लोक मित्र जुलै १९०८

…लै-१९०८. ] ॥ वन्देमातरम्. ॥ [ अंक १ ला.

# लोकमित्र.

## ईश-प्रार्थना.




श्लोक.

ज्याच्या कीर्तीस गाया दिनमाणि दिवसा ठाव घेतो नभांत ।
रात्रीं शीतांशु ज्याचें चरित कथितसे रम्यशा चांदिण्यांत ॥
विश्वाची रम्य शोभा उघड करितसे ज्याचिया वैभवाला ।
गाया स्तोत्रास त्याच्या अवघड न पडे केविं या मंदधीला ॥ १ ॥

ज्याला नाम अनंत अंत न कळे ज्याचा विधीला कधीं ।
ज्याचें रूप अदृश्य दृश्यपरि तें या होय सृष्टीमधीं ।
ज्याची शक्ति अचिंत्य चिंत्य परि ती भक्तांस विश्रांत या ।
जो विश्रांत भरे भरूनहि उरे मी काय वर्णूं तया ॥ २ ॥

आनंदें वर्ष गेलें सुखवुनि सकलां सत्य ज्याच्या कृपेनें ।
केलें तें धन्य ज्याणें अखिल दवडिलें चांगल्या उद्यमानें ॥
आलें हें अन्य पहा बहुत भिववितें आपुल्या उग्ररूपें ।
सत्कार्यीं यास योजा जपुन, मग तुह्मां दे सुखें तें अमूपें ॥ ३ ॥

सत्याचा मूर्त गाभा अखिल जगतिं या सत्य ज्याचें स्वरूप ।
देहीं तें दीप्त होतां सकल जनमना उद्यमीं ये हुरूप ॥
जें जें चैतन्य सारें प्रभुविण दुसरें तें नसे ही प्रचीती ।
येतां या वागतांना महिवर कसली भेडवी त्यास भीती ॥ ४ ॥

आनंदाचा निधी तो प्रकट मिरवतो येथल्या वस्तुजातीं ।
सृष्टीची रम्य शोभा सतत पटविते थोर याची प्रचीती ॥
पाहावें त्या प्रभूनें अमृतमय अशा आपुल्या ईक्षणानें ।
प्रार्थावें काय त्याला बहुतर नकळे याहुनी मानवानें ॥ ५ ॥

सर्वांच्या वर सारखा मिरवतो ज्याच्या कृपेचा कर ।
कैसा होय कृपालु रुष्ट तरि तो या लोकमित्रावर ! ॥
उत्साहें करितात साह्य बहु जे देऊनि याला धन ।
किंवा लेख, तयां जनां सकळिकां रक्षो कृपेचा-घन । ६ ॥

थोरातां थोरता ती अविरत गवसो साह्य आह्मां कराया ।
स्फूर्ती ती आपल्यांना सतत नवारो सच्चरित्रें लिहाया ॥
दर्भा संदर्भ नामी नव नव सुकथा गावया नित्य लाधो ।
कल्लोलस्थांस काव्यीं सरस मधुर वाग्योजना नीट साधो ॥ ७ ॥

## सिंहावलोकन.

अनेक नद्या एकाच पर्वतावरून निघतात, पण त्यांतील एखादी मंदगतीनें चालत करिणीप्रमाणें स्वस्थपणानें वाहत जाते; दुसरी घो घो घो घो शब्द करीत सपाट्यानें आपल्या पदनूपुरांच्या आवाजानें सर्व जनांस थक्क करून त्यांचें मन वेधीत जाते; तों तिसरी एखाद्या कड्यावरून धाडकर

उडी मारून आपल्या प्रचंड वेगानें एखादा धबधबा उत्पन्न करून मानवजातीस मोठी दहशत बसवून जोरानें धांवत जाते; पण पुढें काय ? सर्व नद्यांची एकच अवस्था ! जी उठली ती समुद्राला मिळाली कीं झाला तिचा निकाल ! त्य अनंत व गंभीर सागराच्या पोटांत शिरल्याबरोबर पहिलीची मंदगति, दुसरीची नूपुरगर्जना व तिसरीची धडाडी पार नाहींशी होते; भिन्न स्वरूप कोठेंच दिसत नाहीं व सर्वांस आपल्यांत तन्मय करून टाकणाऱ्या सागराचें एकटें भव्यस्वरूप मात्र दृष्टीपुढें उभें राहतें ! याप्रमाणेंच भूतकाळाची अवस्था आहे. जुनें वर्ष गेलें—पार झालें ! तें अनंतकाळाच्या उदरांत दिसेनासें झालें ! तें भूतकाळाच्या स्वरूपांत मिळालें ! त्याला आतां वर्तमानकाळाचें रूप उरलें नाहीं. काळाच्या अनंततत्वाकडे पाहिल्यावर आमच्या एका वर्षाची काय किंमत ! राष्ट्रच्या घडामोडींकडे लक्ष दिल्यावर आमच्या या एका वर्षाची काय कथा ! परंतु आमचें जें अल्प आयुष्य, फार झालें ह्मणजे शंभर वर्षें त्यांत मात्र या वर्षाची बरीचशी किंमत आहे. कारण आमचें ' अयुष्य शंभर वर्षांचें आहे खरें ' पण त्यांत बाळपणचीं १०।१२ वर्षें, ज्ञानप्राप्तीचीं १०।१२ वर्षें व म्हातारपणचीं कांहीं वर्षें वजा गेल्यावर बाकी जें थोडेंसें आयुष्य राहणार त्यांत आह्मीं काय तो पराक्रम गाजवणार; ह्मणून या अल्पकाळांत आमच्या एका वर्षाची किंमत मोठी आहे, ह्मणून गेलेल्या वर्षांत आह्मीं काय केलें त्याचें सिंहावलोकन करण्याची आमची पद्धती आहे. व्यापारी आपला जुन्या सालचा आढावा काढून नव्या सालाच्या व्यापारास आरंभ करतो, त्याप्रमाणेंच हा कांहींसा प्रकार आहे. तेव्हां सालाबादप्रमाणें गुदस्तांच्या कामाचें आपण सिंहावलोकन करूं.

स्थूलमानानें पाहिल्यास लोकमतांत चरित्रें, निबंध, गोष्टी, स्थलवर्णनें, कविता व किरकोळ विषय, इतकीं सदरें आहेत. देवीकुमुदिनी ही एक कादंबरी चालू आहे. या प्रत्येकबद्दल आपण थोडथोडा विचार करूं.

आलेल्या चरित्रांत राजा भगीरथ हें जुन्या पुण्यपुरुषांचें चरित्र आहे. उद्योगाचें महत्व मनांत ठसण्यास यापेक्षां उत्तम चारित्र कोठलें आणावयाचें ! आणि खरोखर पाहिल्यास कोणीही नशीबवादी होऊं नये अशी परमेश्वरी इच्छा स्पष्ट दिसते. नशीब ह्मणजे तरी काय ? कृतकर्म--पूर्वकर्म—च ना !

मग तो आपला पूर्वजन्मींचा उद्योगच नव्हे काय? संसारांत अनेकविध दुःखें पाठीशीं असतांना जो उद्योगनिरत राहील, त्याची धन्यता काय वर्णन करावी, तो अवर्णनीय आहे!

सावित्रीचरित्र कुलस्त्रियांस वाचण्यास योग्य आहे व तें कुलस्त्रियेच्याच लेखणींतून बाहेर पडलें आहे, ही मोठीच स्पृहणीय गोष्ट आहे. कारण 'आधींच सोन्याचें वरी जडावाचें' या कवीच्या उक्तिप्रमाणें ही गोष्ट झाली आहे व आमच्या वाचकांस तें एक उत्तम लेणें प्राप्त झालें आहे.

शेख फैजी आणि राजा बिरबल हीं मध्यमकालीन पुरुषांचीं चरित्रें आहेत, तींही आपआपल्या गुणांनीं वाचकांस तल्लीन करणारींच आहेत. बिरबलाचें नांव तर आबालवृद्धांस माहीत आहे व अकबर बादशहाच्या नांवाबरोबर बिरबलाच्या नांवाचा उच्चार व्हावयाचा व कोणतीही गोष्ट या दोघांच्या नांवानें बहुधा सांगण्यांत यावयाचीच हा प्रघात सर्वांस माहीतच आहे.

पंतप्रधान थोरले माधवराव व सवाई माधवराव यांचीं नांवें महाराष्ट्रीयांस प्रियच आहेत. माधवरावांची न्यायनिष्ठुरता व सवाई माधवरावांचें खर्ड्याच्या लढाईच्यावेळचें भाषण कोणत्या सहृदय मनुष्यास डोलवणार नाहीं!

न्यायमूर्ति रानडे व तेलंग या दोघांचीं चरित्रें सरकारी नोकरांनीं विचार करण्यासारखीं आहेत. सरकारी नोकरी करून सुद्धां किती चांगल्या गोष्टी करितां येतात हें त्यांपासून शिकण्यासारखें आहे.

बाबू बिपिनचंद्र पाल व लालालजपतराय ह्या मूर्ति आज सर्वांच्या डोळ्यांपुढें आहेत. त्यांनीं भोगलेलीं दुःखें कोणाच्या आठवणींतून गेलीं नसतील! 'हिरा ठेवितां ऐरणीं। वांचे मारितां जो घणीं॥' ह्या तुकारामबोवांच्या उक्तीची वाचकांस यांच्याठिकाणीं सत्यता दिसून येणार आहे.

मनुष्याला बोलण्याचा प्रसंग निरंतर आहे, तेव्हां तें कसें असावें याचा विचार 'बोलणें' या निबंधांत आहे. 'दुर्गतिची माउली' पुष्कळांच्या गळ्यांत पडून आपला पराक्रम गाजवीत आहे, तेव्हां तिचा निषेध करावा तेवढा थोडाच! 'मायेचा बाजार' तर आज अखिल भारतवर्षीयांनीं डोळ्यापुढें ठेवण्यासारखा आहे. म्हातारीची कहाणी ही काहणी म्हणून दूर सारण्यासारखी नाहीं.

'स्वदेशी' हा निबंध वाचावा तेवढा थोडाच! कारण नुसत्या वाचनापेक्षां त्याचा पाठ करून तो विषय अंतरंग व बहिरंग व्यापून उरला पाहिजे. आगलाव्या, याला ह्मणावें स्वकार्यदक्षता, हे निबंध लेखकाची कलमबहाद्दरी दाखऊन वाचकांचें मनोरंजन करितात, यांत शंका नाहीं. समुद्राचा तळ, हिमफेन हे निबंध वाचकांच्या ज्ञानांत भर टाकणारे आहेत. लंदनशहरांतील कांचेचें घर हा लेख इंग्लिशांच्या दीर्घ प्रयत्नांचा आदर्श आहे. पारिसांतील पुस्तकालयें या लेखावरून तद्देशीयांची ज्ञानप्रसार करण्याची उत्कंठा किती हें समजून येतें. रोगपरिहारक विवर परमेश्वराच्या अनेक कौतुकांपैकीं एक कौतुक दाखवून मनुष्यमात्राची त्याच्याबद्दलची पूज्यबुद्धि द्विगुणित करितें. प्रतापगड व अलाहाबाद या ठिकाणांची माहिती महाराष्ट्रीयांस उपयोगी आहे, पण ती यापेक्षां पुष्कळ विस्तृत पाहिजे असें वाटतें. ठिकाणें प्रत्यक्ष पाहून त्यांची माहिती मिळवून ती चटकदार भाषेनें लिहिण्याची कला आमच्या मंडळीस अद्याप साधली नाहीं असें वाटतें. प्रवासवर्णनें व स्थलवर्णनें यांचा अधिक संग्रह होणें इष्ट आहे.

'रमणीय वेंचे' हे नांवाप्रमाणें रमणीय असून वक्ते व ग्रंथकर्ते यांस समयास हात देणारे आहेत.

'ईशस्तवन' ही कविता वर्षारंभीं परमेश्वराचें गुणगायन करिते, केकादासी त्यालाच पुष्टि देते. तों 'भगवत्प्रेमनिर्झर' झुळझुळ वाहात येऊन वारा जसा वृक्षसमुदायास डोलवूं लागतो, त्याप्रमाणें वाचकवर्गास डोलवूं लागतो व कवीबरोबर तन्मयमुद्रेनें गावूं लागून 'असतां तुझिया समीप मी। मग बाळा तुज कायरे कमी ॥' या आशिर्वादोक्तीनें वाचकांस नवी उमेद देतो! इतक्यांत अनुप्रासष्टक 'वाचकांस दे सुखास हीच आस दे विभो' अशा उदात्त वाणीनें ईश्वराची प्रार्थना करितें! जगद्भूमीवरील पात्र भर्तृहरीच्या एका श्लोकाचें स्पष्टीकरण करितें तों दुसऱ्या एका भर्तृहरीच्या श्लोकावरून आमचें प्राचीन वैभव गावयाची दुसऱ्या एका कवीस स्फूर्ति होते! एक कवि प्रीतीचें वर्णन करतो, तों दुसरा कवी 'महाराष्ट्र' कसें असलें पाहिजे हें स्पष्ट सांगतो, इतक्यांत जणूं त्याचीच पुष्टि करण्याकरितां 'स्वातंत्र्यदेवी हंसते अशाला अशा वाणीनें दुसरा कवि गर्जना करतो!

'देवी कुमुदिनी' ही कादंबरी लोकप्रिय झाली आहे हें सांगण्याचें फारसें कारण आतां उरलेंच नाहीं.

याशिवायही लोकमित्रांत पुष्कळ लहान लहान विषय आले आहेतच तेही आपापल्यापरी वाचकांचें मनोरंजन करीत असतीलच. 'भिन्नरुचिर्हि लोकः' तेव्हां प्रत्येकाची आवड निराळी असणारच. आम्हीं आपल्या प्रिय-वाचकांचें मनोधारण करण्याकरितां आपल्या सामर्थ्याप्रमाणें प्रयत्न करीत आहों व त्याचें फळ जें आमच्या नजरेस आलें तें याप्रमाणें वाचकवर्गापुढें ठेविलें आहे. अशीच ही सेवा परमेश्वरकृपेनें व आमच्या वाचकवर्गाच्या सहानुभूतीनें आमच्या हातून सतत घडो असें दयाळू परमेश्वरापाशीं मागणें मागून हा अल्प लेख पुरा करितों.

---

## सद्यःस्थिती.

यासंबंधानें लिहितांना प्रथम हें सांगितलें पाहिजे कीं, सद्यःस्थितीबद्दल जें येथें लिहिण्यांत येत आहे तें हवा, पाणी किंवा इतर कोणतेही देश किंवा लोक यांचेसंबंधानें नसून मुख्यत्वें आपला ह्मणजे हिंदुस्थानदेश व सनातन-धर्मीय लोक यांचेविषयींच थोडक्यांत लिहावें असा विचार आहे. सद्यः ह्मणजे हल्लींच्या आपल्या देशाच्या व लोकांच्या स्थितीविषयीं विचार कर-तांना अर्थात पूर्वस्थिती कशी होती याचा प्रथम विचार केला पाहिजे, कारण तसें केल्याशिवाय पहिली स्थिती चांगली होती कीं, हल्लींची चांगली आहे तें समजणार नाहीं. तसेंच हल्लींची स्थिती चांगली नसल्यास ती वाईट होण्याचें कारण काय आणि ती सुधारण्यास अथवा चांगली होण्यास कांहीं उपाय आहे किंवा नाहीं याबद्दलही विचार अथवा स्पष्टता, करणें भाग आहे. यावरून या विषयाची पूर्वस्थिती कशी होती, हल्लीं कशी आहे, तशी होण्याचीं कारणें काय व ती सुधारण्याचे उपाय कोणते असे निरनिराळे चार विभाग होतात, म्हणून त्यांबद्दल अनुक्रमानें खालीं थोडक्यांत विवेचन केलें आहे.

ग्रंथ आणि इतिहास वाचणाऱ्या सर्व सूज्ञलोकांस माहित आहे कीं, आपला देश पूर्वीं सर्वप्रकारें श्रेष्ठत्वाच्या उंच शिखरास पोंहचलेला होता.

येथील धार्मिक व नीतिसंबंधीं ज्ञान, कलाकौशल्यें, उद्योग, संपत्ती किंवा वैभव, लोकांचे वागणुकीचे रिवाज किंवा सद्गुण हे अप्रतीम अथवा उत्तम होते, ह्मणूनच इतर देशचे लोक या देशाला सुवर्णदेश ह्मणत असत आणि तो पाहण्याकरितां किंवा येथील वैभव हरण करण्याकरितां त्यांनीं अतोनात प्रयत्न केले व त्याकामीं त्यांस यशही आलें, ह्मणजे येथील ज्ञान व संपत्ती त्यांनीं हरण केली इतकेंच नव्हे, येथें त्यांनीं आपली सत्ताही स्थापित केली या सर्वांचा परिणाम असा झाला आहे कीं, हल्लीं हा देश दरीद्र, अनेक स्पर्शजन्यरोग, दुष्काळ अथवा अनावृष्टी, अज्ञान, दुर्गुण, दौर्बल्य इत्यादिकांचें माहेरघर होऊन राहिला आहे. गरीब—बहुधा शेतकरी—लोकांस पुरतें अन्नवस्त्र मिळेनासें झालें आहे. चांगलें धान्य पिकवूनही तें त्यांस खावयास मिळत नाहीं. कपडे पुरेसे नाहींत. त्यांचेऐवजीं थंडीचे निवारणाकरितां शेकण्यास लांकडेंही पुरतीं मिळत नाहींत. ढोरांकरितां चरण वगैरेही पुरीं नसतात. पूर्वीप्रमाणें धान्यसंग्रह व द्रव्यसंग्रह नसल्यामुळें दुष्काळाच्या किंवा अनावृष्टीच्यावेळीं फार त्रास व दुःख भोगावें लागतें. मि. डिग्बीसाहेबांच्या हिशेबावरून पाहतां येथील लोकांच्या रोजच्या उत्पन्नाची सरासरी ६ पै आहे आणि इंग्लंडांत ती दरमाणसीं २—१०—६ पडते. बहुतेक व्यापार व कलाकौशल्यें परदेशाच्या हातांत गेल्यामुळें येथील लोकांनां पुरेसा उद्योग नाहींसा झाला आहे व त्याकरितां परदेशीं गेलेल्या लोकांची दैना होत आहे. आळशी व फुकट खाणाऱ्या अथवा दुराचारी लोकांची संख्या अतोनात वाढली आहे. लोकांत अनेकप्रकारच्या अनहितकारक किंवा दुर्गुणकारक चालींचा व समजुतींचा फैलाव झाल्यामुळें मनस्वी नुकसान होत आहे.

उद्योगाभाव, दरिद्र व अज्ञान यामुळें लोकांत अनीतिचा जोर झाल्यामुळें जो तो आपल्या स्वार्थावर लक्ष्य देत सुटला आहे व त्यामुळें स्वदेशाभिमान, स्वधर्माभिमान, स्वलोकप्रीति ह्मणजे परस्परांशीं प्रीतीची आणि विश्वासाची वागणूक हे मुख्य गुण जे व्यक्तिशः असल्याशिवाय देशस्थिती चांगली राहत नाहीं ते बहुधा नष्टप्राय झाले आहेत. सारांश, पूर्वस्थिती व इतर देश यांशीं तुलना करून पाहतां आपला देश व लोक सध्यां अत्यंत दुःखी व नीचास्थितींत आहेत यांत तिलप्राय संदेह नाहीं. ही गोष्ट इतिहास व वर्तमानपत्रें वाचणारांनां नवीन सांगितली

पाहिजे असें नाहीं. कित्येकांचें ह्मणणें असें आहे कीं, याचें कारण परसत्ता हेंच आहे, परंतु निःपक्षपातानें विचार करून पाहतां हें ह्मणणें केवळ सर्वस्वी वाजवी नाहीं. इंग्लीश लोकांच्या सत्तेमुळें आमचें द्रव्यसंबंधांत जें नुकसान होत आहे त्याचा मोबदला आपणास मिळत आहे. बंदोबस्त, सोई, व्यापार-वृद्धि, न्याय, ज्ञानप्राप्ती चांगली झाली असून ऐक्य व सद्गुण यासंबंधांत आपणांत लायकी आल्यास त्यांचेकडून आपणास विशेष सवलती मिळून सुखवृद्धि होणार आहे. खरोखर पाहतां हल्लींच्या वाईटस्थितीचें मुख्य कारण स्वतः आपणच—आपलें अज्ञान व दुर्गुण—आहों व त्याचमुळें आह्मांवर परमेश्वरकोप झाल्यामुळें अशी स्थिती झाली आहे व जोंपर्यंत आह्मी सुधारणार नाहीं तोंपर्यंत ती नष्ट होणेंही असंभवनीय आहे असें एका अंतरज्ञानी महात्म्यांचें ह्मणणें आहे. परमेश्वरकोपाचें प्रमाण वारंवार पडणारे दुष्काळ किंवा अनावृष्टी, प्लेगासारखे व्याधी हे होत. हे प्रकार कांहीं सरकाराकडून होत नाहींत, किंबहुना हीं अरिष्टें उत्पन्न न होतीं तर परदेशीं जाणाऱ्या द्रव्यासंबंधीं बरेंच नुकसानही भरून येतें. अस्तु. आपल्या देशाला व लोकांनां निकृष्टस्थिती येण्याला आपणच कारण कसे झालों म्हणजे परमेश्वरकोप कशामुळें झाला आणि ही कष्टप्रद स्थिती नष्ट कशानें होईल म्हणजे परमेश्वरकोप कशानें जाईल याविषयीं थोडक्यांत लिहून हा विषय समाप्त करूं.

आपल्या देशाची किंवा लोकांची पूर्वीची उत्तमस्थिती जाण्याला जीं कारणें झालीं त्यांत मुख्य तीन आहेत. पहिलें वैभव अथवा संपत्ती, दुसरें ज्ञातीभेद व तिसरें धर्मज्ञान, यामुळें खालीं लिहिल्याप्रमाणें परिणाम झालेः—

**वैभव अथवा संपत्ती**—यामुळें मनुष्यांत स्वभावतः आळस व ऐषआराम उत्पन्न होतात आणि त्यायोगें उद्योग, कलाकौशल्य व सद्गुण यांचा ऱ्हास होऊन अज्ञान व अनीति वाढतात.

**ज्ञातीभेद**—पूर्वीं आपल्यांत फक्त चारच वर्ण असून त्यांचा बहुधा परस्पर अन्नव्यवहार होण्यास हरकत नव्हती व कनिष्ठ वर्णांतील कन्या श्रेष्ठ वर्णांत करीत असत, मात्र श्रेष्ठ वर्णांतील कनिष्ट वर्णांत देत नसत; तसेंच योग्यतेला अनुसरून एका वर्णांतून दुसरे वर्णांत जातां येत होतें; परंतु मागाहून कित्येक अदूरदृष्टी शास्त्रकारांनीं हे सर्व चांगले प्रकार मोडून

टाकल्यामुळें अनेक ज्ञाती उत्पन्न झाल्या, इतकेंच नाहीं त्यांचा परस्पर अन्न-व्यवहार व विवाहसंबंध बंद झाला. एका जातीचा पुरूष व दुसऱ्या जातीची स्त्री अशांच्या संयोगामुळें अनेक नवीन जाती उत्पन्न झाल्या व होत आहेत आणि या गोष्टीस लौकर कांहीं उपाय न झाल्यास पुढें जितकीं कुटुंबें तितक्या जाती होण्याचा संभव आहे. हल्लीं जातींजातींतही विरोध पहाण्यांत येतो याचें मुख्य कारण जो तो म्हणतो आमची ज्ञाती श्रेष्ठ. ब्राह्मणांचें श्रेष्ठत्व जरी बहुधा सर्वांकडून कबूल करण्यांत येत आहे तरी वर्णाश्रमधर्माप्रमाणें सर्वच ब्राह्मणांचें वर्तन असावें तसें शुद्ध व पवित्र नसल्यामुळें इतर कित्येक ज्ञाती ब्राह्मणांचेंही वर्चस्व हल्लीं कबूल करीत नाहींतसें झालें आहे. बरोबर आहे, उंच जातींतील मनुष्यें अस्वच्छ, किंवा अनितीमान असल्यास त्यांचें श्रेष्ठत्व कनीष्ठ जातीला कसें कबूल होईल? सारांश या ज्ञातीरिवाजामुळें आपसांत विरोध उत्पन्न होऊन सर्व सौख्याचें मूळ जें ऐक्य तें न झाल्याकारणानें निकृष्ठ-स्थितीचें हें एक मुख्य कारण झालें आहे.

**धर्माज्ञान**—आमच्या धर्मापासून उत्पन्न झालेल्या अज्ञानाचे मुख्य प्रकार म्हटले म्हणजे देवकृपेनें किंवा भक्तिनें सर्व मिळतें. भक्तिनें अथवा देवकृपेनें पातकाची क्षमा होते. येथें भक्तीत शरीराचें नुकसान करणारीं व्रतें, उपोषणें व इतरप्रकारचा धर्माचार यांचा समावेश होतो असें समजावें. अतिथीसन्मान, फाजील दया किंवा सहनशीलता, अज्ञानभक्ति (नीतीशिवाय) व सर्व मिथ्या आणि सर्वांचा आत्मा समान मानणें हे प्रकार अज्ञानांपैकींच होत. अलीकडील धर्मशास्त्रकारांनीं अशाप्रकारच्या धर्माज्ञानाचा प्रसार केल्यामुळें खरें धर्मरहस्य व धर्मतत्वमहत्व एका बाजूस राहून असे परिणाम उत्पन्न झाले कीं, लोकांच्या भावांतील किंवा श्रद्धेंतील स्थैर्य नाहींसें झालें, सर्व सद्गुण किंवा नीती आणि सदुद्योग, ज्ञान, पुरुषार्थ वगैरे एका बाजूस राहून आमचे लोकांस सर्वत्र देवच दिसूं लागला त्यामुळें अनेकप्रकारचे निर्जीव पदार्थ, जनावरें वगैरे सर्वच पूज्य होऊन एकठिकाणीं भाव नाहींसा झाला; भक्तिनें सर्व कांहीं मिळतें व होतें अशा समजामुळें अनीती वाढून उद्योग, व्यवहार, वगैरेकडे विशेष ओढा राहिला नाहीं; अतिथीसन्मानामुळें ढोंगी, आळशी, अनाचारी वगैरे लोकांना फावून लक्षावधी फुकट खाणारे लोक पोसले जात आहेत; सर्व मिथ्या या समजानेंही लोकांत उद्योग आणि पुरु-

षार्थाविषयीं औदासिन्य आलें; फाजील सहनशीलतेमुळें इतरांकडून होत असलेल्या दुःखांचा प्रतिकार करणें झालें नाहीं किंवा ईर्षा नष्ट होऊन ती अत्यंत कमी प्रमाणावर ह्मणजे आपसांत कलह इतकीच मात्र राहिली आणि दारिद्रय व अज्ञानामुळें किंवा देवकृपेनें अनितीचा दोष जातो अशा समजामुळें आपसांत कलह, निर्दयत्व व अविश्वास वाढून त्यायोगें ऐक्याचा अधिकच भंग झाला. तसेंच इंग्रजी विद्येमुळें तर धर्ममहत्व मुळींच नाहींसें होऊन कित्येक लोक तर धर्मास ( देवास ) मुळींच मानीत नाहींसे झाले आहेत; व अशा लोकांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे.

वरील प्रकारांशिवाय आमच्या शहाण्या ( ? ) शास्त्रकारांनीं एक अटकेची युक्ति काढली. त्यांनां वाटलें असावें कीं, देशाला अटकेच्या मर्यादा केल्या ह्मणजे लोक देशाबाहेर न गेल्यामुळें येथील संपत्ती व वैभव येथेंच राहतील, पण प्रयत्नांनी पुरुषार्थ वाढतो व संपत्ती किंवा वैभव प्राप्त झाल्यावर जरी त्यामुळें दुर्गुण उत्पन्न होतात, तरी प्रथम ती मिळविण्याकरतां प्रयत्न व पुरुषार्थाची अवश्यकता असल्यामुळें ती ज्यांस पाहिजे असेल ते स्वभावतःच आपले सदहु गुण वाढवितात ही गोष्ट आमचे शास्त्रकारांच्या लक्षांत न आल्यामुळें कोंडून राहिलेले आमचे लोक अज्ञान व अनितीमान बनले आणि बाहेर काय स्थिती आहे तें त्यांस न समजल्यामुळें परदेशीय लोकांपुढें हे लोक अर्थात हतवीर्य झाले. सूज्ञ वाचकहो, विचार करा कीं, अशा प्रकारामुळें परमेश्वरकोप न होईल तर काय होईल व मूर्तींत तरी देवपणा कसा राहील ! व अशा मूर्ती ( अनीतीनें भ्रष्ट झालेल्या ) अन्य धर्मियांकडून फुटल्या गेल्या तर त्यांत नवल तें काय ! ! आमच्या लोकांत दया अथवा सौजन्य व मुख्य धर्मतत्वें चांगलीं असल्यामुळें व आमच्यांतील कित्येक चांगल्या वागणुकीच्या लोकांच्या पुण्याईमुळेंच परमेश्वरानें चांगलें शिक्षण देण्याकरतां सांप्रत आमच्यावर बिकट प्रसंगाची योजना केली नसेल ना ? किंबहुना अनावृष्टीआदि दुःखें आमचे डोळे उघडण्याकरतांच योजिलीं नसतील ना ! कांहींअसो. यावेळीं आमच्या लोकांनीं लौकर सावध होऊन सुधारलें पाहिजे. दुसऱ्याच्या नांवानें रडण्यांत कांहीं अर्थ नाहीं. जें करणें तें सर्व स्वतःच करण्यासारखें आहे.

वर ज्याप्रमाणें सर्व सारांशांत लिहिलें आहे त्याप्रमाणें शेवटीं निकृष्ट-स्थिती जाण्यास उपायही येथें थोडक्यांत आम्हीं हाच सांगतों कीं, प्रथम धर्मतत्वांचें सत्यत्व नवीन पद्धतीनें ह्मणजे पदार्थवादी किंवा अन्यधर्मीयलोक यांसही मान्य होईल अशारीतीनें सिद्ध होऊन मग धर्मातील अज्ञानरिवाज व लोकांतील अनहितकारक प्रकार बंद झाले पाहिजेत, परंतु हें सर्व ऐक्या-शिवाय व्हावयाचें नाहीं. पृथक पृथक लहान लहान प्रयत्न किंवा सभांतून नुसते ठराव किंवा भाषणें यांनीं कांहीं होणें नाहीं. प्रत्यक्ष अंमलबजावणी धर्मैक्याशिवाय होणें नाहीं. हें धर्मैक्य करण्याचा सुलभ उपाय एका महा-त्म्यानें सांगितला असून त्याकडे सर्वांनी मन लावल्यास धर्मैक्य खचीत लौकर साध्य होणार आहे, इतकेंच नव्हे तर त्या धर्मैक्याचा उपयोग कला-कौशल्य, व्यापार, उद्योग अथवा संपत्तीवृद्धीकडेही उत्तमप्रकारें होणार आहे.

अधिकारी.

---

## लोकमान्य बाळ गंगाधर टिळक.



आकृति विशेषेषु आदरः पदं करोति ।

कालिदास.

प्रकृति मनोहर तेथें वद न धरी कोण आदरा जीवा ॥

मोरोपत.

'तिलक' या नांवांत अशी कांहीं जादू भरली आहे कीं, त्या नांवाचा उच्चार होतांक्षणींच ज्याच्या मनांत आनंद, आदर व अभिमान ह्या वृत्ती उचंबळूं लागणार नाहींत असा मनुष्य आर्यावर्तांत सांपडणें दुर्लभ! खऱ्या लोकप्रियतेचें बीज कशांत असतें हें समजून घेण्यास 'तिलक' हें नांव पुरेसें आहे. नुसत्या पैशास किंवा विद्वत्तेस कोणी मान देत नाहीं. यदाकदाचित् दिलाच तर तो परोक्ष व सापेक्ष असतो. लोकांचीं अंतःकरणें आकर्षून घेण्याचें सामर्थ्य एका साधुत्वामध्यें आहे. हें साधुत्व 'वसुधैव कुटुम्बकम्' अशी वृत्ति झाल्याशिवाय अंगीं बाणत नाहीं; ही वृत्ति अंगीं आल्याशिवाय स्वार्थत्याग करणें दुष्कर आहे; व स्वार्थत्यागावांचून लोकप्रियता संपादणें शक्य नाहीं. ज्याच्याठिकाणीं हा स्वार्थत्याग अधिक असतो त्यावर लोकांचें प्रेम जडतें. माझ्यावर प्रेम करा किंवा मला मान द्या असें नुसतें ह्मटल्यानें कोणी कोणावर प्रेम करीत नाहीं किंवा कोणी कोणाला मान देत नाहीं. कारण तसा जुलमाचा राम राम करणें शक्य नाहीं. सारांश स्वार्थत्याग हेंच लोकप्रियतेचें खरें लक्षण आहे व त्यांतच लोकप्रियतेचें बीज आहे. ज्याला म्हणून ती संपादन करावयाची असेल त्यानें आमचे लोक मठ्ठच आहेत, त्यांना विचार नाहीं. ते अंधपरंपरेनें जातात अशी शुष्क ओरड न करितां व त्यांनीं केलेल्या निंदेचा किंवा दिलेल्या त्रासाचा तिरस्कार करण्याचे भरीस न पडतां केवळ निरपेक्षबुद्धीनें व स्वार्थत्यागानें लोकसेवा करावी. महात्म्यांच्या आंगची योग्यता व त्यांचा स्वार्थत्याग हीं त्यांच्या झालेल्या गांजणुकीनें फार चांगलीं निदर्शनास येतात. चंदनाचा परिमल खोड उगाळल्यानें जितका बाहेर पडतो तितका मुग्धावस्थेंत नाहीं? सुवर्णाची शुद्धता अग्नींत तापविल्याखेरीज प्रत्ययाला येत नाहीं. तात्पर्य लोकमित्रांत प्रस्तुत सुरू असलेल्या चारित्रमालेच्या प्रथम पुष्पांत ह्मटल्याप्रमाणें ( गतवर्षींचा जुलैचा अंक पहा ) प्रसंग ही मनुष्याची कसोटी आहे! असो. अशा दर्जाचे सांप्रत आमचे जे काय चार दोन पुढारी आहेत त्यांच्या मेरूभागीं स्थानापन्न होण्याची योग्यता प्रस्तुत चरित्रनायकांशिवाय इतरांस नाहीं! तरी सदरहु स्थलीं आह्मीं वाचकांना त्यांचीच ओळख करून देण्याचें योजिलें आहे.

प्रस्तुत चरित्रनायकांचा जन्म शके १७७८ आषाढ कृष्ण ६ स ( इ. स. १८५६ जुलै तारीख २३ रोजीं ) झाला. त्यांच्या वडिलांचें नांव गंगाधर रामचंद्र. मूळगांव चिखलगांव. सदरहु गांव रत्नागिरी जिल्ह्यापैकीं दापोली तालुक्यांत आहे. गंगाधरपंतांचें बहुतेक आयुष्य शिक्षकाचे धंद्यांत गेलें. ते कांहीं दिवस पुणें मुक्कामीं व नंतर ठाणें येथें अ. डे. ए. इन्स्पेक्टरचे हुद्यावर होते. उत्तम शिक्षक ह्मणून त्यावेळीं त्यांची फार ख्याति होती. ग्रंथकार या नात्यानेंही त्यांनीं आपलें नांव अजरामर करून ठेविलें आहे. त्रिकोणमित्ती ( Trignomitry ) व लघुव्याकरण हीं त्यांचीं पुस्तकें प्रख्यात आहेत. त्यांचें वर्तन अत्यंत बालबोध होतें. त्यांचा अंत इ. स. १८७२ त आगष्ट महिन्याचे ३१ तारखेस झाला.

चरित्रनायकांचा मराठी अभ्यास त्यांच्या वडिलांचे देखरेखीखालींच झाला. इंग्रेजीस आरंभ करावयाचा तोंच गंगाधरपंतांची बदली पुण्यास झाल्यामुळें त्यांचा बहुतेक इंग्रेजी अभ्यासही वडिलांच्याच नजरेखालीं झाला. इ. स. १८७२ त ( वडील निवर्तल्यावर चार महिन्यांनीं ) बळवंतरावजी प्रवेशपरीक्षेंत उत्तीर्ण होऊन डेक्कन्कॉलेजांत गेले. इ. स. १८७५ त ते बी. ए. झाले. बी. ए. च्यावेळीं मात्र पांच सहा महिने ते मुंबईच्या एल्पिष्टन् कॉलेजांत गेले होते; तथापि डेक्कन्कॉलेजाविषयीं त्यांचे मनांत इतका जाज्वल्य अभिमान होता कीं, ते बी. ए. चे परिक्षेस बसतांना डेक्कन्कॉलेजचाच विद्यार्थी ह्मणून परीक्षेला बसले ! आपल्या शाळेचा इतका अभिमान बाळगणारे विद्यार्थी आतां किती सांपडतील बरें !

पाठशाळेंत असतांनाच त्यांची गणीतशास्त्रांतील नैपुण्याबद्दल प्रख्याति झाली होती. असें म्हणतात कीं, गणीतशास्त्राचे प्रोफेसर हॅथार्नवेट हेही प्रसंगविशेषीं बीजगणितांतील गूढ प्रश्न बळवंतरावजीनीं सोडविलेले पाहून चकित होत ! एकदां या साहेबांनीं अडलेलें उदाहरण ‘ उद्यां समजावून देऊं ’ असें सांगून मुलांस सोडून दिलें होतें ! दुसरे दिवशीं बळवंतरावजीनीं तें उदाहरण फळ्यावर करून ठेविलें ! तें पाहून साहेबांना जरी ओशाळल्यासारखें झालें तरी त्यांनीं तसें न दाखवितां ‘ माझाच तो शिष्य आहे ’ असें ह्मणून वेळ मारून नेण्याचा यत्न केला; परंतु बळवंतरावजींनी त्यावेळीं

निस्पृहपणानें उत्तर दिलें कीं, " नाहीं. मी आपला शिष्य नसून केरूनाना छत्र्यांचा आहे ! " आपल्या गुरूबद्दल केवढा हा अभिमान ! हेंच उत्तर त्यांना एम्-ए. च्या परिक्षेंत अपयश येण्यास कारण झालें असें म्हणतात ! असेंच पूर्वी त्यांनीं एकदां शाळेंत असतांना एक अनुनासिक शब्द वेगवेगळ्या तीन प्रकारांनीं ( उदाहरणार्थ ' नंदन ' हा शब्द ' नंदन, ' ' नन्दन ' ' ननूदन ' असा ) लिहिला होता व शिक्षकानें त्या चुक्या धरिल्याबद्दल त्यांच्याशीं भांडण केलें होतें ! इ. स. १८७९ त ते बी. ए. एल्. एल्. बी. झाले.

कॉलेजमध्यें असतांनाच कै. गो. ग. **आगरकर** व चरित्रनायक यांनीं सरकारी नोकरींत न शिरतां लोकशिक्षणाच्या कामांत आपला देह झिजविण्याचें निश्चित केलें होतें; परंतु आगरकर एम्. ए. ची परीक्षा देण्याचे नादीं लागल्यामुळें **बळवंतराव**जींना कांहींकाळ स्वस्थ बसावें लागलें; परंतु सुदैवानें त्यांची व लोकशिक्षण देण्याच्या इरायानें सरकारी नौकरीला तिलांजुली देऊन बसलेले कै. **विष्णुशास्त्री** चिपळूणकर यांची भेट झाली. उभयतांचाही उद्देश एकच असल्यामुळें त्यांनीं " मानवीसुधारणेचें पाऊल पुढें पडत जाऊन राष्ट्राच्या भौतिक, नैतिक व धार्मिक सुखाची अभिवृद्धि करणाऱ्या साधनांपैकीं अत्यंत श्रेष्ठ साधन जें शिक्षण त्याचा फैलाव करणें इष्ट व श्रेयस्कर अशा समजुतीनें इ. स. १८८० च्या जानेवारीचे दोन तारखेस नवीन इंग्रजीशाळा ( न्यू इंग्लिश स्कूल ) स्थापन केली व आम्हां आर्यांमध्यें असणाऱ्या कर्तबगारी, गुणसमुच्चय वगैरे गोष्टींचें उदाहरण जगापुढें मांडिलें. सदरहू शाळा कशी काय चालली आहे हें येथें सांगावयास नको आहे कारण तें सर्वांना महशूर आहे.

शाळेंत शिरल्यापासून तों तहत् तिजपासून आपला संबंध तोडून घेईपर्यंत बळवंतरावजींनीं तिची सेवा एकनिष्टपणें केली. त्यांच्याकडे गणीत हाच विषय जरी सोंपविलेला होता तरी ते सर्व विषयांत पूर्ण निष्णात असल्यामुळें वाटेल तो विषय घेत. ' हा विषय माझा नाहीं मी तो घेत नाहीं ' अशी त्यांनीं कधींही तक्रार केली नाहीं. अडलेलें काम संभाळून न्यावयाचें हा त्यांचा बाणा असे.

कै. विष्णुशास्त्री चिपळूणकरांनीं न्यू इंग्लिशस्कुलाची स्थापना केली त्याचवेळीं ' केसरी ' व मराठा अशीं दोन वर्तमानपत्रें सुरू केलीं. केसरीच्या संपादकाचें काम कै. आगरकरांकडे असून मराठ्याचें बळवंतरावजींकडे होतें. हीं वर्तमानपत्रें काढण्याचा हेतु केवळ उदरंभरण नसून मायभाषेची व देशाची सेवा करून वर्तमानपत्रकर्त्यांवर खरी खरी जबाबदारी काय असते हें लोकांचे निदर्शनास आणून द्यावयाचा होता व तो त्याप्रमाणें त्यांनीं दिलाही ! हीं पत्रें सद्धेतूनें काम करीत असून त्यांचे चालक स्वकार्यदक्ष असल्यामुळें थोडक्याच काळांत यांचा चांगलाच अभ्युदय झाला; परंतु मध्यंतरींच या दोघांही भावंडांवर एक भयंकर किटाळ आलें. तें किटाळ ह्मटलें ह्मणजे कोल्हापुरचें प्रसिद्ध ' बरवेप्रकरण ' होय ! सदरहू प्रकरणांत आगरकर व चरित्रनायक या उभयतांसही १०१ दिवसांची साधी कैद भोगावी लागली ! ग्रीसदेशस्थ तत्ववेत्ता युरोपियन तुकाराम-साक्रेतीस, याच्या कारागृहवासानें तेथल्या बंदीशाळेला ज्याप्रमाणें महत्व आलें त्याचप्रमाणें या विद्वद्वर्यांच्या सहवासामुळें डोंगरीचें नांव महाराष्ट्रांत मशहूर झालें.

कै. आगरकरांनीं आपलें विकारविलसित-ह्याम्लेट-नाटक याचठिकाणीं लिहिलें. या संकटामुळें या मित्रद्वयाला कांहींकालपावेतों शारिरिक यातना सोसाव्या लागल्या खऱ्या परंतु त्याबद्दल त्यांना लोकोत्तर मान मिळाला, आणि, " कालागरुर्दहनमध्यगतः समंताल्लोकोत्तरं परिमलं प्रकटी करोति " या न्यायानें देशकार्य करण्याची त्यांची उमेद उत्तरोत्तर वाढत गेली.

यापुढें कांहीं अपरिहार्य कारणामुळें बळवंतरावजींस न्यूस्कूलचे संस्थेंतून आपलें अंग काढून घ्यावें लागलें; परंतु आश्चर्याची गोष्ट ही कीं, त्यांनीं त्या संस्थेमधून जरी आपलें अंग काढून घेतलें तरी पण त्यांचें त्या संस्थेवरील प्रेम आजतागाईत कमी झालेलें नाहीं ! असें सांगतात कीं, पुढें पुण्यांतील इतर शिक्षणसंस्थांनीं बळवंतरावजींस आपल्याकडे ओढून घेण्याचा प्रयत्न केला परंतु ' विषवृक्षोऽपि संवर्ध्य च्छेत्तुमसांप्रतम् ' या न्यायानें बळवंतरावजींच्या हातून तसें झालें नाहीं ! याचवेळीं बळवंतरावजींकडे केसरीच्या संपादकाचें काम आलें.

पुढें त्यांनीं लॉ क्लास सुरू केला. तो बरींच वर्षें चांगला चालला होता; परंतु कालांतरानें त्यांना तो बंद करावा लागला !

सन १८९१ सालीं हिंदुस्थानसरकारनें कंसेंट बिल् ( संमतिवयाचा कायदा ) कांहीं फाजील सुधारणाभक्तांच्या चिथावणीला भुलून पास केला ! त्यावेळीं तो कायदा न होऊं देण्याबद्दल बळवंतरावजींनीं आपली शिकस्त केली पण त्यांना यश आलें नाहीं ! प्रसंगविशेषीं हा अनर्थोत्पादक कायदा आमचें, आमच्या अब्रूचें सारांश आमच्या सर्वस्वाचें मातेरें करून टाकण्यास कसा कारणीभूत होतो हें कांहीं उदाहरणांवरून लोकांचे निदर्शनास आलेंच असेल.

इ० स० १८९३ त चरित्रनायकांनीं 'ओरायन' नामक ग्रंथ लिहून प्रसिद्ध केला. सदरहु ग्रंथांत वेदांचा काल ठरविण्याचा प्रयत्न केलेला आहे. या ग्रंथावरून गणीत, ज्योतिष, खगोल, भूगर्भ इत्यादि शास्त्रांतील व संस्कृतभाषेंतील त्यांचें अप्रतिम प्राविण्य दृग्गोचर होतें ! हा ग्रंथ पाहून माक्षमुल्लरभट्टासारखे परदेशस्थ पंडितही आश्चर्यानें अगदीं थक्क होऊन गेले ! या ग्रंथाच्या प्रकाशनानें बळवंतरावजींचा कीर्तिदुंदुभी संपूर्ण विद्याविभूषित व सुधारलेल्या राष्ट्रांमध्यें यावच्चंद्रादिवाकरौ दुमदुमत राहील यांत नवल नाहीं !

" श्रुताध्ययनसंपन्नाक्षर्मज्ञाः सत्यवादिनः ॥ राज्ञासभासदः कार्या रिपौ मित्रेच ये समाः " या याज्ञवल्क्य–वचनावरून जी–ज्युरीची पद्धति आमच्या देशांत न्याय देण्याचे कामांत अमलांत होती व जी इंग्रजसरकारानेंही इ. स. १८६२ सालापासून आमच्याकडे प्रथमतः फौजदारी काम चालविण्याच्या कायद्यानें सुरू केली–तीवर गदा आणण्याचा तत्कालीन बड्या लाटसाहेबांचा विचार चालू होता ! परंतु यावेळीं सरकारी अधिकाऱ्यांच्या खलित्यांत 'ज्यूरीपद्धती' विरुद्ध म्हणून नमूद केलेल्या गोष्टींच्या स्वरूपाची बळवंतरावजींनीं आपल्या लेखांत चांगलीच छान केली व सुदैवानें त्यांच्या त्या लेखांना त्यावेळीं अपेश आलें नाहीं.

इ. स. १८९३ सालीं कांहीं अकल्पित कारणानें हिंदु व मुसलमान या उभयज्ञातींत प्रभासपट्टण येथें भयंकर दंगा झाला ! सांथीप्रमाणें तो पसरत पसरत मुंबईपर्यंत येऊन भिडला व पुढें उत्तरोत्तर त्याच्या ठिणग्या जागोजाग उडून महाप्रलय झाला ! वस्तुतः आह्मां दोघांचेही मानेवर एकच जड जूं असून आम्हीं आपापसांत भांडावें हें केवढें आश्चर्य !

यावेळीं बळवंतरावजींच्या स्पष्टवक्तेपणाची व देशबंधूंच्या कळकळीची खरी खरी कसोटी लागली. केसरीच्या एकनिष्ठ देशसेवेची कल्पना अगदीं अशिक्षितांपर्यंत जाऊन पोंहचली !

गेल्यावर्षीच्या प्रथमांकांत सिद्ध करून दाखविल्याप्रमाणें राष्ट्राची स्थिती देहासारखी आहे ! देह सुधारावयाचा असल्यास एकाच अवयवाकडे लक्ष्य पुरपून जसें भागत नाहीं तसेंच राष्ट्राचेंही आहे. देशाची सुधारणा करावयाची असल्यास त्याच्या औद्योगिक, व्यापारी, राजकीय, सामाजिक वगैरे सर्व अवयवांकडे लक्ष्य दिलें पाहिजे ! याच न्यायाला अनुसरून आह्मांत धार्मिक चेतना वाढविण्याकरितां त्यांनीं श्री गणपत्युत्सवाला नवें सार्वजनीक वळण दिलें. समाजाच्या उत्कर्षास अत्यंत आवश्यक अशा संघशक्तीच्या क्रियांचा गणपत्युत्सव हा सांप्रतच्या स्थितींत 'श्रीगच' आहे असें ह्मणण्यास प्रत्यवाय नाहीं !

'ज्यास पूर्वकाल नाहीं त्यास उत्तरकाल नाहीं' अशा अर्थाची एक प्रचलित ह्मण आहे. ह्या ह्मणीची सत्यता विचार केला असतां सहज पटते. पूर्वीं आपण कसे होतों हें समजलें व पूर्वींच्या व सांप्रतच्या स्थितींत कोणते इष्ट अगर अनिष्ट बदल झाले आहेत हें ध्यानीं आलें तरच मनुष्यमात्र अवनतीच्या फेऱ्यांतून सुटून उन्नतीच्या शिखरावर चढण्यास समर्थ होतो. पूर्वीं आपण कसे होतों हें समजण्यास त्या कालांतील वस्तुस्थिति डोळ्यांसमोर आणणें अथवा असणें यासारखें दुसरें उत्तम साधनच नाहीं. हें साधन आह्मांला साध्य करून देण्याकरितां बळवंतरावजींनीं श्री शिवाजी-जयंत्युत्सव सुरू केला. सदरहू उत्सव दिवसेंदिवस वाढत्या प्रमाणावर आहे हें सांगावयास नकोच.

इ. स. १८९५ सालीं चरित्रनायक मध्यभागच्या तर्फेनें कायदेकौंसिलांत लोकनियुक्त सभासद ह्मणून निवडून आले. कौंसिलर झाल्यापासून त्यांनीं आपले विचार भीडमुरवत न धरितां मुद्देसूद व सप्रमाण रीतीनें सरकारापुढें मांडण्यास कधींही कसूर केली नाहीं !

इ. स. १८९४ च्या राष्ट्रीयसभेपर्यंत राष्ट्रीयसभेचें व सामाजिक परिषदेचें आधिनिवेशन एकाच मंडपांत होत असे. परंतु इ. स. १८९५ त बळ-

वंतरावजींनीं कै. श्रीधर विठ्ठल दाते यांच्या साह्यानें मोठ्या शिताफीनें राष्ट्रीयसभेस सामाजिक परिषदेच्या कचाटींतूत मुक्त केलें ! राष्ट्रीयसभेप्रमाणें ही सामाजिक परिषद सर्वप्रिय नाहीं. या बाबतींत त्यांना सुधारकांच्या निराधार वाक्प्रहाराचें खंडनार्थ लेखणीला व वाचेला बरेंच शिणवावें लागलें ! त्यांचे निरर्गल प्रलाप व कुटाळकी यांचा असह्य भडिमार सोसावा लागला; परंतु त्या सर्वांस दाद न देतां केवळ राष्ट्रीयहिताकडे लक्ष्य देऊन राष्ट्रीय-सभेचे आपण कट्टे भक्त आहोंत हें त्यांनीं सर्वांच्या दृष्टीस आणून दिलें. प्रतिपक्ष कितीही निंदो, खरा मार्ग सोडावयाचा नाहीं हा त्यांचा बाणा या प्रसंगाइतका इतर थोड्याच प्रसंगीं दिसून आला असेल !

इ. स. १८९६ सालापासून आर्यावर्तांत ब्यूबॉनिकप्लेग ह्मणून एक नवी-नच रोग उत्पन्न झाला आहे. प्रथम या रोगानें आपला छापा मुंबईत मांड-वीवर घातला. आतां तर त्यानें सर्व देशभर फेरी करून सोडिली आहे ! सर-कारानें सेग्रिगेशनें, क्वारंटाइनें काढून या रोगाचा उच्छेद करण्याचा प्रयत्न केला पण त्यांत यश आलें नाहीं ! पुण्यास मि. र्‍यांडसाहेबांनीं—सद्धे-तूनेंच—प्लेग बंद करण्याकरितां प्रजाजनावर अनन्वित जुलूम केला ! त्यामुळें चिडून जाऊन कोणी माथेफिरूनें त्यांचा व क्याप्टन् आयर्स्ट यांचा ज्युबि-लीचे दिवशीं रात्रीं खून केला ! याच संधीस केसरीवर सरकारानें राजद्रो-हाचे संशयावर फिर्याद केली ! व याचवेळीं नातू बंधुद्वयालाही कांहीं अतर्क्य कारणावरून कैद केलें होतें. हायकोर्टांत महिना दोन महिनें खटला चालून चरित्रनायकांना ना. स्ट्रॉची साहेबांनीं दीड वर्षांची सक्त मजूरीची शिक्षा दिली ! पुढें कांहीं अकल्पित कारणानें—कोणी ह्मणतात डॉ० मोक्ष-मुल्लरभट्ट यांच्या खटपटीनें—त्यांस सरकारनें मेहेरनजरेनें शिक्षेची मुदत संपण्यापूर्वींच चार महिनें अगोदर सोडून दिलें !

कोल्हापूरचे राजगुरु श्री. बाबामहाराज यांनीं मरतेवेळीं बळवंतरावजींना आपल्या मालमत्तेचें संगोपन करण्याकरितां पंच ( ट्रस्टी ) नेमिलें होतें. बाबामहाराजांचे पश्चात् सर्व पंचांनीं मिळून बाबामहाराजांचे विधवापत्नीचे—ताईमहाराजांचे—मांडीवर औरंगाबादेचा जगन्नाथ नांवाचा एक लहान मलगा दत्तक दिला. पंचांचे ताब्यांत जिनगी असून दत्तकपुत्र लहान अस-

त्यामुळें ताईमहाराजांना आपल्या मनाप्रमाणें द्रव्याचा सदुपयोग ! करितां येईना; तेव्हां त्यांनीं कोल्हापूरच्या बाळासाहेब पंडित नांवाच्या आपल्याहून दोनचार वर्षांनीं मोठा असणाऱ्या वीसबावीस वर्षांच्या अर्भकास पुन्हां दत्तक घेण्याचा फार्स करून बिचाऱ्या जगन्नाथास दूर करण्याचा प्रयत्न केला ! आपली मनीषा पूर्ण करण्याकरितां त्यांनीं बळवंतरावजींवर फिर्याद केली ! सरकारनेंही त्यांच्यावर खोटी जबानी दिल्याचा आरोप लादून ताईमहाराजांना त्यांच्यावर फौजदारी करण्याची परवानगी दिली ! परंतु सत्याचा वाली परमेश्वर असल्यामुळें हायकोर्टांत खटला गेल्यावर चीफ जस्टिस् सर जेन्किन्स् यांनीं त्यांस मोठ्या आदरानें दोषमुक्त केलें !

इ. स. १८९६ च्या दुष्काळाचेवेळीं दुष्काळग्रस्त शेतकरी लोकांना सरकारांतून साऱ्याची तहकुबी अगर सूट मिळवून देण्याचे कामीं बळवंतरावजींनीं अतोनात परिश्रम घेतले. सार्वजनीक सभेमार्फत रा. साठे, आपटे वगैरे स्वयंसैनिकांस पाठवून लोकांना फ्यामिनकोड 'दुष्काळाचा कायदा' समजाऊन देवविला ! या व प्लेगचेवेळीं हिंदू प्लेग हॉस्पिटल् उघडून त्यांनीं महाराष्ट्रावर जे उपकार करून ठेविले आहेत त्यांची भरपाई आमचे हातून होणें खरोखरच दुष्कर आहे !

बी. ए. एल. एल्. बी. पास झाल्यापासून त्यांनीं स्वतःचे उदरंभरणार्थ वकीली कधींही केली नाहीं. परंतु बापटकमीशनचे व हिंदूमुसलमानांचे दंग्याचेवेळीं त्यांनीं वकील या नात्यानें निरपेक्षबुद्धीनें जी कामगिरी बजाविली ती केवळ अवर्णनीय होय ! इतरांस मदत करणें हेंच माणुसकीपैकीं प्रधान अंग आहे. हें अंग त्यांच्यामध्यें असामान्यरीतीनें हजर आहे. हें स्पष्टपणें सांगावयास पाहिजे असें नाहीं. त्यांच्या लेखांत, वागण्यांत व बोलण्यांत सारांश प्रत्येक व्यापारांत हें दृष्टिगोचर होतेंच होतें ! कोणीही मनुष्य--वाणी, उदमी, शेटसावकार, कुळंबी, माळी, सुशिक्षित अशिक्षित--त्यांजकडे गेला तर त्यांची भेट घेण्यास वर्दी लागत नाहीं व त्याचप्रमाणें त्यांचीं हकीकत ऐकिल्यावर खरा खरा सल्ला देण्यांत त्यांजकडून कधींही कसूर होत नाहीं ! माणुसकीचें दुसरें अंग ह्मटलें ह्मणजे उद्गार व क्रिया यांचा मेळ ठेवणें हें होय, ह्यांचीही त्यांच्यामध्यें उणीव नाहीं. थोडक्यांत

सांगावयाचें ह्मटलें ह्मणजे सत्यपक्षपातित्व व कार्यदक्षता ह्या दोहींचे बजावणींत राजा भर्तृहरीच्या—

‘ गुरुं वा बालवृद्धौ वा ब्राह्मणं वा बहुश्रुतम् ।
आततायिनमायान्तं हन्यादेवाविचारयन् ॥ १ ॥ ’

ह्या उक्तीला डोळ्यासमोर ठेवून तदनुरूप वर्तन करणें हेंच त्यांचें मुख्य ब्रीद आहे.

असो. इ. स. १९०५ च्या अक्टोबर महिन्याच्या १६ व्या तारखेला लॉर्डकर्झनसाहेबांनीं बंगालची फाळणी करून वंगदेवीला छिन्नभिन्न केलें ! कित्येकजण या बाबतींत त्यांना दोष देतात; परंतु त्यांनीं तसें करण्यांत आमच्यावर अपकार केला नसून एकप्रकारें उपकारच केला ! कारण त्याचा परिणाम स्वदेशी चळवळीवर होऊन ती पूर्ण वाढीस लागली ! बहिष्कार योगाचें साम्राज्य सुरू झालें ! तरुणपिढीच्या मनांत राष्ट्रियत्वाचें वारें खेळूं लागलें व जुन्या आशावादी लोकांचीं मनें निराश व निरुत्साह झालीं. अशाप्रकारें विचारांची एकदम क्रांति घडून आल्यामुळें समाजसमुद्र खवळून गेला, परंतु लाल-बाल-पाल या त्रयीनें सुकाणू आपल्या हातीं घेतल्या-कारणानें आजपावेतों नवीन चळवळीचें तारूं आपला मार्ग धीरे धीरे व धिम्मेपणानें आक्रमण करीत होतें पण आतां सरकारचा रोषरूपी खडक त्याच्या मार्गांत आडवा आल्यामुळें त्याची गति कुंठित होऊन तें त्याच्यावर एकदम आपटून व फुटून रसातळीं जातें कीं काय अशी जबरदस्त भीती वाटूं लागली आहे ! गेल्यावर्षीं सुरत मुक्कामीं भरलेल्या राष्ट्रीयसभेंत जुन्या व नव्या पक्षांत वितंडवादाचीं रणें माजून हातघाईपर्यंतही प्रसंग येऊन ठेपला, कित्येकांचीं डोकीं फुटलीं, कित्येकांच्या गालफडांत जोडे बसले व अखेर दुफळी झाली ! हा सर्व प्रकार त्यावेळीं प्रत्येक वर्तमानपत्रांत येऊन गेला असल्यामुळें त्याचें आतां पुन्हां चर्वितचर्वण करण्याचें वस्तुतः प्रयोजन नव्हतें ! परंतु प्रसंग ओघालाच आल्यामुळें त्याचें येथें दिग्दर्शन करणें भाग पडलें ! असो. या आमच्या आपापसांतील यादवींत नवीन पक्ष अंशतः विजयी झाला व मवाळी पक्ष पूर्णपणें डबघाईला येऊन त्यानें प्रयागतीर्थीं कन्व्हेन्शन भरविलें व आपली जास्त विडंबना करून घेतली ! या बाबतींत

नवीन पक्षाला प्रोत्साहन मिळून जें थोडें बहुत यश मिळालें त्याचें सर्व श्रेय आमच्या आजच्या चरित्र नायकाला आहे ! इ. स. १८९५ सालीं राष्ट्रीय सभेला सामाजिक परिषदेच्या पेचाटींतून मुक्त करण्याकरितां बळवंतरावजींना जितकी यातायात पडली तितकीच किंबहुना कांकणभर जास्तच या खेपेला पडली ! या सर्व अडचणीस व यातायातीस न जुमानतां त्यांनीं हा गाडा आपल्या विलक्षण चातूर्यानें, कर्तबगारीनें व धाडसानें सुरळीत चालविला होता परंतु मध्यंतरींच–प्रेसअॅक्ट व एक्सप्लोझिव्हअॅक्ट असे दोन देवमासे उसळून त्यांनीं ही आमची नवीन चळवळीची नौका आडवून धरली व आमच्या या चतूर दर्यावर्द्यास सन् १९०८ जून तारीख २५ रोजीं खालीं खेंचलें !

तात्पर्य संगीत शारदा नाटकांत कोदंडानें ह्मटल्याप्रमाणें—

जो लोककल्याण । साधावया जाण ॥
घेई करीं प्राण । त्या सौख्य कैचें ॥ १ ॥
बहू कष्ट जीवास । दुष्टान्न उपवास ॥
कारागृहीं वास । हे भोग त्याचे ! ॥ २ ॥

हेंच खरें !

सारांश खऱ्या लोकनायकांवर अशीं संकटें यावयाचींच व तेही तीं–आलीं असतां न डगमगतां त्यांस तोंड द्यावयास सदैव तयार असतात; ते अशावेळीं कचरून कधींही माघार घेत नाहींत ! हा जो लोकनायकांचा मुख्य गुण तो कित्याप्रमाणें पुढें ठेवून राष्ट्रभक्त म्हणविणाऱ्या लोकांनीं त्याप्रकारें वर्तन केल्यास कितीतरी काम होणार आहे ! ज्या जगच्चालकाच्या इच्छामात्रेंकरून आमच्या चरित्रनायकावर प्रस्तुत संकट ओढवलें आहे त्यांतून ते त्याचीच इच्छा असल्यास लवकरच मुक्त होतील हें निर्विवाद आहे. तो धन्य दिवस दिसेपर्यंत ' तो सुदिन आह्मांला लवकर दाखीव ' असें ह्मणून त्या करुणेशाची करुणा भाकण्या पलीकडे आमच्या हातीं काय आहे !!!

असो. अशाप्रकारच्या आपल्या अनेक लोकोत्तर सद्गुणांच्या योगानें बळवंतरावजी मथळ्यावरील कालिदासाच्या उक्तीनुरूप अखिल आर्यावर्तांत आबालवृद्धांस अत्यंत आदरणीय झालेले आहेत ! हिंदुस्तानांतील कोणत्याही भागांत ज्याला ह्मणून सामाजिक व राजकीय माहिती आहे त्याच्या तोंडून,

महाभाग बळवंतराव टिळकांचें नांव निघाल्याबरोबर त्यांच्या एकनिष्ट देशसेवेबद्दल चार शब्द बोलल्याशिवाय राहवत नाहीं! ह्यांच्या कडकडीत लोकसेवेबद्दल अगदीं अशिक्षित लोकांपैकीं देखील कांहींच्या मनावर विलक्षणप्रकारचा ठसा मुद्रित झालेला आढळतो! “ फार काय कित्येक लोक तर त्यांना “ दक्षिणचे अनभिषिक्त राजे ” म्हणतात! सकृद्दर्शनीं प्रस्तुत गोष्ट कित्येकांना-अर्थात् बळवंतरावजींच्या लोकप्रियतेचा हेवा करणारांना-खोटी वाटत असेल परंतु आमच्या ऐकिवांत असें आहे कीं, एकदां सरकारानें “ असा हा टिळक आहे तरी कोण? ह्मणून पुण्याचे कलेक्टरास प्रश्न विचारला होता! त्यावेळीं त्या कलेक्टरनें असें लिहून धाडिलें होतें कीं, ‘ टिळक ह्मणजे पुणें व पुणें ह्मणजे टिळक! ’ परंतु लेखकाच्या मतें सदरहू उत्तर ‘ टिळक ह्मणजे महाराष्ट्र व महाराष्ट्र ह्मणजे टिळक असें हवें होतें!

—अनंत तनय.—

## सिंहस्थ.

सिंहस्थ ह्मणजे गुरु सिंहराशीला येणें. गुरु हा ग्रह १३ महिन्यांत १ राशी भोगितो, ह्मणजे १३ वर्षांनीं पुन्हा त्याच राशीला येतो ह्मणून १३ वर्षांनीं सिंहस्थ येतें. सिंहराशीला गुरु असतां कोणकोणतीं शुभकृत्यें करूं नयेत त्याबद्दल आपल्या शास्त्रांत सांगितलें आहे. तें असें:—

संन्यासो देवयात्रा व्रतनियमविधिः कर्णवेधस्तु दीक्षा ।
मौंजीबंधोंगनानां परिणय न विधिर्वास्तु देवप्रतिष्ठा ॥
वर्ज्याः सद्भिः प्रयत्नात् त्रिदशपतिगुरौ सिंहराशि स्थितोवा ।”

संन्यास, महायात्रा, व्रतें, कान टोंचणें, यज्ञदीक्षा, मुंज, लग्न, वास्तु इत्यादि शुभकर्में, सिंहराशीस गुरू असतां करूं नयेत; ( गुरूचा अस्त असतां किंवा तो नीच राशीस असतांही हीं कर्में वर्ज आहेत ) असें शास्त्रांत सांगितलें आहे; पण अति अडचणीचे प्रसंगीं अपवादादाखल शुभकृत्यें करण्याची शास्त्राज्ञा आहे:—१ सिंहराशीचे १३ अंश २० कलांपासून १६ अंश ४० कलांपर्यंत तरी शुभकृत्यें करणें वर्ज्य आहे. २ गोदावरीचे उत्तरेस व भागीरथीचे दक्षिणेस असलेल्या प्रदेशांशिवाय इतर स्थळीं सिंहस्थ गुरूचा दोष नाहीं. ३ मेषराशीचा सूर्य असतां सिंहस्थ गुरूचा दोष नाहीं; आणि ४

माघ शु०॥ १५ च्या दिवशीं दिवसा मघा नक्षत्र असेल तर सिंहस्थ गुरूचा दोष समजावा; तसें नसेल तर दोष नाहीं. असे चार अपवाद आहेत. सिंहस्थांत अन्य तीर्थांपेक्षां गोदावरीच्या स्नानाचें महात्म्य विशेष वर्णन केलें आहे.

" षष्टिवर्षसहस्राणि भागिरथ्यावगाहनं ।
सकृद् गोदावरीस्नानं सिंहस्थे च बृहस्पतौ ॥
" सिंहस्थिते सुरगुरौ दुर्लभा गौतमी नृणां ।
भागीरथी नर्मदा च यमुना च सरस्वति ॥
आयांति भीमरथ्याद्याः स्नातुं सिंहगते गुरौ ।
विहाय गौतमीं गंगां तीर्थान्यन्यानि सेवितुं ॥ "

" जेव्हां सिंहराशीचा गुरु असतो तेव्हां जे पुण्यवान् पुरुष गोदावरीचें स्नान करतात, त्यांनां साठहजार वर्षें भागीरथीचें स्नान केल्याचें पुण्य प्राप्त होतें. सिंहराशीचा गुरू असतां गोदावरीचें स्नान मनुष्यांनां दुर्लभ होय. भागीरथी, नर्मदा, यमुना आणि सरस्वति या पुण्य नद्यांत स्नान केल्याचें फल त्यावेळीं गोदास्नानानें प्राप्त होतें. इत्यादि. "

यावरून सिंहस्थांत गोदावरीस्नानाचें महात्म्य सहज कळून येईल.

चालू वर्षीं ह्मणजे शके १८३० कीलकसंवत्सरीं, श्रावण शु. २ गुरुवारीं घटी ४६ पळें ५६ यासमयीं, सिंहराशीचा गुरु होतो. म्हणून तो सिंहराशीला असेपर्यंत भाविकजनांनीं गोदास्नान करून इहपरत्र सुखदायक असें महत्-पुण्य जोडावें.

थोरात.

## श्रीक्षेत्र नाशीक.

येत्या श्रावण शु. २ स सिंहराशीस गुरु येतो. सिंहस्थांत, गोदास्नानाचें पुण्य किती आहे, हें वर सांगितलेंच आहे तेव्हां श्रद्धाळू लोक यंदा गोदा-स्नानाकरितां आपल्याकडील पुराणप्रसिद्ध क्षेत्र जें नाशिक तेथें जातील. त्यांत लोकमित्राचे प्रीय वाचकही कांहीं असतील. त्यांच्या माहितीकरितां, श्रीक्षेत्र नाशिक व त्र्यंबक आणि त्या क्षेत्रांत असलेलीं मुख्य मुख्य अन्य पवित्र स्थळें यांचें त्रोटक वर्णन आज येथें देत आहों.

श्रीक्षेत्र नाशिक हें पुरातनकालापासून प्रसिद्ध आहे. याला नाशिक असें नांव पडण्याला कारण, श्रीरामचंद्र वनवासांत असतां, या स्थळीं त्यांनीं लक्ष्मणाकडून रावणाची बहीण जी मायावी शूर्पणखा, तिचें नाक कापविलें हें होय, असें रामायणांत सांगितलें आहे. तात्पर्य काय कीं, रामायणकालापासून हें क्षेत्र अखिल भारतवर्षात प्रसिद्ध आहे. नाशिकांत श्री बालाजी, सुंदरनारायण, रामचंद्रजीचें मंदीर, महान् साधु देवमामलेदार यांचें मंदीर इत्यादि मनोहर स्थळें पहाण्यासारखीं आहेत. गोदावरीच्या पलीकडील तीरावर पंचवटी आहे. पंचवटींत काळाराम, मुरलीधर, कपालेश्वर, नारोशंकर, यांनीं बांधिलेलें मंदीर, सीतागुंफा, इत्यादि स्थळें पहाण्यासारखीं आहेत. सीतागुंफेंत दिवसासुद्धां अगदीं अंधार असतो. म्हणून ती पहाण्याकरितां बरोबर उजेड घेऊन जावें लागतें. उजेड दाखविणारीं माणसें तेथें तयार असतातच! या गुंफेंत जाण्याची वाटही बिकटच आहे. कांहीं ठिकाणीं बसून व कोठें कोठें तर भुईसरपट जावें लागतें! त्या गुंफेजवळच दुसरी एक गुंफा असून तींत पंचरत्नेश्वर महादेव आहे. ही गुंफा फारच खोल आहे. सध्यां ती बंद केलेली आहे असें ह्मणतात.

या पंचवटींतच रामानीं बरेच दिवस निवास केला होता. याच ठिकाणाहून रावणानें श्रीसीतेचें हरण केलें.

येथून कोस दीडकोसावर तपोवन आहे. याच तपोवनांत गौतमऋषींचा आश्रम होता असें ह्मणतात. सांप्रतही हें स्थळ मोठें रमणीय आहे. हें स्थळ पाहून अद्यापिही प्राचिन ऋषींच्या आश्रमस्थानाची कल्पना करितां येते. तपोवनांत पूर्वकालीं बांधिलेलीं कांहीं स्थानें असून सध्यां तीं मोडून तोडून गेल्यामुळें, त्यांच्या खुणा मात्र दृष्टीस पडतात. भारतांत वर्णिलेली वेणनदी जिला हल्लीं कपिला म्हणतात, ती याच तपोवनाजवळ गोदावरीस मिळते. ब्रम्हयोनी, विष्णुयोनि, रुद्रयोनि, मुक्तियोनि, आणि अग्नियोनि या नांवाचीं पांच तीर्थें येथें आहेत. यांनां पंचतीर्थ असें ह्मणतात. शिवाय, सौभाग्यतीर्थ, कपिलासंगमतीर्थ आणि शूर्पणखातीर्थ अशीं तीन तीर्थें येथें आहेत. सप्तऋषिंचें स्थान येथेंच आहे. येथें शूर्पणखेची मूर्तिही आहे.

नाशिकापासून २ कोसांवर गोदावरीचे तटाकीं गंगापूर आहे. येथें

गोदावरीस घाट बांधिलेला असून या स्थलीं गोदेचा प्रवाह धबधब्यासारखा खालीं पडत आहे.

नाशिकापासून ३–३॥ कोसांवरील एका टेंकडीवर रामशय्या नांवाचें स्थान आहे. या डोंगरांत दोन तीन गुंफा कोरलेल्या असून तेथें एक दोन कुंडेंही आहेत. तेथील जमीन सपाट असून त्या जमिनीवर उगवणारें गवत, उंच न वाढतां तृणशय्येसारखें भुईबरोबर उगवतें ! हें स्थल पहावयास जाणारांनीं, भोजनाची सामुग्री जवळ बाळगिली पाहिजे. कारण येथें दुकानें वगैरे नाहींत. रामचंद्रानीं ज्यावेळीं खर नामक राक्षसाबरोबर युद्ध केलें, त्यावेळीं सीता आणि लक्ष्मण यांना त्यांनीं याच टेंकडीवर बसून युद्ध-चमत्कार पाहण्यास सांगितलें होतें.

नाशिकापासून १–१॥ कोसावर सीतासरोवर आहे. याच्या एका बाजूस गोदेचा प्रवाह असून दुसऱ्या बाजूस पाण्याचीं कुंडें आहेत. याच्या आजू-बाजूस सुंदर आंबराई आहे.

नाशिकाहून १–१॥ कोसावर टाकळीचा हनुमान आहे. श्री मारुतीची प्रतिमा भिंतींतून कोरून काढिली असून याची स्थापना महाराष्ट्र वीरभूषण श्रीछत्रपति शिवाजीमहाराजांचे परमपूज्य गुरु श्री रामदासस्वामीं यांनीं केलेली आहे. येथें एक तीर्थ आहे.

नाशिकापासून २ कोसांवर एका डोंगरांत पांडवगुंफा आहे. पर्वताच्या पायथ्यापर्यंत सडकेचा रस्ता आहे. चढणीला लहान मोठ्या एकवीस गुंफा डोंगरांत पोखरेलल्या आहेत. या गुंफा पांडव वनवासांत असतां त्यांनीं तयार केलेल्या आहेत असें कित्येक ह्मणतात, व कित्येक त्या बुद्धदेवानें तयार केल्या आहेत असें ह्मणतात. तात्पर्य तीं स्थळें जशीं वैदिक धर्मीयांस पवित्र वाटतात, तशींच बुद्धांसही वाटतास. या गुंफांत, पांडवांच्या मूर्ति आहेत, विश्वकर्म्याची मूर्ति आहे आणि गौतममुनींचीही मूर्ति आहे. एका बाजूस श्री शंकरपार्वती व श्रीकृष्ण यांच्याही मूर्ति आहेत. या स्थळीं पाण्याचीं जीं कुंडें आहेत तींही पहाण्यासारखीं आहेत.

रामकुंड, ब्रह्मकुंड, रुद्रकुंड वगैरे बरींच कुंडें येथें आहेत. रामकुंडावर श्राद्ध, स्नान आणि दानें वगैरे करितात.

दर सोमवारीं नाशिकक्षेत्रांत श्री कपालेश्वर महादेवाची पालखी निघते. त्यावेळचा देखावा पहाण्यासारखा असतो.

श्रीक्षेत्र नाशिकास जाणारे भाविकजन श्री त्र्यंबकेश्वरास जातातच. पुढील अंकांत त्या पवित्र क्षेत्राचें त्रोटक वर्णन येईल.

---

## मूठभराई.

( श्लोक-भुजंगप्र. )

पडेना पुरी वृष्टि दुष्काळ आला । गरीबांवरी घालितो घोर घाला ।
असंख्यात ते लागले मृत्युपंथा । रडें कोसळे दुःख त्यांचें पहातां ॥ १ ॥
जरी घाल हो रोजचें मूठ एक । तरी सांठवे धान्य खंडी अनेक ।
नसे फारसा भार कोणावरीही । महत्कार्य तेणें परी साध्य होई ॥ २ ॥
असे आपुलें हेंच कर्तव्यकर्म । नसे याहुनी जाणिजे श्रेष्ठ धर्म ।
इथें सांठवे सर्वही नीति सार । प्रयत्नें करूं बांधवां दुःखपार ॥ ३ ॥
अहो राहती देशबंधू उपासीं । अन्नांना पहा गोवितो काळ पाशीं ।
तयांची जरी काळजी नित्य घ्याल । अहो प्राण त्यांचे तरी वांचतील ॥ ४ ॥
फळे यत्न हा मान्य हें होय सर्वां । तरी ना कुणा काळ, दुष्काळ, पर्वा ।
जरी हा ठसे अंतरीं बोध पूर्ण । तरी अन्नपूर्णा सदैव प्रसन्न ॥ ५ ॥
पडेना पहा भार एका मुठीचा । नका वेळ मोडूं स्वयंसेवकाचा ।
अहो थेंब थेंबें तळीं सांचताती । असे सत्य हें ठेवणें तत्व चित्तीं ॥ ६ ॥
नसे याचना ' हक्क ' हा पूर्ण माना । तुह्मीं बंधुसंबंध चित्तांत आणा ।
खरें आपुलें यांत कल्याण आहे । ठसावें मनीं बोल मी बोलतों हे ॥ ७ ॥
अहो हा कसा दुःख दुष्काळ देई । हजारों मनुष्यें बळी रोज घेई ।
पहा देशबंधु प्रती आत्मभावें । तरी श्रीहरी सौख्यदाता स्वभावें ॥ ८ ॥

थोरात.

---

## कूटप्रश्नाचा निकाल आणि नवा प्रश्न.

लोकमित्र अंक ११ मे १९०८ यांतील पद्यकूटाचें उत्तर ' जाहिरात ' असें आहे.

या पद्यकूटाचीं उत्तरें २६ जणांकडून आलीं असून तीं सर्व बरोबर आहेत. यांपैकीं १७ पद्यांत व ९ गद्यांत आहेत. ज्याप्रमाणें पत्रें हातीं येतील त्याप्रमाणें बक्षिसांचा निकाल करावयाचा असल्यामुळें तसें केलें आहे.

१ गणेश ताल्या अरगडे फ. अ. मास्तर, सोलापूर. ... ... ... ... पद्य.
२ श्रीनिवास गणेश मेंढकी, बेटावद, खानदेश ... ... ... ... ... पद्य.
३ गोविंद रामचंद्र ओक, बी. ए. एल् एल् बी. वकील–बेळगाव ... ... पद्य.
४ जनार्दन सीताराम साखरदांडे, म. ग्लेडब्रूक तेजपाळ कं. नं. १ मुंबई.... पद्य.
५ शंकर धोंडो नाईक, नशिराबाद, खानदेश.... ... ... ... ... पद्य.

या पांचांस बक्षिसें मिळतील.

६ अनंत तनय, खुटबांव. ... ... ... ... ... ... ... पद्य.
७ रघुनाथ वासुदेव सावरकर, नाशीक.... ... ... ... ... ... पद्य.
८ दत्तात्रय कृष्ण थत्ते, पातोंडें... ... ... ... ... ... ... गद्य.
९ गुलाबचंद नागोरी, पैठण. . . ... ... ... ... ... ... गद्य.
१० रंगनाथ रघुनाथ वारगांवकर, शिवपट्टण. ... ... ... ... ... गद्य.
११ पांडुरंग बळवंत दसपुत्रे, बेटावद. ... ... ... ... ... ... गद्य.
१२ सर्वोत्तम गोपाळ मद्दाखब, जालना. ... ... ... ... ... ... पद्य.
१३ रा. भा. परदेशी, मास्तर, राहतें. ... ... ... ... ... ... पद्य.
१४ वासुदेव गोविंद गोडबोले, केळयें. ... ... ... ... ... ... गद्य.
१५ सीताराम नारायण पंडित, बांदें. ... ... ... ... ... ... पद्य.
१६ का. बा. पंडित, त्र्यंबक. ... ... ... ... ... ... ... पद्य.
१७ वासुदेव हरी करंदीकर, मुरगोड. ... ... ... ... ... ... गद्य.
१८ गोपाळ विठ्ठल तिरवडेकर, कुडाळ. ... ... ... ... ... ... पद्य.
१९ गणेश सदाशिव जोशी खोत, गोंवळ. ... ... ... ... ... ... गद्य.
२० कृष्णाजी बाबाजी कुलकर्णी, कळंबोळ. ... ... ... ... ... पद्य.
२१ कृष्णराव अनंत पै, असोळणें. ... ... ... ... ... ... पद्य.
२२ बापु एकोबाशेट शिंपी, बेटावद. ... ... ... ... ... ... पद्य.
२३ नागुसा पदमसा, चांदवड. ... ... ... ... ... ... ... पद्य.
२४ पुंडलीक पांडुरंग कामत, असोळणें. ... ... ... ... ... ... पद्य.
२५ भिकाजी नागेश जांबोटकर, पुणें. ... ... ... ... ... ... पद्य.
२६ म. शि. श्रेष्ठ, तळें. ... ... ... ... ... ... ... ... पद्य.

येणेंप्रमाणें निकाल झाला आहे. वि. ब. थोरात.

## कूटोत्तर. (पद्यांत.)

### श्लोक—वृत्त. “ वसंततिलका. ”

वंचावया जरि जगा कुटिले अमूप ।
स्वीकारिसील नटुनी नवचित्ररूप ।
म्यां जाणिली कुटिलता तव जाहिरातें !
दृश्य स्वरूप करितों बघ तीं जनातें ॥ १ ॥

वृत्त. " शार्दूलविक्रीडित "

रंभेनें थिरुनी यदा निजतनू व्यासात्मजा दाविली ।
कर्पूरान्वित ती सुरम्य दिसली पेर्सा बये पॅकिली ।
श्रीमद्भागवतीं कथा मधुर मीं, सत्या अती भासली ।
आतां गे ! परि पाहतां तुज खरी वाटावया लागली ॥ २॥

वृत्त. " उपजाति "

शोभे हिरा स्वज्जठरस्थलांत ।विशीर्ष जो तूं दिसते हिरात
जें घ्यावया कामुक रूस रीस । तें आवडे आंग्ल नृ-केसरीस ! ॥३॥

वृत्त " आर्या. "

विषमाक्षरां फिरवितां तव तूं होसी क्षणांत गे ! राजा ।
तैशीं समाक्षरें तव सुखातें दावितात हितकाजा ॥ ४ ॥

वृत्त ' भुजंगप्रयात. '

अशी ही तुझी रम्यकाय। ।विभिन्न । करायास जातां अहा ! भिन्न भिन्न !
प्रकार प्रिये ! दृश्य जे आहिरातें ! । मुदें धाडितों ते तुझ्या मी पित्यातें ५
नसे मी जरी प्रौढ शस्त्रक्रियेंत । तुला छेदिलें हन्त ! हा ! भीत भीत ॥
न बेवो तुझ्या कोप तो प्रेषितातें । क्रिया मानवी साच दोषास्पदा ते ! ७

अनंततनय.

सूचना-यापूर्वीचे कूटप्रश्न सोडविल्याबद्दल ज्यांना अद्याप बक्षीसें मिळालीं नसतील त्यांनीं आमचेकडे पत्र पाठवून अमूक अंकांतले अमूक बक्षीस हें कळवून मागणी करावी.

प्रकाशक.

---

## नवीन कोडें.

१ डोळे नसणाऱ्या एका मनुष्यानें एका झाडास बोरें लटकलेलीं पाहिलीं. परंतु त्यानें बोरें काढूनही घेतलीं नाहींत, अगर बोरें झाडावर शिल्लकही ठेविलीं नाहींत हें कसें तें सांगा?

वरील कोड्याचें गद्यात्मक उत्तर ता. १० आगष्ट सन १९०८ पर्यंत पाठवावें. पहिल्या नंबरास रोख एक रुपया व बाकी ४ नंबरांस जादूगारांचा शिक्षक हें ०।१२ आणे किंमतीचें पुस्तक फुकट मिळेल.

उत्तरें पाठविण्याचा पत्ता—

वि. ब. थोरात मु. लोणखेड पो. शहादें जि. खान्देश.

# रमणीय वेंचे.

असंतुष्टा द्विजा नष्टाः संतुष्टश्च महीपतिः ।
सलज्जा गणिका नष्टा निर्लज्जा च कुलाङ्गना ॥ १ ॥

"असंतोषी ब्राह्मण नष्ट पावतो; तृप्त असणारा राजा नाश पावतो; जी वेश्या लाजाळू असते ती नाश पावते व जी कुलस्त्री असून निर्लज्ज असते ती ह्या नाश पावतात."

अनभ्यासे विषंशास्त्रं अजीर्णे भोजनं विषम् ।
मूर्खस्य च विषंगोष्टी वृद्धस्य तरुणी विषम् ॥ २ ॥

"ज्याला अभ्यासाचे श्रम घ्यायाला नकोत, त्याला कोणतेंही शास्त्र विषासारखें वाटतें; ज्याला अजीर्ण झालें आहे त्याला भोजन विषप्रद होतें. मूर्खाला गोष्टी विषासम वाटतात, आणि वृद्ध पुरुषाला नवयौवन स्त्री विषाप्रमाणें भासते."

अतिरूपाद्धृता सीताऽतिगर्वाद्रावणो हतः ।
अतिदानाद्बलिर्बद्धश्चाति सर्वत्र वर्जयेत् ॥ ३ ॥

"अतिसुरूपतेनें सीतेचें हरण झालें, अतिगर्वानें रावणाचा वध झाला, अतिदान दिल्यामुळें बलीराजा बंधन पावला. म्हणून अति सर्वांनीं वर्जावें."

अति परिचयादवज्ञा संततगमनादनादरो भवति ।
मलये भिल्लपुरंध्री चन्दनतरुकाष्ठमिन्धनं कुरुते ॥ ४ ॥

"ओळखीनें अतिसलगी केल्यामुळें लहानाकडून थोरांचा अवमान होतो. (चाकर धन्याचा मान राखीत नाहीं.) नित्य, कोणतेही ठिकाणीं, वारंवार जाण्यायेण्याचा परिपाठ ठेवल्यानें आपला सत्कार व्हावा तसा होत नाहीं. कारण, जसें मलयपर्वतावर राहणाऱ्या भिल्लांच्या स्त्रिया तेथें चंदनाचीं झाडें विपूल असल्याकारणानें स्वयंपाकाच्या उपयोगीं चंदनकाष्ठेच सर्पणाऐवजीं उपयोग करीत असतात."

अमृतं शिशिरे वन्हिरमृतं बालभाषणम् ।
अमृतं स्वप्रिया भार्या ह्यमृतं स्वामिगौरवम् ॥ ५ ॥

"शिशिरऋतूंत (हिवाळ्यात) अग्नी, तसेंच बालकाचे बोबडे बोल अमृततुल्य वाटतात; आपली प्रीय अशी जी सुशील भार्या तीही तशीच वाटते. व धन्यानें शाबासकी देऊन गौरवयुक्त भाषण केलें असतां तेंहीं अमृततुल्य वाटतें."

अश्वंनैव गजंनैव व्याघ्रंनैव च नैवच ।
अजापुत्रं बलिं दद्याद्देवो दुर्बलघातकः ॥ ६ ॥

"देवाच्या संतोषार्थ घोड्याचा बळी देत नाहींत. हत्तीचा किंवा वाघाचाही देत नाहींत. पण गरीब दुर्बळ असा अजापुत्र जो बोकड त्याचाच बळी देतात. यावरून देव दुर्बळाचाच घात करीत असतो."

अपुत्रस्य गृहंशून्यं दिशः शून्यास्त्वबान्धवाः ।
मूर्खस्य हृदयं शून्यं सर्वशून्या दरिद्रता ॥ ७ ॥

" ज्याला पुत्र नाहीं त्याचें घर शून्य, ( उदास दिसतें ) ज्याला बंधु नाहीं त्याला दशदिशा शून्यच दिसतात. मूर्खाला ( विचार नसल्यानें ) हृदयाचे नावानें शून्यच असतें आणि दारिद्र्यामुळें मनुष्याला सर्वच शून्य असतें. "

क्षणे तुष्टाः क्षणे रुष्टाः स्तुष्टाः रुष्टाः क्षणे क्षणे ।
अव्यवस्थित चित्तानां प्रसादोऽपि भयंकरः ॥ ८ ॥

" अव्यवस्थित मनुष्य क्षणांत संतुष्ट होतो. तसाच क्षणांत रागावतोही, याप्रमाणें त्याची बुद्धी क्षणिक असते ह्मणून अशा मनुष्याची कृपा झाली तर ती भयंकरच समजावी. "

उष्ट्राणांच विवाहेषु गीतं गायन्ति गर्दभाः ।
परस्परं प्रशंसन्ति अहोरूपमहो ध्वनिः ॥ ॥ ९ ॥

" उंटाच्या लग्नसमयीं गाढव गवयीबुवा, तेव्हां ते एकमेकांविषयीं ह्मणतात. गाढव ह्मणतो ' अहहा ! काय हें स्वरूप सुंदर ! ' तें ऐकून उंट उत्तर करतो ' अहहा काय हा सुस्वर ! "

अध्वा जरा मनुष्याणां अनध्वा वाजिनां जरा ।
असंभोगो जरा स्त्रीणां वस्त्राणामातपो जरा ॥ १० ॥

" सदोदीत मार्ग चालण्यानें मनुष्याला जरा प्राप्त होते; आणि घोड्यास चाल नसल्यानें जरा प्राप्त होते. स्त्रियांस पतिसंभोग नसल्यानें जरा प्राप्त होते व उन्हांत सुकविल्यानें वस्त्र लवकर जीर्ण होतें "

अलङ्गसंगदोषेण सत्याश्च मतिविभ्रमः ।
एकरात्रप्रसंगेन काष्टघंटाविटंबना ॥ ११ ॥

" ज्याचा स्नेह करणें योग्य नाहीं अशाची संगत केली असतां कुबुद्धी व दुर्गुण उत्पन्न होतात. एक गाय ओढाळ गायीचे संगतीस एकच रात्र गेल्यामुळें सकाळीं तिच्या गळ्यांत लोढणें बांधलें गेल्यानें तिची विटंबना झाली. "

अल्पतोयश्चलत्कुंभो अल्पदुग्धाच धेनवः ।
अल्पविद्या महागर्वी कुरूपी बहुचेष्टितः ॥ १२ ॥

" घागरींत पाणी थोडें भरलेलें असलें ह्मणजे डुचमळून उसळतें, थोडें दूध देणारी गाय दूध काढतांना नाचूं लागते, ज्याला विद्या थोडी त्याला गर्व फार असतो आणि जी कुरूप स्त्री तिला नखरा फार असतो. "

त्यजेदेकं कुलस्यार्थे ग्रामस्यार्थे कुलंत्यजेत् ।
ग्रामं जनपदस्यार्थे आत्मार्थे पृथिवीं त्यजेत् ॥ १३ ॥

" एकापासून सर्व कुळाचा नाश होतो तर त्याचा त्याग करून कुळाचें रक्षण करावें. तसेंच एक कूळ देऊन ग्रामाचें रक्षण करावें, व ग्राम देऊन राज्याचें रक्षण करावें व सर्व राज्य देऊन आत्मरक्षण करावें. "

( अपूर्ण. )

## पांच व अभिप्राय.

**देववाणीप्रवेशक**—अथवा संस्कृत पहिलें पुस्तक-मराठी भाषेच्याद्वारें संस्कृत भाषेचें ज्ञान होण्यास हें पुस्तक फारच उपयोगी आहे. लहान मुलांनीं घरींबसल्या फावल्या वेळांत थोडें थोडें वाचन सुरू ठेविलें तर त्यांना पुष्कळ संस्कृत शब्दांची माहिती होईल. ज्यांना संस्कृत ह्मणजे काय हें माहितही नाहीं त्यांनीं सुद्धां हें खिशांत ठेवून प्रत्यहीं थोडेफार पाठ करावें ह्मणजे व्यावहारिक शब्दांचें ज्ञान होईल अशी याची रचना आहे. प्र. शामराव कृष्ण आणि मंडळी-ठाकुरद्वार-मुंबई यांजकडे ८१ आणा किंमतीस मिळतें.

**मराठ्यांची रुढी आणि सुधारणा**—हें पुस्तक देशमुख निळकंठराव भाऊ. साहेब खळतकार पोष्ट-दिग्रस जि० नागपूर यांनीं समाजसुधारणेची उत्कट इच्छा बाळगून लिहिलें आहे. एकंदर प्रकरणें १० असून मराठे क्षत्रीय आहेत, विद्या, वर्ग, कुळदैवतें, लग्नसमारंभ, मराठ्यांतील गोषा, किरकोळ चाली, वगैरे लहान लहान विषयांवर विवेचन केलें आहे. त्यांत ज्या गौण चाली पडून गेल्या आहेत त्यांचा निषेध व ज्या योग्य सुधारणा होणें इष्ट आहे; त्याबद्दल सहानुभूति दर्शवून काटकसरीनें वागणें, स्वच्छतेनें राहणें, देव-धर्म यांचेठिकाणीं निष्ठा ठेवणें, मुलींचा पैसा न घेणें देणें, लहानपणीं लग्नें न करणें, वगैरे गोष्टींबद्दल मराठेमंडळास बोध केला आहे. कि. ८६ आणे.

**मासिक मनोरंजन**—जूनचा ६ वा अंक पावला. यांत नेहमींप्रमाणें चटकदार लेख आणि सुंदर चित्रें आहेत.

हा अंक मित्राच्या वाचकांनीं पहावा असी आमची इच्छा आहे. यांत **माहाता शैसा** या मनुष्याचें चरित्र आहे तें तर फारच चटकदार आणि अनुकरणीय आहे. त्यांतला सारांश थोडक्यांत आमच्या वाचकांकरितां देतों:—

सततोद्योग, अविश्रांत परिश्रम, बुद्धिमत्ता, कल्पकता, व्यवहारदक्षता, वागणुकींत विलक्षण सचोटी, व्यवसायांत छाती आणि साहस इत्यादि गुणांनीं ज्या कित्येक व्यक्तींनीं अति हीन दीन स्थितींतून आपला भाग्योदय करुन घेतला आणि संपत्ति संपादन केली, त्यांत माहाताशैसा ह्याची गणना करण्यास हरकत नाहीं. माहाताशैसा हे कोणी साहसी अमेरिकन, दीर्घोद्योगी इंग्रज, अथवा कल्पक जर्मन नव्हते. सिंहलद्वीप ऊर्फ लंका देशांतील एका गावांत, बौद्धधर्मावलंबी एका अत्यंत दरिद्री, दीनस्थितींतल्या कुटुंबांत या थोर पुरुषाचा जन्म झाला.

ह्याचा पिता दिवाकर शैसा हा वैद्यकीवर कसाबसा आपला निर्वाह करीत असे काहीं दिवसांनीं हा वारला आणि माहाता शैसा यावर सर्व कुटुंबाची जबाबदारी आली. यावेळीं रोख ३६ रुपये व एकंदर भांडीकुंडीं मिळून २५ रुपयाचा माल इतकी इष्टेट दिवाकराचे मागें होती! असो वडील वारल्यावर माहाताशैसा ह्यानें थोडेंसें सिंहली आणि इंग्रजी लेखनकलेचें ज्ञान संपादन केलें होतें. एक दिवस लारेटो बेंजामिन ऐसा नामक एका श्रीमान सिंहलीखिस्त्याकडून याला वैद्य या नात्यानें बोलावणें आलें. त्यावरुन माहाता

शैसा हा त्याच्या गांवीं गेला. एक दिवस कांहीं वनस्पतीसाठीं लारेटोच्या जुन्या पडक्या बगीच्यांत फिरत असतां एकाठिकाणची जमीन ढासळून पडल्यामुळें खालीं जमीनींत एक तांब्याचा हांडा दिसला त्याबरोबर त्यानें आणखी थोडी माती दूर केली व पाहिलें तों बरेच हांडे आहेत असें दिसून आलें. एका हांड्याचें झांकण काढून पाहिलें तों तो सुवर्णमुद्रांनी गच्च भरला आहे व याप्रमाणेंच ते सर्व हांडे भरलेले असावेत असें त्यानें ताडलें. नंतर ज्याच्या भूमीमध्यें हें धन आहे. त्याच्या अनुमतिशिवाय हें नेणें ही चोरी होय. महापाप होय, असा विचार ठरवून त्यानें ही गोष्ट लारेटोला कळविली. लारेटो आजारी होता तरी ही गजांत लक्ष्मी पहाण्याबरोबर तो चांगला झाला. पुढें त्याच्या दारांत हत्ती झुलूं लागले हें सांगण्याचें कारणच उरलें नाहीं.

त्या धनाचा तपास लावून देणारा माहाता शैसा यास त्याने २०० सुवर्णमुद्रा आणि ५०० रौप्यमुद्रा तो नको ह्मणत असतां जबरीने त्याच्या पदरी बांधल्या पण तें द्रव्य माहाता शैसा आपल्या घरीं घेऊन येत असतां वाटेंत चोरांनी पळविलें. पुढें कांहीं दिवसांनीं लारेटोनें आपली प्रियकन्या देऊन शैसा यास जामात करण्याचें ठरविलें व ती गोष्ट मान्य झाली पण असंख्य मोहरा लारेटो देत असतां तें द्रव्य मात्र या जामातानें स्विकारिलें नाहीं. स्वबळावर भिस्त टाकणाऱ्या माहाता शैसानें त्याला सांगितलें कीं, " दुसऱ्याच्या पैशानें श्रीमंत होण्याची मी मुळींच इच्छा करीत नाहीं. माझ्या निढळाच्या घामानें जें मी मिळवूं शकेन, तेंच माझें धन ! त्याच्याशिवाय दुसरें सर्व मी भिक्षेचें धन समजतों. भिक्षेचा मी प्राणांतींही स्विकार करणार नाहीं ! " अहाहा ! माहाता शैसा-सारखे जामात कुणीकडे आणि दारिद्र्यामुळें मुलीला हुंडा देण्याचें सामर्थ्य नसल्यानें हाता-पाया पडत असतां तितडे थोडेंही लक्ष न देता सासऱ्याला घरदार विकावयास लावणारे जामात कोणीकडे ! असो. माहाता शैसा यांनीं त्या श्रीमंताच्या घरून आणलेल्या मुलीला ह्मणजे आपल्या प्रीयपत्नीला गरीबस्थितीत राहून नीतीनें संसार करण्यासंबंधानें केलेला उपदेश प्रत्येक स्त्रीरत्नानें आपल्या हृदयमंदिरांत कायम ठेवण्यासारखा आहे. तो स्थलाभावामुळें येथें नमूद करता येत नाहीं. माहाता शैसा याचा करारी स्वभाव, सततो-द्योग, आणि दृढनिश्चय असल्यामुळें लौकरच त्यावर ईश्वरी कृपा झाली. लहान लहान धंदे करतां एकदां त्यानें वर्तमानपत्रांतील लेखाच्या धोरणानें लाखो मण अस्थींचा संग्रह केला व त्या त्याच्या अटकळीप्रमाणें युरोप अमेरिकेंतून अस्थींची मागणीही आली. या व्यापा-रांत शैसा यास जवळ जवळ २ लाख रुपये मिळाले. यापुढें तर तो गजातलक्ष्मीचा अधिपती झाला. शैसा याच्या दातृत्वाचें वर्णन करणें शक्य नाहीं व आमच्यापाशीं तेवढें स्थळही नाहीं. त्यानें आपल्या ज्येष्ठ पुत्राच्या लग्नास १४ लक्ष आणि प्रथम कन्येच्या लग्नास २० लक्ष रु. खर्च केले. त्याच्या पत्नीच्या अंगावर १८ कोट रुपयांचे अलंकार होते. त्यानें आपल्या वडील मुलास २७ कोट रोख रुपये दिले होते. ज्याची वृद्धमाता अवघ्या ५।६ आण्याच्या पैशासाठीं दुसऱ्याच्या घरीं सारा दिवस दळणकांडण करी त्याच महात्म्या शैसानें दीर्घोद्योगाच्या जोरावर एवढी अगणीत संपत्ति संपादन केली ही लोको-त्तर गोष्ट होय ! **स्त्रीयश्चरित्रं पुरुषस्य भाग्यं देवो न जानातिकुतो मनुष्यः** ही ह्मण येथें तंतोतंत लागू पडते. आमच्या वाचकावर परमेश्वर असीच कृपा करो.

# यंत्राचा खरा उपयोग.



सध्यांतर वैरण फारच महागली आहे व चांगला पाऊस होऊन नवीन वैरण मिळूं लागण्यास अजून बरेच दिवस आहेत; तेव्हां आमच्या सुधारलेल्या कडबा कापण्याच्या यंत्राचा खरा उपयोग व खरा फायदा याच दिवसांत होतो. हें आम्ही खात्रीनें सांगतों.

जमीन नांगरण्याचे दिवस जवळ येत चालले आहेत. लांकडी नांगरापेक्षां लोखंडी नांगराचा उपयोग जास्त होतो. ह्या नांगरास थोडे बैल लागून जमीन जास्त खोल नांगरतां येते हें आतां बहुतेकांना माहीत झालें आहे. अशाप्रकारचे लोखंडी नांगर आमच्या कारखान्यांत तयार करून विक्रीस ठेविले आहेत.

जास्त माहितीकरितां हस्तपत्रक मागवा.

किर्लोस्करबंधु–बेळगांव.

---

९-१२

# इहवृत्त आणि निवडक वेंचे.

**खानापूर**—आजवर पाऊस चांगला आहे. शेवट गोड झाला म्हणजे पुरे.

—बेळगांवास प्लेगनें ४।५ इसम मेल्यामुळें या पावसाळ्यांतच गांव सोडावें लागतें कीं काय या फिकिरींत लोक आहेत. ईश्वरेच्छा!

—शाहापूर ( बेळगांव ) येथील प्रसिद्ध सराफी व्यापारी बाबुली उर्फ कृष्णाजी गोविंद सराफ यांना ता० १६।७।०८ रोजीं देवाज्ञा झाली. हे गृहस्थ फार धार्मिक होते. परिचय असणाऱ्या लोकांस यांचेबद्दल फार हळहळ वाटत आहे. ह्या क्षणिक बाजारांत जर कोणी सद्गुणांच्यायोगानें कीर्तिचा सौदा केला असेल तरच त्याचें नांव मागें राहणार आहे.

—बडोद्याचे युवराज फत्तेसिंगराव यांस पुत्ररत्न झालें म्हणून तेथील सर्व लोकांस मोठा आनंद झाला आहे. गायकवाडच्या इतिहासांत गादीवर असलेल्या महाराजांस नातू झाल्याचा हा पहिलाच प्रसंग आहे.

—हैद्राबाद येथें अफजल गंजांत एका दुकानीं चार हात दोन डोकीं असलेलें एक जुळेंमूल टेविलें आहे. हा चमत्कार पहाण्याकरितां शेंकडो लोक जातात असें समजतें.

—पुणतांबें ( नगर ) येथें एका सुतारणीस एक मुलगी जाहली होती तिला मस्तकावर डोळे होते व दांत भयंकार होते. मुलगी लगेंच मेली असें तेथील पोलीस अफीसर कळवितात.

—एक बाई लहान मुलीला घेऊन विहरीवर पाण्यास गेली तों एका दुष्टानें तिला दोरानें बांधून टेविलें व त्या मुलीच्या अंगावरील सर्व लुबाडलें. त्या मुलीसही धोंडा बांधून तो विहिरींत सोडणार होता इतक्यांत एका सर्पानें त्या मनुष्यास दंश करुन तात्काळ गतप्राण केलें! बाई व मुलगी जवळ असतां त्यांस थोडीही बाधा केली नाहीं. काय ही ईश्वरी लीला!

—लोकांना बंड करण्यास चिथावणारीं लहान लहान पुस्तकें सर्व हिंदुस्थानांत वाटलीं जात आहेत. ह्या पुस्तकांत हिंदीलोकांना सत्तावन सालच्या बंडाची आठवण करून दिली असून बाम्बगोळे तयार करण्याच्या कृतीची माहिती दिली आहे असें म्हणतात.

—**ढेकूणास उपाय**—चुन्यांत वयाबॉलिक आसिड घालून तो भिंतीस लावला तर त्या भिंतींत ढेकूण वगैरे होत नाहींत.

—मेंढ्याचें मांस व गूळ एकत्र करून डाळिंबीच्या झाडाखालीं पुरल्यास छानदार डाळिंबें येतात.

—पाण्यांत सशाचें मांस उकळून तें द्राक्षीच्या मुळांत घातलें तर चांगलीं गोड द्राक्षें निपजतात.

—वऱ्हाडांत पुसद तालुक्यांत दत्या आणि मोहन्या नांवाच्या दोन दरवडेखोरांनीं अधिकाऱ्यांस घाबरवून सोडलें आहे. काळ्या गोऱ्यांच्या दोन दोनशें शिपायांच्या टोळीला ते दाद देत नाहींत. काळे शिपाई त्यांनां धरुं गेले तर ' तुम्हीं गरीब लोक व्यर्थ कां मरतां? गोऱ्या अंमलदारांना येऊं द्या? असें ते म्हणतात.

—भोपाळ संस्थानचें पोष्टखातें १ जुलईपासून ब्रिटीस सरकारचे स्वाधीन केलें आहे.

—सरकार कातड्याचें नाणें प्रचारांत आणणार आहे अशी दाट वदंता नागपूराकडे खेड्यापाड्यांतूनसुद्धां पसरली आहे असें समजतें.

जितकें कांहीं आपणास ठावें । तितकें हळू हळू शिकवावें ॥
शहाणे करून सोडावें । सकळ जन ॥ ६ ॥ रामदास.

ॐ

# लोकमित्र.

मासिक पुस्तक.

वर्ष १८ वें.] आगष्ट. १९०८. [अंक २ रा.

## विषयानुक्रमणिका.


| विषय. | पृष्ठ. | विषय. | पृष्ठ. |
|---|---|---|---|
| महादेव मोरेश्वर कुंटे. ... ... | ३३ | मराठ्यांना क्षत्रियत्वाचा अधिकार. | ५३ |
| आपसांतील वैमनस्य. ... ... | ३५ | आपली स्थिती ... ... ... | ५४ |
| वेणी-माधव ( गोष्ट. ) ... ... | ३८ | विजापूर येथील मशीद.... ... | २६ |
| भिक्षु-स्वप्न ( कविता. )... ... | ४४ | कापराचें झाड. ... ... ... | ५८ |
| नैसर्गिक सृष्टिजन्य कारंजें. ... | ४७ | रमणीय वेंचे. ... ... ... | ६३ |
| महाराष्ट्र ग्रंथकारांचें चवथें संमेलन. | ४९ | | |


**कुमुदसुंदरी** व **विक्रम पृथ्वीपर्यटण** या दोन्ही बक्षीस
पुस्तकासह व्ही. पी. खर्चसुद्धा १ रु ८ आ. १ पोष्टांत भरावा लागतो.

**द. गो. सडेकर** यांनीं खानापूर येथें आपल्या **धनंजय** छा. छा.

# हिंदुस्थानांतील मुख्य स्थान.

## वॉर्चास, क्लॉक्स आणि टाइमपीसीस वगैरे मिळण्याचें.

सरकार, संस्थानें, रेलवे, विद्यालयें, म्युनसिपालिट्या, बोर्डें वगैरे खात्यांस लागणारा माल आमचेच कडून पुरवला जातो. ३० वर्षांपासून प्रसिद्ध, बाकब्गार, अनेक सुवर्ण-पदकें, सनदा, इनामें, लेख, दाखले मिळाले व मिळत आहेत याचें कारण खात्रीलायक व निवडक माल पाठविणें हेंच होय.

बॉयवॉच-किं. रु. ३, ३॥, ४; स्टूडंटस वॉच रु. ५, ६, ८, ग्यारंटी वर्षें १, २, ३.

जेंटसवॉच-रु. १०, १२, १५; चांदीचें रु. १५, १८, ३० ग्यारंटी वर्षें ३ ते ४.

रास्कोप पेटंट वॉचस-रु. १४, १५, १६; चांदीचें रु. २६, २८ ग्यारंटी वर्षें ५.

वेस्टड वॉचेस-रु. ९, १०, ११, १५ ते ३०; चांदीचें रु. १७ ते ४० ग्यारंटी वर्षें १ ते ४.

टेबलटाइमपीसेस-" बी " २ इंच डायल रु. २॥; ४ इंच डायल रु. २॥ ते ३॥; अलार्म २॥। ते ४; १५ मिनिट अलार्म ५॥; लांकडी टाइमपीसेस रु. ३॥; अलार्म रु. ४॥; तासवाले रु. ५; तास व अलार्म रु.५॥.

फ्यामिली क्लॉक-( गॉथिक ) आठ दिवस चाविचें, तास अर्धा तास वाजणारें रु. ९॥ ते ११॥; अलार्म १० ते १२॥.

ऑफिस क्लॉक-आठ दिवस चावीचें, तास अर्धा तास वाजणारें, डायल इंच ८, १०, १२; उंची इंच १९, २२, २४ किं. १२, १४, १६; अलार्म अगर क्यालेंडरकरितां एक रुपया जास्त.

ऑफिस रेग्युलेटर-आठ दिवसाचें, वाजणारें, डायल इंच १२, उंची इंच ३२, किं. रु. १८ ते २५.

वॉचेस व टाइमपीसेस व्ही. पी. पोस्टानें रवाना केलीं जातील. क्लॉक्स रेलवेपार्सलनें मागवा. क्लॉकच्या मागणीबरोबर रु. ५ अगाऊ आले पाहिजेत. टपाल किंवा रेलवे खर्च निराळा.

सर्वप्रकारचीं घड्याळें उत्तमप्रकारें दुरुस्त केलीं जातात. क्याटलाग पहा.

जी. बी. नाईक कं० सिताराम बिल्डिंग-मुंबई.

लो. टिळक ग्रंथसंग्रहालय दा.क्र. वाई जि. सातारा

# लोकमित्र.

## महादेव मोरेश्वर कुंटे.

शिक्षकानें आपल्या विद्यार्थ्यांकडून चांगले चांगले अनेक नियम जरी पाठ करून घेतले तरी ते नियम विद्यार्थी कालांतरानें विसरून जातील व त्या नियमांचा त्यांच्या मनावर जसा परिणाम व्हावा तसा होणार नाहीं; परंतु शिक्षक तेच नियम अनेक उदाहरणांनीं सिद्ध करून दाखवील तर विद्यार्थी ते पाठ न करितांही जन्मभर विसरणार नाहींत व त्यांच्या मनावर त्यांचा उत्तमप्रकारचा ठसा उमटेल. हीच गोष्ट लक्षांत आणून जगद्गुरु श्री परमेश्वर आपल्या भक्तांच्या मुखानें चांगले चांगले नियम किंवा सिद्धांत वदवितो व त्याच्या सत्यतेकरितां अनेक कर्तृत्ववान् विभूति निर्माण करून लोकांना उपदेश करितो. या सिद्धांताप्रमाणें परमेश्वरानें आपला परमभक्त जो कबीर त्याच्या मुखानें—" नर करनी करेसो नरका नारायन होय " हा नियम वदवून त्याच्या सत्यतेकरितां अनेक कर्तृत्ववान विभूति निर्माण केल्या त्या विभूतिपैकींच कै. महादेव मोरेश्वर कुंटे ही एक होय. या महात्म्याचा संक्षिप्त वृत्तांत लोकमित्राच्या वाचकांकरितां आह्मीं येथें देतों.

सातारा शहराजवळ श्रीकृष्णेच्या कांठीं माहुली ह्मणून एक प्रसिद्ध क्षेत्र आहे; तेथें मोरेश्वर कुंटे या नावांचे एक कऱ्हाडे ब्राह्मण राहत होते. ते महादेवपंताचे वडील होत. महादेवपंत हे इ. स. १८३५ त जन्मले. ते ५ वर्षांचे असतानांच त्यांचे वडील निवर्तले ह्मणून लहानपणापासून यांच्या विद्याभ्यासाची कोणी काळजी घेतली नाहीं; तरी आपण विद्या शिकावी अशी बाराव्या वर्षी आपोआप सद्बुद्धि होऊन त्यांनीं आईला न विचारतां घरांतून पुण्याकडे पोबारा केला, पण पुढें त्यांच्या मातोश्रीनीं त्यांना कोल्हापूर येथें विद्याभ्यासाकरितां ठेविलें. तेथें माधुकरी मागून यानीं मराठीचा आणि इंग्रजीचा अभ्यास केला. तेथेंच त्यांना महादेव गोविंद रानडे यांच्या शिक्षणाचा लाभ

घडला. पुढें १८५६ सालीं हे इंग्रजीचा अभ्यास वाढविण्याकरितां मुंबईस आले. तेथें यांची बुद्धि आणि अभ्यास पाहून डाक्तर विलसन यांचें त्यांजवर स्वभावतःच अप्रतिम प्रेम बसलें आणि ह्मणून त्यांचेकडून यांना वारंवार निर्वाहाकरितां थोडथोडी मदत मिळूं लागली. यामुळें अभ्यास सुरळीत चालून १८५९ सालीं यांची म्याट्रिकची परीक्षा व १८६४ सालीं बी. ए. ची परीक्षा पास झाली.

मग १८६५ सालीं यांना कराची हैस्कूलच्या हेडमास्तरीची जागा मिळाली. तेव्हां यांना सिंधी भाषा मुळींच येत नव्हती तरी केवळ सहा महिन्यांतच हे सिंधीभाषेचे प्रसिद्ध वक्ते झाले. नंतर १८६७ सालीं कोल्हापूरच्या हैस्कूलाच्या हेडमास्तरचे जागीं यांची बदली झाली. ज्या जागीं १२ वर्षें केवळ माधुकरी मागून विद्याभ्यास केला त्याचजागीं एवढें ऐश्वर्य प्राप्त झालें हें केवळ श्रमाचें फळ होय. तेथें चार वर्षें राहून १८७१ सालीं पुणें हैस्कूलावर यांची नेमणूक झाली. तेव्हांपासून एकदोन वर्षें खेरीज करून अंतकाळपावेतों सोळा वर्षेंपर्यंत ते त्याच जागेवर होते. आधींच ज्ञानाचें अमूल्य भांडार व त्यांत उत्तमप्रकारची शिक्षणपद्धति या दोहोंचा संयोग झाल्यामुळें हे उत्तमप्रकारचे शिक्षक होते अशी यांची ख्याति आहे. ज्याचे पदरीं मोठें पुण्य असेल त्यासच यांच्या शिक्षणाचा लाभ होईल अशी तेव्हांच्या विद्यार्थ्यांची समजूत होती. कोणताही विषय सोपा करून तो विद्यार्थ्यांच्या मनांत भरविण्याविषयीं त्यांचा अगदीं हातखंडा होता. त्यांना इंग्लिशभाषा उत्तमप्रकारें येत होती. एकदां त्यांचे इंग्लिश भाषण ऐकून एक अमेरिकन गृहस्थ ह्मणाला कीं, " अमेरिकेंतसुद्धां असे वक्ते क्वचितच आढळतील ! "

हे जसे उत्तम वक्ते होते तसे प्रख्यात कवीही होते. मन, राजाराममहाराज, राजा शिवाजी, हीं यांचीं मराठी काव्यें मोठीं प्रसिद्ध आहेत. यांनीं " ऋषि " या नावांचें एक इंग्लिश काव्य केलें तें इंग्लंडांतल्या रसिक वाचकांना फारच आवडलें. त्याचप्रमाणें इटालींत भरलेल्या पाश्चिमात्य पंडितसभेनें नेमलेल्या " आर्यविद्याभारसंपन्नता " नामक विषयावर यानीं इंग्रजींत निबंध लिहिला होता तो सदर सभेस पसंत पडून त्याबद्दल यांना मोठें बक्षिस मिळालें होतें. यांनीं पेन्सीली करण्याचा कारखानाही काढला होता.

यांनीं आर्यगायन-वादनाचा अभ्यास शास्त्रीयरीत्या करून आर्यगायन-वादन पाश्चिमात्य गायनवादनापेक्षां विशेष संस्कृत आणि विशेष रसभरित आहे असें सिद्ध करून दाखविलें. तसाच यांना भूस्तरविद्येचाही छंद होता.

ते अगोदर प्रार्थनासमाजपंथी होते परंतु १८७८ पासून त्यांच्या विचारांत फरक पडून ते पुन्हां आपल्या हिंदुधर्मानें वागू लागले. ते इतके ईश्वर-भक्त होते कीं, पायांत चाळ बांधून, हातांत चिपळ्या घेऊन तास तास दोन दोन तास भजन करीत असत. हे शरिरानें धडधाकट, निरोगी व मोठे धिप्पाड होते. यांच्या शरिराकडे व चर्येवरील ज्ञानतेजाकडे पाहिलें ह्मणजे कोणाही पाहाणारास यांचेविषयीं पूज्यबुद्धि वाटत असे.

हे महात्मे पक्षघातानें इ. स. १८८८ च्या आक्टोबरच्या आठव्या तारखेस स्वर्गवासी झाले. यामुळें आपल्या राष्ट्राचें फार नुकसान झालें.

रा. प. शास्त्री.

## आपसांतील वैमनस्य.

अविवेकात्पीडयतां स्थितमन्योन्यमंडनं ।
कुनृपाणां कुचानांच पतनायसमुच्छ्रयः ॥

एकमेकांचा द्वेष करणारे राजे पतन पावतात, इतकेंच नव्हे तर समाज-व्यक्तियांसही हाच नियम लागू आहे. परस्पर द्वेष परस्परांच्या नाशास कारण व्हावयाचाच ! पण परस्पर द्वेष आमच्या हिंदुस्थानांत अतोनात दृष्टीस पडतो. एकाचें हित तें दुसऱ्याचें अहित असा प्रकार ज्यावेळेस असेल त्यावेळेस एका म्यानांत दोन सुऱ्या असणें संभवनीय नसल्यामुळें एकाचा नाश झालाच पाहिजे, तो प्रकार वेगळा पण असें नसतांही एकानें दुसऱ्यास खालीं आणण्यास तयार होणें चांगलें नाहीं; परंतु एकदां मत्सर उत्पन्न झाला ह्मणजे अशा गोष्टी होऊं लागतात व त्या सुरू झाल्यावर त्यांचे परिणाम व्यक्तीस, समाजास, कुटुंबांस किंवा राजांस बिनतक्रार भोगावे लागतात. अशीं उदाहरणें आपल्या इतिहासांत लागतील तेवढीं आहेत. मराठीराज्य या लढ्यानेंच बुडालें. पेशवाईचा अंत याच गोष्टीनें झाला. कुटुंबकलह नसता तर रघुनाथरावास अटकेंत ठेवण्याची माधवरावास काय गरज होती ! आनंदीबाई नारायणरावाचा खून कशाकरितां करती ? आतां

या कृत्यांस लोभ हा कारण आहेच. लोभामुळें मोठमोठीं अनर्थाचीं कृत्यें घडतात. रजपुतांच्या आपसांतील वैमनस्यामुळें मुसलमानांस हिंदुस्थानांत घुसतां आलें. मुसलमानांच्या आपसांतील तंट्यामुळें मराठ्यांचा उदय होण्यास अवसर सांपडला. हिंदुस्थानांतील एकंदर लोकांच्या फुटीमुळें इंग्लिशांस हिंदुस्थानांत साम्राज्य स्थापितां आलें. कोणत्याही इतिहासांत पाहिलें तरी आपसांत फूट पडल्याशिवाय तिसऱ्याचें चालत नाहीं, असेंच दृष्टीस पडतें. हिंदुस्थानांतील लोकांचे या ढळढळीत दिसणाऱ्या गोष्टीकडे लक्ष जाईल तो दिवस सुदिन समजला पाहिजे. अशाप्रकारचीं आपल्या इतिहासांतील कांहीं उदाहरणें पुढें लिहितों.

अहमदशाहा अबदाली यानें उत्तरहिंदुस्थानांत आपला अंमल बसविला असें कानी येतांच सदाशिवरावभाऊ मोठ्या शौर्यानें तिकडे जाण्यास निघाले. सर्व मराठे सरदार आपापल्या सैन्यांसह त्यांस येऊन मिळाले. त्यांच्याजवळ अफाट फौज जमा झाली. शिवाय तोफखाना, बाजारबुणगे, सरदारांचे स्वार, पायदळ, हीं सर्व जेव्हां एकेठिकाणीं झालीं तेव्हां फारच घोळका जमला. तेव्हां सूरजमल्लानें अशी मसलत सांगितली कीं, अवजड सामान, बायकामुलें, ग्वाल्हेरींत, झांशींत किंवा आपल्या किल्ल्यांपैकीं एकाद्या किल्ल्यांत, सुरक्षितस्थळीं ठेवावीं; मराठ्यांचे व सूरजमल्लाचे स्वारांनीं मिळून शत्रूचे फौजेस अन्नाची बेगमी न मिळूं देण्याची तजवीज करावी; व सावकाशीनें लढून मुसलमानांचा पराभव करावा. ही त्याची कल्पना फार चांगली होती, यामुळें होळकरास व बहुतेक सरदारांस ती पसंत पडली. सदाशिवरावासही ती मानवली; पण होळकराचें व त्याचें मनोमय घांकडें होतें व होळकर सूरजमल्लाचे मसलतीस मिळाला होता, म्हणून त्यानें सूरजमल्लाची हितकारक मसलत नाकारिली! पण आपण केवळ मत्सरास वश होऊन हें केवढें वाईट काम करीत आहों हें भाऊंच्या लक्षांत आलें नाहीं. सूरजमल्लास राग आला; पण तो शाहणा, अनुभवी व प्रसंगानुसार वागणारा असल्यामुळें त्यानें तो उघड करून दाखविला नाहीं. पुढें सदाशिवरावास द्रव्याची गरज लागली. त्याकरितां त्यानें दिल्लीचें बादशाही तक्त फोडण्याचा निश्चय केला. तेव्हांही सूरजमल्लानें असें न करण्याविषयीं भाऊस

पुष्कळ सांगितलें पण उपयोग झाला नाहीं. सूरजमल्लास फार राग आला व त्यास आपला अपमान सहन न होऊन तो सैन्यासह निघून गेला! होळकराचें व भाऊंचें सरळ नव्हतें; यामुळें लढाईच्या ऐनरंगांत होळकरानें लढाईची टंगळमंगळ केली; या दोन्ही गोष्टी एका क्षणांत होऊन गेल्या, पण त्यामुळें मराठीराज्यास जी भयंकर जखम लागली ती कधींही बरी झाली नाहीं, पण ती जखम कुजून तिनें शेवटीं मराठीराज्याचा अंत झाला! सर्व हिंदुस्थान शोकानें दणाणून गेलें, मराठ्यांचा पराभव होऊन त्यांची अपकीर्ति झाली, राक्षसावतारी क्रूर अफगाणांनीं त्यांच्या वीरांचा चुराडा उडविला, अनाथ, जखमी, बायकामुलें, यांची सुद्धां त्या पाषाणह्रदयी अफगाणांनीं दया केली नाहीं! हे सगळे परिणाम आपसांतील वैमनस्यांचे!

शिंद्यांचा व नानांचा अंतर्यामांतून द्वेष होता. एकानें दुसऱ्यापेक्षां अधिक वर्चस्व मिळवूं नये असें उभयतांस वाटत होतें. वास्तविक पाहिलें असतां उभयतांचें काम वेगळें! एक तरवारबहादूर व दुसरा कलमबहादूर! पण तरवारबहाद्दरास एकदा कलमबहादूर होण्याचीही इच्छा झाली! तो पुण्यास आल्यावर त्यानें नानांचें दरबारांतील वजन कमी व्हावें ह्मणून पुष्कळ प्रयत्न केले व आपल्यास सर्व अधिकार मिळावा अशीही त्यानें इच्छा दर्शविली पण शिंद्यांच्या मृत्यूमुळें सर्व आटोपलें!

नारायणराव पेशव्याची आई गोपिकाबाई व रघुनाथरावाची बायको आनंदीबाई यांचा मोठा द्वेष होता. आनंदीबाई नेहमीं राघोबादादास पेशव्यांच्याविरुद्ध उठण्याची भर देत असे. त्यानें कित्येकवेळां दंगे करून माधवरावास त्रास दिला; पण माधवराव शहाणा असल्यामुळें त्याचें कांहीं चाललें नाहीं. आपण मेल्यावर काका नारायणरावास त्रास देतील, असें मनांत आणून अंतकाळीं माधवरावानें नारायणरावास राघोबाचेच स्वाधीन केलें व हा लहान व असमंजस आहे, यास अंतर देऊं नका, याचें रक्षण करा, असें सांगून त्यापासून शपथ करविली तरी त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. दादा पडले बाईलवेडे! तिणें मरणसमयींची आणभाक गुंडाळून ठेवून वेगळ्याच विचारांत दादांस ढकललें! 'नारायणरावास धरावा' अशी दादांच्या हातची चिठी तिनें मिळविली व ध चा मा करून केवढें भयंकर कृत्य घडवून आणलें हें इतिहासज्ञांस माहीतच आहे!

कोल्हापूरचा राजा व पेशवे यांचें वैमनस्य होतें. त्यांणीं एकमेकांस कधीं साह्य तर केलेंच नाहीं, पण एकमेक एकमेकांच्या मुलखांवर स्वाऱ्या करून एकमेकांचे मुलुख लुटीत असत! पानपतच्या लढाईंत पेशव्यांचा पराभव झाला व पुढें कांहीं दिवसांनीं नानासाहेब पेशवे मेले; ह्या दोन्ही गोष्टी मराठी राज्यास अपायकारक झाल्या, पण ताराबाईस त्याबद्दल कांहीं वाईट वाटेल नाहीं. ती आपल्या मरणसमयीं ह्मणाली:—" बाळाजी बाजीराव व सदाशिवराव भाऊ हे दोघेही मेले, असें ऐकून मी मरत आहें, यामुळें मला मोठा संतोष वाटतो ! "

हीच बाई पेशवाई गेल्याचें ऐकती तर तिला किती संतोष झाला असता ! आपसांतील कलह आमच्यांत कोणत्या धोरणाचे असतात, याचें हें मासलेवाईक उदाहरण आहे ! "

---

## वेणी-माधव.

( लेखक-दर्भ. )

सद्यःस्थितीवर एक चटकदार कादंबरी लिहिण्याचा प्रयत्न **माधवरावांनीं** कितीक दिवस चालविला होता, पण त्यांच्या हिरकणीसारख्या तीव्र कल्पनाशक्तीस, सोप्या पण सुबक सोन्याच्या भाषेचें कोंदण नसल्यामुळें ते बहुतेक निराश झाले होते. वास्तवीक अशा कादंबरीलेखनाबद्दलची त्यांची उत्सुकता मोठी प्रबल होती; कारण त्यांच्या अविवाहित स्थितींतून सुखकर गृहस्थाश्रमांत आणण्यास, अशी सुंदर कादंबरी कारणीभूत होणार असल्याचें त्यांना अश्वासन मिळालें होतें.

**प्रबोधरावाची** प्रबुद्ध कन्या प्रगतीबाई, यांना मराठी भाषाविषयाचें उच्चशिक्षण देण्याची शिकवणी, कांहीं दिवसांपूर्वीं माधवरावांकडे होती. प्रगतीस कादंबरीचा फार छंद असल्यामुळें, तिला वाचावयास योग्य, अशी सद्यःस्थितीवर सुरेख कादंबरी लिहून, एखाद्या प्रख्यात मासिक पुस्तकांतून ती प्रसिद्ध केल्यास प्रगती आपणास आनंदानें माळ घालील, अशातऱ्हेचें **प्रबोधरावाचें** वचनात्मक भाषण ऐकून, **प्रगतीनेंही** स्मितहास्य करून **माधवरावाकडे** आशापूर्ण दृष्टीनें पाहिलें होतें. या गोष्टीस दोन वर्षें होऊन गेलीं.

माधवरावाची ती शिकवणीही सुटली. तथापि कादंबरीची आठवण, मधून मधून गांठ पडल्यावर, अद्याप अविवाहित असलेल्या प्रगतीकडून त्यांना मिळत असे.

महागाईसारख्या अफाट शहरांत चारदोन शिकवण्या धरून, गरीबीनें निर्वाह करून, माधवराव राहिल्यावेळांत लेखनव्यासंग करीत, कादंबरी लिहिण्याच्या नादांत, एकदां सारी रात्र जाग्रण झाल्यामुळें, सकाळीं माधव-राव शिकवणीसाठीं बाहेर पडले तेव्हां, अगदीं निरुत्साह व त्रासलेले दिसत होते. जड पावलांनीं, बाजारपेठेंतून, विचारशून्य वृत्तींत, ते खालीं पाहून गर्दींतून चालले असतां, गटराजवळ कांहीं केरकचऱ्याच्या कागदाच्या कपट्यांत, त्यांना एक कागदाचीच जाडशी गुंडाळी दिसली. सहजीं त्यांनीं ती उचलली. कागदाची व्यवस्थेनें सुरळी करून वर दोरा गुंडाळलेला होता. आंत बालबोध मजकूर लिहिलेला दिसत होता. घरीं गेल्यावर काय आहे तें पाहूं, अशा विचारानें, त्यांणीं तें पुडकें खिशांत घालून आपल्या शिकवणीची वाट धरली.

संध्याकाळीं खाणावळींत जरा लौकर जेवण करून, माधवराव बिऱ्हाडीं आले व त्यांणीं ते सकाळीं सांपडलेले कागद वाचून पाहण्यास सुरवात केली. ती एक छोटीशी हस्तलिखित कादंबरी होती. आरंभ केल्यावर त्यांना ती संपविल्याशिवाय खालीं ठेववेना, इतकी ती मजेशीर होती. भाषेचा थाट ठसकेदार, विचार अमळ गहन, पण कौशल्याच्या मांडणीनें सहज सुबोध झालेले, संविधानक अगदीं व्यावहारिक पण जुळणी मोठी मार्मिक, एकंदरींत वाचकांना गुंगवून सोडणारी ती बहारीची गोष्ट वाचून माधरावराव थक्क झाले.

ही " उपेक्षा " नामक कादंबरी किऱ्यासाखीं पुढें ठेवून, तिच्यांतील भाषामाधुर्य, आपल्या कादंबरींत उतरण्याचा सरळमार्गाचा प्रयत्न सोडून प्रगतीच्या मोहानें अधोगतीचे विचार माधवरावांना सुचूं लागले! " भिकाजी भैरव भोपळे " नांवाच्या गृहस्थानें लिहिलेली ती कादंबरी, चोरटेपणानें आपल्याच नांवाखालीं प्रसिद्ध करून प्रगती प्राप्त करून घेण्याचा स्वार्थी विचार त्यांच्या मनांत एकसारखा घोळूं लागला. प्रथमतः " उपेक्षे " च्या कर्त्याची बारीक चौकशी करण्याचा बेत करून माधवराव

निजले; पण निव्वळ आपमतलबी हेतूमुळें उत्पन्न होणाऱ्या कुविचारपरंपरेनें ग्रस्त केल्यावर स्वस्थ झोंप कोठून येणार !

सकाळीं **राष्ट्रमताचा** ताजा दैनिक अंक **माधवराव** वाचीत असतां, त्यांत त्यांना असा मजकूर दिसलाः-" अपघात-दलालपेठेंत साडेचार वाजतां एका बड्या गोऱ्या कामदाराच्या भरधांव पळणाऱ्या मोटारगाडीखालीं **भिकाजी भैरव भोपळे** नावांचे गृहस्थ सांपडले. तत्क्षणीं त्यांना मरणोन्मुखस्थितींत इस्पितळांत नेण्यांत आलें. पण तेथें औषधोपचार होण्यापूर्वींच ते मृत्यु पावले ! " **माधवरावांना** केवढा हा अपेक्षित आनंद ! लगेच त्या कादंबरीचें नांव " **उपेक्षे** " चें " **अपेक्षा** " करून, जुजवी फेरफारांनीं, आठ पंधरा दिवसांत " **आल्हाद** " नामक वाखाणलेल्या मासिक पुस्तकांत ती कादंबरी **माधवरावांच्या** नावानें फडकूं लागली !

थोडीशीं प्रकरणें प्रसिद्ध होतांच, चांगुलपणानें " **अपेक्षा** " इतकी लोकप्रिय झाली कीं, नांवाजलेल्या प्रकाशकाकडून त्या कादंबरीच्या मालकी हक्काची मागणी **माधवरावांकडे** आली. शेवटीं " **आल्हादा** " नेंच पांचशें रुपये देऊन " **अपेक्षा** " आपलीशी केली. या उत्तम कादंबरीनें आरंभ झालेल्या **माधवरावांच्या** लेखनकौशल्याची छाप पडून, त्यांचा लेखनव्यासंग झपाट्यानें वाढत जाऊन, त्यांत त्यांना चांगलें यश येऊं लागलें. अशास्थितींत **माधवरावांची** " **अपेक्षा** " " **प्रगती** " ला कां पसंत पडणार नाहीं ? पण दुःखाची गोष्ट इतकीच कीं " **अपेक्षा** " अस्फुट असतानांच **प्रगतीचा** विवाह होऊन चुकला होता ! **प्रगतीनें माधवरावांना** बंधु मानून सप्रेम त्यांचें सांत्वन केलें खरें तरी पण त्यांना किती वाईट वाटलें असेल हें सांगतां येणें कठीण आहे.

**अपेक्षेच्या** पायगुणानें लक्ष्मीची कृपादृष्टी झाल्यामुळें, **माधवरावांनीं** पहिली भिकार खाणावळ सोडून ते दुसऱ्या चांगल्या खाणावळींत जेवूं लागले. तेथें खाणावळीण बाईची फार दूरच्या नात्याची एक चवदा वर्षांची हुषार मुलगी होती. तिचें नांव वेणू. तिच्या तोंडावर देवीचे दाट वण असून, डोळे आवळलेले होते. तिला देवी आल्यापासून चांगलेंसें ऐकावयाला येत नसे. तिला थोडें लिहितां वाचतां येई. पोर मोठी सालस व सुस्वभावी

होती; पण तिची ती खाट "अज्जी" ह्मणजे खाणावळीण बाई तिला मनस्वी छळीत असे; धड पोटभर अन्न व अंगभर वस्त्र देखील वेणूला मिळत नसे. माधवरावांना सहजीं तिची कींव येऊन, ते तिचा कैवार घेत; पण यामुळें मंडळी थट्टेनें माधवरावांना वेणूचें पाणीग्रहण करून तिचे हाल चुकविण्याची सूचना करीत.

आजीच्या जाचानें त्रासून गेलेली वेणू वरचेवर रडतांना मंडळीला आढळे, पण एकदां दुपारीं जेवणाचेवेळीं, ती अतीशय दुःखानें विशेष स्फुंदस्फुंदून अश्रू ढाळतांना माधवरावांनीं पाहिली. तिच्या हीन दीन दुबळ्यास्थितीची कींव करण्याची जणूं ईश्वरीप्रेरणाच माधवरावाला झाली होती, असे ते वेणबद्दल कळवळले. त्यांचें मृदु मन द्रवलें. ममतेनें तिच्या पाठीवर हात फिरवून ते ह्मणाले "वेण, आज फारच रडते आहेस! रोजच्यापेक्षां आजी कांहीं विशेष बोलली वाटतं?" वेणू अधिकच रडूं लागली. तिणें अश्रुपूर्ण-दृष्टीनें माधवरावांकडे पाहिलें व सद्गादितपणें म्हणते, "माझं लग्न ठरलं आहे." कां तें कोणास ठाऊक, पण माधवरावाच्या छातींत धस्स झालें; तरी पण ते वरकरणी ह्मणतात, "हा वेडे, लग्न ठरलं तर हंसावं कां रडावं?"

आजीबाई स्वैंपाकघरांतून ऐकतच होत्या. त्या पुढें येऊन, मायावी-स्वरानें ह्मणतात, "माधवराव, तुह्मींच पहा बरं, ही घोडी लहान कां आतां रडायला? चवदावं वरीस संपत आलं. स्वरूपान पहावी तर गजनेत्रीं, बहिरी, उकटतोंडी शूर्पणखाच! कोण करून घेणार? पण तीं माणसं आपलीं सुज्ञ, त्यांणीं पत्करली. मी 'हूं' ह्मटलं, यांत वावगं तें काय? आतां ठेवायची सोय कां आहे? ही नसती उठाठेव माझ्यामागं लागली. तिचा भाऊ आपला चांगला शाहणासुर्ता होता. त्यानेंच तिला सांभाळली; पण काय करतो बिचारा! मोटार कां कोठार—मला नाहीं बाई माहीत-वाफेची गाडी असतेना! तिच्याखालींच बापडा सांपडून जिवाला मुकला, नी, ही साडेसाती माझ्या गळ्यांत पडली."

मंडळींतला एक वात्रट लगेच म्हणतो, "केवढी साडेसाती ही आजीबाई ना! आतां साडेसातशें रुपये, वेणूचा हुंडा येईल, तो बिचारीनें ठेवावा तरी कोठें!" दुसरा म्हणतो, "तर मग एखादा शारदेचा श्रीमंतच जामात

करणार कीं काय, आजीबाई ?" तिसरा ह्मणतो, " शारदेचा श्रीमंत पुष्कळ भाग्यवान ! ' आकाशींची चांदणी ' दिपविण्यासारखीच शारदेची ' स्वरूप-संपदा ' होती ! " चवथा म्हणतो " पण आजीबाईनीं ठरविलेले श्रीमंत जांवई, जरठ असून अंध आहेतना ! मग आहे कीं नाहीं ही शारदेच्या श्रीमंतावर ताण !! त्याला वेणू सुरूप आणि कुरूप सारखीच !! " पांचवा गंभीरपणें डोकें खाजवीत ह्मणतो, " पण कायहो, त्या श्रीमंताचे बारा वाजवून फटाकडी शारदा उपटणारा कोदंड इथं कुठं आहे ? " सहावा, माधवरावाकडे पाहून ह्मणतो, " हात्त्याच्या ! वेणीचा परम कनवाळू, हा माधव नव्हे कां ! "

हा संवाद ऐकून, आजीबाईच्या अंगाचा नुसता तिळपापड झाला; व या टीकेला कारण झालेल्या वेणूच्या रड्याचा सूड उगविण्यासाठीं तिनें वेणूच्या पाठींत एक रपाटा ठेवून दिला ! त्या आवाजानें माधवरावाचें चित्त ठिकाणावर आलें. इतकावेळ ते वेगळ्याच विचारांत गर्क होते. वेणूचा भाऊ मोटारगाडीखालीं सांपडून मेला याचा अर्थ काय ? याच गूढांत ते होते. आपल्या " अपेक्ष " चा ह्मणजे पाहिल्या " उपेक्षे " चा कर्ता तर तो नसेलना ? त्यांचें शंकितमन ' तोच तो ' म्हणून सांगत होतें ! मंडळीदेखत या गोष्टीची वाटाघाट नको असल्यामुळें माधवराव त्यावेळीं मुकाट्यानें चालते झाले.

तिसरे प्रहरीं ते पुन्हां खाणावळींत आले. तेव्हां तेथें मंडळी नव्हती. शिवाय आजीबाई भावी जामाताकडे देवघेवीच्या ठरावासाठीं गेल्या होत्या. अर्थात् घरांत एकटी वणूच डोळ्यांतून पाणी गाळीत काम करीत होती. माधवराव तिच्याजवळ जाऊन मायेनें ह्मणतात, " वेण तुझ्या भावाचं नांव ग काय होतं ? तो काय उद्योग करी ? तो मोटारगाडीखालीं कसा सांपडला ? मला सगळी हकीगत सांगशील कां ! वेणू सुस्कारून मर्यादशीलपणें ह्मणते, " माधवराव, आज दुपारीं मंडळींत माझी आणि माझ्या लग्नाची, काळजाला झोंबण्यासारखी चाललेली हेटाळणी आपण ऐकलीतना ? मग तुह्मालाच माझी अगत्यानें वास्तपुस्त करण्याची सुबुद्धि होते, हे मजवर केवढे तरी उपकार ! माझ्या भावाचें नांव भिकाजी भैरव भोपळ, मी

त्याला भिकुदादा म्हणे. माझा दादा जरी फार शिकला नव्हता, तरी मराठी भाषा लिहिण्यांत तो मोठा पटाईत असे; पण तो सारे लेख सांकेतिक टोपण-नांवाखालीं प्रसिद्ध करी. यामुळें त्याचें खरें नांव विशेषसें कोणाला माहीत नाहीं. त्याणें मला चवथ्या पुस्तकापर्यंत उत्तमतऱ्हेनें शिकविलें आहे. तो एक सुंदर कादंबरी लिहित होता. तिच्या प्रकाशनाचा सारा फायदा मला लावण्याचा त्याणें संकल्प केला होता, पण एकेरात्रीं आमच्या येथें चोरी होऊन त्यांतच ते कादंबरींचे कागदही गेले. यामुळें भिकुदादाला फार वाईट वाटलें. कारण माझ्या लग्नाला तात्कालिक अन्यसाधन नव्हतें. तो उदास होऊन, दुसरे दिवशीं विचारमग्नवृत्तींत, रस्त्यानें जात असतां, मोटार आलेली समजली नाहीं, आणि अखेर त्या मोटारवाल्या साहेबानें माझ्या लग्नासाठीं शे दोनशे रुपये, माझ्या या आजीजवळ दिले आहेत ह्मणे. पुरें मला माहीत नाहीं. अशी माझी जन्माची रडकथा आहे. "

माधवराव गहींवरून ह्मणतात, " वेणे तुझ्या हल्लींच्या संकटांत, मागल्या दुःखाची मी आठवण करून दिली, याबद्दल मला क्षमा कर. आणखी एकच प्रश्न विचारतों तेवढा सांग ह्मणजे झालें. " तुझा दादा त्या कादंबरींतिल मजकूर, तुला कधीं वाचून दाखवीत होता कां ? " वेणू उत्सुकतेनें ह्मणते, " हो, दादा वाचून दाखवी एवढेंच नव्हे तर मीही स्वतः मधून मधून वाचीत असे. त्या कादंबरींतला बराच कथाभाग मला ठाऊकही आहे; पण ही इतकी चौकशी आपण कां करता, हें मला कळेल कां ? "

माधवरावांचा कंठ भरून आला व एखादा अश्रु डोळ्यांत उभा राहील, या भीतीनें त्यांणीं डोळे पुसले. नको होय करणाऱ्या भीरु मनाला सत्यपणाची धिटाई आणून, माधवरावांनीं सारी इत्थंभूत खरी खरी हकीकत, वेणूपुढें ओकून टाकून, स्वतःच्या सदसद्विवेकबुद्धीच्या टोंचणींतून ते मुक्त झाले. मनावरील जड दडपण उतरल्यासारखें होऊन ते ह्मणाले, " वेणे, असा मी चोर, तुझा गुन्हेगार आहे. या अक्षम्यप्रमादासाठीं काय सांगशील तें तुझ्याकरितां करीन. तें माझें पवित्र कर्तव्य आहे. तर बोल, मी काय केलें असतां तुझें कल्याण होईल. " वेणू लाजत लाजत, किंचित हंसून, माधवरावाकडे अपेक्षापूर्ण नजर फेंकून ह्मणते, " छे, छे, प्रमाद कसला,

प्रमादच मी समजलें. आतां आपण अविवाहित आहां व माझंही लग्न व्हायचंच आहे आणखी काय सांगू? पण शालजोडीला, वाकळेंच नव्हे—कांबळ्याच्या रकट्याचं ठिगळ कसं शोभणार? " असें ह्मणून तिनें खालीं मान घातली व ती चोरट्या दृष्टीनें माधवरावाचें मन चोरूं लागली! ईश्वरी संकेतानुरूप बिचारा माधवराव प्रेमपाशांत बद्ध झाला व हंसत हंसत वेणूच्या हनुवटीस हात लावून ह्मणतो, " तर मग दुपारीं मंडळीनें ठरविल्याप्रमाणें अखेरीस मला तूं कोदंड बनविलेंस ! " वेणूही जरासें गाल फुगवून ह्मणते, " त्यांत मग वाईट तें काय झालं ? "

निर्मळ प्रीतीचा हा वेणी–माधवाचा जोडा विवाहसंबंध झाल्यावर महागाई सोडून स्वस्ताईच्या खेड्यांत सुखासमाधानानें नांदत आहे. त्याच्या विवाहाचें वरील विचित्र गूढ कोणालाही माहीत नाहीं. तें षट्कर्णी करून त्यांच्या आनंदामृताच्या पेल्यांत विषबिंदु टाकण्याचें पाप वाचकांनीं जोडूं नये एवढीच विनंती आहे.

## भिक्षु-स्वप्न.

श्लोक.

फिरत फिरत एका राजधानीस आलों ।
बघुन अतुल शोभा मी तिची फार धालों ॥
नवल नगरिं त्या तों एक वर्तून राहे ।
श्रवण करि सुखें मी सांगतों तें गड्या हे ॥ १ ॥
अवचित नगरीच्या मृत्यु आला नृपाला ।
असति न सुत किंवा अन्य दायाद त्याला ॥
ह्मणुन जमुन मंत्री सर्व मोठे हुशार ।
जनपद सुविचारें योजिती हा विचार ॥ २ ॥
" सजवुन गजशुंडादंडिं देऊन माला ।
जन जमवुन द्यावें शीघ्र सोडून त्याला ॥
गजधर मग ज्याच्या कंठिं घालील माला ।
नरपति समजावें आमुचा पूज्य त्याला " ॥ ३ ॥
परमरुचिर ऐशा मंडपीं शीघ्र सारे ।
झटुन नटुन आले लोक नानाप्रकारें ॥

सहज फिरत गेलों मीहि तेथें गड्या हे ।
मलिन वसन ऐसा भिक्षु मी दूर राहें ॥ ४ ॥
गज पण सुहृदा ! तो दूर धावून आला ।
मजजवळ, गळां तो अर्पि माझ्या सु-माला ॥
समजुन मग मातें आपुला पूज्य राजा ।
करिति सकल हर्षे फार सन्मान माझा ॥ ५ ॥
मज सुरुचिर वस्त्रें देउनि आदरानें ।
सविनय शिबिकेंत स्थापुनी कौतुकानें ॥
मिरवित मग नेती राजवाड्यास मातें ।
झडति मधुर वाद्यें गाति बंदी यशातें ! ॥ ६ ॥

* * *

मी भिक्षु अन्न न मिळे मज खावयातें ।
संप्राप्त राज्यपद होय पलांत मातें ! ॥
होता असा विधिबळें बलपूर्ण राजा,
मावे न हर्षभर तैं गगनांत माझा ॥ ७ ॥
सिंहासनीं बसविती मज आदरानें,
वस्त्रोत्तमें सुरुचिराभरणें सुखानें ।
मित्रा ! सजून मग दीनजनास दानें,
देऊन मी सुखविलें सकलांस मानें ॥ ८ ॥

* * *

मी घेतला निजकरीं मग कारभार,
तेव्हां प्रजा सकल हर्षित होय फार ।
राज्यांतलें सकल नासुन दुःखताप,
केला जगीं प्रकट मी अतुलप्रताप ! ॥ ९ ॥
भार्या मिळे रतिसमान सुरूप मातें,
तद्रूपद्गुणां मज न शक्ति वदावयातें ।
मीं तत्सवें बहुपरी करितां विलास,
सीमा उरे न मम खास तईं सुखास ! ॥ १० ॥
भाग्योदयीं सतत ये भरतें सुखाला,
मातें सुरूप बहुत द्रुत पुत्र झाला ।
प्रौढत्व सृष्टिनियमें जंव पुत्र पावे,
आलें मनीं तनयलग्न जवें करावें ॥ ११ ॥
पाहून सुंदर अशी मग राजबाला,
मी योजिली ममसुतास वधू सुशीला ।
लग्नोत्सव त्वरित मन्नगरींत चाले,
हर्षादधींत जन सर्व निमग्न झाले ॥ १२ ॥

मी वेंचिलें धन अपार; कमी न कांहीं,
भातें; भरे मम सुकीर्ति दिशांत दाही।
उत्कर्ष हा न रुचला जगदीश्वराला
माझ्यावरी ह्मणुन ये बहु घोर घाला ॥ १३ ॥

* * *

माझे रिपू जमउनी बल फार मोठें,
चालून येति-मम सौख्यसमुद्र आटे—।
चाले भयंकर खचीत तईं लढाई
अंतीं परंतु मम सैन्य पळून जाई ॥ १४ ॥
आले अरी नगरिं निर्दय हे बघून,
गुप्तस्थळीं भिऊन मी बसलों लपून।
तेथेंहि शत्रु मज शोधित शीघ्र आले,
तत्काल सर्व अवसान गड्या! गळालें ॥ १५ ॥
तेव्हां मला न उठवेच पडून राहे
वैरी मदीय धरिती मजला सख्या! हे!।
निर्भत्सुनी मजवरी करितीं प्रहार,
मी ओरडे मम मनांत भिऊन फार ॥ १६ ॥
तत्काल जागृत जरी सखया! जहालों,
होतों खरोखर तरी मनिं फार भ्यालों।
शोधून मी मग हळू मम अंग पाहे,
झाला न वार मज; मी सुखरूप आहें ॥ १७ ॥
डोळे हळू उघडुनी मग नीट पाहे,
झाली पहांट; निजलों सदनांत आहे!।
कोठें अरी असति ते मम तोहि वाडा?
याचा क्षणांत मज होय गड्या! निवाडा ॥ १८ ॥
स्वप्नांत मीं सकल ज्यां वरिलें सुखातें।
स्वप्नांत खास मुकलों सखया! तयातें ॥
झालें बरें मज न शोक गमे तदर्थे।
भिक्षा क्षुधा शमविण्यास असे समर्थ ॥ १९ ॥

* * *

स्वप्नस्थ सौख्यसम जीवित या जगांत।
आहे अशाश्वत धरून असें मनांत॥
जातो सुखें शरण जो जगदीश्वराला।
तो पावतो जगतिं शाश्वत सत्सुखाला ॥ २० ॥
या स्वप्नवृत्ता कथिलें रुख्यातें। त्या भिक्षुनें एकुनियां तयातें ॥
श्लोकांत 'कल्लोळकरें' रचून। समर्पिलें सद्रसिकां नमून ॥ १ ॥

कृ. बा. कल्लोळ.

# नैसर्गिक सृष्टिजन्य कारंजें.

( लेखक— ०र्विग )

शरीरसंपत्ति सदृढ, द्रव्याची अनुकूलता, स्वाभाविक उद्योगशीलता, मनाला हौस, आंगीं निरालसता इत्याद्यनेक गुणसंपन्न मनुष्य असला ह्मणजे त्यास सृष्टींतील साधारण वस्तु पाहिल्यापासून आनंद व ज्ञान प्राप्त होतें. मग अद्भुत, अलौकिक, अशी वस्तु पाहिल्यापासून त्यास किती आनंद होईल याची कल्पना वाचकांनींच करावी. अशा अलौकिक चमत्कारांपैकीं आज वर निर्दिष्ट केलेल्या चमत्काराची माहिती आम्हीं मित्राच्या वाचकां- करितां देतों.

हें कारंजें ऐसलंडमध्यें आहे. ह्याच्यासारखें चमत्कारिक व मनोवेधक कारंजें पृथ्वीवर अन्यठिकाणीं क्वचितच आढळेल. हें त्या बेटाच्या नैर्ऋत्य दिशेस आहे. त्यास तद्देशीय लोक ' **गसीअर** ' असें ह्मणतात. ह्याचा घेर सुमारें १०० मैल आहे. हें हेक्लापर्वतांत उत्पन्न झालेल्या ज्वालामुखीच्या रसानें बनलेलें आहे. ह्याचें मोठ्या विहिरीसारखें पात्र आहे, त्याचा व्यास ६६ फूट आहे व खोलीं ७८ फूट आहे. ह्यांतून नेहमीं आधण आल्याप्रमाणें पाण्याचा जलस्तंभ सळसळत असतो. पाणी उडत असतां तोफांच्या गड- गडाटाप्रमाणें किंवा मेघगर्जनेप्रमाणें कर्णकटु हृदयभेदक ध्वनि होत असतो व क्षणार्धांत जिकडे तिकडे पाणीचपाणी-रसमय-होऊन जातें; पहिला कारंजा जलस्तंभ-भुईनळा फुटल्याप्रमाणें एकाएकीं उडूं लागतांच, पांच मिनिटाचे आंत दुसरा, तिसरा अशीं सुमारें १५ कारंजीं—जलस्तंभ-सुरू होतात, त्यांची उंची सरासरीच्या मानानें १९ फुटांपासून ५० फुटांपर्यंत असते. पाण्याची उष्णता फारेनहाइटचे २०९ असते. मुख्य जलस्तंभ हा कधीं कधीं पन्नासपासून दीडसें फुटांपर्यंतही उंच चढलेला आढळतो. हें कारंजें म्याडम आइडाफीपर ह्या नांवाच्या बाईला पृथ्वीप्रदक्षिणा केली त्यावेळीं आढळलें. तिनें स्वतः पाहिलेला चमत्कार लिहून ठेविला आहे तो असा. ती ह्मणते " आह्मीं सुमारें २५ मैल चालून गेल्यावर या देखाव्याजवळ येऊन पोहोंचलों. ही एक तप्तरसाची नदीच आहे. हिचें पात्र रुंद व खोल असून त्यांतून लावारस वाहात असतो. मध्यंतरीं १८।२० फूट उंच व

१५।१८ फूट रुंद असा शिलामय प्रदेश आहे त्यावर तो प्रवाह आपटून त्याचा धो धो असा आवाज कित्येक कोसपर्यंत ऐकूं येतो. नदीवर लहानसा लांकडी पूलही बांधिलेला दिसला. खडकामुळें झालेले धबधबे तीसपासून चाळीस फुट उंचींचे आहेत. ज्या खोऱ्यांतून ही नदी वाहते तें फार चिंचोळें आहे. त्यांतून आह्मीं गेल्यावर आमच्या नजरेस एकदांचा मुख्य प्रवाह पडला, त्याबरोबर जगडव्याळ वाफेचे लोळ व त्यानें बनलेले ढग लहानमोठ्या प्रमाणावर आमच्या दृष्टिस पडले. हा जलाचा ओघ पाहण्याबरोबर आमच्या प्रवासाचें सार्थक होऊन जन्मसाफल्याची कृतकृत्यता वाटली. अशाप्रकारचा कारंजा नेहमी उडत राहतोच असा नियम नाहीं ह्मणून आह्मांस तीन रात्री तशास्थितींत काढाव्या लागल्या तेव्हां सर्व चमत्कार दृष्टीस पडला व एकदांचें डोळ्याचें पारणें फिटलें. खरेंच असला भव्य व दिव्य सृष्टचमत्कार माझ्या जन्मांत कधीं दृष्टीं पडावयाचा नाहीं. मी याची जी माहिती पुस्तकांत वाचिली त्यापेक्षां शतपटीनें नव्हे लाखोपटीनें हा प्रेक्षणीय, वर्णनीय व प्रशंसनीय असा आहे. तप्तरसाचे जे सोट उडत असत ते एकाहून एक वरचड होण्याकरितां उंच उंच उडत; मी जी माहिती सांगतें त्यांत अतिशयोक्तीचा लवलेश नाहीं. " अशाप्रकारचे सृष्टचमत्कार- जलस्तंभ कारंजीं अनेकठिकाणीं आहेत. त्यांचीही समयानुसार थोडी माहिती सांगून हा लेख पुरा करितों. प्रॉव्हींन्समधील कॉमसशहराजवळ एक कारंजा आहे तो प्रत्येक सातव्या मिनिटांत बंद होतो. लांगडाकमध्यें टान्साक या नांवाचा एक कारंजा आहे तो दिवसांत सात तास वाहतो व पांच तास बंद होतो. जणूं काय म्युन्सीपालटीच्या कायद्यांनीं त्यास पूर्णपणें बांधून घेतलें आहे.

कंटिक्टमध्यें गिलफोर्डजवळ असाच एक कारंजा आहे त्याचे पाण्याच्या आंगीं असा विलक्षण धर्म आहे कीं, तें कुपींत अगर दुसऱ्या कोणत्याही भांड्यांत बंद करून ठेविलें तर तें आटून कुपी अगर भांडें अगदीं कोरडें ठणठणीत पडतें. माउंटसाराकेमध्यें असाच उडता फवारा आहे. त्याचे पाण्याचा असा धर्म आहे कीं, तें सूर्य जसजसा वर येईल तसतसें तापूं लागतें. इंग्लंड, स्पेन, वेल्समध्यें नियतकालिक कारंजीं पुष्कळच आहेत.

यार्कशायरमध्यें एका कारंज्याच्या आंगीं असा चमत्कारीक धर्म आहे कीं तें एका तासांत कित्येकवेळां बंद व कित्येकवेळां सुरू होतें. वेस्टफालियामध्यें बुलरहॉर्न ह्या नांवाचा कारंजा आहे त्यांतून नेहमीं 'सूं' असा आवाज होतो. हिरोडोटस व डायडोरस हे प्रवासी असें सांगतात की, "ज्युपिटरच्या देवळा शेजारीं 'सूर्य' नांवाचा कारंजा आहे, त्याचें पाणी सकाळीं ऊन असतें व संध्याकाळीं थंड असतें. पुन्हा सूर्य मावळला कीं, तापूं लागतें व मध्यरात्रीं आधण येतें व उजेडतांच थंड होतें असा क्रम सतत चालू असतो. डोडोनोच्या अरण्यांतील कारंजाचे आंगीं मशाल पेटविल्याप्रमाणें उजेड देण्याचा धर्म आहे. हा दिवसा कोरडा व रात्रीं जलबंब वाहतो." प्लिनी ह्मणतो. "लेकलारियनचा कारंजा दिवसांतून तीन वेळ बंद व तीन वेळ सुरू होतो. कित्येक कारंजांचे आंगीं तरुणांस रूपसंपन्न करण्याचा, गुणावह औषधींचा, रक्तपिती नष्ट करण्याचा, स्वर बदलण्याचा, स्मरणशक्ति नष्ट करण्याचा इत्यादि अनेक प्रकारचे धर्म आहेत ते सर्व सांगितलेअसतां अतिशय विस्तार होईल. पृथ्वीवरील सृष्टपदार्थांच्या आंगीं कोठें काय काय धर्म आहेत हें जाणण्याची शक्ति कोणामध्यें आहे! ज्यांमध्यें असेल ते पुरुष धन्य होत.

---

## महाराष्ट्र ग्रंथकारांचें चवथें संमेलन.

### भाग १ ला.

### संमेलनाचा वृत्तांत.

आगाऊ वर्तमानपत्रद्वारें जाहीर केल्याप्रमाणें शनिवारीं तारिख ३० मे सन १९०८ इ० रोजीं सकाळीं साडेसात वाजतां पुणें मुक्कामीं विजयानंद नाटकगृहांत महाराष्ट्र ग्रंथकारांच्या चवथ्या संमेलनास आरंभ झाला. साहित्यपरिषदेचे तिघे नामधारी चिटणिस, पुण्यातील ठरावीक मंडळी व बाहेरगांवची दहापांच मंडळी यांशिवाय या संमेलनास ग्रंथकार मंडळी फारशी आली नव्हती? नाटकगृहांत बाहेरगांवाहून आलेली ह्मणून जी मंडळी चमकत होती ती तरी लग्नकार्यानिमित्तव पुण्यास आलेली असावी असा तर्क आहे. प्रारंभीं रा. रा. वासुदेव गोविंद आपटे यानीं प्रास्ताविक भाषण केलें. "त्यांत ते ह्मणाले, "सभा, महामंडळें, संमेलनें हीं आधुनिक तीर्थक्षेत्रें आहेत. देशाची उन्नति सर्वत्राजूंनीं केली पाहिजे; सर्व लोक प्रेमरज्जूनें निगडित करण्याचा प्रयत्न करणें अवश्य आहे. राष्ट्रहितबुद्धी हा राष्ट्रोद्धाराच्या सोपानाची प्रथमपायरी आहे. वाङ्मय हें राष्ट्रीय जीवनाचा झरा आहे; सर्व जातीच्या, सर्व धर्माच्या व पंथाच्या लोकाना एका सूत्रांत गोवून सर्वांच्या

अंतःकरणाचें एका केंद्रांत आकर्षण करणारी अशी एक प्रचंड शक्ति आहे व ती शक्ति म्हणजे साहित्यप्रेम. महाराष्ट्रवाङ्मयाची परंपरा श्रीज्ञानदेव, नामदेव, तुकारामांपासून चालत आलेली आहे. मध्यंतरी ती विच्छिन्न होण्याचा प्रसंग आला होता; परंतु तो कै चिपळूणकर पितापुत्र, मोडक, रानडे यांसारख्या विद्वानांनीं टाळला. महाराष्ट्र वाङ्मयाच्या गरजा अनेक आहेत; त्या भागविण्याचा आपल्याला प्रयत्न केला पाहिजे. साहित्यविषयक प्रश्नांचा विचार एकजुटीनें करावा म्हणून प्रथम ग्रंथकारांत परस्पर स्नेहसंवर्धन करून दळणवळण वाढविलें पाहिजे व तसें करणें हाच प्रस्तुतसारख्या संमेलनाचा प्रधानहेतु होय ! " यानंतर त्यांनीं गेल्या वर्षांत परत्र पावलेल्या ग्रंथकारांचा नामनिर्देश करून व तदनंतर रा. ब. वैद्य यांची प्रशंसा करून त्यांस अध्यक्षस्थान स्वीकारण्याची विनंति केली व आपलें भाषण आटोपलें.

या सूचनेस रा. रा. न. चिं. केळकर यांनीं अनुमोदन दिल्यावर रा. ब. वैद्य हे टाळ्यांच्या प्रचंड गजरांत स्थानापन्न झाले.

मामूलवहिवाटीप्रमाणें अध्यक्षपद दिल्याबद्दल साहित्यपरिषदेचे आभार मानिल्यावर रा० ब. वैद्यांनीं आपलें लिहून आणलेलें भाषण वाचूनदाखविलें. प्रथम त्यांनीं महाराष्ट्र देशाची चतुःसीमा कायम करून ' महाराष्ट्र ' या नांवाची व्युत्पत्ति करून दाखविली. नंतर मराठी भाषेस प्रारंभ कसा झाला हें त्यांनीं सांगितलें. श्रीज्ञानेश्वर, मुक्तेश्वर, नामदेव इत्यादिकांचे ग्रंथ महाराष्ट्र वाङ्मयाचे पायाभूत होत. या पायावरच तुकाराम, रामदास, एकनाथ यांनीं इमारती उठविल्या; व याच इमारतींवर पुढें मोरोपंतादिकांनीं आपापल्या मगदुराप्रमाणें लहान मोठे सुंदर मनोरे उभविले. नाथाचें भागवत, मुक्तेश्वराचें भारत, दासाचा दासबोध व तुकारामबोवांची अभंगाची गाथा हे ग्रंथ महाराष्ट्र वाङ्मयाचीं चार दालनें होत. इ. स. १८१८ नंतर महाराष्ट्राच्या प्रतिभेस पुनः स्फूर्ति झाली व या नवीन परिस्थित्यनुरूप मराठी वाङ्मयाच्या नवीन इमारतीस आरंभ झाला. जुन्या वाङ्मयरूपी मंदिराची अधिष्ठात्री देवता भगवद्भक्ति होती व या नवीन इमारतीची अधिष्ठात्री देवता स्वदेशभक्ति ही होय. पूर्व ग्रंथकारांचा ओघ भगवद्भक्तीनें प्रसन्नशांत झाला होता. भावी महाराष्ट्र वाङ्मयाचा ओघ स्वदेशोन्नतीच्या प्रभावानें उचंबळलेला व रमणीय होईल. अशा या नूतन वाङ्मयाच्या इमारतीचा पाया कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या निबंधमालेनें घातला असें मी मोठ्या अभिमानानें म्हणतों. " या नंतर गतवर्षी प्रसिद्ध झालेल्या मराठी ग्रंथांचें परीक्षण करून त्यांनीं आपलें भाषण संपविलें.

या नंतर खाडीलकर यांनीं सन् १९०७ ते १९०८ या सालांत साहित्यपरिषदेनें केलेल्या कामांचा पाढा वाचून दाखविला. ते म्हणाले, " या संस्थेचा जन्म इ. स. १९०६ त झाला. पहिल्या वर्षी सभासद ७० होते आतां ९० आहेत. वर्गणी वसूल ५४ रुपये झाली. खर्चवेंच वजा जातां शिल्लक रुपये १६-२-६ आहेत. रा. राजवाडे यांच्या ऐतिहासिक कागदपत्रांच्या प्रकाशनाचें काम सुरू आहे. सध्यां साहित्यपरिषद मराठी शास्त्रीय परिभाषेचा कोश तयार करीत आहे. प्रथम गणीत, अर्थशास्त्र वगैरे चारच शाखा घेतल्या, होत्या आतां आणखी दोन घेतल्या आहेत. हा कोश तयार करण्याचे कामीं रा. ब. महा-

जनीं, प्रो. पेंडसे, प्रो. साठे, रा. गोडबोले, रा. दीक्षित व रा. गोखले या विद्वान गृहस्थांनीं अत्यंत साह्य केल्याबद्दल परिषद त्यांची फार आभारी आहे. यंदा परिषदेकडून पुस्तकपरीक्षणाचें काम व्हावें तसें झालें नाहीं. परीक्षणाकरितां अवघीं चारच पुस्तकें आलीं पैकीं दोन परीक्षणायोग्य नसून बाकीचीं अद्याप परीक्षकांकडे आहेत. याशिवाय परिषदेनें परिश्रम घेऊन जुन्या मराठी दुर्मीळ काव्यग्रंथांची एक विस्तृत यादी तयार करविली आहे."

सदरहू रिपोर्ट वाचून झाल्यावर सभेचें काम संपलें. दुपारीं ठरल्याप्रमाणें कामास ४ वाजतां आरंभ न होता ४-३० वाजता झाला. प्रथम पारिभाषिक शब्दांची छान करण्याकरितां एक मंडळ ( कमेटी ) नेमिलें नंतर प्रथम रा. रा. लेले शास्त्री यांनीं चालू क्रमिकपुस्तकांवर लिहून आणलेली आपली टीका वाचून दाखविली. क्रमिकपुस्तकांतील गुणदोष रा. लेले यांनीं विस्तारानें दाखविले. आमच्या अनादिसिद्ध निसर्गवर्णमालेचा या टेक्स्ट् रिव्हिजन् सोसायटीनें विनाकारण कसा खून केला हें त्यांनीं फार उत्तमप्रकारें समजावून दिलें. नंतर रा. रा. गोगटे यानीं आपला मोडी लिपीवरील निबंध वाचून दाखविला. यांत त्यांनीं 'मोडी' ही लीपी हेमाडपंतानें दुसरीकडून कोठून आणिली नसून किंवा ती मौर्यांची ती मोडी अशी परलीपी नसून तिची उत्पत्ति बालबोधीपासूनच झाली आहे हें सचित्र समजावून दिलें.

सदर विवेचन झाल्यानंतर संमेलनाची दुसरी बैठक पुरी झाली. संमेलनाच्या तिसऱ्या बैठकीस रविवारीं सकाळीं साडेसात वाजतां आरंभ झाला. संमेलनास हजर राहतां न येणाऱ्या गृहस्थांकडून आलेलीं खेदप्रदर्शक पत्रें वाचून दाखविल्यावर रा. सहस्रबुद्धे यांनीं शास्त्रीय वाङ्मययावरील आपला निबंध वाचून दाखविला. निबंध चांगला व उपयुक्त माहितीनें भरलेला होता. यावर डॉ. चिळणकर यांनीं बडोद्यास कै. रा. ब. विनायकराव कीर्तने यांनीं स्थापिलेल्या परंतु आतां नामशेष झालेल्या व्हर्न्याक्युलर कॉलेज ऑफ सायन्स' या संस्थेचा अनेक दृष्टीनें बोधप्रद असा इतिहास सांगितला. यानंतर ठाण्याचे रा. विनायकराव भावे यांचें व्याख्यान झालें. ते ह्मणाले, " एल्. एम्. अँड एस् किंवा बी. एस्. सी. झालेल्या गृहस्थांकडून मराठी शास्त्रीय वाङ्मयांत कांहीं भर पडेल अशी आशा करणें चुकीच आहे. वरील मंडळींना खरें ज्ञान मुळींच नसतें. डॉक्टरलोक ह्मणजे इंग्रजी औषधें खपविणारे दलाल होत. त्यांना औषधें तयार करितां येत नाहींत. बी. एस्. सी. नाही शास्त्रीय ज्ञान कांहींच नसतें. व्यवहारोपयोगी शिक्षण देण्याचा सरकारचा हेतु नाहीं. भाषांतररूप ग्रंथानीं शास्त्रीय शिक्षणाची मदत व्हावयाची नाहीं. एकंदरींत सांगावयाचें तात्पर्य एवढेंच कीं, " खरोखरी उपयुक्त असे शास्त्रीय ग्रंथ निर्माण होण्यास जशा प्रकारची अनुकूल परिस्थिति पाहिजे तशी सध्यां नाहीं; सबब तिची अनुकूलता होईपर्यंत शास्त्रीय वाङ्मयाचें गाडें असें रखडतच चालणार । "

या विषयाचा समारोप झाल्यावर प्रसिद्ध इतिहास संशोधक राजवाडे यांनीं तीन निबंध वाचिले. पहिल्या निबंधांत त्यांनीं असें सिद्ध केलें कीं, मुक्तेश्वरानें अठरा पर्वें भारत रचलें असावें व बाकीचीं पर्वें कधींना कधींतरी सांपडतील, अशी जी शंका व आशा वाटत होती, तिला आतां बिलकूल जागा नाहीं. चंद्रात्मज नामक एका कवीनें पांचवें पर्व व उद्योग

येथन भारत लिहावयास प्रारंभ केलेला आहे. प्रारंभीं त्यांनीं श्री ज्ञानदेव. सोपान, मुकुंदराज, एकनाथ व मुक्तेश्वर इतकांचा उल्लेख केलेला आहे. तात्पर्य मुक्तेश्वरानें फक्त चार पर्वे भारत रचिलें हा सिद्धांत समजावा. दुसऱ्या निबंद्धानें त्यांनीं स्टेन् कोनौ यानें प्राकृत 'ल व ळ', व 'ण व ण्ण' यांबद्दल जे सार्वत्रिक सिद्धांत ठोकून दिले आहेत ते अपवादादाखल अनेक उदाहरणें देऊन खोडून काढिले. तिसऱ्यांत ते ह्मणाले, "राष्ट्रोदय होण्यास पूर्ववैभवशाली इतिहासाची जरूरी असते. असा इतिहास लिहावयास लागणाऱ्या साधनांची मी तूर्त जळवाजुळव करीत आहें. सर्व कागदपत्र छापणें झाल्यास ४ लक्ष रुपये खर्च लागेल. राष्ट्राच्या कल्याणाकरितां हे कागदपत्र छापून काढणें अवश्य आहे; पण त्याला मुबलक द्रव्यसहाय पाहिजे. दरमहा ५।६ रुपयांत माझा गुजारा होतो. मला जेवढें अन्न लागतें तेवढेंच अन्न हजारानें पगार घेणाऱ्या बड्या माणसासही पुरणारें आहे. तरी त्यांनीं आपल्या खर्चांत व ऐषआरामांत काटकसर करून या कामास पैशाचा पुरवठा करावा."

नंतर रा. रा. शंकरराव चांगण यांनीं 'उद्देश्य व विधेय' या विषयांवर एक आर्याबद्ध निबंध लिहून आणिला होता तो त्यांनीं साकृति समजाऊन देण्याचा यत्न केला. वेदांतांतील 'एकमेवाद्वितीयं' हा सिद्धांत व्याकरणांत देखील खरा असल्याचें आढळून येतें हें सिद्ध करून दाखविण्याचा रा. चांगण यांचा हेतु आहे असें रा. मोडक यांनीं सांगितलें व याच मुद्याच्या समर्थनार्थ त्यांनीं व वे. मू. रंगाचार्य रड्डी यांनीं भाषणें केलीं.

यानंतर ज्ञानेश्वरीचा जीर्णोद्धार या विषयावर रा. पांगारकरांचें व्याख्यान झालें १५३२ सालीं भास्कर नांवाच्या लेखकानें लिहिलेली एक ज्ञानेश्वरीची प्रत माझे हातीं आली आहे असें त्यांनीं सांगितलें. त्यावर ते ह्मणाले, "ही पोथी ज्ञानेश्वरील पुरवणी दाखल लिहिलेली आहे. हींत ज्ञानेश्वरींतील ओव्यांची संख्या १००५० आहे असा उल्लेख आहे. या ग्रंथानें ज्ञानेश्वर एक नसून दोन ह्मणणाऱ्या भारद्वाजाच्या लेखास पुष्टि न मिळतां भिंगारकर बोवाच्या मतासच दुजोरा येतो. अशा ग्रंथाचा जीर्णोद्धार करावयास रा. राजवाड्यांसारखी शोधकबुद्धि व परमेश्वर भक्ति या दोहोंचा मिलाफ व्हावयास पाहिजे. नुसत्या शोधकाचे हातून ज्ञानेश्वरीच्या जीर्णोद्धाराचें काम कधींही होणारें नाहीं !

अशा आशयाचें रा. पांगारकर यांचें भाषण झाल्यावर रा. ब. जोशी यांचें भाषण झालें. त्यांचें भाषण इतकें उत्तम होतें कीं तें साररूपानें देणें चांगलें नाहीं. तें समग्रच दिलें पाहिजे पण स्थलाभावामुळें नाइलाज आहे.

रा. ब. जोशी यांचें भाषण आटोपल्यावर अध्यक्षांनीं रा. ब. जोशी यांनीं महत्वाचा कार्यभाग उरकलाच आहे असें समारोपादाखल सांगितलें. नंतर रा. न. चिं. केळकर यांनीं अध्यक्ष, वक्ते, संमेलनाचे चिटनीस, श्रोते व नाटकगृहाचे मालक यांचे आभार मानून पुढील वर्षाकरितां साहित्यपरिषदेसाठीं पूर्वींचेंच चिटनीसत्रय कायम करावे असें सांगितलें व संमेलनाचें काम संपलें

पुढच्यावेळीं दुसरा भाग ह्मणजे संमेलनासंबंधीं विचार प्रसिद्ध करण्यांत येतील.

---

अनंततनय.

# मराठ्यांना क्षत्रियत्वाचा अधिकार.

आजकाल मराठ्यांच्या क्षत्रियत्वाविषयीं जिकडे तिकडे वाटाघाट चालली आहे. कोण ह्मणतो कलियुगांत क्षत्रियांश नष्ट झाला आहे, कोण ह्मणतो "नंदान्तं क्षत्रिय कुलम्" या वचनाचा अर्थ भलताच करण्यांत येऊन क्षत्रियत्वाचा अभाव दाखविण्यांत येत आहे. अशा वेळीं एका काट्यानें समतोल न्याय करणारा शांत, निस्पृह आणि धोरणी मनुष्य पाहिजे हें खरें. श्रीमंत सयाजीराव महाराज, श्री. छत्रपती शाहूमहाराज वगैरे मराठी राजांना तर आपण क्षत्रिय आहों हें सिद्ध करून घेण्याची महत्वाकांक्षा उत्पन्न झाली आहे. इकडे धर्मसंस्थानाकडे खुलासा विचारिला असतां एकटे अनुकूळ तर एकटे प्रतीकूळ अशी दुही माजली आहे. अशावेळीं साधकबाधक प्रमाणांनीं कालमानाकडे लक्ष देऊन धर्माध्यक्षांनींहीं आपले विचार बदलणें ह्मणजे त्यांत सुधारणा करणें योग्य आहे हें कोणीही विचारी मनुष्य कबूल करील.

वरील तत्व जाणणारे आजमितीस कांहीं धर्माध्यक्ष आहेत ही संतोषाची गोष्ट होय. कारण आमचे पूज्यपाद श्रीमच्छंकराचार्य द्वारकामठाधीश यांणी श्रीमंत तुकाजीराव पवार, देवास संस्थानचे महाराज यांचें क्षत्रियत्व कबूल करून त्यांचे व्रात्यप्रायश्चित्तोत्तर उपनयनादि संस्कार वैदिकमंत्रांनी करावे असी देवास येथील ब्रह्मवृंदास आज्ञा केली आहे ही अत्यंत आनंदाची गोष्ट होय. अशाप्रकारें सर्व धर्माध्यक्षांनीं सामाजीक तेढ्यांचा निकाल करून संतोषवृद्धि केल्यास लोकांना त्यांचे कितितरी आभार वाटून सौख्यलाभ होणार आहे. श्रीपादांनीं जो कबूलीरायस दिला आहे तो उदात्त विचारांनी युक्त आणि शास्त्राधाराला धरून आहे. तो बराच विस्तृत असल्यामुळें स्थलसंकोचास्तव समग्र येथें देतां येत नाही. जरूर असणारांनी विविधज्ञानविस्तार मा. पु. १९०८ चा ६।७ अंक पहावा. आह्मीं फक्त श्रीपादांचा निर्णय तेवढा येथें देतों:—

## निर्णय

श्रीमंत सरकार तुकोजीराव बापूसाहेब, संस्थानदेवासनरेश. ... ...

ण्यांत व त्यांचे परमार क्षत्रिय घराण्यांतही धर्मशास्त्रानुसार यथावत् प्रायश्चित्त देऊन उपनयम संस्कार झाल्यावर गर्भाधानादि क्षत्रियोचित यावत्संस्कार व ग्रहस्थाश्रमोचित सर्व धर्मकृत्यांमध्यें ब्राह्मणांनीं वेदमंत्र ह्मणून वैदिक विधींनें कर्म करणें व करविणें याविषयीं शास्त्रबाध नाहीं.

या बाबत काशीपुरीस्थ कैवल्यधामनिवासी परमहंसपरिव्राजकाचार्य स्वामी श्री कृष्णानंदसरस्वती यांचें, संकेश्वर मठाचें, शारदापीठ धर्माधिकारी वे० शा० सं० कृष्णाचार्य शास्त्री कर्नाटक वास्तव्य देवास यांचें व अर्जदार ब्रह्मवृंद देवास यांचें एकमत आहे इति शिवम्। श्रीमच्छंकरभगत्पूज्यपादाचार्याणामवतारशकाद्धः २३७७ संवत् १९६४ मिति मार्गशीर्ष शुद्ध ६ मंगळवार शके १८२९ ता० १०-१२-०७ स्वारी मुकाम बडोदें. ।श्री।

## आपली स्थिती.

( लेखक-बेडेकर )

बायकोला मिळेना लुगडें. पण चंद्राजीला घेई तोडे, आईला ह्मणे थेरडे उगीच कां नावानें फोडतेस खडे, पण जिनें केलीं हाडांचीं काडें तिलाना ? हे जबाब रोकडे, अथवा यांत आश्चर्य कसलें जीं मुळींच माकडें त्यांनां काय कळे वेडेंवांकडें. त्यांचें असेंच व्हावयाचें त्रागडें ! जेव्हां ईश्वराच्या घरीं बसतील कोरडे तेव्हां कोण आवरील रडें ?

घरांत पाट निघणार नाहींत चार पण खुर्च्या टेबलेंच फार, जिकडे तिकडे कुत्र्या-मांजराचा परिवार, त्यांनींच करतो आल्या गेल्याचा सत्कार, मग तो असो नोकरदार कीं एखादा वेद पारंगत हुषार, सार्‍यांना तोच प्रकार, आचार विचारांचाच जर नकार तर चाळे कां नाहीं सुचणार भिकार ?

ओंठावर आली नाहीं मिशी तों लागूं लागली चाळिशी, सदा घरघर चालते घशाशीं, ह्मणून कुंथत बसतो वडिलांशीं, यांची गती पुढें होणार कशी कारण यांची प्रकृती पडली अशी कीं हे सहज पडले तरी उशाखालीं पाहिजे मऊ उशी ! यांची डोळे मिटले कीं बिछान्यांतच काशी ! वाराणशी ऐवजीं एखादी बशी ! * * * * * *

पंधरवड्याची एकादशी, ती जाते अशी तशी, पण महाशिवरात्रीच्या

दिवशीं तरी कुठें राहतो उपवाशीं, विलायती बिस्कीटाची बशी, रम्‌ची शिशी, चट करितो पट्‌दिशीं हे कां लहान गुलहौशी! पण यांची जेव्हां मिळेल बक्षीसी तेव्हां येतील मूळपिठाशीं?

साता सागरांच्या पलीकडे कोणी मेला, त्याचा स्मारकफंड सुरू झाला, मित्रांनीं सल्ला दिला, तेव्हां वर्गणी देऊन नंबर लावला पण घरीं दुपारीं माधुकरी आला तर सांगतो त्याला कीं दारावरची पाटी वाच आणि परत जा आपला, निरुद्योगी कुठला! उठला सुटला कीं चालला 'भवति भिक्षां देही' करायला! काय करील बिचारा, दारावरचा " अवकाश आहे आणि सरली " हा पाटीवरचा मजकूर वाचला आणि कानांत तुळशी घालून चालता झाला!

समयांना रजा दिली, राकेलच्या चिमण्यांची बढती केली, डोळ्यांला इजा झाली तरी ती रीत नाहीं सोडली, कारण चिमणी ह्मटली ह्मणजे मनापासून आवडच आपुली!. कशी गम्मत आहे चिमुकली?

अगांत विलायती सूट पायांत लेदरचा बूट, दुसऱ्याला म्हणे ऊठ ऊठ कारण आज एका इम्पॉरटंट विषयावर चालणार आहे काथ्याकूट पण मुळांतच जर नाहीं जूट तर हवें कशाला हें झूट! कूट!

पाश्चिमात्य शिक्षणाचा अंमल बसला, नोकरी करितां करितां जीव त्रासला, दहावर अवरकांटा दिसला, आतां देवास नैवेद्य कसला, असें ह्मणून डोळ्यांवर आलेल्या धुराचा मासला वडील माणसांस दाखवणें बरें नव्हे.

## विजापूर येथील मशीद.

ह्या शहारांत अद्दीलशाई घराण्यांतील बादशाहा राज्य करीत असतां त्या घराण्यांतील कित्येक पुरुषांस इमारती बांधण्याची बहुत आवड होती आणि द्रव्य व सत्ता अनुकूल असलेमुळें ती आवड पुरवून घेण्यास त्यांस हरकत मुळींच आली नाहीं. त्यांनीं जगप्रसिद्ध अनेक इमारती बांधिल्या आणि मनाची हौस पूर्ण करून घेतली. परंतु जसें त्या राजाचें वैभव अल्पायुषी होतें तसें ह्या इमारतींचें सौंदर्यही दीर्घकाळ टिकणारें नव्हतें. तरी पण आलीकडे हें शहर जिल्ह्याचें मुख्य ठिकाण झालें असून कलादगीस जीं सरकारी आफिसें होतीं, तीं सर्व येथें आलीं आणि तिकडे कांहीं इमारतींचा

उपयोग करण्याकरितां सरकारानें कित्येक इमारतींची दुरुस्ती केली, त्यामुळें कांहीं इमारती चांगल्या अस्तित्वांत राहतील अशी आशा आहे.

बोळ घुमज ( घुमट ) ह्यास "सुलतान महंमद आदिलशाहाचा दर्गा" असें म्हणतात. हा शहरच्या ईशान्येस स्टेशनाजवळ आहे. हा फार उंच असलेमुळें ५।६ मैलांवरून दिसतो. बादशाही अमदानींतील वैभवदर्शक हा घुमट दुरून नजरेस पडतांच आगगाडींतील प्रवाशाची चित्तवृत्ति आनंदित होते. याची लांबी १९८ फू० व रुंदी इतकीच व उंची २२३ फू० आहे. ह्याच्या चारीबाजूंस उत्कृष्ट चार मनोरे आहेत. मनोऱ्याच्या साहव्या मजल्यास लागून इमारतीच्या सभोंवतीं वर्तुळाकार उत्कृष्ट ग्यालरी आहे. वरचा ताजमहाल धरून एकंदरींत उंची २५० फू० होईल. चार बाजूंच्या मनोऱ्यांपैकीं प्रत्येक मनोऱ्यास आठ आठ मजले आहेत. घुमटाची जाडी १२ फू०, व्यास १३५ फू०, ग्लालरीचा घेर ४०० फू० आहे. ह्यांच्या भिंतींची सफाई इतकी उत्तम आहे कीं, एका टोंकास उभें राहून भिंतीस तोंड लावून एकानें बोलावें व दुसऱ्या टोंकास दुसऱ्या मनुष्यानें भिंतीस कान लावून ऐकावें, उत्तम ऐकूं येतें; व ह्या दोघांमध्यें अंतर १३० फू० असतें. एवढा मोठा व असा उत्कृष्ट घुमट साऱ्या पृथ्वीवर कोठेंही नाहीं असें ह्मणतात. ह्या दिवाणखान्यांत आवाज केला तर त्याचा प्रतिध्वनि ४।५ वेळां होतो. पहिल्यानें जो प्रतिध्वनि होतो तो चांगलें कोणी कोणी बोलल्याप्रमाणें होऊन पुढें प्रत्येकवेळीं कमी कमी होत जातो. ह्या ग्यालरींत बसण्याकरितां उत्तम चौथरे केलेले आहेत त्यांपैकीं एकावर बसून हळूं बोललें तरी दुसऱ्या चौथऱ्यावर ऐकायास जातें. खिशांतील घड्याळाचें टकटकणें देखील ऐकूं येतें.

ह्या घुमटांत त्या बादशहाची कबर आहे व शेजारीं उजवेकडे त्याची प्रियवती 'रंभावती' इची कबर आहे. असी असण्याचें कारण एक दिवस हीं उभयतां गच्चीवरून अनेक देखावे व शोभा पाहत आनंदानें एकमेकांच्या खांद्यावर हात टाकून फिरत असतां बादशहा विनोदानें ह्मणाला प्रिये तूं येथून खालीं उडी टाकशील ? ती ह्मणाली होय. घे पाहूं असें बादशहानें बोलतांच तिनें खालीं उडी घेतली. तों खालीं कांहीं माणसें फिरत होतीं त्यांतील एकाच्या आंगावर तिची उडी पडली आणि त्यानें तिला वरल्यावर झेलून धरिलें,

म्हणून तिला कांहींएक धक्का लागला नाहीं. हा तिचा वचनाधीनपणा पाहून बादशहा फार खुष झाला, आणि पाहिजे तें माग ह्मणाला. ती बोलली कीं, तुमच्या शेजारीं उजवेकडे माझी कबर असावी यापेक्षां मला कांहीं नको. ह्याप्रमाणें तिचें बोलणें मान्य करून बादशहानें तिची कबर आपल्या कबरे-शेजारीं उजवीकडे बांधविली.

ताजबावडी- ही विहीर चौरसाकृति असून हिची प्रत्येक बाजू २२२ फू० आहे. हिच्या एका कांठावर उभें राहून दुसऱ्या कांठावरच्या माणसास हांक मारिली तर ऐकूं जात नाहीं. सभोंवतीं तासलेल्या दगडाची भिंत आहे. मध्यभागीं विहिरींत उतरण्याकरितां ३६ फू० रुंदीची कमान आहे. कमानीच्या दोहोंबाजूंस लागून दोन उत्तम मनोरे आहेत. व त्यांस लागून एक उत्तम इमारत आहे. विहिरींत पुढें आलेल्या पाण्याच्या पातळीबरोबर दोन सज्जे आहेत. त्यांवरून विहिरीभोंवतीं पाण्यांत क्रीडा करितां येते. दुसरी चांदबावडी, ह्मणून एक विहिर आहे, तीही अशीच आहे.

हैदरबुरुज- ह्यास उपल्याबुरूज किंवा उपलीयाबुरूज असें ह्मणतात. हा सन १५८० त इब्राम अद्दीलशाहानें आपल्या हैदर नामक वजीराचें स्मारक ह्मणून बांधिला. याची उंची ६९८ फू० आहे. हा एका टेंकडावर एकाटाच आहे. वर जाण्यास ९ फू० रुंदीचा जिना आहे. यास ७० पायऱ्या आहेत. वर दोन तोफा आहेत त्यांत एक ३० फू० लांब असून तिचा घेर ७ फू० आहे. व तोंडाच्या पोकळीचा व्यास १४ इंच आहे. दुसरी २० फू० लांब व ४ फू० घेराची असून तोंडाचा व्यास १० इंच आहे. विजापुरास आणखी चिनीमहाल, सातमजली माडी, आनंदमहाल, अदालतमहाल, आरसेमहाल, गगनमहाल, सोनेरी महाल, धक्कामशीद, जुम्मामशीद, पेहतरमहाल, चिंदडीमशीद इ० उत्तम उत्तम अनेक इमारती आहेत.

विजापूरची भरभराटी होती तेव्हां तेथें लहानमोठीं मिळून घरें ९८४००० असून लोकसंख्या १८ लक्ष होती. विजापुरांत राहणें हें एक परम सुदैव असें त्याकाळीं लोकांस वाटत असे व ज्याप्रमाणें पारमार्थिक लोक सायुज्य-मुक्तीची इच्छा करितात त्याप्रमाणें ऐहिकसुखाची इच्छा करणारे लोक विजापूरप्राप्तीची इच्छा करित असत.

थोड्या काळापूर्वी जें नगर संपत्तीचें माहेर, ऐष आरामाचें विलासमंदीर झालें होतें; ज्या नगरांत बादशहाची स्वारी चातुरंग सैन्यासह मोठ्या थाटानें निघत होती. जेथें राजे लोकांच्या भेटीचे दरबार भरत होते, जेथें अहेर, सतकार वगैरे सर्वकाळ चाललेच होते, जेथें अफजूलखान, रुस्तुमजवान, शिद्धीजोहार इ० रणशूरविरांचीं निशाणें फडकत होतीं, जेथें आज अमक्या राजावर स्वारी केली, आज अमक्या राजाचा पराभव केला, आज अमक्यावर खंडणी बसविली इ० पराक्रमाच्या गोष्टी, तशाच राजकीय मसलती चालत होत्या, रोज लक्षावधि रु० ची घडामोड होत होती, जेथें नाच, गाणें, शर्यती, कुस्त्या, पट्टा, पोताटी इ० मनोरंजक प्रकार चाललेच होते. असें त्याकाळीं प्रसिद्धीस आलेलें जें विजापूर त्याची आजची स्थिती पाहिली तर इतकें ऐश्वर्य तेथें होतें हें सिद्ध करण्यास प्रस्तुत विद्यमान असलेल्या इमारतींचाच पुरावा घ्यावा लागेल. संपत्ति आणि सत्ता ह्या दोहोंचें वास्तव्य एकेठिकाणीं असलें ह्मणजे तेथें सर्व गोष्टींची अनुकूलता असते. हीं दोनी प्रतिकूळ झाल्यावर मग त्याच्या उलट सर्व प्रकार होतात. ज्याकाळीं येथें ‘ **अदीलशाई** ’ घराणें राज्य करीत होतें, त्याकाळीं सत्ता आणि संपत्ति ह्या दोघी केवळ दासी हात जोडून सेवेला तत्पर होत्या. मग न्यूनता ती कोणती? इमारतींस सोन्याचा मुलामा दिला किंवा हिऱ्यांचीं कोंदणें बसविलीं तरी एकंदर वैभवाच्या मानानें थोडेंच. एकंदरींत कालमहिमा अतर्क्य आहे हेंच खरें!

## कापराचें झाड.

कापराचे झाडास कर्पूरवृक्ष, कर्पूरवल्ली व चंद्रमा अशीं नांवें संस्कृत भाषेंत आहेत. कापराला इंग्रजींत क्यांफर असें ह्मणतात. ह्याचा उपयोग वैद्यशास्त्रांत, सुगंधी पदार्थांत आणि धर्मसंबंधीं कार्यांत आमचे पूर्वज फार दिवसांपासून करीत आले आहेत.

कापूर हा पदार्थ फार प्राचीनकाळीं आपल्या लोकांस माहित नव्हता असें वाटतें. कारण आमचे जवळ चरक, सुश्रुतसंहिता ग्रंथ आहेत त्यांत याचा नामनिर्देशही नाहीं. परंतु अलिकडे झालेला राजनिघंट यांत त्याचा उल्लेख आहे.

कापराचे तीन प्रकार आहेत. १ भिमसेनी कापूर, २ पत्री कापूर व ३ चिनी कापूर. हे तिन्ही प्रकार आजपर्यंत व्यवहारांत आहेत.

इ० सन ९०० चे अखेरीस इब्न खोर्दादबा हा अरबी प्रवासी चीन व हिंदुस्थानांत आला. त्यानें आपल्या प्रवासाची हकिकत म्हणून एक ग्रंथ प्रसिद्ध केला आहे; त्यांत त्यानें लिहिलें आहे कीं, मले बेटांतून कापुराचा निर्गम चिनाकडे व हिंदुस्थानाकडे होत असे. यावरून अरबी वैद्यांनीं व प्रवाशांनीं कापराचा शोध प्रथम लाविला असें सिद्ध होतें. त्यांच्या ग्रंथांतील माहिती आपले इकडील वैद्यांनीं उतरून घेतली असावी.

( १ ) **भीमसेनी कापूर** :--हिंदुस्थानच्या आग्नेयी कोनाकडे मोलक्का, जावा, सुमात्रा इ० मसाल्याचीं बेटें ह्मणून प्रसिद्ध आहेत. त्यांत सुमात्रा बेटाच्या पश्चिम किनाऱ्यावर फानसूर अथवा कानसूर नवाचें एक लहानसें शहर आहे; तेथें उत्पन्न होतो. कानसूर यास बरास ह्मणतात; यावरून भीमसेनी कापरास बरास कापूर ( बरास गावीं उत्पन्न होणारा ) ह्मणतात.

बरास कापूर अथवा भीससेनी कापूर ज्या झाडापासून उत्पन्न होतो त्या झाडाचा शोध ‘ कोलब्रुक ’ साहेबानें लाविला. त्यांस ( ड्र्याबालानोस् क्यांफोरा ) असें ल्याटिन भाषेंत नांव आहे. तें झाड ८ वर्षें वाढल्यावर पाडून त्याच्या चिपा अथवा तुकडे करून त्याच्या सालीच्या खालीं व लांकडाच्या ( स्तंभाच्या ) भेगींत अगदीं बारीक कण सांपडतात. हाच अपक्व कापूर होय. एका झाडापासून सुमारें ११ रत्तल ( ४४० तोळे ) कापूर निघतो. तो ८० रुपये रत्तल या भावानें विकला जातो. हल्लीं मुंबईस भीमसेनी कापराचा भाव दर तोळा ३ रु० आहे. हा जमविण्यास मजुरीचा खर्च फार बसतो म्हणून हा महाग विकला जातो.

**पत्री कापूर** :-एका लहान झुडपाच्या पानांतून हा निघतो. हें झुडूप चीनदेशांत तेनासरीमप्रांत व कुमौन पर्वतावर सांपडलें आहे. त्यास ( ब्लूमिया बालसोमिफेरा ) हें नांव आहे. या झुडपांतून ब्रह्मदेशांतील लोक तो शिजवून काढतात. ही वनस्पती ब्रह्मदेशांत पुष्कळ आहे. हा कापूर भीमसेनी कापुरापेक्षां कांहींसा जड आहे, परंतु हा हवेंत लवकर उडून

जातो, व त्यास दवण्यासारखा वास येतो. चीन देशांत यास ' नागई कापूर ' ह्मणतात. हा आपल्या देशांत फारसा विक्रीस येत नाहीं.

चिनई कापूर- ज्याचा सर्वत्र प्रसार आहे असा हाच कापूर. हा वरील दोन्ही जातीपेक्षां स्वस्त दरानें विकला जातो. पूर्वीं एक रत्तलास ३ रु. पडत असत. हल्लीं तो १॥ किंवा २ रु. रत्तलानें विकत मिळतो. यास पक्का कापूर ह्मणतात. व हा ( सिनामोमम् क्यांफोरा ) या नांवाच्या झाडांच्या बुंधाचे तुकडे करितात व चंदनापासून जसें तेल वाफेच्या योगानें काढितात त्याप्रमाणें त्यांतून जपानीलोक काढितात. याच्या एक औंसाच्या, अर्ध्या औंसाच्या, पाव औंसाच्या चौकोनी वड्या तयार करून टिनाच्या डब्यांत ठेवून परदेशीं विक्रीस पाठवितात.

वैद्यशास्त्राधारानें कापराच्या अंगीं अनेक गुण आहेत असें सिद्ध झालें आहे. कापूर हा कडू, तिखट, किंचित् थंड, कंठदोषहर, कफवातहर व कृमिनाशक आहे. याशिवाय नेत्रविकारांवर लेप करण्याकरितां, मूत्राघातांत जननेंद्रियांत धरण्याकरितां भावमिश्र ग्रंथांत सांगितलें आहे. रसरत्नावली- कारानें ज्वरातिसारांत देण्याकरितां हिंगूळभस्म, अफू इत्यादि पित्तविसर्जक व दाहशामक पदार्थांबरोबर त्याचा कापुरासह योग लाविला आहे. तो कृमिचाहि नाशक आहे म्हणजे सूक्ष्म कृमि, आंतड्यांतील कृमींचा नाश करितो. वातनाशक ह्मणजे हृदयकंप, अपस्मार, कलायखंज वायु ( एक बाजू आपोआप हलणें ) व वीर्य नाश अथवा झोंपेंत एकाएकीं स्वप्नावस्था होणें इत्यादि विकारांत व प्रमेह ( परमा ) झाला असतां जननेंद्रियाच्या पीडायुक्त उत्थापनांत दिला असतां तो हे सर्व विकार बंद करितो. या वरील विकारावर कापराचें लहान प्रमाण म्हणजे अर्ध्या गुंजेपासून १ गुंजेपर्यंत असावें. मध्यम प्रमाण एक गुंजेपासून २ गुंजेपर्यंत दिल्यास प्रकृतीस आनंद व शांतता उत्पन्न होते. व दमा, जुनाट संधिवात व योनिशूल यांवर २ किंवा ३ गुंजा द्यावा.

हिंदुवैद्य कापुराच्या अंगीं वृष्य ( लिंगोत्थापन करण्याचा ) गुण आहे असें मानतात. परंतु या ह्मणण्यास आधार कांहींच नाहीं. कारण कापराचा उपयोग आपल्या लोकांस चिनीलोकांपासून कळून आला असावा असें

वाटतें. कारण बौद्धधर्माचा प्रसार चीनदेशांत व सिंहलद्विपांत झाल्यापासून कापूर हा पदार्थ भारतवासि बौद्धधर्म्यांनीं इकडे आणण्याचें सुरूं केलें असें दिसतें.

जयसिंहराजाच्या कारकीर्दीत ' सुधार्णव ' नांवाचा ग्रंथ लिहिला गेला. त्यांत वाजीकरणयोगांत कापूर हा इतर सुगंधी व दीपक औषधांबरोबर देण्याविषयीं पाठ आहे. तो श्लोक असा.

कर्पूरं टंकणं सूतं तुल्यं मुनिरसं मधु ।
मर्दयित्वा लिपेल्लिंगं स्थित्वा चाप्य तथैवच ।
तथा प्रजायते लिप्तं रमेत रामां यथोचितं ॥

कापूर, टांकणखार, पारा, अगस्त्याच्या पानांचा रस, मध समभाग घेऊन एकत्र मर्दन करावें आणि त्याचा ××× यावरून वीर्यस्तंभनाकरितां कापुराचा उपयोग वैद्यलोक करण्यास सांगत हें उघड आहे. परंतु त्याजबरोबर ते इतर उत्तेजक औषधें देत असत. ह्मणून एकट्या कापुराचा गुण कामवृद्धी करण्याचा नाहीं असें सिद्ध होतें.

कापूर अति प्रमाणानें दिला असतां दाह उत्पन्न करितो व हृदयाची गति कमी करून डोकें दुखणें, मोह, बडबड, सर्वांगास शैथिल्य व अतिशय धाप, हीं उत्पन्न करून कधीं कधीं मृत्यु येतो. हें विषारीप्रमाण २ गुंजा आहे. जखमा वगैरे कापुराच्या पाण्यापासून धुतल्या असतां जखमेंतील कृमि मरतात. कापराच्या पाण्यांत झाडाचें बीं भिजवून ठेविलें असतां कितीही दिवसांनीं बाहेर काढिलें तरी तें जमिनींत घातल्याबरोबर उगवतें. हा एक अतुपयोगीं धर्म त्याच्या अंगीं आहे. ( शे. मा. पु. )

याशिवाय जे कांहीं कापराचे उपयोग नवीन समजले आहेत त्यांची यादी खालीं दिली आहे.

( १ ) **क्यांफर पिल्स**-अर्धा औंस साबण व अर्धा औंस कापूर एकत्र खलून त्याच्या गुंजप्रमाण गोळ्या कराव्या त्या सर्व रोगांवर द्याव्या प्रत्येक गोळी दिवसांतून तीन वेळ द्यावी.

( २ ) **कर्पूरतैल**-एक औंस कापराचे बारीक तुकडे करून ते एका चिनीच्या भांड्यांत घालावें व त्यावर कढत केलेलें अळशीचें तेल ओतावें

व घट्ट बूच मारून कापूर विरघळेपर्यंत हलवावें. म्हणजे कर्पूरतैल तयार होतें. हीच कृति कांचेच्या बुचाच्या बाटलींत केली तरी होते. हें तेल माहामारींचे पेटके, संधिवायु, चमक, शूळ इत्यादिकांवर चोळलें असतां गुण येतो.

( ३ ) कर्पूरार्क. एक औंस कापूर घेऊन त्याचे बारीक तुकडे करावे. आणि ते तुकडे ८ औंस शुद्ध केलेली स्पिरिट आफ वाईन एका कांचेच्या बुच्याबाटलींत भरावी व त्यांत वर सांगितलेले कापराचे तुकडे घालून बूच मजबूत बसवावा, ह्मणजे कांहींवेळानें ते तुकडे विरघळून जातात. तोच कर्पूरार्क होय. या अर्काचे वयमानाप्रमाणें १० पासून ६० थेंबपर्यंत एक औंस ( २॥ तोळे ) पाण्यांत मिळवून द्यावे. ह्मणजे कैफ येऊन दुःखाचा जोर कमी होतो. हा अर्क वायूवर, सुजेवर किंवा पोट दुखत असतां पोटावर चोळला तर गुणावह होतो. याचेयोगानें कफाचेंहि पाणी होतें. तसाच हा अर्क महामारीवर व अजीर्णावर बहुत बाणेबंद आहे. या रोगांवर हा २ पासून दहा थेंबापर्यंत बत्ताशांत अगर खडीसाखरेंत मिळवून द्यावा. याजवर अर्धा तास पाणी देऊं नये.

( ४ ) कापूर ५ तोळे, आमोनिया १० तोळे. ऑनिसी तेल २॥ तोळे, अल्कोहोल ४० तोळे, ह्याप्रमाणें द्रव्यें घ्यावीं. कापूर आणि ऑनिसी तेल हीं प्रथमतः आल्काहोलमध्यें विद्रुत करावीं; मग त्यांत आमोनिया मिळवावा. कपाळ दुखत असतांना हें थोडेंसें औषध चोळलें असतां ताबडतोब गुण येतो.

( ५ ) क्लोरोहैड्रेड अर्धा औंस व कापूर अर्धा औंस या जिनसा चांगल्या तऱ्हेनें घोटून कुपींत भरून ठेवाव्या. हें औषध डोक्यास चोळलें असतां डोक्याचा दर्द ५ मिनीटांत नाहींसा होतो. हाच मलम दांतावर लाविला असतां दांत बळकट होतात.

( ६ ) कापूर व क्लोरल समभाग एकत्र मिसळून विंचू चावलेल्याजागीं चोळल्यास चांगला उपयोग होतो. दोन्ही जिनसा एकत्र मिसळल्यानें पातळ मिश्रण तयार होतें. तें कांचेच्या बुचाच्या बाटलींत ठेवावें. ह्यापासून विंचवाच्या वेदना तत्काळ कमी होतात.

# रमणीय वेंचे.

( मागील अंकावरून पुढें चालू. )

आत्मानं सततं रक्षेद्दारैरपि धनैरपि ।
पुनर्दाराः पुनर्वित्तं न शरीरं पुनः पुनः ॥ १४ ॥

" धनद्रव्य, स्वस्त्री हीं झालीं तरी देऊन आत्मरक्षण करावें. कारण जिवाचें रक्षण झालें तर पुनः सर्व संपत्ती, स्त्री, राज्यहीं मिळवितो येतील. परंतु हें शरीर पुनः पुनः मिळणार नाहीं "

उद्योगः कलहः कण्डर्धूतं मद्यं परस्त्रियः ।
आहारो मैथुनं निद्रा सेवनात्तु विवर्धते ॥ १५ ॥

" उद्योग, कलह, कंड ( खाज ) जुगार, मद्यपान, परस्त्रीगमन, अहार, मैथून आणि झोंप हीं जशीं वाढवावीं तशीं वाढतात. "

मातृवत्परदारांश्च परद्रव्याणि लोष्ठवत् ।
आत्मवत्सर्वभूतानि यः पश्यति स पश्यति ॥ १६ ॥

" परस्त्रियांना मातेप्रमाणें मानणारा, परद्रव्याला मातीसमान मानणारा आणि सर्व प्राण्यांना आपल्यासारखें मनाणारा जो तोच पण्डीत ज्ञानी समजावा. "

आहारनिद्राभयमैथुनानि समानमेतत्पशुभिर्नराणां ।
एको विवेको ह्यधिको मनुष्ये तेनैव हीनः पशुभिः समानः ॥ १७ ॥

अहार, निद्रा, भय, आणि रतिक्रिडा ( मैथुन ) हीं जशीं पशूंस आहेत तशींच माणसांसही आहेत. पण यापेक्षा मनुष्यांच्याठिकाणीं विचारबुद्धी जास्ती आहे. ती ज्याला नाहीं तो पशूसमानच होय.

वृद्धार्कः प्रेतधूम्रश्च वृद्धस्त्री पिल्लरोदकम् ।
आयुष्यनाशकं नित्यं रात्रौ दध्यन्नभोजनम् ॥ १८ ॥

सायंकाळचें उन्ह, प्रेताचा धूर, वृद्ध बायको आणि डबकणांत सांचलेलें पाणी तसेंच नित्य रात्रीं दधीभोजन हीं आयुष्याचीं हानी करणारीं होत.

बालार्को यज्ञधूम्रश्च बालस्त्री निर्झरोदकम् ।
आयुष्यवर्धकं नित्यं रात्रौ क्षीरान्नभोजनम् ॥ १९ ॥

सकाळचे उन्ह, यज्ञामधील धूर, तरुण स्त्री, झऱ्याचें पाणी, रात्रीं दूध पिणें हीं आयुष्याची वृद्धी करणारीं होत.

सत्कुले योजयेत्कन्या पुत्रं विद्यासु योजयेत् ।
व्यसने योजयेच्छत्रुं इष्टं धर्मेण योजयेत् ॥ २० ॥

मुलगी देणें ती चांगल्या कुळांत द्यावी, आपल्या मुलांकडून विद्याभ्यास करवावा. शत्रूस नानाप्रकारच्या संकटांत पाडावें आणि जो प्रिय असेल त्याला धर्ममार्ग शिकवावा.

उत्पद्यंते विलीयन्ते दरिद्राणां मनोरथाः ।
बाल्ये वैधव्यदग्धानां कुलस्त्रीणां कुचाविव ॥ २१ ॥

दारिद्र्याचे मनोरथ, कुलीन बालविधवा स्त्रांचे स्तनप्रमाणें व्यर्थ होत कारण ते जसे उत्पन्न होतात तसेच तात्काळ नाहींसे होतात.

उत्तमेतु क्षणं कोपो मध्यमे घटिकाद्वयम् ।
अधमेस्यादहोरात्रं चाण्डाले मरणान्तिकः ॥ २२ ॥

" जो उत्तम पुरुष त्याला प्रसंगोपात आलेला क्रोध क्षणमात्र राहतो. मध्यम असतो त्याचा फार झालें तर दोन घटका राहतो. जो कनिष्ठ अधम असतो त्याचा फार तर एक अहोरात्र टिकतो, आणि जो चांडाळ अधमाधम त्याचा राग मात्र तो मेल्यानंतर नाहींसा होतो. "

नौकां वै भजते तावद्यावत्पारं न गच्छति ।
उत्तीर्णेतु परे पारे नौकायाः किं प्रयोजनम् ॥ २३ ॥

" नौकेंत बसलेले लोक, नदी उतरून पैलतिरास जाऊन पोंहचेतोंपर्यंत नौकेला भजतात, पण एकदां पैलतिरास गेले म्हणजे मग त्यानां नौकेचें कारणच राहात नाहीं. "

उद्योगे नास्ति दारिद्र्यं जपतो नास्ति पातकम् ।
मौनिनः कलहो नास्ति न भयं चास्ति जाग्रतः ॥ २४ ॥

" उद्योगाला दारिद्र्याची बाधा नाहीं. जप करणाराला पातकाची भीती नाहीं; ज्यानें मौन धारण केलें त्याला भांडण्याचें भय नाहीं, आणि जो जागत बसतो त्याला चोराचें भय नाहीं. "

एकोऽपि गुणवान् पुत्रो निर्गुणैः किं शतेन तैः ।
एकश्चन्द्रो जगच्चक्षुर्नक्षत्रैः किं प्रयोजनम् ॥ २५ ॥

" गुणवान् असा एकच पुत्र असला तरी पुरे. शंभर पुत्र असून ते मूर्ख असले तर त्यांचा काय उपयोग? आकाशांत एकच पूर्णचंद्र असला म्हणजे पुरे. असंख्य नक्षत्रांची काय गरज आहे? "

अनित्यानि शरीराणि विभवो नैव शाश्वतः ।
नित्यं संनिहितो मृत्युः कर्तव्यो धर्मसंग्रहः ॥ २६ ॥

" शरीर हें नाशवंत आहे आणि वैभवही चिरकाल टिकणारें नाहीं मृत्यू तर आपल्या बरोबरच चालत आहे. याकरितां सत्कर्माचा संग्रह करीत जावा "


कविः करोति काव्यानि रसं जानन्ति पण्डिताः ।
कन्यासुरतचातुर्यं जामाता वेत्ति नो पिता ॥ २७ ॥

" कवि काव्य निर्माण करतात, पण जे पण्डित आहेत ते त्या काव्यांतील रसस्वाद घेतात; जसें मुलीच्या बापाला तिचें सुरतचातुर्य कळत नसून तें त्याच्या जावयालाच कळतें. "

( अपूर्ण. )

# कडबा कापण्याचे यंत्राच्या

## उपयुक्ततेविषयीं मुंबई सरकारचा अभिप्राय.



आमचे पेटेंट कडबा कापण्याच्या यंत्रांची आम्हींच प्रशंसा करितों व विक्री होण्यासाठी वर्तमानपत्रांतून कांहीं तरी उगीच भपकेदार जाहिराती देतों, अशी ज्यांची समजूत असेल त्यांनी ता. २७ जून सन १९०८ चा नंबर ६४६८ चा सरकारी ठराव, रेविन्यु डिपार्टमेंट, प्यारा २ पहावा. त्यांत सरकारांनीं असें स्पष्ट म्हटलें आहे कीं, कडबा कापण्याचें यंत्र वापरल्यापासून एक तृतियांश कडबा हटकून वांचतोच. म्हणून मुंबई इलाख्यांतील सर्व कलेक्टर साहेबांनीं आपआपल्या रयत लोकांच्या हिताकरितां आमचे यंत्राचा उपयोग समजावून देऊन त्यांचा खप झपाट्यानें करवावा अशी सरकारांनीं स्वतः सूचना केली आहे.

गरीब शेतकऱ्यांना सुद्धां आमच्या यंत्राचा मुबलक फायदा घेतां यावा म्हणून आम्हीं त्यांच्या किंमती ता. १ आगष्ट १९०८ पासून कमी केल्या आहेत. विशेष माहितीकरितां हस्तपत्रकें मागवा.

किर्लोस्कर बंधु—बेळगांव.

१०—१२

---

सूचना—अंकास उशीर होतो असें जाणून वर्गणीची पोंच वगैरे छापण्यास आज सवड झाली नाहीं. सोबत निराळें जाहिरातीपत्रक आहे तें पहा.

## इहवृत्त आणि निवडक वेंचे.

**खानापूरः**—पाऊस चांगला पडत आहे. बेळगांव व शहापूर येथें प्लेगनें डोकें वर केल्यामुळें लोकांचीं मनें अस्वस्थ आहेत. धारवाडासही प्लेग आहे.

—येथील सावकार बाळापा भरमा होसमनी यांजवर खुनी खटल्याचा आरोप आला होता त्याचा सेशनांत विचार होऊन त्यांतून ते दोषमुक्त झाले हें कळविण्यास आनंद वाटतो.

—मुंबईतील एक लाख मजूर लोकांनी नामदार गव्हर्नर साहेबांस एक अर्ज केला आहे. त्यात आपली उपासमार, फारेष्टचे त्रास, कलालांचीं दुकानें व पिठे जास्त झाल्यामुळें आपणा मजुरलोकांवर घडणारे दुष्ट परिणाम, आणि टिळक महाराजांस आपण आमच्यांतून ओढून नेलांत तरी ती त्यांची शिक्षा रद्द व्हावी असें मागणें केलें आहे.

—पुण्याच्या ब्रह्मवृंद सभेनें श्री विद्यानरसिंहभारती स्वामी श्रीमठ संकेश्वर यांचा जो नुक्ताच करवीर दरबाराकडून अपमान करण्यांत आला त्याबद्दल दिलगीरी प्रदर्शित केली आहे व याबद्दल महाराज सरकारांनीं अपराध्यास योग्य शासन करुन आपण माफी मागावी असें कळविलें आहे. अशाठिकाणीं नम्र झाल्यापासून महाराजांना गौणत्व प्राप्त न होतां उलट त्यांची कीर्ति विशेष होईल.

—यवतमाळ येथील हरिकिशोरपत्राचे संपादक भावे यांजवर १२४ अ व १५३ अ कलमाखाली झालेल्या खटल्याची चवकशी पुरी होऊन दे. भावे यांस एकंदर ५ वर्षांची सक्त मजुरीची शिक्षा सांगण्यात आली.

—छापखानेवाल्यांनीं माजिस्ट्रेट कोर्टांत आपल्याजवळ छापखाना असल्याबद्दल १८६७ च्या कायद्यान्वये लेख दाखल केला पाहिजे तो न केल्याबद्दल कलकत्त्याच्या ७ युरोपियन छापखानेवाल्यांना ५।५ रुपये दंड करण्यांत आला व वर्तमानपत्राच्या एका अंकावर आपलें नांव छापलें नाहीं म्हणून दिल्लीचे सय्यद हैदर रेझा यांना २०० रुपये दंड केला. यावरून दोन अनुमानें निघतात एक युरोपियन कंपन्या हैदरपेक्षां ४० पटीनें दरिद्री असल्या पाहिजेत किंवा दिलीच्या माजिस्ट्रेटची अक्कल तरी ४० पटीनें जास्त असली पाहिजे.

**पायांत ज़ोर येण्यास**—ज्याच्या पायात ताकद नाहीं, विशेषतः पायाच्या घोट्यांत ताकद कमी त्यानें रोज रात्रीं व सकाळीं अगदीं गार पाणी घेऊन ते घोटे व पाय स्पंजानें भिजवावे. या पाण्यांत आधीं थोडें जाडें मीठ घालावें नंतर पाय पुसावे व सावकाशपणें चांगलें १५ मिनिटेंपर्यंत चोळावें असें केलें असतां पायांतील स्नायूंत खूप जोर येतो. लवकरच ताकद वाढल्याचा अनुभव येतो आणि पाय दणकून पडतात.

—सोलापूरच्या स्वराज्यपत्राच्या खटल्याचा अद्याप निकाल झाला नाहीं.

—खुदीराम बोस यास ता. ११।८।०८ रोजीं सकाळीं ७॥ वाजतां फांशी देण्यांत आलें. शेवटपर्यंत त्याची वृत्ति आनंदी व वीरश्री पूर्ण होती. फांसावर चढेपर्यंत गीता हातांत होती, शेवटीं कालीचा तीर्थ प्रसाद घेऊन तो फांसावर चढला!

---

जितकें कांहीं आपणास ठावें । तितकें हळू हळू शिकवावें ॥
शहाणें करून सोडावें । सकळ जना ॥ १ ॥ रामदास.




वर्ष १८ वें.] सप्टेंबर. १९०८ [अंक ३ रा.

## विषयानुक्रमणिका.


| विषय. | पृष्ठ. | विषय. | पृष्ठ. |
|---|---|---|---|
| कै. परशुरामपंत तात्या गोडबोले | ६६ | महाराष्ट्र ग्रंथकारांचें चवथें संमेलन | ८४ |
| उपदंश विकाराचा फैलाव व नीतिचा ऱ्हास. ... ... ... ... ... | ७० | रमणीय वेंच. ... ... ... | ८७ |
| विलायती चीट. ... ... ... | ७४ | श्रीमत्तिलकाष्टकम्. ... ... | ८९ |
| श्री. गोदावरी दर्शन. ( कविता ) | ८१ | पोंच व अभिप्राय ... ... | ९० |
| श्रीक्षेत्र त्र्यंबक. ... ... ... | ८१ | १ अकांतील कूटाचें उ० व नवीन प्र. | ९६ |


कुमुदसुंदरी व विक्रम पृथ्वीपर्यटण या दोन्हीं पुस्तकांस
पुस्तकासह व्ही. पी खर्चसुद्धां १ ८१ पोष्टात भरावा लागतो.

द. गो. सडेकर यांनीं खानापूर येथें आपल्या धनंजय छा. छा.

# आभार प्रदर्शन.

लोकमित्रास ज्या हितचिंतक आश्रयदात्यांनीं आपल्या मित्रमंडळींकडे शिफारस करून एक किंवा त्यापेक्षां जास्त नवीन वर्गणीदार जमवून दिले त्यांचे मित्रावर फार फार आभार झाले आहेत.

पूर्वींच्या वर्गणीदारांपैकीं कांहीं लोकांनी " आम्हीं वर्गणीदार आहों " असें कळवून व्ही. पी. पाठविली असतां ती परत करून चालकाची नाउमेद केली होती ती या देशभक्तांनी पुनः आणून दिली याबद्दल मित्रास आपल्या सहाय्यकर्त्यांचा फार फार अभिमान वाटत आहे.

मित्रहो, आह्मीं जो आपणाकडून १।८१ घेतों तो केवळ आमच्या घर खर्चाकडेच खर्च होत असेल असें आपण समजूं नका. त्यांतील बराच भाग आपल्या सेवेकरितां ह्मणजे मित्रांत सुधारणा करण्याकडे खर्च होत आहे. आपला संतोष तीच मित्राची संपत्ति अशी त्याची समजूत आहे.

हल्लीं सर्व टैप नवा आणला आहे. लेखांतही थोडीफार सुधारणा केली आहे, वर्गणीदारांना बक्षीस आहे, नवीन वर्गणीदार जमवून देणारांनाहीं थोडाफार मोबदला आहे. यावरून या आमच्या ह्मणण्याची सत्यता आपणास कळून येणार आहे तेव्हां ही गोष्ट आपण लक्षांत आणून व स्वतःचे मनोदेवतेस विचारून तिच्या आज्ञेप्रमाणें आह्मांस आणखी ही मदत करावी अशी मित्राच्या सर्व वांचकांस आह्मीं विनंति करीत आहों. आरंभींचे ह्मणजे १ ला २ रा हे सुमोरें २०० अंक शिल्लक आहेत ते संपेपर्यंत आह्मांस वर्गणीदार पाहिजेत. हितचिंतकांनी मनावर घेतलें तर इतक्या वर्गणीदारांची भरती झाल्याची आनंदकारक बातमी पुढच्या अंकीं प्रसिद्ध करण्याचाही एखादेवेळीं योग येईल.

ज्या मित्रांनी मित्रास मदत केली त्यांत कित्येकांनीं बक्षीस घेतलें नाहीं. केवळ मित्रहितास्तव श्रम केले आहेत हेंही येथें कळविल्याशिवाय आमच्यानें राहवत नाहीं. असो. अशा मदत करणाऱ्या लोकांचीं नावें लौकरच प्रसिद्ध करणार आहों

**सूचना**—मित्राचें कुमुदसुंदरी हें बक्षीस तयार नसल्यामुळें आलीकडे कांहीं वर्गणीदारांना विकत पृष्ठापर्यंटणाबरोबर **नंदकुमार** किंवा संगीत **शिवाजीविजय** या दोन नाटकांपैकीं एक पाठविलें आहे ह्मणून कोणी असंतोषी होऊं नये. सदरी पुस्तकें उत्तम पैकीं आहेत व तीं यापुढें कोणास मिळणार नाहींत. कुमुदसुंदरी छापून होत आली आहे.

८०१६



# लोकमित्र.

## कै. परशुरामपंत तात्या गोडबोले.

( लेखक-ज. र. आजगांवकर. )

'आसही तुझी फार लागली' ही मराठी तिसऱ्या पुस्तकांतील कविता कै. तात्यांची होय, इतकें सांगितलें असतां, त्यांची ओळख आमच्या वाचकांस पटलीच पाहिजे. शिवाय 'नवनीत,' हा ग्रंथ जोंपर्यंत अस्तित्वांत आहे तोंपर्यंत, तात्याही किर्तिरूपानें महाराष्ट्र सरस्वतीमंदिरांत विराजमान आहेत, यांत संशय नाहीं. शिवाय हल्लीं मोरोपंत, वामनादि मराठी कवींच्या काव्यांची अभिरुची जी वाढत चालली आहे, तीस मूळ कारण ज्यांचे परिश्रम झाले आहेत, ते तेच, ह्मणजे परशुरामपंत तात्या गोडबोले होत.

गोडबोले यांचें मूळगांव रत्नागिरी जिल्ह्यांत पावसगोळप होय. तेथून तात्यांचे पणजे बळवंतराव गोडबोले हे वांईस रास्त्यांच्या आश्रयास येऊन राहिले. त्यांचे चिरंजीव परशुरामपंत, ह्यांनीं रास्त्यांबरोबर मराठ्यांच्या सैन्यासहवर्तमान कर्नाटक, ह्मैसूर, वगैरे प्रांतांत जाऊन बराच द्रव्यसंचय केला व मानमान्यता मिळविली. त्यांचे शरीरसंबंध तासगांवचे जोशीं आणि स्वतः रास्ते यांच्या मुलींशीं झाले. पुढें कालचक्राच्या फेऱ्यामुळें, त्यांचे चिरंजीव बळवंतराव हे रोजगारधंदा पाहण्यासाठीं पुण्यास येऊन राहिले.

ह्या बळवंतरावांचे, परशुरामपंत तात्या हे चिरंजीव होत. त्यांचें जन्म वाई येथें शके १७२१ त झालें. त्यांचा प्राथमिक विद्याभ्यासही तेथेंच झाला. त्यांचें मोडी अक्षर फार सुरेख होतें व त्यांस जमाखर्चाची माहिती फार चांगली होती. ते नारायणशास्त्री देव ह्यांजपाशीं संस्कृत शिकले. त्यांचे वडीलबंधु दाजीबा ह्मणून होते, त्यांस मोरोपंतादि महाराष्ट्रकवींची कविता वाचण्याचा नाद फार होता. त्यांच्या सहवासानें तात्यांस मराठी काव्यांची गोडी लागली. पुढें, तात्या पुण्यास येऊन, आपले मामा जोग यांच्या पेढीवर कारकून राहिले. तथापि, त्यांचा मराठी कवितेचा व्यासंग चालूच होता.

पुढें मराठी कवितेच्या मार्मिकतेविषयीं त्यांची फार कीर्ति होऊन, त्यावेळीं ‘ बोर्ड ऑफ एज्युकेशन ’ ह्या मंडळीनें, मराठी कोश तयार करण्यासाठीं नेमिलेल्या विद्वन्मंडळांत तात्यांची योजना झाली. ह्याच सुमारास विश्रामबागेंत सरकारी छापखाना सुरू झाला. त्यावर, पुणे कॉलेजाचे प्रिन्सिपाल या नात्यानें मेजर क्यांडीसाहेब यांची देखरेख असे; तेथें त्यांची व तात्यांची ओळख झाली व तात्यांच्या भाषामार्मिकतेविषयीं त्यांची खातरी झाली. पुढें क्यांडीसाहेबांस, सरकारी शाळांतील मराठी क्रमिक पुस्तकें तयार करण्याच्या कामावर सरकारानें, मराठी ट्रान्स्लेटर नेमिलें. तेव्हां त्यांनीं तात्यांस आपले हाताखालीं पंडित ह्मणून नेमून घेतलें. ह्या जागेवर तात्या अखेरपर्यंत होते. ते क्यांडीसाहेबांचा उजवा हात होते. तात्यांच्या महाराष्ट्र कविताज्ञानाचा उल्लेख, कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनीं आपल्या निबंधमालेंतील ‘ मोरोपंताची कविता ’ या निबंधांत केला आहे, तो पाहिला ह्मणजे त्यांचें भाषाज्ञान किती गहन होतें, हें लक्षांत येतें. तात्यांसारखा मराठी कवितेचा भोक्ता व ज्ञाता हा कालपावेतों दुसरा कोणी झाला नाहीं, असें ह्मटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं.

सरकारी काम संभाळून तात्यांनीं अनेक मराठी ग्रंथ केले आहेत; त्यांचे तीन प्रकार आहेतः—

१ संस्कृतावरून मराठी केलेले-ह्यांत शाकुंतल, वेणीसंहार, उत्तररामचरित, मृच्छकटिक, नागानंद आणि पार्वतीपारिणय हीं नाटकें प्रमुख होत. हीं भाषांतरें आहेत. शब्दासशब्द ठेवून देणें हें कांहीं खरें भाषांतर नव्हे, तर मूळावरून जो रसाविर्भाव होतो ! तो भाषांतरावरून झाला पाहिजे, हें भाषांतराचें मुख्य तत्त्व तात्यांच्या ग्रंथांत चांगलें व्यक्त होतें. तात्यांचीं भाषांतरें हीं भाषांतरें वाटत नाहींत, मूळग्रंथ वाटतात; त्याचा थोडासा मासला येथें देतों.

दुर्योधनाच्या स्त्रीनें, द्रौपदीच्या दासीस ‘ तुझी धनीण आपले केस कधीं बांधणार ? ’ असा प्रश्न केला, त्यावर तिनें जें उत्तर दिलें तें व तें ऐकून दुर्योधनाच्या पत्नीची कशी अवस्था झाली, हें ती द्रौपदीस सांगत आहेः—

‘ अज़ानि केश तुमचे विमुक्त नाहिं जाहले ! ।
कशी करील बद्ध ती अधींच बाई आपले ॥ ”

7086
/0044

अशा मदीय उत्तरें मनांत फार खोंचली ।
जणूं गमे तिला उरीं सुरीच काय बोंचली ॥ १ ॥

कण्वर्षीचे उद्गार.

जाते आज शकुंतला ह्मणुनियां वाईट वाटे मला ।
येती दाटुनि अश्रुपूर नयनीं हा कंठही दाटला ॥
स्नेहें दुःख पहा वनांत वसत्या मातेंहि होतें असें ।
होईना मग तें प्रपंचिक जनां कन्यावियोगें कसें ? ॥ २ ॥

शकुंतलेस बोध.

शुश्रूषा पतिची करी सवतिशीं स्नेहप्रवृत्ती धरी ।
केलें यद्यपि अप्रिय स्वपतिनें कोपूं नको अंतरीं ॥
राहीं सावध गर्व फार न धरीं दासीं करावी दया ।
येणें पावति थोर मान युवती होती दुजा अप्रिया ॥ ३ ॥

भीमाची प्रतिज्ञा.

'जी ही गदा ममकरांत सदैव नाचे ।
घातें इच्या चुरिन ऊरु सुयोधनाचे ॥
रक्तें तयांतिल विलेपिन मी स्वपाणी ।
त्याहींच बांधीन सखे तव मुक्तवेणी ॥ ४ ॥

वेणीसंहार.

जुन्या मराठी सहाव्या पुस्तकांत, जें वर्षाकालाचें वर्णन दिलें आहे तें, तात्यांच्या मृच्छकटिक नाटकांतील होय. तसेंच त्याच पुस्तकांत तात्यांच्या उत्तररामचरितांतील, 'किति रे असाशी तूं निष्ठुर रामा ।' 'जन्मुनि रविवंशीं ऐसा—' इत्यादि पदें दिलीं आहेत तीं ज्यांनीं वाचिलीं असतील त्यांस तात्यांच्या काव्यसौष्टवासंबंधानें अधिक कांहीं सांगितलें पाहिजे असें नाहीं. प्रसिद्ध विद्यमान् नाटककार रा. रा. गोविंद बल्लाळ देवल यांनीं लिहिलेलें व अत्यंत लोकप्रिय झालेलें सं० मृच्छकटिक नाटक, तात्यांच्या मृच्छकटिकाच्याच आधारें लिहिलें असून, त्यांतील शकाराच्या तोंडच्या बहुतेक कविता तात्यांच्याच कायम ठेविल्या आहेत.

---

१ 'जाते वी मम शकुंतला हो' हें किर्लोस्कराचें पद याच अर्थाचें आहे. २ वाडवडीलां सेवित जावें' हें किर्लोस्करांचें पद.

२ जुन्या कवींच्या काव्यांचा संग्रह–ह्यांत नवनीताचे दोन भाग, केकादर्श, आणि कै. माधव चंद्रोबा यांनीं कितीएक वर्षे चालविलेला सर्वसंग्रह ह्यांचा समावेश होतो. ह्यांपैकीं नवनीत हा ग्रंथ तर आज ४०।५० वर्षें, तुकाराम रामदासादि मराठी कवींच्या प्रासादिक काव्यांशीं, विद्यार्थ्यांचा परिचय करून देत आहे व पुढेंही करून देईल. तात्यांचा केकादर्श पाहिला ह्मणजे कठीण कविता सुलभरीतीनें समजून सांगण्याची त्यांची अप्रतिम शैली दिसून येते. सर्वसंग्रहाच्या संपादकाचें काम तात्यांकडेच होतें; व मोरोपंतादिकांच्या कवितेवरील त्यांच्या टीपा अद्याप सर्वमान्य समजल्या जातात. ह्या बाबतींत त्यांस एवढा मान आहे कीं, 'तात्यांनीं असें असें ह्मटलें आहे' इतकें सांगितलें ह्मणजे वादाची परिसमाप्ति होऊं शकते. 'तात्या' हें नांव मराठी ग्रंथकारांच्या ग्रंथांतून, एखाद्या घरगुती नांवाप्रमाणें उल्लेखिलेलें आढळतें; इतकें तें लोकप्रिय झालें आहे. अशी लोकप्रियता संपादण्याचें थोड्याच ग्रंथकारांच्या नशीबीं असतें. असो. कै. रा. ब. शंकर पांडुरंग पंडित यांनीं सरकारी आश्रयानें, तुकारामाची गाथा, इंदुप्रकाश छापखान्यांत छापून पहिल्यानें प्रसिद्ध केली, त्या कामींही तात्यांची त्यांस पुष्कळ मदत होती. तात्यांची अर्थ लावण्याची पद्धति फार सरळ असे, शब्दांची ओढाताण करणें किंवा एका कवितेचे अनेक अर्थ करण्यासाठीं तिला अनर्थांत घालणें, हें त्यांना मुळींच आवडत नसे. ती कवितेची विटंबना आहे असें ते ह्मणत.

३ स्वतंत्र ग्रंथ-मराठ्यांच्या इतिहासावर सोप्या कविता, नामार्थदीपिका, बालबोधामृत, कादंबरीसार, वृत्तदर्पण, पाठावली भाग दोन (हें शेवटचें पुस्तक संस्कृत आहे.) हीं पुस्तकें लक्षपूर्वक पाहिलीं ह्मणजे एक विशेष गोष्ट अशी दिसून येते कीं, सामान्यप्रतीच्या लोकांस अत्यंत सुलभरीतीनें ज्ञानलाभ व्हावा, हा तात्यांचा मुख्य प्रयत्न होता; आणि तो उत्तमप्रकारें सिद्धीस गेला आहे. सरळ, शुद्ध आणि सोप्या भाषेंत कविता कशी करावी, हें जुनी मराठी कविता फारशी न वाचितां, 'संस्कृतप्राकृतमिश्रित कविता कंथेचें' प्रदर्शन करून एकदम मोरोपंत होऊं पाहणाऱ्या हल्लींच्या पदवीधर कवींनीं तात्यांच्या काव्यरचनापद्धतीवरून जरूर शिकावें.

तात्यांच्या ह्या सगळ्या ग्रंथांचें अवलोकन केलें ह्मणजे त्यांस मराठीभाषा किती वश होती, गूढार्थ सुलभ करण्याचें त्यांचें सामर्थ्य केवढें होतें आणि काव्यरसपरिपाक यथास्थित उतरण्याची सामुग्री त्यांचेठायीं किती सिद्ध होती. हें सहज ध्यानांत येतें. तात्यांस कविता करण्यास फार वेळ लागत नसे; विषयांची योजना झाली कीं त्यांच्या लेखणीतून कविता भराभर बाहेर पडत असत.

तात्या जितके रसिक, विद्वान आणि मार्मिक होते, तितकेच ते प्रेमळ हरिभक्त होते; व ह्मणूनच त्यांच्या कवितेंत प्रसाद सारखा भरून राहिला आहे. मोरोपंतांच्या कांहीं आर्या वाचिल्याशिवाय त्यांचा एकही दिवस कधीं गेला नाहीं असें सांगतात. ह्या आर्यांचा अर्थ लावण्यांत त्यांचा हातखंडा असे. त्याविषयीं त्यांस मोठमोठ्यांचीं दूरदूरच्या ठिकाणाहून पत्रें येत; त्यांचीं समर्पक उत्तरें, ते जेव्हांचे तेव्हां, मोठ्या आनंदानें लिहून पाठवीत. महाराष्ट्रांत जुन्या कवींचें माहत्म्य वाढत चाललेलें पाहून त्यांस मोठा आनंद होत असे. मोठ्या विद्वान् लोकांत सुद्धां तात्यांची एवढी आख्या होती कीं, कै. कृष्णशास्त्री चिपळूणकर हे देखील अडलेली आर्या त्यांस विचारीत असत. मोरोपंताच्या काव्यास कोणी नांव ठेविलें कीं तात्यांना अतिशय राग येत असे; आणि खरोखरीच मोरोपंतांचें हृद्गत बरोबर जाणणारा पुरुष महाराष्ट्रांत त्यांच्यासारखा दुसरा कोणी झाला नाहीं.

सांप्रतकाळीं काव्यसंग्रह, प्रभात, महाराष्ट्रकवि इत्यादि मासिक पुस्तकें चालू आहेत; रा. पांगारकर, भावे, राजवाडे, देव इत्यादि इत्यादि सद्गृहस्थ मराठी कवितेचें संशोधन व प्रकाशन करीत आहेत, विश्वविद्यालयांत मराठी भाषेचा प्रवेश झाला आहे; ह्या सर्व गोष्टींचे श्रेय ज्यांच्या श्रमास मिळणें योग्य आहे, त्या सर्वांत परशुरामपंत तात्या गोडबोले यांस अग्रस्थान दिलें पाहिजे.

कै. कृष्णशास्त्री चिपळूणकर तात्यांस थोर समजत, तशीच तात्यांचीही शास्त्रीबुवांच्याठायीं अत्यंत पूज्यबुद्धि होती; ही पूज्यबुद्धि तात्यांच्या वेणीसंहारांतील पुढील श्लोकावरून चांगली व्यक्त होते:-

‘ वेणीसंहरणाख्य नाट्य कवीनें केलें असे संस्कृतीं ।<br>
तें म्यां पाहुनियां तसें उतरिलें भाषांतरीं प्राकृतीं ॥

तें कृष्णें रसवित्तमें बुधवरें अत्यादरें शोधिलें ।
कीं तेणें रसिकांचिया निजरसें चित्तासि संरोधिलें ॥ १ ॥

तात्यांची प्रकृति पहिल्यापासून चांगली निकोप आणि सुदृढ होती. ते मिताहारी होते; त्यांची राहणी अगदीं साधी असे. ते देवभोळे, सत्यवादी भाविक आणि प्रेमळ असत. ते अगदीं खरे खरे हिंदु होते. ते सर्वांशीं प्रेमानें आणि नम्रतेनें वागत असत. त्यांच्या पहिल्या कुटुंबास अपत्य होईना ह्मणून, बहिणीच्या व पहिल्या कुटुंबाच्या आग्रहास्तव त्यांनीं, आपले वयाचे ४० वे वर्षीं दुसरें लग्न केलें होतें. ह्या दोन्ही बायका एकमेकींशीं मोठ्या प्रेमानें आणि सुखासमाधानानें राहात असत. दोघींवर तात्यांचा लोभ सारखा असे. थोरलें कुटुंब तात्यांच्या आधीं सुमारें सहा महिनें वारलें; त्यावेळीं त्यांस फार दुःख झालें; आणि शव घराबाहेर काढिलें तें पाहून, हुंदक्यासरसें ते म्हणाले, 'मी लवकरच तुझे मागोमाग येतों.' त्याप्रमाणें आपल्या सहचारिणीस जणूं काय वचन दिल्यासारखें बरोबर सहा महिन्यांनीं, शके १७९६ च्या गोकुलाष्टमीच्या दिवशीं दोनप्रहरीं, खोकल्याच्या आजारानें त्यांचें देहावसान झालें. त्यावेळीं त्यांचें वय ७६ वर्षांचें होतें.*

---

## उपदंश विकाराचा फैलाव व नीतिचा ऱ्हास.

उपदंश विकार ( उष्णतेचे विकार ) ह्या विषयावर इंग्रजींत आजपर्यंत कित्येक ग्रंथ लिहिले गेले आहेत—सध्यां मराठींतही त्याचें पुष्कळ विवेचन आढळतें व ह्यापुढें आणखी पुष्कळ प्रसिद्ध होतील. कारण हा विषयच असा आहे कीं, तो कधीं संपावयाचा नाहीं. कोणास कांहींतरी जास्त माहिती देण्याची गरज नेहमीं अनुभवावरून दिसून येईल. ह्या रोगाविषयीं कांहीं लिहिण्याचा आजचा माझा विचार नसून याच्यायोगानें किती अपाय झाले आहेत, होत आहेत व पुढें होतील आणि नीतिचा कसा ऱ्हास होत चालला आहे

---

१ कृष्णशास्त्री चिपळूणकरांनीं.

* बडोदें येथील ग्रंथप्रकाशक मंडळीनें 'अर्वाचीन कविता' नामक पुस्तक प्रसिद्ध केलें आहे, त्यांत 'तात्याचें संक्षिप्त चरित्र व त्यांच्या कांहीं निवडक कविता दिल्या आहेत, त्या वाचकांनीं अवश्य वाचाव्या.

हें समाजाच्या निदर्शनास आणावें आणि ह्या भयंकर रोगाच्या दाढेंतून सुटण्यास काय उपाय योजले असतां फायदेशीर होणार आहेत तें सुचवावें असा आहे.

उपदंश ( गर्मी ) हा रोग प्रथम युरोपखंडांतून हिंदुस्थानांत आल्याचें समजतें. खरें पाहतां हा रोग आपल्या पूर्वजांना मुळींच माहीत नव्हता. बरें, त्यांना हा रोग न जडण्याचें कारण तरी काय असावें ? मला वाटतें कीं, त्यांची नीतिची वर्तणूक किंवा ज्याला व्रतानें रहाणें ह्मणतां येईल हेंच त्यांना उपदंश विकारापासून अलिप्त ठेवण्यास साधनीभूत असलें पाहिजे. असें ह्मणतात कीं, आपले वाडवडील अडदांड असून सुधारलेले नव्हते; परंतु नैतिकदृष्ट्या पाहूं गेलें असतां हा शेरा त्यांना लागू पडेल असें मला तरी वाटत नाहीं. सध्यांच्या व पूर्वींच्या नीतिची तुलना केली तर कदाचित् ह्या ह्मणविलेल्या सुधारणेच्या कालांत पारडें उलटें दिसून येईल. त्यांना रितीभाती माहीत नव्हत्या, सुधारणा ह्मणजे काय हें कळत नव्हतें असें तर ह्मणतां यावयाचेंच नाहीं; परंतु ते फार सद्गुणी व नैतिकदृष्ट्या सुधारलेले होते असें कबूल करणें भाग पडतें. जर आपण सध्यां शुद्धव्रतानें रहाणाऱ्या स्त्रीपुरुषांचें शेंकडा प्रमाण काढूं लागलों तर अशीं माणसें बोटावर मोजण्यापुरतींच सांपडतील असें मला खात्रीनें वाटतें. सांप्रत असें प्रमाण बनण्याचें कारण काय असावें ? परकीय राष्ट्रांशीं निकटसंबंध असें ह्मटल्यास गैरवाजवी होईलसें मला वाटत नाहीं. सध्यांच्या काळास सुधारणेचा काळ असें ह्मणतात परंतु नीतिची वर्तणूक व सद्गुण ह्या बाबतींत हिंदुस्थानच नव्हे सर्व जग अगदीं निराळ्याच दिशेनें वाहात चाललें आहे ह्मणजे त्याचें पाऊल पुढें न पडतां उलट मागें पडत आहे असें मोठ्या दिलगिरीनें ह्मणावें लागतें.

जनावरांची बुद्धी त्यांना सृष्टिनियमाविरुद्ध उपभोग घेण्यास कशी प्रतिबंध करिते; व तीं कशारीतीनें वागतात हें सर्वांच्या नेहमीं पाहण्यांत येत असल्यामुळें त्यांना अवगत आहेच, मी सांगावें असें नाहीं; परंतु मानवप्राणी विषय सुखोपभोगाच्या कामीं आपली सदसद्विवेकबुद्धि किती क्षुद्र व कशी कुचकामाची ठरवितो पहा !! मनुष्यास विशी प्राप्त झाली नाहीं तोंच

आपल्या देशांत तो वयांत आला असें समजतात. तो ह्या वयांत इतका मदांध बनतो कीं, त्याला आपले मनोविकार ताब्यांत ठेवणेंच शक्य दिसत नाहीं. तो विषयोपभोगांत इतका गढून जातो कीं, त्याला पैशाची किंवा आपल्या स्वतःच्या आयुष्याचीहि पर्वा रहात नाहीं, नव्हे तो काळजी करीत नाहीं आणि शेवटीं त्याच्या नशिबीं काय ? तर तो बलहीन व नीतिभ्रष्ट होतो आणि आपल्या आयुष्याचीं पहिली पंचविशी संपण्याचे पूर्वींच त्याला विषयोपभोगाची व आपलें आयुष्य एखाद्या उदार धाडशी कृत्यांत घालण्याची इच्छा रहात नाहीं. त्याला एखाद्या निर्जीव प्राण्याची स्थिती प्राप्त होते. त्याचा स्वभाव एककल्ली, तापट, कोणी हिताहिताची गोष्ट सांगितली असतां खपत नाहीं असा बनतो.

पहा, गोष्टी किती गर्हणीय आहेत !! त्या राष्ट्रास लज्जा आणीत नाहींत काय ? अशा लोकांचें शेंकडा प्रमाण कमी नाहीं. जवळजवळ शेंकडा ९५ पासून ९९ सुद्धां असे लोक सांपडतील. त्यांनीं कमाविलेलें शिक्षण व मनांत वसत असलेले थोर विचार ज्यांला मनोविकार ह्मणतात ते त्यांस चेतना उत्पन्न करण्याकडे वळलेले असतात; व त्यामुळेंच त्यांना अशी स्थिती प्राप्त होते. ते इतकें करूनच थांबत नाहींत तर आपल्या शरीरांतील विषाचा प्रसाद आपल्या मुलाबाळांस व त्याच मार्गानें एका पिढीपासून दुसऱ्या पिढीस भोगावयास लावितात. ह्मणूनच हिंदुस्थानांतील प्रजा भर तारुण्यांत कांतीरहीत, बलहीन, दुर्मुखलेली, निस्तेज अशी दिसून येते व अशा स्थितीमुळेंच सर्व आयुष्यभर आपल्या जातभाईपासून व इतर राष्ट्रांपासून होणारा अपमान व छल ती मुकाट्यानें सहन करिते ह्यांत मोठेंसें नवल नाहीं. त्यांना ( लोकांना ) आपल्या जन्मभूमीचें ठिकाण ( खेडेगांव ) सोडून बाहेर पडवत नाहीं; फार झालें तर तालुका किंवा जिल्हा त्यांची मर्यादा बनते. मग दूरदेशीं जाऊन उपयुक्त शिक्षण मिळवून लोकांचे कामीं पडणें दूरच राहिलें. ते नेहमीं विषयोपभोगाचा जप करितात व त्यामुळें दुसरे उदात्त विचार त्यांच्या मनास शिवत देखील नाहींत. आपल्या अशक्ततेमुळें त्यांना घरदार सोडून एखादें उपयुक्त परिश्रमाचें काम हातीं धरण्याची मनीषाच नसते. कालांतरानें त्यांचें जीवन त्यांना दुःसह व ओझें वाटतें व दुसरी पंचविशी संपण्याचे पूर्वीच ते मृत्युमुखीं पडतात.

सध्यां हिंदुस्थानांतील शारीरीक व नैतिक स्थितीचें चित्र वरीलप्रमाणें रेखाटतां येईल. वाईट मार्गाचा परिणाम तरी ह्याशिवाय दुसरा कोणता असणार !!! आपण शूर व उच्चआर्यांचे वंशज ह्मणवितों परंतु त्यांचे गुण कोणीकडे व आपले दुर्गुण पहा !!! जर आपण खरोखर आर्यांचे वंशज आहोंत तर त्यांनीं पाळलेलीं उच्च नीतीतत्वें आपण पाळणें जरूर नाहीं काय? देशास हीन स्थिती प्राप्त होण्याचीं आणखीही पुष्कळ कारणें प्रतिपादन करण्यांत येतात. कोणी, देशांतील संपत्ति दररोज वाहून जात असल्यामुळें ही स्थिती प्राप्त झाली असें ह्मणतात; तर दुसरे सामाजिक रीतिभाती, जातीभेद हीं व अशीं कित्येक कारणें पुढें मांडतात. परंतु सर्वांत मोठें कारण ह्मणजे आपणास नीतिभ्रष्टतेपासून प्राप्त झालेला दुबळेपणा व आपलें पडत असलेलें वाईट मार्गांतील पाऊल होय असें माझें मत आहे. अशा स्थितीस प्रतिबंध करावयास नको काय? व तो कोणत्यारीतीनें केला पाहिजे? प्रत्येकानें आपली स्वतःची वर्तणूक चोख व शुद्ध राखिली पाहिजे व कोणाचें पाऊल वाईट मार्गांत पडतें असें दिसून आल्यास त्यापासून होणारे शारीरिक, मानसिक व द्रव्यादि भयंकर तोटे त्याच्या नजरेस आणून समजावून सांगितले पाहिजेत. आईबापांनीं मुलांस लहानपणापासून बालबोध वर्तणुकीचा धडा घालून द्यावा. वरचेवर नीतितत्वें त्यांच्या मनावर ठसविण्याचा सुलभ मार्गानें प्रयत्न करावा. त्यांची शारीरिक शक्ती वाढविण्याची शक्य ती खटपट करण्यास हयगय करूं नये. ह्याहीपेक्षां वैद्य व डॉक्टर यांच्यावर ह्याबाबतींत विशेष जबाबदारी आहे असें मला वाटतें. कारण उपदंश विकाराचे लोक त्यांचेकडे नेहमीं औषधाकरितां येतात, त्यावेळीं त्यांनीं निर्भिडपणानें, केवळ स्वार्थाकडे नजर न देतां, अशा रोगापासून घडणारे वाईट परिणाम, त्यापासून उद्भवणारे दुसरे रोग व पुढील पिढीस होणारी बाधा ह्याचें हुबेहुब चित्र त्यांकडे व प्रसंगविशेषीं इतर लोकांचे मनावर वठविलें पाहिजे; व त्यापासून त्यांना परावर्त करण्याची खटपट केली पाहिजे; अशी खटपट केवळ व्यर्थ जाईल असें मला वाटत नाहीं. कुशल पाथरवट आपल्या कौशल्याच्यायोगानें दगडाचा देव बनवितो. मग ह्यांनी तर माणसांशीं--ज्यांना परमेश्वरानें वाईटापासून चांगलें निवडून काढण्याची बुद्धी दिली आहे अशांशीं-आपली शक्ती खर्च

करावयाची आहे. " पेरावें तसें उगवतें " ह्या न्यायानें पाहिलें असतां सदुपदेशाच्या कामीं घालविलेला वेळ चांगलीं फळें आणून समाजाचा फायदा करून दाखविल्याशिवाय रहाणार नाहीं अशी लेखकाची खात्री आहे.

" लक्ष्मीसुत "

## विलायती चीट.

( लेखक—" दर्भ " )

राष्ट्रीयपक्षांचीं मतें हल्लीं इतकीं प्रचालितपणें पुढें येऊन, त्यांचा आपलेपणा ऊर्फ जहालपणा, पाण्यावरील तेलाच्या थेंबाप्रमाणें, साऱ्या देशभर पसरण्यापूर्वीं, पुष्कळांप्रमाणें, बडोद्याच्या यशवंत रावांचीं ही स्वाभिमानी मतें केव्हांच पूर्णपणें बनून गेलीं होतीं. " क्रियेवीण वाचालता व्यर्थ आहे " ही रामदासाची सूत्रमयवाणी यशवंतरावाच्या रोमरोमी भरून उरल्याचा प्रत्यय त्यांच्या पक्क्या स्वदेशी वागणुकींत व्यक्त होई. अर्थात् त्यांनीं आपल्या मुलाबाळांसही हेंच शिक्षण दिलें होतें. त्यांची वडील मुलगी तर बापाच्या तालमेंत उत्तम सुशिक्षित होऊन, स्वदेशीची पुरी भक्त बनली होती.

याच सुमारास वंगभंगामुळें राष्ट्रीय जागृतीची खळबळ उसळून, राष्ट्रकार्यासाठीं मवाळ व जहाल यांची अहमहमिका माजली. या दोन पक्षांत एकी होण्याचे जे अनेक स्फुट उपाय करण्यांत आले; त्यांतच मोठ्या धैर्यानें यशवंतरावांनीं आपल्या एका मुग्ध उपायाची अल्पशी भर टाकली. अकबराच्यावेळीं हिंदुमुसलमानांत पडलेलें वितुष्ट, बेटीव्यवहारानें नाहींसें करण्याचा प्रयत्न जसा झाला, तशाच धर्तीवर यशवंतरावांनीं, आपसांतील दुहीचा समेट होऊन पुढील पिढी तेजस्वी निपजण्यासाठीं, आपली पुरी जहाल कन्या, मुक्याट्यानें मुंबईस एका पदवीधर पुऱ्या मवाळ बिजवराला देऊन, विजयी होण्यासाठीं, आपलीं मतें मवाळ्याच्या अंतःपुरांत नेऊन सोडलीं.

चाळशी उलटलेले यशवंतरावाचे वडे कामदार जावई शंकरराव व त्यांचें लाडकें, तरुण, द्वितीय कुटुंब, ह्मणजे यशवंतरावाची कन्या पार्वती बाई, यांचा परस्पर विरोधी भिन्नमतप्रचुर संसार ह्मणजे स्वमत पुष्ट्यर्थ होणारीं परस्परांचीं मौजेचीं, लडिवाळ, पण एकेरीवर येणारीं भांडणें, व बिजवराच्या

बायकोचाच पगडा बसविणारे घडोघडीचे खटके, यांचा एक मनोरंजक सोटाच होय.

वयस्क शंकराला माळ घालणाऱ्या नवयौवन पार्वतीला, असें करण्यांत स्वमत स्थापनार्थ, आपण केवढा स्वार्थत्याग केला आहे, याची कल्पना नव्हती असें नाहीं. पण ती बाहेर न दाखवितां, देशहितासाठीं तिळतिळ तुटणारा तिचा जीव, एखाद्या मेहेनती कोळ्याप्रमाणें, भोळ्या शंकराचीं मवाळ मतें, सत्प्रीतीच्या मजबूत जाळ्यांत नकळत अडकवून, तीं शोषून टाकण्यासाठीं धडपडत होती. पार्वती सुविचारी व दृढ निश्चयी असल्यामुळें, आपली पायरी ओळखून, कोपिष्ट शंकराच्या मवाळ मतांना झुगारून न देतां, त्यांतूनच आपलीं जहाल मतें, हळू हळू निर्माण करून, भाळलेल्या शंकराकडून, तीं तंत्रातंत्रानें मान्य करवी. ही स्त्रियांची मोहनी मोठी अजब होय. बिचारा शंकरराव परिस्थितीनें बाहेर मवाळ व घरांत जहाल बनत चालला.

आपले परम दयाळू बादशहा सातवे एडवर्डमहाराज यांचा, मोठ्या राजनिष्ठेनें पाळण्यांत येणारा यंदाचा सव्वीस जूनचा वाढ दिवस, शंकररावांना रावबहादूरकी मिळवून देणार असल्याची गुणगुण असल्यामुळें, त्यांना तो मोठ्या अत्यानंदाचाच वाटला. त्यांनी मोठ्या उत्साहानें सकाळींच पार्वती बाईच्या हातचा पवित्र देशी साखरेचा देशी चहा देशी पात्रांतून आनंदानें ग्रहण केला व स्वारी आतां पोषाख करून बाहेर निघते तोंच टपालच्या शिपायानें एक पत्र आणून दिलें.

तें पत्र वाचून शंकरराव पार्वतीबाईस ह्मणाले: " हें घे तुझ्या बापाचें पत्र. कसेंही करून निदान चार दिवसांचे सवडीनें तरी तुला तिकडे भावाच्या भेटीस पाठवून द्या असें ह्मणतात. तुझा भाऊ विश्वास, धंदेशिक्षणाच्या अभ्यासासाठीं जपानास जाणार आहे. तूं कांहीं ह्मण, पण तुझे वडील यशवंतराव ह्मणजे पुरे दुराग्रही. मी त्यांना कितीदां लिहिलें कीं, साहेबाचें आणि माझें चांगलें आहे आणि विश्वास बी. एच्या परीक्षेंत पहिल्या वर्गांत पास झालेला आहे; तर मी त्याला एकदम शंभरांवर चिकटवून देतों. पुढें तो हँ हँ ह्मणतां वाढेल. पण नाहीं. स्वदेशी ! स्वदेशी ! आतां जपानला जाऊन

विश्वासराव तयार होऊन आले कीं विलायतेच्या गिरण्या आणि व्यापार, यांना जबरदस्त धक्का बसणार एकूण ! नोकरी ह्मणजे स्वदेशी नव्हे काय ? माझ्यासारख्या मोठ्या पगाराच्या जागा वास्तवीक गोऱ्यांचाच; पण त्या आह्मीं कर्तृत्वानें देशांतच ठेवून, पगाराच्या ओझ्याचे पैसे देशांतच नाहीं कां ठेवीत ? असेंच प्रत्येकानें करावें ह्मणजे संपत्ति वाढेल. तूंच सांग दगदगी उद्योगधंद्यांतील स्वतंत्रतेंत नोकरीची ऐषआराम, सत्ता, सुखसंपत्ति, अधिकार, बडेजाव, यांचा गंध तरी आहे कां ? यशवंतरावाचें आद्यतत्व काय तर नोकरी न करणें हाच स्वराज्याचा स्वावलंबी पाया. खासे विचार ! तर मग मजसारख्या मोठ्या जागा साहेबांनींच करून विलायतेस पैसे लांबविले पाहि-पाहिजेत; व आह्मीं इतके विद्वान होऊन पैसाफंड, मुष्टिफंड वगैरे प्रतिष्ठित भिक्षामागी करून देशाच्या, ह्मणे, उपयोगी पडलें पाहिजे, यांतच देशाचें अलोट हित ! माणूस एकदां वाहवला ह्मणजे भलतीकडेच तर्कटतो. ”

पार्वतीबाई जरा त्रासून ह्मणतात ? “ पण हें एवढें व्याख्यान मला काय ह्मणून ? बाकी साहेबाची जागा करून, मिळणारा ओझेंभर पगार देशांत किती राहतो, हें या पोषाखावरून नाहीं कां समजत ? साधूंना भेदभाव नाहींच. कोणीकडून फार तर इंग्रजी साम्राज्यांत पैसे राहिले ह्मणजे झालें. त्यांना भरतखंडाची आकुंचित मर्यादा घालण्याचा जहाली आकुंचितपणा ह्मणजे मेंदूचाच आकुंचितपणा ! हें दिलदार खुलें व्यापारी तत्व असेंच ना ? आमचे बाबा खास वेडे ! काय ह्मणे मिनिटांची काळजी घेतल्याशिवाय तासाची कशी घेतां येईल ? व्यक्तिस्वातंत्र्या शिवाय, वसाहतींचें, कां होईना, स्वराज्य-स्वातंत्र्य कसें मिळेल ? ह्मणून प्रत्येकानें आपला चरितार्थ नोकरीच्या परतंत्र-तेशिवाय करण्यास शिकलें पाहिजे; ह्मणजे अर्थात् स्वराज्याची भीक देखील मागण्याचें कारण उरणार नाहीं. एकीकडे स्वराज्याची स्वतंत्रता मागावयाची आणि दुसरीकडे स्वतः लालचावल्यामुळें, नोकरीच्या परतंत्रतेंत जास्त खितपत पडून, विचारस्वातंत्र्यही घालवून घ्यायचँ ! पण बाई, मी काय बहकतें.....”

शंकरराव हंसून ह्मणतातः—“ हँ, चालूंद्या, ठीक आहे. प्रतिपक्षाचे विचार तरी अशानें कळतात. बरें, तें जाऊं दे, पण तूं जाणार कशी ?

आपला हा चिमुकला पांच महिन्याचा हेरंब असा ताप करी. वाटेचें वारें नाहीं कां त्याला बाधणार ? " पार्वतीबाई ह्मणतातः—" पण मी कुठं जायचा हट्ट घेऊन बसलें आहे ? मी येत नाहीं ह्मणूनच उत्तर धालावं. मीही विश्वासाला लिहून कळवितें कीं, माझी भेट नाहीं झाली तरी चालेल, तूं आपला देशकार्यासाठीं जपानला निघून जा. "

बादशहाच्या आरोग्यचिंतनार्थ, निवडक कामदार व किताबदार मंडळीची एका बड्या गोऱ्या अधिकाऱ्याच्या अध्यक्षतेखालीं सकाळींच सभा असल्यामुळें शंकरराव लगबगीनें तिकडे गेले. राजाच्या जयजयकारांत सभेचें काम आटोपतांना अध्यक्षांनीं एका धनाढ्य इंग्लिश व्यापारी कंपनीच्यावतीनें, प्रत्येक सभासदास एक एक अगदीं नवीन सुरेख नमुन्याचें बायकांचें विलायती चीट नजर केलें; व त्याच दिवशीं संध्याकाळीं राजाच्या " उदंड आउक्षा " साठीं भरणाऱ्या याच मंडळीच्या बायकांचे सभेस स्त्रियांनीं हेंच चीट नेसून यावें, अशी बारिकशी सूचनाही पुढें आली. राजपक्ष यत्किंचितही न दुखावितां प्रजापक्षाचें कोटकल्याण करण्याचे आपले भारदस्त व मुत्सद्दी विचार सभेंत शंकररावांना, विद्वत्तापूर्ण वक्तृत्वानें उत्तम खुलवितां आले असतील, पण या सर्वांगसुंदर परदेशी चिटाच्या मोहानें त्यांना पार्वतीबाईला भुलवितां आलें नाहीं.

इंग्लिश कंपनीनें इंग्लिश चीट नजर करणें ह्मणजे उघड उघड इंग्रजी स्वदेशीच नव्हे काय ? या चरचरीत अंजनानें आपले डोळे उघडून, आपणही आपल्या स्वदेशीची शपथ घेणें किती आवश्यक आहे ? अशा तऱ्हेचे पार्वतीबाईचे विचार होते. त्यावेळेची नवराबायकोची चकमक मोठी गमतीची होती. शेवटीं तडजोड करण्यासाठीं पार्वतीबाई ह्मणाल्याः—" मी परदेशी चीट तर नेसणार नाहींच पण इकडच्या इच्छेसाठीं नेसलेंच तर मला सभेंत माझे स्वदेशी विचार प्रगट करूं दिले पाहिजेत; नाहीं तर मी आपली बऱ्हाणपुरी चंद्रकळा नेसून सभेस जाईन, व केवळ इकडच्या इभ्रतीसाठीं, नुसती नंदीबैलासारखी, होस हो म्हणून मान हालवून, वेळ मारून परत येईन. कोणचं पत्करतं ? " शंकरराव निश्चयानें दरडावणीच्या सुरांत ह्मणतातः-" तें चीट नेसूनच गेलं पाहिजे. बेअकली असशील, तर काय वाटेल तें तूं तेथें बोलून आपली फजीती करून घेशील. भिंतीला देखील

कान असतात, हें बोलतांना खूप ध्यानांत धर. " पण दैवाची गति विचित्र आहे. सभेला जाण्याचे वेळीं हेरंबाला जास्त ताप आल्यामुळें पार्वतीबाई सभेला गेल्या नाहींत. आपल्या बायकोची ही गैरहजरी डिबेटिंग क्लबांतच शंकररावांना कळून त्यांची थट्टा झाली; व यामुळें विलायती चीट न नेसण्याच्या हट्टानें आपला उपमर्द करणाऱ्या बायकोवर जळफळतच ते घरीं आले.

संताप हा अविचाराचा राजा होय. त्यांतून दिवस मावळण्याच्या सुमारास, हेरंबाला पुष्कळ घाम येऊन, ताप खडखडीत निवला असल्यामुळें, पार्वतीबाईचें ह्मणणें शंकररावास शुद्ध लबाडीचें वाटलें. आपल्यावर वरचढ करणाऱ्या अशा धर्मपत्नीची चीड येऊन, तिची खोड मोडण्यासाठीं त्यांणीं तिला तेंच चीट नेसून, बडोद्यास माहेरीं पाठवून देण्याचा निश्चय करून तांगा देखील बोलावला. बिचारीनें त्याला परोपरीनें विनविलें. ती सद्गदीतपणें ह्मणतेः--" माझ्यासाठीं नव्हे, पण या तान्हुल्या अर्भकाच्या कल्याणासाठीं तरी असा अविचार करूं नये. त्याचा ताप असा एकदम निवला हें सुचिन्ह नव्हे. यामुळेंच माझा जीव आधीं उडाला आहे. त्यांत आपलें हें असें करणें हें पश्चात्तापाला कारण होईल असें मला वाटतें. मी आपल्याशीं बिलकुल लबाडी केली नाहीं. पाहिजे तर हें चीट फाटेपर्यंत, मी येथेंच नेसावयाला काढतें, पण अशी मला घालवून, उभयतांची शोभा करून घेऊं नये. या हेरंबाची तरी करुणा येऊंद्या. हात जोडतें, पदर पसरतें, पाया पडतें व अन्यायावीण क्षमा मागतें. " पण विवेकशून्य सत्तेपुढें शहाणपण मुळींच चालत नाहीं. रात्रीच्या नवाच्या थर्डक्लास एक्सप्रेस गाडीला तिची हेरंबासह बडोद्यास रवानगी झाली. जातेवेळीं तें विलायती चीट नेसलेली दीन अबला डोळेभर पाहून शंकरराव धन्य झाले. बडोद्यास यशवंतरावांना तार करून शंकरराव आराम निजले.

पहाटेस पांच वाजले नाहींत तोंच, शंकररावांना बडोद्याहून यशवंतरावाची जरूरीची तार आली, ती अशीः- " पार्वतीबाईची गाडी बडोद्यास पोंचली नसून तिला इटोळा स्टेशनवर भयंकर अपघात झाला. कैक माणसें मेलीं, जळलीं व जखमी झालीं. मी तिकडे गेलों, आपण एकदम निघून या. " करावयाला जावें एक तों होतें भलतेंच. करारीपणाची चिकाटी

दाखविण्यासाठीं, हेकटपणाचा दुराग्रह करून, मुलासह पार्वतीबाईला, तिच्या विनवण्यास न ऐकतां, मृत्युमुखीं मुद्दाम ढकलून दिल्याप्रमाणें, आपल्या हातून हा केवढा अनर्थ झाला, असें शंकररावास वाटलें. संतापी माणसें रागाच्या झपाट्यांत जितकीं पाषाणहृदयीं असतात, तितकींच तीं शांत-वृत्तींत मृदुमनाचीं असतात. शंकररावांना प्रेमाचा उमाळा आला व ते चिंतातुरपणें धगधगणाऱ्या मनानें तडक इटोल्यास चालते झाले.

भयंकर अपघाताच्या प्रलयकालानें तेथें भरविलेल्या मृत्यूच्या दरबाराकडे पाहून कोणाच्या काळजाचें पाणी होणार नाहीं ? गाड्यांची टक्कर होतांच, मालगाडींतील हजारों भरलेले राकेलचे डबे, फुटलेल्या इंजनांतील विस्तवानें पेटून, प्राप्त झालेल्या प्रत्यक्ष यमराजाच्या स्वागतार्थ, तोफेसारखे धडाधड उडून अनर्थमय सलामी देऊं लागले. माणसांच्या डब्यांतील दिव्यांचा ग्यास व वीज भडकली व अग्निनारायणाचा एकच डोंबाळ झाला. माणसांचे डबे पेटले व कैकजण झोंपी गेलेल्या जागींच कायमचे निजले. कैक माणसें जळून खाक झालीं. कित्येक अर्धवट जळल्यामुळें प्राणोत्क्रमणाचेवेळीं एक-मेकांस निराशेनें मारलेल्या मिठ्या तशाच राहिल्या, स्तनपान करणाऱ्या मुलांसह आया तशाच होरपळून गतप्राण झाल्या, कोठें नुसता हात, तर कोठें नुसता पायच उरला, सामानसुमान हलकेंभारीं चटसारें राखरांगोळी झालें. आग-गाडीच्या प्रचंड व मजबूत डब्यांचीं लोहमय शरीरें, यकःश्चित फाटक्या कागदाप्रमाणें, वाभाडे जाऊन छिन्नभिन्न होऊन पडलीं. असा अत्यंत भेसूर देखावा पाहून, शंकरराव गांगरून गेले. तेथें बिचारी पार्वतीबाई व दीन हेरंब कोठें हुडकावा ? कैकजण आपआपलीं माणसें अशींच हुडकीत होते; व कित्येकांचा अद्यापही पत्ता लागलेला नाहीं. मृत्यूच्या झडपेची सावली पडून तळमळणारे कैक आसन्नमरण अभागी प्राणी बडोद्याच्या इस्पितळांत आणून टाकले होते. तेथेंही पार्वतीबाई नव्हत्या. अपघाताच्या स्मशान-भूमींतून, प्रेताची राख तुडवीत तुडवीत उत्कंठेनें प्रियपत्नीचा शोध कर-णाऱ्या शंकररावाला जळत जळत विझलेल्या चिटाच्या अर्धवट निऱ्या सांपडल्या. भांडणाच्या मूळाचें कालचेंच तें कोरें चीट, हें त्यांनीं तेव्हांच ओळखलें. झालें ! काय तें कळून चुकलें ! स्त्री आणि पुत्र यांच्या अक्षय्य विरहानें शोकाकुल झालेले शंकरराव तें चीट यशवंतरावांना दाखवून, कपाळ

पिटून रडूं लागले. कंठ भरून आलेले यशवंतराव आश्चर्यानें ह्मणाले:- "काय ? आपण अजून परदेशी चीट वापरता ?" प्रश्नाला उत्तर नाहीं; पण जेथें प्रेतांच्या राखाडींत ते चिटाचे तुकडे सांपडले, तेथें यशवंतरावांना नेऊन, पस्तावलेल्या शंकररावांनीं चिमूटभर चिताभस्म हातीं घेऊन, स्वतःला बायकोच्या स्मरणार्थ, स्वदेशीला वाहून घेतल्याची शपथ घेतली.

*　　*　　*　　*　　*

ईश्वरी योजनेचा एखादा लोकोत्तर चमत्कार प्रत्ययास आला ह्मणजे जगन्नियंत्याच्या अगाध थोरवीचें अपूर्व कौतुक वाटून हरिपदीं सद्भावानें मन विलीन होतें; व "देव तारी त्याला कोण मारी" असा परमपवित्र विश्वास दृढ होतो. असाच प्रकार पार्वतीबाईबद्दल झाला. हेरंबाचा ताप जसा एकदम निवाला., तसाच तो गाडींत बारांचेसुमारास पुन्हा भरला. त्यामुळें हेरंब मनस्वी रडूं लागला. जलद चालणाऱ्या गाडीच्या दरदराटानें तो घाबरा होई. पार्वतीबाईच्या शेजारींच एक मिजासखोर किरिस्ताव डाक्टरीण बसली होती. तिनें हेरंबाच्या किरकिरीस त्रासून ह्मणा किंवा तिच्या अद्वितीय वैद्यकीय ज्ञानानें ह्मणा, सुरतेस तिच्या ओळखीच्या स्टेशनमास्तरास, हेरंबाला प्लेगाचा ताप भरला असल्यामुळें, असला संसर्गजन्यरोग गाडींतून पुढें जाऊं देऊं नये अशी सूचना केली. लगेच पार्वतीबाईला खालीं उतरण्याचा हुकूम झाला. घाईंत बाकावर सोडून ठेवलेलें विलायती चीट तसेंच गाडींत विसरून, मायलेकरास सुरतेसच उतरावें लागलें. केवढी ही भगवत्कृपा ! तिच्या प्रेरणेनेंच इटोळ्यास आ पसरून बसलेल्या कालमुखांतून ती अचानक सुटली. स्वदेशीचीं पाळें, अत्यंत खोल जाण्यासाठीं एकनिष्ठेनें झटणाऱ्या पार्वतीबाईचा जीव वाचविण्यांत कांहीं तरी ईश्वरीहेतु असलाच पाहिजे, अशी शंकररावांनीं आपल्या मनाशीं भाविकपणें खूणगांठ बांधली.

हल्लीं हा शंकरपार्वतीचा जोडा स्वदेशीच्या प्रसारार्थ अविश्रांत श्रम करीत असून, गोजिरवाणा हेरंब, आपल्या निष्पाप बाललीलांनीं त्यांचे श्रम परिहार करीत असतो.

---

## श्री गोदावरी दर्शन.

[ नाशकास गोदावरींचें दर्शन झालें त्यावेळीं मनांत उद्भवलेले तरंग जसेच्या तसेच पुढील पद्यांत गोंविले आहेत. ]

श्लोक.

साच पुण्यसुखमूर्ति नरांची; वास भू जणु समस्त सुरांची; ।
हर्ष जीस बघतां मनिं कोंदे; । त्या नमू अघविनाशक गोदे ! ॥ १ ॥
कीर्ति गौतममुने ! तव धन्य ! । तूंच एक गमतोसि वदान्य ! ॥
साधुनी स्वहित अन्यहितासी । सत्य तूंच जगतीं जपलासी ॥ २ ॥
भूतलीं कलिमला मिति नाहीं; । दैन्य ताप मनुजां अति देई; ॥
नाडिले जन पुरे अविचारें; । व्यर्थ गर्व शिरले मनिं वारें ! ॥ ३ ॥
संप्रति स्थिति अशी बघुनीयां, । वाटतें नर भवांत तराया ॥
ध्यानिं आणुनि अगोदर बापा ! । मार्ग तूं करुनि ठेविशि सोपा ॥४॥
स्वधुंनीनिवह, निर्मलवारी । तोषवी बहुत हा अघहारी ॥
याहुनी जनमनास विसांवा । कोठुनी सुखद अन्य असावा ? ॥ ५ ॥
राम, वायुसुत, शंकर, विष्णु । थोर थोर मुनि, साधु सहिष्णु ॥
सर्व राहति तटीं तव गोदे ! । वंदितों तुजसि त्यांसह मोदें ॥ ६ ॥
स्वर्ग सोडुनि महीवर आली । शर्मदा सुरनदी सुकृताली; ॥
तीसवें जणु निवास कराया । होय आगमन येथ सुरां या ॥ ७ ॥

* * * *

श्रीपदाब्जरज तीर्थ, जनांतें । मान्य हें नच अमान्य कुणातें ॥
स्थानवैभव असें जनिं येई । रे ! मना ! प्रभुपदीं रत होई ॥ ८ ॥

जय जय रघुवीर ! समर्थ ! "भृंग."

## श्रीक्षेत्र त्र्यंबक.

नाशिक क्षेत्रीं जाणारे यात्रेकरू श्रीक्षेत्र त्र्यंबकास जातातच, हें क्षेत्र नाशकापासून २० मैलांवर आहे. तिकडे जाण्यास पक्या सडकेचा रस्ता आहे. हा प्रदेश मोठा रमणीय आहे. रस्त्यानें जात असतां अनेक लहान लहान टेंकड्या, लहान मोठे वृक्ष, शेतांतलीं उभीं धान्यें इत्यादिकांचा मनोहर देखावा दृष्टीस पडतो. नाशिकापेक्षांही त्र्यंबकाचें महात्म्य विशेष आहे. तीर्थमहात्म्यांत नाशिकापेक्षां हें क्षेत्र पुरातन असल्याचे अनेक दाखले पुराणग्रंथांतून सांपडतात.

सौराष्ट्रे सोमनाथं च श्रीशैले मल्लिकार्जुनम् ।
उज्जयिन्यां महाकाल मोंकारममलेश्वरम् ॥ १ ॥
परल्यां वैजनाथं च डाकिन्यां भीमशंकरम् ।
सेतुबंधे तु रामेशं नागेशं दारुकावने ॥ २ ॥
वाराणस्यां तु विश्वेशं त्र्यंबकं गौतमी तटे ।
हिमालये तु केदारं घृष्णेशं तु इलापुरे ॥ ३ ॥

वरील श्लोकांत मुख्य ज्योतिर्लिंगें जीं बारा त्यांचीं नावें आहेत. यांत त्र्यंबकाचें नांव आलें आहे.

श्रीराम वनवासांत असतां या पवित्र स्थळीं त्यांनीं कांहीं दिवस वास्तव्य केलें होतें. सांप्रत या क्षेत्रांत रामचंद्राचें स्मरण ज्यामुळें येतें अशीं कांहीं देवालयें आहेत. त्र्यंबक हे गांव फारसें मोठें नाहीं वस्ती बहुतेक हिंदूंची असून ती सुमारें पांच हजारांजवळ आहे. गांवाजवळच एका टेंकडीवर प्राचीन किल्ला आहे. या किल्यावर श्री छत्रपति शिवाजी महाराजांची बरीच फौज होती. हा किल्ला चांगला मजबूत बांधलेला असून बिकट आहे. या टेंकडीच्या आजूबाजूस निलगिरीपर्वत असून या किल्यांत जाण्यास फक्त दोनच दरवाजे आहेत. त्यांपैकीं दक्षिणेकडील दरवाजा मुख्य आहे. याच दरवाजांतून पूर्वी लष्कर व लष्करी सामान जात येत असे, आणि उत्तरेकडील दरवाजा असा बेताचा ठेविलेला आहे कीं, प्रसंगींच त्याचा उपयोग करितां यावा. यामुळें तो मुख्य दरवाजापेक्षां अगदींच लहान आहे. तो पर्वताच्या कड्यांतून खोदून काढिलेला आहे आणि त्यांतून खालीं उतरण्याकरितां ज्या पायऱ्या आहेत, त्या इतक्या लहान लहान आहेत कीं, त्यांवरून एकच मनुष्य उतरूं शकेल !

श्रीत्र्यंबकेश्वराचें देवालय मोठें असून सुंदर आहे. एखाद्या किल्यासारख्या त्याच्या भिंती असून त्या काळ्या दगडाच्या आहेत. या देवालयाचें बांधकाम श्रीमंत पहिले बाजीराव पेशवे यांच्या कारकिर्दींत झालेलें आहे असें ह्मणतात. श्रीत्र्यंबकेश्वराचें लिंग, शंकराच्या इतर लिंगांसारखें नसून, पाण्याच्या धारेंत निरनिराळ्या तीन मुद्रारूप आकृति मात्र आहेत. यांना ब्राह्मणेतर स्पर्श करूं शकत नाहींत. तेच पूजा अर्चा वगैरे करितात. दर

सोमवारीं श्रीत्र्यंबकेश्वराची पालखी निघते; त्या पालखींत महादेवाची धातूची मूर्ति ठेविलेली असते. देवालयांतून पालखी निघते व कुशावर्तात मूर्तीला स्नान घालून पुन्हा देवालयांत येते. कुशावर्त हें एक पवित्र तीर्थ आहे.

गंगाद्वारे कुशावर्ते बिल्वके नीलपर्वते ।
स्नात्वा कनखले तीर्थे पुनर्जन्म न विद्यते ॥ १ ॥

याप्रमाणें त्याचें महात्म्य वर्णिलेलें आहे. कुशावर्त ह्मणजे दर्भानीं झांकलेलें. कुशावर्त हें एक चौकोनी कुंड असून त्याची रचना अशी आहे कीं, आजूबाजूच्या कुंडांतून यांत पाणी घेतां यावें किंवा यांतून काढून देतां यावें. हें कुंड दगडांनीं बांधिलेलें असून याच्या चारीबाजूंस बसावयाकरितां बैठक केलेली आहे. यास्थळीं दान, स्नान आणि श्राद्ध हीं करितात.

कुशावर्ताजवळच कनखलतीर्थ आहे. हें तीर्थ ह्मणजे एक आडच आहे. यांत श्राद्ध केल्यानंतर पिंड टाकितात त्यामुळें याचें पाणी अस्वच्छ असतें. यांत यात्रेकरू लोक स्नान न करितां फक्त त्या पवित्र जलानें आचमन आणि मार्जन करितात.

ब्रह्मगिरीपर्वताच्या पायथ्याजवळ त्र्यंबक वसलेलें आहे. याच्या चारीबाजूस लहानमोठ्या टेंकड्या आहेत. यांतील एका टेंकडीस बीलपर्वत ह्मणतात. यावर नीलदेवीचें देवालय आहे. नीलदेवीच्या देवालयाकडे जातांना रस्त्यांत एक तलाव लागतो. येथेंच यात्रेकरू लोक बहुधा स्नान करितात. डोंगरावर जाण्यास, दगडांनीं बांधिलेला मार्ग आहे. चढाव बराच कठीण आहे. परंतु फार उंच नसल्यामुळें वर जाण्यास फारसे श्रम पडत नाहींत. येथूनच ब्रह्मगिरी आणि चक्रतीर्थाकडे यात्रेकरू लोक जातात. हीं दोन्ही स्थळेंही पहाण्यासारखीं आहेत.

**पौराणिक माहिती**–ब्रह्मदेवाचे शापानें त्र्यंबक ( तीन आहेत अंबकें ह्मणजे नेत्रें ज्यास असा शंकर ) ह्याठिकाणीं येऊन राहिले. त्यांचे सन्निध इतर देवही आले ह्मणून ह्यांचे आराधनानें व गंगेच्या पूजनवंदनानें पापी मनुष्य पुनीत होतो. ब्रह्मगिरीवर ब्रह्मदेवानें शंकराची तपश्चर्या केली ह्मणून हें नांव पडलें. गंगा–पूर्वीं गौतमऋषी ह्याठिकाणीं तपश्चर्या करीत असतां देशांत आवर्षण पडलें ह्मणून निर्वाहार्थ चार वर्णांचे लोक येथें येऊन राहिले.

अशा विकटप्रसंगीं त्यांनीं स्वतपोबलानें नित्य धान्य उत्पन्न करून त्यांचें पोषण केलें. एकेदिवशीं शेतांत चरणाऱ्या गाईस हांकण्याकरितां त्यांनीं एक दर्भ तिचे अंगावर फेंकला; तोंच त्याचें शस्त्र बनून ती मरण पावली-त्या दोषाचे परिहारार्थ शंकराचे जटेंतील गंगा ( गोदावरी ) मृत्युलोकीं आणून तिच्या उदकानें स्नान केल्याखेरीज दोषभंग होणार नाहीं, असें ब्राह्मणांनीं जगदुद्धारार्थ सांगितलें; त्यांनीं त्याप्रमाणें तपश्चर्या करून शंकराजवळ गंगा मागितली पण ती सुखानें मृत्युलोकीं जाईना ह्मणून शंकरास तिचा राग येऊन आज्ञाभंगास्तव त्यांनीं आपली जटा आपटून तिचा अखंड त्याग केला. ह्याच गंगेचा ओघ गांवांतून वाहात असतां हेमाडपंतानें हट्टानें तिला दुतर्फा घाट बांधिले व त्याचा विचार तिचे मुखापर्यंत तसेंच करण्याचा होता ह्मणून ती तेथें गुप्त होऊन पुढें सुमारें तीन कोसांवर चक्रतीर्थावर वर येऊन पाहूं लागली. तिचे स्मरणानें अंतःकरण, स्तुतीनें वाणी व स्नानानें शरीरशुद्धि ह्याप्रमाणें त्रिविधताप दूर होतात. गंगाद्वारीं गंगा प्रथम उत्पन्न झाली ह्मणून हें नांव पडलें. कुशावर्त, कंचन, कनखल व बिल्वतीर्थ आणि प्रयागतीर्थ ह्यांचें स्नान वंदन व दर्शनानें मनुष्य पापमुक्त होतो. एवंच ह्याठिकाणीं सर्व तीर्थें गंगामय व सर्व देवता शंकररूप असल्यानें येथें एक रात्रभर राहणारासुद्धां पुनित होऊन अंतीं कैलासास जातो.

---

## महाराष्ट्र ग्रंथकारांचें चवथें संमेलन.

भाग २ रा.

### संमेलनासंबंधीं सुचलेले विचार.

यंदाचे संमेलनास वास्तवीक ग्रंथकार फारच कमी आले असतांहीं " ग्रंथकार पुष्कळ जमले होते " असेंच बहुधा वर्तमानपत्रकर्त्यांनीं एकसहा विधान ठोकून दिलें आहे सत्य गोष्टीचा असा विपर्यास कां ? ग्रंथकार थोडे आल्यामुळें संमेलनास कांहीं कमीपणा येतो अशांतला प्रकार नाहीं ग्रंथकार यंदा कमी कां आले याचा सूक्ष्म विचार करता दोन तीन कारणें डोळ्यांपुढें उभीं राहतात तीं—

( १ ) यंदाच्या संमेलनाच्या तारखा मे महिन्याच्या अगदीं अखेरीस नेमिल्यामुळें बऱ्याच मंडळींना येतां आलें नसावें; कारण सुटी संपताक्षणींच ज्याला त्याला आपल्या कामावर जाण्याची घाई असते.

( २ ) " आरंभशूराः खलु दाक्षिणात्याः " या न्यायानें मंडळींची संमेलनासंबधींची उत्सुकता विरघळली असावी.

( ३ ) संमेलनापासून कांहीं तादृश फायदा होत नाहीं अशी त्यांची खात्री झाली असवी.

नाटकगृह हें संमेलनास योग्य ठिकाण नाहीं. खाजगी वाडाच त्याला पाहिजे. पुण्यास सार्वजनीक सभेच्या वाड्याप्रमाणें मोठा वाडा लभ्य असतांही संमेलनाच्या चालकांना नाटकगृह अधीक कां वाटलें कळत नाहीं. कसें तरी एकदां रंगभूमीवर मिरवावयास सांपडावें अशी तर चालकांची महत्वाकांक्षा नव्हतीना ? ग्रंथकार व प्रेक्षक अथवा श्रोते यांची एकाच ठिकाणीं कोंबाकोंबी केल्यामुळें रा. रा. वा. गो. आपटे यांनीं म्हटल्याप्रमाणें स्नेहसंवर्धन तर मुळींच झालें नाहीं; परंतु परस्परांना ( ओळख नसलेल्यांना ) परस्परांची नुस्ती ओळख करून घेण्यासही अवसर मिळाला नाहीं ! वस्तुतः ग्रंथकारांकरितां म्हणून एकाद्या दोनतीन तासांपुरत्या खाजगी बैठकीचा योग आणणें इष्ट होतें. यापेक्षां संमेलनाकरितां येणारांची रहावयाची सोय एकत्र केली असती तर फार उत्तम झालें असतें. आतां तें काम खर्चाचें होतें. कबूल. परंतु संमेलनाकरतां म्हणून मुद्दाम लांबलाबून येणारे गृहस्थ एक दोन रुपये देण्यास मागेंपुढें पाहते असें संभवत नाहीं.–राष्ट्रीयसभेप्रमाणें खर्चापुरती वर्गणी ठेविली असती तर काम सहज भागलें असतें.

संमेलनाकरिता जे गृहस्थ येतात ते नाटकगृहांत ठरावीक माणसांचीं पुराणें ऐकत ताटकळत बसण्याकरितां खास येत नाहींत. ग्रंथ लिहितांना आपल्याला येणाऱ्या अडचणी आपल्या व्यवसायबंधूंना सांगून त्यांचा परिहार व्हावा, आपले व्यवसायबंधू काय लिहीत आहेत, आपण काय लिहीत आहोंत, ते पुढें काय लिहिणार किंवा आपण पुढें काय लिहावें वगैरे हेतू धरून ते येत असतात. परंतु खेदाची गोष्ट ही कीं, यंदाचे संमेलनांत अशा प्रकारचा फायदा करून घेण्यास मुळींच वाव मिळाला नाहीं ! रा. रा. वा. गो. आपटे आपल्या प्रास्ताविक भाषणांत म्हणाले, " एकमेकांत स्नेहसंबंध उत्पन्न करून परस्परांत दळणवळण जास्त वाढविणें हाच संमेलनाचा प्रधानहेतु होय. " हेतु तर ठीक आहे परंतु तो साधला मात्र नाहीं. रंगभूमीवर दळणाचें टोपलें नव्हतें व जातेंही पण कोठें दिसलें नाहीं. त्यांच्या भाषेचें कृत्रिम व विसंगत वळण मात्र चांगलें निदर्शनास आलें ! अशाच धाटणीवर संमेलनें भरत गेल्यास स्नेहसंबंध वृद्धिंगत होण्याची गोष्ट तर बाजूसच राहिली परंतु ग्रंथकारांच्या परस्पर नुसत्या ओळखी होण्याचीही मारामार !!!

असो. आतां आपण रंगभूमीवर झालेल्या मोठमोठ्या वक्त्यांच्या भाषणांचा विचार करूं

१ अध्यक्ष रा. ब. वैद्य याचें भाषण सर्वांगसुंदर व माहितीनें पूर्ण भरलेलें असें झालें त्यांनी आपल्या भाषणाचे शेवटीं गतवर्षी प्रसिद्ध झालेल्या मराठी–पुस्तकांवर कांहीं टिकात्मक अभिप्राय दिले. अभिप्राय नेहमींच्या पद्धतीप्रमाणेंच ' होऽबा ' चे कोटींतले होते. कांहीं मात्र खरोखर मार्मिक होते. पुस्तकांवर टीका निस्पृहपणानें करून दोषाविष्करण चांगलें केलें पाहिजे. वस्तुतः हें काम साहित्यपरिषदेचें असून तें तिनें यंदा कां बजाविलें नाहीं कळत नाहीं ! " पुस्तकें परीक्षणार्थ चारदोनच आलीं. " अशी चालकांची तक्रार आहे. पण त्यांवर तरी तिनें निर्भिडपणानें अभिप्राय कां दिले नाहींत ? वर्तमानपत्रांप्रमाणें

" पोच व अभिप्राय " अशीच पद्धत तिनें आंगिकारावी ! वर्तमानपत्रांना राजकीय सामाजिक वगैरे पुष्कळ गोष्टींकडे लक्ष्य पुरवावयाचें असतें तसें तर साहित्यपरिषदेचें नाहींना ? पुढील वर्षी तरी साहित्यपरिषद् आपल्या स्वीकृत ब्रीदाला जागेल काय ? असो. कीचक नाटकावर टीका करतांना अध्यक्ष साहेबानीं ' प्यारी ' या शब्दावर बराच भडिमार केला, परंतु तो अस्थानीं होता असें माझें मत आहे. ' प्यारी ' हा शब्द हिंदुस्थानी असून तो ' प्रिये ' या शब्दाचा अपभ्रंश असावा. कीचकासारख्या दाक्षिणात्यानें वर उत्तर हिंदुस्थानांत गेल्यावर हा शब्द उचलला असावा असें मानण्यास हरकत नाहीं. ' प्यारी ' हा शब्द कीचकाचे तोंडी घालण्यात कर्त्याची उत्तम चतुराई दिसून येते. कारण त्यानें ( कर्त्यानें ) त्याच्याच ( कीचकाच्याच ) तोंडून " राजा दुर्योधनानें माझी फार चांगली सरबराई केली " असे शब्द आरंभींच वदविलें आहेत. पुन्हां दुसरी गोष्ट ' प्यारी ' ह्मणजे ' प्रिया ' असाच जर अर्थ आहे तर त्या शब्दाचा वाईट चालींच्या स्त्रियाकडेच उपयोग कां करावा ! शब्दाचा मूळचा अर्थ चांगला असून काहीं रूढीमुळेंच जर त्याला वाईट वळण मिळालें असलें तर तें बदलावयास नको काय ?

२ रा. रा. लक्ष्मण गणेश शास्त्री लेले यांनीं चालू कामिक पुस्तकांवर जी टिका केली ती खरोखरच फार मार्मीक होती. टीका अशीच असावी. एकतर्फी चांगली नाहीं. टिकाकारानें निस्पृहदृष्टीनें व समबुद्धीनें गुण व दोष यांचें सांगोपांग आविष्करण केलें पाहिजे. ' मनाचा हक् प्रदेश ' या शब्दावर मात्र सदोष टीका झाली. ' मनाचा हक् प्रदेश ' ह्मणजे मानसिक दृष्टी अतएव ज्ञानचक्षु हा शब्दइंग्रजींतील ' ल्याटिट्यूड ऑफ मेन्टल् व्हिजन् ' या शब्दसमुच्चयाचा अर्थ असावा असें वाटतें. तथापि मुलाना अर्थबोध होण्यासारखा हा शब्द नाहीं एवढें मात्र खरें !

३ रा. रा. शंकरराव चांगण बॅरिष्टर हायकोर्ट इंदूर यांचें भाषण अस्पष्ट असें झालें. स्वीकृत विषय चांगला व कल्पनामय होता; परंतु समजावून सांगण्याची हातोटी साधली नाहीं. रा. रा. मोडक यांनीं यांचा विषय समजावून देऊन आपल्या शिष्याची बूज राखिली हें त्यांना भूषणास्पद झालें. यापेक्षां शंकररावजींनीं आपलें भाषण लिहून काढून दुसऱ्या कोणाकडून तें वाचविलें असतें तर तशानें ह्मणजे त्यांचा कमीपणा दिसून आला असतां अशांतला प्रकार नाहीं.

४ असो. अखेरीस रा. रा. न. चिं. केळकर यांनीं आभाराचें प्रदर्शन उघडून व ' दरसाल अशाचप्रकारें संमेलन भरत जावो ' अशी सर्वेशाची प्रार्थना करून संमेलनाची इतिश्री केली व आपलें भरतवाक्य आटोपलें ! अशाप्रकारें ह्मणजे कशाप्रकारें ? केळकर साहेबांनीं या ' अशाप्रकाराचें थोडक्यांत दिग्दर्शन केलें असतें तर फार चांगलें झालें असतें ! माझ्या मते यंदाच्या संमेलनासारखीं नुसतीं नामधारी संमेलनें जितकीं न भरतील तितकीं बरीं ! अशाप्रकारचीं संमेलनें भरवून विनाकारण ग्रंथकारांच्या भाड्यातोड्याखालीं खर्च होणाऱ्या द्रव्याचा व काळाचा अपव्यय नव्हे काय ?

अनंततनय.

# रमणीय वेंचे.

( मागील अंकावरून पुढें चालू )

कवयः किं न पश्यन्ति किं न कुर्वन्ति योषितः ।
मद्यपाः किं न जल्पन्ति किं न भक्षन्ति वायसाः ॥ २८ ॥

कवि काय पाहत नाहींत ? सर्व पाहतात. स्त्रियांना करितां येत नाहीं असें काय आहे ? सर्व कांहीं येतें. मद्यपान केलेला मनुष्य काय बोलत नाहीं ? वाटेल तें भकतो व कावळा काय खात नाहीं ? सर्व कांहीं खातो.

मणिं वहति पादाग्रे काचः शिरसि धार्यते ।
क्रयविक्रयवेलायां काचः काचो मणिर्मणीः ॥ २९ ॥

रत्नाची योजना पायांत घालण्याकडे केली आणि काचमणी डोक्यावर धारण केला, तथापि ज्यावेळीं त्यांच्या खरेदीविक्रीची वेळ येते तेव्हां रत्न तें रत्न व कांच ती कांचच ठरतें.

काकः कृष्णः पिकः कृष्णः को भेदः पिककाकयोः ।
वसन्तसमये प्राप्ते काकः काकः पिकः पिकः ॥ ३० ॥

कावळा काळा असतो तशीच कोकीळाही काळी असते. कावळा आणि कोकीळ यांत भेद काय आहे ? परंतु जेव्हां वसंतऋतु येतो तेव्हां यांतील भेद कावळयाचा कावळा व कोकीळेची कोकीळा समजते.

काव्यशास्त्रविनोदेन कालो गच्छाति धीमताम् ।
इतरेषां तु मूर्खाणां निद्रया कलहेन वा ॥ ३१ ॥

जे ज्ञाते आहेत ते आपला काळ काव्यशास्त्रादिकांची चर्चा करण्यांत घालवितात, आणि जे मूर्ख आहेत ते झोंप घेण्यांत, जुगार खेळण्यांत, काळाचा व्यय करितात.

पुष्पेषु चम्पा नगरीषु लङ्का नदीषु गङ्गा नृपतीषु रामः ।
योषित्सु रम्भा पुरुषेषु विष्णुः काव्येषु माघः कवि कालिदासः ३२

पुष्पांमध्यें उत्तम फूल चांफ्याचें, साऱ्या नगरींत उत्तम लंकानगरी, सर्व नद्यांत श्रेष्ठ अशी गंगा, सर्व राजांत श्रेष्ठ रामचंद्रराजा, सर्व स्त्रियांत श्रेष्ठ अशी रंभा, सर्व पुरुषांत श्रेष्ठ विष्णु, काव्यामध्यें उत्तम काव्य माघकवींचें, आणि कविमध्यें श्रेष्ठ कवि कालिदास होय.

काव्येषु नाटकं रम्यं तत्रापि च शकुन्तला ।
तत्रापि च चतुर्थोऽङ्कस्तत्र श्लोकचतुष्टयम् ॥ ३३ ॥

काव्यांत नाटक रमणीय, त्या नाटकांत शकुंतला नाटक रमणीय, त्या शकुंतलेंतील चवथा अंक रमणीय आणि त्या अंकांत चार श्लोक रमणीय होत.

आदौ नम्राः पुनर्वक्राः स्वीयकार्येषु तत्परः ।
कार्यान्ते च पुनर्वक्राः काण्वास्तु प्राणघातकाः ॥ ३४ ॥

प्रारंभीं नम्र असून मागाहून वक्र ( वांकडा ) आपलें काम साधून घेण्याविषयीं तत्पर, तें काम झाल्यावर आणखी पुनः वांकडा होणारा असा जो कण्व तो प्राणघातक होय.

कुग्रामवासः कुलहीन सेवा कुभोजनं क्रोधमुखी च भार्या ।
मूर्खश्च पुत्रो विधवा च कन्या विनाग्निना संदहते शरीरम् ॥३५॥

खेड्यांत राहणें, हीनकुलांत जन्मलेल्याची चाकरी, वाईट भोजन, रागीटभाषणी बायको, मूर्ख मुलगा, आणि विधवा कन्या हीं अग्निवांचून शरीर जाळितात.

वेदान्त वाक्येषु सदा रमन्तो भिक्षान्नमात्रेण च तुष्टिमन्तः ।
विशोकमन्तः करणे रमन्तः कौपीनवन्तः खलु भाग्यवन्तः ॥३६॥

वेदांत वाक्यान्याटायीं सदैव रमणारा व वेदांत श्रवण करून आनंद मानणारा, भिक्षा मागून मिळालेल्या अन्नानेंच संतुष्ट असणारा, शोकरहित अंतःकरणाचा असा लंगोटी लाविलेला वैरागी भाग्यवंत समजावा.

अधः पश्यसि किं बाले तव किं पतितं भुवि ।
रे रे मूढ न जानासि गतं तारुण्यमौक्तिकम् ॥ ३७ ॥

हे स्त्रिये, तूं खालीं काय पहातेस ? तुझें काय हरवलें आहे ? असें एकानें विचारलें असतां ती स्त्री ह्मणते हे मूढा तुला कसें समजत नाहीं ! माझें तारुण्यरूप मोतीं हरवलें आहे तें मी शोधीत आहे.

आयुः कर्म च वित्तं च विद्या निधनमेव च ।
पञ्चैतानि हि सृज्यन्ते गर्भस्थस्यैव देहिनः ॥ ३८ ॥

आयुष्य, कर्म, द्रव्य, विद्या आणि मरण हीं ज्यावेळीं प्राणी गर्भांत असतो त्याचवेळीं कपाळीं लिहिलीं जातात.

गतशोको न कर्तव्यो भविष्यंनैवचिन्तयेत् ।
वर्तमानेषु कार्येषु वर्तयन्ति विचक्षणाः ॥ ३९ ॥

विचारी पुरुष झाल्या गोष्टींचा शोक करीत नाहींत व पुढें होणाऱ्या गोष्टींची काळजी करीत नाहींत. तर सांप्रत जें कर्म करावयाचें त्याचाच मात्र विचार करतात.

गृहासक्तस्य नो विद्या नो दया मांसभोजिनः ।
द्रव्यलुब्धस्य नो सत्यं स्त्रैणस्य न पवित्रता ॥ ४० ॥

ज्याला घर सुटत नाहीं त्याला विद्या प्राप्त होत नाहीं. जो मांसभक्षक असतो त्याला दया नसते. जो पैशाचा ( द्रव्याचा ) लोभी तो सत्याचा विचार करीत नाहीं; आणि जो बाहेरख्याली असतो त्याला पतिव्रता स्त्री कोठेंही दिसत नाहीं.

घृतं न श्रूयते कर्णे दधि स्वप्ने न दृश्यते ।
मुग्धे दुग्धस्य का वार्ता तक्रं शक्रस्य दुर्लभं ॥ ४१ ॥

हे मुग्धे ( स्त्रिये ) तुपाचें नांव कानींही पडत नाहीं. दही स्वप्नांतही दृष्टी पडत नाहीं, दुधाची तर गोष्ट बोलावयासच नको ताक तर इंद्रादिकांसही दुर्लभ आहे

अर्थातुराणां न गुरुर्न बन्धुः कामातुराणां न भयं न लज्जा ।
क्षुधातुराणां न रुचिर्न पक्क चिन्तातुराणां न सुखं न निद्रा ॥४२॥

( अपूर्ण )

# श्रीमत्तिलकाष्टकम्.



श्लोक-वृत्तं-भुजंगप्रयातम् ।

घनश्यामलं शारदाकण्ठरत्नम् । गुणाढ्य वदान्यं वरं लोकपालम् ॥
गणेशं जयन्तं प्रशान्तस्वरूपम् । भजे देशभक्तं मुदा बालराजम् ॥ १ ॥
स्वदेशव्रत्तं पूर्ण भक्त्याचरन्तम् । धृतं येन हस्ते बहिष्कारशस्त्रम् ॥
प्रसन्नं तथा चैकपत्नीव्रतस्थम् । भजे देशभक्तं मुदा बालराजम् ॥ २ ॥
महापण्डितं निस्पृहं वीतरागम् । लसद्दीप्तिमन्तं ज्वलत्कर्मसक्तम् ॥
महाराष्ट्र गीर्वाण भाषाप्रवीणम् । भजे देशभक्तं मुदा बालराजम् ॥ ३ ॥
महाराष्ट्र भूप्राणसंजीवनं तम् । सदा राजकार्ये नितांतं निमग्नम् ॥
तनूबुद्धिजेतारमानन्दकन्दम् । भजे देशभक्तं मुदा बालराजम् ॥ ४ ॥
" न मेषा वयं सुप्ततेजास्तु सिंहाः " । स्वकीयातंबंधूनिदंसंप्रवक्तुम् ॥
लिखन्तं श्रुतं ' केसरी ' वृत्तपत्रम् । भजे देशभक्तं मुदा बालराजम् ॥५॥
स्वकीयं मतं निस्पृहं निश्चितं यो । नृपाऽग्रेऽपि वक्तुं न सत्यं बिभेति ॥
विशुद्धं प्रबुद्धं च सत्यव्रतं तम् । भजे देशभक्तं मुदा बालराजम् ॥ ६ ॥
सुरापानसक्तान्स्वबंधून्निरीक्ष्य । स्वचित्ते भृशं यो विषण्णोबभूव ॥
कृतो येन यत्नोऽनिशं तद्धिताय । भजे देशभक्तं मुदा बालराजम् ॥७॥
व्रतं स्वीकृतं निर्मलं पालनाय । सहित्वा सदाक्लेशभारं प्रभूतम् ॥
कृतं बन्दिवासस्थलं येन पूतम् । भजे देशभक्तं मुदा बालराजम् ॥ ८ ॥
इदं देशभक्तस्य पुण्यंचरित्रम् । स्वदृष्टेः पुरस्तात्सदायो निधाय ॥
तथा वर्तमानो जनो लोकमान्यो । हितं शाश्वतं देशभूमेःसकुर्यात् ॥९॥

अनंततनय.

## पोंच व अभिप्राय.

ही रामाची अयोध्या—ही ऐतिहासिक कादंबरी मासिकमनोरंजनाचे संपादक श्रीयुत काशिनाथ रघुनाथ मित्र–मुंबई. यांनीं, श्रीयुत चण्डिचरण-सेन यांच्या मूळ बंगालीभाषेंतील कादंबरीवरून लिहिली आहे.

ह्या कादंबरींतील मुख्य कथानक ह्मटलें ह्मणजे अयोध्येचा नबाब नासिरुद्दीन याची कारकीर्द होय. आज आपल्या भरतखंडाचे सर्व सत्ताधारी जे इंग्रज लोक, ते हातांतली तराजू सोडून ह्मणजे वणिक्वृत्ति सोडून क्षत्रियवृत्तीचा अंगिकार करून ज्यावेळीं आपले हातपाय साऱ्या भरतखंडांत पसरीत होते, त्या काळची ही गोष्ट आहे. व्यापारी ह्मणून इकडे आलेले पुढें सार्वभौम सरकार कसे झाले हें इतिहासज्ञांस अवगतच आहे, पण त्यांच्या ‘ संस्कार ’ होण्यांत जे असंख्यात तोटे झाले आहेत ते एवढे मोठे आहेत कीं, त्यांची भरपाई कधीं ह्मणून व्हावयाची नाहीं.

ईस्टइंडिया कंपनीचा शिरकाव, उत्तरहिंदुस्थानांतील बादशाही सिंहासनापर्यंत झाला होता. अकल्पित ह्मणून त्या कंपनीला जो लाभ झाला त्या लाभामुळें तिला आपलें लष्करी सामर्थ्य वाढवावें लागलें व याच सामर्थ्याच्या जोरावर आणि त्याकालीं पेटलेल्या राज्यकर्त्यांच्या आपसांतील कलहाग्नीमुळें कंपनीच्या हातीं थोडथोडा मुलुख येऊं लागला ! तिचें वर्चस्व, खुद्द राज्यकर्त्या मुसलमान बादशहांवरही झालें. प्रस्तुत कादंबरीचा मुख्य विषय त्या वर्चस्वामुळें अयोध्येच्या बादशाही सत्तेला कसा व कां धक्का बसला, हाच असून त्याकाळची तेथील तक्ताची स्थिती कळावी ह्मणून “प्राक्कथन” या पहिल्या भागांत बरेंच वर्णन दिलें आहे. या भागाला ‘ अयोध्या ही ईष्ट इंडिया कंपनीला जणूं एक सोन्याची नगरीच सांपडली होती ! कंपनीच्या गव्हरनर जनरलला वारंवार पैशांची गरज लागावयाची; त्यानें बिनदिक्कत वजिराकडे ( अयोध्येचे नबाबांस ‘ वजीर ’ ह्मणत ) मागणी करावयाची आणि कधीं त्याचें आर्जव करून तर कधीं युक्तिप्रयुक्ति लढवून आणि कधीं कधीं तर बिचाऱ्या दुर्बल वजिराला धाकदपटशा दाखवून त्याच्याकडून सारखे पैसे उकळावयाचे.......... सारांश अयोध्येच्या खजिन्याला इ. इं. कंपनीची सारखी तुंबडी लागली

होती........" या वाक्यांनीं झालेला आहे ! त्यावेळीं अयोध्या प्रांतांतील कांहीं भागावर जमाबंदीचे कामावर कर्नल हॅने या नावाचा युरोपियन अंमलदार होता. या एकट्यानेंच सुमारें ३ वर्षांत तीस लक्ष रुपये गिळंकृत केले होते !! पण हे रुपये त्यानें कंपनीच्या कामाकरितां ह्मणूनही घेतलेले नव्हते. कंपनीची बाब ती निराळीच. कंपनीसरकारची भर करितां करितां राज्यकर्त्या नबाबाची सांपत्तिक स्थिति कशी झाली होती याचें थोडक्यांत वर्णन ( पृ. १३ ) असें केलेलें आहे. ' निरनिराळ्या कलमांखालीं कंपनी नबाबाकडे आपली दोन कोटी दहा लक्ष रुपये बाकी मागूं लागली. नबाब भांबावून गेला. स्वतःच्या नोकरांचे पगार देण्यास व राज्यांतील महत्वाच्या कामीं खर्च करण्यास त्याच्या खजिन्यांत पैसा राहिला नाहीं. एवढेंच नव्हे, तर राजवाड्यांतील स्त्रियांचीही भयंकर उपासमार होऊं लागली.... ! "

नबाबाच्या मागें कंपनीसरकारचा पैशाविषयीं तगादा कसा होता याचें वर्णन या " प्राक्कथनांत ' केलेलें आहे. पुस्तकांतील इतर भागांपेक्षां हा भाग विशेष महत्वाचा आहे असें आह्मांस वाटतें.

नबाब नासिरुद्दीन हा गाझीउद्दीन हैदर याचा पुत्र असून बापाच्या मरणानंतर स. १८२७ सालीं गादीवर बसला. गाझीउद्दीन यानें आपल्या रयतेला सुखसमाधानांत--त्याकाळीं ठेवितां आलें तितकें-ठेविलें होतें. नासिरुद्दीन गादीवर बसतांच त्यानें खजिन्यांतलि दोन कोट रुपयांची शिल्लक उडवून फस्त केली ! नासिरुद्दीन गादीवर बसला तेव्हां त्याचें वय पंचवीस वर्षांचें असून तो स्वभावानें दिलदार पण भोळा, विलासप्रीय व अप्रबुद्ध होता. गादीवर येण्यापूर्वींच त्याला अनेक दुर्व्यसनें जडलीं होतीं. तशांत ' लाज, भीति, पापपुण्य यांनां तिलांजली वाहिलेल्या, सुरासक्त, पशुदेहधारी फिरंगी आणि एतद्देशीय कुलांगारांनीं ' त्याला सदासर्वकाळ वेढिलें होतें ! अशा बादशहाच्या हातून प्रजेला पीडा झाली तर त्यांत नवल काय ? त्याच्या कारकीर्दींत प्रजा किती त्रस्त झाली होती व बादशहाच्या चैनीसाठीं पैसा पाहिजे ह्मणून कारभारी तिला कसे छळीत होते, याचें वर्णन नापितराज सर्फराजखां--बादशहाचे दिलजान दोस्त यांचें कुलवर्णन, त्याचें बादशहाजवळ असलेलें वर्चस्व हीं ४ थ्या प्रकरणांत आलीं आहेत. बादशहाचया आणि त्याच्या कामदारांच्या

अत्याचारामुळें प्रजेला किती दुःख भोगावें लागलें हें पांचव्या प्रकरणांत आलें आहे.

त्यावेळीं कंपनीसरकारचे मुख्य अधिकारी गव्हनर जनरल लार्ड वुइलियम बेंटिक आणि त्यांचा मसलतगार मेटकाफ हे दोघे युरोपिअन हिंदुस्थानांत येऊन कंपनीची राज्यव्यवस्था पाहूं लागले. " ईस्ट इंडिया कंपनी ह्मणजे अर्थलोभी व्यापारी बनियांची मंडळी! गेल्या दोन शतकांत ती छलानें, बलानें आणि कौशल्यानें हिंदुस्थानांतून जळूप्रमाणें एकसारखा पैसा शोषून नेत होती. इ० स० १७६५ सालीं ईस्ट इंडिया कंपनीला बंगालची दिवाणगिरी मिळाल्यानंतरही प्रजेच्या सर्वस्वाची लूट करण्यास ती कांहीं कमी करीत नव्हती. तिला प्रजेची उन्नति करावयाची इच्छा नव्हती; इतकेंच नव्हे तर, भरतखंडांतील लोकांनां चिरकाल अज्ञानांधकारांत ठेवण्याविषयीं ती नानाप्रकारच्या युक्त्या योजीत असे............हिंदुस्थानच्या लोकांचे डोळे उघडले ह्मणजे हिंदुस्थानांत आपणाला प्रभुत्व गाजविण्यास मार्ग राहणार नाहीं असें त्यांनीं स्पष्ट सांगितलें.... ...... हिंदुस्थानांत चोर आणि दरोडेखोर यांना पाठविण्यास आह्मीं कबूल आहों; परंतु खिस्ती धर्मप्रसारकांनां पाठविण्यास कबूल नाहीं. खिस्ती धर्मप्रसारकांच्या कर्मांनींच अमेरिका स्वतंत्र झाली ! "

ही गोष्ट दीडशें वर्षांपूर्वीची आहे. त्यावेळीं कंपनीच्या डिरेक्टरांना पडलेली भीति प्रस्तुतकालीं कांहीं अंशानें तरी खरी झाली आहे काय ?

प्रस्तुत कादंबरी इतकी उत्तम वठली आहे कीं, एकवेळ हातीं घेतली ह्मणजे संपूर्ण वाचल्याशिवाय खालीं ठेववत नाहीं. त्यामुळें थोडेसे उतारे देऊन कसें भागणार ? त्यावेळच्या बादशाही अंमलाचें, विशेषतः कंपनी सरकारच्या कारभाराचें वर्णन एकपरी आंगावर कांटा आणण्यासारखें आहे; तथापि त्यावेळच्या शूरवीर स्त्रीपुरुषांच्या पराक्रमांचीं जीं वर्णनें आलीं आहेत, तीं वाचण्यासारखीं आहेत. 'भारतरमणी' या प्रकरणावरील अवतरण पहा:— 'खरोखर भरतखंडाचा जर कधीं उद्धार झाला, तर तो भारतीय स्त्रियांच्या सद्गुणामुळेंच होईल ! हिंदुस्थानांतील पडदानशीन स्त्रियांपेक्षां अधिक सत्वशील, विशुद्ध, उदार आणि उदात्त अंतःकरणाच्या स्त्रिया या भूतलावरील

सुधारणागिरीच्या अत्युच्च शिखरावर विराजमान झालेल्या दुसऱ्या कोठल्याहि देशांत आढळून येणार नाहींत ! " " डब्ल्यू नाईट. "

काशिनाथाचें भगिनी प्रेम, मानकुमारीची पतिनिष्ठा, जाज्वल कुलाभिमान व पातिव्रत्य, अयोध्यानाथाचें आपल्या धर्मचारिणीवरील प्रेम, जगन्नाथ शास्त्र्यांची धर्मश्रद्धा, राणी नारायण कुमारीचें वीर पुरुषांसहि लाजविणारें शौर्य, हिमालयवासी जगन्नाथशास्त्री यांनीं आपल्या नातवास लिहिलेलें उपदेशपर पत्र, इत्यादि अनेक उत्तमोत्तम प्रसंगवर्णनांनीं वाचकवर्गाचें चित्त आकर्षण करण्यासारखी या कादंबरीची रचना झाली आहे. हिमालयांतील ' योग्याचा आश्रम ' व शेवटच्या प्रकरणांस जगन्नाथशास्त्री अद्यापि जिवंत असून ते हिमालयांतील महात्मे झाले असल्याचें वर्णन, काशिनाथानें प्राणत्यागार्थ नदींत उडी टाकिली असतां त्यांच्या आजोबानें गुप्तपणें येऊन त्याला सुरक्षित वर काढणें हा कथाभाग ' दैविक ' चमत्कारांचा ह्मणून कित्येकांस खोटाच भासण्याचा संभव आहे. असो.

या पुस्तकाच्या चांगुलपणाचें वर्णन करावें तेवढें थोडेंच होणार आहे. ज्यांना शक्ति आणि वाचनाभिरुची असेल त्यांनीं एक रुपया खर्चून ' ही रामाची अयोध्या ' अवश्य संग्रहास ठेवावी अशी आह्मीं शिफारस करितों.

**२ कुबडीः**—हा लहानसाच परंतु उपयुक्त व प्रासादिक असा ओवीबद्ध जुना ग्रंथ एका समर्थ भक्तानें शुद्ध करून प्रसिद्ध केला आहे. हा ग्रंथ ह्मणजे श्रीदासबोध ग्रंथाचें संक्षिप्त विवरण आहे.

**' दासबोधाचे शब्दापाशीं । अर्थ भिक्षा मागणें ज्यासीं ॥**
**तेणें हातीं घेवोनी कुबडीसीं । बुद्धी झोळीसी सांठवा ॥**

द. ९ आ. १.

वरील ओवी पुस्तकाच्या मुखपृष्ठावरच दिलेली असून, या एका ओवींतच सगळया ग्रंथांतील विषयांचें दिग्दर्शन केलेलें आहे. आणि तें अगदीं यथार्थ आहे कारण, दासबोधांतील खरें मर्म कळण्याला या कुबडीचा मोठा उपयोग आहे ज्ञानेश्वरीसारखी समर्थांच्या दासबोधाची भाषा कठीण नाहीं. ह्मणून त्यांतलें रहस्यही अल्पायासानेंच समजतें, असें कित्येकांचें ह्मणणें आहे. हें ह्मणणें, वरवर दासबोध वाचणारांना कदाचित पटेलहि. पण ग्रंथांतील हृद्गत समजणें फार कठीण आहे. तें समजून सांगणारे महात्मेही दुर्मिळ होत चालले आहेत ह्मणून ' ... ' । जयासीं साधणें आत्महित ॥ तेणे दासबोधींचा निश्चितार्थ । गुरु मुखें आयकावा ॥ द. १ ओ. ८ ॥ या कुबडीकारांच्या सांगण्याप्रमाणें दासबोधाचें मर्म समजून देणारे गुरूही मिळणें कठीण. अशावेळीं या कुबडीचा उपयोग करून, समर्थांच्या दासबोधांतील रहस्य समजून घेतलें पाहिजे.

कारण दासबोधाची योग्यता सर्वप्रकारें किती आहे हें नव्यानें कोणास सांगावयास नको. ' ... सध्यांचेकाळीं कोणत्याही बाजूनें आमचा उद्धार करण्यास दासबोध हा ग्रंथ समर्थ आहे, आणि कुबडी हा दासबोध समजावणारा ग्रंथ असल्यामळे त्याचीही योग्यता तितकीच मोठी आहे. याकरितां महाराष्ट्रांतील प्रत्येक व्यक्तीनें हे दोन्ही ग्रंथ आपल्याजवळ ठेवून सदोदित त्यांचें अध्ययन चालू ठेवावें अशी नम्र शिफारस आहे. ' असें समर्थ भक्तांना ( कबडीचे प्रकाशक ) कुबडीच्या प्रस्तावनेंत म्हटलें आहे तें अगदीं यथार्थ आहे

कुबडीग्रंथ लहानच आहे त्याची ओंवीसंख्या सुमारें ६५० आहे. दासबोधाच्या प्रत्येक समासाचे रहस्य २।४ ओंव्यांत समजून देण्याची कुबडीकारांची खुबी तारिफ करण्यासारखी आहे. कुबडा हा ग्रंथ कोणी लिहिला तें कांहीं समजत नाहीं; कारण ग्रंथांत कर्त्याच्या नांवाचा कोठेंही नामनिर्देश नाहीं. ज्यांनीं हा ग्रंथ लिहिला, त्यांस दासबोधाचें मर्म उत्तमतऱ्हेनें समजलेलें असून इतरांस समजून सांगण्याची त्यांस योग्यता प्राप्त झाली होती यांत कांहीं संशय नाहीं. ग्रंथाची किंमत ८४ असून तो " विनायक नारायण कंपनी गिरगांव–मुंबइ " यांजकड मिळतो

३ तर्कशास्त्रः–लेखक श्री. गोविंद रामचंद्र ओक, बी. ए. एल् एल् बी. वकील जिल्हा कोर्ट बेळगांव व प्रकाशक दामोदर सावळाराम आणि मंडळी, मुंबई. मराठी भाषेत शास्त्रीयविषयांवर ग्रंथ कमी याचें कारण, बहुजनसमाज अद्यापि अज्ञानावस्थेंत आहे हें होय. ज्यांना मराठीभाषा चांगल्यारीतीनें लिहितां वाचता येते, त्यांचा कल बहुधा नाटकें कादंबऱ्या वगैरे मनोरंजक ग्रंथ वाचण्याकडे असतो. शास्त्रीयग्रंथ समजण्यास कठीण असतात; म्हणून ते वाचण्याकडे लोकप्रवृत्ति कमी असते; पण अशा ग्रंथांची योग्यता मोठी आहे: तर्कशास्त्रावर संस्कृत भाषेंतहि सर्वमान्य असे ग्रंथ आहेत. सांप्रत कालेजातून इंग्रेजी किंवा संस्कृत तर्कशास्त्र शिकविलें जातें. तें शिकविणारास आरंभीं या ग्रंथाची पुष्कळ मदत होईल. ग्रंथकारांनीं विषयविवेचन सोपें आणि सरळ भाषेंत केलें असल्यामुळें, निव्वळ मराठी वाचकासही तें समजण्यास अडचण पडणार नाहीं. पुस्तकाची छापाई चांगली असून बांधणीही कापडी मजबूत आहे. त्या मानानें किंमत १॥ रु. ही कांहीं फार नाहीं.

४ चमत्कार तर खराच ! ले. श्री. नीलकंठ सखाराम भांगले प्रकाशक कोल्हटकर आणि मंडळी उमरावती किं. ८४; ही एक लहानशी संसारिक गोष्ट आहे. तीन मित्रांची २५ वर्षांत निरनिराळ्या तीन प्रकारची झालेली स्थिती या गोष्टींत दाखविली असून नाटकाच्या फंदांत पडल्यामुळें सद्गुणाची माती होऊन दुर्गुण कसे जडतात व त्यामुळें सारा जन्म दुःखात कसा काढावा लागतो याचें चित्र या लहानशा कथेंत बरेंच चांगलें रेखाटलें आहे. एकंदरींत ही गोष्ट वाचण्यासारखी आहे. पुस्तकाच्या मानानें किंमत मात्र थोडी जास्त वाटते !

५ " राष्ट्रप्रेम पुष्पमालेपैकीं प्रथम पुष्प ' आर्यमाता–विलाप ' पावलें. सदरहु मालेंत हें प्रथम पुष्प रा. रा. कृष्णाजी पांडुरंग लिमये ऊर्फ प्रख्यात कवि राधारमण यांनीं गुंफिलें आहे पुष्प मनोहर व सुरस आहे. काव्यमकरंदलोलुपांनीं तें एकवार अवश्य हुंगावें अशी आमची त्यांस आग्रहाची शिफारस आहे. "

६ **वन्देमातरं फोटो**-यांत प्रसिद्ध पुरुषांचे आणि देवतांचे मिळून ५७।५८ मुखवटे आहेत. काम फार सुबक झालें आहे. महाकाली, महालक्ष्मी, श्रीविश्वेश्वर, कबीर, रामदास, शिवाजी, माणीकप्रभु, तुकाराम, इत्यादि वंदनीय आर्यपुत्रांचें प्रत्यक्ष दर्शन होण्यास हें चांगलें साधन आहे ही इतकी मंडळी मोठ्या कुशलतेनें 'वंदेमातरम' ह्या पंचाक्षरांत बसविली आहे किं. ८२. प्रत्येक संग्रहेच्छु त्याला आश्रय देईल इतका हा मोहक आहे. हा फोटो दे **श्रीधर वामन नगरकर**—नाशीक यांजकडे मिळतो.

७ " कुणबी-धर्म-समाजोन्नति, पुस्तकमाला पुस्तक पहिलें-**गणेशोत्सव-लेखकः-** विनायक रामकृष्ण दिक्षित. प्रकाशक श्री. मुकुंदराज प्रासादिक संगीत मंडळी, नरखेड.

हें एक अगदीं लहान साच्याचें १२।१४ पृष्ठांचें पुस्तक असून, त्यांत ' संगीत ' चालीवर गजाननाचीं स्तुतिपर अशीं लहान लहान पद्यें आहेत. देशांत एकप्रकारची विशेष जागृति उत्पन्न झाली असून, जो तो आपापल्यापरी आपल्या अज्ञानी देशबंधूंस सज्ञान करून देशकार्य करण्याला योग्य असे तयार करूं पहात आहे, हें आशादायक शुभचिन्ह होय. ' कुणबी समाजोन्नति पुस्तकमालें ' तील ' गणेशोत्सव ' पुस्तक पहिलेंच आहे व तें नुकतेंच प्रसिद्ध झालें आहे. यावरून " समाजोन्नतीकरितां या मालेंत आणखीं कांहीं पुस्तकरूपी पुष्पांची भर पडावयाची आहे हें उघड आहे; ह्मणून आज आमच्या हातीं आलेल्या या पहिल्या पुष्पाचा सुवास कसा काय आहे, तो वाचकांस दाखविला पाहिजे. ज्या समाजाच्या उन्नतीकरितां ह्मणून ही माला लिहिली जाणार आहे त्या समाजाला सध्यांच्या अज्ञानावस्थेंत साजेल अशीच भाषा या पुस्तकांत वापरली आहे ! खुद्द ' दोन शब्दां ' पासून इतिश्रीपर्यंत हाच प्रकार आहे ! ' कवित्व करणें मला येत नाहीं, तरी गणेशकृपेनें जें यथामति आलें तें सादर केलें असे. सूज्ञ हंसक्षीरन्यायानें ग्रहण करतील अशी उमेद बाळगून " मालेस " ही अल्प सेवा अर्पण करितों.

" हा गद्यात्मक " दोन शब्दांचा " मसला आहे ! पुढे " उद्देश आहे त्याचें तात्पर्य " कुणबी गृहस्थांनीं या मालेचा एकदां तरी वाचून ( ? ) उपयोग करावा.

अशा भाषाभिज्ञाच्या तावडींत सांपडलेली गद्यभाषा निभावून जाणें मुष्किल आहे. मग तिचें " पद्यरूप " छिन्नविच्छिन्न झाल्यास मोठेंसें आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं ! ' गाणातें ' ' मोरिया ' ' हर्षितें ' ' मतिभ्रंशसमुहजन ' ' धावी धावी ' असे शब्द व शब्दसमूह आणि ' हा मायरूप कूप ! अह्मां जाळितो सदा । शांति नसे चित्ती कधीं होई आपदा ॥ धृ० ॥ दमलों मी श्रमित बहु भागलों अतां । दंभरूप अहंकार ! गांजी तत्वता । शरण कुणा जाऊं कोण शांति दे मला । तो देव रामकृष्ण सुरवरांगना ! । कीं लक्ष्मीपती गौरीसुता विघ्ननाशना । शरण गेल्यावीण त्यासी होईना कदा ( ? ॥ १४ ॥ अशी पद्यरचना ! असो; पुढील पुष्प गुंफण्याचे वेळीं तरी लेखकांनीं आणि प्रकाशकांनीं खबरदारी घ्यावी अशी मित्रप्रेमभावानें सूचना करून ठेवतो तिचा अव्हेर न व्हावा.

८ **प्राचीन यंत्रकला साहित्यः**-हें लहानसें पुस्तक कलाशिक्षण मा. पु. चे संपादक श्री. माधव भैराळ सुरतकर यानीं लिहिलें आहे. यांत प्राचीन कालमापक यंत्राविषयीं उपयुक्त व सुसंबद्ध अशी थोडीशी माहिती दिलेली आहे. पुस्तककार ह्मणतात. " पूर्वी

स्वयंवह यंत्रे किंवा उड्डाणशक्तीनें चालणारीं विमानें नव्हतीं व हल्लींच आकाशांत फिरणाऱ्या वायुनौका व घड्याळें निघालीं आहेत; असा आपल्या इकडे चांगल्या सुशिक्षितांतहि समज आहे पण तो सर्वथैव खोटा व निराधार आहे, व हें सप्रमाण दाखविण्याचा हेतु आहे "

या पुस्तकांत पूर्वीच्या कालमापक यंत्रांची माहिती आहे ज्योतिषशास्त्रात सूक्ष्मकाल मापनाचीं साधनें अवश्य लागतात व पूर्वी तीं होतीं हें भटि, विपल, पल इत्यादिकांवरून उघड दिसतें. ज्यावेळीं स्वयंवह–स्वतः चालणारीं–कालमापक यंत्रें प्रचारांत आलीं नव्हतीं त्यावेळीं- वैदिककालीं अमुक गुरु अक्षरें उच्चारण्यास अमुक काळ लागतो असें निश्चित करून त्यावरून कालमापन करीत असत असें दिसतें. २१६००० गुरु अक्षरें उच्चारण्यास अहोरात्र ह्मणजे साठ घटिका लागतात असा नियम बांधून ठेविलेला होता. ६० गुरुअक्षरांनीच रचिलेला एक संस्कृत श्लोक या पुस्तकांत दिला असून तो ह्मणावयास बरोबर एक पळ लागतें. इत्यादि माहिती दिली असून छायायंत्र, तोययंत्र, कपालयंत्र, वानरयंत्र, नरयंत्र, रेणुयंत्र इत्यादिकांची उपलब्ध माहिती दिली आहे.

चवथ्या विभागांत मयूरयंत्र व विषुवाख्ययंत्र याविषयींचें शिल्प संहितेतील वर्णन वाचण्यासारखें असून, आपल्या पूर्वजांस साप्रतच्या घड्याळासारखीं यंत्रेंही करितां येत होतीं, हें निश्चयात्मक सिद्ध होतें.

एकंदरींत हें छोटेसे पुस्तक वाचण्यासारखें आहे. पृष्ठांच्या मानानें किंमत थोडी जास्त वाटते; आपल्या पूर्वजांविषयींची आदरबुद्धि ज्यांच्या मनांत वसत असेल, त्यांनीं हें पुस्तक वाचून त्याचें मनन करण्यासारखें आहे. किं. ८६ आणे.

---

## १ अंकांतील कूटाचें उत्तर व नवीन प्रश्न.

त्या मनुष्यास डोळा एक व झाडास बोरें दोनच होतीं. त्यानें एक बोर तोडून घेतलें व दुसरें झाडावर शिल्लक ठेविलें.

**सूचना**—या प्रश्नाचीं उत्तरें बरीच आलीं आहेत. पण तीं सर्व चुकलीं आहेत.

### नवीन पद्यकूट नं० २.

मुर्खी भय परी पुढें उलट तेच लक्ष्मीसुता ।
उरांतिल निघे ध्वनी तरि लपे तिथें राहता ॥
टिपें गळवितां समीं विषम घे तदा आर्द्रता ।
अशींच बघ अक्षरें वळख तूं मला जाणता ॥

"दर्भ."

**सूचना**—याचीं उत्तरें अक्टोबर ५ तारखेपर्यंत पद्यांत पाठविणाऱ्या पांच नावांस कुमुदसुंदरी ही कादंबरी बक्षीस मिळेल.

पत्ताः-वि. व. थोरात लोणखेड पो०-शहादें, जि०-बेळगांव.

---

## अभिनंदन.

दे. विनायक लक्ष्मण भावे बी. एस सी. संपादक महाराष्ट्रकवि ठाणा. यांनीं आजपर्यंत अल्पमोलांत जी वरील मासिक पुस्तकद्वारें लोकसेवा केली आहे ती अत्यंत प्रशंसनीय आहे. महाराष्ट्रकविचे अंक सोडून निरनिराळीं प्रकरणें आम्हीं लावूं लागलों त्यावेळीं चांगदेवचरित्र, दासोपंतचरित्र, सीतास्वयंवर, रंगनाथस्वामी निगडीकर, अपरोक्षानुभव, रुक्मिणीहरण, पंचरत्न, स्फुटसंग्रह भाग १ ला दुसरा, पंचतंत्र, रामायण, शिवकथामृत इतकीं पुस्तकें तयार झालीं. या सर्वांची मिळून पृष्ठसंख्या १५०० आहे. याशिवाय गीतार्णव वगैरे कित्येक प्रकरणें अपुरीं आहेत.

दे. भावे यांनीं जो छापविण्याकरितां जुना ग्रंथसंग्रह जमविला आहे तो फारच मोठा आहे असें ही आमच्या एका स्नेहानें आम्हांस कळविलें आहे. या परिश्रमाबद्दल श्री. भावे यांचें आम्हीं सकौतुक अभिनंदन करितों.

## लोकमत.

"लोकमित्राचें अंतरंग, बाह्यांग वगैरेंचा विचार करितां आपण अल्प खर्चांत बक्षिसें वगैरे देऊनही महाराष्ट्र वाङ्मयाची वृद्धी करीत आहां ही सानंदाश्चर्यकारक गोष्ट आहे. श्रीकृपेनें लोकामित्र वृद्धींगत होवो अशी आमची प्रार्थना आहे.

" **कलावैभव किंवा उद्योगशाला** " हें पुस्तक मीं " गणेश सदाशिव जोशी " यांचे नांवावर आपणाकडून आणलें असून त्यांतील कांहीं कृती करून पाहतां उत्तम साधत आहेत. आपलें पुस्तक " उद्योगशाळेंत गुरुप्रमाणें आहे. ' जास्त काय लिहूं ! याच्या आणखीं २।३ प्रती थोडेच दिवसांत मागवीन तरी पाठविणेची मेहेरबानी व्हावी.

" कूटप्रश्नास दरअंकांत स्थान द्यावें अशी विनंती आहे. तसेंच उत्तरें देण्याची मुदत अगदीं थोडी असते ती प्रमाणानें वाढवावी ह्मणजे बाहेरगांवचे लोकांस सोइस्कर होईल.

कालें ६।९।०८. } आ. न. **रामकृष्ण शंकरजी महाजन** रंगीशाई कारखानदार.

## इहवृत्त आणि निवडक वेंचे.

**खानापूर**—आजपर्यंत पाऊस ठीक आहे; पण आतां ४।८ दिवसांत पडला तर शेवट गोड होईल. रोगराई ऋतुमानाप्रमाणें. बेळगांव-शहापूरकडे मात्र प्लेगचा अंमल सुरू आहे.

—श्रीमत् पूर्णानन्दसरस्वति स्वामीमहाराज श्रीमठ कैवल्यपूर यांची स्वारी यंदा येथील मठांत असल्यामुळें श्रीमंगलमूर्तीचा उत्साह फारच प्रक्षणीय असा पाहण्यास सांपडला. मखराचें काम मोठें प्रेक्षणीय झालें आहे.

—लो. टिळकाचा अपील-अर्ज हायकोर्टानें नामंजूर केला. आतां प्रीव्हीकौन्सिलकडे तरी दाद लागते काय पहावी.

—सोलापूर जिल्हा, मद्रास इलाखा, या बाजूला बराच पाऊस पडल्याचें पत्रांवरून समजतें.

—पाटणा जिल्ह्यांत हल्लीं सतरंज्या विणण्याचे २५०० माग चालू आहेत. स्वदेशी चळवळीमुळें हें काम इतकें वाढलें आहे कीं, त्यांना गिरण्यांतून सुताचाही पुरवठा होईनासा झाला आहे.

—रत्नागिरी जिल्ह्यांत केळशी गांवच्या ब्राह्मणावर जादा पोलीस ठेवण्यांत आले असून त्यांच्या पगाराची रकम १७१३ रुपये सदर ब्राह्मणाकडून वसूल करण्यांत येत आहे.

—बंदुकांच्या गोळ्या कागदाच्या करूं लागले आहेत. थोड्या अंतरावर सोडिल्या असतां शिशाच्या गोळ्यापेक्षा त्या अधिक नाश करितात.

—हिंदुस्थानच्या वैसरायास सरकारातून दरसाल कांहीं नियमित रकमा मिळतात. पगार २५०८०० रुपये. घरखर्च २७१२०० रुपये. दरबारखर्च २०४००० रुपये. स्वारीखर्च ४००००० रुपये. ह्यातला स्वारीखर्च वाढत चालला आहे. इ. स. १९०५-६ सालीं पावणेआठ लाखांहून अधिक झाला.

—प्लेगाच्या अनुभवातीं असें सिद्ध झालें आहे कीं, गांठीशिवाय प्लेग शेंकडा तीनही नाहीं. २ मार्फत प्लेग हा उंदरावरच्या पिसवांनीं होतो. ३ प्लेगाचा संसर्ग उंदराउंदरात पसरून त्यावरून माणसांत येतो. ४ गांठीचा प्लेग स्पर्शजन्य नाहीं. ५ बहुतकरून उंदरांवरच्या पिसवा माणसाच्या अंगावर जाऊन प्लेग पसरतो. ७ उंदराच्या घाणीशिवाय दुसऱ्या कोणत्याही घाणीशीं प्लेगाचा संबंध नाहीं.

—वऱ्हाडांतले प्रसिद्ध दरवडेखोर दरया व मोहन्या यांना पकडून देणारास वऱ्हाडसरकारानें १५०० रुपयांचें बक्षीस लाविलें आहे.

—नुकसानीची बाब ह्मणून चार आण्याची तार बंद करून सहा आण्याची करणार ह्मणे.

—ईस्टइंडिया कंपनीकडून हिंदुस्थानची राज्यव्यवस्था काढल्यास ५० वर्षें झालीं.

—आणखी २ कोटींचें कर्ज ना. हिंदुस्थानसरकार काढणार.

**सूचना**—देवीकमुदिनीचा फार्म या अंकीं देण्याचा पण अभिप्राय वगैरे वाढल्यामुळें पुढील अंकावर लोटणें भाग पडलें.

---

अक्टोबर—१९०८.]   ॥ वन्देमातरम् ॥   [अंक ४ था.

# लोकमित्र.

## नाना फडणवीस.



खूप शक्तीनें राज्य राखिलें बाजी यशवंत नाना!

—एक शाहीर.

राजा कितीही हुशार व दक्ष असला तरी त्याला मंत्रीही तसाच लागतो; कारण राज्याचीं बहुतेक सूत्रें मंत्र्याच्याच हातांत असतात. मंत्री हा राजा व प्रजा यांजमधील वकील आहे तेव्हां प्रजेचें सुखदुःख या वकीलावरच बहुतेक अवलंबून असतें. मंत्र्याची स्थिति कांहींशी मृदंगासारखी असते. मृदंगाला दोहींकडून मार खावा लागतो. केवळ राजाचेंच हित पाहणारा मंत्री असला तर त्याला प्रजेचा निरर्गल वाक्प्रवाह सोसावा लागतो; व केवळ प्रजेचेंच हित पाहणाऱ्याला राजाचा अवकृपाखड्ग मानेवर कधीं बसेल याची रात्रंदिवस काळजी बाळगावी लागते. तात्पर्य एका संस्कृत कवीनें—

नरपतिहितकर्ता द्वेष्यतां याति लोके ।
जनपदहितकर्ता त्यज्यते पार्थिवेन ॥
इति महति विरोधे विद्यमाने समाने ।
नृपतिजनपदानां दुर्लभः कार्यकर्ता ॥ १ ॥

असें जें ह्मटलें आहे तेंच खरें ! मुत्सद्याला अनेक धोरणें संभाळावीं लागतात. राजा, प्रजा व आपला देश या त्रयीच्या संरक्षणाकरितां त्याला परराज्याशीं अनेक मसलती कराव्या लागतात. कोणत्यावेळीं काय गोष्ट घडून येईल याचा कांहीं नेम नसल्यामुळें त्याला प्रत्येकाच्या हालचालीवर डोळ्यांत तेल घालून नजर ठेवावी लागते. मुत्सद्याचे अंगीं प्राधान्येंकरून कोणकोणते गुण अवश्य लागतात त्याचें कविवर्य श्री मुक्तेश्वरानें फारच मार्मिक वर्णन केलें आहे. ते ह्मणतातः—

' युगांतीं अपाय लागे जेणें । त्याची चिंता आधींच करणें ॥
उपेक्षा केलिया आपणें । घात केला आपुला ॥ १ ॥
कृत्रिमें दाऊनि मित्रधर्म । शोधोनि ठायीं पाडावें वर्म ॥
आपुलें अंग लपवी कूर्म । तेंवी स्वदोष झांकावे ॥ २ ॥
शोधिजे परबुद्धीचा ठाव । कळों नेदिजे आपुला भाव ।
स्वार्थ साधे तो उपाव । नानायत्नीं साधावा ॥ ३ ॥ "

या दर्जाचे मुत्सद्दि आमच्या मायदेशांत पूर्वीं पुष्कळच होऊन गेले. त्यांतल्यात्यांत विशेष प्रख्यात दोन. एक अमात्य राक्षस व दुसरा आर्य चाणक्य. अर्वाचीनकालांत त्यांच्या तोडीचा मुत्सद्दी ह्मटला ह्मणजे एकच व तो फडणवीस नाना हा होय ! सखारामबापू, महादजी शिंदे ऊर्फ पाटीलबोवा, विठ्ठलसुंदर, रामचंद्र मल्हार वगैरे मुत्सद्दीही नानाच्याच बरोबरीचे होते हें खरें परंतु नाना त्यांच्या मेरूस्थानीं शोभण्यासारखे होते हें निर्विवाद आहे. तेव्हां त्यांची माहिती आह्मीं आज आमच्या वाचकबंधूंस करून देण्याचें योजिलें आहे. वस्तुतः त्यांची माहिती आबालवृद्धांस आहे. मग असें असतां आह्मीं त्यांची आणखी नवीन ती माहिती काय देणार असा सहजच प्रश्न उद्भवतो ! त्याचें उत्तर एवढेंच देतों कीं, याठिकाणीं त्यांच्या समग्र चरित्राचें पर्यालोचन करावयाचें नसून त्यांच्या आयुःक्रमांतील कांहीं

चमत्कारिक प्रसंग सांगून त्यांच्याबद्दलची आपल्यास असलेली स्मृति जागृत करावयाची आहे; इतकेंच !

नानांचा जन्म सातारा येथें शके १६६३ दुर्मतीनाम संवत्सर माघ कृष्ण चतुर्थी शुक्रवार या दिवशीं झाला. वडिलांचें नांव जनार्दन बल्लाळ, मातोश्रींचें नांव रखुमाबाई. पानपतच्या स्वारींत तरवार गाजवून मरण पावलेले प्रख्यात शूर सरदार बळवंतराव मेहेंदळे यांच्या ह्या भागिनी होत.

नानांचे वडील जनार्दन बल्लाळ व चुलतचुलते बाबुराव रामचंद्र हे एकत्रच रहात असत. दोघांसही नेहमीं पेशव्यांचे बरोबर मोहिमेवर जावें लागत असे व त्यामुळें मुलांच्या विद्याभ्यासाकडे लक्ष पुरविण्यास त्यांस फावत नसे. अर्थात् हें जोखमीचें काम घरांतील बायकांवर पडलें. नानांस लहानपणापासूनच कीर्तनें, पुराणें ऐकण्याचा व देवांच्या मूर्ति करून त्यांची पूजा करण्याचा छंद असे. रखुमाबाईनें मुलाचें लक्ष विद्येवर लावण्यासाठीं त्यास वारंवार बोध करावा व प्रसंगविशेषीं कठोरपणानें ताडनही करावें; पण तेवढी वेळ गेली ह्मणजे पाहिले पाडे पावणेपंचावन हें व्हायचेंच !

व्रतबंध होईपर्यंत हा असाच क्रम चालला होता. त्यापुढें नानासाहेब पेशव्यांचे चुलतबंधु भाऊसाहेब यांनीं नाना व मोरोबा यांस आपले पुतणे विश्वासराव व माधवराव यांपाशीं ठेवून या चौघां मुलांकडून विद्याभ्यास आस्थेनें करवून घेण्याची सुरवात केली.

नाना व मोरोबा यांचे स्वभाव अगदीं भिन्न भिन्न होते. मोरोबांचा स्वभाव हूड व धाडसी असून ते अंगानेंही चांगले धष्टपुष्ट असत; यामुळें त्यांस मर्दुमकीच्या खेळांची फार आवड असे व ते त्यांत लवकरच तयार झाले. नानांचा स्वभाव त्यांच्या अगदीं उलटप्रकारचा होता; ह्मणजे ते पहिल्यापासूनच एकलकोंडे, भित्रे व भिडस्त असत व त्यांची शरीरयष्टीही मजबूत नव्हती; यामुळें शारीरिक व्यायामाचा त्यांस कंटाळा असे. बाकीच्या शिक्षणाविषयीं पाहिलें तर उभयतांत जमीनअस्मानचें अंतर. मोरोबांचें लक्ष विद्येवर मुळींच नव्हतें पण बुद्धिसामर्थ्यांत देखील ते नानांपेक्षां पुष्कळ कमी असत. यामुळें या उभयतांत ईर्षा उत्पन्न होऊन तिचा परिणाम एकदां इतक्या थरावर गेला कीं, मोरोबांनीं मूलस्वभावानें नानांस मंडळावर घोडे

फेरीत असतां घोड्यावरून खालीं पाडिलें ! नाना दोन दिवस देहभानावर नव्हते व याप्रसंगीं त्यांचा जीव मोठ्या शिकस्तीनें बचावला.

नानांनीं बारा तेरा वर्षांच्या वयांत संपादिलेली विद्या, त्यांची तरतरीत बुद्धि आणि समयोचित व प्रौढपणाचें भाषण या गोष्टी पाहून नानासाहेब पेशव्यांस आनंद झाला व ते नेहमीं त्यांस आपणाजवळ बाळगून पोटच्या मुलाप्रमाणें त्यांजवर ममता करूं लागले. या थोर मुत्सद्याच्या निकट सहवासापासून नानांस पुष्कळ उपयोग झाला असावा.

नानांचे वडील जनार्दन बल्लाळ यांस पोटदुखीची व्यथा असे. शके १६७८ सालीं ते रघुनाथराव दादासाहेब यांजबरोबर नर्मदेच्या पलीकडे स्वारीवर गेले होते. त्यावेळीं त्यांचें पोटशूळाचें दुखणें विकोपास जाऊन त्यांतच त्यांचें देहावसान झालें.

जन्मास आल्यापासून त्यांच्यावर हा पहिलाच दुःखाचा प्रसंग ! पित्याचें और्ध्वदेहिक आटोपल्यानंतर कांहीं दिवसांनीं पेशव्यांनीं नानांस फडणवीशीचीं वस्त्रें, पालखी वगैरे इतमाम दिला.

याच महिन्यांत पेशवे श्रीरंगपट्टणवर चालून गेले. समागमें भाऊसाहेब कारभारी व नाना फडणवीस हे होते. ही मोहीम फत्ते करून पेशवे शके १६७९ च्या आषाढांत पुण्यास आले. नानांचा हा पहिलाच प्रवास होय. यानंतर तीन वर्षेंपर्यंत नाना कोठें स्वारीवर गेले नाहींत.

याच सुमारास नाना, मोरोबांचें व त्यांचें पटत नसल्यामुळें, आपल्या वडिलोपार्जीत दौलतीची वांटणी घेऊन वेगळे राहिले. सोळा वर्षांचें वय होण्यापूर्वीच दुर्दैवानें नानांवर विषयवासनेचा पगडा बसला. या दुष्ट वासनेबद्दल त्यांस वारंवार पश्चात्ताप होई व तिचें दमन होण्यासाठीं त्यांनीं पुष्कळ भगीरथ प्रयत्न केले. ईश्वरोपासनेंत सर्वदा निमग्न होऊन राहिलें म्हणजे तरी कामवासनेचा आपणास विसर पडेल अशा समजुतीनें नाना पुणें सोडून गोदावरीतीरीं श्रीक्षेत्र कायगांवटोकें येथें गेले, व तेथील देवासमीप त्यांनीं अतिरुद्राचें अनुष्ठान स्वतः केलें.

यानंतर सर्व महाराष्ट्रास व आमच्या आजच्या चरित्रनायकास अत्यंत अनिष्ट असें जें शके १६८२ साल तें लवकरच प्रलयकालरात्रीप्रमाणें समीप

येऊन ठेपलें. अबदालीचें पारिपत्य करून आलेल्या अपयशाचें परिमार्जन करावें ह्मणून भाऊसाहेब व पेशव्यांचे ज्येष्ठ पुत्र विश्वासराव हे हिंदुस्थानांत जाण्यास निघाले. या स्वारीबरोबर जाऊन उत्तरहिंदुस्थानांतील तीर्थयात्रा करण्याचा नानांनीं बेत केला. मातुश्रीचीही तशीच इच्छा होती ह्मणून ते आपली आई व बायको यांस बरोबर घेऊन स्वारीबरोबर निघाले. भाऊसाहेब पुण्याहून निघाले ते खानदेश, बागलाण, नेमाड हे प्रांत ओलांडून माळव्यांत गेले आणि तेथून आग्र्याचावरून मथुरेस गेले. मथुरेस सर्वांनीं तीर्थविधि केल्यानंतर भाऊसाहेबांची स्वारी दिल्लीस गेली. नाना मात्र मथुरेमध्यें कांहीं दिवस मुक्काम करण्याच्या हेतूनें तेथेंच राहिले.

मथुराक्षेत्राचें वर्णन नानांनीं फारच सुंदर केलें आहे तें आह्मीं मुद्दाम त्यांच्याच शब्दांनीं देतों.

“ सूर्यतनया यमुना इच्या तीरीं गौघाटाजवळ गेलों. तेथें स्नानसंध्या करून दोहों दिवसांनंतर मुक्तिपुरी श्री मथुराक्षेत्रीं गेलों. तेथें क्षौर प्रायश्चित्त श्राद्धादिक करून तदनंतर पुढें भगवान् पूर्णब्रह्म राधाकृष्ण याणें सकल लीला केल्या असें जें वृंदावन त्या स्थळास गेलों. तेथें कालियाडोहीं कदंबवृक्ष ज्याजवर भगवान् बसून वस्त्रहरण करिता झाला, त्याच्या शाखा अद्यापि यमुनेंत गेल्या आहेत, त्याखालीं जाऊन स्नानतर्पण करून तदनंतर गोपीचंदनाचे टिळे व तुळशीच्या माळा घालून भगवंताचें ध्यान करीत होत्साता वृंदावनांत अटलविहारी, व कुंजविहारी व बालाविहारी, राधाकिशोर, गोविंदजी या भगवंताच्या मूर्ति यांचीं दर्शनें घेतलीं. त्यांत कुंजविहारी मध्यानकाळीं चोपाळ्यावर निद्रिस्थ, कपाट लागलेलें, परंतु चोपाळ्याची दोरी बाहेर ओढीत असत, ती आपले हातीं ओढून भगवान् जो यास आंदोलनलीला केली. तेथोन शृंगारवट जेथें भगवंतानें राधेस शृंगार केले, तेथें जाऊन वटदर्शन घेऊन पुढें वंशीवटी ह्मणून जेथें भगवंतें मुरलीवादन केलें तेथें जाऊन वटाचें दर्शन घेतलें. तेथून सेवावन, कुंजवन हीं स्थळें, कुंज कसे कीं, भगवान् लीला करतो असाच भास होत असावा. सर्वही वृक्ष छत्राकार ठेंगणें, भूमिस्थपल्लव कंटकवृक्षांसही परंतु ( ? ) कंटक नाहीं. हें पाहून आनंदमय होत्साता यमुनातीरीं रेतींत भगवान् जो याणें बालरूपी लीला

केली. पादारविंदसंबंधी रेणुरजःकण त्यांची प्राप्ति मस्तकीं वंदावयाकरितां ब्रह्मादिक देव-इच्छितात, तेथें जाऊन लोळून ती रेती मस्तकावर घेतली. तेथोन ज्ञानगुडदीस ( ? ) गेलों. तेथें थोरथोर संत, महंत, बैरागी भगवत्पर होत्साते, सायंकाळचे सहा घटिका दिवसास येऊन बसून पुराणश्रवण करित आहेत, भगवंताच्या कथा नामें गाताहेत, त्यांचें दर्शन घेऊन चार घटिका पाहून चित्त बहुत शांत झालें. तदनंतर धीरसमीर जे यांप्रति कालिंदीतीरीं जाऊन सायंकाल संध्याकरून भगवान् सांब सदाशिव जो यांचें एकाग्रमनें-करून ध्यानकरून येता झालों. याप्रमाणें तीनचार दिवस क्रमिले. अनेक जन्मांचें पुण्य कीं, असें वृंदावन दृष्टीस पडलें. तेणेंकरून भगवंताच्या मूर्ति व भगवद्भक्त यांचे दर्शनेंकरून नेत्र पवित्र जहाले. ”

याप्रमाणें मथुरेची यात्रा आटोपून नाना दिल्लीस गेले. पुढें लौकरच पानिपतचें तुमुल रणकंदन झालें. त्याची हकीकत सर्वांस माहीतच आहे; तेव्हां ती येथें देण्याचें प्रयोजन नाहीं. पुढें मागें भाऊसाहेबांचें चरित्र लिहूं त्यांत ती देऊं.

पानपतच्या लढाईत जेथें मी मी ह्मणणाऱ्या सरदारांना पळतां पळतां भुई थोडी झाली तेथें बिचाऱ्या अबलांची काय गति झाली असेल याची कल्पनाच केली पाहिजे ! नानांच्या मातुश्री रखुमाबाई यांचा कोठें पत्ताच लागला नाहीं, त्यांची पत्नी यशोदाबाई हिचें वय यावेळीं फार झालें तर सोळा सत्रावर्षांचें असेल पण संकट गुदरलें ह्मणजे अल्पवयांत देखील मनुष्यास स्वसंरक्षणाचे उपाय सुचतात. यशोदाबाई “ रणांतून बाहेर निघालियावरि तिनें घोडी टाकून दिली. ती पायउतारा होऊन अंगावरील दागिनें काढून फाटकें वस्त्र नेसून अंगास माती लावून दिल्लीच्या रोखें गेली. ” पुढें तीस सोबत मिळून ती जिनगीस सुखरूप येऊन पोंचली.

बिचाऱ्या अशक्तनानांची जी अवस्था झाली ती आह्मीं सांगण्यापेक्षां त्यांच्याच शब्दांनीं दिलेली बरी. ते लिहितात–“ मी सायंकाळचे दोन घटिका दिवसास घोड्यावर पानिपतांत आलों. त्या देशाचा मार्ग अगदीं ठाऊक नाहीं. तेथें परमेश्वरें वाट दाखवावयापुरते रामाजीपंत उभे होते. सांगूं लागले घोडें वस्त्रें टाकून द्यावीं. त्यावरून सर्व टाकून शुद्ध लंगोटी

लावून बसलों. रात्र जाहल्यावर चाललों. तो एका कोसांत तीन चार वेळ शरीरास हात लावून टोपीवाल्यांनीं झाडा घेतला. दरखेपेस समागमींचे दहा-वीस तोडून टाकीत, त्यांत मी राहिलों. हे सत्ता ईश्वराची. परंतु बापूजीपंत, रामाजीपंत रहातच गेले. तों तेच शत्रु येऊन रामाजीपंत, बापूजीपंत वगैरे यांस जखमी भारी केलें. पडले. मी एकटा राहिलों. तों गवतांत गेलों. ईश्वरेंतृणेंकरून माझें रक्षण केलें. त्यांस मोहनी घातली. सर्वांस मारिलें असतां मी जवळ असतां न मारिलें व गवत लांब असतां ( नसतां ) जाऊं दिलें. पुढें ते गेल्यावर जाऊं लागलों तों पुढें दोन कोसांवर दुसरे मागती दृष्टीस पडले. तेव्हां मागतीं तृणांत जाऊन बसलों. तों जवळ येऊन काढूं लागले. ते समयीं ईश्वर त्यांतीलच एका वृद्धाचे मनांत संचार करितां झाला कीं, कशास मारितां? मग गेले. तदनंतर माझी शक्ति पानिपतावर बहुत क्षीण, आमविकारादि विकारयुक्त, अन्न चालेना. असा मी त्याजवर दयासमुद्र सांबसदाशिव जो याणें कृपा करून शरीर अशक्त, ऊन पाहिलेंच नाहीं, व पादचारी अभ्यास नसतां सोळा सत्रा कोश अन्नउदकाव्यतिरिक्त आलों. क्षुधा तिसरे प्रहरीं लागली. तेव्हां बोरीचा पाला सांपडला तो खावून पाहिला. तो तोंडांत जाईना. तसाच सायंकाळीं एका ग्रामाबाहेर आलों तों एका बैराग्यानें पीठ आणून दिलें त्याची भाकर खादली. ती अमृतप्रमाण लागली. नंतर निद्रा केली. प्रातःकाळीं गंगासहस्रनाम ह्मणत ईश्वर नामःस्मरण करीत चाललों. ”

असो. नंतर नाना दरमजल दरकूच करीत जिनगीस गेले. तेथून पत्नीस बरोबर घेऊन ते हळूहळू बऱ्हाणपुरास आले. याठिकाणीं त्यांची व नाना-साहेब पेशव्यांची भेट झाली. श्रीमंतांनीं नानांची ममतेनें विचारपूस करून त्यांच्या मुखें सर्व वृत्तांत ऐकून घेतला. नंतर नाना त्यांची आज्ञा घेऊन टोंक्यास आले. श्रीमंत कूच करून टोंक्यावरून पुण्यास गेले. तेथें गेल्या-वर लवकरच त्यांनीं भाऊ! भाऊ! ह्मणून प्राण सोडिला!

नाना फडणवीस शके १६८२ च्या चैत्रांत पुण्याहून निघाले ते सुमारें चौदा महिन्यांनीं शके १६८३ चा ज्येष्ठमास सरतां सरतां पुण्यास परत आले. श्रावणमासीं रघुनाथराव दादासाहेब माधवरावांस बरोबर घेऊन

सातान्यास गेले. त्यांबरोबर नानाफडणविसांसही जावें लागलें. श्रीमन्महाराज रामराजे यांनीं माधवरावांस पेशवाईचीं वस्त्रें दिल्यावर स्वारी परत फिरली. यावेळीं नीरानदी ओलांडीत असतां नानांच्या जिवावर मोठें अरिष्ट गुदरलें होतें परंतु केवळ दैवयोगानेंच बचाव झाला.

पुढें रावसाहेब थोरले माधवराव पेशवे यांनीं सांगितल्यावरून नाना राज्यकारभारांत थोडथोडें मन घालूं लागले; तरी पण श्रीमंत माधवरावांच्या कारकीर्दींत त्यांचें चांगलेंसें तेज पडलें नाहीं.

" यावेळीं त्यांच्या वयास वीस वर्षें झालीं होतीं. परंतु एवढ्याशा लहान वयांत देखील या संसारांतील सुखदुःखाचे प्रसंग जे त्यांनीं पाहिले तसे सुदैवानें फारच थोड्यांच्या दृष्टीस पडतात ! पूर्ववयांतील विपत्तिच्यायोगानें त्यांच्या स्वभावावर कांहींशी खिन्नतेची छाया पडून राहिली ती शेवटपर्यंत नष्ट झाली नाहीं. या जगांत मनुष्याच्या कपाळीं सुखापेक्षां दुःखाचाच वांटा मोठा आहे, याविषयीं त्यांस चांगली आठवण, सारखा प्रत्यय पूर्ववयांत आल्यामुळें राहिली. त्यांच्या स्वभावांत गांभीर्य उत्पन्न झालें आणि चैनी, लहरी व रंगेल स्वभावांच्या लोकांचा त्यांस तिटकारा येऊं लागला. नानासाहेब व भाऊसाहेब यांनीं त्यांस पुत्राप्रमाणें वागविलें हें ते यावज्जन्म विसरले नाहींत. त्यांत नानासाहेबांविषयीं तर त्यांच्या मनांत इतकें प्रेम व पूज्यबुद्धि उत्पन्न झाली होती कीं, राज्यकारभारांतच काय, पण खासगी वर्तनांतसुद्धां त्यांनीं त्यांचेंच पुष्कळ अंशीं अनुकरण केलें असें दिसतें. "

असो. राज्यकारभारांत नानांस अद्यापि ह्मणण्यासारखा अनुभव नव्हता. तथापि असल्या जबाबदारीचे कामास जी योग्यता लागते ती त्यांनीं संपादिली होती. नानांवर माधवराव पेशव्यांचा बहुत लोभ व विश्वास होता व ते प्रत्येक महत्वाच्या कामांत त्यांची मसलत घेत असत. थोरले सुभेदार मल्हारराव होळकर यांच्यामागें तुकोजी होळकरास व पानपतचे युद्धांत लंगड्या झालेल्या महादजीस पेशव्यांजवळ रदबदली करून सरदारीचीं वस्त्रें देवविण्याचे कामीं नानांनीं अतिशय मेहनत घेतली व तिचें त्याप्रमाणें त्यांना श्रेयही पण मिळालें.

( अपूर्ण. )

## वित्ताचा व्यय.

देशांत दंगेधोपे, लुटालूट, लढाया किंवा झोटिंगपातशाही असणे अशा-वेळीं जीवितरक्षणाचीच भ्रांत असते मग वित्ताची पर्वा काय असणार ? तरी पण जीवित ज्याप्रमाणें प्रिय आहे त्याप्रमाणेंच वित्तही प्रिय आहे. जीवित असेल तर वित्त मिळवितां येईल आणि जीविताचे अभावी तें मिळणार कसें आणि जवळ असल्यास त्याचा उपयोग त्याचे मालकास होणार कसा ? परंतु जीवित असून वित्त मिळण्याची मारामार पडते आणि वित्त न मिळालें ह्मणजे जीवित सुकून जातें संपुष्टांत येतें आणि कधीं कधीं नष्ट होतें. अर्थात जीवित आणि वित्त दोन्ही पाहिजेत, पण जीवित असतांना वित्त मिळविण्याचे मार्ग मोकळे असतात. वित्त मिळण्याची आशा असते आणि वित्त सततोद्योगानें मिळतेंही तसें वित्ताचेंयोगानें जीवित मिळत नाहीं. वित्त जागचेजागीं रहातें आणि जीवित निघून जातें. जीवित असेल तर गेलेलें वित्त परत आणतां येतें तसें जीवित गेलें तर वित्ताचे योगानें तें परत आणतां येत नाहीं. मग जरी दोन्हीं पाहिजेत तरी जीवित जास्त नाहीं काय ?

असें जर आहे तर वित्ताकरितां जीविताची आशा कां कमी होते. जीवित गेल्यावर वित्ताचा काडीइतकाही उपयोग-स्वतःला-नाहीं हें पक्कें कळून जीविताकडे निष्काळजीपणा करून वित्ताची फाजील हांव कां धरावी ? ज्या वित्ताकरितां जीवितास त्रास होतो तें वित्त लोभ धरून जीविताचा अंत होई-पर्यंत उराशीं कां रक्षण करावें ? वित्त हें जर जीविताकरितां आहे जीवित वित्ताकरितां नव्हे तर जीवितापुरतेंच वित्ताला कवटाळून बाकीचा भाग ज्या जीवितास त्याची जरूर आहे-फारच जरूर आहे-अशांकडे त्याची वांटणी कां करूं नये ?

पण हे विचार व्यर्थ आहेत. वित्त मिळविण्यास अघोरतर प्रयत्न करावे लागतात तसें जीवितासंबंधानें नाहीं कारण तें प्राप्तच आहे आणि सर्वांसच त्याची प्राप्ती झालेली आहे. वित्ताची गोष्ट तशी नाहीं. स्वतः प्रयत्न करून, शरीराला कष्ट सोसून आणि सगळी ताकद खर्चीं घालून वित्त मिळवावें लागतें हा प्रकार जर हमेश नजरेसमोर उभा आहे तर त्याची महति वाटणें

रास्तच आहे, परंतु तसेंही ह्मणतां येत नाहीं कारण ज्याप्रमाणें वित्ताकरितां प्रयत्न चाललेले हमेश नजरेस पडतात त्याचप्रमाणें जीवित गेल्यावर, जीविताला त्रास सोसून मिळविलेल्या वित्ताचा उपभोग भलतेच घेतात हे प्रकारही हमेश दृष्टीस पडतात. मग वित्ताची इतकी काळजी–जीवितापेक्षां जास्त–कशाला? वित्तासंबंधानें एवढी आसक्ति कां असावी?

हे विचार योग्य दिसतात खरे पण जीविताला वित्ताची आवश्यकता आहे असें जर आहे तर आवश्यक गोष्टींची जीविताला आसक्ति कां नसावी? वित्तावांचून त्याचें जर सर्वस्वी अडणार आहे तर वित्ताची जमवाजमव त्यानें होईल तितकी आणि होईल त्या तऱ्हेनें करून कां ठेवूं नये?

थोडासा विचार केला असतां पाहिली गोष्ट कबूल होईल पण दुसरी मात्र कबूल होणें नाहीं. वित्ताचा संचय करावा परंतु अटोकाट प्रयत्न करून आणि रात्रंदिवस तळतळ सोसून जमविलेलें जें वित्त, त्याचा उपयोग मात्र झाला पाहीजे नाहींपेक्षां तें वाजवीपेक्षां फाजिल जमवून कांहीं फायदा नाहीं. स्वतःचे परिश्रमानें जें मिळतें तें सगळें स्वतःकरितांच फक्त नव्हे हें लक्षांत ठेविलें पाहीजे. त्याचा उपयोग जरुरी पुरता स्वतःस करून घेऊन उरलेल्याचा विनियोग, ज्यांना त्याची वित्ताची–अवश्यकता असते परंतु ज्यांना कांहीं शरीरभोगामुळें तें मिळविणें अवघड असतें किंवा अजिबात मिळवितांच येत नाहीं, अशा जीविताकडे, करण्याकरतांच तें आपल्या स्वाधीन झालें आहे असें समजून त्याचा उपयोग झाला पाहीजे. ह्मणजे जरी तें मिळविण्यास्तव आपणांस परिश्रम करावे लागले तरी त्या श्रमांचा मोबदला फक्त आपणांस एकट्यालाच घेणें बरोबर नाहीं असें पर्यायानें ह्मणावें लागतें; आणि आपल्यांत एक अशा अर्थाची ह्मण आहे कीं " एकानें मिळवावें आणि सर्वांनीं खावें " तिचा अर्थ फक्त कुटुंबापुरताच न घेतां जर जास्त व्यापक घेतला तर असा होईल कीं " जें एकटा मिळवितो तें ज्या मानानें पुरवठ्याचें असेल त्या मानानें तितक्या प्राण्यांनीं खावें. "

हाच विचार खरा आहे आणि सूज्ञांनी म्हटलें आहे कीं " ज्याचे हातून फक्त रक्षण न होतां संपत्तीचा विनियोग योग्यप्रकारानें होईल अशाल्याच संपत्तीचा लाभ व्हावा. रात्रंदिवस संपत्तीचें रक्षण करून ती पुरून

ठेवणाऱ्याजवळ ती असली काय आणि नसली काय सारखीच. कारण त्या संपत्तीचा त्याला स्वतःलाही उपयोग नाहीं आणि दुसऱ्यांनां तर त्या संपत्तीचें दर्शनही दुष्कर मग उपभोग कोठचा मिळणार ? ”

वरील ह्मणण्याचा सत्यार्थ पुष्कळांच्या लक्षांत असेलच तथापि अलीकडे सर्व देशभर जो आज कित्येक वर्षे प्लेगरूपी नरयज्ञ चालू झाला आहे त्यावरून या ह्मणण्याचा सत्यार्थ उघड आणि स्पष्ट दिसून येईल. जीव असेपर्यंत कष्ट सोसून पैसा मिळविला, तो जतन केला, तो अत्यंत प्यार असल्याकारणानें त्याचा व्यय न होतां जोंपर्यंत दिवस जातील तितके ढकलले, तो दुसऱ्याच्या दृष्टीस देखील पडूं दिला नाहीं इतकेंच नव्हे परंतु स्वतःमागें त्याचा वारस होणाऱ्या पुत्राला देखील अंतकाळपर्यंत ओळख दिली नाहीं, देह झिजविला, कंजूषपणा करून नसत्याव्याधी मागें लावून घेतल्या आणि शेवटीं नरयज्ञांत बळी पडल्यावर तो पैसा जागचेजागीं ह्मणजे मृत्यूलोकीं राहिला. कारण स्वतःशिवाय दुसऱ्या कोणासही त्याचा मागमूस न लागूं दिल्याकारणानें तो गुप्तठिकाणीं जशाचा तसाच राहिला किंवा धूर्त मंडळीच्या हातीं गेला अशीं शेंकडो उदाहरणें चालू असलेल्या नरयज्ञाचे प्रसंगीं दिसून येत आहेत.

तेव्हां जर पैशाचा उपभोग बेताचा—पण कंजूषपणाकरून शरीराला त्रास देऊन मात्र नव्हे-करून उरलेल्या द्रव्याचा विनियोग लोकोपयोगाकरितां केल्यास तो मिळविल्याचें सार्थक तरी होईल. मागें राहणाऱ्या माणसांनां तर त्याचा उपभोग घेण्यास सांपडणें रास्त आहे कारण तो त्यांचा हक्क आहे परंतु त्यांची सोय होऊन बाकीचा जो उरण्यासारखा असेल त्याचा लोकोपयोगार्थ व्यय केल्यास स्वतः श्रम करून मिळविलेल्या द्रव्याचें चीज स्वहस्तें केलेंगेल्याकारणानें मनाला समाधान वाटून कीर्ति होईल.

येथें दुसरी एक अडचण पुढें येते ती ही कीं, मागें राहणाऱ्या माणसांनां अमुकच पाहिजे आहे असा नियम नसतो व कितीहि ठेविलें तरी कमीच होतें ह्मणून स्वतः विचार करून कांहीं नियमित द्रव्याचा व्यय लोकोपयोगार्थ करावयाचाच असा प्रत्येकानें संकल्प केला पाहिजे.

———

## अलभ्य लाभ !

( लेखक—दर्भ )

रेलवेंतील स्टेशनावरची नोकरी म्हणजे सुळावरची भाकरी खरी, पण तिचा ओलाकोरडा घांस सुखानें खाऊन, समाधानानें तसल्या स्थितींतच मोठ्या आनंदानें राहणारे प्राणी काय थोडेथोडके आहेत ? ही आपखुषीची निव्वळ गुलामगिरी वरून इतकी भपकेदार आहे कीं, बाहेरच्यांना ती पुष्कळदां दिपवूनच सोडते; आणि म्हणूनच कैक बिचारे जीव तिच्या प्राप्ती-साठीं अहोरात्र जिवापाड खटपट करीत असलेले दिसतात. रेलवेहद्दीच्या तारांनीं जखडलेल्या स्टेशनाच्या तुरुंगांत, चैनींत आयुष्य घालविणाऱ्या हरीच्या लालांना तें मर्यादित आवार म्हणजे एक आपलें स्वतंत्र राष्ट्रच वाटून, तशा थाटांतच ते जगाशीं कसे बाण्यानें वागतात याचा अनुभव कोणाला नाहीं ? कसल्याही दैवाधीन अवस्थेंत परमेश्वराच्या सौजन्यानें, सुखाच्या कल्पनेस अवकाश ठेवल्यामुळें कोणतीही स्थिति समाधानानें सुसह करून घेतां येते, एवढा धडा रेलवेनोकरांच्या सदा आनंदी उत्साहमूर्तींच्या दर्शनानें जरी शिकतां आला, तरी जगापासून अगदीं अलिप्त राहण्याच्या त्यांच्या संवयीनें व्यवहारशून्यतेंत प्रसंगीं ते कसे सहज फसतात हें विसरण्यासारखें नाहीं.

आसपास गांव ना शीव, अशा निर्जन मसणांतल्या रखरखीत भयाण जागीं टुकटुकणाऱ्या एका छोटेखानी स्टेशनीराष्ट्रांत एक आनंदी राजा रात्रीचें राज्य करीत असे. हे असिस्टंट मास्तर राजारामपंत ऊर्फ राजे सरळ स्वभावाचे असून दिलदार होते पण त्यांची बायको बहिणाबाई म्हणजे एक कजाग व आढ्यतेखोर स्त्री असून, तिला नवऱ्याच्या या यःकश्चित मास्तरकीनें स्वर्ग ठेंगणा झाला होता. तिचें माहेरचें एका भावाशिवाय कोणीही उरलें नसून, तो भाऊही तिच्याजवळच असे. विशीच्या तारुण्यानें खुललेले हे भाऊराव, स्टेशनाच्या प्लॅटफार्मावर गाडीच्यावेळीं ऐटींत हिंडून, दृष्टीस पडणाऱ्या नाजुक चेहऱ्यांच्या दर्शनानें नेत्रसुख घेण्याचीच उमेदवारी करीत असत. या उमेदवारीचा कोठें प्रसाद मिळाल्यामुळें म्हणा किंवा पूर्वकर्मानें म्हणा, भाऊरावांच्या अंगावर कसलासा रोग उद्भवला होता. कोणी म्हणे कच्चा

रसायनांचीं औषधें घेतल्यामुळें, हा अंगावर पारा फुटला आहे, तर कोणी ह्मणे, हा घाणेरडा महारोग आहे. भाऊरावाच्या पायांचीं बोटें फुटून त्यांतून कधीं कधीं अतिसूक्ष्म कृमीही गळत. अशास्थितींत एकदां एक कृष्णसर्प सहजीं भाऊरावांच्या पायावरून, दंश न करतां पार निघून गेला. यामुळें सर्प महारोग्यास चावत नाहीं, या प्रचारांतील ह्मणीला दुजोरा येऊन, बिचारा भाऊराव महारोगी असल्याबद्दल संशय दृढ झाला. त्याची स्थिति दिवसेंदिवस फार वाईट होत चालली. सख्खी बहीण त्याला विचारीनाशी झाली. अन्नपाण्याचे त्याचे हाल होऊं लागले. याच्या राहण्यानें राजाच्या घरीं पाणी पिण्यासही लोक शंकून चिळसूं लागले. कोणी निनांवी अर्ज केल्यामुळें रेलवेच्या डाक्तराकडून, असला स्पर्शजन्य रोगी रेलवेच्या हद्दींत न ठेवण्याचा राजांना दसऱ्याच्या दिवशींच हुकूम झाला. बहिणाबाई भावावर कडकल्या; व राजे हद्दीबाहेर भाऊरावांना स्वतंत्र झोंपडींत ठेवण्यास तयार असतांही, बहिणीच्या आग्रहानें भाऊरावांना नरसोबाच्यावाडीस मधुकरी मागून दत्ताची सेवा करीत आयुष्य कंठण्याचा प्रसंग आला. राजांना वाईट वाटलें व जरा लौकरच मनाला समाधान वाटण्यासाठीं दसऱ्याचें सोनें घेऊन ते वनदेवीला गेले.

स्टेशनापासून दीड मैलाचे अंतरावर डोंगरांत सखलजागीं प्राचीन बांधणुकीचें एक हेमाडपंती वनदेवीचें देऊळ आहे. भोंवताली वड, पिंपळ, लिंब वगैरे मोठमोठाले जुनाट वृक्ष आहेत, जवळच स्वच्छ पाण्याचा ओढा झुळझुळ वाहत आहे; अशा त्या रम्यस्थानीं राजे देवीच्या पायां पडून बाहेर आल्यावर, त्यांना एका ओरींत धुमी पेटवून बसलेले एक भव्य बैरागीबोवा दृष्टीस पडले. राजाच्या चेहऱ्याकडे पाहून, त्यांनीं कांहीं सहेतुक स्मित केलें व ह्मटलें:-" बच्चा हा घे अंगारा, " राजांनीं तो घेतला व बावाजीला दसऱ्याचें सोनें देऊन, नमस्कार केला. बावाजी लगेच ह्मणतात " बेटा, तुझ्या नशीबांत खरें सोनें आहे. दसऱ्याचें सोनें तूं मला दिलेंस, पण दत्तगुरु तुला येथें बावनकशी सोनें देणार आहे. तूं भाग्यवान आहेस, त्याशिवाय असला ठेवा कसा लाभेल ? " द्रव्याचा मोह मोठा कठीण आहे. छांछूंचे थोडेसे चमत्कार बावाजींनीं दाखवितांच राजे नादावले. बोवां

राजाचा हात पाहून आश्चर्यानें ह्मटलें:—" तुझ्या नशिबांत खास अलभ्य-लाभ आहे पण तो जरा कष्टसाध्य आहे. " एवढ्यानेंच राजे खुलले व ह्मणतात:—" आपण त्रिकालज्ञानीं, आपल्याला सारं समजतं. लाभ कष्ट-साध्य असल्यास कष्ट सोसावयास नकोत काय? कांट्यावांचून गुलाब नाहीं हें मी जाणतों. आपण सांगाल तें करीन पण लाभकाळ फुकट नाहीं जाऊं द्यावयाचा. " बावाजींनीं धिमेपणानें अशीं धांदल करण्याचें कांहीं कारण नाहीं ह्मणून सांगितलें. कारण तेथचा ठेवा असा तसा नसून, रामायणकालापूर्वीचा वाल्याकोळ्याच्या लुटींतला आहे; योगज्ञानानें तो तुह्मांस कसा साध्य होईल याचा साधकबाधक कारणांनीं पुरा विचार करून, मगच असल्या जिवा-वरल्या धोक्यांत हात घालावा हा शहाणपणा होय. अशा गोंजारण्यानें राजांना आशा लागली.

बावाजीच्या पायावर डोकें ठेवून ते परतले. तेव्हांपासून बावाजीची, बऱ्याच तऱ्हेनें, पण अगदीं गुप्तपणें, राजाकडून सरबराई होऊं लागली. होतां होतां पुढें वीस एकवीस दिवसांनीं दिवाळींतील पाडव्याच्या दिवशीं संध्याकाळीं बावाजी मोठे खूष होऊन, राजांना ह्मणतात:-" तुला तो ठेवा साध्य व्हावा म्हणून काल अमावास्येच्या रात्रीं मला केवढें अनुष्ठान करावें लागलें म्हणून सांगू ! माझ्या जिवावरच बेतली होती पण माझें मंत्रसामर्थ्य अत्यंत तेजस्वी असल्यामुळें, तुझ्यासाठीं प्रत्यक्ष काळाशींही टक्कर देऊन एकदांची तडजोड त्या रक्षकाकडून कबूल करून त्याला अंकित करून घेतलें. बोल हवा कां तो ठेवा तुला ? महत्कर्म कठीण आहे. वेळीं प्राणाचीही आहुती द्यावी लागेल ? आहेस तयार ? बाबा त्या तोंडच्या गोष्टी नव्हत. घाबरून गांगरलास आणि सांगितलेल्या कर्तव्यास अणुमात्र चुकलास कीं तो ठेव्याचा कृतांतासारखा रक्षक तुला सबंदच गिळील. जिवंत खाऊन टाकील. ह्मणून ह्मणतों, विचार कर, ठेवा, ठेवा, ह्मणून अलभ्य लाभासाठीं हुरळून जाऊं नकोस. "

राजे मोठ्या आतुरतेनें ह्मणाले: -" गुरूची कृपा. अगदीं भिणार नाहीं. आपण एवढा अलभ्यलाभ मला साध्य करून द्यावा. " बावाजी अत्यंत गंभीरतेनें उद्गारले:—" बरं तर, पाहूंया कसं काय तुझं धैर्य टिकतं तें !

घी देखा, पण बडगा नहीं देखा! फुकट नाहीं अलभ्यलाभ!" असें ह्मणून बावाजी, गुरगुरल्यासारखें कांहीं वेडेंवांकडें पुटपुटत, चमत्कारिक हातवारे करीत करीत, भीषण आरोळ्या मारून, उग्र दिसूं लागले. त्या शून्यखोऱ्यांत त्या फुटक्या तिनीसांजाचेवेळीं पडत चाललेल्या अंधेरांत, ओरींतील धुमीच्या किंचित् प्रकाशानें वाढणाऱ्या शून्यतेंत भेसूर आवाजानें विकाळपणा करणारे बावाजी पाहून, राजाच्या अंगावर तेव्हांच शहारे आले; पण अलभ्य लाभ पाहिजेना! त्यांनीं वर वर शांतता धरून, काय चमत्कार होतो तें ते भीत भीत पहात होते.

झट्कन् चिमट्याच्या एका फराट्यानें बावाजींनीं ते रसरशीत निखारे चोंहींकडे विखरून, धुमीखालची जागा मोकळी केली व ते ह्मणाले–" चेला, भिऊं नकोस, नीट हुषार रहा. धुमीखालींच तो ठेवा असला पाहिजे." ते उठले व हुकमतीच्या आवाजानें " दत्तगुरूची शपथ, कोण असशील तो ये बाहेर" असें म्हणून त्यांनीं धुमीजवळ डावा पाय जोरानें आपटला. त्यासरशी धुमीची धरणी दुभंगली; व एक भयंकर पिंवळाजरद मांडीएवढा लठ्ठ नाग बाहेर तोंड काढून, उंच फणा उभारून डोलूं लागला! राजे लट-लटत हात जोडून उभे होते. सर्पाच्या डोळ्यांतून ठिणग्या पडल्यासारखें तेज लखलखत होतें; व त्याच्या स्वस्तिकाच्या विस्तीर्ण फड्यावर तोंडांतून द्विधा जीभ उग्रतेनें आंत बाहेर करीत होती. त्यानें राजापुढें फडा आपटली व आपलें कालवदन पसरून तो बराच बाहेर सळसळला. राजे पोबारा कर-ण्याच्याच बेतांत होते पण त्यांचे पाय तेथें जमिनीला खिळल्यासारखे झाले होते न जाणों आपण एक पाऊल मागें सरलों तर तो समंधी साप आप-ल्यावर बेलाशक उडीच घालावयाचा, अशा दहशतीनें ते खांबासारखे स्तब्ध होते. बावाजी धीर देऊन ह्मणाले:–" मी असतांना असा भितोस कां? काढ खिशांतला रुपाया आणि टाक त्याच्या अलग तोंडांत" राजांनीं कांपत कांपत तसें केलें; पण तो साप अधीकच तोंड पसरूं लागला. बावाजी निर्धास्तपणें त्याच्यापुढें गेले व सर्पाच्या डोक्यावर थापटून ममतेनें " बच्चा बस कर आतां" असें ह्मणून, ते त्याला आंत दडपूं लागले. लगेच साप भुईंत अदृश्य झाला व फार दिवस पुरल्यामुळें जंगून मातींत काळा ठिक्कर पडलेला हंडा वर आला.

तोंडोतोंड त्याला पुतळ्यांची शीग लागली होती. राजे आशेनें आनंदून गेले. हंडाभर पुतळ्या ह्मणजे झालें काय? त्यांनीं हावरेपणानें हात पुढें केला. पण बावाजी दरडावून ह्मणालेः—"हँ, अविचार करूं नकोस. त्यांतली फक्त एक पुतळी उचल. सारा हंडा फुकट कसा लाभेल? नुसती तुला प्रचीत दाखविली. राजांनीं एक पुतळी घेतांच हंडा पार आंत गेला, व भूमींत हंड्यावर हंडा आदळल्यासारखा द्रव्यनादाचा आवाज होऊन, जिकडे तिकडे सामसूम झालें. बुवासाहेब ध्यानस्थ झाले, व राजे त्यांच्यापुढें हात जोडून उभे राहिले. क्षणभरानें बावाजीनीं हास्य करून, डोळे उघडले व राजांच्या आशाळलेल्या चेहेऱ्याकडे निरखून पाहून ह्मटलें:–"बाबारे, तूं पुरा भाग्यवान. अनादिकाळचें द्रव्य तुला थोडक्यांत लाभण्याचा आज योग आहे. हा पाडवा तुझें जन्माचें कल्याण करील. उद्यां ह्मणशील तर तूं फुटक्या नशिबाचा! साधून घे. आज जितके रुपये तुलां मिळतील तितके आणून, ऐन मध्यरात्रीस अनन्यभावानें पूजा करून, ते या नागोबाच्या तोंडांत घाल, ह्मणजे तुला तितक्या पुतळ्या उदईक मिळतील त्या घेऊन आनंदानें दिवाळीचा शेवट गोड करून जन्माची ददात नाहींशी करून घे. हँ. आटप. विलंब नको. मला स्वतःलाच जर हें द्रव्य साध्य करून घ्यावयाचं असतं तर तें केव्हांच घेतलं असतं. पण बाबारे, आपण पडलों निरिच्छ. खुळ्या हें आह्मांला द्रव्य नव्हे वमन आहे. आमच्या हें काय उपयोगी? हा पापाचा ठेवा आह्मांत आणि दत्तगुरुंत अंतर पाडील. तुमचा तुम्हांलाच प्रापंचिकांना तो लखलाभ होवो. जा तर, आणि अलभ्य लाभ हवा असेल तर दक्षणेसह पूजा साहित्य घेऊन नेमका मध्यरात्रीं ये."

राजांनीं मान डोलविली व स्टेशनाचा रस्ता सुधारला. तेव्हां त्यांच्या डोक्यांत येणारे विचार निराशाजनक होते कारण त्या दिवाळींतल्या पाडव्याच्या रात्रीं चार तासाचे आंत शें दोनशे रुपये तरी आणावे कोठून? बरें न आणावे तर काय एवढा अलभ्य लाभ मूर्खासारखा उगींच फुकट घालवावा? भोळे बिचारे राजे! उंबरांतल्या किड्याप्रमाणें स्टेशनालाच विश्व समजणाऱ्या जंगली माणसाला जगाचा काय अनुभव? पोकळचंद शेटजीची कांहींएक उचापत न करतां, दिवाळीची चमचमीत बेगमी ज्या साधनांनीं

करतां आली त्या साधनानें वाघाचे डोळे कसे मिळणार, हीच त्यांना पंचाईत पडली. इतके रुपये नुसत्या मास्तरकीच्या बिनमोल पतीवर हातउसने तरी-त्यांतून अशा अपरात्रीचेवेळीं -कोण देणार ? अशा उत्साहहीन स्थितींत राजांनीं घरीं येऊन कसेंबसें जेवण आटोपलें; आणि रकमेच्या जुळवाजुळवीच्या दुःखमय विचारांत खिन्न होऊन ते ऑफिसांत स्वस्थ बसले. तारांच्या खांबांतून खेळणारें रानचें वारें, आपल्या गानोत्सुक सुस्वरानें यावेळीं राजांना आनंदित करण्याऐवजीं, दुःखपूर्ण सुस्काऱ्यांनीं विव्हल करी, राजे टेबलावरच्या बत्तीकडे सारखे पहात पहात विचार करीत होते. कैकतऱ्हेचीं रानांतलीं कैंब्री व घुंगुरडीं दिव्याभोंवतीं जमलीं होतीं. मोठासा रंगीबेरंगी पतंग, मध्येंच, ज्योतीवर झडप घाली व बिचारा प्राणास मुकून, त्याचें तें मजेदार मखमाली शरीर दिव्याच्या आगीनें चिमणीच्या कांचेंत तसेंच भस्म होऊन सांचून राही; पण हीं पतंगाची कृति निर्हेतुकपणें राजांच्या सूक्ष्म अवलोकनांतून जात असतां एकदम त्यांना त्याचेंच अनुकरण करण्याची बुद्धि झाली कीं काय कोण जाणें ! तत्क्षणीं ते उठले, त्याणी सरकारी रुपये मोजले व गाडी जातांच पुढें एक वाजेपर्यंत गाडी नसल्यामुळें, पतंगाप्रमाणें सरकारी शंभर रुपयांच्या रकमेवर झडप घालून, तिच्यायोगानें अलभ्यलाभाची जोड जोडण्याचा आपला निश्चय अमलांत आणला. भुरळ घालणाऱ्या द्रव्यलोभाच्या विचारांत मागचापुढचा पोंच उरला नाहीं. एका अलभ्यलाभाच्या विचाराशिवाय राजांना कांहींएक दिसत नव्हतें. नागोबांनीं विधिपूर्वक शंभर रुपये स्वाहा करून बिळाचा आश्रय केल्यावर, राजांना दुसरे दिवशीं तितक्या पुतळ्यांचा हंडा घेऊन जाण्यास सांगून, बावाजी मोकळे झाले.

हातची रकम गेल्यावर मग कोठें राजे शुद्धीवर येऊं लागले; पण वनदेवीच्या देवळांत रेंगाळण्यास त्यांना वेळ नव्हता. गाडीची वेळ होत आल्यामुळें स्टेशनावर जाणें फार जरूरीचें होतें. काळोखी रात्र, एकाचा अम्मल, गुडुप् अंधेर, आकाशांत हिऱ्यासारख्या चांदण्या चमकत नव्हत्या असें नाहीं; पण राजाच्या मनांत सरकारी रकम वापरून येणारे, पापबुद्धीनें भीतिप्रद काळेकुट्ट ढग, जणों काय, वर आकाशांतच मधून मधून दृश्य

रूपानें भ्रमण करीत असल्यामुळें, काळोखाची काळोखी क्षणोक्षणीं अनिश्चितपणें कालरूप धारण करून राजांचा थरकांप करून सोडी. अशास्थितीत राजांना येथेंच सोडून आपण वनदेवीकडे वळूं.

देवीच्या गाभाऱ्याचे दारास बाहेरून पक्की कडी घातली असून, आंतून बावाजी दाराच्या कमलाकार भोंकांतून बाहेर पाहत पाहत चडफडून मोठ्यानें ओरडत होते:- " अरे चांडाला, मला आंत कोंडून तूं हें बाहेर काय आरंभलें आहेस ? तो सर्प तुला गिळील. व्यर्थ मृत्यूच्या जबड्यांत कां हात घालतोस ? " बाहेर एक गृहस्थ बावाजींचें अनुकरण करून, धुमीखालची जागा मोकळी करून, बोवांप्रमाणें पाय आपटून, तो कालसर्प वर येण्याची वाट पहात होता. बावाजीस शांतपणें उत्तर देऊन तो ह्मणतो:-" मी एक महारोगी आहे. जग मला कंटाळलें व मी जगाला कंटाळलों. भाऊबिजेसाठीं बहिणीकडे जातों आहे. वाडीहून येतां येतां येथेंच दिवस मावळला व पायही दुखूं लागले. दुकाळ्यानें देवीमागे घाणेरडा देह लपवून रात्र काढावी ह्मणून पडून होतों. तों सहजी सारा प्रकार दृष्टीस पडला. तुह्मीं काढलेला भुजंग मीं पाहिला. मला मृत्यूचें भय वाटत नाहीं. तसेंच नागोबाचें द्रव्यही मला नको; पण हा सर्प मला चावून, माझा महारोग जावा, किंवा एक मृत्यु तरी यावा एवढाच माझा हेतु आहे. आपण देवीचें ध्यान करीत स्वस्थ असा. मी हा आपला जिवावरचा तोडगा करून सोक्षमोक्ष करून घेतों. "

काय चमत्कार ! नागोबा फुरकारत जबडा पसरून वखवखतच बाहेर आला; पण महारोग्यानें ' जयशंकर ' ह्मणून कडकडून फोडण्यासाठीं त्याच्या तोंडांत हात घालतांच, रुपयांच्या खळखळाटांत, पाताळलोकींच्या त्या सर्पानें आपली अवतारसमाप्ति करून, एक हुबेहुब सापासारखी, रुपयांनीं भरलेली, खरी निर्जीव पिशवी महारोग्याच्या हातीं आली ! काय हें रूपांतर ! खरा प्रकार तेव्हांच उघड झाला. सारा कळसूत्री खेळ. कमरेइतक्या खोल खड्ड्यांत गुरविली. पोलादी मजबूत स्प्रिंगवर साप व हंडा बसवून तोलपणें बावाजीच्या पायाखालीं विजेच्या ब्याटरीनें चालन साधलें होतें. विद्युत्प्रकाशानें नागोबाच्या तोंडांतून ज्वाला व डोळ्यांतून ठिणग्या दाख-

विण्याची योजना केली होती. हंड्यांत काळी माती ठेंचून भरली असून वर तोंडाच्या शिगेला पन्नास खऱ्या अस्सल पुतळ्या बेमालूमपणें दर्शनी बसविल्या होत्या. इच्छित रक्कम नागोबाचे मुखीं पडतांच संधी साधून, या खऱ्या पुतळ्या अजीबात काढून घेऊन, रुपये लांबवून, बावाजी आपल्या कळसूत्रासह अदृश्यच व्हावयाचे, पण यावेळीं भाऊरावांनीं सवडच सांपडूं दिली नाहीं. यामुळें खरोखरच अलभ्य लाभ झाला. राजांना एक जगाचा धडा मिळाला. भाऊबीज मोठ्या थाटानें झाली. बहिणाबाईला पुतळ्यांच्या माळेची ओंवाळणी भाऊरावांनीं घातली. बावाजी सर्वस्व जाऊन कसेबसे पार झाले. पुढें लौकरच एका राजवैद्यानें भाऊरावाच्या रोगाची खरी परीक्षा करून, तो कच्च्या रसायनाचा परिणाम, आपल्या दिव्यौषधीनें नाहींसा करून, भाऊराव खडखडीत बरे झाले. राजाच्याच वशील्यानें हल्लीं ते कोठेंसे छोट्या गुड्समास्तराचे कामावर आहेत.

---

## फुलांचा उपयोग.

( चाल—अंकित पदांबुजाची दासी. )

पुष्पाविण तें काय जगाचें । नडतलें, कळे नच साचें ॥ ध्रु० ॥
वट औदुंबर, पिंपळ पिंपर । फूल दिलें नच त्याचें ॥ १ ॥
तरी धरित्री, ईश्वर सूत्रीं । पिकतां कांहीं न वेचें ॥ २ ॥
क्षेम चालवी, पुष्पाभावीं । विश्वंभर सकलांचें ॥ ३ ॥
जीवारोग्या, श्रमसुख भाग्या । ईशकृपें नामे कैंचें ॥ ४ ॥
निपजे कांतर कुसुम मनोहर । इंद्रचाप रंगाचें ॥ ५ ॥
रात्रंदिन तें, किती तरि फुलतें । हास्य जणूं बालाचें ॥ ६ ॥
फार उंच गिरि, बहु खोल दरी । कुम बहर कां खेचे ॥ ७ ॥
शून्यस्थानीं, खुलती फुलुनी । वारें नच मनुजाचें ॥ ८ ॥
बाह्य वृत्तिला, फलु मनुजाला । कारण नच कुसुमाचें ॥ ९ ॥
मनीं प्रेरिती, परि हर्ष किती । नग हे भूदेवीचे ॥ १० ॥
प्रसन्नरूपी, सहज अपापी । जीवन हें आशेचें ॥ ११ ॥
भक्ति भाव जरि, चंचलता धरि । स्थैर्य होंचि धीराचें ॥ १२ ॥
देव दूत हे, सुंदर पाहे । आश्वासन जगताचें ॥ १२ ॥
हीच शिफारस, लावुनि मानस । वळवूंया देवाचें ॥ १४ ॥

"दर्भ"

---

## कर्तव्य.

श्रीयुत पाण्डेय लोचनप्रसाद शर्मा यांनीं वरील नावानें उडिया भाषेत कांहीं श्लोक कलकत्याच्या देवनागर मा. पु. प्रसिद्ध केले आहेत त्यांपैकीं ४ श्लोक आज आह्मीं आमच्या वाचकांकरितां येथें देत आहों—

कर्तव्य है उन्नतिका आधार । कर्तव्य है ज्ञान-विवेक-द्वार ॥
कर्तव्य ही है सुखशांति-मूल । कर्तव्यको भ्रात! कभी न भूल ॥ १ ॥
ब्रह्मा यही, विष्णु यही महेश । है, सिद्धिका मूल यही गणेश ।
ब्राह्मी यही है गुरु, तात मात । कर्तव्य पूजा कर नित्य भ्रात! ॥ २ ॥
दारिद्र्यका दुःख यही मिटाता । है मूर्खताको यह शीघ्र खाता ।
आत्मोन्नति है द्वार यही दिखाता । यही सुखी है सबको कराता ॥ ३ ॥
कर्तव्यका जो करते न प्यार । वे हैं महामूढ समाज भार ।
भूखों मरे कष्ट सहैं अपार । रोते फिरें वे नित द्वार द्वार ॥ ४ ॥

## गहाणदारांकरितां ३१ वें कलम.

हिंदुस्थानसरकारनें नुकताच नवीन मुदतीचा कायदा पास केला आहे, त्यांतील कलम ३१ सावकारास फारच महत्वाचें असल्यामुळें तें याखालीं देत आहों. “ ३१—गहाणदारानें गहाण लहान अगर नष्ट करण्याचा किंवा गहाण मिळकत विकून मागण्याचा दावा, हा आक्ट पास झाल्याचे तारखेपासून ह्मणजे ७ आगष्ट १९०८ पासून २ वर्षांत अगर गहाणाची रकम येणें झाल्यापासून ६० वर्षांच्या आंत; ह्या दोहोंपैकीं जी मुदत प्रथम संपेल त्या मुदतींत करावा. ६० वर्षांचे आंत केलेला दावा हा आक्ट पास झाला त्यादिवशीं अवल किंवा अपलिकोर्टांत चालू असेल तर १२ वर्षांच्या मुदतीचे सबबीवर रद्द केला जाणार नाहीं.

( २ ) ता. २२ जुलई १९०७ चे नंतर आणि हा आक्ट पास होण्यापूर्वीं अव्वल अगर अपीलकोर्टानें ६२ वर्षांच्या मुदतीचे सबबीवर दावा अंशतः अगर सबंध रद्द केला असेल तर अगर काढून घेतला असेल तर तो दावा त्या कोर्टास अर्ज केला असतां पुनः फैलावर घेतला जाईल. मात्र असा अर्ज हा आक्ट पास झाल्यापासून ह्मणजे ता. ७ आगष्ट १९०८ पासून ६ महिन्याचे आंत केला पाहिजे ” गहाणदारांनीं ह्या कलमाकडे लक्ष द्यावें.

## सद्यःस्थिती.

( लेखक-बेडेकर. )

रेसीम ह्मणजे एका किड्याची विष्टा, त्याचा असतो मुकटा, तो ह्मणे सोंवळा मोठा, जेवतांना नाहीं नेसलं तर कुळाला लागेल बट्टा पण हाच जर परधर्माभिमानी कट्टा तर करील कशाला पुण्याईचा सट्टा, कोणी केली कुचेष्टा, तर ह्मणे करितात चेष्टा, आणि घरचं खाऊन दुसऱ्याची बाळगतो कोण प्रतिष्टा, ज्याची जशी निष्टा, तशीच त्याची मानप्रतिष्टा !

२ धोतरांऐवजीं पाटलोणी, अंगावर असली तर उपरणीं नाहींतर पर्शियन कोटाचीच पुरे आहे छानी असें मनांत आणी, आणि कोणी उपदेश केल्यास शिरा ताणी मग पालथ्या घड्यावरच नाहीं कां पडलें पाणी ?

३ संगीत नाटकें, मनोरंजक चुटके, शीघ्र कवीचे फटके वाचून रोज घेतो घुटके पण भगवद्गीता वाचायचं मनांत येत नाहीं यावरून नशीबच नव्हे कां फुटकें !

४ कसलाही असो तमाशा, याला बघण्याची आशा, आपल्या घरचाच खाकेस मारतो गाशा, आणि जिथें चाललेला असतों हंशा तिथें जागा मिळण्यासाठीं काढतो उठाबशा जागा नच मिळाली तर जातो परत ह्मणे झाली निराशा. पण दुसरीकडे असलें वेदांतपर कीर्तन; त्याचें आलें असलें जरी अगत्याचें आमंत्रण तरी जायला घेत नाहीं मन ! कारण स्वाधीन आहे कुठें तन मन धन.

५ सूर्योदय झाला न झाला तोंच तयार पाहिजे चहाचा पेला, असा हुकूम घरांत फिरविला, कारण डॉक्टरनेंच अभिप्राय दिला कीं तबियत ठीक राहावयाला, हाच उत्तम उपाय पहिला, हा जसा उपाय योजला तसा "केस्तु" करून ब्राम्हणकर्माची बिगार टाळण्याचा क्रम कां नाहीं फिरवला पण हें कोठून सुचायला, कारण तुर्त नाहींना कोणी जाब विचारायला !

६ भररस्त्यावर घेतो हवाशीर बंगला, मग गोळा करितो मित्रांला, सोडावॉटरचा खर्च सुरू केला, मुळीं सीमाच नाहीं त्याला, चिरुटाच्या नळ्यांला उत आला, त्यांतच एखादा वरिष्ट असला ह्मणजे मग विचार कसला; [illegible]रण

धक्का बसेल नोकरिला ! हा जसा योग्य खर्च झाला तसा एक ब्राह्मण कां सांगूं नये पंक्तीला पण हें कोठून सुचायला !

७ जुन्या चाली रीति त्यांची वाटे खंती, वडील माणसांची भीती, मुळीं आणीनाच चित्तीं, स्त्रीस उपदेश करी एकांतीं, तूं फिरावयास येत जा मज सांगातीं, मी पाहून घेईन ज्ञातान्यांची काय चालते बडबड ती, मुळीं तुझी समजूतच कोती, तूं माझी स्त्री आणि मी तुझा पती फुकाची आहे श्रीमंती, आहे चलती, मग कां करावं कमती ! यांची कशांत करावी गणती !

८ चोळी ऐवजीं जाकीट, नेसायला घे चीट, बुंकवाची लाव बारीक तीट, हेंगाड्या वेणीचा येतो वीट, तर कुचडा घाल फीट, तूं व्हावेंस संसारांत धीट ह्मणून आईची पिटपिट बापाची किटकिट ऐकून न घेतां करतों मार पीट तरी समजेना कसं नीट !

९ स्मरणशक्ती कमी झाली, ह्मणून बाटल्यांतलीं रंगीबेरंगी औषधें सुरूं केलीं, धर्ममर्यादा नाहीं संभाळली, कारण शरीर रक्षी तो धर्म ही ह्मण तोंडपाठच होती केली, ती वेळेलाच पुढें काढली पण स्मरणशक्ती किती वाढली ह्मणून जर शंका आली असली तर बापाची श्राद्ध तिथी विसरली एवढी गोष्ट सांगितली ह्मणजे होईलना खात्री आपली. गोष्ट आहे नकली पण अक्कल विकली ह्मणून सांगण्याची भीड नाहीं वाटली !

१० गळ्यांत यज्ञोपवीताची पंचकडी, साफ करतो लावून साबूची वडी, डोक्यावर नाहीं शेंडी, कारण तिची आवडच थोडी, ह्मणून ती पार काढी, शास्त्राला देईना थारा, फॅशनेबल ठेवायला पाहिजे चेहरा, त्याशिवाय खुलतच नाहीं मोहरा जिकडे भरेल दरा तोच गांव बरा, गंध लावायचा मुळिंच तिटकारा, भस्माचा नको वारा यांना काय ह्मणावयाचें याचा विचार करा, योग्य नांव दिसलें तर हांक मारा नाहीं तर बसेल फटकारा !

---

सूचनाः—मागच्या अंकांतील कूटाचें उत्तर पुढील अंकीं देण्यांत येईल. सदरहु पद्यकूटाच्या पहिल्या चरणांत उलट तेच लक्ष्मीसुता असें आहे त्याठिकाणी " उलट पेच लक्ष्मी " सुता असी दुरुस्ती करून वाचावें.

प्रकाशक.

## रमणीय वेंचे.

(मागील अंकावरून पुढे चालू.)

वाटेल त्या मार्गानें द्रव्य प्राप्त करून घेणाराला गुरु किंवा प्रत्यक्ष भाऊ असला तरी तो तें नातें ओळखीत नाहीं. जो कामातुर झाला त्याला कशाचें भय अथवा लाज वाटत नाहीं. ज्याला अतिशय भूक लागली आहे तो अन्नाची रुची पाहात नाहीं व तें कच्चें किंवा हिरवें आहे याचाही पण विचार करीत नाहीं आणि जो रात्रंदिवस काळजी वाहात असतो त्याला कशापासूनही सुख होत नाहीं व निद्राही लागत नाहीं.

लुब्धानां याचकः शत्रुर्मूर्खाणां बोधको रिपुः ।
जारिणी । पतिःशत्रुश्चोराणां चन्द्रमा रिपुः

धनलुब्ध जो मनुष्य त्याला याचक शत्रु असा भासतो मूर्खाला त्याच्या हिताच्या गोष्ट सांगणारा वैऱ्या सारखा भासतो. जारकर्मी स्त्रीला तिचाच पति शत्रूसमान वाटतो, आणि चोरांना चंद्रमा शत्रुप्रमाणें दिसतो.

ज्वरादौ लंघनं प्रोक्तं ज्वरमध्ये च पाचनम् ।
ज्वरान्ते भेषजं दद्यात् सर्वज्वरविनाशनम् ॥ ४४ ॥

ताप (ज्वर) आला असतां लंघन (उपोषण) करावें हे योग्य त्याच्या मध्यमावस्थेंत पाचन (काढाकोरे) द्यावे, आणि शेवटीं सर्व ज्वराचा नाश करणारें असें औषध द्यावें.

जामाता कृष्णसर्पश्च पावको दुर्जनस्तथा ।
विश्वासो नैव कर्तव्यः पञ्चमो भगिनीसुतः ॥ ४५ ॥

जावई, काळा सर्प, अग्नि दुष्ट मनुष्य व पाचवा भाचा याचा विश्वास धरूं नये

सदावक्रः सदा रुष्टः सदा पूजामपेक्षते ।
कन्याराशिस्थितो नित्यं जामाता दशमो ग्रहः ॥ ४६ ॥

सदोदीत वाकडा, सदैव रुसणारा, नेहमी आदरातिथ्याची इच्छा करणारा असा जो जांवई तो कन्या राशीला दहावा ग्रहच होय.

यस्य नास्ति विवेकस्तु केवलं यो बहुश्रुतः ।
स न जानाति शास्त्रार्थान् दर्वी पाकरसानिव ॥ ४७ ॥

जो केवळ बहुश्रुत मात्र असतो तो सारासार विचार जाणतोच असें नाहीं, व त्याला शास्त्रांचा अर्थही कळतो असें नाहीं. ज्याप्रमाणें पाक ढवळण्याची पळी त्या पाकाची गोडी कांहींच जाणूं शकत नाहीं.

दुर्जनं प्रथमं वन्दे सज्जनं तदनन्तरम् ।
मुखप्रक्षालनात्पूर्वं गुदप्रक्षालनं यथा ॥ ४८ ॥

दुष्ट मनुष्याला सज्जनाच्या पूर्वी वंदन करावें. कारण (सज्जनांना मागाहून वंदन केलें तरी त्यांना क्रोध येणार नाहीं) जसें तोंड धुण्यापूर्वी गुद प्रक्षालन करावें लागतें.

शकटं पञ्च हस्तेन दश हस्तेन वाजिनम् ।
गजं हस्त सहस्रेण देश त्यागेन दुर्जनम ॥ ४९ ॥

गाड्यापासून पांच हाताच्या अंतरानें, घोड्यापासून दाहा हाताच्या अंतरानें, हत्तीपासून सहस्र ह्मणजे (हजार) हाताच्या अंतरानें चालावें आणि दुर्जन ज्यांत राहतो तो देशच सोडून जावें.

सर्वोपनिषदोगावो दोग्धा गोपालनन्दनः ।
पार्थोवत्सः सुधीर्भोक्ता दुग्धं गीतामृतं महत् ॥ ५० ॥

सर्वे उपनिषदें हीच कोणी एक गाय, तिचें दूध काढणारा श्रीकृष्ण भगवान् आणि पृथापुत्र जो अर्जुन हा त्या गाईचें वत्स ( वासरूं ) गीतामृत हें दूध होय.

अलंकारप्रियो विष्णुर्जल धाराप्रियःशिवः ।
नमस्कारप्रियो भानुर्ब्राह्मणो भोजनप्रियः ॥ ५१ ॥

श्रीविष्णुला अलंकार प्रिय, श्रीशंकराला अभिषेक प्रिय, सूर्यनारायणाला नमस्कार प्रिय आणि ब्राह्मणानां भोजन प्रिय असतें.

क्षान्तितुल्यं तपो नास्ति संतोषान्न सुखं परम् ।
नास्ति तृष्णासमो व्याधिर्न च धर्मो दयापरः ॥ ५२ ॥

शांतीसारखें दुसरें तप नाहीं. संतोषासारखें सुख कशातही नाहीं. आशेसारखा दुसरा रोग नाही आणि दयेपेक्षां दुसरा श्रेष्ठ धर्म कोणताच नाहीं

नान्नोदकसमं दानं न तिथिर्द्वादशी समाः ।
न गायत्र्याः परो मन्त्रो न मातुः परदैवतम् ॥ ५३ ॥

अन्नोदकासारखें दुसरें दान नाहीं. द्वादशीसारखी दुसरी तिथी नाहीं. गायत्री मंत्रासारखा दुसरा मंत्र नाहीं आणि जन्मदात्या आईच्या तोडीचें अन्यदैवत नाहीं.

आयुर्वित्तं गृहच्छिद्रं रहस्यं मन्त्रमौषधम् ।
तपो दानावमानौ च नव गोप्यानि कारयेत् ॥ ५४ ॥

आपलें आयुष्य, संपत्ति, घरांतील उणेपणा, गुप्तगोष्ट, मंत्र, औषध, तप, दान आणि अवमान हीं गुप्त ठेवावीं.

नराणां नापितो धूर्तः पक्षिणां चैव वायसः ।
चतुष्पदां शृगालस्तु स्त्रीणां धूर्ता च मालिनी ॥ ५५ ॥

मनुष्यांत न्हावी धूर्त असतो, पक्षांत कावळा धूर्त असतो, चतुष्पाद जनावरांत कोल्हा धूर्त व स्त्रियात माळीण धूर्त असते.

पिता रक्षति कौमारे भर्ता रक्षति यौवने ।
पुत्रो रक्षति वार्धक्ये न स्त्री स्वातन्त्र्यमर्हति ॥ ५६ ॥

कौमार्यावस्थेंत कन्येचें रक्षण पिता करितो, तारुण्यात नवरा रक्षण करितो व ह्मातारपणीं पुत्र तिचें रक्षण करितो, एकूण स्त्रियांला स्वातंत्र्य ह्मणून नाहीं.

( अपूर्ण )

# अंकास उशीर कां !

नियमितपणांत जी एकप्रकारची बूज व शिस्त असते तिचें महत्व आज नव्यानें कोणास सांगावयास पाहिजे असें नाहीं. कोणत्याही कामांत नियमितपणा असला म्हणजे तें काम देखिल सर्वांस मान्य होतें. सृष्टींतील एकंदर घडामोडी ह्या बहुमोल नियमितपणाच्या गुणामुळेंच आजतागायत अबाधित चालत आहेत. कोणत्याही गोष्टींतला एकदां नियमितपणा चुकला ह्मणजे त्यांतील स्वारस्य अगदीं नाहींसारखें होतें. अविश्वास उत्पन्न होतो. एखादा इसम जर नियमाबाहेर आहारविहार करील तर त्यास अजीर्ण, पोटदुखी इत्यादि रोगांनीं पछाडलेंच ह्मणून समजावें ! ज्यावेळीं जी गोष्ट व्हावयाची अथवा करावयाची–मग ती ईश्वरनिर्मित असो किंवा मनुष्यनिर्मित असो,–ती त्याचवेळीं झाली पाहिजे किंवा केली पाहिजे. असा हा व्यवाहारांतला सार्वत्रिक नियम आहे आणि म्हणूनच ‘ मित्रा ’ नेंही आलिकडे ह्याच सर्वमान्य नियमाचें अवलंबन करण्याचा निश्चय केलेला आहे. पण मध्यंतरी शरीरप्रकृतींत थोडी विकृति उत्पन्न झाली म्हणजे एखाद्या वेळीं नियमितपणा चुकतो व शरीरप्रकृतीच्या अनुरोधानें वागणें भाग पडतें, आणि त्याचा अनियमितपणा

जसा क्षम्य मानला जातो तद्वतच ' मित्रा ' चीही थोडीबहुत सांप्रत स्थिती झाली आहे. मुख्यतः वृत्तपत्रें व मासिक पुस्तकें, सुरळीतपणें निघण्याला साधन सामुग्री चांगली असावी लागते. छापण्याचें यांत्रिक साहित्य उत्तम नाहीं तरी मध्यम प्रकारचें असलें व काम करणारे कारागीर त्याविषयांतील दर्दी असले ह्मणजे कामही वेळेवर सुबक निघतें. साहित्य असलें तर कुशल कारागीर नाहींत, व कारागीर असले तर साहित्य धड नाहीं, अशी मधलंड स्थिति झाली म्हणजे जेमतेम कसेंतरी काम करून गरज भागवून घ्यावी लागते. आतां जंगजोड सारखा जमण्यास द्रव्यबळ. मनुष्यबळ, व परिस्थिति, हीं अनुकूल पाहिजेत ही गोष्ट उघड आहे पण ह्या तिन्हीं बाबतीसंबंधानें ' मित्रा ' ची स्थिति असावी तशी समाधानकारक नाहीं हें अत्यंत खेदानें कबूल केलें पाहिजे. अगदीं पहिल्या-लहान प्रमाणांत ' मित्र ' जेव्हां अस्त्विांत आला तेव्हां त्याला स्वतःच्या पायावर उभे राहण्याचें मुळींच त्राण नव्हतें; पण त्याच्या प्रेमळ आश्रयदात्यांच्या पूर्ण सहानुभूतिनें व परमेश्वर कृपेनें अगदीं थोड्याकालांत म्हणजे अवघ्या ४।६ वर्षांत ' मित्र ' स्वतःच्या छापखा-न्यांत निघण्याइतकें सामर्थ्य त्यास आलें. इतक्यांत मुख्य नियंत्यावर निर्घृणकाळानें अकालीं झडप घालून

ओढन नेल्यामुळें त्याचा मुख्य आधारस्तंभ खुंटल्या-सारखा झाला तरी पण अशा प्रकारच्या मध्यंतरी आलेल्या अनेक अडचणींतून त्यानें आपलें डोकें वर काढून आज सतत १०।१२ वर्षें आपल्या प्रेमळ आश्रय-दात्यांकडे तो भेटीस जात राहिलाच व त्याच्या ओबड-धोबड स्वरूपाकडे फारसें लक्ष्य न देतां त्याचें संगोपन करण्यांत प्रीय आश्रयदात्यांनींही मुळींच कसूर केली नाहीं आणि यापुढें करणारही नाहींत हें तो पूर्णपणें जाणून आहेच; तथापि अनेक तऱ्हेनीं आपल्या आश्रित वर्गाची सेवा करून त्यांची मर्जी सुप्रसन्न राखण्यास जर का ' मित्रा ' नें कसूर केली तर कदा-चित् त्याजवर कृतघ्नपणाचा आरोप येऊं लागेल व तो त्याच्या मानी स्वभावास मुळीं आवडणारही नाहीं ह्मणून आपण आपली होईल तितकी अंतर्बाह्यांगांत सुधारणाकरून चांगल्या स्वरूपांत आपल्या आश्रदा-त्याच्या भेटीस जाणें हें आपलें कर्तव्य होय. असें त्यास वाटूं लागल्यामुळें त्याच्या इच्छेचा भंग न होऊं देण्याविषयीं आह्मींही जारीनें खटपट चालविली आहे.

यापूर्वीं मित्राचा अंक ह्याँडप्रेसावर निघत असे, पण आता यापुढें तो चांगल्या मशिनवर उत्तम नव्या टाइपांत सुबकपणें निघूं लागेल. कारण त्याचेकरिता एक उत्तम प्रिटिंग मशीन आणविली असून टाईपही

नवीन आणविला आहे व त्याचसाठीं आम्हांस मुंबई वगैरेकडे जावें लागल्यामुळें प्रस्तुत अंकास थोडा उशीर झाला आहे तरी मुख्य सुधारणेची बाजू लक्षांत आणून त्याबद्दल वाचकांनीं क्षमा करावी अशी नम्र विनंति आहे. आतां स्वतःची सांपत्तिकस्थिति अनुकूल नसतां व अनेकप्रकारच्या खर्चाची झीज सोसूनही हा जो इतका मोठा भार उचलण्याचें आम्हीं धाडस केलें आहे, तें केवळ मित्राचा चांगुलपणा वाढून दिवसेंदिवस शक्य तितकी त्याची सुधारणा व्हावी आणि त्याजवर त्याच्या प्रीय आश्रयदात्यांची मर्जी प्रसन्न राहावी, म्हणून होय. तरी 'मित्रा' च्या हितचिंतकांनी कृपा करून त्याला एक एक नवीन वर्गणीदार मिळवून देऊन, अथवा आह्मीं प्रसिद्ध केलेल्या व पुढें करणाऱ्या उपयुक्त व संग्रहणीय अशा कलावैभव, योगराजचिंतामणी, भगवद्गीता, इत्यादि पुस्तकांतून एखादें मागवून आह्मांस प्रस्तुत भारांतून थोडेंतरी हलकें करावें, आणि अशारितीनें मुद्रणकलेसारख्या स्वतंत्र धंद्याला उत्तेजन दिल्याचें श्रेय संपादावें, इतकीच आमची सर्वांपाशीं नम्र विनंति आहे. परमेश्वर आमच्या आश्रयदात्यांस सुखी ठेवो व त्यांजकडून मित्रद्वारें लोकसेवा घडो; इतकीच प्रार्थना आहे ती तो विश्वंभर पूर्ण करो.

प्रकाशक.

# संग्राह्य पुस्तकें.

**कलावैभव किंवा उद्योगशाला:**—आवृत्ति तिसरी लोकमित्र साइजचीं पृष्ठें ४४२ किं. व्ही. पी. सह दीड रुपया. प्रती अगदीं थोड्या आहेत.

**श्रीयोगराजचिंतामणी:**—सार्थ वैद्यक सात प्रकरणाचा नवीन ग्रंथ. याचा कर्ता श्रीहर्षकीर्तिसूरी नांवाचा जैनपंडित आहे. पाक, गुटिका, चूर्णे, काढे, मात्रा, तैले-घृतें, व मिश्राधिकार असे सात अध्याय किं. व्ही. पी. सह १॥ आणे.

**श्रीमद्भगवद्गीता:**—वैष्णव लोकांनी व इतर विद्वमान्यांनी आश्रय द्यावा. द्वैतसिद्धांताला अनुसरून मराठी भाषेंत अशा प्रकारचा ग्रंथ दुसरा नाहीं. मूळश्लोक, संस्कृत व्याख्या आणि मराठी तात्पर्यार्थ यांनी युक्त असल्यामुळें सर्वांना उपयोगी आहे. अध्यायानुक्रमाणिका आणि मध्वाचार्यादि चित्रेंही आहेत. व्ही. पी. सह किंमत १॥१० पडेल.

**नवा जादूगार किंवा जादूगाराचा शिक्षक**—यांत भाषण, कृति आणि १५४ खेळ आहेत. आमिनोदिन बाळाभाई कंट्राक्टर आटपाडी-सातारा हे १९।१०।०८ चे पत्रानें कळवितात. जादूगाराचें पुस्तक मागविलें आहे तें फारच उत्तम असून खऱ्या खऱ्या दाखल्याचें आणि उत्तम आहे. असो. पृष्ठें १३२ किं. व्ही पी. सह ॥९ आणे.

**तारुण्यविलास किंवा यौवनसाम्राज्य**-पाक, गुटिका, चूर्णे, सुगंधिक उटणी, मुखरंजनादि प्रकार, वीर्यवर्धक कित्येक उपाय वगैरे माहिती. तरुण स्त्रिपुरुषांच्या उपयोगाची आहे. किं. व्ही. पी. सह ॥५ आणे.

**लाट**-संगीत **शिवाजीविजय नाटक** किं. ॥१२ आणे, **नंदकुमार नाटक**-फारच सुरेख आहे. किं. ॥१२ आणे, संगीत **सुनिश्चयप्रभाव नाटक**-किं. ॥१२ आणे.

**सूचना**—हीं तीन नाटकें व्ही. पी. सह दिजंबर अखेरपर्यंत १ रुपयास मिळतील.

**लोकमित्र ( मा. पु. )** वर्षारंभ जुलैपासून. पाहिल्या अंकांत लो. बाळ गंगाधर टिळक, दुसऱ्यांत महादेव मो. कुंटे, तिसऱ्यांत परशुरामपंततात्या

गोडबोले, चवथ्या पांचव्यांत नाना फडणवीस यांचीं चरित्रें आलीं असून प्रसिद्ध लेखक दर्भ यांच्या गोष्टी, आणि इतर लेखकांचे लेख आहेत. यापुढें फारच सुधारणा होणार आहे.

नवीन वर्गणीदारांस आरंभापासूनचे अंक मिळतील. व्ही. पी. सह १॥ पोष्टांत भरावा लागतो. **विक्रमपृथ्वीपर्यटण** ( पृष्ठें १३२ ) आणि **कुमुदसुंदरी** अशा दोन कादंबऱ्या फुकट मिळतील. नवीन एक वर्गणीदार जमवून देणारांस **वैद्यप्रभाव** किंवा **रामबाण उपाय** हें पुस्तक फुकट मिळेल. मित्राच्या हितचिंतकांनी यावेळीं मदत करावी अशी विनंती आहे.

## स्त्रियांचा सुबोध करमणूक.

( किं. व्ही. पी. सह ॥८ आणे )

मुलींचे खेळ, मुलींकरितां उपदेशपर धडे, सिमांतिनी अख्यान, तुळशी अख्यान, मंगलागौरी अख्यान, मकरसंक्राती, सीतलासप्तमी, हारितालिका, ऋषीपंचमी, सोमवती वगैरे कथा, स्त्रियांकारितां मनोरंजक गाणीं, पाळणे, आरत्या, भूपाळ्या, पदें, म्हणी, बाळंतपण, गरवारपण वगैरे विषयांवर लेख आहेत. प्रत्येक पुरुषानें या पुस्तकाची एक प्रत आपल्या प्रिय पत्नीस नजर करावी. पृष्ठें १६४ किं. ॥८ आणे पण डिसेंबर अखेरपर्यंत व्ही. पी. सह ॥८ आणे. **पत्ता—लोकमित्रकर्ते पो० खानापूर जि० बळगांव.**

---

## पत्रांस उत्तरें.

**रामदास नारायण पाटील**—पिंगाणे—बाणपत्र वर्षाच्या वर्गणीनें मागविलें असतां त्यांनी फक्त बक्षीस बुक पाठवून १॥५ वसूल केले व आजवर बाण नाहीं किंवा पाठविलेल्या पत्रांस उत्तरें नाहींत असें कळवितात. बाणासंबंधानें अशीच ओरड आहे. ज्यांनी या बाणाचा विश्वास बाळगिला असेल त्यांस कळविण्याचें इतकेंच कीं, हा रामबाण नव्हे !

श्रीधर शामराव वळसंगकर- गुलबर्गा आपला ' विजापूर येथील प्रेक्षणीय मशीद ' हा लेख पावला. मागें आमच्या अंकांत प्रसिद्ध झालेलीच बहुतेक माहिती आहे. नवीन लेख पाठवाल तर अगत्यपूर्वक प्रसिद्ध करूं.


रामचंद्र बाळाजी कुलकर्णी मनगोळी. बक्षीस पुस्तकांसंबंधीं अभिप्राय पावला. फार आभारी आहों.

---

प्रकाशक.

# कडबा कापण्याचे यंत्राच्या

## उपयुक्ततेविषयीं मुंबई सरकारचा अभिप्राय.



आमचे पेटेंट कडबा कापण्याच्या यंत्रांची आह्मीच प्रशसा करितों व विक्री होण्यासाठीं वर्तमानपत्रांतून कांहीं तरी उगीच भपकेदार जाहिराती देतों. अशी ज्यांची समजूत असेल त्यांनीं ता. २७ जून सन १९०८ चा नंबर ६४६८ चा सरकारी ठराव, रेविन्यु डिपार्टमेंट, प्यारा २ पहावा. त्यांत सरकारांनीं असें स्पष्ट ह्मटलें आहे कीं, कडबा कापण्याचें यंत्र वापरल्यापासून एक तृतियांश कडबा हटकून वांचतोच. ह्मणून मुंबई इलाख्यांतील सर्व कलेक्टर साहेबांनीं आपआपल्या रयत लोकांच्या हिताकरितां आमचे यंत्राचा उपयोग समजावून देऊन त्यांचा खप झपाट्यानें करवावा अशी सरकारांनीं स्वतः सूचना केली आहे.

गरीब शेतकऱ्यांना सुद्धां आमच्या यंत्राचा मुबलक फायदा घेतां यावा ह्मणून आह्मीं त्यांच्या किंमती ता. १ आगष्ट १९०८ पासून कमी केल्या आहेत. विशेष माहितीकरितां हस्तपत्रकें मागवा.

किर्लोस्कर बंधु—बेळगांव.

११-१२

बक्षिस! आर. टी एम्. कं० यांचा स्वदेशी!!

हीं संधी पुन्हाः **मेंथॉलार्क** येणार नाहीं.

**ह्या**मच्या धर्तीवर बनविलेला आणि डोक्याच्या भयंकर व्याधींतून मुक्त करणारा किं. प्र. बाटलीस ८४ आणे.

**ग**जकर्ण कोणत्याहि जातीचें व कितीहि जुनाट असल्यास फक्त ३ दिवसांत हटकून गूण किं. प्र. बाटलीस ८४ आणे.

**गु**लाबी क्यारबॉलिकटूथ पाउडरः—दांत दुखणें, हालणें, तिडीक, दंतशूल वगैरेवर गुणकारी पूड मोठ्या बाटलीस ४ आणे.

अलीकडे नकली औषधांच्या बऱ्याच जाहिराती फडकत आहेत आणि त्यामुळें ग्राहकलोक विनाकारण भपकेदार जाहिरातीस भुलून आपले पैसे नाहक खर्चताहेत परंतु आमचीं एकंदर औषधें पूर्ण गुणकारी असून स्वदेशी असल्याबद्दलची खात्री ज्यांनीं आमचें औषध एकच वेळ वापरलें आहे ते दुसऱ्या औषधास स्पर्शहि करित नाहींत हीच होय. जास्त प्रसंसा केल्यापेक्षां एकवेळ मागऊन खात्री करून घ्यावी बक्षीस एक डझन मागविणारांस लोकमित्र, आनंद, ज्ञानमित्र मासिक वर्षभर फुकट मिळेल. टपाल प्याकींग खर्च शिवाय. अ. पत्रक सोबत. उत्तम स्वदेशी साखर, कापूर, चहा, काश्मिरी केशर १ तोळा रु. १८= तमाखूचा सुवासिक जर्दा नं० १ बंशेरास रु. १

पत्ताः-सोल एजंटः—हिराचंद रेवचंद शेटजी
निपाणी, जि०-बेळगांव.

---

# सर्वसंग्रह.

४ थी आवृत्ति अगदीं नवीन उपयुक्त विषय घालून विद्वान् लोकांच्या मदतीनें छापण्याचें काम सुरू केलें आहे. प्रकरणवारीनें विषयांची योजना केली असून टैप नवा, कागद उत्तम, किंमत १। रुपयाचे आंत; तेव्हां अगावू नांवें कळवा. पत्ता—लोकमित्रकर्ते-खानापूर-बेळगांव.

# लोकमित्र.

## नाना फडणवीस.

( मागील अंकावरून पुढें चालू )

श्रीमंत माधवरावांचा स्वभाव दयाळू व उदार असून हे प्रजेचें यथान्याय पालन करण्याविषयीं झटत असत. पानपतच्या लढाईनंतर मराठी राज्य डबघाईस आलें असतां यांच्या हातांत राज्यसूत्रें आलीं ही सुदैवाचीच गोष्ट होय. शहाणपणानें बापाची व पराक्रमानें आजाची बरोबरी करण्याची योग्यता यांचे आंगीं होती. लोकमित्राच्या गतवर्षीच्या द्वितीय अंकांत आह्मीं यांचें साग्र चरित्र दिलें आहे तेव्हां त्यांजबद्दल आतां येथें जास्त लिहिण्याचें प्रयोजन नाहीं. विशेष जिज्ञासूनीं वाटल्यास गतवर्षीचा आगष्टचा अंक पहावा.

शके १६९४ सालीं श्रीमंत माधवरावांना दुर्धर राजयक्ष्मा नांवाचा रोग होऊन ते अगदीं शरपंजरीं पडले. अंतकाळीं त्यांनीं राज्यांतील मोठमोठे मुत्सद्दी, सरदार व आप्त इष्ट यांस थेउरास आपणासमीप बोलाविलें. सर्व मंडळी जमल्यावर ते ह्मणाले कीं माझ्या तीन इच्छा अपूर्ण राहिल्या आहेत. एक गिलच्यांचें पारिपत्य, दुसरी हैदराचें पारिपत्य आणि तिसरी ऋणविमोचन. मी मरण पावल्यावर हे माझे हेतु कोण पूर्ण करील? यावेळीं नानांनीं छातीला हात लावून श्रीमंतांची खातरजमा केली. ‘ या तिन्ही गोष्टींची काळजी करूं नये. आह्मीं त्या पार करितों. ’ व असें म्हणून त्यांनीं रामचंद्र नाईक परांजपे यांना पाठवून सावकाराकडचीं सर्व खतें आणविलीं व तीं आपल्या समक्ष फाडविलीं ! अशा छातीचे पुरुष खरोखर दुर्मीळ !

मार्गशीर्ष महिन्यांत श्रीमन्महाराज रामराजे यांनीं नारायणरावांस पेशवाईचीं वस्त्रें दिलीं. त्याचबरोबर सखारामबापूंस कारभाऱ्याचीं व नानांस फडनिसीचीं वस्त्रें पुन्हां मिळालीं.

नारायणरावांजवळ लहानपणापासून कोणी बाबाजी बर्वे या नांवाचा मनुष्य असे. त्यावर त्यांची इतकी मर्जी असे कीं, त्यांनीं त्या बरव्यास आपला मुख्य कारभारी नेमून त्याच्या मसलतीनें वागण्याचा क्रम ठेविला. हा बाबाजी अगदीं हलक्या किंमतीचा मनुष्य होता. त्याच्या चिथावणीवरून नारायणरावांचे हातून अनन्वित गोष्टी होऊं लागल्या. बापू व नाना यांचें कारभारांत कांहीं चालेनासें झालें; अर्थात् ते उदासीनच राहिले.

पुढें नारायणरावाचें काय झालें हें सर्व विश्रुत आहे. नानांस या प्रकरणाची गूणगूण कळली होती व त्यांनीं नारायणरावांस वेळींच साधन करण्याचा यत्नही केला पण होणाऱ्या गोष्टी टळाव्या कशा !

असो. नारायणरावांच्या दहाव्या दिवशीं पेशव्यांची आप्तइष्ट वगैरे मंडळी तिलांजुलि देण्याकरितां नदीवर गेली होती, तेव्हां नाना फडनवीस, सखाराम बापू, त्रिंबकराव मामा व हरिपंत फडके या चौघांनीं एकीकडे बसून वाळवेचीं लिंगें केलीं व त्यांवर हात ठेवून शपथ घेतली कीं, " नानासाहेब यांचा वंश चालवावयाचा, त्या वंशाशिवाय कारभार चालावयाचा नाहीं. " या ( दादा साहेबांच्या ) वंशास नमस्कार करावयाचा नाहीं.

याप्रमाणें चौघांनीं प्रतिज्ञा केल्यावर कांहीं दिवस लोटले. रघुनाथरावांस पदभ्रष्ट करण्याबद्दल नानांचा पक्का निश्चय झाला होता; तथापि या प्रचंड उद्योगास कोणकोणतीं साधनें अवश्य मिळविलीं पाहिजेत याविषयीं त्यांच्या मनांत विचार चालला होता. पुढें एकेदिवशीं रात्रीं नानाफडनवीसांच्या वाड्यांत खालील बाराजणांनीं जमून मनसोबा केला. ते बारा असामी येणेंप्रमाणें—

| | |
|---|---|
| १ नाना फडनवीस. | ७ आप्पाजी बळवंत. |
| २ सखारामबापू. | ८ कृष्णाजी बाहिरव थत्ते. |
| ३ त्रिंबकरावमामा पेठे. | ९ आप्पाजी पुरंदरे. |
| ४ नारो आप्पाजी. | १० हरी बल्लाळ फडके. |
| ५ बापूराव केशव. | ११ आनंदराव पानशे. |
| ६ विसाजी कृष्ण बिनीवाले. | १२ खासगीवाले. |

या बारा असामींनीं दादासाहेबांस धरण्याबद्दल यादी लिहून तिजवर रुकार घातले व गीता व गंगाजळी उचलून परस्परांच्या हातीं दिल्या. या

मुत्सद्यांच्या समुदायासच बारभाई ह्मणत असत. या बारभाईनीं मसलत ठरविली ती अशीः—" दादासाहेबांस धरून कैदेंत ठेवावें व सध्यां गंगाबाईच्या नांवाची राज्यांत द्वाही फिरवावी. पुढें तिला मुलगा झाला तर उत्तमच झालें. तसें न झाल्यास गंगाबाईस दत्तकपुत्र देऊन त्याच्या नांवें कारभार चालवावा. "

इकडे नारायणरावांचा खून झाल्याचें वर्तमान कळल्याबरोबर निजामअलीनें फौजेची सिद्धता करून मराठी राज्यावर स्वारी केली. त्याचें पारिपत्य करण्याकरितां इकडून दादासाहेबांची स्वारी निघाली. त्यांनीं नानाफडनवीस, सखारामबापू व दुसरे बारभाईतींल मुत्सद्दी यांस बरोबर नेलें होतें, ते पांच सात मजला झाल्यावर एकामागून एक आजारीपणाचा बहाणा करून परतले.

पुण्यास आल्यावर नानाफडनवीस यांनीं पार्वतीबाई ( भाऊसाहेबांची पत्नी ) व गंगाबाई यांस शनवारच्या वाड्यांतून काढून पुरंदरावर पाठविलें; व शहरच्या कोतवालास कैद करून गंगाबाईच्या नांवाची शहरांत द्वाही फिरविली. दादासाहेबांच्या पक्षाचे लोकांस धरून प्रतिबंधांत ठेविलें. गंगाबाई ही राज्याची मालकीण, तिचे कारभारी सखारामबापू व नानाफडनवीस यांच्या आज्ञेप्रमाणें सर्वांनीं वागावें, दादासाहेबांस गादीवरून दूर केलें असल्यामुळें त्यांचा हुकूम कोणी मानूं नये अशी नानांनीं सर्व राज्यांत दवंडी पिटाविली.

या पुण्यास झालेल्या खटपटी दादासाहेबांचे कानीं येतांच त्यांनीं तिकडे चालविलेलें मोहिमेचें काम तहकूब करून पुण्याकडे मोर्चा फिरविला. इकडे हरिपंत फडके, त्रिंबकरावमामा, साबाजी भोंसले व निजामअली हे आपापल्या फौजेसह दादासाहेबांवर चालून जात होते. त्यांपैकीं मामांची व त्यांची पंढरपुराजवळ गांठ पडून त्यांत मामांचा पराभव झाला. दादांनीं त्यांस कैद करून आपल्या समागमें घेतलें. यावेळीं आनंदीबाईनीं मामांस आपल्या बटकीकडून शेणाचे दिव्यांनीं ओंवाळविलें ! पुढें मामा लवकरच मरण पावले.

या जयामुळें दादांस उमेद येऊन त्यांनीं पुण्यावर चालून जाण्याचा बेत केला; परंतु यशापयशाची वानवा वाटल्यावरून शिंदे व होळकर यांची मदत मिळविण्याकरितां त्यांनीं बऱ्हाणपूरचा रस्ता धरिला. नर्मदा उतरून

ते इंदुरास गेले. तेथें महादजी शिंदे व तुकोजी होळकर यांनीं त्यांस भेटून यथाशक्ति मदत देण्याचें कबूल केलें.

इकडे पुरंदर मुक्कामीं गंगाबाई अधिकवैशाख शुद्ध ७ शके १६९६ या दिवशीं प्रसूत होऊन पुत्र झाला. त्याचें नांव सवाई माधवराव ऊर्फ सवाई रावसाहेब असें ठेविलें. सवाई माधवरावांचें समग्र चरित्र गेल्या वर्षी लोकमित्राचे ४ थे अंकांत दिलेलें आहे; अर्थात् त्यासंबंधीं येथें जास्त लिहिण्याचें प्रयोजन नाहीं.

मध्यंतरी बापू व नाना यांनीं शिंदेहोळकरांशीं गुप्तपणें पत्रव्यवहार सुरू करून त्यांस आपणाकडे वळविलें. हें दादासाहेबांस कळतांच त्यांनीं गुजराथेकडे पळ काढिला. सेनाधीश हरिपंत यांनीं त्यांचा पाठलाग केला. फत्तेसिंग गायकवाड यांचे साह्यानें हरिपंतांनीं दादांवर छापा घातला. त्यांत दादांचा पराभव होऊन त्यांस खंबायतेकडे पळ काढावा लागला. पुढें इंग्रजांनीं मदत देण्याचें कबूल केल्यावरून ते सुरतेस जाऊन राहिले.

इंग्रेजांस जें पाहिजे होतें तेंच झालें. हा मराठी राज्यांत सुरू झालेला गोंधळ पाहून त्यांना असें वाटूं लागलें होतें कीं, अर्काटच्या किंवा मुर्शिदाबादेच्या नबाबाप्रमाणें हे दादासाहेब जर आपल्या हातीं येतील,तर या बाहुलीच्या नांवावर आपण सगळें मराठी राज्य ग्रासून टाकूं !

असो. दादासाहेब व इंग्रेज या उभयतांत आमच्या स्वातंत्र्याची राखरांगोळी करणारा सुरतचा प्रख्यात तह झाल्यावर इंग्रेजांनीं कर्नल् कीटिंग याचे हाताखालीं सुमारें अडीच हजार फौज देऊन त्यास दादासाहेबांचे मदतीकरितां पाठविलें. इंग्रेज व दादासाहेब यांच्या फौजा पुण्यावर चालून येऊं लागल्या. त्यांच्याशीं तोंड देण्याइतकें सैन्य हरिपंताजवळ नसतांही त्यांनीं शत्रूच्या फौजेभोंवती घिरट्या घालून त्यांस चैन पडूं दिलें नाहीं. आरास नांवाचे गांवाजवळ मराठ्यांची व इंग्रेजांची लढाई होऊन तींत इंग्रेजांस जय मिळाला तरी त्यांचा नाशही पुष्कळ झाला.

इकडे वॉरन हेस्टिंग्ज् बंगाल्याचा गव्हर्नर यांस मुंबईसरकारचा हा अव्यापारेषु व्यापार पसंत पडला नाहीं. त्यानें कर्नल् अप्तन् या नांवाचे लष्करी अंमलदारास मराठ्यांकडे वकिलीकरितां पाठविलें. बापू व नाना यांनीं

प्रथम पुष्कळ आढेवेढे घेतले परंतु कालवर्तमानपरत्वें अखेर त्यांनीं पुरंदर मुक्कामीं तह ठरविला.

ज्या ज्या राजेरजवाड्यांस पेशवाईतील मुलूख जिंकून आपलें राज्य वाढवावें अशी इच्छा होती, त्यांनीं त्यांनीं आपण दादासाहेबांच्या पक्षाचे असून त्यांसाठींच लढाई करीत आहोंत असें प्रसिद्ध करून पेशव्यांच्या राज्यावर स्वारी केली. त्यांत मुख्यत्वें हैदरअली व कोल्हापूरकर. नानांनीं हरिपंतास हैदरावर पाठवून कोल्हापूरकरांवर पाटीलबावांची योजना केली. कोल्हापूरकरांस पादाक्रांत करून शिंदे हरिपंतास येऊन मिळाले.

इकडे मोरोबांनीं पुनः फितूर मांडिला. मागें त्यांनीं असेंच एक कुलंगडे उपस्थित केलें होतें तें लवकर उघडकीस आल्यामुळें जागचेजागींच जिरून गेलें, पण या खेपेस त्यांनीं विशेष सावधगिरीनें तयारी केली होती. त्यांस त्यांचे जुने साथी बजाबा पुरंदरे, चिंतो विठ्ठल, विख्यात शिपाई सखाराम हरी वगैरे सर्व मंडळी येऊन मिळाली. मोरोबांनीं तुकोजी होळकरासही वश करून घेतलें. हळूहळू सखारामबापूही मोरोबांच्याच बाजूस वळले. या सर्वांनीं बेत केला कीं, दादासाहेबांस जे लोक प्रतिकूल असतील त्यांस पकडून कैदेंत ठेवावें व मुंबईहून दादासाहेबांस आणून त्यांच्या हातीं पेशवाईचा कारभार सोंपवावा. इंग्रेजांस तर ही गोष्ट इष्टच होती तेव्हां ते मोरोबांस मिळाले यांत नवल नाहीं. तात्पर्य ,नानांखेरीज पूर्वीच्या बारभाईतील जितके लोक हयात होते ते सर्व आतां मोरोबांकडे वळले!

हा नानाफडणविसांवर मोठा कठिण प्रसंग आला होता. प्रतिस्पर्धी प्रबळ झाले, जिवलग मित्रही उलट फिरले, जवळ फौज नाहीं, पैका नाहीं अशी चोहोंकडून अडचण प्राप्त झाली; तथापि त्यांनीं याप्रसंगीं जें कारस्थान उभें केलें तें ध्यानांत आणिलें असतां—

“ एका केवलमर्थसाधनविधौ सेनाशतेभ्योऽधिका ।
नंदोन्मूलनदृष्टवीर्यमहिमा बुद्धिस्तु मागान्मम ॥ ”

असें म्हणणाऱ्या आर्यचाणाक्याचें स्मरण झाल्याशिवाय रहात नाहीं?

मग नानांस अमूकदिवशीं पकडावयाचें असा मोरोबा इत्यादि मंडळींनीं निश्चयकरून त्यादिवशीं त्यांच्या घरावर छापा नेला, पण नाना त्या आधींच

पळून पुरंदरास गेले होते ! असो. नाना पुरंदरास गेल्यावर मोरोबांनीं पुण्यांत येऊन सर्व कारभार आपले हातीं घेतला.

मोरोबांशीं सख्य करून आलेली वेळ कशी तरी मारून नेण्याकरितां नानांनीं सखारामबापूंचे मध्यस्थीनें मोरोबांशीं सलोख्याचें बोलणें लाविलें. त्यांत असें ठरलें कीं, मोरोबादादा, बापू, बजाबा पुरंदरे, चिंतो विठ्ठल व नानाफडनवीस या पांच असामींनीं मिळून राज्यकारभार चालवावा त्यांत नानाफडनविसांनीं पुरंदरास पेशव्यांजवळ राहून तेथील बंदोबस्त राखावा व मोरोबांनीं इतर बाबतींत बाकीच्या कारभाऱ्यांच्या अनुसंधानानें मसलत करावी.

मोरोबांस लहानपणापासून नानांचा मसलतीस्वभाव माहीत असूनही त्यांच्या डोळ्यांवर कशी भुरळ पडली देव जाणे ! मोरोबांची गोष्ट राहूं द्या पण बापूंचीही बुद्धि चकली जावी हें केवढें आश्चर्य !

मोरोबांच्या हातीं कारभार आल्यापासून आठपंधरा दिवसांतच ते नानांचे पूर्ण कह्यांत आले. मोरोबांच्या फितूरीची बातमी पाटीलबोवा व हरिपंत यांस कळतांच ते तिकडचा बंदोबस्त करून आपापल्या फौजांसह कूच करून निरनिराळ्या वाटांनीं पुरंदराकडे येऊं लागले. ते जवळजवळ आल्याची बातमी नानांस लागतांच त्यांनीं आपली खाजगत फौज पाठवून पुण्याच्या आसपासचे घाट रोंखिले तेव्हां मोरोबा एवढावेळ झोंपेंत होते ते आतां जागे होऊन दादासाहेबांस आणविण्याचा मनसोबा करूं लागले; पण त्याचा उपयोग झाला नाहीं शिंदे व फडके पुरंदरास येऊन दाखल झाल्यावर नानांनीं शिंद्यास मध्यस्थ घालून तुकोजी होळकरांस मोरोबांच्या कटांतून फोडिलें. पुढें शिंद्यांच्या स्वारांनीं मोरोबांस पकडून नानांच्या हवालीं केलें तेव्हां त्यांनीं मोरोबांस अहमदनगरच्या किल्ल्यांत कैदेंत ठेविलें व बजाबा पुरंदरे यांस वंदनच्या किल्ल्यांत टाकिलें. कांहीं अंतस्थ कारणाकरितां यावेळीं बापूंस फक्त नजरकैदेंत ठेविलें.

मुंबईकर इंग्रजांनीं दादासाहेबांस पुढें करून त्यांच्या नांवावर मराठी राज्यावर छाप बसविण्याची मसलत केली होती परंतु तीस वॉरन हेस्टींग्ज् आडवा आल्यामुळें ती फसली. यामुळें त्यांना विषाद वाटून त्यांनीं पुरदरेच

तहास हरताळ फासण्याचा निश्चय करून तो तावडतोब अमलांतही आणिला. त्यांनीं त्या तहाचें एकूनएक कलम मोडिलें. अर्थात् या वागणुकीचा नानांस फार राग आला व त्यांनींही त्या तहाचीं कलमें पुरीं न करण्याचा निश्चय केला. इंग्रेज भडोचजवळचा तीन लाखांचा मुलूख तहाप्रमाणें मागूं लागले तेव्हां दादासाहेबांस आमच्या हवालीं केल्याशिवाय तुह्मांस तो मुलूख मिळणार नाहीं असें त्यांनीं साफ सांगितलें.

इकडे दादासाहेबांस पुण्यास नेण्याचा इंग्रेजांचा निश्चय कायम झाला; व त्याप्रमाणें त्यांनीं आपल्याकडून होतांहोईल तितकी गुप्तपणें तयारीही केली; तथापि नानांस मुंबईंत घडलेलें यच्चयावत् वर्तमान हेराचेद्वारें रोजच्यारोज कळत असे. मुंबईकरांचे नुसते बेत चालले होते तेव्हांच नानांची लढाईची कडेकोट तयारी चालली होती. अखेर इंग्रेजांनीं जिवाचा धडा करून मुंबईहून फौज रवाना केली. ती जलमार्गानें पनवेलीस आली व तेथून बोरघाटाकडे हळूहळू येऊं लागली. या फौजेबरोबरच दादासाहेब व त्यांचे दत्तकपुत्र अमृतराव होते.

याप्रसंगीं मराठ्यांनीं गनीमीकाव्यानें युद्ध करून इंग्रेजांस त्राहि त्राहि करून सोडिलें. या लढाईंत इंग्रेजांचा नामांकित सरदार इष्टुर फांकडा ( कपतान् स्टुअर्ट ) व पुष्कळ शिपाईलोक पडले ! सवाई माधवरावांचे चरित्रांत दैवी चमत्कार ह्मणून तरवारीची जी गोष्ट दिली आहे ती याचवेळीं घडली.

अखेर आपला आतां निभाव लागत नाहीं असें पाहून इंग्रेजांनीं शिंद्याच्या मध्यस्थीनें मराठ्यांशीं तह केला. यावेळीं शिंद्यांनीं मेहेरनजर केली; ह्मणूनच इंग्रेजांस जिवानिशीं परत जातां आलें, याबद्दल त्यांनीं कृतज्ञताबुद्धीनें शिंद्यांस भडोच किल्ला व त्याखालचा मुलूख बक्षीस दिला.

दादासाहेबांस बुंदेलखंडांत बारा लक्षांची जहागीर देऊन तिकडे रवाना करावें असें शिंद्यांनीं नानांशीं बोलणें लाविलें. ते ( दादासाहेब ) इतःपर फंदफितूरी करणार नाहींत अशाबद्दल शिंद्यांनीं हमी घेतल्यावरून व दादासाहेब दक्षिणेंतून गेल्यास राज्यास अपाय होण्याची तितकी भीति कमी, असें जाणून नानांनीं पाटीलबोवांचे ह्मणण्यास रुकार दिला. या कामीं शिंद्यांचा अंतस्थ हेतु असा होता कीं, दादासाहेबांबद्दल आपण हमी घेत-

त्यास आपलें तितकें वर्चस्व वाढेल व पुढेंमागें पेशव्यांच्या कारभाऱ्यांस दपटशा देण्यास हा एक बाऊ आयताच आपल्या हातीं राहील.

असो. याप्रमाणें दादासाहेब बुंदेलखंडांत चालले असतां त्यांस वाटेंत कोणी फिसालत दिली कीं, तुह्मांस झांशीचे किल्ल्यांत कैदेंत ठेवण्याचा शिंद्यांचा इरादा आहे. त्यावरून दादासाहेब पळून जाण्याची संधि पहात होते. महेश्वरासमीप नर्मदा उतरत असतां त्यांनीं शिंद्यांचे फौजेवर तुटून पडून तिचा नाश केला व पळून भडोचेस जाऊन तेथें इंग्रेजांचा आश्रय धरिला !

यावेळीं नानांस शिंद्याचा संशय आला; व त्यावरून त्यांनीं सखारामबापू बोकील व चिंतो विठ्ठल रायरीकर हे शिंद्यांच्या ताब्यांत होते त्यांस मागून घेऊन कैदेंत ठेविलें. चिंतो विठ्ठल यांनीं कैद चुकावी ह्मणून संन्यास घेतला होता पण त्यांस संन्यासाश्रमांतही कैद भोगावी लागली व ते त्याच स्थितींत मृत्यु पावले. सखारामबापूंस कैद करून सिंहगडावर नानांनीं प्रथम ठेविलें होतें. तेथून निघाल्यावर बापूंनीं कांहीं महिने प्रतापगडावर व कांहीं महिने रायगडावर घालविले. तेथेंच त्यांचा अंत झाला. कैदेंत नानांनीं त्यांचे ( बापूंचे ) फार हाल केले असा लोकापवाद आहे. त्याचप्रमाणें चिंतो विठ्ठल रायरीकर व सखाराम हरी यांसही त्यांनीं हालहाल करून मारविलें असें ह्मणतात. ही हकीकत खरी असल्यास त्यांच्या हातून ही फारच वाईट गोष्ट झाली असें ह्मटलें पाहिजे. हे गृहस्थ जिवंत राहिले तर राज्यास फार अपाय होईल अशी जर नानांस भीति वाटत होती तर त्यांनीं त्यांचा उघडपणें प्राण घ्यावयाचा होता. तसें करण्यास हजारों मार्ग खुले होते; पण तसें न करितां नानांनीं आपल्या दुर्बळ [illegible] झालेल्या प्रतिस्पर्ध्यांवर अशा निर्दयरीतीनें सूड उगवून आपल्या थोर[illegible] कलंक लावून ठेविला आहे असें मोठ्या दिलगिरीनें ह्मणावें लागतें !

असो. इकडे दादासाहेबांसंबंधीं आपल्यावर आलेला अपवाद नाहींसा करण्याकरितां शिंद्यांनीं गुजराथेवर चाल केली. गुजराथेंत जाऊन पोंचतांच त्यांनीं इंग्रेजांशीं तहाचें बोलणें लाविलें. हेतु हा कीं, त्यांस तहाचे नादीं लावून फसवावें; पण इंग्रेज ऐकेनात. याच संधीस मुंबईकरांनीं आपल्या

( अपूर्ण )

# वेळेचा मितव्यय.

लेखक—( दर्भ. )

वेळ ही तरी एकप्रकारची दौलतच आहे; आणि तरुणांच्या मालकींत येणाऱ्या, दुसऱ्या धनदौलतीप्रमाणेंच, हीही उधळेपणानें बहुतेक खर्चून जाईपर्यंत, हिची खरी किंमत बहुतेकांना समजत नाहीं. आळशीपणाच्या संवयी एकदां पुरतेपणीं जडल्यावर, एकाएकीं त्या सुटत नाहींत; व यामुळें ज्या मनुष्यानें आपल्या जीविताच्या पेरणीचा बहुमोल हंगाम फुकट दवडला, त्याला आयुष्यक्रमांतील सुखाची सुगी कोठून लाभणार ? गेलेली संपत्ति उद्योगानें परत मिळवितां येईल, नष्ट झालेलें ज्ञान अभ्यासानें साध्य होईल, बिघडलेली प्रकृति औषधानें व पथ्यपाण्यानें सुधारतां येईल, पण "गेली वेळा येइल, गोष्ट पुन्हां ही कधींहि न वदावी" सोन्याच्या तासाच्या सुबक कोंदणांत, मिनिटाच्या पाणीदार साठ साठ हिरकण्या बसविलेलीं वेळेचीं कैक तेजःपुंज मौल्यवान पदकें, नित्यशः सारखीं हरवताहेत, पण तीं पुन्हा सांपडण्याची आशा मात्र व्यर्थ होय !

कर्तव्याच्या हयगयीचें समर्थन करतांना, ज्या स्वतःच्या फसवणुकीच्या अनेक सबबी पुढें येतात, त्यांत 'वेळ नाहीं' हीच सबब फारकरून ऐकूं येते. "मला जर वेळ असती तर मी यंव् केलें असतें आणि त्यंव् केलें असतें" अशा भ्रामक समजुतीचे मूढ व आळशी लोक, वेळेची सबब सांगून, प्रत्यक्ष त्यांच्या मनानें देखील हजारों प्रेरणा कलेल्या हजारों बरेपणाच्या गोष्टी, विनाकारण करावयाच्या टाळतात; वास्तवीक कांहीं बरें करण्याची शक्यता, फुरसुतीपेक्षां अन्यकाळीं कमी असते, असें मुळींच नाहीं. जगांतील कर्तृत्व-वान पुरुषांकडे क्षणभर नजर फेंकली असतां काय आढळेल ? असले पुरूष ह्मणजे, हवी तेवढी मुबलक फुरसुतीची वेळ असून, कांहींएक करावयास नसणारे, खुशालचंद लक्ष्मीपुत्रच असल्याचें दिसून येईल काय ? छे ! छे ! असल्या अद्वितीय व्यक्ती ह्मणजे वर्षाच्या एका टोंकापासून दुसऱ्या टोंका-पर्यंत अहर्निश अविश्रांत श्रम करणाऱ्या उद्योग-विभूतीच होत.

असलीं माणसें सारखीं कामामागें काम करण्यांत अगदीं चूर असतांही त्यांतल्यात्यांत, आणखी थोडें अधिक काम करण्यास, त्यांना पाहिजे तेवढा

वेळ काढतां येतो, पण आळशी मनुष्यास सदासर्वकाळ वेळेचा तोटाच असतो. करतांकरतांच आंगीं कर्तृत्व येतें व करणाऱ्याच्या आंगींच अधिक क्रियावंतपणाची स्फूर्ति प्रादुर्भूत होऊन, जगांतील मोठमोठीं अवाढव्य कामें व्यवस्थितपणें उठतात. फिरत्या चाकाला अधिक गति देणें आयासाचें नाहीं, पण स्तब्ध चाक सुरूं करण्यास श्रम पडतात. हीच गोष्ट उद्योगी व आळशी मनुष्यास लागूं पडते.

सूक्ष्म क्षणांचाही यथायोग्य उपयोग करून, सतत परिश्रम केल्यानें, डोंगराएवढालीं कामेंही, शीण वाटल्यावांचून, पद्धतशीरपणें सहजीं घडून येतात. "थेंबें थेंबें तळें साचे किंवा दगड झिजे" या म्हणींत फार अर्थ आहे. आतां थोडें, मग थोडें, असें सारखें करतां करतां, महिन्यांनीं व वर्षांनीं झालेल्या कामाचे ढीग पाहून, ज्याचेंत्यालाही आश्चर्य वाटेल! मोठमोठे चिरेबंदी वाडेही दगडावर दगड रचूनच बांधतात. वेळेची खरी किंमत पूर्णपणें ओळखून, मजबुतीला अवश्य लागणाऱ्या लहान लहान क्षणांची मध्यें ठेंचून भर घालून, जीविताच्या कर्तृत्वाची अभंग इमारत वेळेच्या लहानमोठ्या चिऱ्यांनींच बांधली पाहिजे.

टांकसाळीच्या तक्तपोशीला लोखंडी गजांची जाळी बसवून, सोन्यारुप्याचे बारीक बारीक रजःकणही फुकट न जाऊं देण्याची योजना केलेली असते. यावरून सोन्यापेक्षां अधिक मोलाच्या वेळेची अत्यल्प धूळही फुकट न जाऊं देण्याची उमदी काटकसर आपण शिकली पाहिजे; व बहुतेक लोक अत्यंत महत्वाच्या वेळेचे बारीक बारीक कण, जे आळसाच्या केरांत फुकट जाऊं देतात, ते आपण मोठ्या काळजीनें गोळा करून, उपयोगांत आणले पाहिजेत, म्हणजेच वेळेची श्रीमंती येऊन, कामासाठीं हवी असलेली फुरसत लागेल तेवढी आपोआप मिळेल. अर्थात् फुरसत नाहीं म्हणून वृथा कुरकुर करणें गैर आहे. एवढेंच नव्हे तर देवानें फुकट दवडण्यास सवड दिली नाहीं, हा ईश्वरी क्षोभ न समजतां प्रसादच समजला पाहिजे. कारण शेंकडा नव्वदांना अशा फुकटच्या वेळेचें काय करावें, हेंच समजत नसल्यामुळें, न जाणारी वेळ म्हणजे त्यांना एक देवाचा शापच वाटतो. यामुळेंच हजारों लोक, यथास्थित वेळ असूनही निरुद्योगीपणानें, ती माशा मारण्यांत फुकट घालवून, स्वतः नुसते कपाळकरंटे बनतात!

गाठीची कवडी देखील वायां न जाऊं देणाऱ्या एखाद्या तिमाजी नायकाप्रमाणें, जर आपण एकही क्षण फुकट न दवडतां, तो सत्कृतीच्या हिशोबास लावला, तर असल्या क्षणाक्षणांनींच बनलेल्या दीर्घकालांत ज्ञान व सत्कृती या पूर्ण मालकीच्या अपार संपत्तीनें आपण खास सुखसंपन्न होऊं. उद्योगांत जाणारी वेळ मनाला आनंद व उत्साह देते, पण रिकामेपणांत होणारा काळाचा अपव्यय, कंटाळवाणेपणानें मनुष्याला निरुत्साह करून सोडतो. वेळीं जीवितही जड होतें. वास्तवीक प्रत्येकाला आपल्या आयुष्याची आवड आहेच आहे; तर मग प्रत्येकानें तिळभरही वेळ, उधळेपणानें फुकट गमावतां कामा नये, कारण आपलें परमप्रिय आयुष्य तरी या अमोल वेळेचेंच बनलेलें आहे, हें पुरें लक्षांत ठेवलें पाहिजे.

## ग्रहण.

ग्रहण ह्मणजे काय? आणि तें होतें कसें? याची सोपपात्तिक माहिती हल्लीं शाळेंतील सामान्य विद्यार्थ्यांसहि होत असल्यामुळें त्याबद्दल आतां कोणास फारसें कौतुक वाटेनासें झालें आहे; तरी प्राचीनलोकांचे ग्रहणाबद्दलचे आश्चर्यजनक विचार व त्याच्या शुभाशुभत्वाच्या चमत्कारिक समजुती यांचा विचार करितां सर्वांना भयचकित करून सोडणाऱ्या अनुपमेय चमत्कारानें क्षणभर मन तल्लीन झाल्याशिवाय रहात नाहीं.

पाश्चात् ज्योतिषी ग्रहण होण्याची खरी उपपात्ति आपण शोधून काढल्याबद्दल कितीहि घमेंडी मारोत; अगर ख्रिस्ती मिशनरी राहु केतूंच्या अलंकारिक वर्णनाचें खरें रहस्य न कळल्यामुळें अज्ञानानें पाहिजे तशी टर उडवोत! परंतु ग्रहण होण्याची खरी उपपात्ति आमच्या पूर्वजांना ज्यावेळीं पाश्चात् लोक घोर अज्ञानतिमिरांत स्वस्थ झोंप घेत पडले होते, त्यावेळींसुद्धां पूर्णपणें समजली होती ही गोष्ट आर्यभट्ट, भास्कराचार्य वगैरे प्रख्यात आर्यज्योतिषांचे ज्योतिषग्रंथ पाहिले असतां सहज सिद्ध होते.

ग्रहणांविषयीं भास्कराचार्य काय ह्मणतात पहा—

पश्चाद् भागाज्जलदवद्धः संस्थितोऽभ्येत्यचन्द्रो ।
भानोर्बिम्बं स्फुरदसितया छादयत्यात्ममूर्त्या ।

* * *

पूर्वाभिमुखो गच्छन् कुच्छायान्तर्यतः शशि विशति ।

" मेघाप्रमाणें 'खालीं असणारा चंद्र पश्चिमेकडून पूर्वेकडे शांतपणें जात असतां आपल्या कृष्णवर्ण निस्तेज बिम्बानें तेजःपुंज सूर्यबिंबास आच्छादितो. "

* * * *

' पर्वाभिमुख जाणारा चंद्र पृथ्वीच्या छायेंत शिरतो. '

वरील श्लोकार्धापैकीं पहिल्यामध्यें सूर्यग्रहण होण्याचें कारण व दुसऱ्यामध्यें चंद्रग्रहण होण्याचें कारण आचार्यांनीं सांगितलें आहे; तें वाचून भारतीय ज्योतिषशास्त्रज्ञांना खगोलविद्येची खडानखडा माहिती होती असें कोण ह्मणूं शकणार नाहीं !

क्रांतिवृत्ताला चंद्राची कक्षा ज्या बिंदूत छेदिते त्या छेदन बिंदूस आमच्या आर्यज्योतिषांनीं राहु केतु अशा संज्ञा दिल्या आहेत. या छेदनबिंदूंत अगर त्यांच्या अगदीं जवळ चंद्र आल्याशिवाय चंद्राला अगर सूर्याला ग्रहण कधींहि लागणार नाहीं; अर्थात ग्रहण लागण्यास हे राहु केतु नामक दोन च्छेदनबिंदुच कारण होत. या सत्य गोष्टीच्या आधारानें भारतीय कल्पक कवींनीं राहू केतूंचें अलंकारिक वर्णन केलें तर त्यांत काय बिघडलें ? राहु केतूंत चंद्र असतां ग्रहण लागतें अर्थात राहु केतु ग्रहण उत्पन्न करितात किंवा राहु केतु ग्रासतात यांत असत्य तें काय ? कल्पककवि एखाद्या पदार्थाचें नानाप्रकारें कल्पना वठवून वर्णन करितो ह्मणून त्याला आजपर्यंत कोणी वेड्याची कोठरी दाखविली आहे काय ? जो कवि एखाद्यावेळीं सुंदर तरुणीमुखाला निष्कळंक चंद्रमा बनवितो तोच दुसऱ्यावेळीं त्याला प्रफुल्लित कमळ ह्मणण्यास सोडित नाहीं; आणि एकादेवेळ लहर लागली ह्मणजे त्यालाच अस्ति मांसमय मृत्तिकाकुंभ बनविण्यासहि कमी करित नाहीं; पण या कवीच्या लीलेबद्दल आजपर्यंत कधीं कोणाला विषाद वाटलेला नाहीं. मग त्यानें राहु केतूंना दैत्य बनवून त्यांजकडून सूर्य चंद्रांचा ग्रास करविला तर त्याबद्दल मात्र त्या बिचाऱ्यावर एवढा रोष कां ?

कोणताहि समाज घेतला तरी त्यांतील सर्वच लोक परिपूर्ण ज्ञानी असतात असें नाहीं. प्राचीन काळापासून प्रचलीत असलेल्या आख्यायिका खऱ्या मानून त्यांवर पूर्ण विश्वास ठेवणारे भाविकलोक सर्व समाजांत असावयाचेच;

त्याप्रमाणें ग्रहणासंबंधाची राहु केतूंची कल्पित आख्यायिका खरी मानणारे कांहीं लोक अद्यापहि आपल्यामध्यें आहेत यांत कांहीं नवल नाहीं. फार लांब कशाला! प्राचीन आख्यायिकेला मान देण्याकरितां भास्कराचार्यांनींहि आपल्या ग्रंथांत ‘ शंभूच्या वरामुळें तमोरूप धारण करणारा राहू पृथ्वीच्या छायेंत शिरून चंद्रास आच्छादितो व चंद्रबिंबांत प्रवेश करून सूर्यास आच्छादितो ’ असें म्हटलें आहे. उघडच आहे कोणतीहि नवीन गोष्ट प्रतिपादन करावयाची, तर ती लोकमताला मान देऊनच प्रतिपादिली पाहिजे. तरच त्या गोष्टीवर भाविकलोकांची श्रद्धा लवकर बसेल.

ग्रहणासंबंधाच्या चमत्कारिक आख्यायिका आपल्याप्रमाणेंच पृथ्वींतील निरनिराळ्या देशांमध्यें निरनिराळ्या आढळतात; त्या बऱ्याच मनोवेधक असल्यामुळें त्यांपैकीं कांहीं देतों:—

लाल कृष्णवर्ण सर्प सूर्य चंद्रावर आक्रमण करितो यामुळें ग्रहण होतें असें चिनीलोक समजतात व यामुळें ते सर्पानें सूर्यचंद्राना लवकर सोडावें ह्मणून आपल्याप्रमाणेंच स्नानदानादि मंगळकृत्यें व जपजाप्य करितात; शिवाय सर्पाला भिवविण्याकरितां मोठमोठ्यानें ओरडतात व वाद्यें वाजवितात.

आफ्रिकेंतील हबशीलोकहि चिनीलोकांप्रमाणेंच सर्पामुळें ग्रहण होतें असें समजून त्या सर्पाला भिवविण्याचा प्रयत्न करितात. इतर आफ्रिकिअन समजतात कीं सूर्यचंद्रांवर दैत्य चालून जातो त्यामुळें ग्रहण होतें; याकारणानें त्या दैत्याला भिवविण्याकरितां ते लोक चिनीलोकांप्रमाणें ओरडूं लागतात; कांहीं लोक भिऊन रडूं लागतात. कित्येकजण कर्कश वाद्यें वाजवून सर्वत्र गोंगाट करून सोडतात. ग्रहण सुटूं लागलें ह्मणजे यांना मोठा आनंद होतो; आणि दैत्य आपणाला भिऊन पळाला ह्मणून आपली मोठी प्रौढी गाऊं लागतात.

प्राचीन रोमनलोक मानित असत कीं चंद्रसूर्य या देवी आहेत. त्या देवी गर्भार राहिल्या ह्मणजे त्यांना ग्रहण होतें. यामुळें त्यांचा गर्भ सुरक्षित रहावा ह्मणून ते लोक ग्रहण लागलें ह्मणजे दानधर्म करित. कांहीं कांहीं लोक असें समजत असत कीं कोणी कांहीं मंत्रतंत्रादि क्रिया केल्या ह्मणजे त्यामुळें चंद्रसूर्य दुःखीत होऊन काळवंडतात. तेंच त्यांना ग्रहण लागतें.

पेरूदेशांतील लोकांचें असें मत आहे कीं, चंद्रसूर्यांना अरिष्टदशा आली

ह्मणजे त्यांना ग्रहण लागतें; ह्मणून या लोकांना अशा अनिष्ट दशेमध्यें चंद्र-सूर्य मरून कदाचित् आपल्यावर पडतील ह्मणून मोठी भीति वाटते. यास्तव त्यांना शुद्धीवर आणण्याकरितां ते लोक मोठमोठ्यांनीं वाद्यें वाजवितात; आरडओरड करितात व कुत्र्यांना भुंकावयास लावितात.

चंद्रसूर्यामध्यें भांडण झालें ह्मणजे ग्रहण लागतें असें मेक्सिकोतील लोक समजतात. ज्याला ग्रहण लागलें त्याचा युद्धामध्यें पराजय झाला असें समजतात. या लढाईमुळें भयभीत होऊन लढाई लवकर बंद व्हावी ह्मणून व्रतोपोषणें करितात. स्त्रिया आपल्या शरीरास नानाप्रकारें कष्ट देतात. लहान लहान मुलीं आपल्या हातांतून रक्त निघेपर्यंत टोंचून घेतात. याप्रमाणें ग्रहणासंबंधीं नानाप्रकारच्या समजुती निरनिराळ्या देशांत चालत आल्या आहेत.

मधुकर.

---

## युद्धानंतरः—

श्लोक—( शा. वि. वृ. )

झाले शत्रु पराजित प्रमुख ते आले करीं आपुल्या।
शस्त्रांच्या जखमा पहा तनुवरी त्यांच्या कुठें लागल्या ॥
लावा औषध; मूर्छितांस उचला डोलींत घालोनियां।
मुक्कामावर न्या, निवांत अपुल्या आराम त्यां व्हावया ॥ १ ॥
युद्धीं सांपडले नव्हेत अपुले हे शत्रु आतां पहा।
सन्मित्रापरि मानुनी सकलहीं सेवेंत यांच्या रहा ॥
प्राणाचीहि करोनियां न परवा स्वामीहिता कारणें।
केला संगर घोर, थोर ह्मणुनी सद्वीर यां मानणें ॥ २ ॥
शत्रुंच्या कडच्या ह्मणून न धरा त्या बाल, वृद्ध स्त्रिया।
त्यातें द्या परवानगी निजगृहीं जाती तरी जावया ॥
रस्त्यामाजि तयां कुणी न अडवी ऐशी व्यवस्था करा।
त्यातें शत्रु असें गणा न हृदयीं वात्सल्य त्यांचें धरा ॥ ३ ॥
धारातीर्थीं असंख्य वीर पडले जे शत्रुचे युद्धि या।
त्यांचे जे कुणि धर्मबंधु असती ते मूठमाती तयां ॥
देती, त्यांस नका करूं अडथळा द्या साह्य त्यां चांगलें।
तैसेची मृतवीर धुंडुनि करा युद्धांत या आपुले ॥ ४ ॥

कैदी सांपडले रणांत अपुल्या हातीं बडे लोक जे।
त्यांतें होईल त्रास व्यर्थ असले बोलूं नका बोल जे ॥
मोठाले सरदार यांत असती सेनानि भीमापरी।
तैसे श्रेष्ठहि राजकारण पटु प्रख्यात भूमीवरी ॥ ५ ॥
व्हावें सौख्य बरें ह्मणून झटणें जैसें तयां स्वगृहीं।
आहीं शत्रुगृहीं असें नच गमो त्यांच्या मना लेशहीं ॥
द्यावा योग्य तयांस मान जपणें खाणें पिणें चांगलें।
आह्मां ते ह्मणतील शत्रु असतां मित्रापरी वागले ॥ ६ ॥
ऐसा प्रेमळ जो मनीं, अहित ही त्यांतें न कां वानिती ?।
साक्षात् देवाचि शंभु हा अवतरे भूमीवरी मानिती ॥
ऐसा श्री शिवराज भूषण महा-राष्ट्रास या लाभला।
ज्यातें सज्जन "लोकमित्र" ह्मणती "थोरांत" ही जो भला ॥७॥

"थोरात"

---

## जीवन.

"दिसे क्षणिक सर्व हें भरंवसा घडीचा कसें।"
"धरील ? मन आधिनें बहुपरि भ्रमें चाकसें॥"

केका—मोरोपंत.

सात्विकरावांची सांपत्तिक स्थिति बरी होती, पण त्यांच्या वयाला पन्नाशी उलटेपर्यंत पोटीं संतान नसल्यामुळें, आजवर ते प्रपंचांत उदासीन असत. सुदैवानें नुकतीच त्यांची भार्या भावनाबाई प्रसूत होऊन, पुत्ररत्न झाल्यामुळें सात्विकरावांना अत्यानंद झाला होता पुत्राला जरी व्यतीपात लागला होता, तरी तो मोठा कर्तृत्ववान निपजणार असल्याचें जोशीबोवांनीं सांगितलें होतें. शांती करून पुत्रोत्सव, मोठ्या सढळ हातानें, फार थाटाचा उठवून देण्याचा बेत कायम झाला होता. अनेकतऱ्हेचे नवस फेडण्याचें काम शक्यतेप्रमाणें, पहिल्या दिवसापासूनच सुरूं होतें.

त्यांच्या लहानशा दुमजली घरापुढें एक छोटासा, पण नीटनेटक्या मांडणीचा शानदार बगीचा होता. या बागेंत मध्यभागाचे सुमारास एक अगदीं लहानशी फार जुनी कबर होती. ती एका रमल नांवाच्या मोठ्या वैराग्यशील फकीराची असून, तो निजामशाहीच्या पूर्वी तेथें रहात असे अशी दंतकथा बुद्धलोक सांगत. या कबरस्थानाच्या दिवाबत्तीसाठीं

सरकारी थोडें उत्पन्न असून, एक फकीर तें काम नेमानें करीत असे. या मुसलमान साधूच्या समाधीवर सात्विकरावाचा खरा भाव होता. त्यांना तो साधू हटकून नवसास पावल्याचे बरेच दाखले होते. मुलासाठीं या कबरीला केलेला नवस गेल्या सर्वपित्रीअमावास्येच्या आदल्या दिवशींच गुरुवारीं, मोठ्या श्रद्धेनें त्यांणीं फेडला.

अस्तमानचा सुमार, पैगंबरभक्ताची नमाज पढण्याची वेळ; त्या कबरीवर सात्विकरावांच्या खर्चानें, उंची गलफ चढून, दोन्हीकडे तेवत होते. पुढें पुष्कळसा धूप जळत असून त्याचा परिमल सुटला होता. सात्विकराव आपल्या माडीच्या खिडकींत, आरामखुर्चीवर पडून, समाधानवृत्तींत, शुद्ध मनानें, त्या कबरीकडे पहात होते. कानाला गोड लागणारा लांबचा सुस्वर चौघडा व मधून मधून मधूर वाऱ्याच्या झुळुकेबरोबर कानीं येणारी नवयौवन वारांगनेच्या गायनाची एखादी अस्पष्ट तान ऐकून, सात्विकरावांना झोंपेची गुंगी आली. त्यांचा डोळा लागला. तरी ती कबर मात्र त्यांच्या डोळ्यापुढून हालली नाहीं. उलट ती अलीकडे येऊन उंच उंच वाढूं लागल्याचा त्यांना भास झाला. साडेतीनशें वर्षांपूर्वीं चुन्यांत बसविलेले कबरीचे निर्जीव दगड वारुळांतून बाहेर येणाऱ्या सजीव सापाप्रमाणें भराभर एकामागून एक असे न ढासळतां त्या थडग्यांतून बाहेर येऊन सारखे आकाश गाठूं लागले.

हा चमत्कार उत्सुकतेनें सात्विकराव झोंपेंत पहात असतां, ती कबर एकदम उंच होण्याची थांबली, व ती दुभंगून तिला वेशीसारखें भलें मोठें दार झालें! आंत भीति वाटण्यासारखा किट्टकाळोख दिसत होता, व खोल खोल थडग्यांतून गंभीर वाणीनें, " अल्ला हो अकबर " असे सारखे उच्चारलेले शब्द सात्विकरावांना त्या खुल्या द्वारांतून स्पष्ट ऐकूं येत होते! ते चरकल्यासारखे होऊन जास्त डोळे ताणून, त्या उघडलेल्या कबरस्थानाच्या विशाळ दाराकडे पाहतात, तों आंतून केवढा उंच, व भव्य, वयोवृद्ध पुरा पिकलेला, पांढऱ्या पोषाखाचा, हातीं स्मरणी घेतलेला फकीर, हसऱ्या चेहऱ्यानें आपणाकडेच येत आहे असें त्यांना दिसलें. घाबरून घाम सुटल्यामुळें ते मागें सरणार, तोंच त्या फकीरानें आपला केवढातरी लांबच्यालांब हात चटकन

सात्विकरावाचे खांद्यावर टाकून, त्यांना थांबविलें. बिचाऱ्याच्या आंगावर काटाच आला!

फकीर धीर देऊन ह्मणतोः—" भिऊं नकोस. तुझा मजवर पुरा विश्वास, म्हणूनच मी तुला दर्शन दिलें; व ह्मणूनच तुला इशारत करतों कीं, या हैद्राबाद शहराची आतां धडगत नाहीं. मूळची ही आह्मां फकीरांची जागा. आतां ती एकसारखी उजाडच झाली पाहिजे. प्रत्यक्ष मालकाला तीनतीनदां बजावलें कीं शहर खालीं कर पण तो उमजत नाहीं. बेभरवशानें भीत भीत जर तो लोकांला शहर सोडा ह्मणून सांगूं लागला, तर रयत समजते कीं, निजाम सरकार महा बलिष्ट, अरब रोहिला जय्यत तयार, शहर लुटण्याचा तर बेत नाहींना? खरोखरच कोणीतरी या शहराचा धुव्वा उडविणार हें खास! येथल्यासारखी संपत्ति आहे कोठें? या काळची ही प्रतीदिल्ली आहे. तेथचेंच अगणित द्रव्य येथें भरलें आहे. पण लोकांची बुद्धि फिरली. धर्मवासना नष्ट झाली व ज्याला दानत किंवा शील ह्मणतात, त्याचा गंध देखील या धनाढ्य शहरांत उरला नाहीं. इतकी अपरंपार संपत्ति देशाच्या हीनदीन स्थितींत उपयोगी पडण्यासाठीं, योग्य कारणीं लावण्याची ज्यांना अक्कल किंवा इच्छा नाहीं, त्यांच्याजवळ ती असली काय किंवा अनंतसमुद्राच्या तळाशीं जाऊन पडली काय एकच. नुसती चैन हा संपत्तीचा खरा उपयोग नव्हे. तुला आपला व आपल्या माणसांचा जीव पाहिजे असेल, तर माझें ह्मणणें ऐकून भरवशाची सांगड करून जग नाहीं तर सगळ्यांबरोबर मुकाट्यानें मरून जा. सावध हो...."

पण इतक्यांत सात्विकरावांना कोणीशी हाक मारल्यामुळें ते जागे झाले. त्यांना धडकी भरल्यासारखें होऊन, डोळे उघडतांच भीतभीत त्यांनीं त्या रमलसाधूच्या कबरीकडे हळूंच नजर केली. तों ती जेथच्यातेथेंच नेहमीं सारखी अचेतन असून दिवे मंद मंद जळत होते. पावसाचें बीं निघाल्यामुळें रक्ताचा सडा झाल्याप्रमाणें अत्यंत लाल झालेलें पश्चिमेकडील तेजस्वी क्षितीज काळें ठिक्कर पडत चाललें असून, पर्वतासारख्या प्रचंड शरीरांचे नीलवर्ण मोठमोठे ढग बाहेर पडून, वरवर चढून, आकाशांत इतस्ततः भेसूरपणें भ्रमण करूं लागले होते. अमावास्या पावसाला घेऊनच उजाडली. मेघराज सारखा कोसळूं लागला. घटस्थापना झाली व माळेंत पाऊस सांपडला. मग काय विचारतां? ज्याला त्याला वाटे, यंदा पाऊस सुबत्ताकरून, दसरा

आनंदाचा करणार, पण तो आपला निर्दय बत्ता फिरवून " आनंद विसरा" ह्मणण्यासाठींच सारखा झोडपीत होता, हें कोणाच्या ध्यानांत येणार?

सात्विकरावांचा झालेल्या साक्षात्कारावर विश्वास होता खरा, पण त्यांत जलप्रलयच होईल असें त्या फकीरानें कोठेंही स्पष्ट सांगितलें नव्हतें. त्यांतील कांहीं कांहीं शब्दांच्या धोरणानें तसा अर्थ निघण्यासारखा होता व म्हणूनच पोहण्यात पटाइत असलेल्या सात्विकरावांनीं खरोखरीच्या भोपळ्याच्या दोन भल्या मोठ्या सांगडी करून जगण्याची तयारी केली होती! स्वप्नावर भरवसा ठेवण्याच्या या त्यांच्या मनस्वी देवभोळेपणाबद्दल मंडळींनी त्यांची थट्टा देखील केली, पण बापड्या सात्विकरावांना तिकडे लक्ष देण्यास अवकाशच नव्हता. बाहेर सारखा पाऊस व घरांत अमावास्येच्या रात्रीपासूनच त्यांच्या बाळंत कुटुंबाची प्रकृती बिघडत चाललेली. उपाय करण्यांत बिलकुल हयगय नव्हती. पाऊसपाण्याचा गारवा बाधूं नये, म्हणून उष्ण औषधेंही सुरूच होतीं. उपयोग मात्र कशाचाच झाला नाहीं.

रविवारीं तर पाऊस " मी " .ह्मणत होता. त्याची मुसळधार खळली नाहीं. बाळंतिणीला दहावा दिवस असून रात्रीं तिला बेसुमार वायू झाला! भावना बाई तट्कन बाजल्यावरून उठली. तिणें घट्ट काचा घातला. सरसावून पदर आडवा बांधला. डोक्याचें टोपडें फेंकून दिले. झिंजा पसरल्या व वाताच्या लहरींत घराबाहेर पडण्यासाठीं धडपडूं लागली. सात्विकरावांना देखील ती आवरेना. पण तान्हुल्याची आठवण होण्याबरोबर ती परत बाजल्याकडे आली. काजळाने भरलेले डोळे गरगर फिरविले, विकट हास्य केलें व वर आकाशाकडे बोट दाखवून, घाबरेपणानें तिकडे पहात पहात नवऱ्याला ह्मणते:—

" तो पहा देवाधिदेव इंद्र, कसा आपल्यावर रागावला आहे तो! अरे देवा! हे सहस्रावधी यमदूत, पाश घेऊन, हैद्राबादेच्या या चंद्रघाटावरच कां बरं उतरताहेत? पळा, चला, एक क्षणही येथें राहूं नका. तीं पहा हजारों कोल्हीं कुत्रीं आणि गिधाडें! अग बाई! कैक माणसांचेच डोळे फोडफोडून तीं खाताहेत ना! उठा, कशाची वाट पाहता? खरंच खरंच! आपल्या या छकुल्या बाळाला देखील नेलं पाहिजे नाहीं? जीवन आहे बाइ हें; त्याला सोडून कसे प्राण राहतील? त्याला तुह्मीं घेतां कीं मी घेऊं? मीच घेतें. " तिनें त्या तान्ह्या अर्भकाला उचलून पोटांशीं धरलें; तों धड्‍ड्‍ड् कायसें कोसळल्याचा आवाज सात्विकरावांनीं ऐकला.

काय तो घोर प्रसंग ! घरें ढासळूं लागलीं. पावसाचा अनर्थ सारखा वाढतच होता. मुशी नदीचें पाणी चढत होतें. जंगबहादर तलावाचें पाणी मोठ्या सडकेएवढ्या रुंदीच्या तटावरून, धबधब्यासारखें खालीं पडत होतें. ही तटाची भिंत, तलाव खूप भरला तरी नेहमीं, कैक फूट मोकळी असे. अर्थात हा तटाचा भागही कक वर्षें भेगा जाऊन, नादुरुस्त होत होता. त्या तटाच्या माथ्यावरून पाणी वाहूं लागतांच, चंद्रघाटाच्या ह्मणजे हैद्राबादेच्या जु या वस्तीच्या लोकांस, जीवित-वित्ताच्या रक्षणार्थ सूचना देण्यासाठीं सरकारी तोफ झाली. अशा भयंकर जलप्रलयाच्यावेळीं व्याप नसलेले गोरंगरीब तेथेंच राहण्याच्या आशेचा उपद्याप कशाला करतील ? ते लगेच शहर सोडून गेले. पण अडी अडचणींत सांपडलेले व अपार संपत्तीच्या पाशांत गुंतलेले लोक कशाचीं घरें सोडतात ? हत्ती, घोडे, दाणा, गल्ला, व कोटीं ीं मोजण्यासारखें जड जवाहीर बाळगणारे, कितीक पिढ्यांचे श्रीमंत हिंदु मुसलमान चंद्रघाटावर अनेक होते. त्यांच्या सात सात मजली हवाशीर हवेल्यांतून ते कोठचे बाहेर पडणार ? त्यांची भवितव्यता तेथेंच साऱ्या इस्टेटी बरोबर राम म्हणण्याची होती ! सात्विकरावासारखे गृहस्थितीनें नाडलेले लोकही एवढ्या प्रचंड वस्तींत पुष्कळ होते.

दहा दिवसांची बाळंतीण भावनाबाई, वायूच्या झटक्यांस बावरून, लेंकराला घेऊन, “ जीवन माझें मोलाचें ! भय नाहीं काळाचें ” असें गाणें गात गात, नवऱ्याला झुकांडी देऊन, धूमधडक घराबाहेर पडली. सात्विकराव तिच्यामागें धावला. दोघेही पडवीत येतात न येनात तोंच मागें बरेंच घर ढासळून पडलें; व केवढा मत्तगजासारखा पाण्याचा लोंढा फोंपावत, आपल्या वाटेंत येईल तें चट्सारें पुढें घालून, खदखदून, फेंसाळत, अतिवेगानें वाहूं लागला ! विचाराला वेळच नाहीं. पडवींतील तयार असलेल्या सांगडी, सात्विकरावानें चढत्या पाण्यांत ढकलल्या; वायूनें बेफाम झालेल्या बायकोस भरपावसांत एका सांगडीवर जखडून, तें रडणारें तान्हें लेंकरू त्यांनीं आपल्या पाठीशीं बांधलें, भरलेल्या यमुनेंतून कृष्णाला घेऊन जाणाऱ्या वासुदेवाची त्यांना आठवण झालीं. त्यांनीं त्या दयाघन सच्चिदानंद वासुदेवाचें मनोभावानें स्मरण केलें व कृष्णरूप निबिड अंधेरांत दुसऱ्य सांगडीच्या आश्रयानें मूशीनदीच्या क्षुब्ध पाण्यांत ते शिरले.

त्यांना उत्तम पोहतां येत होतें. बायकोची व आपली अशा दोन्ही सांगडी मोठ्या धीरानें व कौशल्यानें त्यांणीं संभाळून निभावण्याचा आटोकाट यत्न सुरूं केला. तलावाच्या भिंतींतल्या उंचावरल्या भेगांत पाणी घुसून, पाण्याला मोठी वाट खुली होतांच, पाण्याचे लोटच्या लोट गांवांत शिरले. मोठमोठ्या हवेल्या कस्पटासारख्या साफ धुऊन गेल्या. निजल्याजागींच हजारों लोक चेंगरून, गुदमरून व बुडून मेले. कोणाचा शोक कोणी करावा? या जलप्रलयाची कल्पना होण्यास, नुसता विचारही मनांत येण्यास अवसर मिळण्यापूर्वीच मृत्यूनें साऱ्यांना गांठलें! अफझुलगंज इस्पितळ वाहवलें व त्याच नांवाचा तीन मजली भक्कम पूल, एका मनोऱ्याशिवाय पार ढासळून पडला! धनदौलत, गुरेंढोरें, माणसें, लांकूडफाटा वगैरे भयंकर अडचणींतून सांगडीवरून तरून जाणें ह्मणजे महाकर्म कठीण! त्यांत भावनाबाई सांगडीवर सारखी धडपडत बडबडतच होती. जीवनाचा सारखा ध्यास लागला होता. मधून मधून ती ह्मणेः—"अहो, ते पहा, खऱ्या पाणीदार मोत्यांचे कमालखानी हजारों हार, तीं पहा, अपूर्व नवरत्नाचीं अगणित पदकें, आणि ही काय वाळू? कीं माणकं? कीं पाच? कीं सोनं? कीं सारंच! चला चला. लक्ष्मीबाई, पळा, चालत्या व्हा! सोडलंत आह्माला? आला कंटाळा? निघा कुठं तें!" अशी वात झालेली बाळंतीण बायको ऊर्फ जिवंत हडल, सात्विकरावांनीं सांगडीवर कशी संभाळली असेल तें ईश्वरासच माहीत! उजाडेपर्यंत अडथळे चुकवीत चुकवीत थेट धारेंतून ते कितीतरी लांब गेले असतील!

इकडे नदीचें पाणी ६०।६५ फूट चढून चंद्रघाट जलमय झाला! शेंकडों खेडीं पार वाहून गेलीं. पाण्यानें शिकंदराबादही गांठली! रविवारची अनर्थमय कालरात्र व सोमवारचे प्रलय प्रहर, हैद्राबाद शहरची दुर्दशा करून, निघून गेले. मुशी नदीचें पात्र लहान व उगमही शहरापासून २०।२५ कोसांइतका जवळ असून, अकस्मिकपणें जसें कल्पनेच्या बाहेर पाणी येऊन दुर्दैवाचा सफाई खराट फिरला त्याप्रमाणेंच हें आगांतुक पाणी, आपल्या दुष्टतम कृतीनें जिकडे तिकडे यमपुरीचे, आंगावर शहारे आणणारें, परम उग्र व भयाण प्रदर्शन मागें उरलेल्या गाळांत साडून, जादूप्रमाणें तें आलें तसें जलदीनें पार ओसरूनही गेलें! लाखों लोक मेले. लाखों अकिंचन होऊन उघडे पडले. या अनर्थपाताची बातमी लागून, परठिकाणाहून

हैद्राबादेस धांवत आलेल्या जिवलग नातलगांत असा एकही इसम नव्हता कीं, ज्याचा कोणी ना कोणी तरी बळी पडून कुटुंबघात झाला नाहीं! अशा लोकांनीं केलेल्या हृदय विदीर्ण करणाऱ्या शोकाची नुसती कल्पना देखील होणें शक्य नाहीं! हें हैद्राबादचें सुतक साऱ्या हिंदुस्थानभर पसरलेलें आहे.

या हाहाःकारांत खुद्द निजामसरकारांचेंही पुष्कळ नुकसान झालें आहे. तरी या परमदयाळू सरकारस्वारीला, प्रजेच्या या दैविक आपत्तीबद्दल पराकाष्ठेचें वाईट वाटून, त्याणीं अश्रू ढाळले. निराश्रितांसाठीं सरकारी राजवाडे राहण्यास दिले. सहा लाख रुपये वाटले. नोकरलोकांस आगाऊ पगार दिले. हैद्राबादच्या या उघड्या पडलेल्या लोकांसाठीं जिकडे तिकडे फंड गोळा होत आहेत; पण जेथें कोट्यावधी रुपयांची धनदौलत नाहींशी झाली, तेथें पूर्वस्वरूप येण्यास किती काळ जावा लागेल हें सांगतां येणें कठीण आहे.

सात्विकरावासारखा जिवंत सुटलेला प्राणी या प्रळयांत दुर्मिळ होय. उजाडल्यावर भावनाबाई आपोआप शुद्धीवर आली व शक्तिहीन होऊन सांगडीवर निपचित पडली. मोठ्या मेहनतीनें त्या सांगडी एका खेड्याजवळ कडेस लागल्या. तेथें भावनाबाईची मुलासह चांगल्या प्रकारची व्यवस्था सात्विकरावांना लावतां आली. त्यांचें सर्वस्व जरी हैद्राबादेस घरांत नाहींसें झालें होतें तरी अनेक भरभराटीच्या स्वदेशी कंपन्यांतून त्यांनीं शेअर घेतले असल्यामुळें सात्विकराव केवळ दरिद्रीच बनले नाहींत. भावनाबाईची प्रकृती चांगल्या एका डाक्टराला दाखवितां त्यांणीं सांगितलें कीं, बायकोच्या फाजील काळजीनें उष्ण उपाय अतिशय केल्यामुळेंच भावनाबाईना जीव घेणारा उष्णवात झाला. रविवारी रात्रीं जरी डाक्टराची सल्ला मिळाली असती तरी देखील त्यांनीं भावनाबाईच्या डोक्यावर गार पाण्याची धार धरावयास सांगितली असती; पण असला उपाय आसुरी व उलट घातक वाटून गैर विश्वासानें बाळंतिणीच्या डोक्यावर गार पाणी ओतण्याचें साहस झालें नसतें. अर्थात् त्या वायूंतच तिचा अंत झाला असता, पण ईश्वरीकृपेनें तो उपाय सहजीं घडून बाळंतीण वांचली. मुलाचें नांव जीवन ठेवलें व सात्विकराव हैद्राबादेस रमलसाधूच्या कबरीस कुटुंबयात्रा घेऊन गेले. खरडून पार धुवून गेलेल्या चंद्रघाटावर त्यांना स्वतःच्या घराची जागा देखील कोणती ती समजेना इतकें स्थित्यंतर होऊन गेलें! त्यांणी ती कबर पुष्कळ हुडकली, पण ती त्यांना सांपडली नाहीं!

——

## शंका समाधान.

नंबर १ च्या कूटाचा खुलासा गेल्या अंकीं केलेला आहे; परंतु त्यामुळें कित्येकांचें समाधान झालें नाहीं असें त्यांच्या पत्रांवरून समजतें. तें कूट देणाऱ्या सन्मान्य गृहस्थांनीं उत्तर दिलें तें असें:—‘ हा केवळ भाषेचा प्रश्न आहे. ‘ बोरें पाहिलीं ’ यांत पाहिलीं या क्रियापदामुळें पहाणारा अगदीं आंधळा नव्हता. शिवाय अनेकवचनी क्रियापद असल्यामुळें एकापेक्षां अधीक बोरें होतीं. ‘ काढूनही घेतलीं नाहींत ’ यांतील नाहींत या बहुवचनीं क्रियापदानें एकापेक्षां अधीक काढून घेतलीं नाहींत. व “ शिल्लकही ठेविलीं नाहींत यावरून एकापेक्षां अधीक शिल्लक ठेविलीं नाहींत असा उघड बोध होतो. ’ कूटाचें उत्तर मागील अंकीं दिलें आहेच.

आतां तरी वाचकवर्गाचें समाधान होईल असें मला वाटतें.

### पद्यकूट नं० २ चा निकाल.

या कूटाचीं पद्यात्मक उत्तरें १३ जणांकडून आलीं; त्यातलीं ४ चुकलीं असून ९ बरोबर आहेत. निकाल पुढें लिहिल्याप्रमाणें झाला आहे.

नं० १ श्री. नागूसा पदमासा महाजन—चांदोड–नाशिक.

मुर्धी दर असे, निघे रव तई दडा राहतें।
रडा गळवितें टिपे समपदीं मला वाटतें ॥
जरी करिशि अक्षरें विषम दवातें घर।
धनीक, जन भीति ज्या ‘ दरवडा ’ असें उत्तर ॥ २ ॥

नं० २ रा. कृष्णराव अनंत पै—असोळणें गोवा. नं० ३ वासुदेव जिवबा प्रभु, पंखालाईन कराची–सिंध. नं० ४ रामचंद्र विश्वनाथ मेहेंदळे हेडमास्तर—गोऱ्हें–वाडें ठाणें. नं० ५ त्र्यंबक कृष्ण देशपांडे, आंबेघर ता० जावली–सातारा. नं० ६ मुरलीधर माधव कुलकर्णी, उंदिरखेडें. नं० ७ प्रभाकर विसाजी भावे, चांदवड. नं० ८ यशवंत महादेव गद्रे–धारवाड. नं० ९ पुं. पां. कामत.

वि. ब. थोरात.

### नवीन पद्यकूट नं० ३.

शिराविणहि मर्द मी, मद उरांतला काढुनी।
जनासि मद आणितों, जन ठके मला नेणुनी ॥
पदाविण बळें मला कुजवुनी न धागे करी।
बहीण उलटी, करी रजनि, जोखडा दे शिरीं ॥ १ ॥ दर्भ.

सूचना—डिसेंबर १५ तारखेपर्यंत या कूटाचीं उत्तरें पाठवावीं. पहिल्या पांच नंबरांस भारतांतील वेंचे हें पुस्तक फुकट मिळेल.

पत्ताः—विष्णु ब. थोरात मु. लोणखेड पो. शहादें ( खान्देश )

## रमणीय वेंचे.

( मागील अंकावरून पुढें चालू )

भार्गवेण हता माता एका जायाश्च पाण्डवाः ।
परदाररतः कृष्णो न देवचरितं चरेत् ॥ ५७ ॥

परशुरामानें आपले आईस ठार मारलें. पांच पांडवांना मिळून एकच स्त्री होती. श्रीकृष्ण परस्त्रीरत होते तथापी ते सर्वपूज्य होते. त्यांचें उदाहरण आम्हीं घेऊन चालणार नाहीं.

न संध्यां संधत्ते नियमित निमाजं न कुरुते ।
न वा मौंजीबन्धं कलयति न वा सुंनत विधिम् ।
न रोजां जानीते व्रतमपि हरेर्नैव कुरुते ।
न काशी मक्का वा शिवशिव न हिंदुर्न यवनः ॥ ५८ ॥

योग्य वेळीं संध्या करित नाही. अथवा निमाजही पढत नाहीं. आर्य धर्माप्रमाणें मुंज करीत नाहीं अथवा मुसलमान धर्मोप्रमाणें सुन्ताही करीत नाही. रोजे ( रमजान महिन्यांतील उपवास पाळीत नाही. किंवा शंकराचें एखादें व्रतही करीत नाहीं. काशीयात्रा करीत नाहीं, किंवा मक्केसही जात नाहीं असा जो तो ! हरहर ! हिंदुही नाही व मुसलमानही नाहीं.

घृष्टं घृष्टं पुनरपि पुनश्चन्दनं चारुगन्धं ।
छिन्नं छिन्नं पुनरपि पुनः स्वादु चैवेक्षु दण्डम् ।
दग्धं दग्धं पुनरपि पुनः काचनं कान्तवर्णम् ।
न प्राणान्ते प्रकृति विकृतिर्जायते चोत्तमानाम् ॥ ५९ ॥

चंदन जों जों घासावा तों तों त्याचा अधीक सुगंध सुटतो. ऊंस चरकांत घालून जसजसा पिळावा तसतसा त्यांतून गोड रस येतो. सोनें विस्तवांत घालून जसजसें तावून काढावें तसतसा त्याचा रंग अधिक खुलतो. परंतु प्राणांतसमय आलाअसताहीं उत्तमांच्या सुस्वभावात बदल होत नाहीं.

न पुत्रात्परमो लाभो न भार्यायाः परं सुखम् ।
न धर्मात्परम मित्रं नानृतात्पातकं परम् ॥ ६० ॥

पुत्रलाभाहून अधीक असा दुसरा लाभ नाहीं. स्त्रीसुखासारखें दुसरें सुख नाहीं. धर्मासारखा श्रेष्ठ दुसरा मित्र नाहीं, आणि असत्यासारखें दुसरें महत्पाप नाहीं.

दर्शनाद्धरते चित्तं स्पर्शनाद्धरते बलम् ।
संभोगाद्धरते वीर्यं नारी प्रत्यक्षराक्षसी ॥ ६१ ॥

ज्या आपल्या दर्शनानें पुरुषाचें चित्त हरण करतात, स्पर्शानें शक्ति हरण करतात, संभोगानें वीर्य हरण करतात, अशा या स्त्रिया प्रत्यक्ष राक्षसी होत.

गर्भस्थो हरते दुग्धं जन्मतः स्नेहमाहरेत् ।
पश्चाद्धन विभागेन नास्ति बंधुसमोरिपुः ॥ ६२ ॥

गर्भात असतां आईचें आंगावरील दूध मिळूं देत नाहीं जन्मास आलेवर आईचें प्रेम नाहींसें करतो. मोठेपणी वडिलार्जीत द्रव्याचा वाटेकरी होतो. ह्मणून पाठच्या भावासारखा दुसरा शत्रू नाहीं.

नास्ति क्षुधासमं दुःखं नास्ति रोगः क्षुधासमः ।
नास्त्याहारसमं सौख्यं नास्ति क्रोध समोरिपुः ॥ ६३ ॥

भुकेसारखें दुःख कोणतेंही नाहीं आणि क्षुधेसारखा दुसरा रोगही नाहीं. (आहार जेवणासारखें सुख दुसरें कशांतही नाहीं; आणि रागासारखा हानीकारक शत्रू कोणताच नाहीं.

कोकिलाना स्वरं रूपं नारीरूपं पतिव्रता ।
विद्यारूपं कुरुपाणां क्षमारूपं तपस्विनाम् ॥ ६४ ॥

स्वर हें कोकिळेचें रूप, पतिव्रत्य हें स्त्रियांचें रूप, विद्या हें कुरूपाचें रूप आणि क्षमा हें तपस्वयाचें रूप होय.

दिनान्ते च पिबेदुग्धं निशान्ते च पिबेत्पयः ।
भोजनान्ते पिबेत्तक्रं किं वैद्यस्य प्रयोजनम् ॥ ६५ ॥

जो सायंकाळीं दूध पितो, प्रातःकाळीं पाणी पितो, भोजनानंतर ताक पितो त्याला वैद्याची काय गरज.

नीचाश्रयो न कर्तव्यः कर्तव्यो महदाश्रयः ।
अजः सिंहप्रसादेन आरूढो गजमस्तके ॥ ६६ ॥

निचाचा आश्रय करूं नये, श्रेष्ठांचाच आश्रय करावा, सिंहाच्या प्रसादेंकरून एक शेळी हत्तीच्या मस्तकावर चढली.

विरला जानन्ति गुणान्विरलाः कुर्वन्ति निर्धनस्नेहम् ।
विरला रणेषु धीराः परदुःखेनापि दुःखिता विरला ॥ ६७ ॥

गुणांची परीक्षा करणारे क्वचित, दरिद्र्याबरोबर स्नेह करणारे क्वचित, युद्धांत धीर धरणारेही क्वचितच, आणि दुसऱ्याचें दुःख पाहून दुःखी होणारेही विरळाच आढळतात.

मूले भुजङ्गैः शिखरे विहङ्गैः शाखाः प्लवङ्गैः कुसुमानि भृङ्गैः ।
आश्चर्य मेतत्खलु चन्दनस्य परोपकाराय सतांविभूतय ।६८।


ज्याच्या बुडासि जंगी नागसर्प रहातात, शेंड्यावर पक्षी घरटीं करून राहातात, फांद्यावर वानरांना आश्रय मिळतो आणि फुलावर भ्रमर बसतात याप्रमाणें चंदनवृक्षाचें हें आश्चर्य नव्हे! काय परोकारार्थ संताच्या विभूती उत्पन्न होतात.

परसेवा सुखं हन्ति प्राणं हन्युः परस्त्रियः ।
परान्नं सुकृतं हन्ति ब्रह्मद्वेषे कुलक्षयः ॥ ६९ ॥

परसेवा सुखाचा नाष करते, परस्त्री संग प्राणघात करतो, परान्न सेवनानें पुण्याचा नाश होतो आणि ब्राह्मणाच्या द्वेषानें कुळाचा क्षय होतो.

(अपूर्ण.)

जितकें कांहीं आपणास ठावें । तितकें हळू हळू शिकवावें ।
शहाणे करून सोडावें । सकल जना ॥ १ ॥ रामदास.




वर्ष १८ वें. ] डिसेंबर. १९०८. [ अंक ६ वा.

## विषयानुक्रमणिका.

| विषय. | पृष्ठ. | विषय. | पृष्ठ. |
|---|---|---|---|
| नाना फडणवीस. (मागील अंकावरून पुढें चालू.)... ... ... ... | १४५ | लालावृंदावन व मोरससाखर. | १६२ |
| आमच्या शिक्षणाविषयीं. ... | १५३ | पोंच व अभिप्राय. ... ... | १६४ |
| वर्तमानपत्र फुकट मिळविण्याची अजब युक्ति. ... ... ... ... ... | १५७ | वर्तमानसार. ... ... ... | १६६ |
| कुसंग ( कविता. )... ... ... | १६२ | रमणीय वेंचे. ... ... ... | १६७ |
| | | देवी कुमुदिनी ( कादंबरी )... ... ... ... ... ... | ३६१ ते ३६८ |

कुमुदसुंदरी व विक्रम पृथ्वीपर्यटण या दोन्हीं बक्षीस
पुस्तकासह व्ही. पी. खर्चसुद्धां १ ८१ पोष्टांत भरावा लागतो.

द. गो. सडेकर यांनीं खानापूर येथें आपल्या धनंजय छा. छा.

## अनुभवानें खात्री कळेल

## सद्यःशुक्रकरी पयः

दुधाचें गुणवर्णन ग्रंथांतरीं "सद्यःशुक्रहरीनारी। सद्यःशुक्रकरीपयः" असें केलें आहे. त्याप्रमाणें दर गोळीस पावशेर दूध या मानानें १–१ शेर पावेतों दूध साफ पचवून शुक्रवृद्धी व स्तंभकता यांची पूर्ण प्रचिती दाखविणाऱ्या–सुवर्णगुटी नांवाच्या स्वर्णवर्खगुंठित १६ गोळ्यांचा डबा किं. १ रु. व्ही. पी. ।। रु. ३ डबे फक्त ३ रु.

वाजीकरणांत–वृद्धोऽपितरुणायते–अशी खात्री व प्रौढी वर्णिलेल्याच या गोळ्या आहेत पण निदान १०० तरी घ्याव्या लागतात. त्यांस शेंकडा फक्त ५ रु. ट. खर्च माफीनें पाठवूं.

पत्ता:—म्यानेजर प्रवासपेटी व वैद्यकपंचकर्ते–पुणें.

३–३

---

## सन १९०९ सालची डायरी.

इंग्रजी, मराठी व कानडी भाषेंत. प्रत्येक पानावर तिन्ही भाषेंत तारीख, वार, मिति व शक लिहिला आहे. देशी वस्तु कोणत्या ठिकाणी मिळतात त्यांची साद्यंत माहिती दिली आहे. शिवाय पंचागासंबंधी सर्व माहिती, पोष्ट, तारायंत्र यांसंबंधी सर्व माहिती, तारीखवाराचें क्यालेंडर वगैरे माहिती दिली असून प्रत्येक पान रुलिंग केलेलें आहे. शेवटीं कोरीं पानेंही सोडलीं आहेत. साधी प्रत किं. ८४, मध्यम ८५ व पाकेट पेनसलची ८७. व्ही. पी. खर्च २ आ.

पत्ता:—लोकमित्र कर्ते पो. खानापूर जि. बेळगांव.


---

## नोटीस.

मंगळूर येथें कॅनरा हायस्कुलाच्या भुवनेंद्र-हालमध्यें ता. २८, २९, व ३० दिसेंबर १९०८ या तीन तारखेस, गौडसारस्वत ब्राह्मण परिषदेची या वर्षाची ( दुसरी ) सभा भरणार आहे.

रा. रा. दत्तात्रेय बळवंतराव चिटणीस, बी. ए. एल्. एल्. बी. सॉलिसिटर, हायकोर्ट मुंबई यांनीं अध्यक्षस्थान स्वी. मेहरबानगीनें कबूल केलें आहे.

मंगळूर ता. २५।११।०८ } एम. दामोधर किणी एम्. ए. एल् टी. ए. श्रीनिवास पै. बी. ए बी. एल्.

---

# लोकमित्र.

## नाना फडणवीस.

( मागील अंकावरून पुढें चालू. )

गुजराथेंतील गादर्द नामक सरदारास उत्तरकोंकण काबीज करून घेण्याचे इराद्यानें मुंबईस बोलाविलें. तो येण्याचे पूर्वींच इंग्रेजांनीं कल्याण हस्तगत करून बोरघाटापर्यंत चाल केली व तेथें ठाणें बसविलें. ही खबर नानांस कळतांच त्यांनीं इंग्रेजांवर फौज रवाना केली. या फौजेनें बोरघाटांतील इंग्रेजांच्या ठाण्यावर छापा घालून बहुतेक लोक मारिले व बाकीचे कैद केले. इतक्यांत गादर्द आपल्या फौजेसह बोरघाट चढून वर आला. यावेळीं हरीपंत फडके, तुकोजी होळकर व परशुरामभाऊ पटवर्धन यांनीं पराक्रमाची शर्थ करून इंग्रेजांस अगदीं जर्जर करून सोडिलें.

वस्तुतः अशी स्थिति असतां आमच्या कित्येक अंध इतिहासकारांनीं इंग्रेजांनीं लिहिलेल्या इतिहासाचेंच मराठींत अनुकरण केलें आहे. दुर्दैव कीं त्यांना आमच्या बखरी खोट्या वाटून डफ्साहेबांचे शब्द खरे वाटावेत ! इंग्रेजी इतिहासकारांनीं व मराठ्यांनीं लिहिलेल्या हकीकती ताडून पाहतां त्यांत बरीच तफावत दिसून येते. उदाहरणार्थ खालील दोन प्रसंग पहाः—

हें चित्र पहा आणि हें पहा.

### गणेशपंताच्या फौजेवर छापा.

**लेफ्तनंत वेल्स याचा रिपोर्ट.**

" महाराज आपणांस कळविण्यास मला आनंद वाटतो कीं, मी तुरुप स्वारांचें पलटण व कंदहारी स्वारांचें पलटण बरोबर घेऊन निघालों तो आज पहाटेस चार वाजतां गणेश-

**नानांनीं लिहून ठेवलेली हकीकत.**

" गणेशपंत बेहरे यांजवर इंग्रेजांनीं छापा घातला तेसमयीं थोडीशी लढाई झाली. मशारनिल्हेस दोन तीन जखमा लागल्या. संभाळून निघून हातगडाकडे आले. "

पंतांच्या छावणींत पोंचलों. मी गणेशपंताचे तंबु, राहुट्या, तीन तोफा व धान्याचा बाजार हें सर्व काबीज केलें व त्याचे ९० लोक मारिले व १५ जखमी केले. माझ्या लोकांपैकीं एक दफेदार व दोन स्वार जखमी झाले व कंदाहारी स्वारांपैकीं एक असामी मेला. सारांश या प्रकरणीं कोणचीही गोष्ट करावयाची राहिली नाहीं. एक गणेशपंताचें डोचकें कापून तुह्मांस नजर करावयाचें तें केलें नाहीं एवढेंच. आतां तो गमजा करील असें मला वाटत नाहीं. "

## चित्र २ रें.

## कर्नलब्राऊन पनवेलीस रसद आणण्याकरितां जात असतां त्याजवर भाऊंनीं केलेला हल्ला.

### डफ साहेबांनीं लिहिलेली हकीकत

"एप्रिलच्या पहिल्या तारखेच्या सुमारास गार्दर्डानें धान्य व दारूगोळा वगैरे लढाईचें सामान आणण्याकरितां तीन पलटणें, आपल्या जवळचे सगळे स्वार व दहा तोफा, अशी फौज कर्नल ब्राऊन यांच्या हाताखालीं देऊन त्यास पनवेलीस पाठविलें. या फौजेवर परशुरामभाऊंनीं हल्ला केला. रिकामे बैल

### नानांनीं लिहिलेलीं हकीकत.

" छ ' ३ रबिलाखरीं खोंपवलीहून चार पलटणें तोफा वगैरे सरंजाम घेऊन मजबुतीनें पनवेलीस रस्त आणावयाकरितां रात्रीस कूच करून जाऊं लागली, तों राजश्री परशुरामपंत भाऊ यांची बातमी होतीच, यांनींहीं रात्रीसच जाऊन त्यासीं गांठ घातली. निकड करून लढाई लागली तों पेंढारी लागूनच होते. शें दी-

वळवून नेण्याचेकामीं मराठ्यांचें कौशल्य ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. याप्रसंगीं इंग्रजांनीं बरोबर बैलांचा तांडा होता तो राखण्यासाठीं पुष्कळ प्रयत्न केला, तथापि मराठ्यांनीं पुष्कळ बैल हांकून नेले. ”

डशें माणूस ठार व दोनशेंपावेतों जखमी इंग्रेजांकडील केलें व तीन चारशें बंदुका व दहा बारा उंट व छकडे दारूगोळ्याचे व राहुट्या डेरे व चार साडेचार हजार बैल व त्यांवर कांहीं जिनशी व कांहीं रिताडाचें याप्रमाणें पाडाव आणिलें. उजाडतांच मुक्काम त्यांचा बारवईवर अडचणीचे जाग्यांत झाला. त्यावर दुसरे दिवशीं रात्रीस कूच करून जाऊं लागला तों त्यांनीं ( भाऊंनीं ) गांठ घेतली. शें पन्नास त्यांकडील माणूस मारिलें व हजार बैल पाडाव आणिला. इकडून बाणांची मारागिरी केली त्याणें त्यांकडील दारूचे छकडे होते त्यांस आग लागून त्याकडील माणसें फार जळालीं. रात्रीसच पळून पनवेली गेले.

असो. इंग्रेजांची जेथें सरशी झाली आहे तो मजकूर साहेबांनीं विशेष विस्तारानें लिहिला आहे व मराठ्यांच्या जयाची हकीकत संक्षेपानें लिहिलेली आहे ! यांत ह्मणजे त्यांचा दोष आहे असें नाहीं कारण ते तरी मनुष्यच ! ‘ मान सांगावा जनांत व अपमान सांगावा मनांत ’ हें सर्वविश्रुतच आहे !

असो. अखेरीस सालबाई ( सालपें ) मुक्कामीं उभयतांचा तह होऊन या बऱ्याच दिवस चाललेल्या लढाईची समाप्ति झाली !

इंग्रेजांशीं लढाई चालली असतां नानांनीं हैदराशीं मैत्री करून त्यास इंग्रेजांचे मुलखावर स्वारी करण्यास चिथावून दिलें. यांतील हेतु इतकाच कीं, हैदराची व इंग्रेजांची लढाई लागली ह्मणजे तो हीनबल होईल व पुढें आपणास त्यास जिंकावयास सोपें पडेल व इंग्रेजांसही अनायासें तंबी बसेल. या कामीं नानांनीं कांट्यानें कांटा काढण्याची युक्ति लढविली खरी !

नरगुंदच्या संस्थानिकाला टिपूनें फार त्रास दिल्यावरून व त्यानें पेशव्यांस मदत मागितल्यावरून नानांनीं हरिपंत फडके व सेना धुरंधर मुधोजी भोसले या उभयतांस टिपूवर पाठविलें. त्यांनीं टिपूस जर्जर करून त्यास तह करावयास भाग पाडलें. या तहान्वयें मराठ्यांस नरगुंद, कित्तूर व बदामी हे प्रांत मिळाले.

शके १७१२ च्या ज्येष्ठ महिन्यांत इंग्रेज, पेशवे व निजाम या तिघांनीं मिळून टिपूस अगदीं नामशेष करून टाकण्याची मसलत ठरविली परंतु नानांचे मनांत टिपूस समूळ बुडवावयाचें नव्हतें. " टिपू ही एक इंग्रेजांचे उरावर सर्वकाळ कट्यार आहे; ती नाहींशी झाली असतां ते प्रबळ होऊन पेशवाईस उपद्रव द्यावयास चुकावयाचे नाहींत; याकरितां टिपू दीन होई-पर्यंत मात्र त्याशीं लढण्यास इंग्रेजांस मदत करावयाची; टिपूस जमीनदोस्त करावयाचें इंग्रेजांनीं मनांत आणिल्यास त्यांस नानातऱ्हांनीं अडवून तसें होऊं द्यावयाचें नाहीं; " याप्रमाणें नानांनीं निश्चय केला होता व त्याप्रमाणें त्यांनीं हरीपंत व परशुरामभाऊ यांस सांगितलें होतें व तेही पण त्याच-प्रमाणें वागलें.

टिपूची फौज फ्रेंचलोकांनीं कवाईत शिकवून उत्कृष्ट दशेस आणिली होती व तो स्वतः मोठा पराक्रमी होता. हा म्हैसूरचा वाघ किती जबरदस्त झाला होता, हें समजण्यास इतकें ध्यानांत आणिलें पाहिजे कीं, त्याशीं सामना करण्यास पेशवे, निजाम अली व इंग्रेज या तिघांस एकत्र व्हावें लागलें; व या तिघांच्या लक्ष सव्वालक्ष फौजेनें अश्रांत परिश्रम केले तेव्हांच तो दीन झाला ! असो. पुढें रीतीप्रमाणें तह वगैरे झाला हें सांगणें नकोच.

असो. इकडे शिंदे हे महापराक्रमी व फौजदार सरदार असून त्यांनीं मागें झालेल्या लढायांत चांगलाच नांवलौकिक कमाविला होता.

महादजी शिंदे ( पाटीलबावा ) हे जसे शूर व चतुर होते. तसेच ते पराकाष्टेचे महत्वाकांक्षी होते. हळूहळू आपली सत्ता वाढवून पेशव्यांपासून स्वतंत्र व्हावें, एवढीच त्यांची इच्छा होती असें नाहीं; तर पुढेंमागें सर्व पेशवाईचा कारभारही आपणाकडे यावा असें त्यांच्या मनांत होतें. नानांचा भित्रा स्वभाव पाटीलबोवांस पक्का माहीत होता, व यासाठींच त्यांनीं त्यांस

सर्वदा धाकांत ठेवण्यासाठीं अनेक युक्त्या योजिल्या; परंतु नानांच्या धूर्ततेपुढें त्यांचा कांहीं एक उपयोग झाला नाहीं. अखेर शिंद्यांनीं पुण्यास येऊन श्रीमंतांस विनंति केली कीं, " ह्मातारपणीं मी देशीं आलों आहे, तर आमरण श्रीमंतांच्या पायांचा नित्य सहवास घडावा व येथील राज्यकारभार संभाळून दक्षिणदिशेसही स्वामींचा प्रताप अधिक उज्वालित करावा, यासाठीं हल्लीं नाना फडणवीस व हरिपंत फडके जो कारभार करीत आहेत तो मजकडे सांगावा व दोघांस घरीं बसवावें. शिंद्यांच्या या अर्जास श्रीमंतांनीं कधींच रुकार दिला नाहीं. पुढें कालांतरानें हरिपंत तात्यांनीं नानांची व शिंद्यांची दिलसफाई केली. या दोघां दूरदर्शी व चतुर पुरुषांतील स्पर्धेची हकीकत बरीच मजेदार आहे परंतु ती पाटीलबावांचे चरित्रांत देऊं.

असो. याप्रमाणें नाना व पाटीलबावा यांचा एकदिल होऊन कारभाराचा क्रम यथापूर्व चालूं लागला. खेदाची गोष्ट एवढीच कीं यानंतर थोडेच दिवसांनीं पाटीलबावांस नवज्वराची भावना होऊन ते वानवडीस माघ शुद्ध त्रयोदशी शके १७९५ या दिवशीं मरण पावले. महादजी शिंद्यांच्या मृत्यूनें मराठी राज्याची फारच मोठी हानि झाली!!!

शके १७१२ त पेशव्यांचे निजामाकडे असलेले वकील गोविंदराव काळे यांनीं निजामअल्लीस नाना फडनविसांनीं तयार केलेली एक याद दाखविली व सांगितलें कीं या यादीप्रमाणें आपणाकडे दोन कोटी साठ लक्ष रुपये पेशव्यांचें येणें निघतें. या यादीबद्दल मशीरउल्मुलुक् व गोविंदराव यांमध्यें पुष्कळ कडाक्याचा वादविवाद झाला. मशीर ह्मणाला कीं, यादींत जीं कलमें लिहिलीं आहेत त्यांचा अर्थच आह्मांस कळत नाहीं. तो समजून देण्यासाठीं नानांनींच येथें आलें पाहिजे. यावर गोविंदरावानें उत्तर केलें नानांस पुष्कळ उद्योग आहेत ते सोडून ते येथें कसे येतील? मशीर आवेशानें ह्मणाला, ' ते येथें कसे येतील? पहा कसें लवकरच त्यांस येथें आणितों तें! '

यावर एके दिवशीं मशीर भर दरबारांत प्रसिद्धपणें बोलला कीं, पेशव्यांनीं आमची समजूत काढिली तर बरें आहे, नाहीं तर पेशव्यांस लंगोटी नेसवून हातीं भोपळा देऊन त्यांस काशीस गंगेच्या कांठावर जप करण्यासाठीं धाडल्याशिवाय आम्हीं स्वस्थ बसणार नाहीं!

हरीपंततात्या फडके व महादजी शिंदे हे मरण पावल्यानें निजामास धीर चढून त्यांनीं लढाईचा पक्का निश्चय केला होता व त्यांनीं ही आपली इच्छा दाखविण्यासाठीं कोणतीही गोष्ट करण्याची ठेविली नाहीं. एकदां दरबारच्या करमणुकीसाठीं त्यांनीं तमाशा करवून त्यांत सवाई माधवराव व नाना फडनवीस यांचीं सोंगें आणविलीं, त्यावेळीं मात्र गोविंदराव काळे यांनीं उठून भाषण केलें कीं, हें राजदरबार असून येथें आमच्या खाविंदांचीं सोंगें आणिलीं जातात, त्याअर्थी आमची येथें राहण्याची शोभा नाहीं. आतां आह्मीं परत पुण्यास जातों, पण जातांना इतकें सांगतों तें सर्वांनीं लक्षांत ठेवावें कीं, आमच्या धन्याचा अपमान केल्याबद्दल आह्मीं तुमचे दिवाण मशीर यांस धरून नेऊन पुण्यास दारोदार फिरवूं. याप्रमाणें बोलणें झाल्यावर काळे व पिंगळे पुण्यास आले.

सवाई रावसाहेब व नाना फडनवीस यांस हैदराबादेस झालेल्या हकीकती कळतांच त्यांनीं लढाई देण्याचा निश्चय केला व त्याप्रमाणें सर्व सरदारांस सैन्यानिशीं पुण्यास येण्याचीं निमंत्रणें गेलीं. सर्व सेनेचें आधिपत्य नानांनीं परशुरामभाऊ पटवर्धन यांस दिलें. या स्वारीस पेशवे स्वतः जावयाचे होते व त्यासाठीं गारपिरावर डेरे देऊन लष्कर उतरलें होतें. शके १७१६ च्या मार्गशीर्ष वद्यांत नाना फडनवीस गारपिरावर जाऊन उतरले. मागाहून पंधरा दिवसांनीं खासा श्रीमंत सुमुहूर्तानें पुण्यांतून निघून डेरे दाखल झाले व तेथें आठदहा दिवस मुक्काम होऊन श्रीमंतांची स्वारी हळूहळू मोंगलांच्या मुलुखाकडे निघाली. ह्या सर्व मंडळीस सरहद्दीवर जाऊन पोंचण्यास अडीच महिने लागले.

निजामाकडील सैन्याची व मराठ्यांची परांड्याच्या आसपास फाल्गून वद्य द्वितीयेपासून गांठ पडूं लागली. पहिल्या दोन चकमकींत मराठ्यांस माघार खावी लागली. पठाणांनीं परशुरामभाऊ यांस जखमी करून माघारी हटविलें. परंतु नागपूरकर भोंसले व शिंदे यांनीं लढाईची शर्त करून सोडिली. भोंसल्यांनीं मोंगलावर बाणांचा पाऊस पाडिला व शिंद्यांनीं तोफांचा भडिमार फारच केला. हे दोहींकडून दोन मार सुरू झाले तेव्हां मोंगलस्वार घाबरून पळाले. आपल्या सैन्याची अशी दुर्दशा झालेली पाहून निजामअली

फार घाबरून दहाबारा हजार फौजेनिशीं खर्ड्याच्या गढींत शिरले. दुसऱ्य दिवशीं मराठ्यांनीं त्यांस चोंहींकडून घेरून गढीवर तोफांचा मारा सुरू केला. दोन दिवस पराकाष्ठेचे हाल सोशिल्यावर तिसऱ्या दिवशीं नबाबांनीं तहाचें बोलणें लाविलें. तेव्हां पेशवे ह्मणाले कीं, प्रथम मशीर उलमुल्क यास आमच्या हवालीं करावें मग तह ठरवूं. आपला दिवाण पेशव्यांच्या ताब्यांत देण्याचें निजामअल्लीस मोठें संकट पडलें. त्यासमयीं तो स्वामीभक्त दिवाण आपण होऊन धन्यास बोलला कीं, माझ्या जाण्यानें सरकारची दौलत वांचत आहे तर मी हौसेनें जातों. मग निजामअल्लीनीं पेशव्यांस निरोप पाठविला कीं, मशीर उलमुल्क यांसही हवालीं करितों, मागाल तें देतों; पण मला आतां या विपत्तींतून लवकर मोकळें करा.

असो. मग मराठे व निजाम यांमध्यें रीतीप्रमाणें तह ठरल्यावर त्यांनीं निजामास सोडून दिलें. याप्रमाणें निजामअल्लीचा पूर्ण पराजय होऊन त्यांचा दिवाण मशीर उलमुल्क याचे मनोरथ व्यर्थ गेले. पूर्वीं मोंगलाईंत राजे रघुनाथदास व राजे विठ्ठल सुंदर प्रतापवंत हे दिवाण होऊन गेले. त्यांनीं पेशव्यांचें राज्य लयास नेण्यासाठीं भगीथ प्रयत्न केले होते त्यांत त्यांचाच नाश झाला, व हैदराबादच्या नवाबांस पेशव्यांस शरण यावें लागलें. हा दंश मनांत वाळगून मशीर उलमुल्कानें या खेपेस फौजेची उत्तम तयारी केली होती, आणि आतां मात्र पेशवाई आपण खचीत रसातळास नेऊं असा त्यास भरंवसा वाटला होता. पण याहीवेळीं मोंगलाची पक्की खात्री झाली कीं,:-

‘ ब्राह्मणी राज्य कैदवार एकापेक्षां एक मसलती ! ’

खर्ड्याच्या लढाईनंतर नानाफडनवीसांच्या ऐश्वर्याची पराकाष्टा झाली. त्यांचा फार दिवसांचा संकल्प कीं, सर्व मराठे सरदारांनीं एकत्र होऊन पेशव्यांच्या आज्ञेंत वागावें; तो या लढाईनें शेवटास गेला. यापुढें त्यांच्या सत्तेस उतरती कळा लागली व शेवटीं शेवटीं त्यांस हाल व दुःखें भोगावीं लागलीं. पुढें त्यांनीं जरी अचाट कल्पना लढवून अनेक कारस्थानें उभीं केलीं तरी कारभारांत त्यांचा पहिल्याप्रमाणें जम बसला नाहीं व त्यांत त्यांस यशःप्राप्ति मुळींच झाली नाहीं.

असो. याच संधीस सवाई रावसाहेबांनीं देहत्याग केला. श्रीमंतांना

देहत्याग करण्यास काय काय कारणें झालीं व त्यांच्या अकालीं मृत्यूमुळें नाना फडनाविसांस किती दुःख झालें याचें विवरण गतवर्षीच्या लोकमित्राच्या ४ थ्या अंकांत यथासांग केलेलें आहे. जिज्ञासूंनीं वाटल्यास तें पुन्हां पहावें. येथें त्याचें चर्वितचर्वण करून वाचकांची जागा आडवीत नाहीं.

पण ही शोक करीत बसण्याची वेळ नव्हती म्हणून नानांनीं सर्व शोक बाजूला सारून पुढील तजविजीस कंबर बांधिली. वस्तुतः सवाई रावसाहेबांचे मागें गादीवर हक्क बाजीरावांचा; परंतु बाजीराव बेअकली असल्यामुळें दूरवर विचार करून नानांनीं असा निश्चय केला कीं, बाजीरावास गादीवर न बसवितां कैलासवासी रावसाहेब यांची स्त्री यशोदाबाई हिच्या मांडीवर कोणी गोत्रज असा बालक पाहून दत्तक द्यावा व त्याचे नांवें पूर्वीप्रमाणें राज्यकारभार चालवावा. दौलतराव शिंद्यांचे कारभारी बाळोबातात्या पागनीस व जिऊबादादा बक्षी या दोघांशिवाय सर्व सरदारांनीं नानांच्या म्हणण्यास अनुमोदन दिलें. आपण एकटेंच विरुद्ध होणें रास्त नाहीं असें वाटून अखेर बाळोबांनींही संमति दिली. याप्रमाणें यशोदाबाईचे मांडीवर दत्तकपुत्र द्यावयाचा बेत सर्वांस पसंत पडल्यावर नानांनीं तेथें जमलेल्या सर्व सरदारांपासून यशोदाबाईच्या नांवचीं पत्रें घेतलीं कीं, बाजीराव गादीचे धनी केल्यास, कलह उत्पन्न होऊन राज्यनाश होईल, याकरितां तुम्हीं दत्तक घेऊन त्याच्या नांवें गादी चालवावी. इतकें झाल्यावर पौष महिन्यांत शिंदे व भोंसले आपापल्या मुलखाकडे जाण्यास निघाले.

इकडे बाजीरावसाहेब शिवनेरीस होते, त्यांस पुण्यांत घडत असलेलीं वर्तमानें कळतच होतीं. उलाढाली करण्याच्या कामांत ते कमी होते असें नाहीं. शिंद्यांकडील कारभारी बाळोबा तात्या पागनीस आपल्याला अनुकूल आहेत असें कळतांच त्यांनीं बाळोबातात्यांकडे पत्रव्यवहार सुरू करून त्यास पूर्ण वश करून घेतलें. शिंद्यांच्या कारभाऱ्यास अनुकूल करून घेतल्यावर बाजीरावसाहेब खुद्द दौलतराव शिंद्यांचें मन वळविण्याच्या उपक्रमास लागले. दौलतरावांस स्वतःची अक्कल मुळींच नव्हती. कारभारी कान धरून जिकडे ओढीत नेतील तिकडे ते जाणार अर्थात् बाळोबांच्या चिथावणीवरून शिंदे बाजीरावसाहेबांच्या म्हणण्यास कबूल झाले !

( अपूर्ण. )

# आमच्या शिक्षणाविषयीं विचार.

( लेखक–विश्वनाथ भास्कर शिरोडेकर कल्याणकर. )

प्रस्तुत विषय फार व्यापक व तितकाच महत्वाचा आहे. शिक्षण या शब्दाची व्याख्या कोणास फोड करून सांगावयास पाहिजे असें नाहीं. सांप्रत शिक्षण या शब्दाचा जो अर्थ करतात त्यासंबंधानें आज आपणास विचार करावयाचा आहे. शिक्षण ह्मणजे विद्येचें अध्ययन; हा त्या शब्दाचा साधारणतः रूढ अर्थ झाला. हें विद्येचें अध्ययन मनुष्यामध्यें कधींपासून सुरू झालें, विशेषतः तो भाषादेवीची सेवा कधींपासून करूं लागला, हें ठरवीत बसणें ह्मणजे काळाचा अपव्यय करणें होय. प्रथम मनुष्यांत भाषा कशी उत्पन्न झाली, कोणत्याहि प्राण्यास जी देणगी नाहीं व जी फक्त मनुष्यासच आहे अशा वाणीचा तो कधींपासून उपयोग करूं लागला. तो प्रथम आपल्या वाचेनें उच्चार कसे काढित असेल, हल्लींप्रमाणेंच व्यवस्थित उच्चार त्याच्या वाणीपासून एकदम प्रगट झाले असतील काय किंवा तो इतर पश्वादिक प्राण्याप्रमाणें कांहीं एकप्रकारचे सूर काढून ओरडत असेल, वगैरे मनुष्यजातीच्या भाषारंभकालिन स्थितीविषयीं विचार करूं लागलें असतां मन अगदीं गोंधळून जातें.

विद्याध्ययन करण्यास भाषेची मुख्यतः जरूर आहे. ज्या लोकांत भाषेला सुव्यवस्थितता आलेली नाहीं, त्या लोकांत विद्येच्या अध्ययनाचा प्रसार होणें अशक्य होय. कोणत्याहि गोष्टी परस्परांस कळवावयाच्या अथवा शिकवावयाच्या तर त्यास साधन भाषेशिवाय दुसरें नाहीं. अतएव भाषा हेंच विद्याध्ययनाचें महाद्वार होय!! ज्या लोकांत विद्याध्ययन अथवा शिक्षण प्रसार पावलेलें असतें, त्यांची भाषाहि अर्थात प्रगल्भता पावलेली असते. अशातऱ्हेची प्रगल्भता या पृथ्वींतील कित्येक भाषांस प्राप्त झालेली आहे. त्यांत संस्कृत, ग्रीक, रोमन, इंग्लिश इत्यादि भाषा प्रमुख होत. या भाषा ज्या लोकांच्या आहेत. त्यांस अर्थात् शिक्षणाची गोडी व शिक्षणाचा उपयोग समजलेला होता–व आहेहि. वर दर्शित केलेल्या ज्या भाषा त्यांत कांहीं जुन्या असून कांहीं नवीन आहेत. पण मौज अशी दृष्टिस पडते कीं, सर्वांत जुनी संस्कृतभाषा तिच्याच ठायीं सर्वांत विशेष प्रगल्भता आहे.

असें सर्व देशांतील सुशिक्षितांच्या प्रत्ययास आलेलें आहे. दिवसेंदिवस मनुष्य व त्याची भाषा वस्तुतः पाहतां सुधारत जावी; परंतु तसा मात्र अनुभव दिसून येत नाहीं.

संस्कृतभाषेची संस्कृतता तिच्या त्या श्रेष्ठ नांवावरूनच कळून येण्यासारखी आहे. त्याच संस्कृत भाषेपासून पुढें ज्या भाषा प्रचारांत आल्या त्यांकडे नजर दिली तर त्या फार ओंगळ व क्लिष्ठ असल्याचें दिसून येतें. संस्कृतभाषेंतून आम्हांस शिक्षण अथवा अध्ययन कोणत्या तऱ्हेचें मिळत असे त्याचा प्रथमतः विचार करूं, कारण संस्कृतभाषा ही अत्यंत जुनी असून तिला सर्व भाषांची जननी असें समजतात. कित्येक विद्वान लोकांचा असा तर्क आहे कीं, संस्कृतभाषा ही प्रचारांतील बोलण्यांची भाषा कधींच नसेल ! फक्त ग्रंथ लेखनाच्याच कामीं तिचा तत्कालिन लोक उपयोग करीत असत. कसेंहि असलें तरी ती प्रचारांत होती व अद्यापिही आहे; आणि जोंपर्यंत मनुष्यजातीस भाषेचें खरें मर्म समजत आहे, तोंपर्यंत ती अशीच जिवंत राहणार ! आर्यांची ही संस्कृतभाषा ऋग्वेदाच्या रूपानें प्रथम प्रगट झाली. तत्कालिन काव्य करणारे जे ऋषि त्यांनीं जे सृष्टपदार्थांचे व त्यांतील दिव्य विभूतीचे गुणधर्म अवलोकन केले, ते ते त्यांनीं ह्या ऋग्वेद संहितेंत सूत्राच्या रूपानें ग्रथित करून ठेविले. ते पाठ करण्याची प्रथमतः आह्मां आर्यांत चाल पडली असावी व तीच चाल अद्यापपर्यंत आमच्यांत अबाधित चालत आहे. कित्येक देवतांविषयीं अथवा सृष्टिंतील दिव्य पदार्थांविषयीं या ऋग्वेदांत सुंदर माहिती दिल्याचें आढळतें. पूर्वदिशेचा राजा इंद्र असून तो पाऊस पाडतो, संपूर्ण देवतांचा तो राजा आहे अशी वेदांत कल्पना आढळते. अशा कित्येक देवता अथवा दिव्य वस्तू वेदांत वर्णिल्या आहेत व तत्कालिन लोकांस तीं वर्णनें अतिशय महत्वाचीं व पाठ करून ठेवण्यासारखीं आहेत, असें वाटलें व ह्मणूनच वेद पठन करण्याची आमच्यांत चाल रूढ झाली.

यानंतर संस्कृत भाषेच्या स्वच्छ आकाशांत भरारी मारणारे जे ऋषि निर्माण झाले, त्यांनीं निराळ्या प्रकारची ग्रंथरचना करण्याची सुरवात केली. पूर्वींच्या वैदिकशिक्षणाच्या योगानें उन्नत झालेल्या मनुष्यबुद्धिचेंच पुढील

पौराणिक ग्रंथरचना हें फल होय. पुराणग्रंथ हे केवळ देवाच्या वर्णनाचे नसून ते इतिहासात्मक आहेत. त्यामुळें त्या ग्रंथांची ग्रंथरचना जरी बाजूस ठेविली तरी शिक्षणोपयोगी असे ग्रंथ त्या भाषेंत त्यानंतर बरेच झाले. मनु, याज्ञवल्क्य, इ० महान महान विद्वान यांनीं जीं शास्त्रें निर्माण केलीं, अथवा मनुष्यांस जीं बंधनें निर्माण करून दिलीं. तींही त्यानंतर लागलींच पाठ करून ठेवण्यासारखीं—शिक्षणोपयोगीं ठरलीं गेलीं. पुराणग्रंथ जरी वाचनीय ठरले गेले, तरी ते शिक्षणोपयोगी नव्हते असें नाहीं. त्यांचें विद्वानांनीं मनन करून, त्यांची लोकांस व्यासपिठावर बसून फोड करून द्यावी, अशाच-तऱ्हेचे ते शिक्षणोपयोगी असे ग्रंथ ठरले गेले. यानंतर काव्य-नाटकें वगैरे अस्तित्वांत येऊन भाषेचा अथवा वाणीचा गौरव व जयजयकार सर्व ब्राह्मण व ब्राह्मणेतर मंडळींत झाला. याचवेळीं भाषा कौशल्य अथवा वाक्कौशल्या-बरोबर इतर कौशल्येंहि महत्व पावत गेलीं होतीं असें तत्कालिन इतिहास सांगतो.

आमच्यांत एकंदर चौदा विद्या व चौसष्ट कला सांगितलेल्या आहेत; परंतु हीं सर्व कौशल्यें निरनिराळे लोक आपआपल्या दर्जाप्रमाणें निरनिराळीं शिकत असत. सर्वांत मुख्य जी वाणी अथवा भाषा तिकडे ब्राह्मणांचें फार लक्ष असे व इतर कौशल्यांत वर्णाश्रम धर्माप्रमाणें ते ते लोक मोठ्या आस्थेनें प्राविण्य संपादित असत. हल्लीं जीं कौशल्यें आपण सुधारलेल्या देशांत पाहतों तीं सर्व आपल्या देशांत नव्हतीं असें ह्मणण्यास आधार काय? ज्या लोकांच्या भाषेंत "चौदा विद्या व चौसष्ट कला" हे शब्द आहेत; ते शब्द उगीच कारणावांचून उत्पन्न झाले असतील असें मूर्ख मनुष्यावांचून कोण ह्मणेल? संपूर्ण कलांचा येथें उदय झाला होता किंवा नाहीं व हल्लींच्या सुधारलेल्या देशांत जीं कलाकौशल्यें निर्माण झालेलीं आहेत त्यांच्या मुळाशीं आमचेच कलाकौशल्याचे ग्रंथ आहेत किंवा कसें याबद्दल वाद करण्याचें हें स्थळ नव्हे. इतकी गोष्ट मात्र निर्विवाद आहे कीं, जसे इंग्रेजीभाषेंत इतर कलाकौशल्यावर ग्रंथ लिहिलेले आहेत तसेच संस्कृतभाषेंताहि लिहिलेले आहेत!! पण हें कोणाला? जो शोधील त्याला!!! ज्या भाषेंत शरीर हेंच एक यंत्र कल्पून त्या शरीराची पूर्ण उन्नती करण्याचें शास्त्र अथवा योग-शास्त्र निर्माण झालें आहे व जें शास्त्र सर्व शास्त्रांचें केवळ शिखर होय. जें

आर्यांना अतोनात प्रिय झालेलें आहे. ज्या शास्त्राचे योगानें आमच्यांतील कित्येक पुण्यात्मे संपूर्ण सृष्टीचे मालक अथवा प्रति परमेश्वररूप बनून आजपर्यंत तरून गेलेले आहेत; त्या भाषेंत इतर कलाकौशल्याच्या शास्त्रांचीं पुस्तकें अथवा ग्रंथ नव्हते, असें बिनदिक्कत विधान करणें ह्मणजे तें निव्वळ धाडस होय. ज्या लोकांच्या इतिहासांत विमानाच्या गोष्टी वाचावयास सांपडतात व ज्या लोकांची बुद्धि त्यांनीं विमान हें नांव त्या आकाशयानास दिलें ह्या एकाच गोष्टीवरून कशी सर्वोत्कृष्ठ होती हें दिसून येत आहे; त्या लोकांत कलाकौशल्याचे ग्रंथ नव्हते इतकेंच एव्हे तर त्यांस कलाकौशल्याची चांगलीशी माहितीही नव्हती असें एकदम ह्मणणें, ह्मणजे एक तर तें अज्ञानीपणाचें ठरेल किंवा द्वेषाचें लक्षण समजलें जाईल !! आर्यांत सर्वतऱ्हेचीं शिक्षणें होतीं; परंतु वर लिहिल्याप्रमाणें ब्राह्मणांचा अथवा उच्चवर्णाचा वाक्कौशल्याकडे विशेष ओढा होता.

पुढें मोंगलाच्या दांडग्या अमदानींत या शिक्षणाचा, शिक्षणग्रंथांचा व एकंदर सुधारणांचा कसा चुराडा उडाला, हें इतिहासज्ञास सांगणें नकोच. तरी पण आमचें जे अत्यंत प्रियशास्त्र—योगशास्त्र—तें मात्र आमच्यांतील कांहीं कांहीं परमपूज्य अशा संत मंडळींनीं तसल्या त्या दांडग्या अमदानींतहि पोटाशीं घट्ट कवटाळून धरलें होतें. त्यामुळें पुढें अशी मौज घडली कीं, सर्व शास्त्रें जरी आमच्यांतून अस्तंगत झालीं, तरी हें योगशास्त्ररूपी शुद्ध नवनित राहिलेल्या क्लिष्ट भाषारूप तक्रावर तरंगूं लागलें! आमची थोडीबहुत उन्नति होण्यास तोच मार्ग असून, तद्वारेंच पुढें संत मंडळी निर्माण होऊन आम्हीं आर्य मनुष्योन्नतिची एक एक पायरी पुढें चढत गेलों. जर हें सर्व शास्त्रांचें केवळ सारच असें शास्त्र आमच्यांत नसतें तर श्रीसमर्थ रामदासस्वामींसारखे नारायण अवतरून श्रीशिवाजीसारख्या नरास आपल्या हातीं धरून, जी मनुष्योन्नतिला अथवा आर्योन्नतिला पुनरपि गति मिळाली, ती मिळणें अशक्य होतें व यवनांच्या दांडग्या अमदानींतून वर डोकें काढणें आह्मां आर्यांस खचित खचित अशक्य झालें असतें पण सर्व शास्त्रांचा मेरुमणीच असें जें योगशास्त्र त्या शास्त्राच्या शिक्षणाची आह्मां आर्यांतून

## वर्तमानपत्र फुकट मिळविण्याची अजब युक्ति!

आमचे गणपू काका ह्मणजे मोठ्या कल्पक डोक्याचे! गावांत एकादी कोणतीहि नवीन कला सुरू झालेली असो; तिचे उत्पादक बहुत करून गणपू काका असावयाचे! निदान तिला गणपूकाकांचा भरपूर पाठिंबा तरी असलाच पाहिजे. आतां आह्मीं गणपूकाकांना ' काका ' ' काका ' ह्मणून संबोधितों आहों; यावरून हे आमचे खरोखरच काका आहेत कीं काय? असा भ्रम कदाचित् वाचकवर्गाला व्हावयाचा, याकरितां त्याचें पहिल्यानें निराकारण केलें पाहिजे.

वास्तविक पाहतां गणपूकाका हे आमचे काका नव्हत का कोणी नव्हत; परंतु लहानपणी त्यांचीं वडीलमाणसें लडिवाळपणानें त्यांना ' काका ' ' काका ' ह्मणून हाक मारित असत, तेवढ्यावरून साम्रत ते ग्रामकाकांच्या पदवीला येऊन पोहचलेले आहेत. काटकसरीनें संसार करण्यामध्यें गणपूकाकांनीं सर्व गावांत अगदीं पहिला नंबर पटकाविला आहे. परंतु एका गोष्टीमध्यें मात्र काकांनीं अतोनात उधळपट्टी आरंभिलेली दृष्टीस पडते; व तीजबद्दल काकांच्या परीचयाच्या सर्व मंडळीस राहून राहून आश्चर्य वाटल्याशिवाय रहात नाहीं; ती गोष्ट हीच कीं मासिक पुस्तकें, पाक्षिकें साप्ताहिकें, दैनिकें वगैरे सर्वप्रकारचीं वर्तमानपत्रें काकांजवळ भरपूर येत असतात. केव्हांहि पहा रोज २।४ वर्तमानपत्रें वगैरे गणपूकाकांच्या नांवें ठेविलेलींच. निदान एक तर आहेच आहे. पोष्टमनाचा पाय गणपूकाकांच्या घराला लागला नाहीं असा एकहि दिवस सुना जाणें शक्य नाहीं.

काकांनीं मराठीशिवाय गुजराथी, हिंदी, इंग्रजी, बंगाली, उर्दू वगैरे भाषांचें हि, र, ट, फ, करण्यापुरतें चुटपुटतें ज्ञान संपादन केलें होतें यामुळें काकांच्या संगतीला केव्हांहि येऊन बसा; अमक्या बंगालीपत्रानें काय मजा उडवून दिली आहे! तमकें हिंदीपत्र किती नामी निघालें आहे! केसरी तो केसरी त्याची सर का कोणाला येणार आहे! काळ खरोखर दुर्जनाचा काळ आहे. आजच्या भाल्यानें भाल्याची फेंक पण किती शिताफीनें केली आहे? हां शिंचा बाण ह्मणजे नांव सोनूबाई आणि हातीं कथलाचा वाळा ह्मणतात तशांतला आहे; आजचा इंदु अगदींच गचाळ निघाला, इंदु आणि मंद

मेंदु म्हणतात तें खोटें नाहीं. हीं गुजराथी पत्रें ह्मणजे अगदींच मवाळ. वगैरे वगैरे काकांच्या गप्पावरगप्पा अगदीं सुरू असावयाच्याच; यामुळें काकांच्या ह्या अगाध शिक्षणाभिरुचीचें व तत्प्रीत्यर्थ काकांनीं चालविलेल्या अगडबंब खर्चाचें सकृतदर्शनीं ज्याला आश्चर्य वाटणार नाहीं तो मनुष्यदेह-धारी पशूच होय. तरीहि भाजीकरितां दिडकीचा आणलेला गूळ आठ दिवस पुरवावयाचा तो एक दिवस कमी पुरविला तर त्याकरितां आकाशपाताळ एक करून कुटुंबाला दे माय धरणी ठाय करून सोडतांना काकांना ज्यांनीं वरचेवर पाहिलें असेल त्यांना काकांचीं वर्तमानपत्रें ह्मणजे एक गूढ कूट प्रश्नच आहे असें वाटल्याशिवाय राहणार नाहीं.

काकांच्या स्वभावामध्यें दुसरी एक मोठी गोम होती ती ही कीं, काकांकडे आलेलें वर्तमानपत्र ह्मणून दुसऱ्या कोणाला कालत्रयींहि वाचावयास मिळाव-याचें नाहीं. या बाबतींत काका पुरे निस्पृह आणि वर्तमानपत्रकारांचे पूर्ण पक्षपाती असत. त्यांच्याकडून चोख उत्तर मिळावयाचें कीं, आह्मीं पत्रें घेतों तीं कांहीं जगाकरितां घेत नाहीं. तशांत तुम्हांला वर्तमानपत्र वाचावयास देणें ह्मणजे बिचाऱ्या वर्तमानपत्रकाराचा एक वर्गणीदार कमी करणें आहे. तुह्मांला पोट आहे तसें त्या वर्तमानपत्रकाराला पोट नाहीं काय? असेच सर्व लोक जर दुसऱ्यानें घेतलेलें पत्र वाचूं ह्मणतील तर त्या वर्तमानपत्राला वर्गणीदार कोणी व्हावें? आणि तें वर्तमानपत्र कसें चालावें? काकांच्या या सयुक्तिक युक्तिवादापुढें बिचाऱ्या त्या वर्तमानपत्र मागूं जाणाऱ्या इसमाला अगदीं निरुत्तर होऊन जावें लागत असे; अर्थात् कोणाला झालें तरी काका काय आपल्या तोंडानें त्या वर्तमानपत्रांतील हकीगत सांगतील तेवढ्यावरच संतोषित व्हावें लागत असे.

आमचें घर काकांच्या घराच्या शेजारींच असून आमचा व काकांचा घरोबाहि चांगला होता; यामुळें इतक्या वर्तमानपत्रांच्या वर्गणीचें जबरदस्त ओझें सोसण्यासारखी काकांची सांपत्तिक स्थिति समाधानकारक नाहीं हें मला पूर्णपणें माहित होतें. तशांत काकांच्या खर्चीक स्वभावाचेंहि वर दिग्दर्शन केलेंच आहे; तेव्हां एवढें भयंकर ओझें काकांना कसें सोसत असावें याबद्दलची माझी जिज्ञासा वरचेवर वाढत चालली; परंतु तिचें समाधान

होण्याचा कांहींच मार्ग दृष्टीस न पडल्यामुळें शेवटीं हें काय गूढ आहे तें काकांकडूनच समजून घेण्याचा प्रयत्न करावा असा मी आपल्या मनांशीं निश्चय केला.

एके दिवशीं काका व मी एकमेकांशीं गप्पा झोंकित बसलों असतां पोष्ट-मननें दोन वर्तमानपत्रें काकांना आणून दिलीं; त्यांपैकीं एक बंगाली असून दुसरें उर्दू होतें. तेव्हां ही संधी चांगली आहे असें जाणून मी काकांना प्रश्न केला, काका, अहो तुमच्याकडे अशीं हीं निरनिराळीं वर्तमानपत्रें येतात तरी किती ? आणि यांच्या वर्गणीचा एवढा जबरदस्त बोजा तुह्मांला झेंपतो तरी कसा ? हा माझा प्रश्न ऐकतांच काकांनीं जरा चमत्कारिक नजर करून मजकडे पाहिलें; आणि मग उत्तर दिलें, अरे आज मला तूं हा काय अपूर्व प्रश्न विचारितोस ! मला वर्तमानपत्रांची गोडी किती आहे ही गोष्ट सर्व गांवभर प्रसिद्ध असून या प्रश्नाचें उत्तर का मी आपल्याच तोंडानें दिलें पाहिजे ? आतां वर्गणीविषयीं ह्मणशील तर मनाची हौस पुरविण्याला होईल तितकें पैशाचें नुकसान सोसण्यास तयार असलेंच पाहिजे, त्याला कांहीं इलाज नाहीं; तशांत आमची गोष्ट कांहीं न्यारीच आहे. त्यावर मी ह्मटलें काका न्यारी गोष्ट ती कोणती हेंच मला समजलें पाहिजे. ती गोष्ट मला सांगण्यासारखी नाहीं काय ?

या माझ्या प्रश्नानें आपण बोलण्याच्या आवेशामध्यें भलतीच गोष्ट बोलून गेलों असें आतां काकांना वाटलें असावें असें त्यांच्या मुखचर्येवरून मी सहज ताडिलें, पण माझ्या प्रश्नाला कांहींतरी उत्तर दिलें पाहिजे ह्मणून काका हसत हसत ह्मणाले, ‘ इतकीं पत्रें येतात तीं सारीं वर्गणी भरल्याशिवायच येतात असें का तुला वाटतें ? ’ मी ह्मणालों ‘ अहो वर्गणी भरल्याशिवाय यावयाचीं नाहींत हेंच तर काय तें त्यांतील गूढ ! फुकट मिळणारी एकादी वस्तु कोणी मिळविली तर त्यांत मोठें आश्चर्य तें कसलें ? सामर्थ्य नसतां एवढ्या वर्तमानपत्रांची वर्गणी तुमच्यानें कशी भरवते ? येथील कोणी नामांकित श्रीमंत गृहस्थ जरी इतकीं पत्रें घेऊं ह्मणतील तर त्यांनासुद्धां एवढा बेसुमार खर्च सोसण्याचा हिय्या होणार नाहीं. एका केसरीचेच दोन रुपये पांच आणे भरावयाचे तर त्याला किती मुदती किती बोभाटा ! आणि तुह्मांकडे पहावें तर

कधीं कोणाच्या वर्गणीबद्दल बोभाटा नाहीं, कांहीं नाहीं, हें आहे तरी काय? अशी काय तुमची एवढी जहागीर लागून गेली आहे ? '

काका जरा नरम येऊन ह्मणाले अरे, तुझें ह्मणणें खरें आहे; परंतु वर्तमानपत्रें मिळविण्याची आमची एक अजब युक्ति आहे; पण अद्याप तिचें पेटंट मिळविलें नसल्यामुळें ती तूर्त तुझ्यासारख्या उताविळ मनुष्याला सांगणें उपयोगी नाहीं. काकांच्या या चमत्कारिक उत्तरानें तर माझी उत्कंठा फारच वाढली; ती युक्ति सांगण्याविषयीं मी काकांचा सारखा पिच्छा पुरविला. युक्ति न सांगण्याविषयीं काकांनीं आपल्याकडून होती न होती तितकी शिकस्त करून पाहिली; परंतु युक्ति ऐकिल्याशिवाय मी स्वस्थ राहूं देणार नाहीं अशी काकांची पूर्ण खात्री झाल्यामुळें सदर युक्ति मी दुसऱ्या कोणाला सांगणार नाहीं असें माझ्याकडून कबूल करून घेऊन ती युक्ति मला सांगणें त्यांना भाग पडलें. युक्ति न फोडण्याविषयीं जरी मी काकांजवळ कबूल केलें आहे, तरी मित्रांच्या–वाचकांच्या–करमणुकीकरितां म्हणून तरी सदर युक्ति वाचकांना निवेदन करावी अशी माझी मनोदेवता मला आज्ञा करिते. शिवाय ही युक्ति मी प्रसिद्ध केली ही गोष्ट आतां काकांना कळणें फारसें शक्य नाहीं; कारण त्यांची युक्ति असलेला अंकहि आतां त्यांच्या हातांत जाऊन पडेल ही गोष्ट असंभवनीय आहे. बरें, मित्राच्या वाचकांपैकीं कोणी सदर गोष्ट त्यांच्या कानावर घालील ह्मणावें तर मित्राचे वाचक इतके चहाडखोर असतील असें माझी मनोदेवता मला सांगत नाहीं.

काकांची युक्ति ह्मणजे दुसरें कांहीं नाहीं. आपल्याला साधारण समजतात अशा भाषांत निघणारीं दैनिकें, साप्ताहिकें, पाक्षिकें, मासिकें, त्रैमासिकें, वगैरे सर्व प्रकारचीं वर्तमानपत्रें यांची काकांनीं एक लांबलचक यादी करून ठेविलेली आहे; या यादींत पत्राचें नांव पत्र कधीं निघतें तो वार, अगर महिना, व पत्र मिळण्याचा पत्ता हीं नमूद करून ठेविलेलीं आहेत. हल्लींच या यादींत सुमारें हजार बाराशें पत्रांचा संग्रह झाला असून नित्य नवीन नवीन पत्ते मिळविण्याचा काकांचा उद्योग सारखा सुरू आहे. एखाद्या नवीन पत्राची जाहिरात कोठेंहि झळकली कीं त्याचा शिरकाव आमच्या काकांच्या यादींत झालाच म्हणून समजावें काकांचा नित्यक्रम असा आहे

कीं, त्यांचीं रोज निदान दोन तरी कार्डे या यादींतील पत्रकारांकडे नमुन्याचा अंक पाठविण्याकरितां अनुक्रमानें जावयाचींच; एकाद्या दिवशीं लहर लागल्यास जास्तहि जातात. यादींत हजार बाराशें नांवें असल्यामुळें एका पत्रकाराला पत्र पाठविलें कीं, त्याची पाळी पुनः दोन अडीच वर्षांशिवाय येत नाहीं; इतक्या मुदतीपर्यंत आपण या इसमाला मागें नमुन्याचा अंक रवाना केला आहे असें स्मरण राहणें शक्य नाहीं. वर्तमानपत्रकार वर्गणीदारांचे गरजू असतातच, यामुळें शेंकडा नव्याण्णव तरी नमुन्याचे अंक काकांकडे रवाना व्हावयाचेच. या अजब युक्तीमुळें केवळ कार्डांकरितां रोज दोन दिडक्या खर्च केल्यानें रोज नवीं नवीं दोन पत्रें काकांनां बिनधोक वाचावयास मिळतात. एक डेली पत्र घ्यावयाचें ह्मटलें तरी त्याच्या वर्गणीचा निदान ९।१० रुपये बोजा डोक्यावर घेतला पाहिजे. त्याला पुनः आठवड्याची सुट्टी असून त्यांत रुचीवैचित्र्यहि फारसें कांहीं नाहीं; पण इतका बोजा एकदम शिरावर न घेतां केवळ रोज २।२ दिडक्या खर्चून निरनिराळ्या जातीचीं दोन दोन पत्रें काका रोज खुशाल मिळवित असतात. काकांकडे येणाऱ्या पत्रांची किंमत कधीं कधीं चार आठ आणेपर्यंतहि होऊं शकते. कां कशी आहे काकांची पत्रें फुकट मिळविण्याची अजब युक्ति !

वाचकहो ! सदरहू युक्तीचे उत्पादक काका आहेत, अर्थात् त्यांच्या युक्तीचा पूर्ण फायदा त्यांनाच मिळाला पाहिजे. काका हे हल्लीं सदरहु युक्तीचें पेटेन्ट मिळविण्याच्या खटपटींत आहेत; तेव्हां तें पेटेन्ट मिळेपर्यंत तरी सदरहु युक्तीचा उपयोग आपल्यापैकीं कोणी करूं नये अशी आपणास माझी आग्रहाची शिफारस आहे. नाहींपेक्षां माझ्यावर काकांचा विश्वासघात केल्याचें पातक येईल व त्या पापाबद्दल तुह्मी जबाबदार व्हाल. यदाकदाचित् या युक्तीचें अनुकरण करण्याचा मोह कोणाला झालाच तर त्यानें त्याबद्दल निदान भरपूर मोबदला तरी काकांना पोंचविण्यास चुकूं नये.

मधुकर.

---

## कुसंग.

( वसंततिलका. )

शेतांत एक शुक सुंदर पंचरंगी ।
    बोले किती मधुर दे सुख अंतरंगीं ॥
स्वातंत्र्य पूर्ण विचरे रिझवी मुलांतें ।
    टाकीत धान्य कण शेतकरी तयातें ॥ १ ॥

एके दिनीं गहुं उभा बहु काक खाती ।
    राघूहि खात मिसळे न धरोनि भीती ॥
मोदें करी किलबिलाट पिकांत नाचे ।
    काकाहुनी शुक करी नुकसान साचें ॥ २ ॥

आला धनी भरुनि घेउनि बंदुकीला ।
    घाली छरे अहह ! कार्य अनर्थ झाला ॥
घायाळ होउनि पडे शुक दैवहीन ।
    काकासवें वारित ही कुदशा मलीन ॥ ३ ॥

नेतां घरांत उपचार करावयास ।
    बोले कृषीवल कुसंग फळे शुकास ॥
काकासि संगत करूनि न हा रहाता ।
    " जाणा सदैव सुखरूप मजेंत होता " ॥ ४ ॥

सांभाळिती शुक मुलें बहु काळजीनें ।
    झालें असें, वदति त्यास कुसंगतीनें ॥
हो नेहमीं श्रवण शब्द कुसंग पाठ ।
    राघू ' कुसंग ' वदुनी करि मान ताठ ॥ ५ ॥

झाला वरा शुक सुखें मग जात शेतीं ।
    तेथें मुलें हंसत हाक तयास देती ॥
तोही उभा तरुवरी लवलाहि डोलें ।
    दुःख स्वरें मग " कुसंग, कुसंग " बोले ॥ ६ ॥

" दर्भ "

---

## लाला वृंदावन व मोरस साखर.

कांहीं दिवसांपूर्वी मॉरिशियस येथून मोठ्या मुष्किलीनें परत आलेले तरुण देशभक्त लाला वृंदावन यांची व आमची भेट ता. ६।११।०८ रोजीं मुंबई येथें झाली. सदरहु हकिकतींसंबंधानें विचारितां लालाजी ह्मणाले कीं, यापेक्षांही पुष्कळ दुःखें सांगण्यासारखीं

आहेत. ही प्रसिद्ध केलेली माहिती कांहींच नाहीं. असो. त्यावेळीं आम्हीं व आमच्या इतर स्नेह्यांनी लालाजी परत आल्याबद्दल आभार प्रदर्शित केले. लालाजींनी जी माहिती अनेक पत्रांतून प्रसिद्ध केली आहे; तिच्यांतील सारांश केसरीवरून यापुढें देत आहों तो असा:—

लाला वृंदावन यांनीं मॉरिशियस येथील हिंदी मजुरांची जी हृदयद्रावक स्थिति वर्णन केली, ती ऐकल्याबरोबर अंगावर रोमांच उभे राहतात. शेतांत काम करणाऱ्या मजुरांनीं ऊंसाचा एखादा तुकडा तोंडांत घातला तर मळेवाले त्यांचे दांत पाडितात, अशी क्रूर व सैतानी शिक्षा मॉरिशियस बेटांत चालू आहे. सर्व हिंदुस्थानभर ह्या गोष्टीचा विचार होण्याकरितां 'मारिशियस मजूरसंरक्षणसभा' स्थापन करण्याचा माझा व माझ्या कांहीं स्नेह्यांचा विचार आहे; व यासंबंधानें व्हाइसरायसाहेब, मॉरिशियस येथील गव्हर्नर व पार्लमेंटचे सभासद यांशीं लवकरच पत्रव्यवहार सुरू होणार आहे.

लाला वृंदावन यांनीं मॉरिशियस येथील साखर तयार करण्याची कृति 'आर्य ग्याझेट' लाहोर या पत्रांत प्रसिद्ध केली आहे. मॉरिशियस बेटांत ऊंसाचें दांडगें पीक आहे. तेथील ऊंस तांबडा असतो. तो इतका जोरानें वाढतो कीं, एका मजुराला फक्त तीनच ऊंस डोकीवरून नेतां येतात !

प्रथम ऊंसाची गंडेरी तयार करितात. नंतर यंत्रानें त्यांचा रस काढतात. रसाचा पाटासारखा प्रवाह एका मोठ्या टाकींत जाऊन पडतो. नंतर तेथून तो कढयांत ओतून काकवी बनेइतका कढवितात. प्रत्येक कारखान्यांत अशा पंचवीस तरी कढया असतात. ही कढयांतील काकवी ( शिरा ) लांकडी पिपांत भरून कारखान्यांत ठेवतात. यानंतर या काकवीची साखर बनविण्याची कृति सुरु होते. ही काकवी कढईंत घालून पुनः कढवितात, तेव्हां तिच्यांतील मळ निघण्यासाठीं तिच्यांत हाडांची भुकटी सोडतात; त्यामुळें सर्व मळी वर येऊन स्वच्छ रस खालीं राहतो. मळी काढून टाकून साफ झालेला रस साखर करण्याच्या यंत्रांत ओततात. यंत्रावर एक मोठा फुग्यासारखा शिसा असतो. त्याला लहान लहान भोंकें असतात. ह्या शिशांत चर्बी भरलेली असते. ती चर्बी हळूहळू यंत्रांतील काकवींत गळते व चर्बीच्या साह्यानें रवेदार साखर तयार होते. चर्बी कोणत्या जनावरांची असते हें सांगतां येत नाहीं; परंतु चर्बीच असते, हें खास.

लाला वृंदावन ह्मणतात—"कोणाचेंहि नुकसान करण्याच्या इरायानें मी ह्या गोष्टी जाहीर करीत नाहीं. मी आर्यसमाजिस्ट असल्यामुळें निषिद्ध पदार्थ माझ्या धर्मबांधवांच्या पोटांत न जाऊं नये, ह्मणूनच ही खरी हकीकत मी लोकांपुढें मांडीत आहें. मी दीड वर्ष मॉरिशियस बेटांत होतों, त्यामुळें मला मोरस साखर चांगली ओळखतां येते. हल्लीं इकडे स्वदेशी ह्मणून विकली जाणारी बरीच साखर मोरस साखरेचें रूपांतर आहे. तेव्हां स्वदेशांत सन्मान्य गृहस्थांच्या देखरेखीखालीं शुद्ध स्वदेशी साखर तयार होऊं लागेपर्यंत माझ्या धर्मबांधवांनीं गूळच खावा, अशी माझी आग्रहाची प्रार्थना आहे.

मॉरिशियस बेटांत हाडांचा चुरा मुंबईतूनच जातो. तो दोनप्रकारचा असतो. चांगला बारीक चुरा साखर शुद्ध करण्याचे कामीं व वाईट जाडा चुरा खतासाठीं वापरतात.

हाडांचा चुरा मॉरिशियस बेटांत मुंबईतूनच जातो, याबद्दल मुंबईच्या लोकांनीं आपल्या स्वतःच्या खात्रीसाठीं तपास करावा.

लाला वृंदावन हे तरुण स्वदेशभक्त आहेत. ते परदेशी साखर मुळींच खात नाहींत. जेथें पूर्वी उंसाची लागवड होती, परंतु आतां शेतकऱ्यांची दैना झाल्यामुळें त्यांनीं ती सोडली आहे, अशा सर्व ठिकाणीं जाऊन ऊंसाच्या लागवडीकडे लोकांचें लक्ष जावें असा उपदेश करीत ते फिरणार आहेत "

---

## पोंच व अभिप्राय.

**श्री सद्गुरु वासुदेवानंद सरस्वति टेंभे स्वामी यांचें जीवनचरित्र—पूर्वार्धः**-हें पुस्तक दे. नारायण दत्तात्रय नंदगावकर यांनीं लिहिलें असून, दे. हणमंतराव गोपाळराव फाळके. लष्कर ग्वाल्हेर. यांनीं प्रसिद्ध केलें आहे. श्री टेंभे स्वामी आज काल बहुधा सर्वप्रसिद्ध आहेत. ते सिद्ध आहेत. प्रत्यक्ष श्री दत्तात्रयाचे अवतार आहेत. अशी भाविकाची दृढ भावना आहे. त्यांच्या जन्मापासून त्रोटक चरित्र या पुस्तकांत दिलेलें आहे. शेवटीं त्यांनीं केलेल्या ग्रंथांची यादीही दिली आहे. ती पाहतां हे स्वामी कवीही होते असें दिसतें. हे सुचरित्र ह्मणून वाचण्यास योग्य आहे पुस्तकाची भाषा असावी तशी नीट नेटकी नाहीं व छपाईचें कामही तसेंच झालें आहे· द्वितियावृत्तीचेवेळीं तरी प्रकाशकांनीं या गोष्टींचा अवश्य विचार करावा.

**घरचा शिंपी भाग १ लाः**-हें लहानसें पुस्तक दे. बाळकृष्ण नारायण बर्वे पनवेल, यांनीं लिहिलें आहे. याच्या नावावरूनच यांत कोणत्या विषयाचें विवेचन केलें आहे तें सहज समजण्यासारखें आहे. याच विषयावर मराठी भाषेत यापूर्वि एकदोन पुस्तकें प्रसिद्ध झालीं आहेत. त्यांत आणि प्रस्तुत पुस्तकांत फरक ह्मटला ह्मणजे इतकाच आहे कीं यांत विषयाच्या सुलभपणाकरितां आकृति दिल्या आहेत. 'कपडे शिवणें' ही एक कला आहे. कोणत्याही कलेचा अभ्यास प्रत्यक्ष गुरुजवळ कांहीं दिवस तरी करावा लागतो. नुसतीं पुस्तकें वाचून कांहीं उपयोग होण्यासारखा नाहीं. एखादा तैलबुद्धीचा कल्पक मनुष्य असला तर त्याची गोष्ट निराळी! याचा अनुभव अनेकांनां आला असेलच या पुस्तकांत आलेल्या कपड्यांचें व त्यांच्या भागांचें वर्णन जितकें पद्धतशीर देतां आलें तितकें यांत सोप्या भाषेत दिलें आहे. अशाप्रकारचीं पुस्तकें भागशः प्रसिद्ध न करितां एकदमच प्रसिद्ध केलीं असतां जिज्ञासूनां त्याचा विशेष उपयोग होईल असें आह्मांस वाटतें.

शेवटीं पारिभाषिक शब्दांचा ह्मणून कोश जोडलेला आहे. पण कपडे वापरणारांना आणि शिवणारांना हे शब्द पूर्ण माहीत झालेले आहेत. ह्मणून हा भाग देऊन जागा अडविण्यापेक्षां दुसरी कांहीं उपयुक्त माहिती दिली असती तर बरें झालें असतें. मुख्य प्रमाणाचे पोटहिस्से ह्मणून शेवटीं जें एक कोष्टक जोडिलें आहे, तें मात्र बरेंच उपयुक्त आहे.

द्वितियावृत्तीचा सुप्रसंग आल्यास पुस्तककारानीं पुस्तकाच्या छपाईकडेही चांगलें लक्ष

यावें व यापुढील भाग तरी बराच मोठा काढून तिसऱ्या भागाची आवश्यकता राहू देऊं नये अशी आह्मीं सूचना करितों.

**चार चरित्रात्मक लेखः**—कै. हरि माधव पंडित यांनीं विविधज्ञानविस्तार मासिक पुस्तकासाठीं लिहिलेल्या चार लेखांचा यांत संग्रह केला आहे. यांत १ कै. कृष्णशास्त्री चिपळूणकर, २ सौ डा. आनंदीबाई जोशी एम्. डी. ३ जनार्दन बाळाजी मोडक बी. ए. आणि ४ जावजी दादाजी यांचीं चरित्रें आलीं आहेत. चरित्रकारांच्या रीतीप्रमाणें नुसतीं चरित्रेंच न देतां 'चरित्रात्मक लेख' दिले आहेत. कै. पंडीत हे मोठे मार्मिक मराठी लेखक होते हें प्रसिद्धच आहे. तेव्हां हे चरित्रात्मक लेख वाचनीय आहेत, हें सांगण्याची आवश्यकता नाहीं. हें पुस्तक नाडकर्णी आणि मंडळी मुंबई यांनीं प्रसिद्ध केलें असून, त्याची छपाईही चांगली झाली आहे. पुस्तकाच्या मानानें किंमतही थोडीच–८६ आणे आहे,

**मोगऱ्याचीं फुलें-गुच्छ २ राः**-यांत सुप्रसिद्ध महाराष्ट्र कवि गं. रा. मोगरे यांच्या कांहीं कवितांचा संग्रह असून हे पुस्तक नाडकर्णी आणि मंडळी–मुंबई यांनीं प्रसिद्ध केलें आहे. आज कालच्या महाराष्ट्र कवींत रा. मोगरे हे श्रेष्ठ प्रतीचे कवि आहेत. त्यांची कविता अत्यंत रमणीय असून भाषा साधी परंतु गंभीर आहे. प्रस्तुत गुच्छांत १० प्रकरणांतल्या कविता आल्या आहेत. 'कन्यादान' हें पहिलेंच प्रकरण आहे. त्यांतली नववी कविता अशी आहेः—

" नाना वस्तु जगीं रसाल दुसऱ्या आहेत राया तरी ।
सर्वांहून हिर्चाच फार रसिकीं वाखाणिली माधुरी ॥
येतो वीट विशेष पान करितां अन्यारसांचें जना ।
जावें सेवित हीत तों अधिकची उल्हास वाटे मना ॥ "

हें कविता-माधुरीचें वर्णन यथातथ्य नाहीं असें कोण ह्मणेल ?

'हिंदुस्थानावर शिकंदराची स्वारी' या प्रकरणांत आर्यपुत्र हिमालयाचें वर्णन करितांना ह्मणतोः—

पुढें आला वाटे बिकट पथ हा थोर मजला ।
ह्मणाया जो पांथा त्वरित परता हेंच सजला ॥
पहावें ज्या ठायां हिमचि दिसतें सर्व तिकडे ।
वरी अभ्रें, खालीं हिम, न तिसरें दृष्टीस पडे ॥

'सह्याद्री' चें वर्णन केवळ १२ पद्यांतच केलेले आहे पण तेंही फार बहारीचें झालें आहे.

" ज्याचा मावळुनी प्रतापतरणी केव्हांच गेला तरी ।
गर्वें मान वरी करोनि बसला जो ह्या गिरीच्या शिरीं ॥
तो हा पाहुनिया प्रतापगड त्या राया शिवाची कृती ।
त्याच्या वाघनखांसह स्मरुनियां तल्लीन होते मती ॥ "

'गृहस्थाश्रमा' चें वर्णन करिताना दुर्व्यसनासक्त माणसाच्या स्थितीचें चित्र उत्तम रेखाटलें आहे.

' दुर्व्यसनें द्रव्याची होय यशाचीहि आपुल्या होळी ।
इहपरलोकसुखाची मग कां व्हावी न राखरांगोळी ॥

अस्तु; एकंदरींत हें पुस्तक चांगलें वाचनीय आणि अवश्य संग्रहणीय असें आहे. प्रसिद्ध निर्णयसागर छापखान्यांत छापिलें असल्यानें तें सर्वांगसुंदर झालें आहे हें सांगण्याची कांहीं गरज नाहीं. किंमतही अगदीं बेताचीच ८६ आणे आहे. कधींही न कोमेजणाऱ्या या मोगऱ्याच्या फुलांचा रसिकांनीं अवश्य संग्रह करावा, असें आह्मी सुचवितों.

**लो. टिळक यांजवरील दोन पदें**:—हीं ' गोविंदकविकृत असून, नाशिकचे दे. शंकरगीर हनुमंतगीर यांनीं प्रसिद्ध केलीं आहेत. पदें बरीं आहेत

**सूचीपत्रः**—ज्यो. भाऊ गोरख पंडित लोणखेडें-शहादें-खान्देश यांच्या श्री अन्नपूर्णा ज्योतिषालयांत होणाऱ्या ज्योतिषसंबंधीं कामाच्या माहितीचें सूचिपत्र पावलें. सदर ज्योतिषालयांत ८८ आण्यापासून तों ५० रुपयेंपर्यंत जन्मपत्रिका वगैरे तयार होत असतात. शेवटीं, विक्रीच्या ज्योतिष पुस्तकांची यादी दिली आहे. हें सूचिपत्र फुकट मिळतें तरी ज्योतिषशास्त्राच्या भोक्त्यांनीं इकडे अवश्य लक्ष द्यावें अशी आह्मी सूचना करितों.

## वर्तमानसार.

सार्डिनिया नांवाची बोट माल्टा येथून इजिप्टला जात असतां माल्टापासून सुमारें एक मैलावर जळून गेली आहे. तिजवर एकंदर अडीचशें मनुष्यें होतीं. त्यांत आरबलोकांचा भरणा जास्त होता. सदरहु बोटीवरील एक मूल खेरीज करून बाकी सर्व युरोपीयन उतारू वाचले आहेत असेंही कळतें.

—खोट्या मनिआर्डरी काढून पांचहजार चारशें रुपयांची अफरातफर केल्याचे आरोपावरून लाथी येथला पोष्टमास्तर पकडला आहे असें समजतें.

—सध्यां मद्रासची रेलवे सीलोनच्या रेलवेला जोडण्याचा बेत चालला आहे. या दोन्ही प्रदेशांमधलें अंतर सतावन मैलांचें आहे.

—नागपूर येथील महाराजबागेंतला महाराणी व्हिक्टोरिया यांचा पुतळा कोणी दुष्टानें डांबर फांसून विद्रूप केला आहे. संशयानें ४५ इसमाना धरलें आहे. अत्याचार करणाराचा जो कोणी पत्ता लावून देईल त्याला १ हजार रुपये बक्षीस लाविलें आहे.

—ज्युबिलीप्रीत्यर्थ जाहीरसभा—" राणी साहेबांनीं १८५८ सालीं जाहीरनामा काढला त्यांतील कांहीं आश्वासनें सिद्धीस नेण्यांत आलीं याबद्दल आह्मांला कृतज्ञता वाटते. बादशहाच्या कृपाळु मातोश्रीनें आह्मांस जीं आश्वासनें दिलीं आहेत तीं सर्वस्वीं पुरीं करण्याबद्दल आमची बादशहाजवळ नम्र विनंति आहे. राणीसाहेबांचा जाहीरनामा हा आमच्या राजकीय स्वातंत्र्याचा ठेवा आहे अशी लोकांची रास्त समजूत आहे. बादशहास दीर्घायुष्य प्राप्त होऊन त्यांचा उत्कर्ष उत्तरोत्तर वृद्धिंगत होत जावो अशी हिंदुस्थानवासीयांची ईश्वराजवळ प्रार्थना आहे "

# रमणीय वेंचे.

( मागील अंकावरून पुढें चालू )

उपकारोऽपि नीचानामपकारो हि जायते ।
पयः पानं भुजङ्गानां केवलं विषवर्धनम् ॥ ७० ॥

निचावर उपकार केला तर अपकारच होतो, जसें सर्पाला दूध पाजिलें असतां तें विषच होतें.

जनिता चोपनेताच यस्माद्विद्यां प्रयच्छति ।
अन्नदाता भयत्राता पञ्चैते पितरः स्मृताः ॥ ७१ ॥

जन्म देणारा, उपनयनसंस्कार करणारा, विद्या शिकविणारा, अन्न देणारा आणि भयापासून मुक्त करणारा हे पांच पित्यासमान होत.

निर्वाणदीपे किमु तैलदानं चौरेगते वा किमु सावधानम् ।
वयोगते किं वनिताविलासः पयोगते किं खलु सेतुबन्धः ॥७२॥

विझालेल्या दिव्यांत तेल घालून काय उपयोग ? चोर चोरी करून निघून गेल्यावर सावध राहाण्यांत काय अर्थ ? उतारवय झाल्यावर स्त्रीविलासाचा काय उपयोग ? पाण्याचा पूर येऊन गेल्यावर बांध घालण्यांत होईल काय ?

प्रथमे नार्जिता विद्या द्वितीये नार्जितं धनम् ।
तृतीये न तपस्तप्तं चतुर्थे किं करिष्यसि ॥ ७३ ॥

बालवयांत विद्या संपादन केली नाहीं, तारुण्यांत पैसा मिळविला नाहीं. नंतर ( वयाचे तिसरे भागांत ) तपाचरण केलें नाहीं तर, मग वृद्धपणी काय करणार !

अश्वारूढः पयः पानं गजारूढश्च मैथुनम् ।
शिबिकी मर्दनं चैव पादचारी च भोजनम् ॥ ७४ ॥

घोड्यावर स्वारी करून आलेल्यास दूध प्राशन, हत्तीवर बसून आलेल्यास स्त्रीसंभोग, पालखींत बसून आलेल्यास अंगमर्दन आणि पायीं चालून आलेल्यास यथेष्ट भोजन, हीं उक्त होत. ( श्रम परिहार होतात. )

लालयेत्पंचवर्षाणि दशवर्षाणि ताडयेत् ।
प्राप्ते तु षोडशे वर्षे पुत्रं मित्रवदाचरेत् ॥ ७५ ॥

मुलगा पांच वर्षांचा होईपर्यंत त्याचें लालन ( लाड ) करावें. दहा वर्षांचा होईपर्यंत त्यास ताडण ( हट्टाबद्दल ) करावें. सोळा वर्षांचा होईपर्यंत त्यास पाळावें, नंतर त्यास मित्राप्रमाणें वागवावें.

पुस्तकं वनिता वित्तं परहस्तगतं गतम् ।
यदि चेत्पुनरायाति नष्टं भ्रष्टं च खण्डितम् ॥ ७६ ॥

पुस्तक ( पोथी ), स्त्री, आणि द्रव्य, हीं दुसऱ्याचे हातीं गेलीं म्हणजे तीं गेलींच असें समजावें. कदाचित तीं परत आपल्या हातीं आलींच तर अनुक्रमें फाटलेलीं, भ्रष्ट झालेलीं, आणि अपुरीं अशीं यावयाचीं.

दुर्बलस्य बलं राजा बालानां रोदनं बलम् ।
बलं मूर्खस्य मौनत्वं चोराणामनृतं बलम् ॥ ७७ ॥

बलहीनाचें बळ राजा, मुलांचे बळ रडणें, मूर्खाचें बळ मौन्य ( न बोलणें ) व चोराचें बळ खोटें बोलणें होय.

भार्या रूपवती शत्रुः पुत्रः शत्रुरपण्डितः ।
ऋणकर्ता पिता शत्रुर्माता च व्यभिचारिणी ॥ ७८ ॥

सुरूपी भार्या शत्रूच समजावी, पंडीत ( शाहणा ) नव्हे असा पुत्र शत्रुसम होय, ऋण ( कर्ज ) करून ठेवणारा पिता ( बाप ) शत्रू होय, आणि व्यभिचार करणारी आईही शत्रूच समजावी.

वृद्धकाले मृता भार्या बन्धुहस्तगतं धनम् ।
भोजनंच पराधीनं त्रयं पुंसां विडम्बनम् ॥ ७९ ॥

म्हातारपणीं बायको मरणें, बंधूच्या हातीं सर्व द्रव्य जाणें, पराधीन होऊन भोजन मिळणें हीं तीनीही मनुष्याची विटंबना करितात.

अधमाधनमिच्छन्ति धनमानौ च मध्यमाः ।
उत्तमा मानमिच्छन्ति मानोहि महतां धनम् ॥ ८० ॥

अधम ( कनिष्ट, नीच ) लोक धनाची इच्छा करतात, मध्यम लोक धन व मान याची इच्छा करतात, आणि जे उत्तम असतात ते फक्त मानाचीच इच्छा करतात, कारण मान हेंच त्यांचें धन होय.

अन्नाद्भवन्ति भूतानि पर्जन्यादन्नसंभवः ।
यज्ञाद्भवति पर्जन्यो यज्ञः कर्मसमुद्भवः ॥ ८१ ॥

अन्नापासून प्राणीमात्राची उत्पत्ती होते; तें अन्न पाऊस पडल्यानें उत्पन्न होतें. तो पाऊस यज्ञयागादि सत्कर्मानी पडतो, आणि तो यज्ञकर्मापासून उत्पन्न होतो.

दीपो भक्षयते ध्वान्तं कज्जलं च प्रसूयते ।
यथान्नं भक्षयेन्नित्यं जायते तादृशी प्रजा ॥ ८२ ॥

दिवा काळोख खातो ( अंधःकाराचा नाश करितो ) आणि कजळ ( काजळ ) उत्पन्न करतो. कारण जसें अन्न खावें तशी प्रजा उत्पन्न होते.

मन्त्रे तीर्थे द्विजे देवे दैवज्ञे भेषजे गुरौ ।
यादृशीं भावनां कुर्यात्सिद्धिर्भवति तादृशी ॥ ८३ ॥

मंत्र, तीर्थ, ब्राह्मण, देव, ज्योतिषी, औषध आणि गुरु यांच्याठायीं जशी भावना धरावी, तसें फळ मिळतें.

( अपूर्ण. )

# कडबा कापण्याचे यंत्राच्या

## उपयुक्ततेविषयीं मुंबई सरकारचा अभिप्राय.



आमचे पेटेंट कडबा कापण्याच्या यंत्राची आह्मींच प्रशंसा करितों व विक्री होण्यासाठीं वर्तमानपत्रांतून कांहीं तरी उगीच भपकेदार जाहिराती देतों, अशी ज्यांची समजूत असेल त्यांनीं ता. २७ जून सन १९०८ चा नंबर ६४६८ चा सरकारी ठराव, रेविन्यु डिपार्टमेंट, प्यारा २ पहावा. त्यांत सरकारांनीं असें स्पष्ट ह्मटलें आहे कीं, कडबा कापण्याचें यंत्र वापरल्यापासून एक तृतियांश कडबा हटकून वांचतोच. ह्मणून मुंबई इलाख्यांतील सर्व कलेक्टर साहेबांनीं आपआपल्या रयत लोकांच्या हिताकरितां आमचे यंत्राचा उपयोग समजावून देऊन त्यांचा खप झपाट्यानें करवावा अशी सरकारांनीं स्वतः सूचना केली आहे.

गरीब शेतकऱ्यांना सुद्धां आमच्या यंत्राचा मुबलक फायदा घेतां यावा ह्मणून आह्मीं त्यांच्या किंमती ता १ आगष्ट १९०८ पासून कमी केल्या आहेत. विशेष माहितीकरितां हस्तपत्रकें मागवा.

किर्लोस्कर बंधु—बेळगांव.

## इहवृत्त आणि निवडक वेंचे.

**खानापूर**—थंडीनें आपला अमल गाजविण्यास सुरवात केली आहे. बेळगांव-शहापूर येथें प्लेग सुरू आहे. सुगीचा हंगाम असतांही धान्य तेजीचें आहे. बाहेर धान्य फार जात असल्यामुळें ही महागाई आहे.

—'रेनर्ड' नांवाची नवीन गाडी मेसर्स फिलिक्स निक्सन् कंपनीनें मुंबईस आणिली आहे. ही रुळाशिवाय रस्त्यावरून मोटारप्रमाणें चालते. हिला सुमारें ८० पासून १०० घोड्यांच्या शक्तीचें इंजिन जोडलें आहे. एक उतारूंचा व दोन मालाचे डबे आहेत. दर तासास १२ मैलप्रमाणें हिचा वेग आहे. गाडी चालविण्यास दोन मनुष्यें लागतात.

—मद्रासची राष्ट्रीयसभा ता २८।२९।३० रोजीं भरणार असल्याचें प्रसिद्ध झालें आहे. ना. गोखले विलायतेहून ३ तारखेला निघून १८ डिसेंबरला मुंबईस येतील.

—"गौडसारस्वत ब्राह्मण परिषदेची दुसरी बैठक ता २८।२९ व ३० डिसेंबर रोजीं मंगळूर येथें 'भुवनेंद्र' सभासदनांत भरणार आहे जाणारांनीं नांवें कळवावीं.

—सर्पदंशावर परमँगनेट ऑफ पोटॅश हें औषध चांगलें लागू पडतें असा अनुभव येत चालला आहे. १९८ माणसांस गेल्या सालीं हें दिलें होतें पैकीं २३ माणसें दगावलीं.

—एक आण्याचें निकलचें नाणें लोकप्रिय झाल्यामुळें अर्ध आण्यांचें पाडण्याचा सरकारचा विचार चालला आहे

—पुण्याच्या सिटीमॅजिस्ट्रेटवर बांब फेंकणार असी लोणकढी थाप रामचंद्र विठ्ठल वाघ नांवाचे मनुष्यानें दिली होती. सदर वाघानें ज्यांचीं नावें कळविलीं होतीं त्यांचीं घरें झडती करून पहातां कांहींच मिळालें नाहीं पुढें वाघावर खोटी खबर दिल्याबद्दल काम चालून चार महिन्याची सक्तमजुरीची शिक्षा सांगण्यांत आली.

—बाबू सुरेंद्रनाथ बानर्जी, बाबू मोतीलाल घोष, आश्विनीकुमारदत्त, राजेंद्र मुकर्जी व कृष्णकुमार मित्र यांना हद्दपार करणार असें एक पत्र छापतें.

**—विषप्रयोगानें गुरें मरतात त्यावर उपाय**—सोमल किंवा कण्हेरीच्या मुळ्या गुरांस खावयास घातल्या तर तीं मरतात, त्यावर खालीं लिहिलेले उपाय करावे:—

शिकेकाई बियांसकट ताकांत वाटून गुराचे शक्तीप्रमाणें पाजावी; २-पाणकांद्याचा रस एक शेर व त्याचे चतुर्थांश तूप एकत्र करून पाजावें; ३-केळीच्या कांद्याचा रस सुमारें २ शेर, कात २ तोळे व फटकी ( तुरटी ) १० तोळे एकत्र करून दिवसांतून ३ वेळ पाजावें.

—स्वच्छ आणि शुद्ध साखर बनविण्यासाटीं आगाशी येथें एक कंपनी स्थापन झाली आहे आणि तिचा प्रत्येक भाग दहा रुपयांचा असून त्यांपैकींही एकेकच रुपया सदर कंपनी मागविणार आहे.

—कापुराची लागवड—पश्चिमी कापुराच्या झाडांची लागवड फारच मोठ्या प्रमाणावर सीलोनला होत आहे. लवकरच वर्षास ऐंशीं लक्ष रत्तल कापूर सीलोनला तयार होऊं लागेल असा अंदाज असल्याचें समजलें आहे.

# लोकमित्र.

## नाना फडणवीस.

( मागील अंकावरून समाप्त. )

ही हकीगत नाना फडनवीसांच्या कानीं जातांच त्यांनीं घाबरून पटवर्धन, होळकरादि सरदारांच्या अनुमतानें असें ठरविलें कीं, शिंद्यांनीं योजिलेली मसलत आपणच करून टाकावी ह्मणजे आपली अब्रू राहील, बाजीरावांच्या मनांत आपल्याविषयीं असलेला द्वेष कमी होईल व शिंद्यांशीं आजच लढाईचा आलेला प्रसंग टळेल. असा विचार करून त्यांनीं परशुरामभाऊंस बाजीराव व चिमाजीआप्पा यांस आणण्याकरितां ताबडतोब शिवनेरीस पाठवून दिलें.

परशुरामभाऊ, बाजीराव व चिमाजीआप्पा यांसह पुण्यास येण्यास निघाले. कळशी मुक्कामीं बाजीरावांची व नानाफडनविसांची भेट झाली. या भेटीत असें ठरलें कीं, दोघांनींही पूर्वींचे द्वेष विसरून जाऊन यापुढें एकमतानें वागत असावें. याप्रमाणें परस्परांनीं लेखही लिहून दिले.

ही हकीकत बाळोबातात्यांस कळतांच त्यांस खूप त्वेष आला. आपल्या हातीं एवढें मोठें घबाड लागत असतां नाना फडनविसांनीं आपणास फसविलें, व बाजीरावही आपणास सोडून आयत्यावेळीं नानांकडे वळले; याबद्दल नाना व बाजीराव या दोघांवर सूड घेण्याचा बाळोबांनीं निश्चय केला व त्याप्रमाणें ते दर मजल दर कूच करीत फौजेसहवर्तमान कवडी मुक्कामीं येऊन दाखल झाले.

शिंदे, बाळोबातात्या व पेशवे यांच्या भेटी झाल्या. त्यांत या दोघांनीं जरी बाह्यात्कारीं आपली द्वेषबुद्धि दाखविली नाहीं, तरी बाजीरावांस पेशवाई न द्यावी व नानांस कारभारांतून काढावें, अशाविषयीं त्यांच्या गुप्त मसलती चालल्या होत्या. त्या नानांस कळतांच त्यांस भय पडून ते फाल्गुन शुद्ध

चतुर्दशीचे दिवशीं अस्तमानीं पालखींत बसून निघाले ते उजाडण्याच्या सुमारास सातार्‍यास जाऊन पोंहचले.

नाना फडनवीस सातार्‍यास गेले तेव्हां इतके गांगरले होते कीं, कोणचीच मसलत सिद्धिस नेण्याचा त्यांच्या हातून निश्चय होईना. इकडे बाळोबा तात्यांनीं मसलत केलीं कीं, नेहमीं आपल्या कह्यांत राहील अशाच एकाद्या मनुष्याच्या हातीं पेशवाईचा कारभार द्यावा व खूप पैसा मिळवावा. असा मनुष्य परशुरामभाऊ त्यांच्या दृष्टीस पडला. परशुरामभाऊंची व नानांची जरी आजपर्यंत जीवश्चकंठश्च मैत्री होती तरी ते नानांचे दुस्मान बाळोबा तात्या पागनीस यांस अगदीं वश झाले. बाळोबा व परशुरामभाऊ या भिन्न स्वभावांच्या दोन व्यक्तींची सांगड जुळलेली पाहून आह्मांस शेक्सपियरच्या 'जुलियस सीझर' या नाटकांतील क्याशियम् व ब्रुटस या जोडीचें स्मरण होतें ! उणीव इतकीच कीं स्वराष्ट्राचें कल्याण करण्याविषयींचा ब्रुटस याचा जो अत्यंत श्लाघ्य हेतू होता तो मात्र भाऊंच्या मनांत नव्हता !!!

इकडे बाळोबांनीं नानांस भुरळ पाडण्याकरितां बाजीरावांस कैद करून त्यांस आपल्या ताब्यांत घेतलें व चिमाजी आपांस यशोदाबाईचे मांडीवर दत्तक देऊन त्यांची चिमणाजी माधवराव या नांवानें गादीवर स्थापना केली. बाळोबांचे मनांत नानांस धरण्याचें होतें पण नाना सातारा सोडून येईनात. अखेर त्यांनीं नानांस धरावयाच्या कामीं परशुरामभाऊंचें मन वळविलें. मग या दोघांनीं नानांस दगा करून धरावें या हेतूनें बहिरोपंत मेंहदळे व विसाजीपंत वाडदेकर या दोघांस कांहीं फौजेसह सातार्‍यास पाठविलें. मेहेंदळे हा नानांचा पक्का द्वेषी बनला होता पण वाडदेकरांचे मनांत नानांचा दगा करावयाचा नव्हता. पुण्यास येण्यासंबंधीं बोलणीं चाललीं असतां वाडदेकरांनीं कानावर जानवें ठेविलें. तितकी इशारत नानांस बस झाली. त्यांनीं बहिरोपंतास सांगितलें कीं तुह्मी अंमळ येथेंच बसा. मी आंत जाऊन येतों. असें सांगून ते मागील दारानें घराबाहेर पडून पालखींत बसून तत्काळ वांईस पळून गेले !

अशा प्रकारें हा बेत फसल्यावर परशुरामभाऊंनीं नानांस पकडण्या करितां प्रत्यक्ष आपल्या पुत्रास वांईस पाठविलें. हरिपंत वांईजवळ आल्याची बातमी लागतांच नाना वांईहून पळाले ते पारघाट उतरून महाडास गेले !

'भित्या पाठीं ब्रह्मराक्षस' अशी जी ह्मण आहे ती किती खरी आहे! नानांच्या एका भित्रेपणामुळें त्यांचे इतर गुण मातीमोल होऊन त्यांस जीव घेऊन सैरावरा पळतां पळतां पुरेवाट झाली!

नानांस जो विपत्तिकाळ आला तो सर्वांशीं चांगलाच ह्मटला पाहिजे. कारण आतां प्राणसंरक्षणासाठीं त्यांस भित्रेपणा सोडावा लागला. यापुढें त्यांचे हातून धरसोडीचें वर्तन झालें नाहीं व ते कधीं कोणास भ्याले नाहींत. ठीकच आहे. अंगावर एकादी गोष्ट येऊन बेतेपर्यंत मनुष्य त्या प्रसंगाला भीत असतो परंतु तो प्रसंग एकदां येऊन भिडला कीं तो त्याला तोंड द्याव-यास तयार होतो हा सिद्धांतच आहे. सर्वस्वी नाश पावण्याचा प्रसंग येऊन ठेपतांच कसल्याही संकटाची भीति न धरितां त्याचें निवारण करण्याचा उपाय शोधून काढण्याइतका स्थिरपणा नानांच्या मनास आपोआप प्राप्त झाला!

बाळोबा व परशुरामभाऊ यांस हतवीर्य करून आपलें वर्चस्व प्रस्थापित करण्याकरितां नानांनीं याप्रसंगीं जें हें आपल्या आयुष्यांतील शेवटचें कार-स्थान रचिलें त्यांत त्यांची परिपक्कदशेस आलेली तारतम्य बुद्धि व दूरदृष्टि चांगली दिसून आली. या कारस्थानांत नानांनीं जें बुद्धिकौशल्य लढविलें तें पाहून सर्व लोक चकित होऊन गेले व तत्कालीन युरोपियनलोक त्यांस 'मराठा म्याकिआवेल' ( म्याकिआवेल नांवाचा इतालीदेशांत एक चतुर व विख्यात मुत्सद्दी होऊन गेला ) असें ह्मणूं लागले.

नानांनीं महाडास जातां जातां, शत्रूनें आपणावर एकाएकीं छापा घालूं नये ह्मणन घाटामध्यें फौजेच्या टोळ्या ठेऊन पक्का बंदोबस्त केला. प्रतापगड व रायगड यांवर शिबंदी व जय्यत लढाऊ सामान भरून ठेविलें. नवीन पांच हजार आरब चाकरीस ठेविले. पावसाळा आल्यामुळें शत्रूंनीं नानांचा पाठलाग करण्याचें काम बंद ठेविलें. हें नानांच्या आयतेंच पथ्यावर पडलें. त्यांस स्वस्थपणें मसलती करण्यास अवकाश सांपडला. त्यांनीं आपल्या विश्वासांतलीं सर्व कर्तीं माणसें आपल्याजवळ जमा केलीं.

इकडे नानांनीं महाडास फौज जमा केली आहे हें बाजीरावांस कळतांच त्यांनीं परशुरामभाऊंस सांगितलें कीं, आतांच्याआतांच तुह्मीं जाऊन नानांचें पारिपत्य करा. त्याप्रमाणें करण्याचें भाऊंच्या मनांत होतें परंतु त्यांच्याजवळ

जी मंडळी होती ती आंतून नानांची हितैषनी असल्यामुळें ती भाऊंच्या बेतास हरएकप्रकारें विघ्न करी. बाळोबांनी परशुरामभाऊंस चिथवून नानांची जहागीर व पुण्यांतले वाडे जप्त करविले. या कृत्यानें नाना व भाऊ यांत पक्कें वितुष्ट पडलें.

मग नानांनीं बाजीरावांस गादीवर बसविण्याचा निश्चय केला. पूर्वी त्यांनीं प्रतिज्ञा केली होती कीं, दादासाहेबांच्या वंशजास पेशवाई मिळूं द्याव-याची नाहीं पण दुर्दैवानें त्यांना ती प्रतिज्ञा मोडावी लागली. बाळोबांनीं बाजीरावांस कैद केलें होतें व ते नानांच्या तर हात धुवून पाठीस लागले होते. अर्थात बाजीराव व नाना समदुःखी झाले. ते प्रथम बाळोबातात्यांचा पाडाव करण्याच्या प्रयत्नास लागले. त्यांनीं रायाजी पाटील व सर्जेराव घाडगे यांच्याकडून दौलतराव शिंद्यास अनुकूल करून घेतलें. रायाजी पाटील हा शिंद्यांच्या दौलतींत प्रमुखपणानें वागणारा मनुष्य होता व सर्जे-राव हा शंभर स्वारांचा मनसबदार होता. त्याची मुलगी उपवर असून फार सुंदर होती व तिला वरण्याचें दौलतराव शिंद्यांच्या मनांत फार होतें. अशा माणसांमार्फत शिंद्याकडे पेगाम बांधल्यावर ते नानांस कबूल झाले यांत आश्चर्य नाहीं !

तुकोजी होळकर जरी अगदीं वृद्ध झाले होते तरी या प्रसंगीं त्यांनीं नानांची मसलत सिद्धीस नेण्याकरितां आपली सारी फौज व दौलत त्यांच्या हवालीं केली. बाबाराव फडके यांजकडे हुजुरात पागा व पथकें होतीं ते ही नानांकडे वळले.

येथपर्यंत सर्व कांहीं ठीक जुळलें परंतु बाजीरावसाहेबांच्या उतावळेपणा-मुळें हें सर्व कारस्थान पूर्णतेस येऊन पोंचण्यापूर्वींच बाळोबांस समजलें. तपास करितां त्यांस असें कळलें कीं, हे सारे बाजीरावसाहेबांचेच खेळ आहेत. तेव्हां बाळोबांनीं ताबडतोब त्यांस घाडग्यांच्या ताब्यांत देऊन हिंदुस्थाना-कडे रवाना केलें.

बाजीराव पुण्यांतून गेल्यावर हुजरातेंतील मुख्य मुख्य लोकांस धरण्याचा बाळोबा व भाऊ यांनीं उपक्रम केला. बाबाराव फडक्यास धरून चाकणच्या किल्यावर ठेविलें.

इकडे नानांची फितवाफितवी सुरूच होती. मशीरउल्मुल्क पुण्यास होते त्यामार्फत त्यांनीं निजामाशीं बोलणें लावून त्यांस वश करून घेतलें. रघोजी भोंसले सेनासाहेब सुभा यांजकडे नानांनीं राजकारण केलें तेंही सिद्ध झालें. कोल्हापूरकरांचें व परशुरामभाऊंचें अलीकडे बरींच वर्षे वांकडें पडून दोघांमध्यें नेहमीं लढाई सुरू असे. यासमयीं परशुरामभाऊंस जेरीस आणण्याकरितां नानांनीं कोल्हापूरकरांस चिथावून दिलें. शिवाय त्यांनीं यावेळीं पटवर्धन भाऊबंद मंडळींतही फाटाफूट उत्पन्न केली.

पावसाळा संपतांच बाळोबातात्या व परशुरामभाऊ यांनीं नानांच्या पारिपत्यासाठीं जारीनें तयारी केली व ताबडतोब तिकडे फौजा रवाना केल्या. परंतु नानांनीं जिकडे तिकडे फितूर केलेला बाळोबा व भाऊ यांस कोठून कळणार ! नानांनीं आपल्यास जाळ्यांत गोंवून चोंहोकडून कसें जखडून टाकिलें आहे हें शेवटपर्यंत त्यांस उमगलें नाहीं !

शके १७१८ आश्विन वद्य द्वादशीस शिंद्यांनीं बाळोबांस कैद केलें. परशुरामभाऊंस सदरहु हकीकत कळतांच त्यांनीं चिमाजीआपांस समागमें घेऊन शिवनेरीकडे पळ काढिला, परंतु चक्रदेव यांनीं त्यांचा पाठलाग करून त्यांस पकडलें व मांडवगणचे किल्ल्यावर ठेविलें.

इकडे झालेला हा प्रकार कळतांच बाजीराव दुखण्याचा बहाणा करून पेरानदीचे तीरीं तळ देऊन राहिले होते ते ही परतून पुण्याजवळ कोरेगांवीं येऊन राहिले. कार्तिक महिन्यांत नाना फडनवीस महाडाहून निघून पुण्याजवळ नव्वे आंबेगांव येथें येऊन राहिले. तेथें आठ पंधरा दिवस मुक्काम होता. तितक्या अवकाशांत सरदार व मुत्सद्दी लोकांच्या भेटी झाल्या. मग सुमुहूर्त पाहून ते पुण्यास आले. कार्तिकवद्य एकादशीस नानांनीं पुन्हां राज्यकारभार हातीं घेतला. मार्गशीर्ष शुद्ध पंचमी या दिवशीं बाजीरावसाहेबांस सातऱ्याहून पेशवाईचीं वस्त्रें येऊन मोठ्या समारंभानें त्यांची गादीवर स्थापना झाली.

अशाप्रकारें सर्व गोष्टी मनाप्रमाणें घडल्यावर " आतां कारभारांत रहाण्यांत हांशील नाहीं; अब्रू कायम आहे तोंच सर्व गोष्टींचा सुखानें समारोप करून स्वस्थपणें काशीस जाऊन रहावें असा नानांनीं निश्चय केला व त्या-

प्रमाणें त्यांनीं श्रीमंतांपाशीं गोष्ट काढिली, परंतु पेशव्यांनीं त्यांस तसें करूं दिलें नाहीं. त्यांच्या मनांत नानांस सर्वस्वी नागवावयाचें होतें. त्यांनीं प्रथम आग्रहानें नानांस ठेवून घेतलें, व मागून लागलाच त्यांचा नाश करण्यासाठींही हळू हळू उद्योग सुरू केला. त्यांनीं प्रथम शिंद्यांच्या मनांत नानाविषयीं ईर्ष्या उत्पन्न केली. सर्जेराव घाडग्यास पूर्वीं बाजीरावांनीं दोन कोट रुपये व शिंद्यांची दिवाणगिरी देऊं केली होती. घाटगे ते मागूं लागतांच त्यांनी त्यांस सांगितलें कीं, नाना फडनविसांच्या हातांत जोंपर्यंत थोडाबहूत कारभार आहे तोंपर्यंत ते तुला शिंद्यांची दिवाणगिरी मिळूं देणार नाहींत. याकरितां तूं त्यांस कैद करण्याची मसलत कर. त्यानें तें लागलेंच कबूल केलें. घाटगे अनुकूल झाल्यावर दौलतराव शिंदे ही अनुकूल झाले हें निराळे सांगणें नकोच!

दौलतरावांनीं एकदां नानांस आपल्या लष्करांत मेजवानीस बोलाविलें व विश्वासघातानें त्यांस कैद केलें. नानांस त्यांच्या पदरचे आप्त स्नेही वगैरे मंडळीनीं मेजवानीस न जाऊं देण्याविषयीं पराकाष्ठा केली परंतु अदृष्टाकडे बोट दाखवून नानांनीं त्यांचें बोलणें नाकारिलें. असो. शिंद्यांच्या मनांत नाना फडनविसांस नेहमीं आपणाजवळच नजर कैदेंत ठेवावें असें होतें परंतु पुढें काय बिघाड झाला असेल तो असो त्यांनीं नानांची रवानगी नगरचे किल्यावर केली! नानांस कैद ह्मटली तर किल्याबाहेर जाऊं नये एवढीच होती, पण थोर व अब्रूदार मनुष्यांस यापेक्षां जास्त काय पाहिजे! किती झाली तरी ती कैदच!

असो. याच सुमारास सातारच्या महाराजांनीं स्वतंत्र होण्याकरितां दंगा केला. पेशव्यांनीं त्यांच्यावर माधवराव रास्त्याची रवानगी केली परंतु त्यांस महाराजांनीं मागें हटविलें. पुण्यास असलेल्या फौजेस रास्त्यांच्या मदतीस जाण्याकरितां पेशव्यांनीं हुकूम केला, पण तिचा पगार तुंबला होता, तो दिल्याशिवाय ती जागेवरून हालेना. अखेर फौजेने दंगा केला; तेव्हां पेशवे घाबरून गेले त्यांनीं तिचा बंदोबस्त करण्याकरितां चक्रदेव व पिंगळे यांस सोडिलें. चक्रदेवांचें फौजेवर चांगलें वजन असल्यामुळें त्यांनीं तो दंगा तात्काळ मोडिला. याप्रमाणें दंगा मोडल्यावर पेशव्यांनीं त्या उभयतांस पुन्हां

त्यांच्या पूर्ववत जागा दिल्या. चक्रदेव नानांचे पक्के हितैषिणी होते. त्यांनीं प्रथम नानांस मोकळें करण्याचा उद्योग आरंभिला. त्यांनीं विचार पाहिला कीं जोंपर्यंत शिंदे व पेशवे यांचा ऐक्यभाव आहे तोंपर्यंत नानांची सुटका होणें दुरापास्त, याकरितां या दोघांत प्रथम कलह लावावा; व त्याप्रमाणें त्यांनीं प्रथम शिंद्यांचे घरांतच फितूर मांडिला. दौलतरावांच्या सावत्र आत्यांस फिसालत देऊन त्यांस बंड करण्यास उद्युक्त केलें. दौलतरावांनी जंग जंग पछाडलें, परंतु तंटा मिटेना. बाजीरावांनींही बायांस अधिक बंड करण्यास उत्तेजन दिलें. सर्जेरावाच्या मनांत बायांस कैद करावें असें होतें पण त्यांत त्यास यश आलें नाहीं. लष्करांतील कांहीं सरदारांनीं उघड बंड करून बायांस मदत केली. त्यांचा बंदोबस्त करण्याकरितां सर्जेराव गेला. तों सर्व मसलत फसून त्याच्या तंगडया त्याच्याच गळ्यांत आल्या !

बायांनीं पेशव्यांचे बंधु अमृतराव यांचा आश्रय धरिला. सर्जेरावानें अमृतराव गैरसावध आहेत असें पाहून त्यांजवर एकाएकीं हल्ला केला व हजारों लोकांची कत्तल करून अमृतरावांचा गोट लुटून फस्त केला !

प्रत्यक्ष आपल्य भावावार असा प्रसंग बेतलेला पाहून बाजीरावसाहेबाचें धाबें दणाणलें ! त्यांनीं आपल्या रक्षणाकरितां व शिंद्यांच्या पारिपत्याकरितां निजामाची मदत मागितली. या प्रमाणें बाजीरावांनीं आपल्यास शह दिलेला पाहतांच दौलतरावांनीं आपल्या मुत्सद्दी मंडळींच्या अनुरोधानें नाना फडनविसांस मुक्त करून नाशह केला !

नाना मुक्त होऊन शिंद्यांचे लष्करांत येऊन पोंचतांच त्यांनीं निजामअलीस भीड घालून त्यांनीं शिंद्यांच्या नाशार्थ पेशव्यांस कोणच्याही शर्तीवर मदत करू नये अशी तजवीज केली. आपलें राजकारण ऑफम् झालें व नानाही सुटून आले असें पाहून बाजीरावसाहेबांस भीति उत्पन्न झाली. त्यांनीं लागलेंच शिंदे व नाना यांशीं समेटाचें बोलणें सुरु केलें. याचसुमारास सर्जेराम घाटगे शिंद्यांसही जुमानीनासा झाल्यामुळें त्यांनीं त्यांस कैदेंत घातलें होतें. एकदांची ही साडेसाती शिंद्यांच्या कारभारांतून सुटल्यावर नाना, पेशवे व शिंदे यांची एकी होण्याचें काम बरेंच सोपें झालें.

नानांचें मन प्रसन्न करण्याकरितां पेशव्यांनीं त्यांच्या जहागिरीवरील जप्ती

खुली केली. त्यांच्या बुधवारांतीस वाड्यांत घाडग्यांनीं खून वगैरे बहुत दुष्ट कर्में केलीं होतीं ह्मणून नानांनीं त्या वाड्याचें उद्धार्जन केलें व मग ते त्यांत रहावयाल गेले; व बाजीरावांच्या विनंतीवरून त्यांनीं पूर्ववत सर्व कारभार आपले हातीं घेतला.

शके १७२० च्या सुमारास एतद्देशीय राजेलोकांच्या वैभवास व स्वातंत्र्यास धूमकेतूप्रमाणें अनिष्टसूचक अशी एक गोष्ट घडली. ती गोष्ट ह्मटली म्हणजे लॉर्ड वेलस्ली यांचें या देशांत आगमन होय! आजपर्यंत या देशांत जे इंग्रेज मुत्सद्दी आले त्या सर्वांच्या मेरूस्थानीं शोभण्यासारखा लॉर्ड वेलस्ली हा होता असें आह्मीं समजतों. याच्याच शिकवणीवरून इंग्रेज व्यापाऱ्यांनीं हातांतील तराजू खरोखरच दूर फेंकून देऊन ही भरतभू पादाक्रांत करण्याकरितां समशेर उपसली!

मराठ्यांनीं ज्याप्रमाणें चौथाई सरदेशमुखीचें निमित्त करून ‘ चंचुप्रवेशे मुसलःप्रवेशः ’ या न्यायानें हळू हळू सर्व हिंदुस्थान ग्रासिलें त्याचप्रमाणें वेलस्लीनें केलें. या वेलस्लीच्या पेंचांत प्रथम निजामसाहेब अडकले. वेलस्लीच्या कारस्थानाशीं कारस्थान लढवून त्यांस जागच्याजागींच खेंचून धरण्याचें सामर्थ्य त्या वेळीं एक नानांस मात्र होतें. “ पण ते तर आतां जीर्णदशेस पोंचून अस्ताचलावर आरूढ झालेल्या चंद्राप्रमाणें हतप्रभ झाले होते. या देशाचें साम्राज्य मराठ्यांकडे रहावें ह्मणून, ज्याचे अव्याहत परिश्रम चालले होते, असा तो अस्तास जाणारा मराठ्यांमधील शेवटचा मुत्सद्दी नाना फडनवीस, आणि तेंच साम्राज्य इंग्रेजांस मिळावें ह्मणून ज्यानें विलक्षण कल्पना लढविली, असा तो उदयास येणारा इंग्रेजांमधील पहिला मुत्सद्दी वेलस्ली, या दोघांच्या स्थितीमध्यें कोणचें अंतर होतें व त्यापासून आपल्या देशावर काय परिणाम झाले आहेत याचा विचार करूं लागलें ह्मणजे—

‘ तेजोद्वयस्य युगपद्व्यसनोदयाभ्यां
लोको नियम्यत इवैष दशांतरेषु ॥
[ जात शशी अस्तातें, उगवे हा रवि इकडे
अस्तोदय त्यांचे ते, नियमिति लोकांतें ] ’

अण्णा किर्लोस्कर.

या कालिदासाच्या वचनाची मनावर चांगली प्रतीति होत्ये!

असो. नानांस वेलस्लीच्या युक्तींतील इंगित कळल्यामुळें त्यांनीं बाजीरावांस वेलस्लीशीं तह करूं दिला नाहीं. त्यांनीं वेलस्लीस उत्तर दिलें कीं, असा नवीन तह करण्याचें कांहीं प्रयोजन नाहीं. आजपर्यंत पेशवे सरकाराशीं जे तुमचे तह व ठराव झाले आहेत ते आम्हीं पाळीत जाऊं. टिपूशीं लढाई सुरू झाल्यास, आह्मांकडून तुमचे मदतीस फौज येईल.

पुढें टिपूशीं इंग्रेजांचें खरोखरच युद्ध सुरू झालें त्यावेळीं नानांनीं सांगितलें असतांही बाजीरावानें इंग्रेजांस साह्य केलें नाहीं, परंतु पेशव्यांच्या साह्याशिवाय इंग्रेजांचेंही कांहीं अडलें नाहीं. त्यांनीं एक दोन महिन्यांतच टिपूचें पारिपत्य करून त्याचें सर्व राज्य कार्बीज केलें. टिपूच्या राज्याच्या वाटण्या होण्याची वेळ आली तेव्हां अर्थातच पेशव्यांच्या वांटणीस कांहीं आलें नाहीं. उलट इंग्रेजांनीं त्याच्यावर टिपूस साह्य केल्याचा ठपका ठेविला, परंतु नानांनीं पेशव्यांच्या वतीनें उत्तर देऊन त्याचें अगदीं निरसन केलें.

असो. नगराहून आल्यापासून नानांची शक्ति दिवसेंदिवस क्षीण होत चालली होती, ती इतकी कीं, सरकार वाड्यांत किंवा बाहेर कोठें जाण्यायेण्यानें देखील त्यांस श्रम होत. तथापि त्यांनीं शेवटपर्यंत सरकारी काम आपल्या नेहमींच्या टापटिपेनें व आस्थेनें चालविलें होतें. शके १७२१ च्या माघ वद्यांत त्यांस ज्वर येऊं लागला. तो वाढत जाऊन प्रकृति अधिकाधिक बिघडत चालली व त्यांतच फाल्गून वद्य तृतीयेच्या दिवशीं गुरुवारीं मध्यरात्रीं त्यांचें देहावसान झालें!

याप्रमाणें या थोर पुरुषाच्या आयुष्याचा शेवट झाला. त्यांच्या मृत्यूनें मराठ्यांची केवढी हानि झाली व तिजमुळें महाराष्ट्रांतील लोकांस केवढें दुःख झालें असेल याची कल्पनाच केली पाहिजे. इतकेंच सांगतों कीं, नाना फडनविसांनीं ज्या इंग्रेज लोकांशीं आमरण वैर चालविलें त्यांसही याप्रसंगीं वाईट वाटलें. कर्नल पाल्मर लिहितो कीं' नाना फडनवीस मेले, आणि त्यांबरोबरच मराठी राष्ट्रांतील शहाणपणा व नेमस्तपणा हीं लयास गेलीं?

आतां त्यांच्या गुणस्वभावाविषयीं व कांहीं खासगत गोष्टीविषयीं दोन शब्द लिहून मारुतीच्या शेंपटीप्रमाणें लांबलेल्या या मननीय चरित्राचा समारोप करूं.

नानांचा बांधा उभार असून सडपातळ होता. वर्ण किंचित् काळसर होता व मुद्रा गंभीर होती. त्यांचे डोळे पाणीदार, तीक्ष्ण व चंचल होते. त्यांचें शरीर जरी मजबूत नव्हतें तरी ते खाण्यापिण्यांत अतिनियमित असल्यामुळें त्यांची प्रकृति अगदीं निरोगी असे. त्यांच्या गुणावगुणाविषयीं विचार केल्यास त्यांजमध्यें अतिरिक्त विषयवासना हा दुर्गुण फारच निंद्य होता. बरें ते जसे विषयी होते तसे भक्तशीलही होते. या परस्परविरोधी गुणाचें वास्तव्य त्यांचे ठायीं कसें जमलें असेल तें असो. त्यांचा मूळचा अंकूर वैराग्याकडे असावा. खुद्द नाना असें लिहितात कीं, माझ्या मातामहाच्या वंशापासून ही पापबुद्धि माझ्या हाडींमासीं खिळली असावी. भित्रेपणा हा नानांचा दुर्गुण खरा, पण त्याबद्दल त्यांस दोष देणें न्याय्य नाहीं. ईश्वरानें त्यांस धैर्य दिलें नाहीं, त्यास त्यांचा काय उपाय! या शिवाय त्यांच्या अंगचे सर्व गुण स्पृहणीय होते. ते पराकाष्टेचे उद्योगी, अतिशय नियमित व सचोटीनें वागणारे गृहस्थ होते. यांची धर्मावर कडक निष्ठा होती. स्वामिभक्ति व स्वदेशाभिमान या दोन गोष्टी त्यांजमध्यें पूर्णपणें वसत होत्या. त्यांचा स्वभाव दयाळू होता व ते परोपकाराविषयीं तत्पर होते.

नानांची वृत्ति जरी गंभीर व भाषण नियमित होतें, तरी त्यांची बोलण्याची ढब मनोहर होती. ते फार बहुश्रूत होते.

नाना फडनवीस कधीं हांसत नसत व त्यांस थट्टामस्करी आवडत नसे अशी प्रसिद्धि आहे. पण त्यांस खुबिदार भाषण व विनोद प्रिय असे. त्यांच्या हाताखालीं तात्या काकिर्डे या नांवाचा एक कारकून होता. तो बहुश्रुत, चतुर व शीघ्रकवि असे. त्याचें बोलणें नानांस फार आवडे.

तात्या काकिर्डे नोकरी मिळविण्यासाठीं प्रथम पुण्यास आला तेव्हां त्यानें बेलबागेंत नानांची भेट घेऊन खालील श्लोक ह्मटला:—

**अलंकारप्रीयो विष्णुर्जलधाराप्रियः शिवः ।**
**नमस्कारप्रियो भानु ब्राह्मणो भोजनप्रियः ॥ १ ॥**

" विष्णूस अलंकार आवडतात, शिवास जलधारांचा अभिषेक अवडतो, भानूस नमस्कार प्रिय आहे व ब्राह्मणास भोजन प्रिय आहे ! "

पुढें नानांनीं त्यांस फडांत कारकुनी दिली. त्या कामांत वाकबगार झाल्यावर पुढील बढतीची जागा मिळविण्याकरितां त्यानें नानांजवळ येऊन विनंति केली कीं;—

एतावत्सरासि सरोरुहस्य कृत्यं-। भित्वांभः सपदि बहिर्विनिर्गतंतत्॥
आमोदो विकसनमिंदिरानिवास-। स्तत्सर्वं दिनकरकृत्यमामनन्ति॥२॥

" सरोवराच्या पाण्यांतून कमलानें आपलें डोकें एकदांचें वर काढिलें ह्मणजे त्याचें काम संपलें. पुढें त्यांत सुगंध घालणें, त्याचा विकास करणें व त्यास लक्ष्मीचें माहेरघर बनविणें, हें सर्व काम दिनकराचें ( भानूचें ) आहे; तें त्यानें करावें ! "

यांतील भानु व दिवाकर या शब्दांमधला श्लेष वाचकांचे लक्षांत आलाच असेल.

रामशास्त्री मरण पावल्यावर त्यांच्या मरणाचें वृत्त काकिर्डे यांनीं नानांस कळविलें तें असें:—

वाग्विलासैरनुपमैर्जित्वा भूदेवमंडलम् ॥
जेतुं सुरगुरुं शास्त्री रामनामा दिवंगतः ॥ ३ ॥

' आपल्या वक्तृत्वाच्या बलानें भूलोकचे देव ह्मणजे ब्राह्मण यांस जिंकून प्रत्यक्ष सुरगुरु बृहस्पती यास जिंकण्याच्या ईर्षेनेंच रामशास्त्री देवलोकास गेले ! '

नानांची दिनचर्या फारच मननीय व अनुकरणीय आहे. स्थलाभावामुळें ती आतां येथें देतां येत नाहीं. पुढें एकादे अंकीं देऊं. ते अवघी दीड प्रहर काय ती निद्रा घेत असत. त्यांच्या सर्व वेळा बांधलेल्या असल्यामुळें त्यांच्या हातून इतका उद्योग होत असे कीं, तो सांगूं लागल्यास कोणास खरा देखील वाटणार नाहीं !

नानांच्या घराण्याचें उपास्य दैवत गणपति व कुलदेवता जोगेश्वरी तथापि त्यांनीं शिव, विष्णु या देवतांचींच देवळें बांधिलीं आहेत, यावरून त्यांची भक्ति हरिहरांवर विशेष होती असें दिसतें. ते एकादशी, प्रदोष व चतुर्थी हीं उपोषणें करीत असत. त्यांचा ज्योतिषावर पक्का भरंवसा असे.

बातमी ठेवण्याचे कामांत नानांची कमाल होती. राज्यकारस्थानाचा जेथें जेथें सुगावा लागेल तेथें तेथें त्यांचे गुप्त बातमीदार असावयाचेच. त्यांच्या बातमीचा पल्ला फार दूरवर असून त्यांस बातमी फार जलद कळत असे.

असो. गृहसुखाचा वांटा नानांच्या कपाळीं फारच थोडा होता. त्यांनीं एकंदर नऊ लग्नें केलीं त्यांपैकीं सात बायका त्यांच्या हयातींतच मृत्यु पावल्या.

बाकीच्या दोन अगदीं लहान वयाच्या राहिल्या होत्या त्यांपैकीं एक नानांच्या मरणानंतर चौदावे दिवशीं वारली.

नानांस एकंदर तीन मुलें झालीं. त्यांपैकीं दोन मुली व एक मुलगा हीं सारीं बाल्यदशेंतच मरण पावलीं.

येथें आमच्या आजच्या चरित्र नायकाचें चरित्र संपलें! नानाफडनवीस हे कोणत्या योग्यतेचे पुरुष होते, त्यांनीं काय काय कृत्यें केलीं, त्यांच्या आयुष्क्रमापासून आपणांस कांहीं शिकावयासारखें आहे कीं नाहीं वगैरे गोष्टींसाठीं प्रस्तुत चरित्र लिहिलें आहे. हिंदुस्थानांतील तत्कालिन राजकारणांतील गूढप्रमेयांचें आपल्या अलौकिक बुद्धिमत्तेनें जर कोणी यथार्थ आकलन केलें असेल तर तें नानानींच केलें होतें. आजची हिंदुस्थानची परिस्थिति अत्यंत बिकट अशी आहे. अशास्थितींत आमच्या मुत्सद्दी ह्मणविणाऱ्या मवाळ व जहाल देशबंधूनीं आपापसांत निष्कारण कलह माजवून अनिर्वाच्य प्रकार मांडिले आहेत. त्यांनीं नानांच्या चरित्राकडे दृष्टि देऊन जर वर्तन ठेविलें तर या प्रस्तुत माजलेल्या दुहींतही एकीस वाव निघेल व तसें झाल्यास आमच्या श्रमाचें साफल्य झालें असें मानण्यास जागा राहील.

अनंततनय.

## आमच्या शिक्षणाविषयीं विचार.

( मागील अंकावरून समाप्त. )

अभिरुचि पळून गेली नव्हती, ह्मणून पुन्हां सर्व गोष्टी यथास्थित होऊन शांततेच्या सुकाळाचा मानवी प्राण्यास पुन्हां लाभ लाभा! व त्यांस विद्या व कला यांचें पुनरुज्जिवन करण्याची संधी मिळाली! सांप्रत सुधारलेल्या देशांतून जें कलाकौशल्याचें पुनरुज्जिवन झाल्याचें दृष्टिस पडतें त्यास कारण आर्यांचे लुप्तप्राय झालेले संस्कृत ग्रंथच होत! असें त्या सुधारलेल्या देशांत या भाषेविषयीं जी मान्यता व जी अभिरुचि दृष्टिस पडते त्यावरून ह्मणावयास काय चिंता आहे? संस्कृतभाषेचें अध्ययन अथवा वेदाध्ययन किंवा शिक्षण म्याक्समुल्लर जितक्या भक्तीनें करतो अथवा जर्मनींतील कलाप्रवीण लोक संस्कृत भाषेचा जितक्या कळकळीनें व आस्थेनें अभ्यास करतात

त्याच्या एक शतांश तरी आम्हीं सांप्रतचे आर्य त्या भाषेचा अभ्यास किंवा शिक्षण यांकडे लक्ष देतों काय ? नाहीं ! आणि यामुळेंच आम्हांस अंतस्थ खरी स्थिती माहित नाहीं.

पूर्वींच्या आमच्या शिक्षण घेण्याच्या पद्धति अशा होत्या कीं, ब्राह्मणांनीं बहुधां ज्योतिषशास्त्र–गणितशास्त्र–तर्कशास्त्र इ. शास्त्रांचा केवळ बुद्धिविषयक शास्त्रांचा अभ्यास करावा. क्षत्रियांनीं युद्धोपयोगी व राज्यव्यहारोपयोगी शास्त्रांचा अभ्यास करावा. वैश्यादि इतर ब्राह्मणेतरांनीं व्यापारोपयोगी इतर कलांचा अभ्यास करावा. जीं कलाकौशल्यें आज आपणांस मोहून टाकित आहेत तीं व्यापारोपयोगीं कलाकौशल्यें आमचे प्राचीन आर्य, ग्रीसदेशांतील प्लेटो, अरिस्टाटल सारख्या तत्ववेत्यांच्या मताप्रमाणेंच हलकीं मानीत असत व तीं त्यांस इतकीं मोहून टाकित नव्हतीं. जेणेंकरून बुद्धिसामर्थ्य वाढेल, व जेणेंकरून ह्या शरिर-यंत्राची त्यांच्या मालकास अथवा अत्म्यास पूर्ण ओळख होईल अशाच शास्त्रांची त्यावेळीं फार बडेजाव होती. शरीरयंत्र हें सर्व यंत्रांहून आम्हां आर्यांस त्यावेळीं मोहून टाकित होतें. अर्थात त्यास अनुसरून आमच्या शिक्षणाची त्यावेळीं दिशा ठरलेली असे. वर विवेचन केल्याप्रमाणें आर्यांतील संस्कृत अभ्यासाचा लोप होतां होतां आम्हीं सांप्रतच्या स्थितींत येऊन पडलेले आहों. सांप्रतची आमची शिक्षण पद्धति फार विचार करून पाहण्यासारखी आहे.

आमच्या आर्य पूर्वजांनीं संपादलेलें विद्याभांडार जरी आम्हीं नेटानें सांभाळून, त्यांतील प्रमुख प्रमुख शास्त्रांची जोपासना केली, तथापि तसल्या त्या मारहाणीच्या प्रसंगांत सर्वच शास्त्रांची जोपासना आमचे हातून होणें अवघड होतें. वर्णश्रेष्ठ ब्राह्मणांनीं आपलीं शास्त्रें कशींबशीं संभाळून ठेविलीं परंतु इतर वर्णास त्या माराकुटिच्या प्रसंगीं राजाश्रयाच्या अभावामुळें अर्थातच तसें करण्यास मिळावी तशी संधी मिळाली नाहीं. त्यामुळें साहजिक कित्येक कलांकडे आर्यांचें दुर्लक्ष्य झालें; अशी आर्यांची स्थिती असतां व आर्यलोक शांतता करण्याचे कामीं गुंतले असतां या कलांच्या पुनरुज्जिवनाचें काम सृष्टिदेवतेनें या भरतखंडांत आलेल्या तिसऱ्याच कांहींजणांकडून तडीस नेलें. या सर्व घडलेल्या प्रकाराचा पुढें परीणाम फार निराळा झाला. केवळ

मनुष्यबुद्धिची उन्नति करणारीं शास्त्रें आमच्याकडे राहिलीं आणि व्यवहारोपयोगी शास्त्रें तिसऱ्यांच्याच हातांत गेलीं. पहिल्याप्रकारचीं शास्त्रें जशीं मनुष्याच्या बुद्धिच्या उन्नतिस अत्यवश्यक होत, तशींच दुसऱ्याप्रकाचीं शास्त्रें हीं मनुष्याच्या ऐहिक संपन्नतेस कारणीभूत होत ! ! परंतु दुसऱ्याप्रकारचीं शास्त्रें ज्या आर्यज्ञातीच्या हातांत होतीं त्यांस राजाश्रय नसल्यामुळें त्यांचा शिक्षणक्रम जसा पुढें चालावा तसा त्यांस चालवितां आला नाहीं. त्या शास्त्रांचें जें कांहीं शेष स्वरूप होतें, त्याचेंच परंपरेनें जेवढें त्यांस शिक्षण मिळत गेलें तेवढेंच. असा आर्यांच्या आजपर्यंतच्या शिक्षणाचा त्रोटक इतिहास आहे.

व्यापारोपयोगी शिक्षण ज्या लोकांचे हातांत गेलें, तेच लोक दैववशात् आमच्यावर सत्ता गाजविणारे आमचे ऐहिकप्रभू झाले ! त्यांनीं आह्मां हिंदुस्थानवासियांची पूर्वापार असलेली शिक्षणाविषयींची अभिरुचि मनांत आणून कोणतें तरी आह्मांस शिक्षण दिलें पाहिजे त्याशिवाय आह्मीं आर्य स्वस्थ बसणार नाहीं असें जाणून त्यांनीं जी शिक्षणाची तऱ्हा आमच्यांत उपस्थित केली, व जी त्यांनीं आह्मांस द्रव्याची लालूच दाखवून ह्मणा-अगर अधिकार दानाची लालूच दाखवून ह्मणा-कसेंहि ह्मणा आज आमच्यांत पूर्णपणें प्रस्थापितहि करून ठेविली आहे ! ! यानंतर याच शिक्षणपद्धतिचा अथवा चालू शिक्षणपद्धतिचा आपणास थोडक्यांत विचार कर्तव्य आहे. कारण शिक्षण हें आह्मां आर्यलोकांचें केवळ जीवन असून त्यावरच आमचें आर्यत्व सर्वतोपरी अवलंबून आहे. तेव्हां तें शिक्षण कशाप्रकारचें आहे हें सर्वांस चांगल्या रितीनें समजणें प्रस्तुत प्रसंगीं फार फार अवश्य झालें आहे. चालू शिक्षणाविषयीं अर्वाचीन विद्वानांनीं आपआपले अभिप्राय व मतें पुष्कळ ठिकाणीं प्रगट केलीं आहेत व तीं सर्व लक्षांत घेण्यासारखीं आहेत. कै० **धाकटे शास्त्रीबुवा** हल्लींच्या शिक्षणास " एकना धड आणि भाराभर चिंध्या " असें ह्मणतात. त्यांनीं दुसऱ्या एका ठिकाणीं हल्लींच्या शिक्षणाविषयीं असेंच मत प्रगट केलें आहे कीं, " जिकडे तिकडे गुडघाभर पाणी " सखोलता अथवा गंभीरपणा हल्लींच्या शिक्षणांत नाहींच असें त्यांचें स्पष्ट मत होतें. लोकमान्य **केसरीकार** तर हल्लींच्या शिक्षणास " सरकारी

हमालखान्याचें शिक्षण " असें सोज्वळ नांव देतात. * हे असे जे दोष सांप्रतच्या शिक्षणावर सर्वत्रांकडून ठेवण्यांत येतात त्याचें कारण हेंच आहे कीं, त्यांत पूर्णशिक्षण असें कोणत्याहि एका शास्त्राचें दिलें जात नाहीं. थोडासा भूगोल, थोडासा इतिहास, जरासें गणीत, थोडेसे सिद्धांत, थोडेसें व्याकरण. एकंदरींत शिक्षणाचा हल्लींच्या स्थितींत सगळा चिवडा बनून राहिला आहे. पूर्वींच्या शिक्षणपद्धतीत व चालू शिक्षणपद्धतींत हेंच एक मोठें अंतर आहे कीं, पूर्वीं कोणत्या तरी एका शास्त्रांत प्रथम शिकणारास पारंगत व्हावें लागे, तेव्हांच त्यास दुसरें शास्त्र शिकविण्यांत येई ! ! एकेक शास्त्रांतच पारंगत होण्याच्या शिक्षणपद्धतिपासून श्रमविभागाचा मोठा फायदा आहे. प्रत्येक मनुष्य जर असें ह्मणूं लागेल कीं, मी सर्व विद्यांत व कलांत प्राविण्य संपादीन तर ती गोष्ट त्याच्या शक्तीबाहेरील आहे.

हल्लींचें शिक्षण श्रमविभागाच्या तत्वावर मुळींच दिलें जात नाहीं. जसें एकाद्या मनुष्यानें थोडिशी लोहारकी, थोडीशी सुतारगिरी, थोडीशी सोनारकी, थोडीशी तांबटगिरी शिकून, कोणतीही कला एक पुरी न करतां त्या सर्वांतहि अर्धवटच राहावें, तशापैकींच हल्लींच्या शिक्षणाची तंतोतंत स्थिती आहे. आणि ह्मणूनच कै० विष्णुशास्त्री चिपळूणकर या शिक्षणपद्धतीला "गुढघाभर पाण्याची" शिक्षणपद्धति असें अन्वर्थक नांव देतात

यावरून पूर्वींच्या जुन्या पद्धतीनें शिक्षणाचें दळण दळीत बसावें, त्यांत अलिकडील कित्येक पुनरुज्जिवन झालेल्या-सुधारलेल्या शास्त्रांचा व कलांचा

---

* ता० २९।१२।०८ चे देसरींत सरजार्ज क्लार्क मुंबईइलाख्याचे गव्हरनर यांनी शिक्षणपद्धतींत कोणता फरक केला पाहिजे याबद्दल अपलें मत युनिव्हर्सिटीकडे लिहून पाठविलें आहे त्यांतील सारांश दिला आहे तो फार महत्वाचा आहे. नामदार ह्मणतात "हल्लींच्या शिक्षणक्रमांत भाराभर परिक्षा व भारावर विषय यांचें ओझें विद्यार्थ्यांवर पडतें; बुद्धिशिक्षणापेक्षां निवळ पाठांतरावर अधिक भर दिला जातो. ज्ञानापेक्षां मार्कांकडे लक्ष अधिक असतें. अभ्यासक्रमांत शिस्त मुळींच नसून शिक्षणाच्या पूर्णतेकडे पूर्ण दुर्लक्ष होतें व शिक्षणपद्धतीचें स्वरूप ठिगळें लावलेल्या गोधडीसारखें दिसतें सारांश एकंदरींनें हल्लींच्या शिक्षणक्रमांतून बाहेर पडलेला ग्राज्युएट कुशाग्र अगर शोधकबुद्धिचा न निपजतां अनेक विषयांच्या अर्ध्याकच्च्या व अपक्व माहितींचा एक चालता बोलता खजीना अशी त्याची स्थिति होते !!

हे विचार आजच्या आमच्या लेखकांच्या विचारांशीं जुळते आहेत ह्मणून मुद्दाम आह्मीं येथें त्यांचा सारांश दिला आहे. संपादक.

समावेश होऊं नये, असें आमचें मुळीच ह्मणणें नाहीं. मात्र आह्मीं असें ह्मणतों कीं तें शास्त्र अथवा ती कला एकेकच पूर्णत्वानें शिकविण्यांत यावी. अशा पद्धतिनें जर शिक्षण देण्यांत येईल तर श्रमविभागाच्या तत्वानुसार लोकांचे अनेक फायदे होऊन खरी व चोख शिक्षणपद्धति देशांत सुरूं झाली असें ह्मणतां येईल व या पद्धतिनें एकेक शास्त्राचा निदान एक एक आधारस्तंभ तरी निपजण्याचा संभव आहे. येथें अशी एक शंका उत्पन्न होण्याचा संभव आहे कीं, हल्लींची शिक्षणपद्धति सदोष आहे असें ह्मणणारे तरी हल्लींच्या शिक्षणपद्धतींतून तयार झालेले होतेना? मग ते दोष दाखविणारे विद्वान असें कसें जाणत नाहींत कीं आपणास अमुक गोष्ट सदोष आहे किंवा अमुक गोष्ट निर्दोष आहे हें समजण्याचें ज्ञान तरी याच शिक्षणपद्धतिपासून झालेंना? मग अशी जी ज्ञान दात्री सांप्रतची शिक्षण पद्धति तिला आपण एकदम सदोष असें ह्मणण्याचें धाडस कसें करावें बरें? कोणत्याहिकाळच्या शिक्षणपद्धतींत अल्प स्वल्प दोष हे राहणारच. ती अगदींच निर्दोष कधींच असूं शकणार नाहीं. जर या गोष्टी खऱ्या आहेत तर हल्लींच्या शिक्षणपद्धतीस दोष देण्याचा अर्वाचीन विद्वानास अधिकार काय? परंतु थोडासा विचार करून पाहिलें असतां सहजीं ध्यानांत येईल कीं, चालू शिक्षणपद्धति सदोष किंवा निर्दोष आहे, हें समजण्याची पात्रता ज्यांच्या आंगीं आली ती केवळ हल्लींच्याच शिक्षण पद्धतिपासून त्यांस प्राप्त झालेली नव्हती. आमच्याइकडे प्रतिवर्षीं हजारों पदवीधर अलिकडे युनिवर्सिटीच्या बोगद्यांतून बाहेर पडतात. पण त्यांतून थोडेच असामी आपलें डोकें वर काढतात. याचें कारण काय बरें असावें? कै० शास्त्रीबुवांनीं ओघाओघानें स्वतःविषयीं लिहीत असतां एकाठिकाणीं स्पष्ट ह्मटलें आहे कीं, " मी कॉलेजमधील नेमलेला अभ्यास कधीं कधीं करण्याचें सोडून देऊन भवभूतिच्या अथवा कालिदासाच्या काव्यामध्यें निमग्न होत असे. युनिव्हर्सिटीरूप बागेंतील फिरण्याचा सरळ रस्ता सोडून कधीं कधीं स्वेच्छ रितीनें इतःस्ततःहि त्या रमणीय उपवनांतील सुखास्वादांचा लाभ घेत असे. "

हल्लींचें शिक्षण विचारदृष्टिनें पाहिलें असतां केवळ पंगू होय. त्यायोगें मनुष्याच्या बुद्धिची तर उन्नती होणार नाहींच, पण उलट ती खुरटली जाऊन तो निव्वळ स्वार्थपरायण घडल्याचीं शेकडों—हजारों उदाहरणें आज

आमच्या डोळ्यांसमोर धडधडीत आहेत. खऱ्या शिक्षणाचा परिणाम हा काय? एकाद्या भाषेंत पारंगत होणें, आणि थोड्याशा शास्त्रांची अर्धवट व अपुरी माहिती असणें, ह्मणजे तें शिक्षणाच्या परिपूर्णत्वाचें लक्षण खास नव्हे. हल्लींच्या शिक्षणास "पोटभरू शिक्षण" हें नांव मात्र खासें शोभेल!! ज्या शिक्षणापासून अंतःकरणांत प्रकाश पडत नाहीं, ज्या शिक्षणापासून ज्ञानाची अथवा शिक्षणाची हाव वाढत नाहीं तें शिक्षण काय कामाचें? ज्या शिक्षणापासून उदात्त मनोवृत्ति उत्पन्न होत नाहींत तें शिक्षण "असून अडचण व नसून खोळंबा." या न्यायाप्रमाणें केवळ निरर्थक होय.

हल्लींच्या शिक्षणाची योजना कोणीहि केलेली असो, व ती करणाराचा अंतस्थ हेतू कांहींहि असो, परंतु जोंपर्यंत सोनें कसोटीस उतरत नाहीं तोंपर्यंत त्यास खरें सोनें कसें ह्मणावें? आमच्या डोळ्यासमोर आज आमच्याच या आशिया खंडांतील, एका बाबतींत ज्याचे आह्मी गुरू आहोंत तो जपान देश आहे!! तेथें तीस वर्षांत शिक्षणाच्या योगानें जी सुधारणा झालेली दृष्टोत्पत्तीस येते, तिचा एक शतांश तरी साठ सत्तर वर्षांत हिंदुस्थानांतील चालू शिक्षणानें हिंदुस्थानांत दृष्टिस पडूं नये काय? तेव्हां शिक्षण शिक्षण ह्मणून जें आह्मांस दिलें जातें तें शिक्षण तर खरेंच; परंतु त्याची योजना मात्र फार विलक्षण व गुंतागुंतीची आहे. ज्ञानामृताची वाटी तोंडास लावून आह्मां हिंदुस्थानवासियांचा घसा पुन्हां कोरडा ठणठणीत राहतो हें काय गौडबंगाल ऊर्फ इंद्रजाल आहे तें एक परमेश्वर जाणें!!

हल्लीचें शिक्षण हें पौष्टिक व सात्विक खाद्य नसून हें एक अठरा धान्यांचें कडबोळें अथवा रेचक आहे! यानें आमची मानसिक शक्ति सारखी ऱ्हास पावत चालली आहे, व ती केवळ राजभाषेंत पारंगत करून, त्या लोकांचीं कामें सुलभ रितीनें करून घ्यावयास अथवा त्यांची हमालगिरी उठवावयास शिकवित आहे. अशी अंतस्थ खरी खरी स्थिती नाहीं काय? जे विद्वान आज एका हाताच्या बोटावर मोजतां येण्याइतके याच बोगद्यांतून पसार झालेल्या मंडळींतून पुढें आलेले दृष्टिस पडतात, ते केवळ ह्याच शिक्षण-पद्धतिवर अवलंबून राहून तयार झालेले होते व आहेत काय? वस्तुस्थिती पाहतां असें नजरेस येतें. या पुढें आलेल्या विद्वानांनीं अन्यमार्गे वाचनादि-

द्वारांच्या साधनानें पुष्कळ विद्या संपादन केली होती, आणि त्याचमुळें त्यांचे ठिकाणीं खरी चमक उत्पन्न झाली. आतां कोणी असें ह्मणेल कीं, त्यांना तरी ही वाचनाची अभिरुचि लागण्याची अथवा निराळी विद्या संपादन करण्याची आवड याच शिक्षण पद्धतिनें उत्पन्न करून दिली ना? किंचीत मननाअंतीं असें ध्यानांत येईल कीं, वाचन अधिक करावें, विद्या अधिक संपादन करावी ही आवड उत्पन्न होण्यास हलींची शिक्षण पद्धति पुरेशी असती, तर वर सांगितलेल्या बोगद्यांतून पसार झालेल्या एकूणएक मंडळीच्या ठिकाणींही तसली आवड उत्पन्न झाली नसती काय? तेव्हां वास्तविक प्रकार असा आहे " तुकाह्मणे येथें पाहिजे जातीचें, येर गाबाळाचें काम नोहे " ! !

अर्थात अंतर्यामीं मूळचेंच बीज उत्तम असावें लागतें. तें जर आंब्याचें असेल तरच त्याचा आम्रवृक्ष तयार होऊन त्यास आम्रफळें लागतील! ! अंतर्यामी बीज चांगलें असणें ही गोष्ट संस्कारावर अवलंबून आहे! सृष्टिंतील यच्चयावत् वस्तू एकाच मूलतत्वापासून उत्पन्न झालेल्या आहेत खऱ्या, परंतु ज्या वस्तूवर जसे संस्कार घडत गेले, तसतशी ती वस्तू निरनिराळी होत गेली! आम्रबीजें पुष्कळशीं तयार होणें हें त्या देशाचें भाग्य होय. आमच्या देशांत जरी अलिकडे नविन तऱ्हेची शिक्षणपद्धति सुरूं झालेली आहे तरी आह्मां आर्यांच्या जिवात्म्यावरचे पूर्वींचे संस्कार नष्ट झालेले नाहींत. पूर्वीं आमच्यांत विद्वान, कल्पक, बुद्धिमान वगैरे आत्मे नव्हते असें नाहीं; तेच आत्मे अथवा तींच बीजें पुन्हां त्यास या नवीन शिक्षण पद्धतीचें थोडेंसें पाणी मिळतांच वृक्षरूपानें तरारलीं व स्वतंत्ररितीनें पूर्वसंचिताच्या जोरावर आकाशांतील उच्चतेचा मार्ग क्रमूं लागलीं. सारांश हलींच्या शिक्षणपद्धतींतील दोष काढण्याची पात्रता, हलींच्याच शिक्षणानें ते दोष काढणारास ती प्राप्त झाली असें समजण्याचें कांहीं कारण नाहीं. त्याचीं कारणें वर निर्दिष्ट केल्याप्रमाणें फार गहन अशीं आहेत. सामान्य बुद्धिस तीं सहज समजण्या सारखीं जरी नसलीं, तरी तीं खरी नाहींत असें मात्र नाहीं.

सांप्रतच्या शिक्षणपद्धतीचें हें असलें हिडीस चित्र वाचकां पुढें दुर्दैवानें मला ठेवावें लागत आहे. ह्या हिडीस चित्रासंबंधीं आणखीहि पुष्कळ

बाह्य दोष दाखवितां येण्यासारखे आहेत. सदर बाह्य दोषांविषयीं इतकेंच लिहीतों कीं, हल्लींचें आमचें शिक्षण ज्या शाळांतून अथवा कॉलेजांतून दिलें जातें, त्या शाळा व तीं कॉलेजें यांस केवळ व्यापारी दुकानांचें स्वरूप प्राप्त झालें आहे. आर्यांची पूर्वींची शिक्षण देण्याची तऱ्हा अशी बिलकूल नव्हती. आमचीं प्राचीन शिक्षणालयें प्रत्यक्षरीतीनें पूर्वीं कोणत्याहि राजानें आपल्या कबजांत घेतलीं नव्हतीं. यावरून पूर्वींच्या शिक्षणास राजाश्रय नव्हता अशांतील मात्र प्रकार नव्हता. तत्कालिन राजे शिक्षणास व विद्येस तर उत्तेजन देत होतेच; परंतु प्रत्यक्षरीतीनें त्यांनीं शिक्षणाचे बाबतींत हात घालून ढवळाढवळ केली नव्हती; व लोकलफंड बसवून विद्यार्थ्यां पासून फी घेऊन, त्यास व्यापारी स्वरूप आणलें नव्हतें. शिक्षण हें त्यावेळच्या निस्पृह व विद्वान मंडळींच्या हातांत स्वतंत्र रितीनें राहिलेलें असे.

एकंदरींत शिक्षणासंबंधानें आज आमची स्थिती दुसऱ्याच्या ओंजळीनें पाणी पिण्यासारखी अत्यंत शोचनिय व नादान झाली असून तिनें आह्मांस पूर्ण कंगालकरून सोडलें आहे! ज्या त्या बाबतींत व्यापारीकावा साधणाऱ्या आमच्या प्रभूच्या स्वाधीन आमची ही बापडी विद्यादेवि गेल्यामुळें आमची किती दैना झाली आहे हें सुज्ञास फोड करून सांगणें नको. आतां ह्या स्थितींतून आह्मीं पार कसें पडावें याबद्दल थोडेंसें दिग्दर्शन करून हा विषय पुरा करूं.

शिक्षणपद्धतिचें धोरण कसें असावें याबद्दल वर विवेचन केलेंच आहे. कोणत्याहि शास्त्राचें विद्यार्थ्याकडून पूर्णपणें अध्ययन करविणें ही त्यांतील मुख्य मख्खी होय. नवीन पद्धतीनें कोणत्यातरी एका शास्त्राचें पूर्ण शिक्षण देणें ह्मणजे करावयाचें तरी काय? पूर्वींच्या शिक्षणपद्धतिचें दळण तर दळीत बसावयाचें नाहीं व हल्लींची शिक्षणपद्धति नको आहे. मग ही तिसरी नूतनपद्धति कोणती बोवा? अशी कोणी पृच्छा करील, त्यास उत्तर हेंच कीं, दोन्ही पद्धतींतील दोष टाकून त्या दोहोंतून जेवढा चांगला ग्राह्यभाग मिळेल व त्यांत आणखी जितकी नवीन भर घालावयास सांपडेल तितकी आम्हांस पाहिजेच आहे. "सरकारी हमालखान्याचें शिक्षण" आह्मांस अगदींच नको असें आमचे मुळींच ह्मणणें नाहीं. पण त्या शिक्षण-

पद्धतींत जो इतर शास्त्रांचा सरसाहा चिवडा केलेला दृष्टीस पडतो, तो मात्र आह्मांस नको आहे. सरकारास आपल्या भाषेस उत्तेजन देऊन आपल्या कामगिरीचे बोजे उठविण्यासाठीं कांहीं लोक तयार करणें अगदीं अवश्य आहे. हें आम्हीं कबूल करतों; पण आह्मीं असें ह्मणतों कीं हें " हमालगिरीचें शिक्षण " खऱ्या शिक्षणापासून अगदीं अलग राखावें ! त्यांत शास्त्रिय विषयांचीं सोगें घुसडून देण्याचें मुळींच प्रयोजन नाहीं. पूर्वीं मराठे व मोंगल अमदानींत असली " हमालगिरी " लोक उठवित नव्हते असें नाहीं. परंतु त्यावेळेस त्यासाठीं असलीं कॉलेजें, शाळा व लोकलफंड तत्कालिन राजांस बसवावे लागले नाहींत. शास्त्री, पंडीत वगैरे लोकांस आश्रय देऊन तत्कालिन राजे त्यांचा फार निराळ्या रितीनें उपयोग करून घेत असत. त्यावेळची सरकारी हमालगिरी उठविण्यास थोडेंसें वाचन, उत्तम अक्षर, जमाखर्चाची फक्कड माहिती एवढें प्राथमिक शिक्षण रग्गड असे. या प्राथमिक शिक्षणांत तत्कालिन राजांनीं शास्त्रियविषयांची एकसहा घुसड करून देऊन व द्रव्याची लालूच दाखवून, खऱ्या शिक्षणाचा देशांतून बींमोड केलेला नव्हता. अथवा तसें करण्याचा प्रयत्नहि केला नव्हता. असें ह्मणण्याचें कारण बींमोड करण्याची इच्छा धरून बींमोड होत नसतो. आह्मां मानवांचें शहाणपण व चतुराई कितीही झाली तरी ती परमेश्वराच्या अगाध शहाणपणापुढें व अलोट चातुर्यापुढें कांहींच नाहीं.

यापुढें देशांत खऱ्या शिक्षणाची पुन्हां स्थापना होऊन चालू बजबजपुरी मोडावी अशी जर आर्यांस इच्छा असेल, तर आमचें शिक्षण जें परस्वाधिन आहे तें आह्मीं आमचे हातांत घेतलें पाहिजे व हल्लींचें शिक्षण केवळ " नोकरीसाठीं व पोटाकरतां " आहे सबब तें असून नसल्यासारखेंच आहे असेंच आह्मीं गृहित धरून चाललें पाहिजे. प्रयागचे मदनमोहन मालवीय यांनीं जी स्वतंत्र शिक्षणपद्धति असावी ह्मणून कल्पना सुचविली आहे, तशातऱ्हेची पण निव्वळ शास्त्रविषयक व कलाविषयक शिक्षणपद्धति आह्मीं सुरू करणें जरूर आहे. ह्मणजे जे खऱ्या विद्यादेवीचे उपासक व भक्त असतील, ज्यांस केवळ पोटाकरतांच विद्या संपादन करावयाची नसेल ते अशा विद्यालयांतून शिरूं लागतील. सांप्रत तशी वेळहि येऊन ठेपलेली आहे, प्रस्तुत विद्येकडे-खऱ्या शिक्षणाकडे

लो० टिळक, प्रो० विजापूरकर, रा० ब० वैद्य वगैरे विद्वत्वर्यांचें लक्ष लागून त्यासंबंधी त्यांचे प्रयत्नहि चालू आहेत. तेव्हां अशा शुभवेळीं अशा शाळा घालणें अत्यंत अगत्याचें आहे. अशा शाळांतून केवळ बुद्धिविषयक शास्त्रांचाच अभ्यास न करवितां उच्च वर्णाच्या लोकांकडून कलांचाहि अभ्यास करविणें इष्ट आहे. कारण कला हलक्या समजून जर आह्मीं केवळ बुद्धिविषयक शिक्षणावरच जास्त भर ठेवली, तर आज ज्या कला आमच्यांतून अस्तंगत झाल्या आहेत व ज्या वास्तविकपणें पाहतां खालच्या प्रतिच्या वर्णाच्यालोकांनीं शिकून त्यांत तरबेज होऊन श्रमविभागाच्या तत्वानें लोकांस मदत करावयाची ते लोक आज इतक्या निकृष्ट स्थितीप्रत येऊन पोहंचले आहेत कीं, त्यांस त्या सांप्रतच्या सुधारलेल्या कला शिकविणें फार जड जाणार आहे. ज्या ज्या वेळेस खालच्या प्रतिच्या वर्णावर दुर्धर प्रसंग ओढवल्यामुळें ते हताष झालेले आहेत, त्या त्या वेळेस उच्चवर्णाच्या लोकांनीं त्या त्या वर्णाचीं हलकीं कामें आपल्या हातांत घेऊन त्यांस त्या त्या संकटांतून तारिलें. असा आर्यांचा इतिहास कंठरवानें सांगत आहे. सबब सांप्रतच्या प्रसंगीं आर्यांतील उच्च-वर्णाच्या लोकांनीं व्यापारीकाव्याशीं टक्कर देण्याकरतां व देशाची गेलेली संपन्नता व इजत परत आणण्याकरतां त्यांस या नवीन तऱ्हेच्या विशेषतः व्यापारीदृष्टिच्या शिक्षणरूप पाण्याचें आमच्या हिंदुस्थानरूप निर्जीव होत चाललेल्या रोपट्यावर सिंचन केलें पाहिजे, व स्वतः हें शिक्षण संपादून खालच्या प्रतीच्या लोकांस त्याचे धडे घालून दिले पाहिजेत. त्याशिवाय आमच्या देशास ऐहिक व पारलौकिक सौख्य मिळविण्यास गत्यंतर नाहीं. शेवटीं इतकेंच सांगावयाचें कीं, शिक्षण हें आह्मां आर्यांचें केवळ जिवन होय व प्रस्तुतच्या सारख्या व्यापारीकाव्याच्या कचाटींत सांपडलेल्या स्थितींत तें व्यापारीदृष्टिनें पण निरीच्छबुद्धीनें देणें व घेणें हें अत्यंत हितावह होय. आर्यांच्या शिक्षणपद्धतिसंबंधीं तरणोपायाचा अल्पबुद्धिप्रमाणें जो उपाय दिसला तो त्यांचेपुढें ठेवला आहे. त्याचा ते योग्य विचार करोत अशी जगच्चालकाजवळ प्रार्थना करून येथेंच थांबतों.

वि. भा. कि. कि.

———

# श्रीक्षेत्र तुळजापूर.

( लेखक-श्रीधर शा[illegible]राव व[illegible]सा[illegible]कर-गुलबर्गा. )

तुळजापूर हें पुरातन क्षेत्र सोलापुराहून २४ मैलांवर मोंगलाई हद्दींत आहे. सोलापूर दोनप्रहरीं बारा वाजतां सोडलें. शहराबाहेर पाऊण मैलावर " रुपाभवानी " ह्मणून देवीचें देवालय आहे. तुळजापुरास जाणारे लोक याठिकाणीं दर्शन घेऊन पुढें जातात. वाटेंत तीनचार मैलांवर डाव्या बाजूस " एकरुख " तलाव लागतो. याला हिपरग्याचा तलाव असेंही ह्मणतात. याच तलावांतून सोलापुरास पाण्याचा पुरवठा होतो. जलाशय फार लांबवर मोठा मजेचा दिसतो. तलावावर पहावयाला येणाऱ्या लोकांकरितां बंगला ( Guest house ) बांधून ठेविला आहे. वाटेंत हलगूर व उळे झाल्या-नंतर तांबुळवाडीस मुक्काम केला. हा गांव मोंगलाई हद्दींत आहे. याठिकाणीं पाणी आणण्यास लोखंडी घागरही मिळाली नाहीं यावरून खेड्यापाड्यांतील लोक किती गरीबस्थितींत दिवस कंठतात याची कल्पना होण्यासारखी आहे. पहांटे निघून आह्मीं सिंदफळास सकाळीं आठ वाजतां पोंहचलों. येथें मुद्गलेश्वराच्या देवालयांत उतरलों " मुद्गलेश्वर " ह्मणून एक ऋषी होऊन गेले. त्यांनां जगदंबेनें आपला बाप मानला होता असें ह्मणतात. तेव्हांपासून सिंदफळ हें श्रीजगदंबेचें माहेर असें समजतात; ह्मणून इकडून जाणाऱ्या यात्रेकरूनीं प्रथम मुद्गलेश्वरास नैवेद्य करून मग तुळजापुरास देवीला जाण्याचा परिपाठ आहे. तुळजापूर येथून जवळ जवळ दोन मैल आहे. जेवण करून तिसऱ्या प्रहरीं तुळजापुरास गेलों. वाटेंत सडकेलाच " घाटशीळ " व " पापनास " हीं दोन ठिकाणें आहेत. घाटशीळ ह्मणजे घाटावर मनोऱ्यावजा एक उंच इमारत आहे. त्यावर आठ हात घेराची एक भलीमोठी शिळा आहे. तिजवर देवीची दोन्हीं पाउलें अगदीं स्पष्ट उमटलेलीं आहेत. तेथें उभा राहून देवी आपल्या भक्तांस हाक मारीत आहे अशी समजूत आहे. पापनास येथें एक देवीची मूर्ती असून लहा-नसें एक तीर्थ आहे त्याला पापनास असें ह्मणतात. गांवांत गेल्यावर प्रथम धूळदर्शन घेतलें. देवीचें प्रसन्नवदन पाहून घटकाभर आनंदातिरेकानें देहभान विसरून गेलों. देवालयांत शिरतांनां प्रथम समोर देवळांतील एक

मनोरा दृष्टीस पडतो. गर्भदेऊळास जाण्यास पुष्कळ पायऱ्या उतरून खालीं जावें लागतें. कांहीं पायऱ्या उतरल्यानंतर प्रथम " कल्लोळ " लागतें. ह्या पायऱ्यांवर दोन्हीबाजूस परड्या घेऊन बायका बसलेल्या असतात. नवस केलेले लोक ह्यांत मूठ मूठ पीठ आणि मीठ घालीत जातात. कल्लोळ ही स्नान करण्याची जागा आहे. पाणी पहाडांतून येतें असें ह्मणतात. हौदा-प्रमाणें चोहोंकडून बांधून काढलेलें आहे. यांत स्नान करण्यास ब्राह्मणेतरांस चार आणे कर द्यावा लागतो. कल्लोळावरच नारदाची एक अगडबंब पाषाणमूर्ती आहे. कर घेण्याचें ऑफीस याठिकाणींच आहे." " खुंटा-फळी " ह्मणून यात्रेकरूंवर एक कर आहे. तो दर गाडीमागें १। रुपया प्रमाणें घेऊन तेथील अधिकारी धोतरावर गाडीचा छाप मारतात. तो परत येतांनां नाक्यावर दाखविला ह्मणजे मग कांहीं त्रास पडत नाहीं. खुंटा-फळीचें उत्पन्न वर्षास सुमारें पंचवीस हजारांहून जास्त होतें असें समजतें. येथून बऱ्याच पायऱ्या उतरल्या ह्मणजे उजव्या हाताला गायमुख लागतें. कल्लोळांत स्नान केल्यानंतर गायमुखांत स्नान करण्याचा सांप्रदाय आहे. देवालय बहुतेक डोंगराच्या खोऱ्यांतच बांधलेलें आहे. गायमुखांतून नेहमीं खालीं स्वच्छ पाणी पडत असतें. गायमुख ज्या विस्तृत पाषाणावर आहे तो कोरूनच त्याला गायमुखीचा आकार आणला आहे. ज्या छिद्रांतून पाणी येतें तें पाहिलें असतां प्रवाह फार लांबून येतो असें दिसतें. ह्या पवित्रस्थानीं स्नान करण्यास मनाला फार आनंद वाटतो. येथून मुख्य देवालयास जाण्यास मोठा दरवाजा लागतो. कांहीं पायऱ्या खालीं गेल्या-नंतर मुख्य देवालयाच्या आसपासचें खुलें पटांगण लागतें. हें फार विस्तृत आहे. समोर होमशाला आहे. याठिकाणीं आश्विन वद्य नवमीस होम होत असतो. देवीचा मोठा उत्सव नवरात्रांत व विशेषतः विजया-दशमीस होतो. याठिकाणीं दरवर्षी नगरच्या तेल्याची पालखी येते; याची दंतकथा अशी आहे कीं, या तेल्याच्या मूळपुरुषाला देवीचा वर होता. तो असा कीं, तो पालखी घेऊन निघतांच घर जळून जावें व तो परत जाईपर्यंत तें घर पुन्हां नवेंकोरें बनत असावें ही चाल अद्यापि चालू आहे. हल्लीं येतांना तो एक झोंपडें तयार करून त्याला आग लावून येत असतो. पालखीच्या खालचा दांडा नवमीच्या दिवशीं रात्रीं होमांत

टाकतात व दांडी मात्र परत न्यावयाची वहिवाट आहे. होमाजवळ पिंपळाचा पार आहे. यांत महिषासुर-वधापूर्वीची एक प्राचीन मूर्ती आहे असें ह्मणतात. देवीची पालखी निघाल्यावेळीं याठिकाणीं आरती करतात. येथून जवळूनच बाहेरच्या सभामंडपांत प्रवेश होतो. याठिकाणीं महादेवाचें देवालय आहे. येथून देवीचें दर्शन होतें व हीच मंत्रपुष्पांजली म्हणण्याची जागा आहे. येथें एकंदर चार घांटा टांगलेल्या आहेत. त्यांपैकीं महादेवापुढें असलेली घाट लहान असून गोपीनाथ राजाराम वैद्य या गृहस्थानें श्रावण शु० ९ शके १८२९ या सालीं अलिकडेच बांधली आहे. मधल्या दोन घांटावर अनुक्रमें उद्धव यादवराव व गाजी शहागणकर असें लिहिलें आहे. येथून आंतल्या सभामंडपांत जाण्यास दार लागतें. या दारावर एका चांदीच्या पत्र्यावर एक संस्कृत स्तोत्र लिहिलेलें आहे. त्यांत शेवटीं हस्ताक्षर अनंत पाठक वारकरी शके १७७५ श्रावणकृष्ण ९ शुक्रवार प्रमादीनामसंवत्सरे असा उल्लेख आहे. दरवाज्याच्या आंतल्या बाजूस मधला सभामंडप लागतो. उजव्या बाजूस देवीचें शेजमंदीर आहे. त्यांत पलंग वगैरे आहे. समोर गर्भदेवालयांत देवीचें प्रसन्नवदन पाहून मन तल्लीन होऊन जातें. ध्यान फारच मनोहर आहे. जणूं कायती पुत्रप्रेमानेंच आपल्या सर्व भक्तांस हांक मारीत आहे असा भास होतो व आई हें नांव अगदीं सार्थ आहे असें वाटतें. देवीला शक्तीप्रमाणें पूजा करावी लागते. शेवटची भोगी १। रुपयाची असते. हा उपाध्यायाचा हक्क आहे. पण सध्यां पूजारी व भोपे यांचा तंटा चालू आहे. तंटा विकोपास गेला आहे त्यामुळें देवीपुढलें सर्व उत्पन्न जप्त आहे. नैवेद्यसुद्धां सरकारांत जातो. कांहीं दिवस तो लिलावानें विकीत असत पण अलिकडे ब्राह्मण अधिकारी आल्यापासून ही गैरशिस्त वहिवाट काढून टाकली आहे व तें अन्न गरीब लोकांस मोफत घालण्याचें ठरविलें आहे हें त्यांस भूषणावह आहे. आपसांतल्या कलहामुळें सांप्रत दोघांचेंही नुकसान आहे, हें या लोकांच्या लक्षांत येत नाहीं हें त्यांचें दुर्दैव होय. असो. गर्दी होऊं नये ह्मणून दर्शन घेतलेल्या लोकांस दक्षिण दरवाजानें बाहेर सोडतात. या दरवाजावर देवासच्या महाराजांच्या कनिष्ठ बंधूनीं केलेलें देवीचें स्तोत्र शके १८०३ सालीं चांदीच्या पत्र्यावर लिहून बसविलें आहे.

त्यांतील ७।८ श्लोक यापुढें देत आहों:—

॥ श्री कालिकायनमः । जयजयकाली विश्वमाते दयाळे ॥ झडकरी मज पावे लोकवंद्ये कराळे ॥ जननि जनक बंधू तूं गुरु इष्टमित्र । तुजविण मज नाहीं आश्रया अन्य पात्र ॥ १ ॥ हे कालिके भगवती भवसिंधु तारे । हे इंदिरे सकल दुःख दरिद्र हारे ॥ हे श्रीसरस्वती हृदयाब्जकारे । दासा कृतार्थ करणें करुणाब्धिपूरे ॥ २ ॥ नामें असंख्य चरितासहि पार नाहीं । शेषासही न वदवे न श्रुतीस कांहीं ॥ वाटे तथापि तुजलाच अनन्यभावें । गावें यथामति अहर्निशि देवी ध्यावें ॥ ३ ॥ वेदांतनिष्ठ ह्मणती तुज रूपहीन ॥ त्रैलोक्यसुंदरि मजला न पटेच खूण ॥ तुझें स्वरूप गुणकर्म महा पवित्र । केलीं प्रसिद्ध जगतांत मृकंडु पुत्रें ॥ ४ ॥ झाला महापुरुष या परमार वंशीं । नामाभिधान बरवें जगदेव त्यासीं ॥ कीं तो तुझाच जननी निजबाळ होता । तुझे कृपें सकल वैभव येत हाता ॥ ५ ॥ पूजी असें जगति वल्लभ सात वेळां । अत्यंत तोष वरदे तुजलागिं झाला ॥ त्याचे समस्तहि मनोरथ पूर्ण केले । अंतीं तुवां निजपदांबुजिं स्थान दिल्हें ॥ ६ ॥ माझे पिता महापितादि याच वंशीं । झाले मीहि जन्मलों पदसेवनासी ॥ दुरवून हेतु मनिचे भवबंध तोडी । दासाभिमान सहसा जननि न सोडी ॥ ७ ॥ देवास नाम नगरीं करि वास देवी । ही राजधानि बहु पुण्य पवित्र ठावी ॥ तेथील भूप दुसरा स्तवितों मी माते । दे सौख्यराशि तवभक्ति सदैव मातें ॥ ८ ॥

याच दरवाजावर उभें राहून खालीं चादरींत लेंकरू टाकण्याचा लोक नवस करतात तो येथें फेडीत असतात. आजपर्यंत ही वहिवाट चालू होती पण अलिकडे लेंकरास इजा होईल ह्मणून ही वहिवाट सरकारी हुकुमानें बंद केली आहे. खालीं जमीनी वरूनच मुलास चादरींत ठेवावें ह्मणून फर्माविलें आहे. या दरवाजा समोरच्या ओवरींत देवीचें संस्थान आहे. या ठिकाणीं देवीचें उत्पन्न व त्याचा जमाखर्च व देवालयाची दुरस्ती हीं कामें या संस्थानाकडून चालतात. त्यावर देखरेख करण्यास एक अम्मलदार असतो. सध्यांचे अधिकारी ब्राह्मण आहेत. येथून पश्चिमेकडच्या कोंपऱ्यांत नृसिंहाचें देवालय लागतें. येथून जवळच पश्चिमदरवाजा लागतो. देवालयाच्या

मागच्या बाजूस कोंपऱ्यांत शकून पहाण्याची जागा आहे. एका मोठ्या दगडावर दोन लहान दगड ठेवले आहेत. त्यांवर गोड्या तेलाचें बरेंचसें मेण चढलेलें आहे. ज्याला शकून पहावयाचा असेल त्यानें तेथील मनुष्याला एक पैसा द्यावा व शकून पहावा तो असा कीं आपले दोन्हीं हात त्या लहानशा दगडावर अगदीं हळू ठेवावे व घटकाभर मन एकाग्र करून स्वस्थ असावें ह्मणजे तो दगड कांहीं वेळानें हळूहळू फिरतां फिरतां एकदम गरदिशीं फिरतो. उजवीकडे फिरल्यास चांगलें असें मानतात. याठिकाणीं बरेच भाविकलोक पहात असलेले सदैव दृष्टीस पडतात. पश्चिमदरवाजानें काळभैरवाच्या देवळास जाण्यास रस्ता आहे. ह्या दरवाजापासून सुमारें अर्ध मैलावर भारतीबुवांचा मठ आहे. पश्चिमदरवाजांत उभें राहून मठाकडे तोंड करून देवी मठांत आहे असें समजून नित्य रात्रीं बारा वाजतां पूजारी देवीस हाक मारतात व नंतर पूजा होते. या मठांत भारतीबुवा व त्यांच्या दोन शिष्यांची समाधी आहे. शिवाय भारतीबुवांच्या समाधी शेजारीं श्रीजगदंबेची मूर्ती आहे. तेथेंच दुसऱ्या कोठडींत एका मखमालीच्या लहानशा गादीवर सारिपाटाचा डाव मांडिला आहे. हाच डाव देवी खेळत असे अशी पुरातन समजूत आहे. पटावर सोळा सोंगट्या मांडून ठेवल्या आहेत. याशिवाय येथें दुसरें कांहीं नाहीं. मठाला पांचशे रुपये उत्पन्नाचे दोन गांव इनाम आहेत त्यांतून मठाचा खर्च चालतो. मठांतल्या सध्यांच्या गादीवरल्या पुरुषांनीं अद्यापि चतुर्थाश्रम घेतला नाहीं. समक्ष भेटीवरून ते प्रापंचीक असावेत असें दिसतें. एकंदरींत पहातां अलिकडे आश्रमधर्म कोठेंच बरोबर चालत नाहीं यांत शंका नाहीं. येथून घरीं परतलों. गांवांत कुंकवाचा एक कारखाना आहे. येथें कुंकू व गोडेंतेल यांचा फार दांडगा खप आहे. गांवांत अहिल्याबाईनें बांधलेल्या दोनतीन मोठ्या विहिरी आहेत. वेशीपुढच्या विहिरीवर अहिल्याबाईचें नांव लिहिलेलें आहे. वाचनालय देवलयाच्या बाजूस एका ठिकाणीं आहे. तें नुकतेंच स्थापन झालें आहे. परदेशी निषिद्ध साखर न खाण्याविषयींचें श्रीशंकराचार्यांचें आज्ञापत्र येथें ठेवलेलें आहे. गांवांत देशी साखरेची मिठाई मुबलक मिळते. शहरांतील वस्ती फार गलिच्छ आहे. उदीम-धंदा करणाऱ्यांखेरीज बाकीचे लोक फार आळशी आहेत. याचें कारण ते फक्त यात्रेकरूंच्या आश्रयावरच अवलंबून असतात हें होय. तुळजापुरास तीनच दिवस रहाण्याची वहिवाट आहे ह्मणून आम्हींही तिसरेदिवशीं संध्याकाळीं परत निघालों.

# आठवण.

( लेखक—द. म. )

आऊ फार आजारी होती, आणि वैद्यबोवांनीं तिच्या फणफणणाऱ्या तापावर एक गुणावह काढा लिहून दिला होता. हीं काढ्याचीं औषधें ताबडतोब बाजारांतून आणण्यासाठीं आऊचा भाऊ बाळू, आईच्या आज्ञे-वरून लगबगीनें बाहेर पडला. बाळू फार दूर गेला नाहीं तोंच, त्याला वाटेंत रामू भेटला. त्यानें त्याला बोलावयास गुंतविलें. रामू म्हणतो, " दोस्त, नदीवर पोहोण्यास तर चल, पाणी तर काय मारु निवळलं आहे. " बाळू उत्तर करतो. " छेरे बोवा, मला मुळींच वेळ नाहीं. " पण बाळूच्या या शब्दांत ठाम निश्चयाच्या ऐवजीं थोडासा गुळमुळीतपणा मात्र दिसत होता.

रामू आग्रह करून ह्मणतो. " कांहीं तरी सांगतोस झालं! पाहिजे तर फार वेळ पोहत बसूं नकोस. पांच मिनिटांत गमतीनें एखादी सुळकांडी मारून जा आपल्या कामाला. त्यांत काय मोठंसं? का तेवढीदेखील सवड नाहीं! " कर्तव्य आणि सुख यांच्या विचारांत बाळू एकच क्षण घुटमळला; व लगेच पांचच मिनिटांच्या बोलीनें तो रामूबरोबर नदीकडे वळला. पोहो-ण्याच्या भरांत बोलीचीं पांच मिनिटें, आणखी अशाच कैक मिनिटांना बरो-बर घेऊन, बिचाऱ्या बाळूला फसवून, केव्हांच निघून गेलीं; हें काळोख पडूं लागेपर्यंत बाळूच्या लक्षांतही आलें नाहीं! अर्थात् आऊचें व तिच्या औष-धाचें इतका वेळ त्याला विस्मरण झालें, यांत नवल तें काय?

आपण घरांतून कोणत्या कामासाठीं बाहेर पडलों, या गोष्टीची जेव्हां बाळूला आठवण झाली, तेव्हां रात्र पडूं लागली होती; व त्याला पाहिजे असणाऱ्या औषधांचीं दुकानें बंद झालीं होतीं. बाळूला आपल्या विसराळू-पणाबद्दल फार वाईट वाटलें. लाजेनें ओशाळलेलं तोंड खालीं करून त्यानें थेट घराची वाट धरली. थकलाभागलेला, भुकेनें व्याकूळ झालेला, बापडा बाळू गुपचुपपणें माडीवर जाऊन, थंडीनें कुडकुडत पडला. दुःखपूर्णवृत्तींत बाळूला चैन पडत नव्हतें. आपण वारंवार पुष्कळ गोष्टी विसरतों, हें त्याणें जाणलें; तथापि बहिणीसाठीं काढ्याचीं औषधें आणण्याचा त्याचा खरोखर हेतु असूनही, निव्वळ त्याच्या निष्काळजीपणामुळें झालेल्या विसराळूपणाच्या

फसवणुकींत घडलेल्या चुकीबद्दल तो आपल्यावरच रागावला व त्याची त्यालाच लाजही वाटूं लागली! अशा विचारभ्रमानें त्याचें कपाळ दुखूं लागलें, व त्याला सडकून ताप भरला. सारें अंग ठेंचल्यासारखें दुखूं लागलें. एका एकीं " औषधावांचून आपल्या आऊताईची काय दशा झाली असेल" हा भयंकर विचार त्याच्या डोळ्यापुढें उभा राहून, छातींत धसका बसला. त्याबरोबर बाळूनें तट्कन् उठण्याची धडपड केली, पण त्याला घेरी आल्यामुळें, तसाच तो बिचारा मागें अंथरुणावर पडला.

कांहींवेळपर्यंत त्याला कशाचेंही भान नव्हतें; पण मग हलके हलके बाळूला, आपण एका अपरिचित खोलींत असल्याचा स्पष्ट भास झाला. तेव्हां त्याला थंडीची हुडहुडी भरल्यामुळें त्याची दांतखिळी वाजूं लागली होती. तो उठून बसला व त्यानें आपल्या सभोंवार नजर फेंकली. त्याच्याजवळच एक कोळसे भरलेली शेगडी त्याला दिसली, पण तींत विस्तव मात्र पेटविलेला नव्हता.

एका कोपऱ्यांत एक बुटबैंगण म्हातारी लक्षपूर्वक बाळूकडे पहात बसली होती. फिरत फिरत बाळूचे डोळे त्या म्हातारीकडे जातांच, ती म्हणतेः– " विठू, काय पाहिजे?" बाळू म्हणतोः–" बाई तुमचं नांवहो काय? व मी आहे तरी कोठें? एवढं मला सांगाल कां?" म्हातारी म्हणतेः–" माझं नांव? हो, खरंच आत्ता इतक्यांतच तें मी विसरलें. तूं किनई बाळ, या विस्मरणभूमींत खुशाल आहेस बरं का!" बाळूः-" पण तुम्हांला मी काय म्हणून हाक मारूं तें तर सांगाल?" म्हातारीः–" मला कां? दमडी, टोली, कांहीं तरी म्हण झालं! पण हो, दुसरं कांहीं म्हणण्यापेक्षां विसरेपर्यंत मला आपला तूं कवडीच म्हणत जा. समजलास कां गणू?" बाळूः-" माझं नांव बाळू आहे." म्हातारीः-" असं कां, बरं तर, मी आपल्याकडून तें खूप ध्यानांत ठेवीन. तुझं नांव गोपूच म्हणालास नव्हे कां?"

ही म्हातारी बुद्धिपुरःसर आपल्याला त्रास देण्याच्या हेतूनेंच असें करीत आहे, असें समजून संतापलेला बाळू तिरसटपणें ओरडून म्हणतोः–" मी गोपू नाहीं म्हणालों. माझं नांव बाळू आहे, असं म्हटलं; समजलात कां कवडीबाई?" म्हातारी बजावण्याच्या सुरानें म्हणतेः-" हेंच हेंच तें. असें जळफळून जिवाला त्रास करून घेतां कामानये, म्हणून वैद्यबोवांनीं सांगितलं

आहे ना ? नाहीं तर तुला काय होईल ह्मणे....मीही विसरलेंच पुरतं काय तें. आठवण राहते आहे कुठें ! बरं, मोरू तुला आतां खायला हवं कां कांहीं ! ”

भलत्याच नावानें हाक मारलेली लक्षांत येऊन त्याबद्दल राग येण्याइतकी बाळूची प्रकृती ताळ्यावर नव्हती. ती जास्त बिघडली असल्यामुळें तो कण्हत कण्हत ह्मणतोः–“ होय, मला थोडासा सुरबुरीत सांजा करून दिलात, तर बरं होईल. ” ह्मातारीः–“ बरं, देतें अँ तुला सांजा करून लखु. हे पहा शेगडींत निखारे कसे रसरसले आहेत नव्हे झगझगतील. खरं, मी आपली विस्तव पेटवायलाच विसरलें झालं ! बाळू डोळे झांकून निपचित आंथरुणावर पडला होता, व त्याला सांजा करून देण्यासाठीं, ती ह्मातारी खोलींत वावरत होती तिची तयारी होतांच ती बाळूजवळ जाऊन, ममतेनें ह्मणतेः “ ऊठ बाळ, हा पहा तुला मी पातळसा सांजा करून आणला आहे घे दोन घास ” ताटांतल्या सांजाला बोट लागतांच बाळू चकितपणें म्हणतोः–“ कां बरं ? हा असा गार कां लागतो माझ्या हाताला ? ” ह्मातारी स्वतःवर चडफडत ह्मणतेः–“ खरंच कींरे , अगदीं गार हा ! जळली मेली ती आठवण मी हा सांजा शिजवायला विसरलेंच वाटतं ! ” बाळू पुढें ह्मणतो?–“ आणि यांत सांजाचा कणही दिसत नाहीं. नुसतं पाणी ! ” ह्मातारी आपल्या कपाळावर हात मारून ह्मणतेः-“ दैवा ! दैवा ! मी त्या टोपल्यांतला सांजा देखील घालायला विसरलें कां ! बरं बाबा, तुझी तरी आठवण धड आहे ! ह्मणूनच हें सारं तुला कळतं ! नाहीं तर हें नुसतं गार पाणीच “ उन्हून ” हा गोड सांजा समजून तूं खायचा नी वायूबियू देखील व्हायचा ! बरं, तें आतां जाऊंदे. यापुढें मला आठवण राहिल्यास तुला हलके हलके सवडीनें मी एक छानदार खारीकच भाजून देणार आहे. मग ऊठ तर, आणि या तक्याला टेंकून बैस. आतां तुला पाहायला वैद्यबुवा येणार आहेत. तुला काय होतं तें सारं नीट त्यांना सांग ”

वैद्यबुवा आले ते बाळूकडे न जातां त्या ह्मातार्‍या कवडीकडे गेले व तिच्याच प्रकृतीची चौकशी करून ह्मणतातः–“ आतां बरं वाटतंना आजीबाई ? ह्मातारीः–“ हो, असं वाटत असावं खरं. “ वैद्यबुवाः– ‘ ‘ मी सांगितलेलं औषध आपण नेमानं घेतांना ? ‘ ‘ कवडी :–‘ हो, मी तें घेत असेन असा माझा तर्क आहे. पण हमखास कांहींच आठवत

नाहीं. '' मग वैद्यबोवांनीं तिची नाडी तपासली, व जीभ पाहिली; आणि न विसरतां औषध घेण्याची ताकीद करून, ते तसेच चालते झाले. त्यांनीं बाळूकडे नुसतें ढुंकूनही पाहिलें नाहीं; यामुळें बाळू स्फुंद स्फुंदून रडूं लागला' कवडी लगेच त्याला जोरानें विचारते :- ' 'अरे धोंडू, असं झालं तरी काय तुला रडायाला? बाळू चिडून रडत रडत ह्मणतो :-माझं नांव धोंडू नव्हे ह्मणून मी तुला सांगतोय अँ अँ अँ! "कवडी :-" जाऊंदेरे, त्यांत काय मोठंसं? मी आपलं तुझं नांव नेंहमीं विसरतें! नी मग माझ्या तोंडाला येईल त्या नांवानं तुला हाक मारतें. पण तुला एवढे हुंदकेरे कशाचे येतात?" बाळू :-" कां नांहीं येणार? आजारी कोण? तुह्मी कीं मी? मी लागलों आहे मरायाला आणि वैद्यबोवा पाहतात तुह्माला!" कवडी हात आपटून बोटें मोडीत मोडीत ह्मणतेः-"हा कर्मा! अलबत, वैद्यबोवा तुझ्या साठींच आले होते. पण मला अगदींच विस्मरण पडलं! माझ्या मनांत त्यांना तुला नीट पाहायला देखील सांगायचं होतं! पण आठवण विसरून, उगीच्याउगीच माझीच जीभ दाखविण्याच्या नादांत मला हें सुचलंच नाहीं. असा काय मला भोपळ्या रोग झाला होता? वैद्यबुवा असतांनाच तूं तरी आठवण करावीस कीं नाहीं? आतां मी पळत जाऊन, त्यांना परत घेऊन येतें." असें ह्मणून ती ह्मातारी कवडी निघून गेली. ती फार वेळ बाहेरच होती.

परत आल्यावर ती बाळूला ह्मणतेः-" काय करूं बाबा, वैद्यबुवा कुठं नाहींत. प्रत्येकजणाला मी त्यांचं घर विचारलं, पण कुण्णालाच त्यांच्या घराची आठवण नाहीं. मग तें मला तरी कसं सांपडणार? मला फार वाईट वाटतं, पण माझा निरुपाय आहे. तुला ठाऊकच आहे कीं, आपण या विस्मरणभूमींत राहत आहोंत, तेव्हां हें असंच चालायचं!" बाळू दुःखानें सुस्कारून आपल्याशींच ह्मणतोः-" हर हर! आतां मी कसचा घरीं जातों? येथेंच मी खास मरणार! आणि विस्मरणभूमींतील प्राण्यांची आठवण तरी कोणाला राहणार? नदीवर पोहायला न जातां, मी औषध आणायाला सरळ बाजारांत गेलों असतों, तर असं कां झालं असतं? त्यानें आपले डोळे मिटून भिंतीकडे तोंड फिरविलें. क्षणाभरानें बाळू डोळे उघडून चोहोंकडे पाहतो तों एक किंचित् हसरा गोड चेहरा, आशापूर्ण नेत्रांनीं

त्याला न्याहाळीत होता. " बाळू, तुला अमळ बरं वाटतंना ? " असा आर्द्र मधुर आवाजही त्याच्या कानीं पडला. आईचा प्रेमळ आवाज बाळूनें तेव्हांच ओळखून, एक लांब उसासा सोडला व आतुरतेनें म्हणतो:-" आइ आई, तुला माझी आठवण आहे कांग ? आणि मी तुजकडे परत आलोंना आतां ? " आई:-" होय बाळुल्या, अत्ता कुठं तुझी थोडीशी आशा वाटूं लागली आहे. काय तो तुझा भयंकर ताप बाबा ! आऊसारखाच तूंही फार फार आजारी होतास, पण आतां तूं लौकरच बरा होशील अँ. " बाळू कळकळीनें ह्मणतो:-" खरंच आई, मी आऊताईचं औषध आणायला विसरलों तिचं कसंग आहे ? " आई:-" तिकडून लगेच औषध आणायचं झालं आणि आऊ बरी झाली. या तुझ्या दुखण्यांत तिनं तुझी किती काळजीपूर्वक शुश्रुषा केली आहे ह्मणून सांगू ? " बाळू मनःपूर्वक पस्तावलेल्या आवाजानें ह्मणतो:-" आई, यापुढें मी आपल्याकडून हलगर्जीपणा सोडून देऊन अगदीं अगदीं कांहीं एक विसरायचा ह्मणून नाहीं. "

बाळू खडखडीत बरा झाला व त्यानें आपलें वचन पाळलें. सांगितल्या कामाची काळजीपूर्वक आठवण ठेऊन तो तीं व्यवस्थितपणें करण्यास शिकला. त्याच्या तापाच्या भ्रांतीनें उत्पन्न झालेल्या स्वप्नसृष्टींतील ती विस्मरणभूमी, ती ह्मातारी कवडी, ते वैद्यबोवा आणि तो पातळ पाणसांजा बाळूच्या स्मृतिपटावर खोदल्यामुळें, त्याला आजन्म कर्तव्याचें विस्मरण कसें तें झालेंच नाहीं. बालवाचकांनीं या गोष्टीची विशेष आठवण ठेवावी.

---

## नवीन गद्यकूट नं० १.

मी वृक्षयोनींतील आहें. माझे पोटांतील " लक्ष्मी " काढलीत तर मीं तुमचा पिच्छा पुरवीन. पाय तोडलेत तर डोळ्यांत भरेन; ह्मणून डोक्यांतलें " उत्तम " घेऊन " लक्ष्मी " न्याल; तर तुमचे डोळ्यांनीं " टिपें " पाडवीन; पण " पाय तोडून " शिवाय " लक्ष्मी " नेलीत तर तुमचें कल्याणच करीन; तर मी कोण सांगा पाहूं ?

२

मीं हिंदुस्थानची एक रक्षक समुद्रपत्नी आहें. माझीं चार अक्षरें आहेत. माझें चवथें व दुसरें अक्षर मिळोन एक "संस्थान" आहें; चवथें व तिसरें मिळून रत्नत्रयींतील एक, तुमचे उपयोगाचें व अत्यंत जरुरीचें असें रत्न आहे. तिसरें व पाहिलें मिळून तुम्हांस देवी न येणारे साधनांपकीं एक आहें. तर मीं कोण? माझें नांव काय? माझ्या पोटांतल्या "गुळाच्या ढेपी" काढल्यात म्हणजे मी एक "पुण्यश्लोक" होईन. माझें अर्ध "पुरुष" आहे व दुसरें अर्ध लता (स्त्री) आहे.

**सूचना:**—उत्तरें ता. २१।१।०९ चे आंत यावीं. उत्तरें बरोबर देणाराचीं नांवें लोकमित्रांत प्रसिद्ध केलीं जातील. या खेपेची रहा पाहून पुढें बक्षिसें लावणार आहों तरीं खालील पत्यावर उत्तरें पाठविणें.

**पत्ता—रामकृष्ण शंकर जांभेकर** म० व पो० कोर्ले (खारेपाटण) जि० रत्नागिरी.

**सूचना**-५ वे अंकांतील ३ नंबरच्या पद्यकूटाचा निकाल पुढें देण्यांत येईल.

थोरात.

---

## पत्रव्यवहार.

चार हजार वर्षांहून पूर्वींच्या धर्मराजाच्या राजसूय यज्ञांत धर्मराजास पौण्ड्रादि देशांतील राजांनीं कापूर वगैरे पदार्थ नजराणा आणून दिल्याविषयीं—

'पौण्ड्राश्च दामलिप्ताश्च यथाकामकृता नृपाः ।
कालेयकं च रूप्यं च परिगृह्य परिच्छदान् ॥ ५१ ॥
अगरून्स्फटिकांश्चैव दन्ताञ्जतीफलानि च ।
तक्कोलांश्च लवङ्गांश्च कर्पूरांश्च महाबल ॥ ५२ ॥
अन्यांश्च विविधान्द्रव्यान्परिगृह्योपतस्थिरे ।'

अशी उक्ति श्रीमन्महाभारत-सभापर्वाच्या ७८ अध्यायांत असल्यामुळें ४००० चार हजार वर्षांहून पूर्वींही या हिंदुस्थानांतील लोकांस कापराची माहिती होती असें ठरतें, याकरितां १९०८ आगष्टच्या लोकामित्राच्या २ न्या अंकांतील ५९ पृष्ठावरील ३ न्या ओळीपासून ८ ओळींपर्यंतचा ह्मणजे 'इ० सन ९०० चे अखेरीस-' इत्यादि मजकूर आह्मांस पसंत नाहीं.

उप्पिनंगडिस्थ कुमठा-**नारायणाचार्य.**

---

7086
ग्रं.का | 0044

फेब्रुवारी-१९०२.] ॥ वन्देमातरम् ॥ [अंक ८ वा.

# लोकमित्र.

## साधुवर्य श्रीगजाननमहाराज.



" संसारीचें सार जया नाश नाहीं । तेंचि पडे ठायीं संतसंगें ॥ "
रामदास.

तर मग नाशिवंत मानलेल्या संसारांतच अविनाशी-अक्षय्य, पण अव्यक्त, असें गूढतम तत्व आहे! वरील अवतरणांत श्रीसमर्थांनीं हा

स्थापित केलेला मुत्सद्दी सिद्धांत, प्रापंचिकांना पटण्यासारखाच आहे. प्रपंचलोलुपांना, प्रवृत्तिमार्गापासून एकदम निवृत्तिमार्गाकडे खेंचण्याचा वृथा आचरटपणा न करितां, चुचकारून, घुलकावून, गोडीगुलाबीनें, नकळत प्रवृत्तींतून सहजीं निवृत्तींत ढकलून, तेथची गोडी लावण्याची ही रामदासस्वामींची हतोटी अद्वितीय होय. पौराणिककालीं जसा नारदमुनींनीं वाटमाऱ्या वाल्याकोळ्याला, त्याच्या रुचीनुरूप, " मारा, मारा, " असा उलटा मंत्र सांगूनच त्याचा उद्धार केला; त्याप्रमाणेंच जगाच्या कल्याणासाठीं अवतार घेणाऱ्या संतांच्या विभूतींनीं, सामान्य जनतेचा कल पाहूनच, आपल्या उपदेशाची दिशा ठरविली पाहिजे. हें धोरण समर्थांना पुरें साधलें होतें. साखरेला जशा मुंग्या मिठाळतात तसें आपण ज्या मायामय प्रपंचाला तद्रूपपणें बिलगलों आहों, त्याच संसारांत शाश्वत सार आहे, असें ठासून सांगतांनां, समर्थ बजावतात कीं, तें सार किंवा आदितत्व संतसंगानेंच साध्य होणारें आहे. विषांतून शुद्ध अमृत काढण्याचा केवढा हा संतसमागमाचा महिमा ! पुण्याईच्या पेटींत सुकृताचा सौदा फायदेशीरपणें जुळवून देणारे जर कोणी दलाल असले तर ते हे संतच होत. यांना दलालीही फारशी द्यावी लागत नाहीं. नुसता खरा भाव दिला कीं, काम झालें ! पण यांची गांठ पडण्याला मात्र पूर्वसंचीतच पाहिजे. सुकृतलाभ जोडल्यावरही ईश्वराची ओळख पटवून देणारे तेथचे द्वारपाल हेच संत ! फार काय, संतांच्या हृदयांत जसा ईश्वर, तसे ईश्वराच्या हृदयांतच जे संत, त्यांची योग्यता ईश्वराहून उणी कशी म्हणावी ? हल्लीं हयात असलेल्या अशाच एका थोर साधूची थोडीशी चरित्ररूप ओळख करून देण्याचें आज योजिलें आहे.

तीसवर्षांपूर्वीं आपली ही मायभूमि हल्लींसारखी दुष्काळ-प्लेगादि आपत्तीच्या हैराणगतीनें वारंवार नापीक होत नसे. मेहनत मशागतीची अनन्यसेवा करणाऱ्या तिच्या शेतकरीभक्तांना, तेव्हां ती भरंवशानें घांसभर अन्न सुखासमाधानांत देई. गोठ्यांत चार गुरें व घरांत दोन पोरें हींच काय ती शेतकऱ्यांची गरीबींतली सुखाची धनदौलत. हीं पोरें घरांत मिळेल ती भाजीभाकर खाऊन, बेगुमान गुरांमागें हिंडून, त्यांच्या प्रेमळ संगतींतच मौजेनें असावयाचीं ! अपशब्दांच्या संस्कारामुळें गुराख्यांच्या बोलण्यांत

जरी रानटीपणा असला, तरी त्यांची चित्तवृत्ति निर्मळ असते. बुद्धिमंत ऊर्फ विकारवश माणसांचा जितका परिचय गुराख्यांना कमी, तितकाच त्यांच्यावर खऱ्या निष्ठेनें प्रीति करणाऱ्या निर्बुद्ध ऊर्फ एकमार्गी गुरांचा सत्समागम त्यांना जास्त; याच शुद्धतेचा सरळपणा गुराख्यांच्या कोंवळ्या मनावर उमटलेला असतो. शिवाय गोरसासारखें पौष्टिक व सात्विक अन्न, त्यांना जास्त प्रमाणानें मिळाल्यासही, सदृढपणांत, सत्वगुणविशिष्ट गुणांकडेच त्यांच्या मनाचा कल असणें साहजिक आहे. गाईच्या सत्संगानें पवित्र झालेल्या गुराख्यांनाच प्रत्यक्ष गोपालकृष्ण आपलासा करून घेतां आला, याहून त्यांच्या सुस्वभावाचा अधिक तो पुरावा काय पाहिजे ?

एका खेड्यांतले असेच कांहीं शुद्धमनाचे गुराखी, गुरें चारून, संध्याकाळच्या सुमारास, घराकडे जाण्यास परतले होते. त्यांच्यापुढें पोटभर चरून तुंद झालेलीं गुरें मस्ती करीत, शिंगानें माती उकरीत, उधळत होतीं. गुराखी, आज्ञेच्या स्वरानें, त्यांना तेव्हांच नरम आणून, गप्पागोष्टी, थट्टामस्करी व आपआपल्या गुरांची स्तुति, यांच्या भरांत, मधून मधून त्यांच्या कानांवरून गेलेल्या लावण्या अभंगांचे मोडके तोडके चरण, गमतीनें गुंगत चालले होते. खेड्यापासून बऱ्याच अंतरावर असलेल्या तळ्याकडे पाण्यावर गुरें वळवून, वहिवाटीप्रमाणें गुराख्यांचा मेळा, तेथच्या निर्जन व भयाण जागेंतल्या एका जुन्या महेश्वराच्या देवळांत, देवदर्शनास गेला; तों तेथें चौथऱ्यावर पद्मासन घालून, समाधिस्थ बसलेली एक ईश्वरमूर्तीच त्यांना दिसली !

प्रत्यक्ष देवानेंच या साधुरूपानें आपल्याला दर्शन दिलें, असें त्या भाविक गुराख्यांना वाटून आनंद झाला; पण तो साधु हालेना, डोलेना, बोलेना किंवा नुसते डोळे देखील उघडीना, असें पाहून ते घाबरले. त्यांनीं हात जोडले, नमस्कार घातले, हांका मारल्या व प्रार्थनाही केली पण व्यर्थ. कोणी ह्मणे थकूनभागून आल्यामुळें, साधूला गाढ झोंप लागली आहे, कोणी म्हणे तो भूकेनें व्याकुळ झाला आहे, कोणी ह्मणे त्याचा जीव तहानेनें कासावीस झाला आहे. कोणी ह्मणे त्याला भूत लागलें आहे, कोणी ह्मणे सर्पदंशानें तो बेशुद्ध झाला आहे. असे वाटतील ते तर्क सुरू झाले व जो तो आपल्या अकलेप्रमाणें उपाय करूं लागला. कोणी तोंडांत पाणी घालण्याची खटपट केली,

तर कोणीं, आपल्या फडक्यांत उरलेला, वाळका कोळका भाकरीचा शिळा तुकडा, त्यानें खावा ह्मणून सद्भावानें त्याच्या तोंडापुढें धरला; एकानें तर वांसराशिवाय, आपल्या प्रेमानें कपिल्या गाईला पान्हा आणून, कुळचाभर अमृतमय दूध काढून, साधूच्या तोंडांत घालण्याचाही प्रयत्न केला. वाटेनें जाणारे धंदेवाईक लोक, गुराखी पोरें देवळांत काय करतात, तें पाहण्यास आंत आले. त्यांचें व्यावहारिकज्ञानाचें तर्कशास्त्र निष्कपटी गुराख्यांहून कितीतरी भिन्न ! एक सोनार तर ह्मणाला, " असेल कोणीतरी रस्ते लुटणारा मैंद चोर. पोलीसबिलीस मागें लागले असतील, तेव्हां ढोंग करून बसला असेल झालं ! " बिचाऱ्या साध्याभोळ्या गुराख्यांना असले विचार अगम्य होते. अर्थात् त्यांनां ते रुचले नाहींत. त्यांनीं आपल्या यत्नाची शिकस्त केली, पण समाधिसुखांत, ब्रह्मपदीं रममाण झालेला साधु, असल्या उपायांनीं कशाचा शुद्धीवर येतो ? रात्र पडल्यावर निराशेनें गुराखी घरीं गेले.

महेश्वराच्या देवळांत प्रथमतः गुराख्यांना दर्शन देऊन, प्रकट झालेल्या या साधूची वार्ता, दुसरे दिवशीं सकाळीं त्या खेड्यांत जिकडे तिकडे पसरली. शहरांतल्यापेक्षां खेड्यांतले लोक अधिक धार्मिक व श्रद्धाळू असतात, व म्हणूनच त्या साधूला पाहण्यासाठीं स्त्री पुरुषांची गर्दी झाली, एवढेंच नव्हे तर संतकार्यासाठीं, परस्परांतील भेदभाव विसरून, एक दिलानें, गांवकऱ्यांनीं, साधूची योग्य तजवीज गांवांत करून ठेवली, व त्याला समाधिस्थवृत्तींतच, वाजत गाजत, थाटानें गांवांत आणून, " साधुसंत येती घरा । तोचि दिवाळी दसरा " हौसेनें साजरा करण्यांत आला ! साधु महाराज समाधि उतरून, देहावर येतांच, सेवेंत तत्पर राहिलेल्या भक्तांनीं, नांव गांवाची नम्रपणें चौकशी केली, पण " कल्याण होवो " या आशीर्वादपर शब्दाशिवाय दुसरें उत्तर मिळालें नाहीं. समाधि विसर्जनाच्या समयीं साधूच्या तोंडून " गण्, गण् " असे कांहीं अस्पष्ट शब्द बाहेर पडलेले भाविकांनीं ऐकिले होते, त्याला अनुसरूनच कीं काय, भक्तजन त्यांना **श्रीगजानन महाराज** ह्मणूं लागले. याच नांवानें ते हल्ली प्रसिद्ध आहेत. त्यांच्यासंबंधी, जात, गोत, नांव, ठिकाण वगैरे कांहींएक पूर्वीची माहिती कोणालाच ठाऊक नसल्यामुळें, " आदि अंत ना मध्यही तुला । तूंच दाविसी मार्ग आपुला " असेंच ह्मणणें भाग आहे.

साधूच्या पुण्यकारक वास्तव्यानें त्या अगदीं अप्रसिद्ध खेड्याचें महत्व वाढविण्यापूर्वींच त्याचा सुकृत योग संपला. सहा महिन्याचे आंतच **श्री गजानन** महाराजांनीं तेथून आपलें पाऊल काढलें. शेगांवचा एक श्रीमंत व भाग्यवंत गृहस्थ कांहीं घरगुती कामासाठीं त्या खेड्यांत जाऊन उतरला असतां, त्याला स्वप्नांतच स्वामीनीं दर्शन दिलें. लांब आणि सरळ नाक, विस्तीर्ण आणि पाणीदार डोळे, विशाळ आणि भव्य कपाळ, सावळा आणि तेजःपुंज वर्ण, जितेंद्रिय आणि मोहक बालमुद्रा, रामनामीं रतलेली गंभीर आणि स्पष्ट वाणी, अशी त्यांची अजानुबाहू आणि दिगंबर संतमूर्ती पाहून, तो गृहस्थ स्वप्नांतच तन्मय झाला. मग हुबेहुब तोच परमहंस निरंजन अवतार प्रत्यक्षपणें त्या खेड्यांत नांदतांना पाहून, तेथें त्याचें तन-मन-धन गुंतल्यास आश्चर्य तें काय? देवरूप साधूही भावाचेच भुकेलेले असतात. त्या गृहस्थाचा निष्कलंक भाव पाहून, त्याची इच्छा पुरविण्यासाठीं **श्रीगजानन महाराज**, त्याचेबरोबर शेगांवी येऊन, त्याच्याच घरीं राहिले. दिवसेंदिवस साधूचें विमल यश, शुक्लपक्षांतील शरच्चंद्राप्रमाणें वाढूं लागलें; व त्याच्या शीतल आणि पवित्र चांदण्यांत संसारतप्त भाविकजनांला, समाधानानें, अपूर्व विश्रांतिसुख लाभूं लागलें. दर्शनासाठीं भक्तांची गर्दी होऊं लागली, व शिष्य संप्रदाय जमत चालला. अशा स्थितींत महाराजांना घरीं ठेवून घेणाऱ्या गृहस्थाला उगीच अधिक उपसर्ग पोंचूं नये ह्मणून ह्मणा, किंवा वाढणाऱ्या दाटीनें स्वतःच्या ईश्वरोपासनेंत व्यत्यय येऊं नये ह्मणून ह्मणा, **श्री गजानन महाराजांनीं** तें घर सोडून, वाटेल तिकडे भटकण्याचा क्रम सुरू केला.

निरिच्छ व निरहंकार साधूला वास्तवीक देवाचेंच महावेड लागलें असल्यामुळें, ऐहिक स्वार्थमय दृष्टीच्या मूढलोकांनीं, त्याला वेडा ह्मणूं नये तर ह्मणावें तरी काय? झुकानेवाल्याशिवाय दुनिया झुकत नाहीं खरी, पण असल्या अस्सल बावनकशी विरक्तव्यक्ती, दुनियेची थोडीच परवा करताहेत! दुनियेची दृष्टि मात्र, कोणत्याही हेतूनें कां होईना, अशा अद्वितीय विभूतीकडे सारखी लागलेली असते. खऱ्या महात्म्यांना केव्हांही ईश्वर वश असल्यामुळें, एखादेवळीं त्यांच्याकडून सहज लीलेनें घडणारा चमत्कार पाहून, लोक विस्मित होतात; व मग कोठें अशा प्रचीतीच्या श्रद्धेनें दुनिया

संतचरणीं झुकूं लागते. रखरखीत उन्हाळ्यांत ऐन दोनप्रहरच्यावेळीं एकदां गजानन महाराज, दिगंबरवृत्तींतच मारे रानांतून पायपोळ करीत, भटक्या मारीत होते. नदीनाले, तळीविहिरी, पार आटल्यामुळें आसपास पाण्याचें नांव नाहीं, पण महाराजांना तर मनस्वी तहान लागलेली. जवळच एक शेतकरी कष्टाळूपणें आपलें शेत नांगरीत होता. त्या नांगऱ्यानें येतांना स्वतः-साठीं गांवांतून, मृण्मय कळशी भरून, कोसभर खांद्यावरून आणून, एका झुडुपाखालीं ठेवली होती. महाराज तेथें गेले व तृषेनें जीव व्याकुळ झाला असल्यामुळें, पिण्यासाठीं थोडें पाणी मागूं लागले. नांगर हाणून हाणून त्रासलेला खेडवळ बिचारा नांगऱ्या, डोईवर आलेल्या दिवसाच्या तीव्रतेनें तप्त होऊन, अजाणपणें साधूला न ओळखून म्हणतो:-" तुझ्यासारखे रिकामटेकडे फुकटचेंड्ड पाणी मागत्याल लई, पण त्ये आणावं कुणाच्या बाचं ? इक्त्या लांबून आणलेलं पाणी, तुला देऊन टाकल्यावर, या उन्हांत दीसभर मरीमरतांना आह्मीं काय तडफडून मरावं ह्मंन्तोस व्हई ! " विन्मुख झालेली गजानन महाराजांची स्वारी, पाउलींच तेथून मुकाट्यानें परतून, एका विहिरीवर गेली. पण ती कोरडी ठणठणींत ! लगेच निर्धारानें महाराजांनीं तेथेंच आसन ठोकून, भक्तिपूर्ण अंतःकरणानें पाण्यासाठीं दयाघनाचा सारखा धावा सुरूं केला.

गजेंद्राच्या हांकेबरोबर, त्याच्या उद्धारार्थ लगबगीनें पीतांबराची कास घालून, वनमाळा सावरीत सावरीत, गरुडारूढ होऊन, धांव घेणारा लक्ष्मी-पति, भक्तवर प्रऱ्हादासाठीं स्तंभातून विक्राळ नृसिंहरूपानें प्रकट होणारा स्थिरचरव्यापी जगदात्मा, वस्त्रहरणाचेवेळीं पांचालीची लज्जा राखण्यासाठीं अंबरावतार घेणारा मायबहिणींचा खरा पाठीराखा दीनबंधु, कडकडणाऱ्या तेलांत एकाग्र मनानें हरिभजनीं तल्लीन होणाऱ्या सुधन्व्यासाठीं सुशीतल भागीरथी जलाप्रमाणें तप्ततेल थंड करणारा भक्तसखा, अंबरीष राजासारख्या महान् भगवत् भक्तावर कृत्या सोडणाऱ्या कोपिष्ट दुर्वासामागें सुदर्शन लावून त्याला ' दे माय धरणी ठाय ' झाल्यावर, सुदर्शन आवरण्याची गुरुकिल्ली अंबरीष राजाला शरण जाण्यांतच आहे, असें दुर्वासाला सांगून, भक्त महिमा वाढविणारा भक्तकामकल्पद्रुम करुणासिंधु, तृषार्त साधुवर्य

गजाननाची एकनिष्ठ स्तुति ऐकून, प्रेमातिशयानें कां न उचंबळेल! दयानिधीच्या भक्तवत्सलतेच्या उमाळ्याबरोबर, अमृतासारख्या गोड व स्फटिकाप्रमाणें स्वच्छ गंगोदकानें, ती कोरडी विहीर तुडुंब भरली! भक्ताधीन परमेश्वरानें घेतलेल्या त्या उदकावतारास वंदन करून, महाराजांनीं आचमन केलें; व दोन ओंजळी पाणी पिऊन आत्माराम थंड झाल्यावर ते तेथून मार्गस्थ झाले.

कठोर शब्दांनीं महाराजांचा उपमर्द करून, त्यांना पाणी न देणारा आडदांड नांगऱ्या, हा सारा अद्भुत प्रकार दुरून पाहतच होता. "सर्वस्व मी सज्जनाचें, माझे सर्वस्व सज्जन" असें ह्मणणाऱ्या भक्तप्रिय जगच्चालकावर सहजीं प्रेमाची सत्ता चालवून, निर्द्रव पाषाणाला निर्झर जीवनाचे पाझर फोडणाऱ्या अधिकारी साधूचें पाणी पूर्वपुण्याईनें, यत्किंचित् दृष्टीस पडतांच, त्या नांगऱ्याला स्वतःच्या उर्मट कृतीबद्दल पश्चाताप होऊन, वाईट वाटलें. त्यानें स्वामीमहाराजांमागें सद्गदीतपणें धांव घेतली, व त्यांचे घट्ट पाय धरले. लोखंडाला परिसाची संगति घडली असतां त्याचा परीस होत नाहीं, सोनें होतें; पण खलरूप लोहाला साधुरूप परिसाचा लाभ होतांच तो तद्रूप साधूच बनतो. स्वामींनीं त्या नांगऱ्याच्या मस्तकावर प्रेमानें वरद हस्त ठेवून, अनुग्रह केला. तत्क्षणीं त्याचें मायापटल नाहींसें होऊन, तो परमार्थमार्गी झाला. तेव्हांपासून हा अकोलखेडचा नांगऱ्या भास्कर, शेगावीं स्वामीचा पट्टशिष्य होऊन राहिला आहे. व्यावहारिकदृष्टया श्रीगजानन महाराजांच्या परमपवित्र ज्ञात चरित्रांतील, हल्लीं दिसणाऱ्या शांत, गंभीर व उदात्त उत्तररंगाला येथूनच सुरवात झाली असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

करारी सदाचरणाच्या सत्प्रभावानें समाजावर पूज्यतेची छाप बसवून, सारीं अंतःकरणें एकसारखीं एक करून, सत्कार्यीं लावणाऱ्या निरपेक्ष सत्पुरुषाला, राष्ट्रकार्यालाही मूलभूत असणाऱ्या, एकीचे मायबापच ह्मटलें पाहिजे. शेगांवच्या स्थानिक स्वराज्यांतील मुसलमान जातीच्या अधिकारी सद्गृहस्थानें महाराजांच्या आश्रमासाठीं, मोठ्या आनंदानें, सोयीची एकरभर जागा द्यावी, यांतलें इंगित तरी हेंच होय. साध्या, स्वच्छ व शुचिर्भूत पर्णकुटिकेच्या आश्रमांत, भास्करासारख्या सच्छिष्यासह भक्तजनांना आनंद देणाऱ्या, ईशभजनांत कांहीं महिनें शेगांवीं घालविले नाहींत तोंच महाराजांना पुन्हा एकदा पर्यटणाची हुक्की आली. महाराजांच्या अशा

लहरी वृत्तीवरूनच कीं काय, त्यांचें " अवलिया बावा " असेंही एक नांव पडलें आहे. स्वारी जी निघाली, ती थेट सोळा कोसावर आकोट गांवीं, गांवाबाहेर, एकांतस्थळीं जुनाट वृक्षांच्या शीतळ छायेखालीं, उगीच दगड गोळा करण्याचा रिकामा चाळा, हातानें चालवून, तोंडानें अखंड विठ्ठल नामाचा गजर करीत, हृदयकमलींही विठ्ठल सांठविणाऱ्या **नरसिंग** नांवाच्या वैराग्यसंपन्न पुरुषापुढें, दत्त ह्मणून उभी राहिली.

नरसिंगाला अगदीं लहानपणापासून, हरिभजनाची आवड होती. त्याच्या आईबापांनीं वाटेल ती खटपट केली, पण त्याचें मन प्रपंचाकडे वळेना, किंवा त्याची पवित्र वाणी हरिनाम घेतां खळेना. बापाच्या आग्रहासाठीं, पितृऋण फेडण्याच्या हेतूनें, नरसिंगानें लांकडाच्या मोळ्या आणून बाजारांत विकाव्या व मिळतील ते पैसे बापाला द्यावे असा क्रम सुरूं केला. हा व्यासंग दोन-प्रहरपर्यंत चाले, पण तो करतांनाही तोंडानें देवाचें नांव सारखें सुरूंच असे. दुपारून कोणाचाही बांधला न राहतां, गांवापासून दूर निवांतजागीं, झाडाच्या गर्द सावलींत, दगडाच्या राशी करून, नामस्मरणाचे ढीग घालण्यांतच नरसिंग गढलेला असे. नामामृताच्या अशा मिटक्या मारीत मारीत ब्रह्मपदीं रंगलेल्या नरसिंगाला, साधुवर्य श्री गजाननमहारांचें एकाएकीं असें दर्शन घडतांच, दुधांत साखर पडल्यासारखेंच झालें. साधूची अंतर्खूण साधूलाच ठाऊक. तेव्हांचा तो उभयपक्षीं झालेला सात्विक आनंद काय वर्णावा ? महाराजांनीं नरसिंगाला प्रपंचांत राहून परमार्थ साधण्याविषयीं थोडा उपदेश केला. उभयार्थ साधून देणाऱ्या, दृढसंकल्पाच्या सत्पात्रीं दानधर्माचे परोपकारी लक्ष्मीनारायण स्वरूप, विशदपणें समजूत देतां देतां, केव्हांच संध्याकाळ झालेली समजली देखील नाहीं. गुरेंवासरें घराकडे धावूं लागलीं. त्यांच्या पायांनीं उडालेल्या धुरोळ्यांत, गोपींना आत्मबोध करण्यासाठीं गोकुळांत शिरणाऱ्या उद्धवाप्रमाणें, नरसिंगाला बोध करणाऱ्या महाराजांना " पुण्यागळें गोरजस्नान " घडून आनंद झाला. गुराख्यांना आपल्या नरसिंगाच्या जोडीला नवा साधु पाहून मोठें कौतुक वाटलें. त्यांनीं दोघांनाही मनोभावें प्रणिपात केला. या गोपाळांच्या तोंडून श्रीगजानन आल्याची खातमी गांवांत समजण्यापूर्वींच महाराजांची स्वारी शेगांवाकडे परतली.

महाराजांना, राहून राहून, फिरण्याची लहर, अशीच नेहमीं येत असल्यामुळें, शिष्यासह त्यांनीं बरींच तीर्थे व क्षेत्रें पाहिलीं आहेत. शिवरगांवीं महाविद्वान तापसी ब्रजभूषण, एके सुप्रभातीं चंद्रभोगेत स्नान करून, उदयोन्मुख सूर्यनारायणाला, अर्घ्यप्रदान करीत असतां, समोरच वाळवंटांत शिष्य मंडळीसह उतरलेले श्रीगजानन महाराज पाहून, दीप्तिमंत सहस्ररश्मीच प्रत्यक्ष दर्शन देण्यासाठीं, तेजस्वी साधुरूपानें, शिष्यरूप किरण पसरून, आपल्यापुढें अवतरला आहे, असा त्यांना साक्षात्कारीं भास झाला ! ब्रजभूषणांनी महाराजाचें मोठ्या प्रेमानें गौरव केल्यावर, स्वारी शेगांवीं परत आली. अत्यंत जीर्ण झालेलें फार पुरातन काळचें एक भव्य शिवालय शेगांवांत आहे. या शिवालयावरूनच गांवाला प्रथम शिवगांव असें नांव पडलें. " शेगांव " हा या मूळ नांवाचाच अपभ्रंश होय. या शिवालयापुढेंच महाराजांचा आश्रम आहे. एकदां टाकळीकर गोविंदबोवा, महाराजांची ख्याती ऐकून, त्यांना समक्ष पाहण्यासाठीं या शिवालयांत येऊन उतरले. त्यांचा रानदांडगा मस्त घोडा बाहेर बांधला होता व ते आंत देवपूजा करीत होते. इतक्यांत चित्ताकर्षक, अस्खलित, पवित्र वेदवाणी त्यांच्या कानीं आली. बाहेर येऊन पाहतात तों, अवलियामहाराज, घोड्याच्या पायामध्यें स्वस्थचित्तानें पडले असून, तोंडानें सारखा वेदघोष चालला आहे व मोहनीमंत्रानें भारल्याप्रमाणें तो द्वाड घोडा, चित्रासारखा स्तब्ध उभा आहे ! गोविंदबोवा आश्चर्यचकित झाले व त्यांणीं महाराजांची योग्यता तेव्हांच जाणली. शेगावकरांच्या थोर भाग्यानेंच त्यांना असला सत्पुरुष लाभला आहे, असे त्यांणीं उद्गार काढले.

महाराजांचा चेहरा निसर्गतः प्रेमळ असून, त्यावर निर्विकार बालवृत्तीचें स्पष्ट प्रतिबिंब दृष्टीस पडतें. त्यांच्याकडे पहाणाऱ्या नास्तिकालाही क्षणभर पूज्यभाव उत्पन्न झाल्याशिवाय राहत नाहीं. समाधियोगांत ते फार पुढें जाऊन, प्रत्यक्ष ईश्वरीछत्राखालीं असल्यामुळेंच कीं काय, विश्वभक्षक कालाच्या छायेची छटा दाखविणाऱ्या विशेषशा रेषा त्यांच्या प्रसन्नमुखावर अद्याप दिसत नाहींत. प्रकट झाल्यापासून ते बहुतेक आहेत तसेच आहेत. त्यांच्या वयाचा अंदाज बांधणें झाल्यास, गेली कापिलाषष्ठि त्यांना विशेषशी

आठवत असेल असें वाटत नाहीं. त्यांची प्रासादिक वाणी गोड पण साधारण दुर्मिळच आहे. राहणी अगदीं साधी, स्वभाव निर्भिड व शांत खरा पण एखाद्यावेळीं महाराज रागाचा असा कांहीं आविर्भाव आणतात कीं जवळचे भक्तजन गर्भगळीत होऊनच पळतात. असें करण्यांतही दूरदृष्टीनें भक्तांच्या कल्याणावरच महाराजांची नजर असते असा अनुभव आहे. एकदां महाराजांनीं संतापून मंडळी दूर पिटाळली तोंच त्यांच्या डोक्यावर तुळई कडकडून मोडून पडली. दुसरेवेळीं अशीच आंब्याच्या झाडाची फांदी त्यांच्यावर पडली. त्या खांदीवर शिवाय मधमाशांचें मोहोळ असल्यामुळें स्वामींना अतोनात माशा चावल्या. उसन्या रागानें दूर पळविलेल्या भक्तांनीं महाराजांना यथायोग्य औषधोपचार केले हें सांगणें नकोच. महाराज जरी त्रिकालज्ञानी असले, तरी त्यांना आपल्या ज्ञानाचे चमत्कार दाखवून, स्वतःची बडेजाव करून घेण्याची मुळींच इच्छा नाहीं; तथापि त्यांच्या साहजिक ह्मणून घडणाऱ्या नित्याचरणांतही कधीं कधीं, त्यांना नकळत, तसले प्रकार घडल्याशिवाय राहत नाहींत. महाराजांना एखादी वस्तु अर्पण करण्याचा मनांत बेत करून, तीनतीनदां ती देण्याची आठवण न राहणाऱ्या विसरोपंतास "आतां चवथ्यावेळेला तरी आमची देणगी विसरूं नका" अशी महाराजांनीं सस्मित प्रेमोक्ति काढून हृद्गत ओळखणें, किंवा हुरड्याचें आमंत्रण घेऊन आयत्यावेळीं लोक त्यांना गांवांत हुडकीत असतां त्यांणीं त्या ठाऊक नसलेल्या शेतांत, केव्हांच अगोदर प्रकट होऊन स्वस्थ बसणें, ह्मणजे भक्तजनांना सकौतुक नवल वाटणारे चमत्कारच होत.

शेगांवच्या भक्तिमान् लोकांनीं महाराजांची व्यवस्था फार चोख ठेविली आहे. वर्गणीनें लागतील तेवढे पैसे जमवून, महाराजांसाठीं उत्तम मठ बांधला आहे. पाण्याची उत्कृष्ट सोय केली आहे. याकामीं श्री. मारुती चंद्रभान पाटलांनीं झीज सोसून, पुढाकार घेतल्यामुळें ते स्तुतीस पात्र आहेत. संतासाठीं आपल्या बहुविध मताच्या विस्कळीत समाजांत अशी एकी करण्याची जडलेली हितकर संवय दृढमूल होण्यांत आपलें खरें कल्याण आहे. मात्र महाराजांसारख्या ईश्वररूपी सज्जनांची अमोघ कृपा संपादन झाली पाहिजे. शेगांवकर ती खऱ्या भावानें जोडीत आहेत. श्रीगजानन-

महाराजांची प्रत्यक्ष देवाप्रमाणें पूजा, अर्चा, आरती, धूपारती होत असून नैवेद्य समर्पणाचा विधी तर अपूर्वच दृष्टीस पडतो. रोज दोनप्रहरीं घरोघरचे भरपूर नैवेद्य भक्तिभावानें महाराजांना येतात. कोणाची भाजीभाकरी तर कोणाची शिरापुरी, कोणाचीं कडबोळीं तर कोणाची तुपपोळी, कोणाचा कढीभात, कोणाचें नुसतें ताकपीठ तर कोणाचें लोणीं थालीपीठ, कोणाचे खमंग फोडणीचे पोहे तर कोणाचे मिठ्ठे दहींपोहे, असा अन्नाच्या पूर्णतेचा एकच थाट पाहून स्वामीमहाराजांच्या सेवेंत स्वर्गींची कामधेनु राबत असल्याचा भास झाल्यास नवल तें काय? येणाऱ्या नैवेद्यांतून आवडीप्रमाणें शिष्य दोन दोन घांस महाराजांना भरवितात. ज्याचा नैवेद्य महाराजांनीं उष्टावला त्याला सार्थकतेची धन्यता वाटते. जमणाऱ्या या पवित्र अन्नाच्या शिदोऱ्यांवर भक्तांना तृप्ति देणारा महाप्रसाद मिळतो. पुष्कळ मुलामीभक्तही या गोड अन्नासाठीं पंक्तिबहाद्दर बनलेले असतात, पण कधींकाळीं गिलीट जाऊन, अस्सल अंतरंग किंचित् डोकावूं लागतांच, फजीतीच्या भीतीनें त्यांना कृष्णवदन करावें लागतें. दरसाल रामनवमीला भक्तमंडळी महाराजांचा टोलेजंग उत्सव करतात. नऊ दिवस अन्नसंतर्पण, भजनपूजन, कथापुराण, रामनामसंकीर्तन, वगैरे अनेक धार्मिक प्रकार सुरू असतात. नवमीला रामजन्म फार थाटाचा होतो व त्यावेळीं महाराजांवरही गुलाल उधळतात. रात्रीं रथांतून मोठ्या जयजयकारानें श्रीगजाननमहाराजांची मिरवणूक निघते. अशारीतीनें महाराजांच्या भजनीं लागलेले शेगांवाकडील लोक, " नलगे मुक्ति धन संपदा । संतसंग देई सदा " या श्रीतुकोबाच्या अभंगवाणीचें अभंगत्व, कृतीनें व्यक्त करीत आहेत.

दुर्बलतेचे झणझणीत फटके, प्लेग दुष्काळाचे असह्य चटके व वरती आपसांतील दुहीचे हास्यास्पद खटके, अशा कल्पनातीत व्याधींनीं झटके येऊन लटकें पडलेलें भरतखंड, तावून सुलाखून, साधूच्या अवतारास अत्यंत योग्य झालें असल्यामुळें, असले परमेश्वरस्वरूपी अनेक सत्पुरुष, या हतभागी देशांत अवतीर्ण होऊन, त्यांच्या आशीर्वादानें, मनाच्या एकींत स्वतःची ओळख पटवून देणारी निकी आत्मजागृति, निर्विघ्नपणें लौकर होवो अशी श्रीगजाननचरणीं प्रार्थना करून महाराजांचे महान्भक्त श्री. मारुती चंद्रभान पाटील यांनी गुरुमहाराजांवरील कित्येक पदें, आरत्या,

अभंग वगैरे कविता आमचेकडे पाठविल्या आहेत, त्यांपैकीं एक पद व एक आरती येथें नमूद करून हें अल्पचरित्र येथेंच संपवितों. 'दर्भ'

### पद.

**महाराज गुरु अवलिया। अवलिया सगुण मूर्ति ॥ दर्शनें मनोरथ पुरती ॥ धृ० ॥ शेगांवग्रामी, ग्रांमी तू असती, मानवी चतुर्दळीं वससी। ध्यान अंतरीं, अंतरीं जे करिती ॥ तयांचे मनोरथ पुरती। गुरु अवलिया० ॥१॥ नग्न ही काया, काया मनोहर, सद्‌गुरु दत्त दिंगबर। सहस्रदलीं रमशी, रमशी गुरुमूर्ती ॥ दर्शनें मनोरथ पुरती। गुरु अवलिया० ॥ २ ॥ गजानन स्वामी, स्वामी मला पावा, आपुला प्रसाद मज द्यावा। यशवंतात्मज आत्मज वर्णी कीर्ति ॥ दर्शनें मनोरथ पुरती। गुरु अवलिया० ॥ ३ ॥**

### आरती.

**आरती गुरुराजा, प्राणविसावा माझा। आरती ओंवाळीतों, दास अंकीत मी तुझा। धृ० ॥ अबोल बोल बोली। सर्व कल्पना निवाली ॥ मनांतला हेतु जाणे, माझी सद्‌गुरु माउली। आरती० ॥ १ ॥ सनाथ जाणोनीया, स्वामी धरली तुमची कास। पतीत ह्मणवीतों माझी पुरवावी आस ॥ आरती० ॥ २ ॥ अघटित करणी केली। माझी देहबुद्धि नेली ॥ ज्ञानदृष्टी देवोनियां। आत्मा प्रभा उजळली ॥ आरती० ॥ ३ ॥ जपतप साधन कांहीं, याची नेणें मी सोय। ब्रह्मांड शोधलीया, तुह्मांविण दुजा नाहीं। आरती० ॥ ४ ॥ परा ही परतली। नाहीं लागला हो अंत। वैखरी काय वर्णू तूं तर असती अनंत ॥ आरती० ॥ ५ ॥ अनंत ह्मणवीतां, अंत नाहीं हो तुमचा। पाहतां पहाणे हो, मौनावल्या वेदवाच्या ॥ आरती० ॥ ६ ॥ मौन्येची आरती गावी। सोडुनि द्वैताचा भाव ॥ एकत्व नाहीं जेथें, तेथें बोलणेची वाव ॥ आरती० ॥ ७ ॥ आरती पूर्ण झाली। सर्व वृत्ती ही निवाली ॥ पतीत ह्मणे आतां। करा कृपेची साऊली ॥ ८ ॥**

---

## सृष्टीची स्वाभाविक गति सुधारणेकडे असते किंवा दुर्धारणेकडे असते?

( लेखक—के. ह. पौडवाल )

सृष्टीची स्वाभाविक गति सुधारणेकडे असते किंवा दुर्धारणेकडे असते हें ठरविण्याचें काम अति कठीण आहे. कारण, याचा संबंध धर्मकल्पनांच्या मूळाशीं, ऐतिहासिक गोष्टींशीं व अधुनिक पंडीतांच्या तर्ककोटींशीं

जाऊन भिडत आहे. कोणी सृष्टीची स्वाभाविक गति सुधारणेकडे आहे असें ह्मणतो तर कोणी अति उच्च स्थिति भोगलेली पृथ्वी आतां नीच स्थितीला जात आहे अर्थात् तिची स्वाभाविक गति दुर्धारणेकडे आहे असें ह्मणतो. अशा परस्पर विरुद्ध गोष्टींत वरील प्रश्नाचें उत्तर देण्याचें काम फार अवघड आहे. तरी थोडा शांतपणें विचार केला असतां वरील दोहोंचा मिलाफ आहे असें निराळेंच उत्तर यांत असल्याचें आढळांत येईल.

पाश्चात्त्य तत्ववेत्त्यांनीं आजपर्यंत ह्यासंबंधी जे कांहीं ग्रंथ लिहिले आहेत त्यांवरून पाहतां त्यांचें ह्मणणें असें दिसतें कीं, पूर्वीं मनुष्य अगदीं नीच स्थितींत होता व तो सुधारत सुधारत आज उच्चदशेप्रत येऊन पोंचला आहे. **स्पेन्सर साहेबांनीं** समाजशास्त्रावर जो ग्रंथ हिहिला आहे त्यांत हेंच सिद्ध केलें आहे.

अगदीं प्राचीनकाळीं ह्मणजे मानव सृष्टी ज्याकाळीं झाली त्यावेळीं मनुष्य वृत्ति स्थितीनें अगदीं पशुतुल्य होती; अर्थात् त्यावेळच्या मनुष्यस्थितींत व हल्लीं आपण पशूंची जी स्थिती पाहतों त्यांत ह्मणण्यासारखा फरक नव्हता. त्यावेळीं मनुष्यानें पर्वतकुक्षींत असलेल्या गुहेंत अथवा भूमिगत विवरांत किंवा तुटलेल्या दोनकड्यांच्या मधील भागांत रहावें; श्रम न करितां सहज उत्पन्न होणारें अन्न ह्मणजे फळें, कंदमुळें, झाडांचा पाला इ. खावें; नदीच्या कांठीं अथवा अल्प जलाशयांत मिळणारे मत्स्यादि तसेंच जमिनींवरील क्षुद्र जीव अशांवर उपजीविका चालवावी; थंडी, वारा, ऊन इ. निसर्गापासून त्रास होऊं नये ह्मणून झाडाच्या साली, पाला, वाळलेलें गवत इ. चा पांघरुणाऐवजीं उपयोग करावा. ह्याप्रमाणें मनुष्यानें राहून आयुष्याचा काळ घालविणें ह्मणजे त्याला पशूपेक्षां अधिक योग्यता देणें वाजवी होणार नाहीं.

ह्याच स्थितींत बराच काळ गेल्यानंतर सुधारणेचें पाऊल थोडें पुढें पडलें. शीतोष्णाच्या अतिशयामुळें स्वस्थान सोडून दुसरे ठिकाणीं जाणें ज्यावेळीं शक्य नसे, त्यावेळीं केवळ उपासमार होऊं नये ह्मणून अन्नसंग्रह करणें अवश्य वाटून तसें करण्याकडे मनुष्याची प्रवृत्ति झाली. तसेंच वन्यपशूंपासून उपद्रव होऊं नये ह्मणून प्रसंगानुसार बुद्धीची योजना करून कांहीं ओबडधोबड दगडांचीं व लांकडांचीं हत्यारें करण्यांत आलीं. ह्याही स्थितींत बराच काळ गेल्यानंतर प्रगतीची पुढील पायरी ह्मटली ह्मणजे **धनगरावस्था**

ही होय. ह्या अवस्थेंत वन्यपशूंस धरून त्यांस माणसाळविणें, त्यांच्या हालचालींवर नजर ठेवून त्यांचा स्वतांचें उदरंभरणार्थ कसा उपयोग करून घेतां येईल इ. कडे मनुष्यानें आपली बुद्धि खर्चून पूर्वस्थितींत पुष्कळ सुधारणा केली. गुराढोरांचे मोठमोठे कळप जमवून त्यांना चारा पाणी ज्या ज्या ठिकाणीं मिळणें शक्य असेल त्या त्या ठिकाणीं तितका काळ त्याची वस्ति होऊं लागली. ह्याचवेळीं साधारण खोपट्याची कल्पना आस्तित्वांत येऊन दोनचार कांठ्यांवर पाला, गवत, इ० घालून तेथें मनुष्य जमावानें राहूं लागला. गुरांचें दूध, मांस इ. भक्षण करण्याकडे प्रवृत्ति होऊन गुरांचीं कातडीं पांघरुणाऐवजीं तो वापरूं लागला. तसेंच कापण्यासवरण्याकरितां कांहीं हत्यारेंही त्यानें बनविलीं.

ह्या पुढील प्रगतीची पायरी कृषिवल स्थिति ही होय. ह्या स्थितींत समाज स्थायिक होऊन त्यानें खेडीं, गावें इ. वसविलीं. श्रमविभागाच्या तत्वावर त्यावेळीं जे धंदे आस्तित्वांत होते ते पृथक करण्यांत आले. अदलाबदल, देवघेव, व्यापार इ० सुरू होऊन राजा प्रजा ह्या संबंधाची स्थापना झाली. लहानसहान कायदे करण्यांत आले व इतर अनेक गोष्टी आस्तित्वांत आल्या. ह्याप्रमाणें पृथ्वीवर मनुष्याची वस्ति झाल्यापासून मानव प्राण्याची अतिशय उन्नति ह्मणून जी विद्वान लोक मानितात त्या स्थितीला तो पोहोंचेपर्यंत मूळ स्थितीपासून त्याची क्रमशः जीं अनेक स्थित्यंतरें होत गेलीं. त्या सर्वांचें पाश्चात्य तत्ववेत्त्यांनी जें वर्णन केलें आहे तें यथाक्रम थोडक्यांत आपणापुढें ठेविलें आहे. त्यावरून सृष्टीची गति सुधारणेकडेच असते असें दिसून येतें.

पण, ह्याच्या उलट इतर ग्रंथकारांचें ह्मणणें आहे त्याचाही आपण विचार केला पाहिजे, पराकाष्टेच्या उन्नतीचा ह्मणून जो काळ—ज्याला इंग्लिशलोक सोन्याचें युग ह्मणतात—तो काळ मागें होऊन गेला असें आपल्या येथील पुराणेतिहासकारांचें ह्मणणे आहे. पूर्वीं एकाकाळीं आपल्या आर्यावर्ताची चांगली भरभराट होती, ही गोष्ट कोणीही नाकबूल करणार नाहीं. युद्धकला, शिल्पशास्त्र, चित्रकला, यंत्रशास्त्र, शेतकी, वैद्यक, ज्योतिषशास्त्र, परमार्थज्ञान इ० त हा देश एकाकाळीं सर्व देशांना गुरुस्थानीं होता, हें जगावरील सर्व लोकांस कबूल आहे. वैभव, शौर्य, बुद्धिमत्ता,

कलाकौशल्य इ० त पूर्वी हें राष्ट्र परिपूर्ण असून सौख्यांत नांदत होतें. युद्ध कसें करावें, किल्ल्यावर तोफा कशा चढवाव्या, शत्रूंवर चाल कशी करावी, सैन्याची रचना ( व्यूह ) कशी करावी इ० पूर्वीचे राजेलोक चांगले निपूण होते. यंत्रकलेत सुद्धां आपले पूर्वज निष्णात होते, असें पुराणांतरीं विमानादिकांचीं जीं वर्णनें केलेलीं आढळतात त्यांवरून म्हणण्यास हरकत नाहीं. मि० ऑरविली रिट हे पाश्चात्य देशांत सांप्रत विमान उडविण्याचे प्रयोग करीत आहेत; पण त्यांत त्यांस अजून चांगलें यश आलें नाहीं. वाफेच्या साह्यानें पूर्वीचे लोक दूरदेशीं गमन करीत असत असे उल्लेख आहेत. भागवतांत एकेठिकाणीं ह्मटलें आहे कीं, "शाल्वराजा मयनिर्मित इच्छागामीं धूमयुक्त यानावर आरोहण करून द्वारकेला गमन करता झाला." शिल्पविद्येंतसुद्धां निष्णात असल्याबद्दल आपल्या पूर्वजांची चांगली प्रसिद्धी आहे व ह्याची खात्री आज वेरूळ, जुन्नर, घारापुरी येथील कोरींव लेणी, अमदाबाद येथील जुम्मामशीद, आग्र्याचा ताजमहाल इ० पाहून होणारी आहे. डाक्याची मलमल, नागपुरचा धोतरजोडा, पैठण येथील रेशमी वस्त्रें, काश्मिरी शालजोड्या व गालीचे इ० पाहून अद्यापि सर्व तारीफ करीत आहेत. ह्याचप्रमाणें इतर पुष्कळ गोष्टींसंबंधीसुद्धां सांगतां येणार आहे. आर्यावर्ताला "सुवर्ण भूमिका" असें नांव मिळालें होतें तें वरील कारणावरूनच होय. सारांश, अशाप्रकारें ह्या देशाची एकदां अति उच्चस्थिति होती पण ती हल्लीं अगदीं खालावत चालली आहे, ह्यासंबंधीं आतां वाद नाहीं. तेव्हां पाश्चात्यांचा इतिहास सृष्टीची गति सुधारणेकडे आहे असें सांगतो व आमचा इतिहास ती मागें हटत आहे असें सांगतो ह्या दोन्ही परस्पर विरोधी गोष्टींत मेळ बसावा असा?

पाश्चात्यांनी ह्मटल्याप्रमाणें पूर्वीची मानवसृष्टि अवनताअवस्थेंत असेल व पुढें सुधारत जाऊन ज्या स्थितीला सोन्याचें युग ह्मणतात त्या स्थितीप्रत पोंचून ती पुनः नीच स्थितीला आली असेल; ह्मणजे नीच स्थितींतून उच्चस्थितीला व उच्चस्थितींतून नीचस्थितीला जाणें हाच सृष्टिक्रम आहे असें ह्मणतां येईल; पण तसेंही ह्मणतां येत नाहीं. कारण सृष्टीची गति एकाचकाळीं एकेठिकाणीं सुधारणेकडे व दुसरेठिकाणीं दुर्धारणेकडे असलेली आपण पहातों. आपला

आर्यावर्त देश ज्यावेळीं मोठ्या भरभराटींत असून सुधारणेचीं उत्तम फलें चाखीत होता त्याचवेळीं इतर देश केवळ रानटीस्थितींत राहून दुःख भोगीत होते व हल्लीं आर्यावर्ताची स्थिती खालावली असून पाश्चात्यराष्ट्रें सुधारणा-शिखरीं चढलीं आहेत. ह्यावरून सृष्टीची स्वाभाविक गति अमूक एकच आहे असें ह्मणतां येत नाहीं. तर ती एकाचवेळीं सर्वगामी आहे असेंच ह्मटलें पाहिजे; अर्थात् सृष्टीची स्वभावसिद्ध गति अमूक एकाप्रकाराला अनुसरून न राहतां ती सर्वप्रकारांत आहे ह्मणजे ती सुधारणेकडेही आहे व दुर्धारणेकडेही आहे असेंच ह्मणावें लागतें.

मनुष्यस्वभावाची ज्यानें मिमांसा केली आहे, त्याच्या लक्षांत वरील तत्व तेव्हांच येईल. एकादा शिक्षक विद्यार्थ्यांनां एकाद्या विषयाचें शिक्षण देत असतां त्यांच्या मनावर निरनिराळ्या प्रकारचे किंबहुना एकमेकांशीं अगदीं उलट असे परिणाम झालेले दिसतात. " **भिन्नरुचिर्हि लोकः** " किंवा " **पिंडे पिंडे मतिर्भिन्ना** " ह्या ह्मणीप्रमाणें कोणत्याही स्थितींत असलेलीं माणसें एकाच प्रतीचीं उतरतील असें होणें शक्य नाहीं; ह्मणून मनुष्यानें सृष्टि सर्वप्रकारच्या स्वभावगुणानें ओतप्रोत भरलेली आहे, असें समजून आपल्याला ज्या इष्ट व बऱ्या गोष्टी वाटतील त्या करण्याचा होईल तेवढा प्रयत्न करावा. चांगला हेतु धरून व कालाची अर्थात् सृष्टीच्या गतीची आपल्या प्रयत्नाला जोड मिळवून सदोदित सुधारणेचा प्रयत्न करीत जावा. ज्यावेळीं लोकांकडून असा प्रयत्न होतो, त्याचवेळीं सृष्टीची गति त्या भागापुरती सुधारणेच्या बाजूकडे वळते.

**जपान**चा इतिहास पाहिला तर ४० वर्षांपूर्वी त्या राष्ट्राची आपल्या हिंदुस्थानदेशासारखीच अगदीं निकृष्टस्थिति होती. धर्मसंबंधीं आपल्यांत ज्याप्रमाणें अनेक असमंजसपणाच्या पुष्कळ चाली आहेत, तशा त्या जपानीलोकांतही पूर्वी प्ररूढ होत्या. आपल्या येथें जसें स्वदेश सोडून पर-देशीं जाणें धर्मबाह्य समजतात, तद्वतच जपानांत **परदेशगमन** धर्माच्या दृष्टीनें अगदीं निंद्य मानलें जात होतें. इतर गोष्टींत सुद्धां जपानाची आजच्या हिंदुस्थानासारखीच स्थिति होती; परंतु आज ४० वर्षांत ती सर्व स्थिति पालटून जपान राष्ट्र मोठमोठ्या सुधारलेल्या पाश्चात्यराष्ट्रांच्या बरो-

( अपूर्ण. )

## मूळ स्वभाव जाईना !

पूर्वीं एका निर्जन महावनांत कोणी एक ऋषि सत्वस्थवृत्तीनें रहात असतां, एक कुत्रा नेहेमी त्यांच्याजवळ बसलेला असे. त्या कुत्र्यावर त्या ऋषींची ममता जडली. ऋषींप्रमाणेंच तो कुत्राही मांसाहार न करितां कंदमूळें भक्षण करून रहात असे, एके दिवशीं भूकेनें व्याकुळ झालेला एक चित्ता अवचित त्या ऋषींच्या आश्रमाजवळ येऊन, त्या कुत्र्याला पाहून त्याला धरण्याकरितां उडी टाकणार, इतक्यांत तो कुत्रा प्राणसंरक्षणार्थ त्या तपोनिधी ऋषींची प्रार्थना करूं लागला. तेव्हां आपल्या आंगच्या तपसामर्थ्यानें त्या महात्म्या- मुनींनीं त्या कुत्र्याला चित्त्याचें रूप दिलें. तेव्हां हा आपलयाच जातीचा आहे असें पाहून दुसरा चित्ता निघून गेला. चित्त्याचें रूप पावलेला कुत्रा, यापुढें त्या आश्रमाच्या आसपासच्या अरण्यांत हिंडून वन्यपशूंना मारून आपला चरितार्थ चालवूं लागला. पुढें एकेवेळीं तो ऋषीच्या आश्रमांत बसला असतां एक मोठा वाघ त्याला मारून खाण्याच्या इच्छेनें तेथें आला. तेव्हां घाबरून त्यानें ऋषींची प्रार्थना केली. त्यामुळें ऋषींस दया येऊन त्यांनीं त्याला वाघ केलें व त्यामुळें तो वाघाच्या तावडींतून सुटला ! व्याघ्र- रूपांतच तो त्या अरण्यांत फिरून आपलें भक्ष्य जें मांस तें मिळवीत असे. असे कांहीं दिवस लोटल्यावर एक मोठा भयंकर हत्ती त्याला मारण्याच्या हेतूनें जवळ आला असतां, ऋषींनीं त्या वाघरूपी कुत्र्याला हत्तीचें रूप देऊन त्याचें संरक्षण केलें. तो हत्ती इतर हत्तींप्रमाणेंच त्या वनांत फिरूं लागला. याप्रमाणें बरेच दिवस गेल्यावर, हत्तींच्या कुळाचा सप्पा उडविणारा पिंगट रंगाचा एक सिंह त्या वनांत आला. तेव्हां घाबरून जाऊन तो ऋषींनां शरण गेला असतां त्यांनीं त्याला सिंहाचें रूप दिलें. पुढें कितीएक दिवस गेल्यावर आठ पाय ज्याला आहेत असा शरभ त्या वनांत आला. त्याच्या भीतीनें तो सिंह पुनः ऋषींनां शरण गेल्यामुळें त्यांनीं त्याला महाबलाढ्य असा शरभ केला व भीतिपासून त्याची मुक्तता केली !

त्याच्या भयानें त्या रानांतले पशू पळून गेले. मांसाशनास लालचावलेल्या त्या शरभाला कंदमूळें दृष्टीसमोरसुद्धां नसावींशीं वाटत. तो नित्यशः वन्य

पशूंनां मारून आपली क्षुधा शमवीत असे. ज्यांच्या प्रसादानें त्याचा जीव वांचला होता, त्या महात्म्या ऋषींनाच मारून खावें असें एकदां त्याच्या मनांत आलें. अंतर्ज्ञानानें ऋषींनीं त्याचा दुष्ट हेतु जाणून ते त्याला ह्मणाले. ' तुझ्यावर स्नेह जडल्यामुळें मी तुला या योग्यतेला चढविलें तथापि जातीस्वभाव तूं सोडला नाहींस. ' मी तुझा कोणताही अपराध केला नसतां तूं मला मारूं इच्छितोस ह्मणून तूं पुनः कुत्रा होशील !

तो लागलाच कुत्रा झाला. कृतकर्माचा पश्चाताप होऊन तो शोक करूं लागला. पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. त्या अधमाला, त्या महात्म्या ऋषींनीं अरण्याबाहेर घालवून दिलें !!

थोरात.

## गोरखनाथी बारापंथी झुंड.

मेरी सर्व स्वजनोंसे ए प्रार्थनाहै के झुंड गोरक्षनाथजीका श्रीगोरक्षनाथ देवकी स्वारीसुद्धां हमेषा दर १२ वर्षमे इसमुलुखमैं आताहै. इसझुंडका प्रबंध हमेषा सतिसेवक वा मठोंकी जायदाहस होताहै. इसझुंडकी मिळकत सब हिंदुस्थानभरमें हरएक जिल्हा, हरएक शहर व देशमेंहै. इसाजिल्हा बेळगांवमें भी चार मठ है. जिनका बियान जेलमें (खालीं) जाहीर करूंगा. इस बखतमें थोडासा इसका पूर्ववृत्तांत जाहीरकरका चाहताहूं, व यहैके गोरक्षनाथका स्वारी मै झुंडके हरसिंहस्थको इसमुलुखमैं आताहै. जिसमें सब दर्जे बदर्जे अधिकारी व मानधारी रहतेहै. जो इसका बंदोबस्त करतेहै. इसवखत इसझुंडमै १५० साधु है. इसका पूर्ववृत्तांत जहांतक सुना जाताहै व इसतऱ्होंसे है की ये देव त्रिंबकनाथ जिल्हा नाशिकमे मिती श्रावण शु॥ ५ को इस स्थापना होताहै व श्रावण शु॥ ७ को त्रिंबकनाथसे स्वारी चलताहै व स्वारी मै झुंडके इस मुलुखके चंद जिल्होंमें होकर इस तरफके मठोंका प्रबंध करता हुवा मितीफाल्गुन वद्य १४ शिवरात्रको कदरीमठ जिल्हा मंगळूर जो मछींदरनाथजीका राजस्थानहै, वहांपर इस स्थापना होताहै. इसका पूर्ववृत्तांत जहांतक सुनागया है के इस मर्यादका प्रबंध करता पर्शरामजी है. त्रेतायुगसे ये चला है. इस तऱ्हेसे चालू

सिंहस्थकोभी ये देवकी स्वारी मै झुंड बारापंथके त्रिंबकसे चला. इस झुंडके अधिपती राजा श्रीस्वामी सुंदरनाथजीहै. जो प्रसिद्ध पुरुष मंहत विशालमूर्ति है. जो चंद जागा हिंदुस्थानमे राजो महाराजोंके सन्मान किये हुवेहै. इस मुलुखमैं भी चंदस्थानोमों इन्होने यात्रा किया है. जादा आप मुंबई बाबुलनाथ मै निवास कियाहै. जो सब मुंबई निवासियोमें प्रसिद्ध हैं. जिनका कुच वृत्तांत इस जागापर जाहिर करताहूं के, आप सब दिन एकासन, ( सिध्यासन ) और त्राटक मुद्रा मे सकाळीं ३ बजेसे लेकर रात्र ग्याराबजेतक बइठे रहतें है. और सदैव मौनवृत्तिमै रहते है. खालीं दूधका आहार करतेहै. साक्षात् शिवमूर्ति है. शिवमे इनमें कोइ भेद नहीं है. इनके रायसे झुंडका प्रबंध इनके कारभारी, और बारापंथके बारापंच करते है. इसे तऱ्हेंसे ये स्वामीमैं गोरक्षनाथ देवकी स्वारी झुंड बारापंथसुद्धां इस जिल्हा बेलगांवमे आये. इस जिल्हाके अंदर इनके चार मठ प्रसिद्ध है. जिनका जिकर तपशिलवार खालीं है.

बेळगांवमें चंदरोज निवास करके स्वारी मुक्काम खानापूरमे आये. मैं खानापूरके सबलोकोंको धन्यवाद देताहूं. खानापूरनिवासियोंने, झुंडकी सेवा तन-मन-धनसे किया. सबसे अधिक धोंडभट्ट जोशी, मल्हारपंत, कृष्णराव वागळे, विष्णुराव वागळे, नाना खासनीस, लोकमित्रकर्ते सडेकर व आफिसर लोकोंको मै धन्यवाद देताहूं. जिनोंने झुंडका प्रबंध अच्छा किया. और पांच दिन मुक्काम रखा. ये लोक हरवखत अपनों कामोको छोडकर झुंडकी सेवामें हजर रहे.

बाद वहांसे श्रीस्वामीमहाराजकी स्वारी मुक्काम डोंगरगांव मठ मछींदरनाथमें आये. और ३ दिवस मुक्काम करके इहांका प्रबंध किया. मछींदरनाथके मठमे साबिक ( मागचे ) कारभारी आदितवारनाथको पिर व बरखानाथको कारभारी व दो साधू और यहांपर रखाहै. बाद श्रीस्वामीकी स्वारी मौजे करोळा ( किरवळे ) मठ गोरक्षनाथमै आये. दो दिवस मुक्काम करके प्रबंध किया. पिर बालकनाथको पीर ( मालक ) व तीन साधु और यहांपर रखे. यहांसे श्री स्वामीकी स्वारी मुक्काम बाळावाडी सिद्ध बालनाथके मठमें आये. इसका कुच खुलासा मै करताहूं के, इयांका साबिक ( मागचा ) कारभारी गिरीधारीनाथ कुछ आपकर्म करके मठकी सब संपदा लेकर,

झुंडके आनेसे पहिले एक महिना छप गया. बारापंथके झुंडके सामने हजर नहीं हुवा. इसवास्ते सर्व स्वजनोंसे हमारी प्रार्थना हैं के इस गिरीधारी नाथका किसी महाशयकों खबरहो यां मिले तो झुंडमें जाहीर करे. उसको दसअश्वमेधका फल होगा. यहांका बंदोबस्त करके श्रीस्वामीमहाराजकी स्वारी श्रीसिद्ध हंडीभडंगनाथको जायेगी. शेषवृत्तांत पिछे लिखाजायगा. तारीख १५ जानेवारी १९०९ इ०.

श्रीगोकुलनाथ कारभारी झुंड बारापंथ.

---

## हिंदूंचें स्वतंत्र राज्य.

**जावाबेट**–येथें मलाया जातीचे लोक राहतात. ते स्वभावानें सरळ, सभ्य, दयाळू, अतिथिअभ्यागताचा परामर्ष घेणारे व सत्यवादी आहेत. ते आपणांस मुसलमानी धर्माचे म्हणवितात पण घरांत श्रीरामचंद्र, दुर्गा, महादेव इत्यादि देवतांची पूजा करितात. लग्नांत मंत्र ह्मणतात त्यांत एक असा आहेः-ॐ केदांग ब्रह्मांग सदाशिवाय नमः । शिवाय संगाय गणेशाय ॐ केदांग गंगा शिवंगाय नमः । शिवः ॐ गंगा महातीर्थः" संस्कृत, चिनी व पारशी यांपासून बनलेली मिश्रभाषा आहे. रवि, सोम, अंगिरा, बुध, बृहस्पति, शुक्र, शनी अशीं वारांचीं नांवें आहेत.

**वालीद्वीप** हें बेट लहानसेंच आहे. एकदां जावादेशावर ४० दिवसांनीं परचक्र येणार आहे असें एका ज्योतिषानें सांगितल्यावरून तेथील राजानें आपल्या पुत्रास सहकुटुंब वालीद्वीपीं पाठवून नवीन राज्यस्थापना करण्यास आज्ञा केल्यावरून हें राज्य आस्तित्व्यांत आलें असें ह्मणतात. तेथें व जावाबेटांत पुष्कळ संस्कृतग्रंथ उपलब्ध आहेत. येथील जमीन फार सुपीक आहे. लोक फार सभ्य आहेत. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र असे चार वर्णाचे लोक आहेत. चांडाळ नांवाचेही लोक आहेत. प्रचलित भाषा संस्कृत असून राज्यपद्धति हिंदुधर्मशास्त्राप्रमाणें आहे. प्रत्येक गांवांत देवालयें असून इकडीलप्रमाणें देवांच्या मूर्ति आहेत. शपथेवर विशेष भरंवसा ठेवण्यांत येतो. ब्राह्मणाशिवाय सर्व वर्ण मांस खातात. राजा क्षत्रिय जातीचा आहे. सतीची चाल प्रचलित आहे. या राज्याचे सात सुभे असून लोकसंख्या दहा लाख आहे. शालीवाहनशक चालू आहे.

---

# बैल आणि कुणबी.

( श्लोक–शिखरिणी. )

बैलः— मला ने चाराया कुरण हिरवेंगार बघुनी ।
अरे फाटे जिव्हा सतत करबाडें चघळुनी ॥
कसा आंगीं लागे जरि विपुल तूं घालिसि भुसा ।
अरे बैला व्हावें ह्मणसि मग कां पुष्ट वपुसा ॥ १ ॥
मला खाऊं दे रे लुसलुशित हे पल्लव नवे ।
अहाहा! हे झाले लघु तरु तरी सर्व हिरवे ॥
नको जाऊं तेथें ह्मणुनि मजला कां अडविसी ।
धन्या माझ्या बापा परत मज कैसा फिरविशी ॥ २ ॥
प्रभूच्या आज्ञेनें घन करितसे वृष्टि समयीं ।
अह्मांसाठीं होते ह्मणुनि बघ हे भू तृणमयी ॥
तृणा पेरायातें श्रम विपिनिं तो कोण करितो? ।
जगन्नाथ स्वेच्छें करुनि बघ त्यातें रुजवितो ॥ ३ ॥
घरें बांधा ज्यांचीं सरळ तरु सागादिक पहा ।
अरे का खातों तें? मग उगिच कां बा जुलुम हा ॥
तृणें खाऊं राहूं पुनरपि फुटे अंकुर तया ।
प्रभूची ही आहे मजवर गड्या! संतत दया ॥ ४ ॥
अरे मोटा, गाडे, रथहि, छकडे, नांगर तसे ।
सदा ओढूं आह्मीं परि अदय होतां तुह्मि कसे ।
तुह्मीं स्वार्थी सारे मनुज पशुंचे हाल करितां ।
परी "न्यायी" ऐसा फुकट वर तोरा मिरवितां ॥ ५ ॥

कुणबीः—अरे बैला याचें जतन करितो फार नृपति ।
तयाच्या निर्बंधास्तव नच कुणी आंत शिरती ।
पडे खालीं पाला गळुनि, सडकें लांकुड जरी ।
परी नेता कोणी, नृपति बघ त्या शासन करी ॥ ६ ॥
अरे जातीं रानीं चुकुनि अमुची एक बकरी ।
तरी धांवोनीयां सहज वनसंरक्षक धरी ॥
करी जी नासाडी, शतगुणितही त्याहुनि पडे ।
अह्मां दंड त्रासें कृषिवल असा संतत रडे! ॥ ७ ॥
भरोनीयां पैसे, गवत वठलेले तरु कधीं ।
ह्मणे न्यावें ऐशी सवलतहि देतो नृपसुधी ॥
परी उल्लंघोनी सतत नृपनिर्बंध पडती ।
अरे कारागारीं उदरभरणार्थी जन किती! ॥ ८ ॥

प्रजच्या कल्याणास्तव नृपति निर्बंध करितो।
अह्मीं अज्ञानी ते कडक ह्मणुनी व्यर्थ ह्मणतों॥
करोनीयां अर्जी विदित करितों ज्या रडकथा।
कुणी घेनां ध्यानीं श्रम विफल होतात करितां॥ ९॥

बैल:—

नको बोलूं आतां सकल कळला हेतु तुमचा।
मनुष्यानों माना तृणसमचि कीं जीव अमुचा॥
तुह्मांहून श्रेष्ठ प्रभुवर जगद्रक्षक हरी।
तया जातों आतां शरण, अमुचें संकट हरी॥ १०॥
अगा हे गोपाला! विमल वनमालाधर हरी।
तुझीं स्तोत्रें गातां उठति हृदयीं प्रेमलहरी॥
दया येऊंदे रे! बघुनि अमुचे हाल, तुजला।
तुझ्यावीण त्राता जगति दुसरा कोण उरला?॥ ११॥

थोरात.

## गमप्लास्टर!

( लेखकः—एन. पी. संपत. प्राईझमेडलिस्ट् )

आज परदेशाहून लाखो रुपयांच्या औषधांमध्यें गमप्लास्टरहि येतो व त्यामुळें देखील हजारों रुपये आपल्या देशांतले परदेशांत जातात! तरी याचा चांगल्या प्रमाणावर एखा. द्यांनी कारखाना काढल्यास तो चांगला चालण्यासारखा आहे. लोकांनीं प्रयत्न करून पहावा.

गमप्लास्टरमध्यें खालील वस्तू असतात.

| | |
|---|---|
| राळचा भुरका. ... ... ... ... | ८ औंस |
| पिंवळा मेण.... ... ... ... ... | ४ औंस. |
| * साधा मलम. ... ... ... ... | १६ औंस. |
| बदामाचें तेल. ... ... ... ... | २ औंस. |

कृती:—सर्व पदार्थ उष्णतेच्या योगानें एकत्र करावे. घट्ट झाल्यावर लाटे ( कांड्या ) पाडून कागदांत गुंडाळून विक्रीस ठेवावे.

### * साधा मलम करण्याची रीत.

| | |
|---|---|
| पांढरें मेण ... ... ... ... ... | ४ औंस. |
| * उत्तम चर्बी ... ... ... ... ... | ६ औंस. |
| बदामाचें तेल. ... ... ... ... | ६ औंस. |

कृती:—सर्व पदार्थ उष्णतेच्या योगानें एकत्र करावे.

* चर्बीच्या ऐवजीं कोकूम तेल ( अमसूल तेल ) वापरलें असतां चालेल.

## रमणीय वेंचे.

( ६ वे अंकावरून पुढें चालू )

बालत्वे च मृता माता वृद्धत्वे च मृताः सुताः ।
यौवने च मृता भार्या पातकं किमतः परम् ॥ ८४ ॥

बालपणीं आई मरणें, म्हातारपणीं मुलगा मरणें आणि तारुण्यांत बायको मरणें यापेक्षां अधिक पातक तें कोणतें ?

काके शौचं द्यूतकारे च सत्यं क्लीबे धैर्यं मद्यपे तत्वचिन्ता ।
सर्पे शान्तिः स्त्रीषु कामोपशान्ती राजा मित्रं केन दृष्टं श्रुतं वा॥८५॥

कावळ्याचेठायीं शुद्धता, जुगार खेळणाराजवळ सत्य, षंढाच्या अंगीं धैर्य, मद्यप्याचें चित्त तत्वविचाराकडे, सर्पाच्या अंगीं शांती, स्त्रीयांचेठायीं कामशांती, राजाचें मित्रत्व, या गोष्टी कोणी ऐकिल्या किंवा निदर्शन पाहिल्या तरी आहेत काय ?

माता यदि विषं दद्यात्पिता विक्रीयते सुतम् ।
राजा हरति सर्वस्वं शरणं कस्य जायते ॥ ८६ ॥

प्रत्यक्ष आई जर मुलाला विष पाजते, बाप त्याचा विक्रय करतो, आणि राजा जर एखाद्याचें सर्वस्व हरण करतो, तर मग शरण तरी कोणाला म्हणून जावें !

शतेषु जायते शूरः सहस्रेषु च पण्डितः ।
वक्ता दशसहस्रेषु दाता भवति वा न वा ॥ ८७ ॥

शंभरांत एखादाच शूर मिळेल, हजारांत एखादाच पंडीत निघेल, सभेंत बोलणारा वक्ता असा दहाहजारांत एखादाच आणि या सर्वांत दाता म्हणून एखादा तरी सांपडेल किंवा नाहीं याची वानवाच !

आदौ वेश्या पुनर्दासी पश्चाद्भवति कुट्टिनी ।
सर्वोपायपरिक्षीणा वृद्धानारी पतिव्रता ॥ ८८ ॥

अगोदर वेश्या असून ( तारुण्य निघून गेल्यावर ) दासी झाली, नंतर कुंटीण व सर्व उपाय थकल्यावर वृद्धापकाळीं मोठें पातिव्रत्य मिरविते.

यस्य वर्णस्य यो राजा स वर्णः सुखमेधते ।
जामदग्न्येन रामेण ब्राह्मणा भुभुजः कृताः ॥ ८९ ॥

राजा ज्या वर्णाचा ( धर्माचा ) असतो, त्या वर्णाच्या लोकांनां त्याच्या कारकिर्दीत सुख होतें. जमदग्निपुत्र परशुरामानें ब्राह्मणांना भूपती केलें.

यज्ञोपवीते द्वे धार्ये श्रौते स्मार्ते च कर्मणि ।
तृतीयमुत्तरीयार्थे वस्त्राभावे चतुर्थकम् ॥ ९० ॥

श्रौतस्मार्त कर्माकरितां दोन यज्ञोपवीतें घालावीं. अंगवस्त्र म्हणून तिसरें घालावें आणि वस्त्राभावी चवथें घालावें.

विप्रास्मिन्नगरे महान्कथयतां तालद्रुमाणां गणः ।
को दाता रजको ददाति वसनं प्रातर्गृहीत्वा निशि ॥
को दक्षः परदार-वित्तहरणे सर्वोऽपि दक्षो जनः ।
कस्माज्जीवसि हे सखे विषक्रमिन्यायेन जीवाम्यहम् ॥ ९२ ॥

कोणीएक नवखा गृहस्थ एका शहरांत गेला असतां तेथील एका रहिवाशास पुसतो, हे ब्राह्मण! या शहरांत मोठा कोण ? तो ह्मणाला ताडवृक्षांचा समुदाय; दाता कोण आहे ? परीट, सकाळीं नेलेलीं वस्त्रें संध्याकाळीं परत आणून देतो. येथें दक्ष ( स्वकर्मरत ) कोणी आहे काय ? या शहरांतले सर्वच रहिवासी. कारण ते दुसऱ्याची बायको आणि द्रव्य हीं हरण करण्यांत सदैव दक्ष असतात. तेव्हां तो ह्मणाला, तर मग अशा शहरांत तूं राहातोस तरी कसा ? ब्राह्मणानें उत्तर दिलें कीं, विषांत उत्पन्न झालेले किडे विषांतच राहतात.

अनर्घमपि माणिक्यं हेमाश्रयमपेक्षते ।
विनाश्रयं न शोभन्ते पण्डिता वनिता लताः ॥ ९३ ॥

बहुमोल रत्न असलें तरी त्याला सोन्याचे कोंदणाची गरज असते. कोंदणाशिवाय तें शोभत नाहीं. तसेंच पण्डित, स्त्री, आणि वेल हीं आश्रयाशिवाय शोभत नाहींत.

विभवाः सर्वतः पूज्या न शरीराणि देहिनाम् ।
चाण्डालोऽपि नरश्रेष्ठो यस्यास्ति विपुलं धनम् ॥ ९४ ॥

सन्मान हा मनुष्याला प्राप्त होत नसून त्याच्या वैभवाला मिळतो. जर एखाद्या चंडाळाजवळ विपूल द्रव्य असेल तर त्यालाही श्रेष्ठत्व येतें.

व्यसनानि सन्ति बहुधा व्यसनद्वयमेव केवलं व्यसनम् ।
विद्याभ्यसनं व्यसनं अथवा हरिपादसेवनं व्यसनम् ॥ ९५ ॥

पुष्कळ प्रकारचीं व्यसनें आहेत, पण त्यांत खरोखर व्यसनें अशीं दोनच; एक निरंतर विद्याभ्यास करणें आणि दुसरें श्रीहरीचें पादसेवन ( पूजा ) करणें.

शनैः पन्थाः शनैः कन्थाः शनैः पर्वतलङ्घनम् ।
शनैर्विद्या शनैर्वित्तं पञ्चैतानि शनैः शनैः ॥ ९६ ॥

हळू हळू चालून मार्ग संपतो, थोडी थोडी शिवतां गोधडी तयार होते. हळूं हळूं चढतां पर्वतहि चढून पार जातो, थोडा थोडा अभ्यास करूनच विद्या संपादन करतां येते, हळूं हळूं करूनच द्रव्यसंचय करतां येतो हीं पांच थोडीं थोडींच केलीं पाहिजेत

सत्यं जनविरोधाय असत्यं जनरञ्जनम् ।
सुरा विक्रीयते स्थाने दधि क्षीरं गृहे गृहे ॥ ९७ ॥

सत्यामुळें लोकांजवळ वांकडें होतें आणि असत्यामुळें लोक प्रसन्न असतात. दारू ( सुरा ) विकण्याचें स्थळ ( दुकान ) नियमीत असतें पण दहीं दूध घरोघर विकत मिळतें.

( अपूर्ण. )

# लोकमित्र.

## बाबू कृष्णकुमार मित्र.

सरकारानें, गेल्या महिन्यांत, इ० स० १८१८ च्या सुलतानी कायद्याखालीं, ज्या ९ देशभक्तांस विनदर्यात हद्दपार केलें, त्यांपैकीं बाबू कृष्णकुमार मित्र हे एक होते. यांचें वय हल्लीं ५६ वर्षांचें आहे. ह्यांचें जन्म बंगाल्यांत मेमनसिंग जिल्ह्यांत बाधील नामक गांवीं झालें. त्यांचा प्राथमिक विद्याभ्यास मेमनसिंग येथें जिल्हास्कूलमध्यें झाला. पुढें मॅट्रिक्युलेशनची परीक्षा पास झाल्यावर ते कलकत्ता येथें आले व तेथील 'स्कॉटिश चर्चिस कॉलेज' नामक उच्चशिक्षणसंस्थेंत त्यांनीं आपला पुढील अभ्यासक्रम चालविला. मध्यंतरीं कांहीं दिवस त्यांनीं वैद्यक व शिल्पशास्त्रांचाही अभ्यास केला होता. इ० स० १८७७ सालीं ते बी. ए. झाले व पुढें त्यांनीं कायद्याचा अभ्यास चालविला. कायद्याचे परीक्षेपूर्वी दोन दिवस राजकीय विषयांवर व्याख्यानें देण्यासाठीं कलकत्ता येथील इंडियन असोसिएशनच्या विद्यमानें ते बंगाल्यांत फिरावयास गेले व त्यामुळें त्यांचा कायद्याचा अभ्यास अपूर्ण राहिला. इंडियन असोसिएशन ही संस्था बाबू सुरेंद्रनाथ बानर्जी व कै. आनंदमोहन बोस या देशभक्तांनीं स्थापन केली व पुढें बाबू कृष्णकुमार मित्र हेही त्या संस्थेस लवकरच येऊन मिळाले. या संस्थेचें काम करीत असतां, उत्कट स्वदेशाभिमान व परिणामकारक वक्तृत्व ह्या गुणांबद्दल बाबू कृष्णकुमार यांची फार प्रख्याति झाली.

पुढें लवकरच, कै. आनंदमोहन बोस यांनीं सिटि कॉलेज स्थापन केलें व बाबू कृष्णकुमार हे त्या कॉलेजचे एक प्रोफेसर झाले. त्या दिवसापासून गेल्या सप्टेंबर महिन्यापर्यंत, ह्मणजे जवळ जवळ २८ वर्षें त्यांनीं आपलें अध्यापनाचें कार्य अत्यंत समाधानकारकरीतीनें केलें. त्या कॉलेजाच्या पाठशाळेकडील शाखेचे ते पुष्कळ वर्षें सुपरिटेंडेन्ट होते व तेवढ्यावेळांत त्यांची कडक शिस्त व वर्णनीय नीतिमत्ता यांचा संस्कार विद्यार्थ्यांच्या मनावर

झाल्याशिवाय राहिला नाहीं. बाबू कृष्णकुमार यांनीं आपल्या तारुण्याचीं बरींच वर्षे वाङ्मयाचा अभ्यास व अभिवृद्धि करण्यांत घालविलीं. त्यांनीं बंगालीभाषेंत लिहिलेलीं, गौतमबुद्ध, महमद व महाराणी व्हिक्टोरिया यांचीं चरित्रें बंगाल्यांत सर्वमान्य झालीं आहेत व बंगालीलोक अद्याप तीं मोठ्या आवडीनें वाचतात.

लॉर्डरिपन हे हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल असतां, बाबू कृष्णकुमार यांनीं प्रि. हेरंबचंद्र मैत्र यांच्या सहकारित्वानें ' संजीवनी ' पत्र सुरूं केलें. हें पत्र सुरू होऊन दोन वर्षे झालीं नाहींत तोंच तें अतिशय लोकप्रिय झालें व हल्लीं तर बंगाल्यांतील प्रमुख वर्तमानपत्रांत संजीवनीची गणना होते. ह्या पत्रांत येणारे लेख नेमस्तपणानें लिहिलेले असतात; तथापि लेखकाची उत्कट देशभक्ति, अगाध विद्वत्ता व स्पष्टवक्तृत्व हे गुण त्यांत दृश्यमान झाल्याशिवाय राहत नाहींत.

बाबू कृष्णकुमार हे बंगाल्यांतील ब्रह्मसमाजाचे एक प्रमुख पुरस्कर्ते असून एकेश्वरी पंथाच्या मतांचा प्रसार करण्याच्या कामीं त्यांनीं फार खटपट केली आहे; सामाजिक सुधारणेच्या बाबतींतही त्यांनीं पुष्कळ प्रयत्न केला आहे. समाजसुधारक या नात्यानें इतर ब्रम्हसमाजिष्टापेक्षां, कृष्णकुमार बाबू हे फार पुढें गेले असून, स्त्रीशिक्षणाकडे तर त्यांचा विशेष कल आहे. हिंदुस्थनांतील स्त्रियांस हल्लींच्या स्थितींत, जितकें उच्चप्रतीचें शिक्षण देतां येणें शक्य आहे, तितकें शिक्षण त्यांनीं आपल्या दोन्ही मुलीस दिलें असून त्यांची एक मुलगी कुमारी कुमुदिनी मित्र बी. ए. ही ' सुप्रभात ' नामक एक बंगाली मासिक पुस्तक चालवीत आहे.

बंगालची विभागणी झाल्यापासून बंगाली लोकांनीं जी चळवळ सुरू केली आहे, तींत कृष्णकुमार बाबूंचें प्रमुखत्वानें अंग असून, बाबू सुरेंद्रनाथ बानर्जी यांचा ते अगदीं उजवा हात आहेत असें ह्मणण्यास हरकत नाहीं. आज चार वर्षे ते बहिष्कारयोगाचें प्रतिपादन करीत आले आहेत व ही चळवळ चालवितांना त्यांनीं कधींही विश्रांति घेतली नाहीं. कृष्णकुमार बाबूंची गणना जरी नेमस्तपक्षांत होते, तरी ते बहिष्कारवादी नेमस्त आहेत व विरुद्धपक्षाच्या एखाद्या सन्मान्य गृहस्थावर सरकारी अधिकाऱ्यांच्या गैरमर्जीमुळें कांहीं किटाळ आल्यास, त्यावेळीं आपल्या वैयक्तिक मतभेदाकडे

लक्ष्य न देतां, त्या गृहस्थास शक्य ती मदत करण्यास त्यांनीं कधीं माघार घेतली नाहीं. मुंबई व कलकत्ता येथील मवाळांत जो मुख्य भेद आहे, तो हाच होय. स्वदेशीचा प्रसार करण्यासाठीं भरलेल्या निरनिराळ्या ५०० सभांत कृष्णकुमार बाबूंनीं भाषण केलें आहे व ता. ७ आगष्ट १९०५ पासून आपल्या संजीवनीपत्राच्या प्रत्येक अंकांत बहिष्कार योगाचें समर्थन केलें आहे.

मागें बारिसाल येथें प्रांतिकसभा भरली होती, त्यावेळीं त्या जिल्ह्याचे मॅजिस्ट्रेट मि. इमर्सन यांनीं बारिसाल जिल्ह्यांत ' वंदे मातरम् ' गीत गाण्यास मनाई केली होती. ही मनाई अगदीं बेकायदेशीर असून, न्याय-कोर्टामार्फत तिच्या कायदेशीरपणाचा निकाल लावून घेतला पाहिजे, असें म्हणणारांपैकीं कृष्णकुमार बाबू हे एक होते व त्याप्रमाणें सदर हुकुमाचा बेकायदेशीरपणा प्रस्थापित होईपर्यंत आपण अन्न ग्रहण करणार नाहीं असें त्यांनीं निक्षून सांगितलें!

इ० स० १९०६ मध्यें भरलेल्या मेमनसिंग जिल्हासभेचे कृष्णकुमार बाबू अध्यक्ष होते व त्यावेळच्या आपल्या भाषणांत त्यांनीं स्वदेशी व बहि-ष्काराचें जोरानें समर्थन केलें. त्याच वर्षीं, ऑल इंडिया कांग्रेस कमिटीचे ते एक सभासद झाले. बाबू कृष्णकुमार हे राजकीय विषयांत मन घालूं लागले ह्मणून सिटी कॉलेजच्या अधिकाऱ्यांनीं, बंगालसरकारच्या आग्रहा-मुळें, त्यांस आपली अध्यापकाची जागा सोडावयास लाविली. बाबू कृष्ण-कुमार हे दिसण्यांत मोठे भव्य, प्रशांत आणि गंभीर असे आहेत.

हल्लीं बंगाल्यांत जें बांबगोळ्यांचें प्रकरण उपस्थित झालें आहे, त्यांतील एक आरोपी बाबू अरविंद घोस यांची आई व कृष्णकुमार मित्र यांची पत्नी या बहिणी बहिणी होत व या नात्यामुळें व बाबू अरविंद हे अगदीं निर्दोष आहेत अशी कृष्णकुमार बाबूंची पक्की समजूत असल्यामुळें, अरविंद बाबूंच्या बचावाच्या कामीं त्यांनीं फार मेहनत केली व हीच गोष्ट त्यांच्या हद्दपारीस कदाचित् कारणीभूत झाली असेल तर कोण जाणे!

राष्ट्रीयसभा स्थापन झाल्यापासून, त्या संस्थेचे बाबू कृष्णकुमार हे एक पुरस्कर्ते असून, संस्थेच्या तेरा सभांस ते आजपर्यंत हजर राहिले आहेत. सरकारनें त्यांस ज्यादिवशीं हद्दपार केलें, त्यादिवशीं, कलकत्त्यांतील एका

सभेंत राष्ट्रीयसभेसंबंधानें ते भाषण करणार होते. अशाप्रकारें, केवळ नेमस्तपणें व कायदेशीररीतीनें स्वदेशोत्कर्षासाठीं यथाशक्ति खटपट करणाऱ्या या थोरपुरुषास बिनदर्याप्त हद्दपार करण्याची चुकी सरकारास करावी लागली, हें सरकाराचें व लोकांचें, दोघांचेंही दुर्दैव होय !

शेवटीं, कृष्णकुमार बाबू लवकरच बंधमुक्त होऊन आपल्या हतभागी देशासाठीं पुनः प्रयत्न करण्यास समर्थ होवोत व असे शेंकडो कृष्णकुमार आमच्या देशांत उत्पन्न होवोत, अशी त्या जगन्नियामकाची प्रार्थना करून हा अल्प चरित्रलेख येथें पूर्ण करितों.

ज. र. आजगांवकर.

## सृष्टीची स्वाभाविक गति.

( मागील अंकावरून समाप्त. )

वरील आलें आहे. हें कशाचें फळ ? अथवा अशारीतीनें जपानाची योग्यता कशानें वाढली ? हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे. ह्याचें थोडक्यांत उत्तर द्यावयाचें ह्मटलें तर त्या राष्ट्रांतील लोकांची **स्वदेशप्रीति, विद्ये-बद्दल अभिरुची** व **उद्योगप्रीयता** हे मुख्यतः गुणच त्या राष्ट्राच्या अभ्युदयाला कारणीभूत झालेले आहेत. ह्याशिवाय त्यांचे इतर पुष्कळ गुण वाखाणण्यासारखे आहेत.

**स्वदेशाभिमाना**संबंधी त्यांची कल्पना अत्यंत प्रशंसनीय आहे. आपल्या देशचें सर्व कांहीं चांगलें असून परदेशचें वाईट अर्थात् असाह्य आहे" असें ह्मणणारांपैकीं ते लोक नसून "आपल्या देशांत जेवढें कांहीं वाईट असेल तेवढें नाहीसें करून चांगल्या गोष्टींची वृद्धि करावयाची; इतकेंच नव्हें तर परकीयदेशांत जें कांहीं चांगलें असेल त्याचीही जोड आपल्या देशास करून द्यावयाची हाच खरा **देशाभिमान** होय" असें ते समजतात.

जपानचा असावा तसा संगतवार इतिहास उपलब्ध नाहीं तरी पण त्या राष्ट्रासंबंधी अलिकडे अनेक विद्वानांनीं जी माहिती प्रसिद्ध केली आहे त्यावरून असें समजतें कीं, पूर्वीं जपानांत "परद्वीपांतील लोकांनीं येऊं नये व जपानीलोकांनीं परद्वीपांत जाऊं नये" अशी कायद्यानें सक्ति होती व

त्यावेळीं जपानीलोक हिंदुस्थानासारिखे अज्ञानांधकारांत स्वस्थ घोरत पडले होते; परंतु पुढें कांहीं प्रसंगामुळें जपानीलोक परद्वीपांत जाऊं लागले व तेव्हांपासूनच त्यांच्या सुधारणेला प्रारंभ झाला.

इ० सन १८५१ सालीं अमेरिकनलोक प्रथमतः व्यापाराकरितां जपानच्या किनाऱ्यावर आले. त्यांस जपानीलोकांनीं पुष्कळ अडथळा केला; परंतु अमेरिकन लोकांजवळ युद्धसामुग्री चांगलीच असल्यामुळें त्यावेळच्या मागसलेल्या जपानाचें त्यापुढें कांहीं चाललें नाहीं. ती स्थिति लक्षांत घेऊन जपानानें आपलें पाऊल पुढें सरकाविण्याचा निश्चय केला व ह्याचवेळीं जपानीराष्ट्रास आपलें राष्ट्रीयत्व कायम राखण्यास काय केलें पाहिजे ह्याचा "अनामा" मिळाला. पुष्कळ वर्षें हाडींमांसीं खिळलेल्या संस्कारामुळें परदेशगमन प्रथमतः लोकांस चांगलें वाटलें नाहीं व तसें करण्यास कांहीं लोकांचा अडथळाही होऊं लागला. तरी त्यास न जुमानतां खऱ्या कळकळीचे जे देशभक्त होते ते सुधारलेल्या राष्ट्रांतील कलाकौशल्य, राज्यपद्धति इ० चें योग्य ज्ञान मिळविण्याकरितां स्वदेश सोडून निघाले व युरोप, अमेरिका इ० ठिकाणीं जाऊन परत आल्यावर तेथील नवीन शिक्षणपद्धति आपल्या देशांत सुरू करून व सुधारलेल्या राष्ट्रांतील कलाकौशल्य व यंत्रशास्त्रासंबंधीं अवश्य ज्ञान लोकांस प्राप्त करून देऊन पूर्वीचें जपान व हल्लींचें जपान ह्यामध्यें जमीनअस्मानाचें अंतर पाडण्यास कारणीभूत झाले. जपानांत हल्लीं सुधारलेल्या धर्तीवर जे कारखानें आहेत, आगगाड्या, तारायंत्रें, आगबोटी व पोष्टखातीं आहेत, त्याचप्रमाणें उत्तम आरमार व सैन्य आहे व तेणेंकरून तेथें ऐहिकसुखाची जी वृद्धि होत आहे त्याचें बहुतेक श्रेय वरील खऱ्या कळकळीच्या देशभक्तांसच आहे. त्यांच्याच शिक्षणाच्या प्रभावानें आज तेथील पुष्कळ लोक चांगले शोधक, गुणग्राही व मनोनिग्रही निजपले आहेत. सारांश आज जपानाची सुधारणा झाली आहे ती सर्वबाजूनें झालेली आहे.

स्त्रीशिक्षणाच्या बाबतींतही तें राष्ट्र मागें नाहीं. जपानीलोकांनीं पाश्चात्यांचें अनुकरण केलें खरें, पण आपल्या परिस्थितीचा विचार करून व तदनुरूप फेरफार करूनच त्यांनीं पाश्चात्यांच्या चालीरीती उचलल्या आहेत. अर्थात् हें अनुकरण करतांना त्यांनीं अस्सलाही वर ताण केली

आहे. युरोपांत स्त्रियांच्या उच्चशिक्षणाचा प्रघात पडण्याला कितीतरी काळ लागला व अनेक खटपटी कराव्या लागल्या; परंतु जपानांत तें काम फारच थोड्या अवकाशांत झालें. मध्यंतरीं सुधारणेच्या विरुद्ध एक लाट उसळली होती व त्यावेळीं थोडा काळ स्त्रियांच्या शाळा बंद कराव्या लागल्या.

जपानांत स्त्रीशिक्षणाकरितां स्वतंत्र युनिव्हर्सिटी स्थापन झाली आहे. ह्या युनिव्हर्सिटींतून उच्चशिक्षणाचा लाभ, सहाशें स्त्रिया घेत आहेत. ह्याचप्रमाणें पूर्वशिक्षण घेणाऱ्या स्त्रियांचीही संख्या तेवढीच आहे. त्याशिवाय प्राथमिक शिक्षण सार्वत्रिक आहेच. तेथील शिक्षणक्रमाची अशी योजना आहे कीं, तेणेंकरून स्त्रिया उत्तम कन्या, उत्तम गृहिणी व उत्तम माता व्हाव्यात. स्त्री पुरुषांमध्यें निसर्गतांच जो भेद त्याकडे लक्ष देऊन जपानी युनिव्हर्सिटींतील शिक्षणक्रम आंखलेला आहे. केवळ पुरुषांबरोबर त्यांच्या धंद्यांत स्त्रियांना चढाओढ करतां यावी असा उद्देश त्यांत नाहीं. स्त्रियांना त्याचे नैसर्गिक गुण कायम ठेवून उत्तम स्त्रिया बनविण्याकडेच जपानी युनिव्हर्सिटीचा रोंख आहे. जीं कामें करणाऱ्या पुरुषांपेक्षां स्त्रियाच लायक आहेत. तीं कामें उत्तमप्रकारें कशीं करावीं, तसेंच संसारांत पुरुषांना त्यांनीं कसें सहाय्य करावें, हें जपानी स्त्रियांना त्यांच्या विद्यालयामध्यें शिकविण्यांत येतें. ज्या शिक्षणाच्यायोगानें स्त्रीपुरुषांमध्यें विरोधी भाव उत्पन्न न होतां पुरुषांना त्यांच्या कामांत स्त्रियांकडून योग्य मदत होईल असेंच शिक्षण जपानांत स्त्रियांना मिळत आहे, ही गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. सारांश जपानीलोकांनीं चोहोंकडून आपली सुधारणा करून घेतली आहे.

चीनसंबंधीं मुद्धां असेंच सांगतां येणार आहे. त्या देशांत हलीं विलक्षण चैतन्य उत्पन्न होऊन तो प्रगतीच्या मार्गास लागला आहे.

आतां ह्याच्या उलट पूर्वी जे देश सुधारलेले ह्मणून नांवाजले होते, ते आज नामशेष झाले आहेत. रोम, ग्रीस ह्या देशांचा इतिहास सर्वांस महशूर आहेच. रोमनलोकांचें साम्राज्य युरोपखंडभर पसरलेलें असून तें नष्ट झाल्याला आज ८–१० शतकें होत आलीं. रोमन साम्राज्याचा विस्तार पाहिला तर तो उत्तरेस स्कॉटलंडच्या सरहद्दीपासून दक्षिणेस सहारावाळवंटापर्यंत व पूर्वेस पर्शियन आखातापासून पश्चिमेस अटलांटिक महासागरापर्यंत

होता. रशिया खेरीजकरून युरोपखंडाचा बहुतेक भाग, आशियाखंडांतील इराणपर्यंतचा प्रदेश, आफ्रिकेंतील इजिप्तमधील कांहीं भाग व भूमध्यसमुद्र किनाऱ्यावरील उत्तरआफ्रिकेची पट्टी इतका तीन खंडांतील मुलुख रोमन पातशहाच्या हुकमतीखालीं होता. ह्यावरून रोमचें सामर्थ्य किती होतें ह्याची साधारण कल्पना करतां येणार आहे. तरी सुद्धां त्याची तंतोतंत योग्यता कळण्यास रोमनसाम्राज्याचा इतिहासच वाचला पाहिजे. असो; येथें थोडक्यांत ह्या देशासंबंधीं सांगावयाचें ह्मटलें म्हणजे **रोमचें वैभव** इंग्रजाच्या सामर्थ्यापेक्षां व वैभवापेक्षां कमी तर नव्हतेंच पण कांहीं बाबतींत जास्त होते. इतकें जंगीं सामर्थ्य असून व साम्राज्याचा एवढा विस्तार असून रोमनसाम्राज्य रसातळास गेलें व त्याचे शतशः तुकडे झाले. तसेंच **विद्या, कला, व्यापार, पराक्रम** हीं ज्या देशांत एकत्र नांदत होतीं, असा **वैभवशाली ग्रीसदेश** आज आपल्या वैभवसुखास आंचवला आहे. १९०६ सालीं येथील प्रेसिडेन्सी असोशिएशनच्या हॉलमध्यें ग्रॅज्युएट्स असोशिएशनतर्फे लो० **बाळगंगाधर टिळक** ह्यांचें खाल्डियन वाङ्मया-संबंधीं व्याख्यान झालें. त्यांत त्यांनीं खाल्डियाचें राष्ट्र ६००० सहा हजार वर्षांपूर्वीं चांगलें भरभराटींत होतें असें सांगितलें होतें. सामर्थ्यांत त्याची योग्यता रोमच्या तोडीची होती व ज्ञानामध्यें तें ग्रीसच्या बरोबरीला होतें; पण तें हल्लीं कोठें आहे? युरोपांतील ज्ञानाचा उगम जेथें शोधतां येतो असा मिसरदेश आज कोणत्यास्थितींत आहे? ह्यावरून **सृष्टीची स्वाभाविक गति सुधारणेकडेच** असते अथवा **दुर्धारणेकडेच** असते असें ह्मणतां येत नाहीं. ती एकाचवेळीं दोहोंकडे असलेली दिसून येते, ह्मणून **सुधारणा** ही आपोआप कालेंकरून होणारी नसून त्यासाठीं मनुष्यानें विशेष **प्रयत्नच** केले पाहिजेत व ह्याप्रमाणें सृष्टीच्या ज्या भागानें तशा रीतीचा प्रयत्न केला त्या भागापुरती तिची गति सुधारणेकडे वळलेली आहे. आज-पर्यंतच्या आपल्या देशस्थितीवरून हेंच सिद्ध होतें. आजची आपल्या देशाची स्थिति आपणांस दिसत आहे व ती पाहून आपलें अंतःकरण तिळ-तिळ तुटत आहे. ही स्थिति पूर्वीं नव्हती हें वर सांगण्यांत आलेंच आहे. आपलें पूर्वीचें वैभव कसें नष्ट झालें ह्याचा आपण विचारच करीत नाहीं.

आज आपल्या देशांतील सुपीक जमीन नापीक होत चालली आहे; पण ह्याच जमिनींत पाश्चात्य लोक चहा-कॉफीची लागवड करून शेंकडों रुपये आपल्या देशीं नेत आहेत. व्यापार, कलाकौशल्य इ० त तोच प्रकार.

सारांश अशाप्रकारें आज आपलें राष्ट्र अल्प दर्जाच्या मजुरांचें राष्ट्र बनत चाललें आहे. ही शोचनीय स्थिति होय! व ही आपणांस आपल्या हयगयीमुळेंच प्राप्त झाली आहे. तेव्हां अशी हयगय ह्यापुढें न चालवितां आपणांस आपल्या राष्ट्राची सुधारणा करावयाची असेल तर आपण काय केलें असतां ती होईल ह्याचा शांतबुद्धीनें विचार करून उद्योगास लागलें पाहिजे. आपलें मुख्यतः नडतें कोठें? आपल्या अवनतीचें बिंग कशांत आहे? सद्यस्थितीकडे लक्ष देतां आपण कोणत्या दिशेनें प्रयत्न केला असतां तो सफल होईल? इ० गोष्टींचा प्रत्येकजण शांतपणें विचार करील तर आजची प्राप्त झालेली हीनस्थिति लवकरच नाहींशी होईल. स्वावलंबनाच्या जोरावर देशोन्नत्ति करून घेण्याची सांप्रत जी नवी हुरूप उत्पन्न झालेली आहे. त्याला योग्य वळण लावण्याची आज फार आवश्यकता आहे.

कोणी मनुष्य कोणत्याही मताचा असला तरी तो स्वावलंबनाचें महत्व कबूल करील. स्वावलंबन सर्व बाबतींत झालें पाहिजे. केवळ राजकीय बाबतींत स्वावलंबन दाखविलें ह्मणजे कार्य होईल अशांतला प्रकार नाहीं. तर सामाजिक, औद्योगिक, शिक्षणविषयक व धार्मिकबाबींतही स्वाबलंबनाची चळवळ चालविली पाहिजे. सर्व बाबतींत सरकारावर सर्वस्वी अवलंबून राहणें असें अयोग्य होय. तद्वत कालगतीवर सर्वस्वी अवलंबून राहणें योग्य होणार नाहीं. तसेंच सर्व बाबतींत सरकारापासून अगदीं अलग राहणें बरोबर नाहीं. त्याचप्रमाणें कालगतीवर पूर्णरीतीनें ताबा चालचालविणेंही बरोबर नाहीं; परंतु उद्योगाच्या जोरावर कालगतीचें कांहीं प्रमाणावर नियमन करतां येतें, ही गोष्ट अनुभवसिद्ध आहे. गति वाढवून काल कमी करतां येतो, हें सर्वांस मशहूर आहे. राजकीय बाबतींत सरकारावर सर्वस्वी अवलंबून राहणें जर योग्य नाहीं तर सामाजिक वगैरे बाबतींतही कालावर सर्वस्वी भिस्त ठेवून स्वस्थ बसणें योग्य होईल काय? राजकीय प्रगतीचा सामाजिक, औद्योगिक वगैरे बाबींतील प्रगतीशीं फारच निकटसंबंध असल्यामुळें त्या सर्वांकडे एक समयावच्छेदेंकरून लक्ष देणें अवश्य आहे.

सामर्थ्य हें सिद्धीचें मुख्य साधन आहे. सामर्थ्य नसेल तर नुसती बडबड कांहीं करूं शकणार नाहीं. सामर्थ्याची प्राप्ति केवळ उच्च उच्च महत्वाकांक्षा बाळगल्यानें अथवा नुसती बडबड केल्यानें व्हावयाची नाहीं.

आपल्या नेभळेपणाचीं कोणतीं कारणें आहेत, याचा नीट विचार केला तर सामाजिक, औद्योगिक वगैरे अनेक बाबतींत सुधारणा होणें अति अवश्य आहे असेंच आढळून येईल. एकाच बाबतींत सुधारणा करून घेण्यासाठीं आज आपली मोठी धडपड चालली आहे, परंतु ह्या धडपडींत मिळावी तसी सिद्धि आह्मांस मिळत नाहीं याचें कारण आमची तयारी सर्वबाजूंनीं कच्ची आहे, हेंच होय. आमच्या हिंदुस्थानदेशांत नानाधर्मांचें, नानापंथांचें, नानाजातींचे व नानामतांचे लोक आसल्यामुळें एकसमाज नाहीं ही दुर्दैवाची गोष्ट हाय. त्यांच्यांत एकराष्ट्रीयत्वाची कल्पना दृढमूल करण्याचें अत्यंत महत्वाचें पण नाजूक काम अद्यापि व्हावयाचेंच आहे. जातिमत्सरामुळें व विविधपंथांमुळें देशांतील निरनिराळ्या समाजामध्यें जो दूरीभाव आज कैक शतकें वास करीत आहे, त्याचें निर्मूलन झाल्याशिवाय राष्ट्रीयत्वाच्या कल्पनेचें मूळ खोल जाणें शक्य नाहीं. हल्लींच्या स्थितींत आपणांत पुष्कळ व्यंगें आहेत, तीं कासन टाकून आपण अनेक नवीन प्रघातांचा जपानीलोकांप्रमाणें स्वीकारही केला पाहिजे. धर्मप्रचार आणि रूढि हीं प्रकरणें फार बलवत्तर आहेत. त्यांत फेरफार करावयाचा तो दूरदृष्टि ठेवूनच केला पाहिजे. गौतमबुद्ध व शंकराचार्य ह्यांचीं चरित्रें आपण वाचलींच असाल. त्यांनीं प्रसंगोपात्त बजाविलेल्या कामगिरीवरून वरील ह्मणण्याची सत्यता आपल्या लक्षांत येईल. युरोपमध्यें अर्वाचीनकाळीं ज्यांनीं सामाजिक आणि धर्मसंबंधी सुधारणा केल्या त्यांच्या चरित्रांतसुद्धां आपणांस ह्या कामीं बोध घेतां येईल अशा पुष्कळ गोष्टी आहेत.

सारांश, देशस्थितीचा योग्य विचार करून अंधपरंपरेनें जे कांहीं वाईट आचार आपण आचरीत आहों, त्यांस फांटा देऊन देशाच्यासंबंधानें स्वतांची परिस्थिति ओळखून प्रत्येकानें आपलें काम जबाबदारीनें करण्यास शिकलें पाहिजे. हिंदुस्थानदेश हवा, पाणी, धान्य, वनस्पति, खनीजद्रव्य, प्राणीजद्रव्य इ० गोष्टींनीं परिपूर्ण असतां आपण असें अवनतस्थितींत कां असावें? व ह्याच्या उलट इंग्लंडदेशांत वरील बऱ्यांच गोष्टींची उणीव असतांही तो

देश प्रगतिमार्गावर चालत रहावा! ह्यांतील मर्म काय? हें आपण समजून घेतलें पाहिजे.

स्पेन्सरसाहेब ह्मणतात "राष्ट्र हें एक मोठें यंत्र आहे. यंत्रास जसे निरनिराळे भाग असतात, तसे राष्ट्ररूपी यंत्राचे व्यक्ति आणि समाज हे भाग आहेत. हे सर्व भाग एकत्र जोडून राष्ट्ररूपी यंत्र प्रगतिमार्गावर चालत असतें." आपल्या राष्ट्रांत अशारीतीनें सर्व भाग एकत्र होण्याला लोकांत खरें प्रेम उत्पन्न झालें पाहिजे, खरें बंधुत्व मनांत बाणलें पाहिजे, सर्वत्र समता नांदविण्याचे आटोकाट प्रयत्न झाले पाहिजेत, तरच राष्ट्रांत संघटनात्मक शक्ति उत्पन्न होऊन तें प्रगतिमार्गावर चालूं लागेल.

सार्वत्रिक शिक्षणाच्या अभावामुळें, आज कोणत्याही देशहिताच्या कार्यांत आपणांस बहुजनसमाजाचा असावा तसा जोराचा पाठिंबा नसतो. औद्योगिक, शारीरिक वगैरे शिक्षणांचा सुशिक्षित ह्मणविणारामध्येंही अभाव आहे. जोरदार मनोवृत्ति व स्वार्थत्यागासारिखे उदात्त गुण लोकांच्या ठिकाणीं फार क्वचितच दिसतात; अशी सांप्रतची वस्तुस्थिति आहे. तेव्हां अशा विषमस्थितींत आपला निभाव कसा लागेल व आपल्या उच्च महत्वाकांक्षा कशा पूर्ण होतील असा साहजिक प्रश्न उद्भवून अंतःकरण अगदीं व्यग्र होऊन जातें; परंतु सुधारणेच्या शिखरास पोंचलेल्या इतर देशांचा इतिहास आपण पाहिला ह्मणजे त्या देशांत लोकमताच्याठिकाणीं किती प्रचंडशक्ति आहे व त्यामुळें तेथें मोठमोठ्या उलाढाल्या कशा होऊं शकतात तें दिसून येतें व तेणेंकरून आपल्या मनांत आशासंचारक विचार उद्भवूं लागतात. हेच विचार स्वावलंबनाच्या बाण्याचे जनक होत. अंगीं सामर्थ्य असल्याशिवाय कोणतीही गोष्ट सिद्धीस नेतां येणें शक्य नाहीं. अर्थात् सामर्थ्य संपादणें हें पहिलें कर्तव्य होय. आमच्यांत ज्या उणीवां आहेत व ज्या उणीवांमुळें आह्मीं प्रगतीच्या शर्यतींत मागें राहिलों आहोंत, त्या उणीवां प्रथमतः दूर करण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. एकराष्ट्रीयत्वाची मजबूत पायाशुद्ध इमारत तयार करण्यासाठीं बहुजनसमाजामध्यें राष्ट्रीय अर्थात् राजकीय, सामाजिक, धार्मिक, औद्योगिक वगैरे सर्व बाबतींत आत्मज्ञानाचा प्रसार करण्याची अत्यंत अवश्यकता आहे. आमचे कित्येक पुढारी ह्या गोष्टीकडे दुर्लक्ष करून केवळ राजकीय बाबतींत एकराष्ट्रीयता स्थापन करण्याच्या

नादाला लागले आहेत. हा प्रकार दूर होऊन वर निर्दिष्ट केल्याप्रमाणें राष्ट्र-संघटनेला जितका लौकर आरंभ होईल तितकें चांगलें. योग्य सुधारणा करून धिम्मेपणानें एक एक पाऊल आह्मांस पुढें टाकतां आलें तरी बस्स आहे. जपानीलोकांनीं सर्वांची श्रेष्ठ पदवी आपल्या राष्ट्रास प्राप्त करून दिली. ती कांहीं वाचाळतच्या जोरावर प्राप्त करून दिली नाहीं. वर सांगण्यांत आलेंच आहे कीं, जपानदेशाची स्थिति आमच्याच देशाप्रमाणें होती. तेथील लोक आमच्याचप्रमाणें अज्ञानांधकारांत लोळत पडले होते; परंतु ती शोचनीयस्थिति जाऊन आज जपान प्रचंड राष्ट्र बनलें आहे. हें राष्ट्र बनविण्यास तेथील पुढारीच कारणीभूत झाले आहेत. आज पृथ्वीच्या पाठीवर जीं जीं ह्मणून प्रचंड राष्ट्रें आहेत तीं एकेकाळीं अशींच अज्ञानावस्थेंत होतीं; परंतु त्यांना त्यांच्या पुढाऱ्यांनींच सुदशेस आणिलें आहे. त्यांनींच त्यांचा उद्धार केला आहे. कोणत्याही राष्ट्राची सुधारणा होण्याला त्या राष्ट्रांतील मार्गदर्शक पुरोगामी मनुष्यें पुढें झाल्यावांचून लोकांचें लक्ष सुधारणा करण्याकडे लागत नाहीं.

( अपूर्ण )

## आईचें प्रेम.

( लेखक-भास्करराव डी. ओंकार पुणें. )

एक तरुण गृहस्थ अतिशय विषयांध बनला होता. त्याची नजर शेजारीं राहणाऱ्या एका सुंदर वेश्येवर गेली; परंतु तिला वश करून घेण्याइतका पैसा त्याच्याजवळ नव्हता व त्याची इच्छा तर दिवसेंदिवस प्रबल होत चालली. शेवटीं एक दिवस त्यानें असा निश्चय केला कीं, काय होईल तें होवो; आज तिच्या पायावर लोळण घेऊन आपला हेतु शेवटास न्यावयाचा. त्याप्रमाणें तो तिच्या घरीं जाऊन ह्मणूं लागला. " हे विश्वयोषिते, आमच्या-सारख्या तरुणांना सुखोपभोग, देऊन खुष करण्याचा तुझा धंदा असतांना माझीच का अवहेलना करतेस ? मला विनाकारण का छळतेस ? माझे प्राण तुझ्याशिवाय कासाविस होत आहेत. माझा किती अंत पाहणार ? "

ती ह्मणाली " तुझ्याजवळ माझा खर्च चालवण्यापुरता पैसा नाहीं तेव्हां ही गोष्ट होणार कशी ? तुझ्यासारख्या भिकारड्याच्या नादीं लागून मी

आपल्या जन्माची माती करून घ्यावी ! तूं येथून चालता हो कसा ! ” तरी तो नानाप्रकारें आर्जवें करून ह्मणूं लागला “ माझ्याजवळ पैसा नसला तरी तुझ्यावर अनिवार प्रेम आहे. तुला खोटें वाटत असेल तर परीक्षा पहा ! मी तुझ्यासाठीं काय वाटेल तें करीन. ” याची ही नेहमीची कटकट कायमची बंद कशानें होईल याचा विचार करून ती ह्मणाली “ असं असेल तर मी जी गोष्ट सांगेन ती तूं करशील. ” तो विषयांध मोठ्या आतुरतेनें म्हणाला “ काय करूं तें सांग. ती ह्मणाली माझ्यावर तुझें सर्वांपेक्षां प्रेम आहे ह्मणतोस तर आपल्या आईचें काळीज कापून आणून मला दे. ” मनुष्य कितीही विषयांध, अविचारी बनला तरी त्याची सत्सद्विवेक-बुद्धी आजिबात नष्ट होत नाहीं. तिनें सांगितलेलें क्रूर कृत्य करण्याला त्याचें मन धजेना. तो ह्मणाला-“ तूं याशिवाय वाटेल ती अट सांग. ज्या आईनें मला कडेखांद्यांवर खेळविलें, मला लहानाचा मोठा केला, माझें जेवण झाल्याशिवाय तोंडांत घांस घातला नाहीं, आजारी पडलों. असतां रात्रंदिवस माझ्या बिछान्याजवळ बसून माझी शुश्रूषा केली अशा प्रेमळ माऊलीचें काळीज मी कापून आणून तुला कसें देऊं ? यावर ती ह्मणाली “ तुझें माझ्यावर खरें प्रेम आहे किंवा नाहीं याची परीक्षा पाहावयास मजजवळ दुसरी तोड नाहीं. ज्याअर्थीं तूं हें काम करण्यास इतके आढेवेढे घेत आहेस त्याअर्थीं तुझें माझ्यावर मुळींच प्रेम नाहीं हें दिसतेंच आहे. ” शेवटीं त्या तरुणाच्या सत्सद्विवेक बुद्धीवर पापवासनेनें जय मिळविला-मातृ-प्रेमापेक्षां विषयाची किंमत त्याला अधिक वाटली. तो तेथून निघाला व घरीं येतांच आईच्या छातींत सुरा खुपसून काळीज बाहेर काढलें व तिच्या-कडे घेऊन आला; आणि ह्मणाला “ ही पहा माझ्या प्रेमाची साक्ष ! आतां तरी कबूल आहेस कां ? ” तो उंबरा ओलांडून आंत येतांच त्या दुष्ट वेश्येनें “ खुन ! खुन ! पकडा, ” असा मोठ्यानें पुकारा केला. त्याबरोबर त्या तरुणास पश्चाताप होऊन तो पळून जात असतां उंबऱ्यावर ठेंचाळून धाडदिशीं पडला. इतक्यांत त्याचे हातांतील रक्तानें निथळत असलेलें काळीज हळूंच प्रेमळ आवाजानें म्हणालें “ बाळा लागलें का बरें !! ”

वाचकहो, त्या तरुणाची हें ऐकून काय अवस्था झाली असेल बरें !!

———

## राष्ट्रगीत.

( चाल-जाऊं कामाला० )

वंदन हें तुजला । भारती । पौरुष जननीला ॥ ध्रु० ॥
राखुनि ब्रीदा, तुझ्या कामदा बनवूं या शीला ॥ आयुष्या ॥
मानमृताला, स्फूर्ति कृतीला प्रसाद तूं दिमला ॥ १ ॥
हृदयसंपुटीं सांठवुनी मिठि घालूं पदकमला ॥ तुझ्यागे ॥
तव दृढ भक्ती, अमोघ शक्ती दे यश कीर्तीला ॥ २ ॥
चंद्रसूर्य तव, देशकार्य नव भूतभविष्याला ॥ घडाया ॥
स्वतेज, निश्चिति, तरुण जागृती प्रेरिसि वृद्धाला ॥ ३ ॥
पूर्वज करिती, जी तव प्रीती लागलि वाढीला ॥ संप्रतिं ॥
तीच सुफुल्लित, करवितसे रत तुझिया स्तवनाला ॥ ४ ॥
राजमान्य अति भावी संतति समजो प्राण तुला ॥ साधों ॥
जयजयकारें, करात सारें देशोद्धाराला ॥ ५ ॥

" दर्भ. "

## नेहमीं ध्यानांत ठेवण्यासारखीं वचनें.

( संग्राहक—तात्या नेमिनाथ पांगळ-बार्शी. )

१ श्रीमंतास नम्रता दर्शवावी व गरीबांस मान द्यावा.

( ब. ना. तांगडे. )

२ आपलें हित, अहित करून घेणें आपल्याच स्वाधीन आहे.

३ मनुष्याला जगांत नानासंकटें व दुःखें प्राप्त होतात, परंतु त्यांपैकीं पुष्कळ टाळण्यासारखीं असून तो टाळित नाहीं. तसेंच त्याला पुष्कळ सुखेंहि प्राप्त होण्यासारखीं असतात, पण तो तीं प्राप्त करून न घेतां निष्कारण मनास उद्वेग करून घेतो हा मोठा त्याचा प्रमाद आहे. तो टाळण्यासाठीं वेळोवेळीं कर्तव्य बजावणें योग्य आहे.

४ वाईट दोष टाळण्यास आपली विचारशक्ती, आपल्या वडिलांची व मित्रांची सल्ला व आपणास प्राप्त झालेलें शिक्षण याची वारंवार मदत घेतली पाहिजे.

५ स्वार्थच वारंवार साधित बसणें ही मानवजीवितास शोभणारी गोष्ट नव्हे. ( बेकन. )

६ मनुष्य नानाशास्त्रें पठण करो किंवा नानादेवतांची पूजा करो आत्मज्ञानावांचून सर्व खटापटी व्यर्थ आहेत.

७ प्रतिदिवशीं मनुष्यानें आपल्या वर्तनाचें निरीक्षण करावें व तें पशू-तुल्य होतें कां सत्पुरुषाप्रमाणें होतें हें पहात जावें.

८ सत्कार्य करण्याची सोन्यासारखी संधी आली असतां ती दवडूं नये.

९ नेहमीं चिंताक्रांत असणें जरी वाजवी नाहीं तरी सदैव बेफिकीरपणानें वागणेंहि चांगलें नाहीं. नेहमीं सावध वागणें हेंच श्रेयस्कर आहे. अमुक एका कामांत चूक होणार नाहीं अशी खात्री असली तरी देखील सावधानता ठेविली पाहिजे.

१० आपल्या सद्गुणाचा उपयोग करण्यांत अधिक सावधपणा ठेवला पाहिजे. ( लार्ड चेस्टरफील्ड. )

११ दुर्गुणामुळें मनुष्य स्वतंत्र होतो असें कित्येकांचे ह्मणणें आहे पण तें व्यर्थ आहे. कारण तो षड्रिपूंपैकीं ज्याच्या आधीन असतो त्याचा दास बनतो. दास्यत्व आल्यावर स्वातंत्र्य कोठलें?

१२ सद्गुणी होण्यास पुरुषार्थ पाहिजे व जो पुरुषार्थ गाजवितो तोच खरा स्वतंत्र.

१३ रात्रीं लौकर निजावें. पहांटेस पक्षी उठतात तेव्हां उठावें. नेहमीं आनंदीवृत्ती ठेवावी पण विनय सोडूं नये. गंभीरतेनें वागावें पण उदास असूं नये. धैर्य धरावें पण अविचारी असूं नये. पोषाख स्वच्छ असावा. आहार परमित व पथ्यकर असावा. मनोरंजनाचे विषय इतरांस अपाय-कारक नसावेत. लिली.

१४ विचारशील लोकांना संसार हास्यरस नाटकाप्रमाणें वाटतो व विकारवश लोकांना शोकरसप्रधान नाटकाप्रमाणें वाटतो. वॉलपोल.

१५ संसार सुखमय किंवा दुःखमय बनाविणें हें आपल्या हातीं बऱ्याच अंशीं असतें. सचोटीनें तो सुखप्रद होतो व अप्रामाणिकपणानें तो दुःख-प्रद बनतो.

१६ आरोग्य, बल, संपत्ती हीं अनुकूल असतां मदोन्मत्त होऊं नये व विपत्ती आली असतां धैर्य सोडूं नये.

१७ सद्गुणानें वर्तन ठेवणें हेंच सुखसाधन व अनीतीनें वागणें हा सुखनाश होय.

१८ संसारांत मनुष्याला यश प्राप्त होण्यास बुद्धीपेक्षां धोरण असणें अवश्य आहे.

१९ दुसऱ्यास संतुष्ट करण्याची संधी आली असतां ती दवडूं नये व सर्वांशीं सौजन्यानें वागावें; कारण त्यापासून पदरचें न खर्चतां सर्व गोष्टी अनुकूल होतात.

२० ज्या गोष्टी द्रव्य खर्चूनही मिळत नाहींत त्या केवळ सौजन्यानेंच प्राप्त होतात.

२१ बर्ले एकदा एलिझाबेथ राणीला ह्मणाला, आपल्या लोकांस सौजन्यानें कां एकवेळ वश करून घेतलें कीं, मग सहज त्यांचें धन व स्वतः तेहि आपणास लाधतील. जेथें शक्तीचा इलाज चालत नाहीं तेथें युक्ती योजावी.

२२ एखाद्यानें आपल्याविषयीं फाजील प्रेम दर्शविलें तर त्यावर एकाएकीं अति विश्वास ठेऊं नये.

२३ मित्रत्व दर्शविल्यावरून एखाद्यास आपला जिवलग मित्र समजूं नये व क्षुल्लक कारणावरून एखाद्यास शत्रूहि मानूं नये.

२४ दुसऱ्याचें भाषण प्रेमानें ऐकिलें तरच आपली सल्ला घेण्यास दुसरे येतील.

२५ आपण लहान वयांत असतांना बोलण्यास मान मिळेल अशी आशाच धरूं नये. फक्त सुव्यवस्थित विचार प्रकट करित जाऊन दुसऱ्याचें ऐकत असावें.

२६ रागावलेल्या माणसावर उलट न रागावतां त्याला मृदु उत्तर दिल्यानें त्याचा राग शांत होतो.

२७ थट्टेच्या मौजेखातर किंवा क्षुल्लक कारणावरून मित्र गमावणारा मूर्ख होय. तसेंच अनोळखी मनुष्याची खोडी करून त्याला आपला शत्रू बनविणें मूर्खपणाचें कृत्य होय.

( अपूर्ण. )

## कैलास मानससरोवर.

नेपाळच्या पश्चिम हद्दीवरील टियू घाटानें गेलें ह्मणजे तेथून मानससरोवर ७५ मैल आंत आहे. इतका प्रवास करण्यास जुलै महिन्यांत बर्फ कमी असतें ह्मणून सुमारें २॥ दिवस लागतात. कैलास मानससरोवरापासून दोन दिवसांच्या रस्त्यावर आहे. कैलासाची उंची समुद्राच्या सपाटीपासून सुमारें १६००० फूट आहे. शिखरावर बर्फ सदोदित असतें. या प्रांतांत याक ( वनगाई ) चांखू ( पांढरा चित्ता याचें अंग पांढरें असून त्यावर काळे पट्टे असतात. ) व हरणें असतात. मानससरोवरांत हंस असतात त्यांचा रंग तांढरा असून चोंच व डोळे लाल असतात. आकारानें ते बदकायेवढे असतात. महाकवि कालिदासानें केलेलें हंसाचें वर्णन अगदीं यथार्थ आहे. या तीर्थवर्णनाची माहिती सन १९०८ सालीं धुळें येथील गृहस्थ गजानन पांडुरंग नाटेकर हे स्वतः मानससरोवरास गेले होते. त्यावेळीं त्यांनीं हिमाचलेश्वर हंस ) या सहीने केसरी वगैरे पत्रांतून प्रसिद्ध केली आहे ती फारच विस्तृत आणि चांगली आहे. त्यांना एकंदर खर्च सुमारें १७५ रुपये लागला. मानससरोवराचें क्षेत्रफळ सुमारें २६ चौरसमैल आहे. ज्यांना द्रव्यानुकूलता असेल त्या महात्म्यांनीं जन्मास येऊन आपल्या परमपावन आणि कष्टसाध्य तीर्थाचें अवलोकन करावें.

नुकतेच डा० स्पेन हेडिन नांवाचे युरोपियन शोधकही या क्षेत्रास जाऊन आलेले आहेत. त्यांनी मानससरोवराचें वर्णन फारच बहारीचें केलें आहे. ते ह्मणतात–" दोन अत्युच्च प्रचंड पर्वतांच्या रांगाच्या मध्यें आणि कैलास-पर्वताच्या दक्षिणेस मानससरोवर पसरलेलें आहे. त्याचा आकार वाटोळा आहे. त्याच्या अनुपम शोभेचें वर्णन शब्दांनीं करितां टेणें केवळ अशक्य आहे. उन्हाचेवेळीं त्याचें अत्यंत स्वच्छ पाणी आरशासारखें निर्मळ दिसतें. सकाळीं आणि संध्याकाळीं तर त्याची शोभा सूर्यकिरणें त्याजवर पडलीं ह्मणजे फारच अपूर्व दिसते; पण रात्रीं जेव्हां चंद्राचा स्वच्छ प्रकाश त्याच्या पाण्यावर पडतो तेव्हां तर मानससरोवराचा प्रदेश केवळ स्वर्गतुल्यच दिसतो. असा सुरम्यप्रदेश जगावर दुसरीकडे कोठेंच आढळणार नाहीं; पण तेथें जेव्हां वादळ होतें तेव्हां याच परमशीतळ आणि स्वच्छ अशा मानस-

सरोवराच्या पाण्याच्या घराएवढ्या उंच लाटा उसळूं लागतात. सूर्योदयाच्या आणि सूर्योस्ताच्यावेळीं त्याच्या दोन्हीबाजूंच्या कैलास आणि मांधाता पर्वतांच्या शिखरांवर त्याचीं सोनेरी किरणें चमकूं लागतात तेव्हांच्या त्यांच्या शोभेचें यथार्थ वर्णन करण्यास उत्तम कवीला मोठें काव्यच लिहावें लागेल." असो. प्रसिद्ध बाण आणि कालिदास कवींनीं केलेलें मानससरोवराचें वर्णन अगदीं यथार्थ आहे.

प्राचीनकाळीं ही यात्रा करणें फार कठीण काम होतें. आतां तसें नाहीं. १०।१५ दिवस तिबेटांत घालविल्यानें ही यात्रा करण्यास कठीण जाणार नाहीं. तेथील लोक यात्रेकरूंना चांगली मदत करितात.

हरिद्वार रेलवेस्टेशनापासून गंगोत्री व केदारनाथ सोडल्यावर श्रीपुटी बद्रीनारायणापासून जोतिर्मठ १६१ मैल लांब आहे. येथपर्यंत अलिकडे घोडा जाण्याची चांगली सोय झाली आहे. येथपर्यंत बद्रीकेदारची यात्रा करणारे सर्व लोक जात असतात. नंतर दुधगंगेच्या किनाऱ्यानें ३० मैल गेल्यावर कैलासपर्वताच्या पायथ्याशीं मनुष्य जातो. पुढें चढउतार करतां करतां अजमासें ८० मैल ह्मणजे १२ दिवसांचे वाटेवर भुलिंगमठ लागतो. येथें पूर्वकालच्या पुष्कळ मूर्ति आणि मंदिरें आहेत त्या पहात पहात आणि कैलासपर्वताचें मनोहर वैभव अवलोकन करीत करीत श्रांत झालेला प्राणी विश्रांतदायक मानससरोवरास पावतो. असी ही माहिती आह्मी थोडक्यांत येथें दिली आहे तिचा एखाद्याला तरी उपयोग होवो.

---

## उद्योगधंदे.

**शिसपेन्सिली करण्याची कृति**—'इंडिया हौस मॅगेझिन' च्या आगष्टच्या अंकांत शिसपेन्सिली करण्याच्या कृतीसंबंधानें एक लेख आला आहे. त्यांतला कांहीं भाग वाचकांना उपयुक्त होईल असें वाटल्यावरून तो खालीं देत आहों.

शिसपेन्सिलीच्या कारखान्यांत लाकूडखातें; प्लंबगो किंवा शिसेखातें, रंगखातें व छाप मारण्याचें खातें अशीं चार खातीं असतात. त्यांपैकीं शेवटचीं दोन फारशीं महत्वाचीं नसतात, पहिलें सर्वांत महत्वाचें असतें.

लांकूडखातें—कापण्यास सुलभ आणि मऊ असें कोणतेंही लांकूड पेन्सिलींना चालतें; परंतु पाइम आणि सिडर या झाडांचें लांकूड बहुतेक कारखान्यांत पसंत केलें जातें. पहिल्यानें लांकडें कारखान्यांत आणल्यावर तीं सोलून, चौपट करून त्यांचे इच्छित लांबीचे तुकडे करितात; नंतर पेनसिलीच्या जाडीच्या अर्ध्याहून थोड्या जास्त जाडीच्या फळ्या कापतात. फळ्या कापण्याची क्रिया झाल्यावर त्यांत शिशाच्या कांड्या बसतील अशा लहान खोवण्या पाडतात. या खोवण्यांत शिशांच्या कांड्या घालून, नंतर त्यावर दुसऱ्या फळ्या पाण्यांत जिलेटिन शिजवून त्यानें चिकटवून टाकितात. अशा जितक्या फळ्या चिकटवावयाच्या असतील तितक्या चिकटवून झाल्यावर, एका मोठ्या प्रेसमध्यें त्या सर्व दाबून तेथें सुमारें दहा ते बारा तास राहूं देतात. इतक्यावेळांत त्या एकमेकांस पक्क्या चिकटून वाळतात. वाळल्यावर पेनसिली करण्याकरितां एक एक शिशाची कांडी तिच्या सभोंवतालच्या लांकडासह करवतीनें वेगळी करतात व तिला वाटोळा अथवा अष्टपैलू आकार इच्छेप्रमाणें देतात. आकार दिल्यावर एकेका पेन्सिलीची एकेक बाजू पहिल्यानें कापतात व मागून दुसरें टोंक लांबीबरोबर मोजून नंतर कापतात. इतक्या क्रिया झाल्यावर त्या रंगखात्यांत जातात. तेथें प्रथम जो रंग द्यावयाचा असेल तो पाणी व खडू यांत मिसळून पेन्सिलींना देतात. त्यावर अलकोहोलमध्यें लाख गिरवून त्याचें एक पूट देतात. पूट वाळल्यावर फ्रेंचपॉलिसचा सफाईदार हात देतात.

प्लंबॅगो खातें-कारखान्यांत उपयोगाकरितां जो प्लंबॅगो आणतात तो बहुधा भुकटीच्या स्वरूपांत असतो. पहिल्यानें ती भुकटी स्वच्छ धुतात, नंतर प्लंबॅगो अथवा ग्रॅफाइटबरोबर चिकणमाती मिसळण्यापूर्वीं तीही स्वच्छ धुवावी लागते. तींत खडा किंवा रेंव नाहीं याबद्दलही काळजी घ्यावी लागते. नंतर चिकणमाती व प्लंबॅगो एका लाकडी खलांत इच्छित प्रमाणांत मिसळून दुसऱ्या एका लांकडी बत्त्यानें त्याचा एकजीव करतात. एकदां एकजीव झाल्यावर तो यांत्रिक सोऱ्यांत घालून त्याच्या कांड्या तयार करतात. कांड्या तयार झाल्यावर त्या चांगल्या भाजतात. भाजून झाल्यावर त्या खोवण्यांत घालण्याजोगत्या होतात.

पेनसिली मोजण्यासही एक गमतीदार युक्ति योजण्यांत येते. एका फळीवर सुमारें एक ग्रुस पेनसिली बसतील अशा खोवण्या पाडलेल्या असतात. पुष्कळशा पेनसिली घेऊन त्या वरील फळीवर पसरतात व लागलेंच एक ग्रुसाचें माप होतें. नंतर त्यांचीं बंडलें बांधून विकण्यास पाठवितात.

**रंगीत पेनसिलीचे घटक** जर्मन तांबड्या रंगाची पूड १०, जपान रेड १६०, चिकणमाती ७५०, पॅरॅफिन १५०, निळी माती ७५०, पॅरॅफिन १५०, पीकॉक ब्लू ६०, पॅरॅफिन पहिल्यानें वितळवून नंतर त्यांत रंग मिसळतात नंतर त्यांत माती मिसळून लांकडी दांड्यानें ढवळतात. नंतर रोलमध्यें घालून त्याच्या कांड्या बनवितात.

**काळ्या पेनसिलींचें घटक**- प्लंबॅगो ३५०, माती ७५०, बोरॅक्स ६० पाणी प्रथम कढवून नंतर त्यांत प्लंबॅगो यांचें मिश्रण मिसळतात.

**यंत्रांची किंमत**—१ खोवण्या पाडण्याचें यंत्र. १ आकार देण्याचें यंत्र. १ पॉलिश करण्याचें यंत्र. १ स्टँप ह्मणजे छाप मारण्याचें यंत्र. २ कांड्या करण्याचे प्रेस या सर्व यंत्रांची २१२ येन ह्मणजे अजमासें ५३० रु. आहे. वरील लेख टोकियो येथील एम्. सुबाराव यांनीं लिहिला आहे.

ज्या.

**कोसा**—मध्यप्रांतांतील छत्तिसगड जिल्ह्यामध्यें एकप्रकारचें रेशीम एका किड्यापासून मिळतें त्याचें वस्त्र विणतात. त्यास कोसा असें ह्मटलें जातें. ह्या किड्याचें घरटें अंड्याकृति असतें. त्या किड्यास ‘ कोसला ’ ह्मणतात. ह्या कोसल्यावर केंसासारखे लांब तंतु गुंडाळलेले असतात. ह्या किड्यांचें खाद्य झाडांचीं पानें आहे. त्यांस बोरीचीं व तुतीचीं पानें फार आवडतात; ह्मणून तीं झाडें ज्या प्रांतांत असतात तेथें त्यांची उत्पत्ति होते. ह्या किड्यांचा कोसले तयार करण्याचा हंगाम आश्विन व कार्तिकांत असतो. थंडीच्या दिवसांत त्यांचीं वस्त्रें विणून तयार होतात. ह्या दिवसांत केलेले कोसच उत्तम समजले जातात. या किड्यांची पूर्ण वाढ झाल्यावर त्याच्या शरिरांतून जो तंतु निघतो त्यांस तो आपल्या शरिराभोंवतीं गुंडाळून त्याचा कोसला बनवितो. ह्यांत तो २।३ आठवडे राहून त्याचें रूपांतर होऊन त्यांस पंख फुटतात. पंख निघण्यापूर्वीं हा कोसला काढून न घेतला तर तो किडा कोसला फोडून निघून जातो, मग कोसला निरुपयोगी होतो. कोसला

काढल्यानंतर तो अधणाचे पाण्यांत टाकतात व त्याचे तंतु काढितात. हे फार सावधगिरीनें काढावे लागतात. एका कोसल्यांत १००० गज लांबीचा तंतु निघतो. नंतर त्याची वस्त्रें विणतात. हीं वस्त्रें बिलासपूर, आसाम व बंगालप्रांतांत कित्येकठिकाणीं बनवितात. त्यामध्यें बिलासपूरचीं वस्त्रें टिकाऊ व खुमासदार असतात. त्यांत कोणत्याहीप्रकारची भेसळ करीत नाहींत. ह्या वस्त्रासच कोसा असें ह्मणतात. सु वि

कलिंगडाची लागवड–" पनवेल तालुक्यांत कलिंगडाची लागवड मोठ्या प्रमाणावर होत असून त्या तालुक्यांतील लोकांची पद्धत बरेच लोकांना उपयोगी पडण्यासारखी आहे. पनवेल तालुक्यांतील कलिंगडाची लागवड करणारे लोक बरेच दिवस पड पडलेल्या, साधारण चिकट अशा जमिनी पसंत करितात. नंतर त्यांची नांगरणी करून त्यांजवर मैंद ( हा एक जाड लांकडाचा ६ हात लांब व एक हात रुंद व एक हात उंच असा तुकडा असतो. ) फिरवितात. त्याच्यायोगानें नांगरून निघालेलीं ढेंकळें साफ फुटून चुरा होतो. पुन्हां नांगरणी करून त्याजवर मैंद फिरवितात, अशारीतीनें आणखी एकवेळ करून जमीन भुसभुशीत झाल्यावर शेत तयार करण्यास लागतात. कदाचित् ढेंकळें राहिल्यास तीं मोगऱ्यानें मोडतात. अशारीतीनें शेत तयार झाल्यावर आळें करण्यास सुरुवात करितात. प्रत्येक आळें ६-६ फुटांवर तयार करितात. आळ्यांचा घेर ( परीघ ) ५६ इंच असतो. आळें फार खोल न करितां साधारण चांगल्यारीतीनें १२ पौंड वजनाचें पाणी मावेल अशारीतीचें करितात. आळीं तयार करतेवेळीं आळीं करणारापाशीं सहा फूट लांबीची काठी असते. त्यानें मापून आळीं तयार झाल्यावर त्यांमध्यें गोंवरी पसरून ती त्या आळ्यांतच भाजतात. अशारीतीनें गोंवरी भाजन झाल्यावर हातानें सारखी पसरून त्यमध्यें सात बिया वांटोळ्या लावितात. बियांची निवड फार काळजीनें हे लोक करितात. वाईट बीं कधींच उपयोगांत आणित नाहींत. बिया लावण्याचा हंगाम साधारण अक्टोबर नवंबरमध्येंच असतो. नवंबरचे पुढें लागण करीत नाहींत. बिया लाविल्यानंतर शेणाचा बारका भुसा टाकितात, आणि त्याच दिवशीं एका घागरींत दोन वेळीं या प्रमाणानें भिजवितात. ( घागर सुमारें २५ पौंडांची असते. ) पुढें दोन दिवस पाणी घालीत नाहींत. चौथे दिवसापासून

पाणी देण्यास सुरुवात करितात, ती प्रत्येक घागरीमध्यें सहा आळीं भिजवितात. अशारीतीनें पाणी पहिला कुटा घालीपर्यंत देत असतात. पहिला कुटा घालावयाचा तो आळी लाविल्यापासून बाविसावे दिवशीं घालितात. हा कुटा टोमी नांवाचे मासळीचा असतो तो दोन आणे मण किंवा सवाअकरा रुपये खंडीप्रमाणें मिळतो. पहिला कुटा दिल्यावर एका घागरीमध्यें तीन आळीं भिजवितात व अशारीतीनें पाणी सारखें तीन दिवस देतात. पुढें चौथे दिवशीं पाणी न देतां एका घागरीमध्यें तीन आळीं अशारीतीनें दुसरा कुटा घालीपर्यंत पाणी देत असतात. दुसरा कुटा बिया लाविल्यापासून एकेचाळिसावे दिवशीं देतात व पाणी प्रत्येक घागरीमध्यें तीन आळीं याप्रमाणें तिसरा कुटा देईपर्यंत द्यावयाचें. तिसरा कुटा बिया लाविल्यापासून पांसष्टावे दिवशीं देतात. त्यावेळीं झाडांना साधारण लिंबाएवढीं फळें येतात. कुटा दिल्यावर वरीलप्रमाणें सारखें तीन दिवस पाणी देतात, चौथे दिवशीं पाणी देत नाहींत. पुढें अठरा दिवस सारखें पाणी द्यावयाचें. तें प्रत्येक दिवशीं सकाळीं एका घागरीमध्यें दोन आळीं आणि संध्याकाळीं एका घागरीमध्यें तीन आळीं याप्रमाणें घालतात. अशारीतीनें पाणी देऊन झाल्यावर वेलाचीं फळें मोठीं होऊं लागतात." स. दे. बि.

काजू-गोंवेंप्रांतामध्यें सर्वठिकाणीं काजूबीजाचें उत्पन्न फारच होत असतें याचें कारण त्या प्रांतातील लोकांनीं आपआपल्या ताब्यांत असलेल्या प्रत्येक डोंगरावर संपूर्ण ठिकाणीं काजूंच्या झाडांचो लावणीं केलेली आहे. त्यायोगें तेथें दिवसेंदिवस काजूबीजाचें उत्पन्न होत चाललें आहे. हल्लीं दहा पंधरा वर्षें झाली, गोमांतकाकडून मालवण येथें दररोज पांचसात गलबतें काजूच्या बीजानें भरून येत असतात. त्या कच्चा बिया भाजून त्यांतील गर तयार करण्याचे कामास मालवण येथें हजार पंधराशें बायकापुरुष नित्य गुंतलेले असतात, आणि तयार होत असलेले काजूगर व्यापारी लोक दररोज गलबतांतून मुंबईस पाठवितात; कारण अलिकडे दिवसेंदिवस त्या मालाचा खप युरोपमध्यें फारच होऊं लागल्यानें पूर्वीपेक्षां काजूगराचा दरही फारच वाढत चालला आहे. आमच्या रत्नागिरी जिल्ह्यांत पडीत जमीनी पुष्कळ असून डोंगर तर सर्वठिकाणचे उघडेच आहेत. त्या डोंगरावर व इतर पडीत जमीनीवर गोमांतकांतील लोकांनीं जशी आपआपल्या ताब्यांतील

जमिनींत काजूच्या झाडांची लावणी केली आहे त्याप्रमाणें इकडचे लोक करूं लागतील तर त्यासहि पुष्कळ फायदा होणार आहे. काजूंचीं झाडें कोणत्याहि जमिनीच्या ठिकाणीं होत असतात. त्याची लागवड करण्याची रीत येणेंप्रमाणें: प्रत्येक जून महिन्यामध्यें काजूबीज जमिनीच्या वीतभर खांचींत ३५।४० कदमाच्या अंतरानें लावावें. दोन महिन्यांनीं तें जमिनींत वाढूं लागेल. नंतर पावसाळा संपल्यावर त्या काजूरोपांस चारदोन दिवसांनीं थोडेंथाडें पाणी फक्त एक वर्षभर द्यावें. नंतर शिंपण्याची गरज नाहीं, तीं झाडें आपोआप वाढत असतात. काजूंच्या झाडाचा विस्तार फार मोठा जमिनीसरपट होत असून त्या झाडांस फळेंहि विपु येत असतात. फळें खाण्यास गोड असून त्यांच्या बिजांतील गर मधूर असल्यानें त्याचा मेवामिठाई, पाक फारच उत्तम होत असतो. बाहेरगावीं कोणास बीं पाहिजे असेल तर योग्य किंमतीनें पाठविण्यांत येईल.

बकूल.

---

## पुष्कळ मुलांचा एकदम प्रसव.

बव्हेरिया प्रांतांत मिसेस हश ह्या नांवाची एक बाई राहत होती. तिचा नवरा घरचा गरीब असलेमुळें ह्या बाईस शेतांत कामकाज करण्यास जावें लागत असे. हिला २७ वें वर्ष लागलें असतां ही बाई गरोदर झाली, आणि प्रसव होण्याचे दिवस जवळ आले. सन १८८९ त ती बाई एके-दिवशीं शेतांतून काम करून आली, दोन तास झाले नाहींत तों प्रसूत होऊन तिला एकामागून एक अशीं १०।१० मिनिटाच्या अंतरानें सात मुलें झालीं!! अशीं भराभर एकदम जन्मलेलीं हीं मुलें पाहून बाईचा नवरा व इतर नातलगमाणसें अगदीं घाबरून गेलीं. ह्या संकटांतून ही बाई पार पडते किंवा ह्यांतच हिचा शेवट होतो, ह्या काळजींत तीं सर्व माणसें निमग्न झालीं; परंतु ही स्त्री इतकी बळकट होती कीं, इतकीं मुलें झालीं तरी, ती मुळींच थकली नाहीं! एवढेंच नव्हे परंतु अखेरचें मूल झाल्यापासून ४८ तासांच्या आंत ती घरांतून हिंडूंफिरूं लागली. ह्या बाईस जीं सात मुलें झालीं त्यांपैकीं चार मुलगे आणि तीन मुली होत्या; आणि ही सर्व प्रजा जिवंत राहिली असून त्यांतून कोणीही तात्काळ जाया झालें नाहीं.

## रमणीय वेंचे.

( ८ वे अंकावरून पुढे चालू. )

अश्व रूढं गर्विष्ठं दृष्ट्वा खट्व रूढं रजस्वलाम् ।
सकेशां विधवां दृष्ट्वा सचल स्नानमाचरेत ॥ ९८ ॥

घोड्यावर बसलेला मनुष्यास, खाटवर बसलेला रजस्वला ( विटाळशी ) नवरा मेलेली सकेशा विधवा स्त्री, अशीं दृष्टीस पडलीं असतां सचैलस्नान करावें.

स्थान भ्रष्टा न शोभन्ते दन्ताः केशा नखा नराः ।
स्थान भ्रष्टाः सुशोभन्त सिंहाः सत्पुरुषा गजाः । ९९ ॥

दांत, केश, नखें आणि पुरुष हीं आपल्या स्थानांतरून दूर झालीं असतां शोभत नाहींत, पण सिंह, सत्पुरुष आणि हत्ती हीं स्थिरस्थित शोभतात.

सुखस्यानन्तरं दुःखं दुःखस्यानन्तरं सुखम् ।
न नित्यं लभते दुःखं न नित्यं लभते सुखम् । १०० ॥

सुखानंतर दुःख आणि दुःखानंतर सुख हीं येणारच, निरंतर सुखाचा लाभ होत नाहीं किंवा दुःखही होत नाहीं.

अश्वस्य लक्षणं वेगो मदो मातङ्गलक्षणम् ।
चातुर्यं लक्षणं नार्या उद्योगः पुरुष लक्षणम ॥ १०१ ॥

धांवणें हें घोड्याचें लक्षण आहे, मद हा हें हत्तीचें लक्षण आहे चातुर्य हें स्त्रियांचें लक्षण आहे; आणि उद्योग हें पुरुषाचें लक्षण आहे.

कार्यार्थी भजते लोके यावत्कार्यं न सिध्यति ।
उत्तीर्णे च पर पारे नौकया किं प्रयोजनम् ॥ १०२ ॥

जोंपर्यंत आपलें कार्य साधलें नाहीं, तोंपर्यंत कार्यसाधू लोक हांजी हांजी करतात; जलाशयाच्या पार गेल्यावर मग नौकेची जरूरी रहात नाहीं.

लालनाद्बहवो दोषा स्ताडनाद्बहवो गुणाः ।
तस्मात्पुत्रं च शिष्यं च ताडयेन्नतु लालयेत् ॥ १०३ ॥

लाड केल्यानें पुष्कळ दोष जडतात, आणि शिक्षा केल्यानें सद्गुण अंगीं येतात, याकरतां गुरूनें शिष्याला आणि बापानें मुलाला ( योग्यप्रसंगीं ) शिक्षा करीत असावें. लाड करूं नयेत.

शुचि भूमिगतं तोयं शुचिर्नारी पतिव्रता ।
शुचिः क्षेमकरो राजा संतोषी ब्राह्मणः शुचिः ॥ १०४ ॥

जमिनीत असलेलें पाणी शुद्ध, त्याप्रमाणें पतिव्रता स्त्री शुद्ध होय, प्रजापालन करणारा राजा शुद्ध होय, आणि जो ब्राह्मण संतोषी तो शुद्ध होय

प्रातःस्नानं गवां सेवा आरामः पुष्पवाटिका ।
माता पित्रोश्च शुश्रूषा शास्त्राय च सुखाय च ॥ १०५ ॥

सकाळीं स्नान करणें, गाईची सेवा करणें, फुलझाडें लावणें, मातापितरांची सेवा करणें, हीं केलीं असतां शास्त्राज्ञेनें केल्याप्रमाणें होत असून त्यांपासून तत्काल असें सुखही प्राप्त होतें.

भिक्षो मांसनिषेवणं किमुचितं किं तेन मद्यंविना ।
मद्यं चापि तव प्रियं प्रियमहो वाराङ्गनाभिः सह ॥
वारस्त्रीरतये कुतस्तव धनं द्यूतेन चौर्येण वा ।
चौर्यद्यूतपरिश्रमोऽपि भवतो भ्रष्टस्य का वा गतिः ॥ १०६ ॥

कोणीएक संन्यासी मांस खात असतां त्यास एक जण विचारतो, हे संन्याशा तुला मांस खाणें उचित कसें ? त्यावर संन्यासी ह्मणतो, अरे मी तें मद्याशिवाय खात नाहीं. हें ऐकून गृहस्थ पुनः ह्मणाला, मद्यही तुला आवडतें तर ! संन्यासी ह्मणाला, अरे हें काय विचारतोस ! तें तर मला फार आवडतें; पण मी तें एकटाच पीत नसून वेश्येसमागमें पितों ! ! गृहस्थ ह्मणाला, तूं वेश्येशीं रमणारा आहेस तर, पण तिला देण्याला तुझेजवळ द्रव्य कुठचें ? संन्यासी ह्मणाला तें मी चोरी करून अथवा जुगार खेळून मिळवितों. गृहस्थ ह्मणाला, वाहवा ! ! एकूण आपल्या अंगीं चोरी आणि जुगार ह्या दोनीही क्रिया आहेत तर; जो भ्रष्ट झाला त्याला गती कोणती ?

कृतेच रेणुका कृत्या त्रेतायां जानकी तथा ।
द्वापारे द्रौपदी कृत्या, कलौ कृत्या गृहे गृहे ॥ १०७ ॥

कृतयुगांत रेणुका कृत्या ( कलह लावणारी ) क्षत्रियकुळाचा विध्वंस करण्यास कारण झाली. त्रेतायुगांत जानकी ( सीता ) झाली रावणादिकांचा नाश करण्यास; द्वापारांत द्रौपदी उत्पन्न झाली, कीं जिच्यायोगें कौरवकुळाचा निःपात झाला, आणि सांप्रत कलियुगांत तर घरोघरी कृत्याच कृत्या आहेत.

अक्षराणि समानानि वर्तुलानि घनानि च ।
परस्पर विलग्नानि तरुणी कुचकुम्भवत् ॥ १०८ ॥

अक्षरें कशीं असावीं ? न पुसण्यासारखीं एकासारखी एक, वाटोळी, जाड आणि एकमेकांस न लागलेलीं, जशीं तरुणस्त्रियेच्या कुचासारखीं असावीं.


को निर्दग्धस्त्रिपुर जयिना कश्च कर्णस्य हन्ता ।
नद्याः कूलं विघटयति कः कः परस्त्रीरतश्च ।
कः संनद्धो भवति समरे भूषणं किं कुचानां ।
किं दुःसङ्गाद्भवति महतां मानपूजापहारः ॥ १०९ ॥

शंकराच्या दृष्टीनें जळला कोण ? कर्णाला मारणारा कोण ? नदीचें तीर फोडणारा कोण ? परस्त्रीठायीं रमणारा कोण ? युद्धांत समोर कोण उभा राहतो ? स्त्रियांच्या स्तनांचें भूषण कोणतें ? श्रेष्ठांना क्रोध कशानें येतो ? या सर्वांचें एकाच वाक्यांत उत्तर मानपूजापहार. त्यांतील पहिलें आणि शेवटचें अक्षर एकत्र केलें असतां वरील प्रश्नांचीं उत्तरें अनुक्रमें मिळतात. जसें मारः ( मदन ) नर ( अर्जुन ) पूर ( नदीस पावसानें आलेलें मोठें पाणी ) जारः ( परस्त्रीरत ) हारः ( माला ) शेवटच्या चरणांतील प्रश्नाचें उत्तर हें सर्व मिळून होतें:–मानपूजापहारः ह्मणजे श्रेष्ठाचा मान आणि पूजा यांचा अपहार केला असतां– )

( अपूर्ण. )

# लोकमित्र.

## श्री कृष्णस्वामी ऊर्फ दत्तमहाराज.



" संसारीं पुरुषार्थप्रासादा साधु संग हा पाया " मोरोपंत.

अधोगतीच्या विपत्तिमय कर्दमांतून, राष्ट्राला वर काढण्यास धर्मजागृतीवांचून अन्य साधन नाहीं. हेंच महत्कार्य दयाळू परमेश्वर संतांकरवीं घडवून आणतो. अर्थात् संतांचे अवतार ह्मणजे राष्ट्रोदयाचा प्रभातकाल होय. याच उत्साहजनक कालांत धार्मिक साधूंच्या ईश्वरी प्रेरणेनें समाजांत चित्तशुद्धि, धर्मश्रद्धा, ईशनिष्ठा, कर्तव्यतत्परता, राष्ट्रबंधुत्व, दृढनिश्चय इत्यादि स्पृहणीय गुणांचें हळूहळू बीजारोपण होऊन, आपल्या परमपूज्य धर्मासाठीं, स्वावलंबनाची अवश्यकता भासूं लागते. पाहिजे काय हें समजतें, पण तें मिळवावें कसें याचाच उमज पडत नाहीं. यामुळें इष्टकार्य सिद्ध्यर्थ समाजांत, मग मतवैचित्र्यानें अनेक भेद उत्पन्न होऊन, खळबळ उडून जाते. अशा आणीबाणीच्यावेळीं असा एक सोन्याचा दिवस उगवतो कीं, आपल्या बोधामृतानें राष्ट्राच्या संसारांत पुरुषार्थप्रासादाचा भक्कम पाया घालून देणारा. श्रीरामदासासारखा राष्ट्रीय संत, साऱ्या मतांचें एकीकरण करून, राष्ट्राचें उच्चतम शील बनविण्यासाठीं निर्माण होतो भविष्यत् कालांतील हा महद्भाग्याचा योग आज आपल्या कल्पनेबाहेरचा आहे; पण श्रीसमर्थांपूर्वी कित्येक दिवस अनुकूल परिस्थितीची पूर्वतयारी करण्यास अंशतः कारणीभूत होऊन, धर्माची जोपासना करणाऱ्या अनेक लहानथोर धार्मिक संतांच्या तोडीचे सत्पुरुष अलीकडे अगदींच दुर्मिळ नाहींत. तथापि प्रत्यय सुखावांचून साखरेची गोडी काय वर्णावी ? तसेंच सद्भावावांचून साधूंचें विमल यश काय गावें ? अर्थात् संतचरित्रें संतभक्तांनींच लिहिलीं पाहिजेत; तरच तीं प्रासादिक होतील. जें भक्तिशून्य लेखकाला करवीरक्षेत्रीं होऊन गेलेल्या श्रीकृष्णस्वामी ऊर्फ कुंभारगल्लींतील दत्तमहाराजाच्या सबंद जीवनवृत्तावर फार तर शेंदोनशें ओव्या लिहितां आल्या असत्या, तेथें त्यांचेच प्रेमळभक्त श्रीयुत गणेश विष्णु देशपांडे यानीं दर अध्यायास भक्तिप्रेमाचा पान्हा फोडणाऱ्या शेंदोनशें ओव्या लिहून, अठरा अध्यायी प्रति गीताच निर्माण करण्याचा यत्न करावा, हा तरी संतभक्तीच्याच प्रेरणेचा प्रभाव होय. नमनाखालीं रात्र घालवून, " खाणें थोडें पण मचमच फार " अशाप्रकारच्या शब्दावडंबरानें मित्राची बहुमोल जागा न अडावितां सदर ग्रंथांतील भक्तिरसानें ओथंबलेला श्री दत्तमहाराजांचा गोड चरित्रभाग, यथामति येथें थोडक्यांत सादर करितों.

आपसांतील गृहकलहाच्या प्रज्वलित कुंडांतून, फितुरीची राष्ट्रभक्षक कृत्त्या उत्पन्न होऊन, पेशवाईची राखरांगोळी झाल्यावर, इंग्रजसरकारच्या परम सुखकर राजछत्राखालीं, स्वराज्याच्या बेबंदशाईनें त्रस्त झालेली प्रजा, मोठ्या सुखासमाधानांत नांदूं लागल्यास उणीं पुरीं सतरा अठरा वर्षें झालीं होतीं. इतक्या अवधींत इंग्रजी सुधारणा, इंग्रजी न्याय, इंग्रजी समता, इंग्रजी टापटीप, इंग्रजी कलाकौशल्य, इंग्रजी भूतदया वगैरे गोडीगुलाबीच्या चमकदार गुणांनीं पेशवाई बालबोध प्रजेवर, सत्ताधीशाची इतकी छाप बसली होती कीं, ती दिपून जाऊन, " हे अवतारी इंग्रज कुडींत प्राण देखील घालतील बोवा, " असे आश्चर्योद्गारही क्वचित ऐकूं येत. यामुळें परकीयांविषयीं जडत चाललेल्या विस्मयश्रद्धेंत, आत्मनिंदा व धर्मशैथिल्य, यांचा हलकें हलकें प्रादुर्भाव होऊं लागला होता अशाच काळीं सुमारें शके १७५७ मध्यें कोल्हापूर संस्थानांतील शिरोळ पेठ्यांत नांदणी नामक टुमदार गांवांत आपले चरित्रनायक श्री कृष्णस्वामी अवतरले. " शुद्ध बीजापोटीं फळें रसाळ गोमटीं " या तुकोबाच्या उक्तीप्रमाणें स्वामीचे तीर्थरूप श्री अप्पाभट जोशी व मातोश्री श्री अन्नपूर्णाबाई, हीं उभयतां मोठीं सुशील, सात्विक, स्वधर्मरत, सत्यपरायण व सद्भक्त होतीं हें वेगळें सांगणें नको. गरोदरपणींच श्री अन्नपूर्णाबाईंना दाशरथी श्रीरामाच्या जननी कौसल्येप्रमाणें महद्भूताचें नुसतें वेड लागून राहिलें होतें. कुलस्वामी श्री खंडोबाच्या सान्निध जाऊन बसावें व तासाचेतास एकाग्रतेनें आत्मचिंतनीं लावून, तदाकार व्हावें, यांतच त्यांना ब्रह्मसुख होई ! डोहळ्यावरून समजणारीं अपत्यलक्षणें व्यवहारांत कोणीं लक्षांत घेत नाहीं व ह्मणूनच चरित्रनायकाच्या बालपणांतील गोष्टींवर माहितीचा पाहिजे तेवढा प्रकाश पडणें शक्य नाहीं. पण एका अर्थानें ही अस्पष्टता ह्मणजे तरी जिज्ञासामाधुर्यच होय. थोरांचा थोरपणा त्यांच्या थोरपणीं दृष्टीस पडूं लागल्यावरच त्यांच्या बालचरित्राकडे शोधकबुद्धीनें लक्ष वेधून जातें. जेथें बाळपणीं हे श्रीकृष्णस्वामी ऊर्फ दत्त महाराज ह्मणजे वास्तवीक हूड, उनाड, एकलकोंडे, आळशी व मुखदुर्बळ वेडें ध्यानच समजले जात, तेथें तेच निश्चयी, स्वेच्छाचारी, एकांतप्रिय, सखोल, मितभाषणीं व ब्रह्मवेडानें सच्चिदानंदपदीं ध्यान लावून राहणारे थोर संत

होते, अशी खात्री पटण्यास महाराजांच्या मोठेपणांतील थोर कृतीच कारणीभूत होत. वेड्या कृष्णाची लहानपणीं चटोरपोरें कुचेष्टा करून हुरेंवडी उडवीत, वेळीं त्याला चोप देत, पण तो छोटा सत्पुरुष नुसता रागावत देखील नसे. यामुळें त्यांची मेषपात्रांत गणना होई. सदोदीत त्यांची वृत्ति शांत व प्रसन्न असे. भूतदयेचें भांडवल या संतांजवळ बाळपणीं देखील अपार होतें. घरची गरीबी होती, तरी देखील हे बालसाधु आपल्या वाटणीचें अन्नादी खाद्य गरीब क्षुधितांला देऊन, स्वतः कितीक दिवस उपोषित राहत. आपलें वस्त्र कुडकुडणाऱ्या वस्त्रहीनास देऊन, ते स्वतः उघडे राहत. दुसऱ्यांना सुखी करण्यांतच त्यांना सात्विक आनंद वाटे; पण या विश्वकुटुंबीपणामुळें आईबापांच्या प्रापंचिकदृष्टीनें, ते लहानपणीं उधळेपणा करणारे व्यवहारशून्य मूर्ख ठरून मारही खात; पण त्याबद्दल त्यांणीं खेद ह्मणून कधींच मानला नाहीं. त्यांची सदेह मूर्ति विदेही वृत्तीनें चित्सुखांतच सदा मग्न असे.

उपास्यदैवताची निष्काम बुद्धीनें उपासना करण्यासाठीं ते एकदां गुपचुपपणें अन्नपाणी सोडून, कांहीं दिवस, मंगसोळीस खंडेरायाच्या ध्यानीं निमग्न होऊन राहिले होते. आईबाप जरी या श्रीकृष्णाचा राग करीत व जरी त्यांच्या प्रेमाला महाराजांची धाकटीं भावंडें वासुदेव, मल्हारी आणि योगाई हीं वांटेकरी होतीं, तरी त्यांना या मुलाबद्दल वत्सलतेनें काळजी वाटणें अपरिहार्य होतें. त्यांनीं हुडकतां हुडकतां एकदांचे स्वामी महाराज वरील देवळांत मिळाले. पण ज्याच्या चित्ताला बंधन नसून, हृदयीं नारायण साठविण्याचेंच ध्यान लागलेलें, तो असा परतंत्रतेंत थोडाच राहणार आहे! स्वारी मंगसोळीसच आईबापाच्या हातून निसटून पळाली, ती स्वतःची तब्येत लागेपर्यंत घरीं गेलीच नाहीं. ह्मणण्यासारखा विद्याभ्यास त्यांनीं केल्याचा कोठें उल्लेख आढळत नाहीं. सद्गुरुवांचून तरणोपायाची सोय सांपडत नसल्यामुळें, त्याणीं श्री दत्तावतारी अक्कलकोटच्या स्वामींचे भाविक शिष्य श्रीं आण्णाबोवा मिरजकर यांना शरण जाऊन, त्यांचे पाय धरण्यासाठीं मिरजेस धांव घेतली. शिवाय बोवाशीं त्यांचें लांबलांबचें कांहीं नातेंही होतें असें ह्मणतात. श्री आण्णाबोवा मोठे वैराग्यशील सत्पुरुष होते. त्याणीं अनेक चमत्कार करून कैक भक्तजनांचीं संकटें निवारण केल्याची ख्याती

आहे. आधिव्याधी हरणार्थ त्यांच्याकडे जाण्याविषयीं पुष्कळांना श्रीनृसिंह-वाडीस दृष्टांतानें आज्ञा होत. विहिरींत उडी टाकून, आंत अदृश्य होऊन, भलत्याच एका लांबच्या ओढ्यावर साहजिकपणें वाळूंत खेळत खेळत प्रकट होण्याचा बोवांनीं एकदां चमत्कार दाखविला. कदाचित् हा इच्छाशक्तीचा अद्भुत प्रयोग असेल, पण इच्छाशक्तीवर सत्ता चालविण्यास केवढी योग्यता लागते, याचा विचार देखील बोवांविषयीं आदरच उत्पन्न करतो. एकदां त्यांच्या पायाला झालेल्या करटांतले कृमी बोवांनीं साखर घालून पाळले असें भक्त सांगतात. एकाचें अन्न तें दुसऱ्याचें विष या न्यायानें पू-रक्तादी घाणीवरच वाढणाऱ्या करटांतील कृमींना साखर हें कदाचित् मारक विषही असेल, पण असलें बहुमोल पदार्थविज्ञान जाणणारा प्राणी कोणत्याही दृष्टीनें वंदनीयच नव्हे काय? अशा परमयोग्य गुरूची अनन्यभावानें सेवा करून श्रीकृष्णस्वामींनीं गुरुकृपा संपादन केली. अर्थात् त्यांना आत्मठेवा प्राप्त होऊन मुक्तिठाव सांपडला; पण हें गुरुमाउलीच्या साउलीचें प्रेमसुख श्री कृष्णस्वामींनीं मिरजेस फार दिवस उपभोगिलें नाहीं तोंच सृष्टीक्रमानुसार श्री अण्णाबोवांनीं समाधी घेतली मग स्वामीमहाराज करवीरक्षेत्रीं येऊन राहिले. तेथें ते जगज्जननी श्रीअंबाबाईचे देवालयांत रामाच्या ओरींत बरेच दिवस, साधारण अप्रसिद्धपणेंच राहत असत. वाडीस श्रीदत्तमहाराजांचा हुकूम झाल्यावरून, एक कुष्टरोगी मात्र त्यांच्या सेवेंत तत्पर असे. महाराजांनीं दया केल्यावर, लौकरच तो निखालस बरा होऊन आनंदानें निघून गेला. एकदां एक भाविक स्त्री दर्शनास आली असतां ते रडूं लागले. थोड्याच दिवसांत त्या बाईचा मुलगा मरण पावला, तेव्हां तिला स्वामींच्या रडण्याची अंतरखूण पटली. असेच कोणाकोणाला त्यांच्या भूतभविष्य ज्ञानाचे दाखले पटूं लागल्यावर, जनसमूह हलकें हलकें भजनीं लागत जाऊन, श्रीस्वामींचा सत्कीर्तिपरिमल थोडा थोडा पसरत चालला

कुंभारगल्लींत सदाचरणानें आपलें कुलव्रत चालविणारी ताराबाई नामें एक विश्वयोषिता राहत असे. शिवलीलामृतांत जशी पुण्यशील गणिका महानंदा तशी या श्रीकृष्णस्वामीच्या दत्तलीलामृतांत सद्धर्मशील कलावंतीण तारा होय. तिला महादुर्धर अशी पोटशूलाची व्यथा असे. अनेक उपाय

करून करून बिचारी थकली, पण गूण ह्मणून येईना. शेवटीं ती वाडीस जाऊन निर्धारानें श्रीदत्तसेवा करूं लागली. तेव्हां तिला दृष्टांत झाला कीं, परत घरीं जा व जे सत्पुरुष तुझ्या घरीं येतील, त्यांना मजसमान लेखून, त्यांची सेवा कर ह्मणजे तुझी पोटदुखी बरी होईल. भाविकपणें ती करविरास परत आली. सत्पुरुष कधीं भेटतील, हा सारखा नाद लागून राहिला. त्यामुळें तिचीही सद्‌वृत्तीच बनत चालली हें खरें पण महिना झाला तरी ते महापुरुष दृष्टीस पडले नाहींत, ह्मणून पुन्हा वाडीस जाऊन तिनें श्रीपादपदीं मन लाविलें. पुन्हा तोच दृष्टांत झाला. परत करवीरास येऊन, ती सत्पुरुषदर्शनासाठीं उतावीळ झाली. ध्यानीं, मनीं, स्वप्नीं, सत्पुरुष कधीं भेटतील हा ध्यास लागलेला " ज्याचें जया ध्यान । त्याचें होय तैसें मन !" साधूच्या ध्यासामुळें, ती मनानें अधिकाधिक साधूच बनत चालली; पण साधुरूप देव भेटेना व मनींची तळमळ तुटेना ! असा प्रकार झाला होता तरी ती धीराची बायको निराश न होतां निश्चयानें पुन्हां वाडीस जाण्यास निघाली. असा तिचा दृढ संकल्प पाहून, श्रीकृष्णस्वामी तिला आडवे गेले; व ह्मणतात.:—" दोन वेळ तुला श्रीगुरुमहाराजांनीं दृष्टांत दिला ना ? आतां पुन्हा लोंचटपणानें वाडीस जाशील तर मारच खाशील ! वारांगना अशाच चंचल असावयाच्या. " ताराबाई विस्मित झाली. दोन वेळ वाडीस झालेला दृष्टांत, या कानाचा त्या कानासही ठाऊक नसतां, याच गृहस्थाला तो उगीच कसा समजावा ? अर्थात् श्री दत्तात्रयानें स्वप्नीं सांगितलेला हाच तो सत्पुरुष, असा पक्का विश्वास उत्पन्न होऊन, ती त्यांच्या चरणीं लीन झाली. स्वामींनीं तिची शुद्ध निष्ठा पाहून, तिच्या अत्याग्रहाच्या विनंतीस मान दिला व आपल्या पुण्यदायक वास्तव्यानें त्या सार्वजनिक स्त्रीच्या घरास सार्वजनिक देवालयाचें स्वरूप आणून सोडलें ! येथूनच या आमच्या भक्तजनोद्धारक पावन कथागंगेचें भक्तिरूप पात्र विस्तीर्णपणें रुंदावलें; व तिच्या काठीं चमत्कारांच्या सुंदर घाटावर, शांत, सुशीतल व अत्यंत निर्मल अशा उपदेशजलांत स्नान करून, भाविकजन कृतार्थ झाले. अक्षय्यपदासाठीं अशाश्वत देहाचा त्याग करीपर्यंत स्वामीमहाराज ताराबाईच्याच घरीं राहत होते.

खोट्याच्या अस्तित्वानेंच खऱ्याची महती खुलते व वियोगानेंच सहवासाचें प्रेम ठसतें. एवढ्याचसाठीं स्वामीच्या सतत सान्निध्यानें धन्यतेचा

नकळत किंचित् गर्व वाहणाऱ्या ताराबाईला वियोग प्रचीतीनें ताळ्यावर आणण्याचा महाराजांनीं बेत केला दक्षिण काशीपासून ह्मणजे करवीरापासून पश्चिमेस एक कोसावर प्रयाग ह्मणून एक रमणीय स्थान आहे. येथेंच मिळत मिळत पांच गंगा एकत्र होऊन, पंचगंगा करवीराकडे वाहत जाते. प्रयागाच्या सृष्टिसौंदर्यांत संगम होणाऱ्या वेगवेगळ्या ओघाची मोठी मौज दिसते. गंगास्नानासाठीं मकरांत तेथें मोठी यात्रा भरते. श्रीकृष्णस्वामीही भक्तमंडळासह एकदां प्रयागास गेले असतां, वासू दळवी व कृष्णा लाड अशा दोन प्रिय शिष्यांसह एकाएकीं अदृश्य झाले. त्या त्रिवर्गांना बाकीचे लोक अगदीं त्यांच्या अंगाजवळून वावरतांना देखील दिसत होते; पण लोकांना मात्र ते तिघेही दिसत नव्हते. स्वामीदर्शनासाठीं उत्सुक झालेले लोक त्यांना शोधूं लागले. कित्येकांचीं पुढें वाढलेलीं ताटें तशींच राहिलीं. स्वामीवांचून कोणांसच बरें वाटेना. ताराबाई तर दुःखानें अगदीं विव्हळ होऊन गेली. गुरुमाय आपल्यावर कां कोपली हेंच तिला समजेना. तिनें कशींबशीं मंडळीचीं जेवणें उरकून घेतलीं; व स्वतः मात्र गुरुदर्शनावांचून अन्नग्रहण न करण्याचा नेम केला.

इकडे श्रीकृष्णस्वामी ह्मणजे दत्ताचाच अवतार! त्यांनीं सह्याद्रीचा रस्ता सुधारला. ते इतक्या त्वरेनें चालत कीं, दोघां शिष्यांना स्वामीबरोबर राहण्यास, पळतां भुई थोडी होई. ना अन्न, ना पाणी, ना विसावा. सारखें अहोरात्र मार्गक्रमण सुरूं होतें. तिसरे दिवशीं वासुदेव दळवी महाराजांच्या विनवण्या करून, थोड्या विश्रांतिसाठीं व पोटापाण्यासाठीं जवळच्या गांवांत चलण्याविषयीं सुचवूं लागला. " तहानभूक स्वाधीन नाहीं तर आलास कशाला मजबरोबर! आपण नाहीं येणार गांवांत. पाहिजे तर तूं जा मार खायला. " असे महाराजांचे तुच्छतेचे उद्गार ऐकून क्षुधापीडित शिष्य, " जा ना येऊं गांवांतून जेवण करून, आणि कशीतरी धांवपळ करून गाठूं यांना " अशा विचारानें महाराजांना सोडून गांवाजवळ गेला. तों खरोखरच त्याला अट्टलचोर समजून मार देण्यासाठीं गांवकरी तयार झाले; पण प्रसंग ओळखून गुरूंचें स्मरण करीत त्यानें मागें पाऊल घेतलें व पळ काढून गुरुचरण गांठल्यामुळेंच रिकाम्या मारांतून तो बचावला. आणखी दोन

दिवसांनीं दुसरा शिष्य कृष्णा लाड, झोंपेसाठीं काकुळतीस येऊन, लाडानें महाराजांस विनवूं लागला कीं, दोरीचें एक टोंक स्वामीच्या कंबरेस बांधून, दुसरें स्वतःच्या कंबरेस बांधतों, ह्मणजे स्वामीमहाराज थांबतील व थोडीतरी झोंप मिळेल. "बंधनाची हौस असेल तर ती फिटेल" असें स्वामी सहजगत्या ह्मणाले; तों दुसरे दिवशींच एका ओढ्यावर पाण्याची घागर भरून गांवाकडे जाणाऱ्या एका तरुणीची थट्टा केल्याच्या आरोपावरून संध्याकाळचे आंत, या तिघांना चावडींत अटक प्राप्त झाली. "घ्या आतां बंधनस्थिती आणि यथास्थित विश्रांती" अशी स्वामींनीं शिष्यांला जाणीव देतांच त्यांनीं गुरूंचे पाय धरले. गुरुकृपेनें गांवकऱ्यांना सत्प्रेरणा झाली व मग सुग्रास अन्न मिळून आदरानें सुटका झाली. नंतर स्वारी राजापुरास गेली व तेथें स्वच्छंदानें कांहीं स्वानंदलीला करून मिरजेस परतली. करवीरीं ताराबाई गुरुमहाराजांच्या सगुणमूर्तीच्या विरहानें पराकाष्टेची दुःखी होऊन, अन्नपाणी सोडून, गुरुचरणीं ध्यान लावून बसली होती. अस्थिपंजर बनत चाललेल्या देहाची तिला पर्वा नव्हती. असा तिचा निष्कलंक भाव पाहून, स्वामींनीं तिला दृष्टांतानें घरींच येऊन भेटण्याचें अश्वासन दिलें; पण श्रीकृष्णस्वामी मिरजेस आल्याची बातमी लागल्यावर तिला कोठून दम निघणार! ती मिरजेस धांवली; पण हें अंतरीं जाणून, महाराज मिरजेस गुप्त होऊन, करवीरीं तिच्या घरींच प्रकट जाहले. ताराबाई मिरजेहून खिन्न होऊन परत आल्यावर घरांतच श्रीगुरुमूर्तीच्या अप्राप्य दर्शनानें धन्य धन्य झाली.

श्रीसद्गुरूचें माहात्म्य जसजसें वाढत चाललें, तसतशी ताराबाईच्या घरीं भाविकांची गुरुदर्शनासाठीं दाटी होऊं लागली. परम दयाळू व क्षमाशील महाराजांच्या त्रिकालज्ञानाचे व ईश्वरी अधिकाराचे अनेक चमत्कार अनेक वेळां, अनेक तऱ्हेनें, अनेक भक्तांच्या प्रत्ययास आले. कोणास संतानलाभ तर कोणास धनलाभ, कोणाचें रोगहरण तर कोणाचें पिशाचहरण, अशीं श्रीच्या सत्कृतीचीं कैक उदाहरणें घडून आलीं. मरणोन्मुख पतीच्या आशेनें स्वामीचे पायीं लागणाऱ्या स्त्रीचें कुंकुमसौभाग्य पुसून किंवा वज्रचुडे फोडून नशिबीं असून न टळणारें दुश्चिन्ह स्वामींनीं अचुक सूचित केलें; अशाच एखादीस रामनाम मंत्र सांगून शांत केलें. कुभावानें कुचेष्टा करणाऱ्यास,

सांगूनसवरून, परस्पर शासन करवून ताळ्यावर आणलें व मग सुभाव उत्पन्न होतांच त्याच्यावर गुरुरायांनीं कृपा केली; सहजीं ह्मणून, पण वस्तुतः सत्यसूचक हेतूनें, एखाद्याच्या आंगणांतलें भांडें उचलून त्रिवार ओरडून फेंकून देतांच दुसऱ्या दिवशीं तेथें ठेवल्यासारखी जप्ती आली; एखाद्याच्या दारांतील पडवळाचा वेल खुडन टाकून शिव्या खाल्ल्या, पण पुढें ती खुडलेली वेल, विलक्षण बहारीनें फुटून, त्याला अपरंपार फळें आलीं; हुमनाबादेकडे श्री माणिकप्रभूंनीं देह ठेवतांच, श्रीकृष्ण स्वामींनीं करवीरास स्नान केलें; इच्छित मनोरथ पूर्ण होतांच, देऊं केलेली सोन्याची सरी, श्री अक्कलकोटच्या स्वामीस न देतां, करवीरास येऊन महाराजांच्या भजनीं लागलेल्या स्त्रीनें ती सरी त्यांना देऊं करतांच, " ही सरी आमचीच आहे कारण ती तूं अक्कलकोटच्या स्वामीमहाराजांस देण्याचा केव्हांच संकल्प करून चुकली होतीस " असें खरें ह्रद्गत ओळखून तिला त्याणी लाजविली.

घटकेंत करवीरीं, तर घटकेंत वाडींत, घटकेंत औदुंबरीं तर घटकेंत जोतीबाचे डोंगरावर, असें त्यांनीं भक्तांना दर्शन दिलें; भक्तांसाठीं क्वचित् एकाचकाळीं अनेक रूपेंही घेतलीं; भक्तांच्या दाटीचा त्रास क्षणभर कमी व्हावा, व महाराजांना थोडी स्वस्थता मिळावी ह्मणून ताराबाईनें महाराज आंत बसले असतां, त्यांच्या खोलीला बाहेरून कडी लावून, भक्तांना श्रीची स्वारी बाहेर गेल्याची थाप मारली, पण कनवाळू सद्गुरु भक्तांसाठीं, दाराची कडी तशीच ठवून बाहेर आले, व साधू बंधमुक्त आहेत असें प्रत्यक्ष कृतीनें व्यक्त करून दाखविलें; तापानें भाजून निघालेल्या शक्तिहीन भक्ताला तसेंच फरफटत गंगेवर नेऊन नुसत्या स्नानानें पूर्ववत ताजेंतवानें केलें; करवीराजवळ वडिंग्यास जाऊन तेथचे अकरा ब्रह्मसंमंध काढले; योगाईसारखी बहीण स्वामींना प्रपंचाकडे ओढण्याचा यत्न करीत असतां, तिलाच सदुपदेशानें परमार्थ मार्ग दाखविला; वांझ ह्मशीस दूध उत्पन्न केलें; श्री दत्तमहाराजांच्या वाडी येथील दैविक व धार्मिक हुजूर कोर्टाकडून त्यांच्याकडे सोंपाविलेले आधिव्याधींचे कज्जे, " ज्याचा जैसा भाव त्याचा तैसा देव " या चोख न्यायानें चालवून झटपट निकालांत काढले; असे अगणित चमत्कार सारखे घडत होते, पण त्यांचें भक्तिरसपर मनोहर वर्णन देण्यास प्रस्तुत अज्ञ लेखक असमर्थ आहे.

हीन कुलांतल्या ताराबाईच्या घरीं नेहमीं राहून, तिच्या हातचें अन्न-पाणी ग्रहण करणाऱ्या महापुरुषाविरुद्ध गाऱ्हाणें सांगण्यासाठीं एकानें वाडीस अनुष्ठान आरंभिलें होतें. तेव्हां त्याला श्रीनीं दृष्टांत देऊन सांगितलें कीं, ताराबाईची पूर्वपुण्याई फार सबल आहे व श्री कृष्णस्वामीनीं तेथेंच तिच्या उद्धारार्थ राहण्याचा नेमानेम आहे. अशाचतऱ्हेचे उद्गार खुद्द महाराजांनींही मिरजेस राहण्याचा आग्रह करणाऱ्या मंडळीजवळ काढले होते. वार्धक्यानें थकलेली ताराबाई मृत्यु पावतांच, आपलें अवतारकृत्य संपलें असें जाणूनच कीं काय शके १८२२ श्रावण वद्य १० सोमवारीं श्रीकृष्णस्वामीनीं समाधि घेतली. तेव्हां त्यांच्या मुखावर अद्वितीय ब्रह्मतेज झळकत होतें. त्यांच्या विरहानें शोकाकुल झालेला भक्तसमाज मोठा होता. ताराबाईच्या घरांतच त्यांच्या पादुका स्थापन केल्या असून हल्लींही त्यांची पूजाअर्चा, आरती, धुपारती नेमानें होते. श्रीस्वामी महाराज ठेंगणें, भव्य, तेजःपुज व सदा हसतमुख असत. त्यांना मुलांसारखे चाळे करीत बसण्याची आवड असे. खाणेंपिणें निवळ लहरिवर; व तेंही दुसऱ्याच्या हातानें. नाहीं तर त्याची ही जरूर ते ठेवीत नसत. ते महान् योगी होते. भक्ताविषयीं त्यांचें अंतःकरण अत्यंत कोंवळें असल्याबद्दलचे दाखले त्यांनीं समाधी घेतल्यावरही दृष्टीस पडले आहेत. श्रीयुत देशपांडे यांना काव्यस्फूर्ति होण्यास महाराजांनीं एकदां औदुंबरास दिलेला प्रसादच कारण झाला. तसेंच स्वामींचें चरित्र लिहिण्यासही खुद्द स्वामींनींच प्रेरणा केली; एवढेंच नव्हे तर गाडींत प्रवासी बाईच्यारूपानें चरित्राला लागणारी पुष्कळ उपयुक्त माहिती देऊन ती बाई गाडींतून शिरोळास उतरतांच अंतर्धान पावल्याचाही चमत्कार खुद्द श्रीयुत देशपांड्यांनीं पाहिल्याचा ते स्वतः उल्लेख करतात.

महाराज जसे देवभक्त होते तसेच ते देशभक्तही होते. कोल्हापुराहून जपानास कलाकौशल्य शिकण्यासाठीं जाणाऱ्या दोन भाविक तरुणांनीं महाराजांची आज्ञा मागितली असतां ती त्यांणीं मोठ्या प्रेमोत्साहानें दिली व त्यांच्याच आशीर्वादानें ते उभयतां इच्छितकार्य साधून सुखरूप परत आले. हल्लीं ते स्वतःच्या भरभराटींत कृतीनें स्वदेशीस उत्तेजन देत आहेत. स्वदेशीचे पुरे कैवारी श्रीयुत वामन रामचंद्र जोशी बी. ए. हे एक स्वामीमहाराजांचे मोठे श्रद्धाळू भक्त होत. देशकार्यीं खांदा देण्यास श्रीकृष्ण स्वामींनीं

त्यांना पूर्ण अनुमोदन दिलें. महाराजांच्या वंशांतील कोणीही आज ह्यात नाहीं तरी खुद्द श्रीकृष्णस्वामीचाच साधुत्वलौकीक चिरंजीव होऊन राहिला आहे.

'दर्भ'

## सृष्टीची स्वाभाविक गति

( मागील अंकावरून समाप्त.

हिंदु-मुसलमान वगैरे निरनिराळ्या धर्मीच्या लोकांमध्यें व हिंदूंच्या निरनिराळ्या जातींमध्यें ऐक्य घडवून आणण्याचे व परस्परांमधील गैरसमज नाहींसे करण्याचे प्रयत्न जशा नेटानें व्हावयास पाहिजेत तसे झालेले नाहींत. सर्व धर्मांपेक्षां राष्ट्रीयधर्म श्रेष्ठ आहे, असें जपानी लोकांप्रमाणें आमच्या लोकांस वाटत नाहीं; इतकेंच नव्हे तर पुढारी ह्मणविणाऱ्या बड्या बड्या लोकांचीही राष्ट्रीयधर्माला सर्व धर्मांत अग्रस्थान देण्याची तयारी नाहीं. जातीमत्सराच्या आकुंचित दृष्टीनें पहाण्याची त्यांची संवय अजून गेलेली नाहीं. हें शोचनीय होय! खरी राष्ट्रोन्नति होण्यास सर्व पक्षांची एकी होऊन सर्वांस आपण एकच आहों, असें वाटलें पाहिजे. अनेकवेळां जातीविषयक गोष्टींस महत्व देऊन आह्मीं परस्परांतील प्रेमभाव नाहींसा करतों व राष्ट्रहिताचें अति महत्वाचें जें कार्य हातीं घेतों त्यास कमजोर करतों.

जमिनीच्या ज्या तुकड्यावर आज आपण उभे आहोंत तो संघशक्तीचाच परिणाम आहे; आणि ह्मणून आपणांस उभें रहाण्यास जागा आहे. पण हेच भूमीचे कण एकमेकांस सोडून पृथक झाले तर आपणांस उभें रहाण्यास थारा मिळावयाचा नाहीं, ही गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. आपण आपल्या जडदेहाचा विचार केला तरी आपणांस असें दिसून येईल कीं, पृथ्वी, आप, तेज, वायु व आकाश या पंचमहाभूतांच्या ऐक्यानेंच तो निर्माण झाला आहे. सारांश, ह्या विश्वांत ज्या ज्या ह्मणून चांगल्या गोष्टी आपण पहातों त्यांचें मूळ ऐक्यांतच आहे. पुढारी लोकांनीं ह्या गोष्टीकडे अवश्य लक्ष देऊन वागण्याचा प्रयत्न केला पाहिजे. केवळ राजकीय हितसंबंधाच्या ऐक्यावर सर्व लोकांचें ऐक्य होईल अशी आशा धरणें ह्मणजे वाळूवर इमारत उभारूं पहाण्यासारखेंच आहे. अर्थात् ह्या प्रकारास फांटा दिला पाहिजे.

चहूंतर्फांनीं राष्ट्रीयधर्माची श्रेष्ठता व उदात्तपणा लोकांच्या मनांत भरविल्याशिवाय आमच्या भावी आशा सफल होणें शक्य नाहीं. कोणतीही चळवळ मूठभर लोकांची नसून सर्व राष्ट्राची आहे, असें सिद्ध होऊन लोकमतशक्तीचा प्रभाव सर्वत्र झालेला दिसला पाहिजे व अशी जागृति सर्व देशभर होण्याला तें काम जबाबदार लोकांनीच हातीं घेतलें पाहिजे. त्यांनीं लोकांस नुसता शाब्दिक उपदेश न करितां आपल्या आचरणांनीं त्यांस योग्य कित्ता घालून दिला पाहिजे, म्हणजे त्यांच्यांत विचार आणि आचार यांचा मेळ असला पाहिजे. मनुष्य ज्या गोष्टी चांगल्या ह्मणून समजतो त्याप्रमाणें व्यवहारांत त्याच्याकडून आचरण होईल तर राष्ट्राची उन्नति होण्यास वेळ लागणार नाहीं.

One ounce of practice is worth twenty thousand tons of big talk. SWAMI VIVEKANAND.

तुकाराम, रामदास, साक्रेटिस, वाशिंग्टन, शिवाजी इ० थोरपुरुषांचा ज्या गुणांबद्दल आपण गौरव करितों त्या गुणांचें आपल्याठिकाणीं वास्तव्य असावें असा हेतु धरून आचरण करणारे लोक आज आपल्यांत किती आहेत ? वरील महात्म्यांचे गुणानुवाद गाऊन त्यांना पूज्य मानणाऱ्या लोकांत त्यांच्या गुणांचा अभाव असावा हें निंद्य नव्हे काय ? जे गुण जगांत पूज्य ठरतात, ज्यांची जनतेंत वाहवा होते, ते गुण फक्त उच्चारांतच दिसावेत ! देशहिताच्या लांब लांब गोष्टी आह्मीं लोकांस सांगतों व प्रसंगीं कळकळव्यंजक व्याख्यानेंही झोडतों; पण व्यवहारांत त्याप्रमाणें आमच्याकडून आचरण मुळींच होत नाहीं. अर्थात् आमचें बोलणें केवळ कृत्रीम व पोकळ असतें. सवंग लोकप्रियता व फुकाची प्रतिष्ठा संपादन करण्याकरितांच आमच्या बोलण्याला ऊत येत असतो; पण आचरण मात्र ज्या दिशेला स्वार्थाचा वारा वाहील त्या दिशेलाच धरून होत असतें. अशाप्रकारें विचार आणि आचार यांत जोंपर्यंत मेळ असणार नाहीं, तोंपर्यंत आमचें राष्ट्र कधींही सुधारणार नाहीं

पुढारी ह्मणवून घेण्याची ज्यांना इच्छा असेल त्यांनीं आपलें वर्तन शुद्ध ठेविलें पाहिजे. स्वार्थत्यागाची उच्चतम वृत्ति त्यांच्याठायीं असली पाहिजे. त्यांचें मन उदार असून अंगीं करारीपणाही असला पाहिजे.

थोडक्यांत, सर्व कांहीं उत्तम तें त्यांच्यांत पाहिजे. अर्थात् महत्कृति करणारांत असणारे गुणही अलौकिक असले पाहिजेत; तरच त्यांचे हातून स्वीकृत कार्य फलद्रूप होईल. सर्वतोपरी अवनतीच्या मार्गांत ठेंचाळत असलेल्या आपल्या हिंदुस्थानदेशांत वरील गुणांचा अगदीं ऱ्हास झाला आहे. ह्या गोष्टीकडे आतां राष्ट्रांतील समंजस व थोरपुरुषांनीं लक्ष देणें अति जरूर आहे.

प्रत्येक बाबतींत आमच्या लोकांचें आचरण विचाराच्या उलट घडत असल्यामळें त्यांचें बोलणें फाल होत आहे. ज्यांना बोलतों काय व करतों काय हें समजत नाहीं, आपल्या मताप्रमाणें किंवा विचाराप्रमाणें वागण्याचें ज्यांना धैर्य नाहीं, राष्ट्रकार्याकरितां किंचितही स्वार्थत्याग करण्यास जे तयार नाहींत, अशा मनुष्यांचे हातून लोकहिताचें काम कधींच होणार नाहीं.

चांगल्या गुणांचें पोषण होण्यास आचरणाच्या सत्यतेची फार जरूरी असते. लुथर हा कांहीं जाडा पंडीत नव्हता. त्याच्यावेळीं युरोपांत पुष्कळ जाडे पंडीत होते. तरी ते सर्व मागें पडून लुथरचेंच नांव अजरामर व्हावें याचें कारण काय ? तर त्याच्या अंगीं सत्यनिष्ठा तशीच होती. त्याचीं सर्व भाषणें अंतःकरणांत सत्यज्योति प्रज्वलीत होऊनच होत होतीं ह्मणूनच त्याचा परिणाम श्रोत्यांवर चांगला झाला.

रेनन ह्या फ्रेंच ग्रंथकारानें एकेठिकाणीं ह्मटलें आहे कीं, उच्चार व आचार ह्या दोहोंचा ज्यांच्यांत मेळ असेल तेच समाजाचे नेते होऊं शकतील. जे लोक हातपाय न हालवितां आपोआप सुधारणा होईल ह्मणून स्वस्थ राहतात ते लोक बकननें ह्मटल्याप्रमाणें फक्त " निर्जीव पुतळे अथवा रुढीरूपी चक्रानीं चालणारीं यंत्रें आहेत " असें समजावें.

ज्यांना राष्ट्र सुधारणेची आवश्यकता स्पष्टपणें दिसून आली आहे, असे लोक ती अमलांत आणण्याकरितां नेटानें पुढें न सरसावतां उदासीनपणें जर हात जोडून स्वस्थ बसतील तर कोणत्याही राष्ट्रांत सुधारणेस योग्य काल ह्मणून प्राप्त होण्याची आशाच करतां येणार नाहीं.

आपल्या राष्ट्रांत आजपर्यंत निरनिराळ्या उद्देशांकरितां ज्या अनेक संस्था स्थापन झाल्या त्यांचा इतिहास पाहिला तर त्यांचे उद्देश सिद्धीस न जाण्याचीं

कारणें आपणांस कळून येतील. मनुष्य कितीही हुषार असला, विद्वान असला, बलवान असला आणि त्याला इतर जनांचा पाठींबा नसला-राष्ट्रांतील सर्व लोकांचें सहाय्य नसलें तर त्याच्या हातून सार्वजनीक कृत्य कदापि होणार नाहीं. ग्रीस देशाचा इतिहास ज्यांनीं वाचला असेल, त्यांस अवगत असेलच कीं, तेथील लोक जोंपर्यंत बंधुप्रीतीनें वागत होते, समाजसंबंधी केलेल्या नियमास मान देऊन त्याप्रमाणें चालत होते, विश्वासघात, कपट, जातिमत्सर इ० दुष्टविकारांच्या जोंपर्यंत आधीन झाले नव्हते, तोंपर्यंतच त्यांच्या देशाचें नांव जगांत गाजत होतें. अशाप्रकारचीं अनेक उदाहरणें इतिहासांतून देतां येतील. आमच्यावर सध्यां राज्य करीत असलेल्या इंग्रजलोकांत हे गुण चांगल्याप्रकारें वास करीत असल्यामुळें त्यांची आज किती भरभराट होत आहे हें आपण प्रत्यक्ष पहात आहों. इतर बाबींत त्यांचे तंटे बखेडे असले, एकमेकांचीं मनें एकमेकांविषयीं दुःखावलेलीं असलीं तरी देशकार्याच्याकामीं ते सर्व एका बाजूस ठेऊन एकत्र जमलेले आपणांस दिसतील. कोणतेंही कार्य करायाचें झाल्यास त्याचा ते प्रथमतः चांगला खल करतील आणि सर्वत्रांच्या सल्लयानें जें ठरेल त्याप्रमाणें नंतर संघशक्तीनें करावयास झटतील. अशाप्रकारें राजकीय, सामाजिक, धार्मिक, औद्योगिक इ० सर्व बाबतींत ते वागत असल्यामुळें आज त्यांचा हरएक कामांत विजयच होत आहे. बाराव्या शतकांत इंग्लंडांतील लोक रानटी स्थितींत होते. परंतु त्या कालापासून आज आठशें वर्षांत त्या लोकांनीं सुधारणेच्याकामीं अव्याहत परिश्रम करून सुधारलेल्या सर्व राष्ट्रांत श्रेष्ठत्व संपादून पृथ्वीवरील बहुतेक प्रदेशांत आपली सत्ता पसरली आहे. यांत्रिक, कलाकौशल्य, भूगर्भशास्त्र, रसायनशास्त्र, ज्योतिष, वैद्यक इ० त प्राविण्य संपादून मनुष्याच्या सुखाचीं सर्व साधनें अगदीं पूर्णतेस आणिलीं आहेत. पंचमहाभूतें आज जणु त्यांची सेवाच करीत आहेत. अशी स्थिति एकाकाळीं आमच्या देशाची होती पण विकार आणि गर्व ह्या खोट्या मनोवृत्तींच्या आधीन होऊन आह्मीं आज त्या स्थितीला मुकलों.

पशूंस ज्ञान नसतें; बरावाईट विचार करण्याची शक्तीही नसते हें सर्वत्रांस महशूर आहे. अर्थात आपणांमध्यें असलेलें अज्ञान, दुर्गुण व तेणेंकरून

प्राप्त होणारी विपन्नावस्था हीं पशुत्वाचाच अंश असल्याबद्दल साक्ष देत आहेत, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. करितां त्याचें निर्मुलन झालें पाहिजे.

सुधारणादेवीच्या निवासस्थानाचा रस्ता पुष्पाच्छादित नसून तो कंटकांनीं भरलेला आहे. त्याचें आक्रमण करितांना वाटेंत अनेक संकटें–त्रास, निंदा इ० दुःखें-भोगावीं लागतील, तीं सहन केलीं पाहिजेत.

सृष्टिनियमांचें काम अतिशय दक्ष व निःपक्षपाती न्यायाधिशाप्रमाणें चाललेलें आहे. तेथें दया, माया मुळींच नाहीं. अपराध करील त्यास शासन व योग्यरीतीनें वागेल त्यास बक्षीस मिळावयाचेंच. ह्याप्रमाणें सृष्टिदेवीच्या न्यायमंदिरांत न्याय अगदीं धारवाडी काट्यानें होत आहे. तेथें हिंदुस्थान सारखें, इंग्लंड सारखें व फ्रान्स, अमेरिका, जर्मनी इ० राष्ट्रें सारखींच; ह्मणून ह्या सृष्टिदेवीच्या राज्यांत आपला देश टिकावा ह्मणजे आह्मीं जिवंत रहावें अशी आमची मनापासून इच्छा असेल अर्थात् हिंदुस्थानदेशापुरती सृष्टीची गति सुधारणेकडे वळावी असें आम्हांस वाटत असेल तर वर सांगितलेल्या राष्ट्रीय गुणास आह्मीं सोडतां कामानये. हे गुण आह्मांला परकी आहेत असें नाहीं. ह्याच गुणांच्या जोरावर पूर्वीं आर्यावर्तापुरती सृष्टीची गति सुधारणेकडे होती, ह्मणजे आपले पूर्वज पूर्वीं सौख्यसागरांत डोलत होते; पण अलिकडे हे गुण लोकांत क्वचितच दृष्टीस पडतात. राष्ट्राचा उत्कर्ष होण्यास लोकांच्या अंगांत हे गुण बाणावे लागतात व ते पूर्णतेनें बाणल्याशिवाय राष्ट्राची उन्नति कधींही होत नसते, असें आजपर्यंतचा इतिहासही आपणांस सांगत आहे. अर्थात् ज्या तत्वांच्या गर्भांतून ऊर्जितावस्थेचा उगम व्हावयाचा त्या तत्वांस व्यवहारांत सत्यस्वरूप प्राप्त होऊन सर्व सद्गुणांची वृद्धि झाली पाहिजे.

सांप्रतकाळीं नवीन नवीन शोधांनीं काल व स्थल ह्यांना जबर संक्षेप बसूं लागला आहे. चार चार महिन्यांनीं होणारीं कामें आज एका तासांत होऊं लागलीं आहेत. पृथ्वीप्रदक्षिणा करणारे लोक षण्मासांत परत घरीं येऊन बसत आहेत. पूर्वींची काशीयात्रा जेवढी धोक्याची, वेळाची व खर्चाची होती तेवढी ती आतां नाहीं, हें सर्वांस कळूं लागलें आहे. जगांतील निरनिराळ्या राष्ट्रांचें संघटण हजारपटीनें वाढून एकमेकांचें निरीक्षणही सोपें झालें आहे. अशावेळीं राष्ट्रीय शर्यतींत आह्मीं जर मागें राहिलों,

सर्व गोष्टी डोळ्यापुढें असूनही जर आह्मीं कांहींएक हालचाल केली नाहीं तर मग आमच्यासारखे निग्रंट्ट आह्मींच.

केशव हरि पौंडवाल.

## खासा लाभ!

वर्षप्रतिपदेचा दिवस ह्मटला ह्मणजे आह्मां हिंदूंचा मोठा सण. त्यादिवशीं मीं गिऱ्हायिकांची वाट पहात आपल्या दुकानांत बसलों होतों. अकरा वाजून गेले तरी कोणीही गिऱ्हायीक आलें नाहीं असें पाहून मीं कंटाळून गेलों व दुकान बंद करून घरीं जाण्याच्या तयारीस लागलों. इतक्यांत, दोन घोड्यांची एक सुंदर गाडी माझ्या दुकानासमोर येऊन थडकली. ती उभी रहाते न रहाते तोंच एका चाकरानें पुढें होऊन गाडीचा दरवाजा उघडला. तींतून तीन गृहस्थ खालीं उतरले. त्यांचा श्रीमंती थाटाचा पोशाख पाहून मीं त्यांस सामोरा गेलों; व रीतीप्रमाणें नमस्कारचमत्कार झाल्यावर त्यांस आणून लोडाशीं बसविलें. कांहीं वेळानें एक गृहस्थ मला ह्मणाला,

" आपलेंच नांव कां बाबूराव? "

मीं उत्तर दिलें. " होय, महाराज. "

तेव्हां तो गृहस्थ पुन्हां ह्मणाला, " आपण फार सचोटीनें व्यापार करितां ही गोष्ट ( समोर लोडाशीं टेंकून बसलेल्या गृहस्थाकडे बोट करून ) भाऊसाहेब इनामदारांच्या कांनीं आल्यावरून ते आज आपल्या दुकांनीं कांहीं माल खरेदी करण्याकरितां आले आहेत. तर चला, दाखवा पाहूं निरनिराळ्या उंची सुगंधी अत्तरांचे नमुने. "

हें ऐकतांच मला अत्यानंद झाला. नंतर मीं त्यांस नानातऱ्हेचीं उंची सुगंधी अत्तरें, रेशमी कापड, शालू वगैरे पुष्कळ सामान दाखविलें. भवतिनभवति होऊन अखेर त्यांनीं सुमारें पन्नास हजार रुपये किंम्तीचा माल खरेदी केला. नंतर भाऊसाहेब इनामदार मला ह्मणाले, ' शेटजी, तुह्मीं हा सर्व माल घेऊन संध्याकाळीं रामेश्वराच्या देवळाजवळ या. नंतर मालाची किंमत तुह्मांस देण्यांत येईल; सध्यां हे घ्या. " असें ह्मणून भाऊसाहेबांनीं माझ्या हातांत एक पांच हजारांची नोट दिली; व ते जावयास निघाले. मीहि त्यांस गाडीपर्यंत पोंहचविण्यास गेलों. गाडींत बसल्यावर संध्याकाळीं

माल घेऊन येण्यास पुन्हां एकदां बजावून भाऊसाहेबांनीं मला निरोप दिला. आज आपणांस पंचवीस हजार रुपयांचा निव्वळ फायदा झाला असें वाटून मला फार आनंद झाला व मीं भावी मनोराज्यांत गुंग होऊन गेलों. घरीं गेल्यावर दोनचार घांस कसेबसे खाऊन निद्रेची मार्गप्रतिक्षा करीत अंथरुणावर पडलों; पण झोंप येईल तर शपथ.

चारांचे ठोके पडले. तेव्हां मीं आपला पोषाख चढवून घराबाहेर पडलों; व दहापंधरा मजूर ठरवून त्यांच्या डोक्यावर सामानानं भरलेल्या पेट्या देऊन रामेश्वराच्या देवळाकडे जाण्यास निघालों; ज्यावेळीं मीं देवळाजवळ येऊन पोंहचलों त्यावेळीं जो देखावा माझ्या दृष्टीस पडला, तो मीं कधींही विसरणार नाहीं.

अहाहा! ती विजेची रोषनाई, ते चित्रविचित्र रंगाचे सुशोभित तंबू, तो दिव्यांचा लखलखाट, त्या मश्रुनें मढविलेल्या नानातऱ्हेच्या खूर्च्या, मेजें, कपाटें, पलंग इत्यादि उंची उंची सामान पाहून मीं अगदीं भांबावून गेलों. मनुष्यांचा कोलाहल, लहान लहान अर्भकांचे आक्रोशरव, गाणारणींचे सुस्वर आलाप, हार्मोनियम, फोनोग्राफ इत्यादि वाद्यांचे आवाज, श्वानांचें भुंकणें, अश्वांचें खिंकाळणें इत्यादि प्रकारांनीं ती जागा अगदीं गजबजून गेली होती. तें ऐश्वर्य, तो थाट वगैरे पाहून मीं अगदीं थक्क होऊन गेलों.

इतक्यांत, एक गृहस्थ मजजवळ येऊन ह्मणाला, " वाः शेटजी, अगदीं वेळेवर आलांत. चला, या माझ्या मागून. " नंतर तो चाकरांस ह्मणाला, " अरे, शेटजीनीं आणलेलें सामान नेऊन आंत ठेवा. " नंतर त्या गृहस्थानें मला एका सुशोभित तंबूत नेलें व एका खुर्चीवर बसविलें. दुसरेहि पंधरावीस व्यापारी तेथें बसले होते; त्यांच्याशीं इकडच्या तिकडच्या गप्पा ठोकण्यास मीं सुरवात केली. थोड्यावेळानें एक चाकर थोडीशी मेवामिठाई व फळफळावळ घेऊन आला व तो ह्मणाला कीं, " भाऊसाहेब इनामदार हे आतां पुराण ऐकावयास बसले आहेत, तेव्हां सध्यां त्यांची भेट होणार नाहीं; तोंपर्यंत आपण थोडासा फराळ करावा. " आह्मींही फराळावर सपाटून ताव मारला. थोड्यावेळानंतर दिवाणजी आह्मांस घेऊन भाऊसाहेबांच्या तंबूकडे आले. " शेटजी, या बसा. " असें भाऊसाहेब ह्मणाले. नंतर ते दिवाणजींस ह्मणाले, " सध्यां आपणांजवळ किती रोकड रक्कम शिल्लक आहे ? "

दिवाणजी उत्तर देण्यास तयार होतेच. त्यांनीं तावडतोब उत्तर दिलें, " तीन लक्ष, छप्पन हजार, तीनशें दोन. " " आणि बँकांत किती आहेत ?"

दिवाणजी ह्मणाले " नॅशनल बँकेंत पांसष्ट हजार; चार्टर्डबँकेंत सत्तावीस हजार; बांम्बे ब्यांकेंत चौतीस हजार तीनशें बावन; पंजाब बँकेंत पन्नास हजार; " भाऊसाहेब ह्मणाले " द्या तर मग यांस ( माझ्याकडे बोट करून ) पन्नास हजारांचा चेक; आणि इतर दुकानदारांसहि चेकच द्या. "

" आणि रोकड दिली तर नाहीं कां चालणार ? " माझी कांहीं हरकत नाहीं; पण रात्रीचेवेळीं हे पैसे संभाळणार तरी कसे ! आजकाल चोरांनीं कसा अगदीं या शहरांत धुमाकूळ माजविला आहे; तेव्हां ह्मणतों —"

" कांहीं हरकत नाहीं, आह्मांस चेकच द्या. " आह्मीं सर्व एकदम ह्मणालों. नंतर आह्मीं ते चेक घेऊन घरीं गेलों व सकाळीं उठून ते चेक बँकेंत घेऊन गेलों; तेव्हां ते चेक बनावट आहेत असें आढळून आल्यावरून पोलीसांस खबर दिली. पोलीसांनीं खूप तपास केला; पण त्या सोनेरी टोळीचा पत्ता कांहीं लागला नाहीं. वाचकहो ! वर्षप्रतिपदेच्या सुमुहूर्तावर आह्मांस हा खासा लाभच झाला ह्मणायचा.

सुदर्शन.

## गंगोत्री आणि जमनोत्री.

आर्यावर्तातली पुष्कळ जमीन ज्यांच्यायोगानें सुपीक झाली आहे, ज्यांच्यायोगानें या देशाला सौंदर्य प्राप्त झालें आहे आणि ज्यांच्या पवित्रोदकस्नानानें जन्मजन्मांतरींचीं महत्पातकें भस्म होतात, अशा ज्या अतिपवित्र गंगा आणि यमुना, त्यांच्या उगमाविषयीं येथें थोडी माहिती देत आहों.

गंगेच्या उत्पत्तीविषयीं पौराणिक कथा सर्वांस ठाऊकच आहे. महा पराक्रमी भगीरथ राजानें, आपल्या मृत पूर्वजांच्या उद्धारार्थ घोर तपश्चर्या करून, स्वर्गाहून भूतलावर गंगा आणिली. त्यामुळें गंगेला भागीरथी हें नांव पडलें. गंगेचा खरा उगम अद्यापीही कोणास सांपडला नाहीं. बालगंगेचा प्रवाह ज्याठिकाणीं वहात आहे. तेथपर्यंत मात्र जातां येतें पुढें हिमाच्छादित पर्वत प्रदेश असल्यामुळें व तेथचें बर्फ कधींही वितळत नसल्यामुळें फारकरून जातां येत नाहीं. अशा बिकट स्थळींच गोमुख ह्मणून एक स्थान

असून, त्या गोमुखांतून गंगेचा प्रवाह पुढें वहातो अशी गोष्ट प्रसिद्ध आहे. या पवित्र आणि रमणीय स्थळीं जाण्याचा बऱ्याच धाडशी युरोपियनांनीं प्रयत्न केल्याचीं उदाहरणें आहेत; त्यांपैकीं कप्तान हड्सन नामक एक साहेब, त्याठिकाणीं मोठ्या प्रयासानें गेल्याचें इतिहासांत लिहिलें आहे. त्याठिकाणीं गोठलेल्या बर्फाच्या भिंतीखालून गंगेचा पवित्र प्रवाह वहात असून, तो प्रवाह एका गोमुखाकृति कुंडांतून बाहेर येतो असें सदर साहेबांचें ह्मणणें आहे. अशा बिकट स्थळाविषयींची माहिती आर्यलोकांच्या तोंडून त्या साहेबानें जी ऐकिली होती ती अक्षरशः खरी आहे, असेंही त्यानें लिहून ठेविलें आहे.

बालगंगेपर्यंत जाण्याचाही रस्ता मोठा बिकट आहे. यात्रेकरूंना वळणावळणांनीं मार्ग काढीत वर चढावें लागतें. कित्येकठिकाणीं चढाव इतका कठीण आहे कीं, नुसतें पायांनीं चालत जातां येत नाहीं ह्मणून हात टेंकून, तोल सांभाळून वर चढावें लागतें! कित्येकठिकाणीं भयंकर तुटलेले कडे आहेत, त्याठिकाणीं खडकाच्या भेगेंत खांब रोवून जिनें केले आहेत, त्यांवरून सरपटत जावें लागतें! अशारीतीनें बराच चढाव चढल्यावर मार्गांत एक लहानसें खेडें लागतें. तेथें थोड्याशा झोंपड्या व एक महादेवाचें पुरातन देवालय आहे. याठिकाणीं वृक्षादिकांनीं अनावृत व आकाशास जाऊन भिडल्याप्रमाणें दिसणारे मोठमोठे कडे असून त्यांच्या पायथळ्याजवळ मोठमोठे खडक आहेत, जिकडे तिकडे खोल ओहोळ असून त्यांत आपोआप उगवलेले कांहीं वृक्ष आहेत. हा प्रदेश पाहून प्रेक्षकास तें आपण कधीं न पाहिलेलें एक जगच आहे असें वाटून तो आश्चर्यचकित होऊन जातो! याठिकाणच्या महादेवाच्या देवळाजवळ, कड्यांतून तुटून पडलेले असंख्य दगड पडले आहेत; आणि ते तुटून पडण्याचा क्रमही चालू आहे, ह्मणून एखादेवेळीं ही इमारत दगडांत नाहींशी होईल असें ह्मणतात. या स्थळाची पूर्व बाजू खेरीज करून बाकीच्या तीन बाजूंना खडकाच्या उंच उंच टेंकड्या आहेत. पूर्वबाजूस वृक्षरहित पर्वत शिखरें बरींच आहेत. त्यांपलीकडे रुद्रहिमालयाचीं बर्फानें व्याप्त अशीं चार शिखरें दृष्टिस पडतात. त्याच्या पलीकडे कांहीं दिसत नाहीं.

---

१ ही माहिती ४०।५० वर्षांपूर्वीच्या एका पुस्तकावरून घेतली आहे. अलिकडे तिरडचे कांहीं रस्ते सुधारून सोयीचे केले आहेत, असें ह्मणतात.

बंदरपौच ह्मणून हिमालय पर्वताचें एक उंच शिखर आहे, तेथून यमुनेचा उगम दिसतो; या ठिकाणास यमुनोत्री ह्मणतात. त्याच्या वरचा पर्वतप्रदेश सदोदित वर्फाच्छादित असतो. यमुनोत्रीच्या खालीं डोंगराच्या एका कडेखालीं एक खेडें आहे. त्या कडेवरून पर्वतप्रदेशांतून वहात येणारे हजारों ओहोळ खालीं पडत असतात व ते सगळे एका विस्तीर्ण कुंडांत एकत्र होतात. त्या कुंडापासूनच यमुना नदी पुढें वहात जाते. याठिकाणीं जें उच्च पर्वतशिखर आहे त्याची उंची साहेपंचवीस हजार फूट आहे; असें मि० कोलब्रुक साहेबांनीं लिहिलें आहे पण दुसरे कांहीं साहेब ती यापेक्षां कमी आहे असें ह्मणतात.

यमुनेच्या तीरीं जे खडक आहेत त्यांतून व तिच्या प्रवाहांत जे मोठमोठे डोह आहेत त्यांतून असंख्यात उन्हाळीं निघतात. हे झरे वर्फाच्या मोठमोठ्या थरांखालीं आच्छादित झाले होते. तरी साहसी आणि उद्योगी साहेबलोकांनीं त्यांचा शोध लाविला असें ह्मणतात. खालील उन्हाळांतल्या उन्ह पाण्याच्या उष्णतेनें वरचें कांहीं बर्फ वितळून जातें व बाकी राहिलेलें बर्फ, एखाद्या भव्य दिवाणखान्याला शुभ्र संगमरवरी दगडाचें छत करावें तसें दिसतें.

या पवित्र आणि मनोरम स्थळांचें कितीही वर्णन केलें तरी, तेथचें सृष्टिसौंदर्य अत्यल्पही ध्यानांत येणें नाहीं.

## नेहमीं ध्यानांत ठेवण्यासारखीं वचनें.

( संग्राहक—लाला नेमिनाथ पांगळ-बार्शी )

( मागील अंकावरून पुढें चालू )

२८ स्वतःविषयीं फार बोलूं नये. दुसरा आपल्याविषयीं बोलत असल्यास त्याला तें बोलूं द्यावें कारण तसें करणें दुसऱ्यास आवडतें ह्मणून ते बोलतात.

२९ जेथें आपली जरूरी नाहीं तेथें जाऊन आगंतुकी करूं नये.

३० एखाद्या माणसाविषयीं संशय आल्यास त्याला कामावर लावूं नये व ज्याला कामावर लाविलें त्याच्याविषयीं संशयीखोर असूं नये.

३१ शहाण्याचें तोंड त्याच्या अंतःकरणांत असतें, पण मूर्खाचें अंतःकरण त्याचे तोंडांत असतें.

३२ कोणतेंहि कृत्य करण्याबद्दल फाजील विचार करूं नये व आलेली संधी दवडूं नये.

३३ मनुष्यानें नेहमीं कर्तव्य करीत असावें. कर्तव्यच्युत झाल्यानें तो क्षीण होत जातो.

३४ दुसऱ्याकडून मिळविलेल्या शिक्षणापेक्षां स्वतः प्राप्त करून घेतलेलें ज्ञान उपयोगी असतें

३५ बुद्धी ह्मणजे उद्योग करण्याची अजब शक्ती.

३६ बाल्यावस्थेंत जे हुषार असतात तेच तारुण्यांत उद्योगाभावी कुचकामाचे बनतात. याकरितां सतत उद्योगी बनणें श्रेयस्कर आहे.

३७ जे बाल्यावस्थेंत मंदबुद्धीचे असतात तेच उद्योग, निश्चय व सच्छीलत्व यानें उत्कर्ष पावतात.

३८ मनुष्याचे ठायीं ज्ञान व शहाणपण यांची ओळख करून देणारें; चातुर्य, न्यायशक्ति व विचारशक्ती जागृत करणारें; मूढ माणसांत तीव्रता व तरुणांत ज्ञान व विवेक उत्पन्न करून देणारें तेंच खरें शिक्षण होय.

३९ ज्ञानाची योग्यता चातुर्यापेक्षां कमी आहे. ज्ञानी गर्वानें ह्मणतो मी सर्व कांहीं शिकलों; व चतुर ह्मणतो मी फार थोडें शिकलों.

४० मनुष्यानें आपली बुद्धी सुविचारांनें अलंकृत करून ती आत्म्याचें विलासमंदिर होईल अशी बनविली पाहिजे.

४१ आयुष्याचा खरा उपयोग व्हावा अशी इच्छा असल्यास चांगला व्यासंग स्वीकारून तो लक्षपूर्वक चालविला पाहिजे.

४२ मनुष्यप्राणी अत्यंत क्षुद्र दिसतो पण तो मनांत आणील तर अवाढव्य कामें करील व सर्वांस आपला दास बनवील. ' नर करणी करे तो नरका नारायण होय. '

४३ मनुष्याला पूर्णत्वास येण्यास शांतचित्त, उदार अंतःकरण, विवेकबुद्धि व निरोगी शरीर हीं आवश्य लागतात. त्याचें शांत चित्त नसेल तर उतावळा होईल. उदार अंतःकरण नसल्यास स्वार्थनिष्ट होईल. विवेकी नसल्यास त्याचे हातून अपकार फार घडतील व निरोगी नसल्यास त्याचे हातून फारसें काम होणार नाहीं.

४४ वेळेचा अपव्यय न होऊं देण्याविषयीं फार जपलें पाहिजे. पैसा सांठवितां येतो तशी गोष्ट वेळेची नाहीं. वेळ सदुपयोगांत गेली नाहीं तर व्यर्थ गेली यांत शंका नाहीं.

४५ मरणसमयीं आपल्या आयुष्याकडे अवलोकन केलें तर त्यांतील सर्व वेळ सत्कार्यांत गेला असें वाटून मरण शांततेनें यावें याचें नांव वेळेचा सदुपयोग.

४६ वेळेचा असा उपयोग करावा कीं, पुढें त्यामुळें पश्चातापास जागाच उरूं नये.

( अपूर्ण. )

## कोकिलकूजित-रहस्य.

( चाल-मन किती उतावीळ० )

कोकिले, तुझा रव तरिच गोड ।
खल मलिन जातिची हीच खोड ॥ धृ० ॥
" तूऊ तूऊ " । पंचम गाऊ ।
ह्मणसी पुरवूं श्रवण कोड ॥ १ ॥
परस्व हरणीं । कपटी करणी ।
मंजुल वाणी उडवि झोड ॥ २ ॥
काका घरटीं । होउनि मोठीं ।
करिसी करटीं बीज-मोड ॥ ३ ॥
मधु रसवंती । झांकिल ही कृति ।
परि आतां ती आस सोड ॥ ४ ॥
मनुज पिकांनीं । तव अनुकरणीं ।
केली निशिदिनिं सकल फोड ॥ ५ ॥
कृष्णकृतीला ! कृष्ण कोकिला ।
बाधक, याला काय तोड ? ॥ ६ ॥
ह्मणुनी नव हे । कोकिल पाहे ।
हंसचि देहें सुबक जोड ॥ ७ ॥
परगृहिं जाती । घर तें घेती ।
मालक होती सुकुनि रोड ॥ ८ ॥

" दर्भ "

## रमणीय वेंचे.

( ९ वे अंकावरून समाप्त. )

**मूर्खस्य पञ्च चिह्नानि गर्वी दुर्वचनी तथा ।**
**हठी चाप्रियवादी च परोक्तं नैव मन्यते ॥ ११० ॥**

मूर्खाचीं पांच चिन्हें ( लक्षणें ) आहेत. तीं:-अंगांत गर्व असणें, वाईट बोलणें, हट्ट, दुसऱ्याला वाईट वाटेल असें भाषण, आणि दुसऱ्यानें सांगितलेलें अमान्य करणें.

**मौनं कालविलंबश्च प्रयाणं भूमिदर्शनम् ।**
**भृकुट्यन्यमुखीवार्ता नकारः षड्विधः स्मृतः ॥ १११ ॥**

कोणाजवळ कांहीं मागावयास गेलें असतां, देणाऱ्या गृहस्थानें जर मौन्य धरलें, उत्तर देण्याला अवकाश लाविला, आपलें बोलणें ऐकून तो तेथून चालता झाला, आपल्याकडे न पाहतां उगीच जमिनीकडे पाहूं लागला, भिवयांनीं दुसऱ्याला कांहीं खुणा करूं लागला तर हीं सहा लक्षणें त्याचा नकार दर्शवितात.

**हरिः फरी वृश्चिक वेणु रम्भा विनाशकाले फलमुद्वहन्ति ।**
**यथा तथा सज्जनदुर्जनानां विनाशकाले विपरीतबुद्धिः ॥ ११२ ॥**

हिरीण, खेकडा, विंचू, कळक ( डवगा, बांबू, वेणु ) आणि केळ यांचा नाश होण्याची वेळ आली ह्मणजे त्यांना फळें येतात. त्याचप्रमाणें सज्जन किंवा दुर्जन कोणीही असले तरी त्यांचा नाश होण्याची वेळ आली ह्मणजे त्यांना विपरीत बुद्धी ( जें करणें योग्य, तें न करणें, ) उत्पन्न होत असते, ( हिरीण, विंचू, खेकडी ही प्रसूत होतांच मरतात अशी समजूत आहे. कळकीचे बेटाला बीं आलें ह्मणजे तें बेट मरतें, केळ एकदांच फळून मरते, हें सर्वांस माहीतच आहे. )

**स्मशानान्ते, पुराणान्ते मैथुनान्ते च या मतिः ।**
**सा मतिः सर्वदा चेत्स्यात्कोन मुच्येत् बन्धनात् ॥ ११३ ॥**

स्मशानांतून ( प्रेतयात्रेंतून ) परत आल्यावर, पुराण ऐकल्यानंतर, आणि स्त्रीसंगानंतर जशी ( वैराग्य ) बुद्धी उत्पन्न होते, तशीच बुद्धी ज्याची सर्वकाळ असते तो संसार-बंधनापासून मुक्त होणारच !

**एकादशस्थे गोविन्दे सर्वेऽप्येकादशेस्थिताः ।**
**किं, कुर्वंति ग्रहाःसर्वे शनिरङ्गारको गुरुः ॥ ११४ ॥**

एकादशस्थानीं ( लाभस्थानीं ) गोविंद असावा, ह्मणजे सर्व ग्रह तेथेंच असतात. मग शनी, मंगळ किंवा गुरु काय करणार आहेत !

**कष्टं खलु मूर्खत्वं कष्टं खलु यौवनेषु दारिद्र्यम् ।**
**कष्टात्कष्टतरं किं परगृहवासः परान्नं च ॥ ११५ ॥**

मूर्खपणा हा दुःखदायक आहे. तसेंच तारुण्यांत दारिद्र्य हें दुःख देणारें आहे; पण

यापेक्षांही अतिशय दुःखदायक असें काय ? तर दुसऱ्याचे घरीं रहाणें आणि दुसऱ्याकडचें जेवण !

योनात्मजे नच गुरौ नच भृत्यवर्गे ।
दीने दयां न कुरुते नच बंधुवर्गे ॥
किं तस्य जीवितफलेन मनुष्यलोके ।
काकोऽपि जीवति चिरं च बलिंच भुंक्ते ॥ ११६ ॥

जो पुरुष आपल्या पुत्रावर, गुरूवर, सेवकावर, गरीबावर, बंधुवर्गावर दया करीत नाहीं; त्याचें जिणें मनुष्यामध्यें असून काय उपयोग ? कावळाही बलि भक्षण करून फार काळपर्यंत वांचतो.

यास्रौरूपविनाशिनी मतिहरा पंचेंद्रियक्षोभिणी ।
नेत्रश्रोत्रललाटदर्पदमनी वैराग्यमुत्पादिनी ॥
पुत्रभ्रातृकलत्रभेदनकरा लज्जांकुरच्छेदिनी ।
सा मां पीडति सर्वदोषजननी प्राणापहर्त्री क्षुधा ॥ ११७ ॥

एक मनुष्य ह्मणतोः—जी रूपाचा नाश करणारी, बुद्धिभ्रंश करणारी, पंचेंद्रियाला संतापविणारी, नेत्र कर्ण व मस्तक यांच्या दर्पाला शमविणारी, वैराग्य उत्पन्न करणारी, पुत्र बंधु स्त्री इत्यादिकांत भेद करणारी, लज्जेचा नाश करणारी, इतकेंच नव्हे तर सर्व दोषांची केवळ माताच असून प्राणहरण करणारी ती क्षुधा मला पीडा करिते.

त्यजेत्क्षुधार्ता महिला स्वपुत्रं ।
खादेत् क्षुधार्ता भुजगीस्वमण्डम् ॥
बुभुक्षितः किंन करोतिपापं ।
क्षीणानरानिष्करुणा भवंति ॥ ११८ ॥

क्षुधेनें पीडित असलेली स्त्री आपल्या पुत्राचा त्याग करील. ह्याचप्रमाणें क्षुधार्त असलेली नागीण आपलें अण्ड भक्षण करील. क्षुधित असलेला मनुष्य कोणचें पातक करण्याविषयीं उद्युक्त होणार नाहीं ? पीडित मनुष्य निरंतर कठोर होतात.

अतिपरिचयादवज्ञा इत्यपिवचनं मृषैवमेभाति ।
अतिपरिचयेऽप्यनादौ संसारेऽस्मिन्नजायतेऽवज्ञा ॥ ११९ ॥

अतिपरिचय झाला असतां अवज्ञा होते. असें जें एकाठिकाणीं ह्मटलें आहे तें मला अगदीं खोटें वाटतें. कां, तर अनादिकालापासून चालत आलेल्या प्रपंचामध्यें अवज्ञा कधींही होत नाहीं.

गम्यते यदि मृगेंद्रमंदिरं । लभ्यते करिकपोलमौक्तिकं ॥
जंबुकालयगतेन लभ्यते । वत्सपुच्छखुरचर्मखंडणं ॥ १२० ॥

सिंहाच्या घरांत गमन केलें असतां सिंहानें मारलेल्या हत्तीच्या गंडस्थळांतील मौक्तिकांची प्राप्ति होते व कोल्ह्याच्या घरांत गेलें असतां त्याठिकाणीं त्यानें मारलेल्या प्राण्याचें शेपुट, पायाचे खुर, चर्माचे तुकडे हेंच सांपडेल.

# लोकमित्र.

## कै. गोविंद नारायण माडगांवकर.



कष्टें काया झिजवावी । उत्कट कीर्ति उरवावी ॥
चटक लावून सोडावी । कांहींएक ॥ १ ॥ रामदास.

समर्थांचा हा अनुभवसिद्ध असा उपदेश ह्या क्षणैक मानवी देहाचा नाश झाल्यानंतर त्याचें चिरकालिक स्मरण राहण्यासाठीं आहे. पंचमहाभूतांचे पृथक् पृथक् अंश एकत्र मिळून बनलेला हा मनुष्यदेह जर जगामध्यें अखंड रहावा अशी इच्छा असेल तर तो देह सुखानें पोसून लठ्ठ न करितां कष्टानें अगदीं कृश केला तरच तो या भूतलावर अखंड टिकणार आहे. मग जरी पंचमहाभूतांनीं आपआपले अंश गृहण केले तथापि त्याच्या अखंडत्वास यत्किंचितही धक्का पोहोंचणार नाहीं. आतां त्या कष्टांत मात्र दोन प्रकार आहेत. एक स्वार्थपर कष्ट व दुसरा परार्थपर कष्ट. यांतून दुसऱ्या कष्टाचीच मातब्बरी विशेष आहे आणि ह्याच कष्टानें मानवीदेहाची अखंडता सिद्ध

होते. ह्मणूनच आहे कीं, " परोपकारार्थमिदं शरीरं " तेव्हां परार्थकष्टानें देह झिजवून कीर्तिरूपानें अखंडत्व पावलेले जे कांहीं मानवीदेह या भूतलावर अवतीर्ण झाले त्यांतच प्रस्तुत चरित्रनायकाचाही समावेश होतो, ह्मणून त्यांचें थोडेंसें त्रोटक चरित्र येथें देऊन 'मित्रा' च्या वाचकवर्गास आज त्यांची ओळख करून देण्याचें योजिलें आहे.

गौडसारस्वत ब्राह्मणांचा जो एक लहानसा समुदाय दक्षिणहिंदुस्थानांत येऊन स्थीर झाला आहे, त्याचें मुख्य वसतिस्थान गोमांतकप्रांत होय. ह्याच गोमांतकप्रांतांत मडगांव येथें इ० सन १८१५ त गोविंदरावजींचें जन्म झालें. त्यांची घरची स्थिति फार गरिबीची होती. त्यांचे वडील पोर्तुगाली तपकीर व कांहीं बारीकसारीक औषधें विकून त्यांवर आपला चरितार्थ चालवित असत. कोणत्याही माणसाचा ऊर्जितकाल येण्याला जीं अनेक कारणें लागतात त्यांत स्थलांतर हें एक मुख्य आहे. फार प्राचीनकालापासून आजतागायतपर्यंतचा जर इतिहास पाहिला तर स्वतःच्या कर्तबगारीनें उदयास आलेल्या माणसांनीं आपल्या जन्मभूमीचा त्याग केलेलाच दिसतो. दाशरथी रामांनीं अयोध्या सोडून चवदा वर्षें वनवास पत्करला नसता तर त्यांचें नांव आज त्रिभुवनांत अजरामर होणें मुष्कील होतें. पाश्चात्य लोकांनीं आपली आवडती भूमी ह्मणून तिला कवटाळून धरिलें असतें, आणि हिंदुस्थानासारख्या सुवर्णभूमीचा सहवास केला नसता तर प्रस्तुतची स्थिति अनुभविण्याचा प्रसंग त्यांस क्वचितच येता. तात्पर्य, उत्कर्षदशा येण्याला स्वतःचा देश सोडावा लागतो हें उघड दिसतें. त्याप्रमाणें गोविंदरावजींचे वडील नारायणराव हे आपलें कुटुंब घेऊन १८२४ सालीं मुंबईस आले. त्यावेळीं गोविंदरावजींचें वय अवघें नऊ वर्षांचें होतें. नारायणरावजींनीं मुंबईस आल्यावर तपकीर व औषधें विकण्याचा आपला आवडता व्यवसाय चालण्याकरितां काळबादेवीच्या रस्त्यावर एक लहानसें दुकान उघडलें. वस्तुतः तत्कालीन स्थितीशीं हल्लींची वस्तुस्थिति ताडून पाहिल्यास जमीन-अस्मानाचें अंतर दिसून येईल. मुंबईसारख्या बकाली शहरांत तपकीर विकून कुटुंबचरितार्थ चालविणें बरेंच कष्टसाध्य किंबहुना अशक्यच म्हटलें तरी चालेल; परंतु त्यावेळीं नारायणरावजींनीं आपला व्यवसाय-हलकाच का

असेना पण सचोटीनें चालवून त्यांत होणाऱ्या मिळकतीवर कुटुंबचरितार्थ व मुलांचें शिक्षण, या कामास काडीमात्र आळस केला नाहीं. गोविंदरावजींस शाळेंत घालून, त्यावेळच्या रीतीप्रमाणें त्यांस पुस्तकं पुरवून, आणि त्यांच्या गुरूंस संतुष्ट ठेवून त्यांजकडून दोन अक्षरं करविलीं तरी लहानपणापासून गोविंदजींची प्रकृती फार अशक्त असल्यामुळें त्यांचा विद्याभ्यास व्हावा तसा झाला नाहीं. तेथें त्यांचा उपाय नाहीं. आहे त्या स्थितींत आणखी थोडा काल विद्याभ्यासांत घालवावा असा त्यांचा निग्रह होता; पण "मनसा चिंतितं कार्यं दैवमन्यत्र चिंतयेत्" याप्रमाणें गोविंदरावजींच्या ऐन विद्याभ्यासाच्या दिवसांतच त्यांचे वडिलांचा अंत झाला. यामुळें अल्पवयांत कुटुंबभार माथीं घ्यावा लागल्यामुळें झालेल्याच तेवढ्या विद्येवर त्यांस तृप्त राहणें भाग पडलें. पुढें हे प्रौढ झाल्यावर ख्रिस्ति धर्मोपदेशक डॉक्टर विल्सन ह्यांच्या शाळेमध्यें शिक्षकाचें काम पत्करून चाकरीस राहिले. मरणाच्या पूर्वीं सुमारें एक वर्षपर्यंत ते त्याच कामावर होते. ते आपली नोकरी संभाळून कांहीं विद्यार्थ्यांस केवळ परोपकारार्थ घरींही शिकवीत असत. त्यांच्या घरीं शिकणाऱ्या शिष्यांत प्रसिद्ध विद्वान डॉक्टर भाऊदाजी आणि ऑन० नारायण वासुदेव दाभोळकर हेही होते. गोविंदराव प्रकृतीनें जरी अशक्त होते तरी आहार आणि व्यायाम ह्याविषयीं ते फार नियमितरीतीनें वागत असत. तेणेंकरून त्यांची प्रकृती सहसा बिघडत नसे हे फावल्यावेळांत मराठी ग्रंथ लिहीत असत. यांच्यानें रात्रीं लिहिण्याचें वगैरे काम फार करून होत नसे; ह्मणून जें करणें तें ते दिवसा नियमानें करीत. यामुळें त्यांच्या हातून पुष्कळ काम होई. कोणतेंही काम रोज नियमानें थोडें थोडें केलें असतां साधारण आयुष्यमर्यादेंतही मनुष्याच्या हातून एकंदरीनें कितीतरी काम होतें, ह्याचें हें एक उत्तम उदाहरण आहे.

मराठी ज्ञानप्रसारक मंडळीचें यांनीं पुनरुज्जीवन केलें होतें, आणि ती बराचवेळ जागृत ठेविली होती, पण यांच्या मागून ती लौकरच लयास गेली. ह्यांना गुजराथी भाषाही चांगली अवगत होती. त्यांनीं केलेल्या पुस्तकांपैकीं कांहींचीं गुजराथी भाषांतरेंही त्यांनीं स्वतः करून छापविलीं आहेत. शिवाय त्यावेळीं निघत असलेल्या 'मराठी ज्ञानप्रसारक' मासिक पुस्तकांतहीं त्यांचे बरेच उपयुक्त लेख प्रसिद्ध झाले आहेत. त्यांजकडे पाहिलें ह्मणजे

असें दिसतें कीं, जनांचीं मनें नीतिमार्गाकडे वळविण्याविषयींची इच्छा त्यांच्या अंतःकरणांत विशेष प्रबल होती; असें त्यांचीं पुस्तकें वाचून पाहिलीं असतां दिसून येतें. या आमच्या ह्मणण्याची सत्यता त्यांच्या निरनिराळ्या पुस्तकांतील जे थोडे उतारे खालीं दिले आहेत त्यांवरून तर अगदीं सहज लक्षांत येईल. गोविंदरावजींनीं निरनिराळ्या विषयांवर लहानमोठीं पंधरा पुस्तकें मराठीभाषेंत लिहिलेलीं प्रसिद्ध आहेत त्यांपैकीं " उद्भिज्जन्य पदार्थ, मुंबईचें वर्णन, सृष्टींतील चमत्कार, वृक्षवर्णन, " हीं बरीच मोठीं असून वर्णनात्मक आहेत आणि " ऋणनिषेधक बोध, कुटुंबसुधारणा, दारूपासून अनर्थ, नीतिसंवाद, पत्रावळी व द्रोण, भोजनबंधूपानतंबाखू, लोखंडी सडकांचे चमत्कार, व्यवहारोपयोगी नाटक, शुचिर्भूतपणा, सत्यनिरूपण, सुलेखनविद्या, " हीं अकरा पुस्तकें लहान लहान नैतिकविषयांचीं आहेत; तथापि अत्यंत महत्वाचीं व संग्राह्य आहेत. हें त्या पुस्तकांच्या दोन, तीन, चार, पर्यंत निघालेल्या आवृत्तींवरून सहज लक्षांत येतें. लहानपणीं, कुटुंबाच्या गरीबीमुळें फारसा विद्याभ्यास झाला नसतां, केवळ आपल्या उद्योगानें ज्ञान संपादून व कुटुंबाचा निर्वाह चालवून ह्यांनीं इतके ग्रंथ लिहिले हें कांहीं थोडें नाहीं

ह्यांच्या ग्रंथांमध्यें ह्या गृहस्थांविषयीं एक गोष्ट विशेष दृष्टीस पडते. ती ही कीं, आज पन्नास वर्षांपूर्वीं गोविंदरावजींनीं हीं पुस्तकें लिहिलीं. अर्थात् त्यांची भाषा चांगली शुद्ध, सरळ आणि गोड, ह्मणजे सध्यां चांगली मराठी भाषा ह्मणतात तिच्यासारखी आहे. याविषयीं विविधज्ञानविस्तारच्या विद्वान संपादकांनीं असे उद्गार काढले आहेत कीं, " अर्थशास्त्रावर ग्रंथ लिहावयाचा तो छंदोबद्ध लिहून कितीसा उपयोग होणार आहे? तर अर्थनिरूपण, सुबोधरीतिनें करितां यावें ह्मणून तो व्यावहारीक भाषेनेंच लिहिला पाहिजे. या न्यायानें पहातां ज्यांनीं देशभाषेंत गद्यग्रंथ रचण्यास आरंभ केला ते आह्मांस वंद्य होत. सदाशिव काशिनाथ छत्रे, बाळ गंगाधर शास्त्री, हरी केशवजी, गोविंद नारायण हे आमच्या मराठी भाषेचे हुकर, ड्रायडन, टेम्पल्, आडिसनच होत. इंग्लडामध्यें या नामांकित ग्रंथकारांनीं गद्याची प्रवृति पाडून स्वभाषेची सुधारणा केली त्याप्रमाणेंच आमच्याही पूर्वोक्त गृहस्थांनीं नानाप्रकारच्या विषयांवर लहानमोठे निबंध लिहून तिच्याठिकाणीं

सरलत्व, मनोवेधकत्व आणि मार्दव इत्यादि गुण उत्पन्न केले व्याकर्ण नियमांचीही चांगली व्यवस्था केली हा महान् लाभ आह्मांस कळवून दिल्याबद्दल ते शिरसावंद्य होत " विस्तारकारांचे हे प्रगल्भ विचार अनदीं योग्य आहेत व हेच शब्द तंतोतंत आमच्या गोविंदरावजींसंबंधानें वापरण्यास कांहीं हरकत नाहीं. कारण पुण्यांत राहणाऱ्या एकाद्या मनुष्यानें अशी चांगली भाषा लिहिली असती, तर तिचें फारसें नवल वाटावयास कारण नव्हतें परंतु ते स्वतः गोव्याकडचे राहणारे असून त्यांतही मुंबई ह्मणजे त्यावेळीं भ्रष्ट मराठीचें अगदीं आगर, तेथें अशी चांगली भाषा त्यांनीं इतक्या दिवसांमागें लिहिली हें त्यांच्या कीर्तीस मोठें भूषणच होय.

इंग्रजीमध्यें आडिसन्, स्टील, स्विफ्ट, इत्यादिकांच्या लिहिण्याचा जो रोंख असे तोच रोंख ह्यांच्या लिहिण्यांत होता. उदाहरणद्वारां एखादा विषय मनांत भरविण्याची शैली ह्यांस फार चांगली साधली होती. आणखी नीतीच्या संबंधानें त्यांनीं जीं पुस्तकें लिहिलीं आहेत त्यांप्रमाणें ते स्वतः व्यवहारांत वागत असत. हा त्यांचा गूण अत्यंत अभिनंदनीय होय. आतां नैतिक विषयासंबंधी त्यांच्या ग्रंथांतील कांहीं उतारे येथें दिले असतां थोडा विस्तार होईल खरा, पण सद्यस्थितींत समाजास त्याचा फार उपयोग होणार असल्यामुळें त्यांतील थोडेतरीं उतारे येथें देणें इष्ट आहे.

'पत्रावळी व द्रोण' या लहानशा पुस्तकांत उद्योगाचे परिणाम किती सुखकारक आहेत, व त्यांपासून प्रपंचसंबंधीं सुखें किती सुगम होतात, ह्याचा विचार करतांना गोविंदराव म्हणतात.—" उद्योगानें प्रथम शरीरास आरोग्य होऊन अंतःकरणाचें समाधान होतें. चांगल्या उद्योगांत मन गुंतलेलें असलें ह्मणजे मनांत कुवासना येत नाहींत. दुसऱ्याचें अकल्याण इच्छिणें, घातपात करणें, मत्सर करणें, इत्यादि अमंगल वासना यांहींकरून मन बद्ध न होतां मोकळें व सरळ असतें. मग तें हवा तो विषय ग्रहण करण्यास तयार होतें. जसें खडूचें सुरेख चित्र करावयाचें असलें तर तो पहिल्यानें कुटून व गाळून तयार करावा लागतो, तसेंच आपल्या शरीरापासून आणि मनापासून सुंदर व मोठीं कृत्यें करावयाचीं असलीं तर त्यांस उद्योगरूप आणि मेहनतरूप खलबत्त्यांत घालून कुटून तयार केलीं पाहिजेत.....उद्योग करणें ह्मणजे डोकीवर दगड घेऊन वाहणें व छातीफुटेपर्यंत मेहनत करणें, अथवा मजुरी करून

शरीरास त्रास देणें, असें कित्येकांस वाटतें, परंतु ही त्यांची समजूत केवळ चुकीची आहे. ज्यास जो उद्योग तोलेल तो त्यानें सुखानें करावा आणि जरी अशा उद्योगांत कांहीं श्रम झाले तरी त्यापासून त्यास सुखच प्राप्त होतें. परंतु निरुद्योगी मनुष्य कधींहीं सुखी होणार नाहीं..... यथायोग्य उद्योग करण्याची उमेद आणि ज्ञानाची अभिरुची जेव्हां आह्मांमध्यें सतत वावरूं लागेल, तेव्हांच आपल्या देशांतील अज्ञानरूप दारिद्याचा उपमर्द होऊन ज्ञानरूप संपत्तीचा झेंडा लागेल. कोणी ह्मणतो कीं, हिंदुस्थान दारिद्यरूप गगनचुंबित पर्वताखालीं गर्द होऊन गेलें आहे; कोणी ह्मणतो कीं, अज्ञानरूप महानदीस पूर येऊन त्यांत तें वाहून जात आहे; कोणी, त्यास आलस्यरूप कुंभकर्णी गाढ आणि दीर्घ निद्रा लागली आहे असें ह्मणतात; कोणी ह्मणतो कीं, भित्रेपणारूप जरत्कारूसारिखा अशक्तपणा आला आहे; कोणाचें ह्मणणें, ख्यालीखुशाली व नाच तमाशेरूप जलोदर होऊन त्याच्या आयुष्याचा क्षय होत चालला आहे. परंतु अशाप्रकारचीं दूषणें लावून घेण्यास आपला देश कां पात्र झाला, याचा जर आपण क्षणभर विचार करूं तर आपल्या ध्यानांत येईल कीं आपलें सर्व दैन्य, आळस, निरुद्योग आणि विद्येची अवज्ञा, यांपासून उत्पन्न होतें. आपले लोक विद्या संपादन करावयास योग्य उद्योग करीत नाहींत. तिच्याप्रीत्यर्थ खर्चावें तितकें द्रव्य न खर्चितां ख्यालीखुशालींत खर्चितात, ह्मणून अर्थातच आह्मीं अज्ञानसागरांत बुडालों असतां आह्मांवर अनेक विघ्नें येऊन पडतात; आणि फुटलेल्या जाहजावरील नावाड्यांची जशी अवस्था होते तसी आमची सध्यांची स्थिति होण्याचें कारण हेंच आहे. कोणत्याच प्रकारचा उद्योग नसला तर मनुष्याच्या आयुष्याचा, बुद्धीचा आणि शरीराचा नाश होऊन त्याची स्थिति पशूंपेक्षांही नीच होऊन जाते."

तसेंच निर्मळपणापासून मनुष्यमात्रास किती सुख व समाधान होतें, आणि मळीणपणापासून किती दुःख व हानी होते, हं 'शुचिर्भूतपणा' नांवाच्या पुस्तकांत चांगल्या रीतीनें व्यक्त केलें आहे. याचीं पांच प्रकरणें असून पहिल्या प्रकरणांत "आपण ज्या घरांत राहातों तें स्वच्छ असलें पाहिजे; कारण तें आपणांस सुख प्राप्त होण्याचें मूळस्थान आहे, ह्मणून घराच्या सभोंवतील जागा कशी निर्मळ ठेवावी, आणि असा निर्मळपणा ठेवल्यानें कोणकोणते लाभ होतात." हें दाखविलें आहे. "सर्व संपत्ती-

मध्यें शरीरसंपत्ति श्रेष्ठ मानली आहे अर्थात् तिचें योग्यप्रकारें संरक्षण केलें पाहिजे. शरीरप्रकृती निर्मळ ठेवण्यानें कोणकोणते लाभ होतात व मळीणपणापासून काय हानी होते " ह्याचा विचार दुसऱ्या प्रकरणांत केला आहे. तसेंच " प्राणिमात्राचें संरक्षण अन्नापासून होतें, यास्तव अन्न हें सर्वांस आवश्यकच आहे. 'अन्नमय प्राण, प्राणमय शक्ति आणि शक्तिमय पराक्रम' अशी एक ह्मण आहे; परंतु जें अन्न आपण खातों तें निर्मळ आणि हितकारक असलें पाहिजे, नाहींतर त्यापासून उलट आपली हानी होते ह्मणून खाण्यापिण्यामध्यें निर्मळपणा कसा ठेवावा व त्यापासून काय लाभ होतात" याचें सांगोपांग विवेचन तिसऱ्या प्रकरणांत केलें आहे. चवथ्या प्रकरणांत " अंथरूण, पांघरूण, पोषाख वगैरे स्वच्छ ठेवण्यामुळें कोणकोणते लाभ होतात व ते ठेवावयास काय उपाय केले पाहिजेत " हें दाखविलें आहे; आणि पांचव्या प्रकरणांत " अंतःकरणाच्या व निर्मळपणाच्या आवश्यकतेचा विचार " करून ह्या लहानशा पुस्तकाची समाप्ती केली आहे. हें पांचवें प्रकरण इतकं हृदयंगम व सरस आहे कीं, त्यांतील एकही शब्द टाकवत नसल्यामुळें संक्षिप्त उतारा निवडून काढणें अगदीं अशक्य आहे. तथापि ह्या प्रकरणाच्या शेवटीं गोविंदरावजींनीं जो सारांश काढला आहे तोच येथें देतों. " मनुष्याच्या शरीरामध्यें अंतःकरण हें राजा आहे, आणि तेंच जर स्वच्छ नसेल तर त्याचा बाह्य स्वच्छपणा कांहींच उपयोगाचा नाहीं ह्मणून अंतर्बाह्य शुचिर्भूत ठेवून परमदयाळू जो परमेश्वर त्यास अनन्यभावें शरण जावें; आणि त्यानें ज्या स्थितींत आपणास ठेविलें असेल तींतच संतुष्ट राहून सन्मार्गानें चालत जावें ह्मणजे सर्व गोष्टी सुलभ होऊन सुखांचाही उत्कर्ष होत जाईल. "

जगांत ज्या अनेक सुधारणा घडून येत आहेत. त्या सर्वांत अगोदर 'कुटुंबसुधारणा' झाली पाहिजे. असें गोविंदरावजींचें मत होतें; आणि ह्मणूनच ह्या विषयावर त्यांनीं हें स्वतंत्र पुस्तक लिहिलें असावें. ह्या पुस्तकांत आमच्या कौटुंबिक स्थितीचें हृदयद्रावक अस फारच चांगलें वर्णन केलें आहे, आणि अशी ही अनावश्यक कुटुंबस्थिति सुधारण्याकरितां कसें वागलें पाहिजे ह्याचेंही दिग्दर्शन उत्तम तऱ्हेनें केलें आहे. ते ह्मणतात— " कुटुंबांतील सर्व मनुष्यांही एकत्र मिळून भक्ति करीत असावी, व आईबापांची आणि आपल्या वडिलांची यथाशक्ति सेवा करावी; ते जो चांगला

उपदेश करतील तो सर्वकाळ मानून त्यांची आज्ञा मोडूं नये; आपले भाऊबंदांसी स्नेह ठेवावा, त्यांस आपल्याकडून सर्व सुख मिळावीं ह्मणून देवाची प्रार्थना करीत जावी. ते रोगी झाले असतां औषधोपाय करून त्यांना साह्य करावें. जारण मारण इत्यादि मंत्र्यांच्या ढोंगावर कदापि विश्वास ठेवूं नये. पहा ! या अज्ञानास काय ह्मणावें ! जर दुगाणीच्या शेंदुरानें आणि अर्धीच्या निंबानें रोगी बरे होतील तर हजारों रुपयांच्या औषधांचा काय उपयोग ? रोग्यास औषध, क्षुधितास अन्न, तृषितास पाणी, हें ईश्वरानें निर्माण केलें आहे, तें उगीच काय ? जर मांत्रिक उपायानें रोग जातील तर क्षुधेलाही तोच उपाय कां करीत नाहींत ? असल्या खोट्या रीति हिंदुलोकांच्या घरांत बहुतेक आहेत त्या काढून टाकाव्या. सर्व अवस्थेमध्यें सृष्टिकर्ता जो परमेश्वर त्यासच शरण जावें; सर्व दुःखांचा परिहार करणारा त्यावांचून दुसरा कोणी नाहीं. आईबाप व कुटुंबांतील दुसरे मनुष्यांस, जीवंतपणीं जेवढें आपल्याच्यानें सुख देववेल तेवढें देत असावें. ” असे हे त्यांचे विचार आज पन्नास वर्षांपूर्वींच्या कुटुंबस्थितीस अनुलक्षून आहेत. अर्थात् त्याचा परिणाम सध्यांच्या कुटुंबस्थितीवर कितपत झाला आहे व होत आहे ह्याचा विचार वाचकांनीच करावा ! ‘ लोकांच्या सुधारणाविषयीं लहान लहानशा पुस्तकांत गोविंदरावजीनीं ज्या गोष्टी लिहिल्या आहेत त्या लक्ष देऊन पक्षपात न धरितां आमच्या लोकांनीं वाचाव्या ’ अशी आमची सर्वांपाशीं आग्रहाची विनंति आहे. असो.

गोविंदरावजींचे हे ग्रंथ वाचून आमच्या लोकांस नानाप्रकारच्या अनेक नव्या गोष्टी कळल्या असल्या पाहिजेत, आणि नीतिनें वागण्याविषयीं उपरति झाली असली पाहिजे. हे ह्या राष्ट्रावर त्यांचे मोठे उपकार समजले पाहिजेत. शिवाय गोविंद नारायण हे आपलें काम मनोभावें करणारे, निर्व्यसनी, सुशील आणि भाविक होते; ह्यामुळें जरी ते हिंदुधर्मानें वागणारे होते तरी त्यांजवर डॉ० विल्सन् ह्यांचा फार लोभ होता. असो. पुढें लौकरच ह्मणजे इ. स. १८६५ ह्या वर्षाच्या मार्च महिन्याच्या १५ व्या तारखेस ह्यांस देवाज्ञा झाली डॉ० भाऊदाजीसारख्या विद्वानांनी यांचे स्मारकाकरितां बराच फंडही जमविला होता.

---

गणेशशर्मा.

## सहनशीलता.

अतृणेपतितो वन्हिः स्वयमेवोपशाम्यते ! ।

कांहीं कांहीं मनुष्यांत हा गुण स्वाभाविक असतो कोणी कांहीं केलें तरी त्यांच्या शांतिचा भंग होत नाहीं. कसाही प्रसंग येवो, त्यांचा राग न वाढतां शांतीच वाढत जाते ! हा गुण संपादन करण्यास अभ्यास फार जबरदस्त केला पाहिजे. स्वाभाविक शांत असणें वेगळें व अभ्यासानें शांत होणें वेगळें. थोड्याथोडक्या गोष्टीनेंसुद्धां संतप्त होणारीं माणसें समाजांत आपल्यास पुष्कळ पाहावयास सांपडतात. केव्हां केव्हां तर त्यांचा अकारण संताप पाहून आपल्यास हंसूं आल्याशिवायही रहात नाहीं. त्याप्रमाणेंच स्वाभाविक शांत असणारांची विलक्षण शांति पाहूनही प्रसंगीं विलक्षण आश्चर्य वाटतें ! परंतु या दोन्हीं प्रकारच्या स्थितींत न सांपडतां मध्यम प्रकारांत राहण्याचा प्रयत्न केल्यास आपला फायदा होतो. माठमोठ्या माणसांचा शान्तपणा पाहून आपल्यास पुष्कळ बोध घेतां येईल व क्षुल्लक कारणावरून संतापण्याचा आपला स्वभाव टाकतां येईल. याकरितां अशाप्रकारचीं कांहीं उदाहरणें या खालीं लिहितों:—

तुकाराम साधु यांची वृत्ति फार शांत होती. एका गोष्टींत तर त्यांचें व साक्रेतिसाचें अगदीं साम्य होतें ! उभयतांच्या बायका रागीट व नवऱ्यावर शह ठेवण्यास पाहणाऱ्या होत्या. उभयतां साधु केवळ शांत, शांतीचे पुतळे, होते. तुकारामाच्या बायकोनें तुकारामासच शिवीगाळ करून राहूं नये तर विठोबावरही ताशेरा झाडावा व साक्रेतिसाच्या बायकोनें साक्रेतिसाची वाटेल तशी खरडपट्टी काढावी ! तुकारामाच्या बायकोनें शिव्या दिल्या तर त्या तुकारामबोवांनीं अगदीं स्वस्थपणें ऐकून घ्याव्या व तिच्याच पक्षाचें प्रतिपादन आपण करावें. बायकोनें दिलेल्या त्रासाचें त्यानें अभंगानें वर्णन करून ठेविलें आहे. त्यांतील एक अभंग येणेंप्रमाणें: —

**काय नेणों होता दावेदार मेला । वैर तो साधिला होउनि गोहो ॥ १ ॥**
**किती सर्वकाळ सोसावें हें दुःख । किती लोकां मुख वासूं तरी ॥२॥**

* * * * *

**तुका म्हणे येती बाइले आसडे । फुंदानियां रडे हांसे कांहीं ॥ ४ ॥**

बायको कितीही रागावली व तिणें कितीही दुरुत्तरें केलीं तरी तुकारामाची शांति तिळभर ढळली नाहीं! साक्रेतिसाचें असेंच होतें, साक्रेतिसाचा स्वभाव प्रथम फार तापट होता, पण पुढें त्यानें अप्रतिम शांति संपादिली. त्याची बायको मोठी हुजतखोर व तापट होती. एकदां ती साक्रेतिसावर इतकी रागावली कीं, तिनें त्याचें डगलें भररस्त्यांत फाडलें! त्याला अपशब्दांची लाखोली वाहिली, तरी त्याची शांति ढळत नाहीं, असें पाहून एक घाणेरड्या पाण्याचें मोठें भांडें घेऊन त्याच्या आंगावर ओतलें! पण साक्रेतिसास राग आलाच नाहीं! तो ह्मणाला इतकी मेघगर्जना झाली, तेव्हां वर्षाव होणें साहजिकच आहे!

एकनाथांची शांति अशीच होती. त्यांचें साधुत्व पाहण्याकरितां एका म्लेंच्छानें त्यांच्यावर बुध्या थुंकी टाकली, पण एकनाथांनीं न रागावतां पुन्हा स्नान केलें, त्या म्लेंच्छानें पुन्हा थुंकी टाकली पण एकनाथांनीं न रागावतां पुन्हा स्नान केलें. शेवटीं म्लेंच्छास थुंकण्याचा कंटाळा येऊन त्यान नाथांची क्षमा मागितली. नाथ ह्मणाले, बाबा, तूं मोठा परोपकारी आहेस कारण तुझ्यामुळें मला आज अनेक गंगास्नानें घडलीं. तूं थुंकला नसतास तर मला हा लाभ घडला नसता!

रायमल्लाला संग, पृथुराज, व जयमल्ल, असे तीन मुलगे होते, तिन्ही मोठे पराक्रमी होते. पण संगाला घरांतील कलह आवडत नसे. एकदां यांचा चुलता सूरजमल्ल व हे दोघे मुलगे यांचें भांडण लागलें. सुरजमल्ल व पृथुराज, यांची लढाई जुंपली, तेव्हां संग रानांत जाऊन राहिला! तो एकाच्या घरीं गुरें राखावयास राहिला होता. एक दिवस त्याच्या यजमानास राग येऊन तो त्याला ह्मणालाः—" खायाला मात्र पाहिजे पण काम करावयास नको! पण संगानें त्यावर कांहींएक उत्तर दिलें नाहीं! इंग्लंडचा राजा अलफ्रेड व शिवाजी यांबद्दलही अशाच आख्यायिका प्रसिद्ध आहेत.

जिनीवा येथें आबारेट ह्मणून एक तत्वज्ञ होता. त्यास कधीं राग येत नसे. त्याच्या घरीं एक बायको तीस वर्षें चाकरीस होती. तिनें त्यास रागावलेला कधींच पाहिला नाहीं. एकदां कांहीं मंडळींनीं त्यास कसोटीत लावयाचा बेत केला. त्यांनीं त्या बाईस सांगितलें कीं, तूं आपल्या धन्यास राग

आणशील तर तुला आम्हीं चांगलें बक्षिस देऊं तिनें तें कबूल केलें. त्याला बिछाना चांगला घातलेला फार आवडत असे, ह्मणून तिनें त्याचा बिछाना त्यादिवशीं चांगला घातला नाहीं. दुसऱ्या दिवशीं आबारेटानें तीस विसारलें. तिनें कांहींतरी निमित्त सांगितलें. पण त्या दिवशींही बिछाना नीट घातला नाहीं. दुसऱ्या दिवशीं पंडितानें तिला विचारलें. तिणें कांहींतरी निमित्त सांगितलें पण बिछाना नीट केलाच नाहीं. तिसरे दिवशीं पंडित तिला ह्मणालाः —' तूं अझून माझा बिछाना नीट केला नाहींस. तुला कदाचित् श्रम होत असतील, म्हणून तूं करीत नाहींस असें वाटतें. पण ही कांहीं मोठी गोष्ट नाहीं, कारण मला आतां तशाही बिछान्याची संवय पडत चालली आहे !

---

## पातिव्रत्याचें माहात्म्य.

( लेखक—गरधारी. )

शके १७४० च्या सुमाराची गोष्ट. आतां पोर्तुगीज अमलाखालीं असणारे पेडणें, सांखळी, डिचोली हे महाल त्यावेळीं सावंतवाडी संस्थानांत मोडत होते. पुढें लवकरच सावंत व फिरंगी यांच्यांत लढाई होऊन सदहु महाल फिरंग्यानीं काबीज केल.

सावंतवाडी संस्थानांत त्यावेळीं कशी बेबंदशाही माजली होती याचा विशेष पाल्हाळ करीत न बसतां एवढें सांगितलें म्हणजे बस्स आहे कीं, " मूर्तिमंत बेबंदशाही ' त्याठिकाणीं वास करित होती. त्यावेळचे राजेसाहेब हे मनोरंजनार्थ हजारों लोक उभे करून त्यांचीं डोकीं उडवणाऱ्या वेड्या महमदाच्या पंथाचे असल्यामुळें सावंती राज्याची प्रजा त्यावेळीं किती शांततेनें नांदत होती असेल याचें अनुमान होईल.

कृष्णाराऊळ कुडाळकर या नांवाचा एक आडदांड व निर्दय मनुष्य त्यावेळच्या राजेसाहेबांच्या मर्जींतला होता. तो इतका कीं, गमतीनें एका मनुष्याचें डोकें उडवावें असें जर त्याच्या मनांत आलें व ती गोष्ट त्यान राजेसाहेबांच्या कानावर एकदां घातली कीं आटोपलें काम. मग त्याच्यावर अपील किंवा स्पेशल कांहींच चालण्यासारखें नव्हतें. अशी स्थिति असल्यामुळें

कृष्णाराऊळ व त्याच पंथाची आणखी कांहीं मंडळी यांना लोक इतके कांहीं थरकांप भीत असत कीं, राज्याचे खरे मालक तेच कीं काय असें तिऱ्हाइतांस वाटल्यावांचून राहत नसे.

पेडणें महालांतील हरमल गांवच्या एका फारच श्रीमंत गौडसारस्वत ब्राह्मण गृहस्थानें कृष्णारावळाचा कांहीं मानभंग केला. कृष्णारावळास आपला मानभंग झालेला पाहून काय वाटलें असेल याची कल्पना वाचकांनींच करावी. त्या ब्राह्मणास अर्धा खाऊं कीं सगळाच गिळूं असें त्यास झालें. सगळ्या संस्थानांत जो आपली सत्ता ह्मणवीत असे त्याचा अपमान यःकश्चित् नोडग्या बामणानें करावा आणि तो आपण – कृष्णारावळानें– पाहावा. येथपर्यंत मज्जल ठेपली अं! हा अपमान जर प्रत्यक्ष ताडावर झाला असता तर तो अपमान करणारा बिचारा तत्क्षणींच जगांतून नाहींसा झाला असता; पण तो पडला हरमलास आणि कृष्णाराऊळ सावंतवाडीस त्यामुळें त्याचा सूड कसा घेऊं असा विचार करावयास कृष्णारावळास वेळ मिळाला.

होणार गोष्ट! कृष्णारावळास अशी बातमी लागली कीं, त्या गृहस्थाच्या एकुलत्याएका मुलांचें आजपासून चवथ्या दिवशीं गर्भाधान आहे. मग काय! देव पावला!! कृष्णाराऊळ त्याच ठिकाणीं ह्मणाला " × × बामुरड्याचो जर सत्यानास करीन तरच नांवाचो कृष्णारावळ!"

हे शब्द ह्मटल्याच्या चवथ्या दिवशींची गोष्ट. दुपारचे बारा वाजून गेले आहेत. हरमल गांवांत त्या गृहस्थाचेइथें तो समारंभ चालला आहे. त्या गृहस्थचा मुलगा व त्याची बायको हीं होमकुंडाजवळ बसलीं आहेत. भटजीबावांनीं आपली चर्पटपंजरी सुरू केली आहे, इकडे वाद्यें वाजताहेत अशा मंगलप्रसंगीं कृष्णरावळाची भयंकर मूर्ती मंटपाच्या दरवाजावर येऊन थडकली!

कृष्णारावळाचा पोषाख म्हटला ह्मणजे डोक्यास तांबडा पटका असून त्याचें एक शेंवट उजव्या छातीवर लोंबतें असे. त्याचप्रमाणें तांबड्या बनातीची एक बंडी अंगांत व मळलेलें असें एक रेशीमकाठी धोतर नेसावयास. पायांत पट्ट्यांचें काळें कुळकुळीत व कर्कर करून वाजणारें जुतें व एक काळी घोंगडी आंगावर. हातांत एक भला भक्कम पाळकोयता. याच

पोषाखानें तो वर सांगितल्याप्रमाणें मंडपाच्या दरवाज्याजवळ येऊन ठेपला! कृष्णाराऊळ ! आणि अशावेळीं याठिकाणीं! प्रत्येकजण त्याला पाहूनच गर्भगळित होऊन गेला मग तो आला आहे कशासाठीं हें कळल्यावर त्या बिचाऱ्यांची काय स्थिति झाली असती हें कोण सांगेल?

त्या काळपुरुषास पहातांच भटजींनीं आपलीं तोंडें बंद केलीं. वाद्यें तर थांबविलींच आणि जिकडे तिकडे सामसूम झालें. कृष्णारावळाची चर्या यावेळीं पाहण्यासारखी होती अपमानजन्य संतापातिरेकानें त्याचें डोकें भणाणून गेलें होतें. थोडक्याच वेळांत त्याठिकाणीं जो प्रळय होणार होता त्याचा उपोद्घात याच्या तोंडावर स्पष्टपणें दृग्गोचर होत होता. क्रोधातिशयानें त्याच्या तोंडांतून जरी शब्द बाहेर पडत नव्हता तरीही तो मोठ्या आवेशानें, समोर खिन्नवदन असलेल्या त्या गृहस्थास ह्मणाला "बामणा! गाळी घातलेल्यो त्यो तूंच न्हय! आँ? माकां ह्या कृष्णारावळाक् तूं ओळखूंक नाय्!" अरे × × × आज मी कित्याक आयलसय ठावूक आसा? तुझ्या झिलाचे हात तोडतलंय आणि तीं सोन्याचीं कडीं घेतलंय! समाजलां मां?"

हे शब्द ऐकतांच त्या पित्याची शुद्धि गेली. तो जमिनीवर धाड्दिशीं आदळला. घरांत जिकडे तिकडे रडारड सुरू झाली. त्या मुलाची आई तर निचेष्टित पडली, खरंच आहे एकुलता एक मुलगा. मोठ्या हौसेनें आज हा समारंभ चालला आहे आणि त्यावेळीं असें विघ्न आलेलें कुठल्या आईच्यानें पहावेल बरें? सारांश, एका पावघटकेपूर्वीं आनंदांत गर्क असलेल्या त्या घरांत एका क्षणांत हलकल्लोळ उडून गेला. त्याला पूर्णाहुती देण्याकरतांच कीं काय कृष्णाराऊळ तो भयंकर पाळकोयता घेऊन पुढें सरसावला आणि त्या मुलाचा उजवा हात त्यानें धरला.

तें भयंकर कृत्य पाहून सावध असलेल्यांपैकीं प्रत्येकाची बोबडी वळून गेली इतक्यांत मुलाचा बाप जरा सावध झाला. त्यानें तो हात धरलेला पाहतांच कळवळ्यानें त्याचीं आंतडीं तुटलीं. तो धांवत धांवत पुढें आला आणि कृष्णारावळाच्या पायांवर त्यानें लोळण घेतली तो ह्मणाला "कृष्णा! नकोरे असें करूं; तुला या माझ्या पोराची थोडीतरी दया येऊंदर! याक्षणीं मला मार पण माझ्या मुलास सोड! माझ्या सुनेस चुडे दान दे! तुला

अनंतपुण्य लागेल. मी तुझा सर्वस्वी अपराधी आहें, क्षमा कर! तुला पाहिजे तर त्याच्या हातांतलीं सोन्याचीं कडीं काढून देतों, पाहिजे तर माझी सगळी दौलत देतों पण माझ्या मुलास सोड.

पण कृष्णाराऊळ तो! त्या निर्दयाला कसली दया येते! त्याचा राग मात्र अधिक भडकला. त्या गृहस्थास त्यानें धाड्‌दिशीं लाथेनें उडविलें व त्या पाळकोयत्याच्या एका घावानें त्या मुलाचा उजवा हात तोडला त्याक्षणीं रक्ताची जी चिळकांडी उडाली तिच्यायोगानें कृष्णाराऊळ लालभडक झाला त्याचा चेहरा फार भयंकर दिसूं लागला.

त्या रक्ताचा एक थेंब जवळच उभी असलेल्या एका युवतीच्या डाव्या हातावर पडला!!

वाचकहो! ही स्त्री कोण हें सांगितलें पाहिजे असें नाहीं तें तुह्मीं समजून चुकलांच असाल. मघांपासून चाललेला प्रकार ही अबला अवलोकन करित होती. आपल्या परमप्रिय पतीच्या रक्ताचा थेंब आपल्या डाव्या हातावर पडलेला पाहून त्या षोडशवर्षा रूपसंपन्न पतिव्रतेची स्थिति काय झाली असल अशी वाचकहो! तुमची कल्पना धांवते? कदाचित् ती निचेष्टित पडली असेल किंवा डोकें फोडून घेऊं लागली असेल! असेंच ना? छः! अशींच जर तुमची कल्पना असेल तर ती चुकीची आहे! आपल्या डाव्या हातावर पतीच्या रक्ताचा थेंब पडलेला पाहून त्या पतिव्रतेचें स्वरूप तात्काळ पालटलें! क्रोधातिशयानें ती थर-थर-थर-थर कांपूं लागली! आपण आहे कोठें. करतें आहें काय याचें भान त्या साध्वीस राहिलें नाहीं; इतक्यांत त्या अनर्थाची पूर्णता करण्यासाठींच की काय कृष्णारावळानें तिच्या पतीचा दुसराही हात तोडला; आणि तीं दोन सोन्याचीं कडीं त्यानें आपल्या हातांत घेतलीं.

हा प्रकार पाहतांच त्या साध्वीची काय स्थिती झाली असेल बरें? तिचें देहभान अगदीं गेलें आणि अंतकाळीं ती हे शब्द बोलली:—

"मेल्या! निर्दया!! अशावेळीं तूं आह्मांत असा विघाड पाडलास तर तुझ्या वंशांत असे हात खिळखिळे होतील, ते असून नसल्यसारखे होतील आणि हाल हाल होऊन तुझा आणि तुझ्या वंशांत जे जे कोणी होतील त्यांचा सत्यनाश होऊन जाईल."

असें ह्मणून ती पतिव्रता तुळशीदेवीच्या पुढ्यांत गेली आणि तिनें तिनदा डोकें आपटून प्राण दिला.

पुढें काय झालें हें सांगितलें पाहिजे? तो अनर्थकारक प्रसंग पाहून त्या मुलाचा बाप व आई हीं एका महिन्यांतच मरण पावलीं. त्यांचा मुलगा व त्याची बायको यांचें दहन एका चितेवर केलें. त्याठिकाणीं थडगें बांधिलें आहे असें सांगतात. हा अनर्थकारक प्रसंग त्या प्रांतांत बरेच दिवस एक बोलण्याचा विषय होऊन राहिला होता.

पण इकडे काय झालें? कृष्णा राऊळ मरण्यापूर्वीं तो सातवर्षें बिछान्यावर पडून होता, त्याच्या आंगांत किडे पडून तो मेला असें सांगतात. हें कसेंहि असलें तरी एवढें निःसंशय खरें कीं, त्या पतिव्रतेनें दिलेला शाप खराच झाला कृष्णारावळाचा एक मुलगा, दोन मुली व त्या मुलाचे दोन चार मुलगे हे प्रस्तुत लखकाच्या पाहण्यांत आले आहेत व दररोज़ येताहेत. त्यांना हात असून नसल्यासारखे आहेत जेवायचें झालें तर उजवा हात डाव्या हाताकडे न्यावा लागतो, तेथून तो वर उचलावा लागतो व घारीला ज्याप्रमाणें घिरट्या घेत घेत उंच जावें लागतें त्याप्रमाणें उजवा हात यांना तोंडाकडे मोठ्या सायासानें आणावा लागतो, अशी स्थिति आहे; ही कांहीं काल्पित गोष्ट नव्हे. कृष्णारावळाला पाहिलेले मनुष्यही अद्याप आमच्या इकडे आहेत व त्याच्या वंशजांची स्थिति तर प्रस्तुत पाहण्यास मिळते आहे. सांगण्यासारखी गोष्ट ही कीं, सदर्हु मुलांपैकीं एक मुलगा दुसऱ्या घराण्यांत दत्तक दिला आहे व त्या मुलाचे हातपाय अगदीं शाबूद आहेत.

या गोष्टीवरून पातिव्रत्याचें माहात्म्य काय आहे हें व्यक्त होतें हें तर झालेंच तथापि याशिवाय आणखीही कांहीं अनुमानें करतां येण्यासारखीं आहेत. " सृष्टिनियम " या शब्दाला ब्रह्म मानून चालणारे अर्धे नास्तिक सुधारक आमच्या समाजांत जे कोणी आहेत, त्यांना या गोष्टीवरून असें ह्मणणें भाग आहे कीं, ईश्वर या शब्दाची जी व्याख्या आपण करतों त्याच्या पलीकडे तो आहे. त्या पतिव्रतेचे शब्द एवढे कांहीं मंत्रमय नव्हते कीं ते कृष्णारावळाच्या खांद्यांत बसून त्याचे हात खांद्यापासून साफ मोकळे व्हावे व ती परंपरा त्याच्या वंशांत सुरू व्हावी. तर मनुष्याचा शास्ता ह्मणून जो

कोणी आहे तो मात्र त्या शब्दांचा बांधला गेला ! कां ? तर ते उच्चारणाऱ्या व्यक्तीच्या गुणामुळें. त्यानेंच तिचे शब्द खरे करविले याच कारणामुळें आपल्या हिंदुधर्म शास्त्रांत सांगितलें आहे कीं " स्त्रीला पति हाच प्रभू होय ? "

यावरून असें ह्मणावयास हरकत नाहीं कीं त्या साध्वीनें शाप दिल्यावर त्यांचे हात निरुपयोगी होण्यास जें कांहीं गुप्त कारण घडलें त्यांचेंच नांव ईश्वराचें निराकार स्वरूप !

---

## श्रीक्षेत्र माहूर.



अज्ञानांधःकारांत निमग्न झालेल्या, पापरूपी डोहांत बुडत असलेल्या, संसाररूपी मोहजालांत गुरफटलेल्या, नास्तिकमतरूपी आडमार्गानें ठेंचळत असलेल्या, आणि विषयसमुद्रांत गटंकळ्या खात असलेल्या खलजनांस भक्तिमार्गास लावण्याच्या प्रेरणेनें परमेश्वरानें जगाच्या पाठीवर अनेक पवित्र-स्थलें निर्माण करून त्या त्या ठिकाणीं निरनिराळ्या रूपानें वास केला आहे. अशीं जीं जीं ठिकाणें आहेत व जेथें मोठमोठे महात्मेलोक वास करितात अशा ठिकाणास क्षेत्र असें ह्मणतात. अशांपैकीच " श्रीक्षेत्र माहूर " हें एक होय. या प्रसिद्ध क्षेत्राचे ठिकाणीं नित्यशः शेंकडों लोक जात असतात; तथापि नवीन जाणाऱ्या लोकांस तेथील माहिती नसल्यामुळें त्याठिकाणीं जीं जीं स्थळें पाहण्यासारखीं आहेत तीं सर्व त्यांचे पाहण्यांत येत नाहींत. तेव्हां अशा क्षेत्राची माहिती मित्राचे वाचकांस थोडीतरी कळावी ह्मणून अल्प-मतिनें हा प्रयत्न केला आहे.

माहूर हा गांव निजाम इलाख्यांतील आदलाबाद जिल्ह्याचे उत्तरदिशेस २५ कोसांवर आहे. येथून २ मैलांवर पैनगंगानदी वाहते. याचठिकाणीं इंग्रजसरकार आणि निजामसरकार यांची वऱ्हाडप्रांताशीं हद्द आहे. हा प्रांत पर्वतांनीं, डोंगरांनीं व दाट झाडींनें गच्च भरून गेला आहे. कोण-त्याही मार्गानें माहुरास जावयाचें झाल्यास मोठे पहाड व डोंगर ओलांडल्या-

खेरीज जातांच येत नाहीं, एखादा नवीन मनुष्य एकटाच झाडींत शिरून पुन्हां निघालेल्या पहिल्या स्थळावर परत येईन ह्मणेल तर तें अशक्य आहे; तसेंच येथें वाघ, अस्वलें, कोल्हीं, लांडगे इत्यादि हिंस्रपशूंचें प्राबल्य जास्त असल्यामुळें या अरण्यांतून एकट्यानें फिरणें घोक्याचेंही आहे.

पूर्वी ज्यास " दंडकारण्य " ह्मणत होते तो हाच प्रांत होय, या अरण्यांत फार प्राचीनकाळीं मोठमोठे ऋषी, गोसावी व निस्पृही असे महात्मे आपल्या शरीराचें भय किंचितही न बाळगतां तपश्चर्येस बसत असत, तसेच हल्लींच्या काळींही कित्येक निस्पृही साधुसंत आपल्या जिवाची आशा सोडून या अरण्यांत आनंदानें राहतात! खरोखरच ज्यास सर्व आशा सोडून, मायेचा त्याग करून, संसारसुख तुच्छ मानून, निवळ परमेश्वराची प्राप्ती करून घेणें असेल, त्यास माहूरासारखें दुसरें निवांतस्थळ क्वचीतच सांपडेल. याच दंडकारण्यांत श्रीरामचंद्र वनवास करीत होते; याविषयीं अशी एक कथा आहे कीं, ज्यावेळीं श्रीरामचंद्र येथील पर्वतावरील श्रीदत्तात्रयाचें दर्शन घेण्यास आले, त्यावेळीं इकडील मनुष्यें, नद्या, पर्वत व झाडें देखील त्यांचें दर्शन घेण्यास्तव उत्सुक होऊन मुखानें " श्रीराम, श्रीराम " अशीं अक्षरें काढीत! याचें प्रत्यक्ष उदाहरण पाहूं गेलें तर, अद्यापीही येथील क्वचित झाडांवर श्रीरामाचे नांवाचीं अक्षरें उमटलेलीं दिसतात! यावरून वरील गोष्ट खरी ठरते.

येथील लहानसहान पर्वतापेक्षां श्रीगुरु दत्तात्रयाचें स्थान, श्रीरेणुकादेवीचें स्थान, श्री अत्रीऋषी व अनुसूया मातेचें स्थान, हे तीन मुख्य पर्वत गणिले असून चौथ्या पर्वतावर एक सुप्रसिद्ध किल्ला आहे. आतां आपण प्रथम " श्रीगुरु दत्तात्रयाचे पर्वताकडे वळूं.

पुराणांतरीं प्रसिद्ध असलेलें श्रीगुरु दत्तात्रयाचे निद्रेचें जें स्थान तो हाच पर्वत होय. येथील मुख्य मालकास " महंत " असें ह्मणतात. हा पर्वत जमीनीपासून सुमारें ६ मैल उंच आहे. तसेंच चोहोंकडोन झाडांनीं वेढलेला असल्यामुळें चांगल्यारीतीनें वर जाण्यास ह्या पर्वतास मुख्य दोनच रस्ते आहेत, तेही इतके अकुंचित आणि चढाऊ आहेत कीं, या पर्वतावर बैलांची गाडी मुळींच जाऊं शकत नाहीं आणि जे अगदीं लहान रस्ते

आहेत, त्या रस्त्यांनीं तर मनुष्यांस नुसतें ( ओझ्याशिवाय ) जाणेंही कठीण पडतें. या पर्वतावर चढतेवेळीं सभोंवतालचे दाट झाडीकडे दृष्टी फेंकिली ह्मणजे मनांत बरीच भीति आणि मौज वाटूं लागते. जमीनीपासून सुमारें ५॥ मैल उंच आल्यावर येथ एक तीर्थ आहे; हें तीर्थ ह्मणजे एक चौकोनी मोठेंसें कुंड आहे. ह्या कुंडांत एक गायमुख आहे. ह्या गायमुखावाटे तीर्थ-कुंडांत पाणी येत असतें. गायमुखांतून पाहूं गेलें तर पाणी कोठून येत असेल याचा अंदाज कळत नाहीं. इतक्या उंच पर्वतावर देखील परमेश्वरानें निव्वळ प्राणिमात्रांचे संरक्षणाकरितां पाण्याची सोय केलेली आहे ! या तीर्था-वर आलें ह्मणजे अगोदर स्नान करावें लागतें. येथें स्नान करण्याकरितां पाणी कुंडाच्याबाहेर काढलें पाहिजे. कारण ह्याच तीर्थाचें पाणी देवाचे पूजेस जात असून महंतादिक मोठमोठे महात्मेलोकांचें जीवन याच तीर्थावर आहे. त्यामुळें महंतमहाराजांनीं येथील पाण्याचा चांगला बंदोबस्त राहण्या-करितां एका गोसाव्याची येथें नेमणूक केली आहे; या तीर्थावर थोडेंसें मैदान आहे; त्यांत एकदोन झोंपड्या असून फुलें, फळें यांचीं कांहीं झाडेंही लाविलीं आहेत; त्यामुळें दाट झाडींतून वर चढून आल्यावर श्रांत मनाला विश्रांति देणारें, तृषार्ताची तृषा हरण करणारें, भयभीतांस अभय देणारें, रोग्यांस स्नानद्वारें आरोग्य करणारें, योग्यांस सुमार्ग दाखविणारें, तपस्वी लोकांस उत्तेजन देणारें, आणि अघोर पापांचें क्षालन करणारें हें तीर्थ आहे असें वाटतें.

या तीर्थांत स्नान केल्यावर थोडेसें वर चढतांच बांधीव पायऱ्या लाग-तात, त्या पायऱ्यांवर मोठमोठ्या लोकांनीं आपली कीर्ति अजरामर राहणें-स्तव नांवें खोदून ठेविलीं आहेत; सुमारें दोनतीनशें पायऱ्या चढणें झाल्या-वर येथून देवळास आरंभ होतो. आरंभीं श्रीमहारुद्राचें देवालय असून मग श्रीदत्तत्रयाचे देवळांत प्रवेश होतो. देवापुढें मोठें पटांगण असून कोणतीही सभा होणें किंवा कोणत्याही गोष्टीविषयीं सार्वत्रिक विचार करणें असल्यास तो याठिकाणीं होतो. येथून पुढें गेल्यावर मोठेंसें दालन आहे; याठिकाणीं यात्रेचेवेळीं श्रीदत्तात्रयाचा जन्मोत्सव होतो. पुढें श्रीगजाननमहाराजांची एक स्फटिकाची मूर्ती आहे ती दृष्टीस पडते. तिचें दर्शन घ्यावें व जवळच

श्रीदत्तात्रयाची शयन करण्याची जागा आहे ती पहावी. पुढें श्रीदत्तात्रयाचे दर्शनास जाऊं लागलें ह्मणजे डाव्या हाताकडील कोपऱ्यांत श्रीकैलासनाथांची पंचमुखी स्फटिकाची मूर्ती आहे तीचें दर्शन घेऊन पुढें देवालयांत प्रवेश करावा लागतो. देवालयांत प्रवेश करतेवेळीं कांहींसें भुयारांत उतरावें लागतें. याठिकाणीं बराच अंधःकार दृष्टीसमोर येतो, त्यास दूर सारून पुढें गेल ह्मणजे—

औदुंबरः कल्पवृक्षः संगमः कामधेनवः ।
चिंतामणी गुरौपादं दुर्लभं भुवनत्रयः ॥

असा जो अखिलजगाचा पालनकर्ता व ज्याचे पाय त्रिभुवनांत दृष्टीस पडण्यास कठीण, त्या श्रीगुरु दत्तात्रेयाचें दर्शन होतें. दर्शन घेतांच कसलाही पापी, खल, दुर्जन किंवा नास्तिकमताचा मनुष्य असला तरी त्यास भक्तीचा अंकूर उत्पन्न होऊन याठिकाणाहून हालूं नये असें वाटूं लागतें.

श्रीची पूजाअर्चा झाल्यावर भुयारांतून बाहेर आलें म्हणजे जवळच दुसऱ्या दालनांत एका खोलींत श्रीदत्तात्रय, अनुसूया, व अत्रीऋषी यांच्या सुवर्णांच्या मूर्ती ठैविलेल्या आहेत त्याचें दर्शन घ्यावें. या मूर्तीचे दर्शनास एक रुपया फी ठेविली आहे यामुळें गोरगरीबांस या मूर्तीचें दर्शन होणें कठीण आहे तथापि यात्रेच्या दिवसांत मात्र लहानापासून थोरापर्यंत, सर्वांना मोकळीक असते. मात्र ही मोकळीक फक्त सकाळीं आणि संध्याकाळीं आर्तीचेवेळींच असते. एरव्हीं कवाड उघडींत नाहींत ! या मूर्तीचें दर्शन घेतलें ह्मणजे जवळच दुसरें दालन आहे. या दालनांत श्री दत्तात्रय धूनी लावून बसतात असें सांगतात ! या धूनीतील अंगारा अंगास लावून पुढें जावें ह्मणजे आजपर्यंत झालेल्या महंतलोकांच्या समाधींचें दर्शन होतें. सर्वांत पूर्वींच्या महंतास समाधी घेऊन सुमारें पांचसहाशें वर्षें झालीं असावीं असें सांगतात. यावरून सहाशें वर्षांपूर्वीं येथें फक्त तपस्वी लोकांशिवाय दुसरे लोकांचा प्रवेश होत नसावा असें वाटतें. पुढें जसजसी तपस्वी लोकांची संख्या वाढूं लागली, त्याप्रमाणें येथें सुधारणा होऊन व ह्यांची शिष्यमंडळी वाढत जाऊन महंतादीक महात्म्यें निर्माण झाले असावे असें वाटतें.

सुमारें ३०० वर्षांपूर्वीं येथील महंतादिकांची सुकीर्ति ऐकून निजाम सरकारानें येथिल संस्थानांस सुमारें बावीस हजार रुपये उत्पन्नांचीं १८ गांवें

जहागीर करून दिलीं आहेत. त्यांचें उत्पन्न अद्याप पावेतो चालू आहे. उत्पन्नाप्रमाणें येथील खर्चही तसाच आहे; कारण येथील संस्थानांत सुमारें पन्नास साठ घोडा अगदीं तयार स्थितींत पागेंत बांधलेला आहे. रेडे पाऊणशें आहेत, हे रेडे इतके मस्त आहेत कीं, नवीन मनुष्यास जणूं हत्तीच उभे राहिले आहेत कीं काय असा भास होतो! शिवाय कामकाजाकरितां म्हणजे पाणी आणणें, झाडींतून लांकडें आणणें, जहागीरीचे गांवाहून पर्वतावर धान्य आणणें इ० कामासाठीं २५ रेडा आहे तो निराळाच! महंताचे स्वारीकरितां दोन हत्ती आहेत. शिवाय सांबरें, रोही, कुत्रीं वानरें, एडके, हरिणें इत्यादि जनावरांचाही बराच संग्रह आहे. शिवाय दोन मोठमोठे घोडे देवाच्या नांवचे स्वारीस्तव ठेविले आहेत. ह्या घोड्यांस सुवर्णाचे व चांदीचे दागीनें घालितात. त्याचप्रमाण उंची व मौल्यवान वस्त्रांनीं अतिशय सुशोभित केलें जातें त्यायोगें हें घोडे जणूं इंद्रलोकाहूनच आलेले असावेत, असा भास होतो. वर दर्शविलेल्या जनांवरांच्या खाण्याचा नित्यशः खर्च बराच आहे. संस्थानांत श्रीदत्तसेवेस्तव एकंदर सुमारें पांचशे गोसावी रहात असतात. त्यांच्या खाण्यापिण्याकरितां निराळ्या स्वैंपाकाची योजना केलेली आहे. याठिकाणीं गोसावी लोकांच्या पंक्ती भोजनांस बसल्या म्हणजे प्रेक्षकास जणूं स्वर्गलोकचे तपस्वी लोकच उतरले आहेत कीं काय? असा भास होतो. इतक्या मनुष्यांसाठीं पीठ दळून भाकरी करणें अशक्य असल्यामुळें दररोज कण्या शिजविल्या जातात.

ह्या कण्या भरडण्याकरितां दोन स्वतंत्र जात्यांची योजना केली आहे. हीं जातीं इतकीं मोठीं आहेत कीं, तीं रेड्यांकडोन ओढविलीं जातात. हें पाहून नवीन मनुष्यास बराच चमत्कार वाटतो.

जहागिरीशिवाय यात्रेकरू लोकांचें येथें फार उत्पन्न आहे. याठिकाणीं कोणीही नवीन गोसावी, बैरागी, अतीत, निस्पृही, ब्राह्मण इत्यादि गेल्यास त्याच्या खाण्यापिण्याचा बंदोबस्त महंतमहाराज उत्तमप्रकारें ठेवितात. या संस्थानांतील गोसाव्यांशिवाय पहाडावर दुसरे गोसावीही बरेच राहत असतात परंतु त्यांचा या संस्थानांतील उत्पन्नांशीं कांहीं संबंध नाहीं.

संध्याकाळचे पांच वाजण्याचेवेळीं, दिनमणी आपलें दिवसाचें काम

आटोपून परत आपल्या महालांत जात आहे, जिकडे तिकडे दाट झाडींतील पानें थंड हवेच्या हेलकाव्यांनीं एकमेकांस चुंबन देताहेत, शीतल व मंद वायु आपल्या कामगिरीनें सर्वांस आनंदवीत आहे, देवळांतील सर्व गोसावी-लोकांस एका ठिकाणीं जमा होण्यास्तव सूचना करण्याकरितां नगाऱ्याचे घड-घडाट चालू आहेत, सर्व गोसाव्यांची निरनिराळ्या रस्त्यांनीं देवळांत जाण्या-स्तव त्रेधा उडाली आहे, अशावेळीं देवळाचे बाहेरील बाजूस उभें राहून पाहूं लागलें म्हणजे फारच मौज वाटते. कितीही चिंतासमुद्रांत खोल गेलेला मनुष्य असला तरी त्याचें मन यावेळीं फारच हर्षभरीत होऊन जातें इत-केंच नाहीं तर पर्वतावरून खालीं जमिनीकडे नजर फेंकली आणि खालीं चालणारे मनुष्यांकडे पाहिलें ह्मणजे आपण आपल्या पुण्यबळानेंच इतक्या वर आलों असून दर्शनरूपी अमृत सेवन करीत आहों असा अभिमान वाटतो.

सारांश. ज्यास संसाररूपी मायाजाळांतून सुटून व सर्वसंगपरित्याग करून निवळ परमेश्वर प्राप्तीच करून घेणें आहे, त्या लोकांस तर हें ठिकाण फारच रमणीय भासतें व असे महात्मेंच याठिकाणीं वास करीत आहेत. येथील मुख्य मालकास " महंत " ह्मणतात, हें वर सांगितलेंच आहे. हल्लीं असलेले महंत हे गादीवरील अठरावे महात्में होत. हे उदगीर तालुक्यांतील एका खेड्याचे मराठा पाटलाचे चिरंजीव होत. यांच्या आईबापांनीं मुलें वांचत नसल्यामुळें, आतां झालेलें मूल माहूर संस्थानास सोडीन, असा श्रीकडे नवस केला होता पुढें लवकरच वरील महात्में यांचा जन्म झाला; नंतर सुमारें ६।७ वर्षांचें सुमारास ह्यांनां माहुरास आणून सोडलें. पुढें ह्यांचा प्रतिपाळ येथेंच होऊन हे जसजसे मोठे होत गेले तसतसी ह्यांना मोठमोठी कामगिरीची जागा महंतमहाराजांपाशीं मिळत गेली.

पुढें १४।१५ वर्षांनीं ह्मणजे सुमारें ७।८ वर्षांखालीं पूर्वींचे महंत समाधिस्त झाले. नंतर प्रभूआज्ञेनुसार ह्यांनांच महंताची गादी मिळाली. हल्लीं यांचें वय सुमारें ४० वर्षांचें आहे ह्यांचा नित्यक्रम ह्मणजे सकाळीं उठून स्नानादि विधी सारून शिष्यवर्गासह श्रीगुरु दत्तात्रेयाची व समाधिस्त झालेल्या महं-तांची पूजा, आर्ती वगैरे १२ वाजेपावेतों करून भोजन व वामकुक्षी करणें, नंतर संस्थानासंबंधीं ज्यांचीं त्यांस कामें सांगून संध्याकाळचे आठ वाजे-

पावेतों ग्रंथ पाहणें, तसेंच कोणी नवीन मनुष्य आल्यास त्याच्याशीं भाषण करणें व पुन्हां आर्ती वगैरे करणें असा आहे.

येथ दरसाल मार्गशीर्ष शुद्ध पौर्णिमेस पांच दिवसपावेता मोठी यात्रा भरत असते. शुद्ध १४ स दत्तजन्माचा उत्सव मोठ्या थाटानें होत असतो. पांच दिवसपावेतों दूरदूरचे लोक यात्रेस येत असतात. ह्यावेळीं महंत-महाराजांची पूजा होत असून संभावनेचें उत्पन्न बरेंच दांडगें होतें, यात्रेचे शेवटचे दिवशीं श्रीदत्तात्रय व महंतमहाराजांची स्वारी पालखींत बसून सर्व चोपदार, शिलेदार, कोतवाल इ० शिष्यवर्गासह वाजंत्र्यांचे व नगाऱ्याचे घडवडाटांत मिरवणूक निघत. ह्या दिवशीं सर्व घोडे, हत्ती वगैरेंस उंची उंची मौल्यवान वस्त्रांनीं व दागिन्यांनीं सुशोभित केलें जातें. सर्व पहाडावर मंडळींची एकच गर्दी होऊन जाते. अशी यात्रा त्या प्रांतांत अन्यत्र कोठेंच भरत नाहीं.

श्रीदत्तात्रेय व महंतमहाराज यांचें दर्शन होण्यास पदरीं महत्पुण्य पाहिजे यांत संशय नाहीं. येथील महंत हे कोणाचे वंशज या नात्यानें गादीवर बसत नसून निव्वळ श्रीदत्तात्रयाज्ञेनेंच गादीवर बसतात. ही गादी वंशपरंपरा चालत नसून शिष्यपरंपरा चालू आहे यांत जरी मोठेंसें नवल नाहीं. तरी आश्चर्याची गोष्ट ही कीं, ज्यावेळीं एक महंत अंतर्धान पावतात, त्यावेळीं संस्थानांतील सर्व शिष्यमंडळीचीं नांवें चिठ्ठ्यांवर लिहून त्या चिठ्ठ्या श्री दत्तात्रेयाची मूर्ति ज्या भुयारांत आहे त्या खोलींत टाकून तिचें दार रात्रौ बंद करतात व दुसरे दिवशीं सकाळींच पहावें तों ज्यास गादीवर बसविण्याची प्रभूची इच्छा असते त्याचे नांवाची चिठ्ठी दरवाजाबाहेर येऊन पडते. मग ती चिठ्ठी ज्याचे नांवची निघेल त्यासच गादीवर बसवितात. यावरून हे महंत ईश्वरीअंश नाहींत असें कोण ह्मणेल ?

सारांश ज्यास सर्व पापाचें क्षालन होऊन जन्मास आल्याचें कांहींतरी सार्थक करावें असें वाटत असेल आणि आपल्या आयुष्याचा बहुमोल वेळ थोडातरी ईशचिंतनांत जावा असें वाटत असेल त्यानें एकवेळ तरी माहूरास जाऊन श्रीदत्तात्रेय व महंतमहाराज यांचें दर्शन घ्यावें अशी आमची सविनय प्रार्थना आहे.

द. र. कंधारकर.

(अपूर्ण.)

## सासरीं जाणाऱ्या बालिकेची मनःस्थिती.

प्रथम सासरीं जावयास निघालेल्या तरुण बालिकेची शोकाकूल मुद्रा पाहून तिची मैत्रीण ह्मणतेः—

( वसंततिलका. )

कां सांग आज सखये दिसतेस खिन्न । कां वारिदाकुल नभोपम अप्रसन्न ! ॥
भासे तुझें वदन, कां उमटे न वाणी । कां गाळिती घळघळां तव नेत्र पाणी ॥
होतीस ज्या बहु उतावीळ पाहण्यास । येतांच तो पुढति कां दिसशी उदास ! ॥
होतीस इच्छित जया सह काळ जाया ! । त्या पाहतां बघशि कां सखये पळाया ! ॥
'येणें कधीं तिकडचें सखये ! घडेल । केव्हां गडे ! वदन दृष्टिस त पडेल ॥
बैसोनि तन्निकट अग्निरथिं प्रवास । केव्हां घडेल परमोत्सुक या जनास ॥
पावित्र्य वर्णिति बहू बुध ज्या पदाचें । जें मूळ केवळ महीवर मंगलाचें ॥
पायाच जें निखिल मानवि उन्नतीचा । त्या वर्णवे न महिमा गृहिणी पदाचा ॥
कर्तव्य शिक्षण मिळे मज त्या पदाचें । मातकडोनि नच हो.ल मोल ज्याचें ॥
तें दावुनी जननि-नाम करोनि धन्य ! । मी त्या पदास कधिं होइन सांग मान्य !॥
ऐसें न कां वदत होतिस रोज ! रोज ! । कां तें गडे ! विसरलीस समूळ आज ॥
होते तुझे सकल बोलहि फोल कां ते ! । कर्तव्य शिक्षण-पटुत्वही हेंच वाटे !' ॥
होती समुत्सुक किती रसना तुझी ही । कांतांतरा रिझविण्या मधुभाषणांहीं ॥
कां आज ती अडखळे सखये अशी ही । कां एक शब्दहि तिला वदवे न बाई ? ॥
आणि तुझ्या प्रणयवल्लिस जो बहार । चित्तांत जो करि दिवारजनी विहार ॥
जो मानितो तुज जणूं नव पुष्प हार ! । व्हावा गडे बघुनि ज्या असुखापहार ! ॥
येतांच ती प्रणयमूर्ति तुझ्यापुढें गे । कां सांग तूं फिरविशी मुखचंद्र मागें ! ॥
आहे सुधा जलधि जो तव सौख्य-हेतू । कां त्यांत शंकसि गडे बुडि घ्यावया तूं !॥
आरक्त हे कितितरी तव गाल झाले । कां स्फुंदशी ! सभय कां दिसतेस बाले ! ॥
सोडोनि मौन वद गे मजशीं सुशीले । बाई ! पुरे रडुनि लोचन लाल झाले ! ॥

दत्तात्रय भिकाजी रणदिवे.

# नेहमी ध्यानांत ठेवण्यासारखीं वचनें.

( संग्राहकः—लाल्य नेमिनाथ पांगळ–बार्शी. )

( मागील अंकावरून पुढें चालूं )

४७ मनुष्यानें रिकाम असूं नये. वेळ सांपडेल तेव्हां श्रमाचें व उपयोगी कृत्य करित असावें. कारण मन व शरीर हीं रिकामीं केव्हां आढळतील व आपण त्यांवर कधीं झडप घालूं म्हणून कामादि रिपू टपलेले असतात.

४८ मनुष्यास स्वास्थ, शरीरसंपत्ती, रिकामपण एवढ्या गोष्टी असल्यास तो पापाचरणास हटकून प्रवृत्त होतो म्हणून रिकामा वेळ न घालवितां प्रत्येकानें श्रम करणें जरूर आहे.

४९ वेळेची काटकसर केल्यानें मनुष्याचें इतकें काम होतें कीं तें पाहून एखाद्यास आश्चर्य वाटतें !

५० मनुष्यानें वेळ व्यर्थ न घालवितां उद्योग आरंभिला किंवा लिहिण्याचें काम सुरूं केलें तर त्याला पृथ्वीएवढा कागद व समुद्राएवढी शाईही पुरणार नाहीं !

५१ उत्कर्ष साधण्यास माणसांत दृढनिश्चय व धाडस पाहिजे.

५२ काळजींत आठवडा घातल्यानें जितका थकवा येतो तितका काम केल्यानें येत नाहीं.

५३ कर्तव्य बजावल्यावांचून नुसती बडबड व्यर्थ आहे.

५४ स्वाभिमानाचें तत्व बाल्यावस्थेंतच अंगांत शिरतें.

५५ परहितनिरत माणूस मला फार आवडतो.

५६ जें काम हातीं घ्यावें त्यांत चांगुलपणा मिळवावा.

५७ मित्रहो, दुसऱ्यानें आपल्या उपयोगीं पडून आपलें रक्षण करावें त्याऐवजीं आपण दुसऱ्याचे उपयोगीं पडून त्याचें रक्षण करावें हें श्रयस्कर आहे. आपल्या देशाचे सेवेंत आपण निश्चयानें एकत्र व्हावें कारण देशसेवेंत आलेलें मरण उत्तम होय.

५८ अधाशीपणानें खाणे प्रकृतीस अपायकारक आहे. अतिभोजन हें आयुष्य, आरोग्य यांना हानीकारक आहे. सर्व जेवणांत मर्यादा असावी.

( अपूर्ण. )

## उद्योगधंदे.

देशी टिंक्चर आयोडीन-ह्यांत खालील पदार्थ असतातः—

| | | |
|---|---|---|
| आंबेहळद .... .... .... .... | -॥- | औंस. |
| मैदालकडी .... .... .... .... | १ | " |
| कलमी सोरा .... .... .... .... | १/८ | " |
| स्प्रीट ऑफ वाईन ( रेक्टीफाईड ) .... | १० | " |

कृती-सर्व पदार्थ सात दिवस स्प्रीटमध्यें भिजत घालून सर्व मिश्रण गाळून घेऊन बाटल्या भराव्यात.

गुण-ज्या ज्या ठिकाणीं विलायती टिंक्चर आयोडीनचा आपण उपयोग करतों त्या सर्वठिकाणीं ह्याचा उपयोग करावा. विलायती टिंक्चरपेक्षां सदहू टिंक्चर जास्त गुणकारी आहे. गाल सुजणें, संधीवात वगैरे सर्व रोगांवर ह्याचा उपयोग करावा. एन्. पी. संपत.

कृत्रिम हस्तिदंत—३०० भाग चुना, ३०० भाग पाणी, ७५ भाग फास्फरिक आम्ल, १६ भाग चुनखडी, २ भाग म्याग्नीशिया, ५ भाग तुरटी व १६ भाग ( Gelatine ) सरस यांच्या मिश्रणानें कृत्रिम हस्तिदंत तयार करितां येतो. हे पदार्थ एकेठिकाणीं मिसळतात व एक दिवसभर तसेच ठेवितात. नंतर हें मिश्रण साच्यांत ओतितात व निरनिराळे उपयोगी पदार्थ तयार करतात. नंतर त्या पदार्थांस उघड्या हवेंत आंच देतात व तीन चार आठवडे तसेच ठेवितात अशारीतीनें कृत्रिम हस्तिदंत तयार करितात.

अननसाची लागवड-हिंदुस्थानांत बहुतेक सर्व प्रांतांमध्यें अननसाची लागवड कमीअधीक अंशांनीं होत असते. हें फळ हिंदुस्थानांत कांहीं नवीन नाहीं. मलबारकिनाऱ्यावर, बंगालच्या उत्तरभागांत, आसामप्रांतांत वगैरे ठिकाणीं या फळाची लागवड आज शेंकडों वर्षांपासून होत आहे. या फळाबद्दलची मागणी हल्लीं अतोनात वाढली आहे. या वाढत्या मागणीप्रमाणें अननसाच्या लागवडीचीही वाढ करण्यांत येईल तर त्यापासून फार चांगली किफायत होईल; परंतु हिंदुस्थानांत तशाप्रकारचे विशेषसे प्रयत्न होत असलेले दिसत नाहींत. यामुळें सिलोन, मॉरिशस, स्ट्रेट्स सेटलमेंट येथील अननसें अधिक खपूं लागलीं आहेत. वरील ठिकाणच्या अननसांपेक्षां

हिंदुस्थानांत होणारीं अननस अधिक सरस असतात हेंही यासंबंधांत विशेष लक्षांत येण्यासारखें आहे. बंगालच्या उत्तरभागाच्या जमिनींत अननसें सर्वोत्कृष्ट होतात; परंतु तेथें या फळांची लागवड वाढविण्याचे प्रयत्न होत नसल्यामुळें इतर ठिकाणीं होत असलेल्या निरस फळांचाच अधिक खप होऊं लागला आहे. यासंबंधांत जमीन, हवापाणी वगैरेची जरी हिंदुस्थानांत अनुकूलता आहे, तरी या फळांच्या लागवडीकडे लोकांचें जावें तसें लक्ष जात नसल्यामुळें क्लॉरिडा, हावेलियन बेटें, स्ट्रेट्स सेटलमेंट, मॉरिशस वगैरे ठिकाणच्या उद्यमशील व्यापाऱ्यांना व बागवानांना लक्षावधि रुपयांचा दरसाल फायदा होत आहे. अननस हा काय पदार्थ आहे, याची ५० वर्षांपूर्वी फ्लॉरिडा बेटांत कोणास कल्पनाही नव्हती; परंतु आजमितीस त्या बेटांत या फळाची लागवड इतकी फैलावली आहे कीं, पूर्वकिनाऱ्यावर उभें राहून पाहिलें असतां अननसांचे मळे मैलच्यामैल लांब पसरलेले दिसतात. फ्लॉरिडाबेटांत लागवडीखालीं असलेल्या एकंदर बागाईतक्षेत्रापैकीं शेंकडा ९८ जमिनींत हल्लीं अननसांची लागवड आहे. बाजारांत ज्या वस्तूस विशेष मागणी असेल त्या वस्तूची लागवड करून पैसे कमविण्याबद्दल युरोपियन लोकांची दक्षता यावरून दिसून येते. स्ट्रेट्स सेटलमेंटमध्यें अननसाची लागवड सुरू होऊन अवघीं तीन वर्षें झालीं; परंतु येथील मळेवाल्यांनीं इतक्या अल्पावधींत त्या फळाचें पीक फारच विस्तृत प्रमाणावर वाढविलें आहे. पुढच्या सालीं लक्षावधि रुपयांचीं अननसें येथून बाहेर रवाना होतील असा अंदाज आहे; तरी हिंदुस्थानांत मात्र यासंबंधांत अद्याप कांहींच प्रयत्न होत नाहीं हें आश्चर्य समजलें पाहिजे. स्फॉरिडामध्यें प्रत्येक झाड दीड पासून दोन फुटाच्या अंतरावर लावतात. बहामा बेटांत एका एकरांत अननसाचीं सुमारें २० हजार झाडें लावतात एका अननसास एक आण्यापासून आठ आण्यापर्यंत किंमत येते. अननसाच्या सालांस एका टनास ४५० रुपयेप्रमाणें भाव येतो. तिचा रस काढून त्यापासून दारू तयार करितात. अननसाच्या सरबताला मागणी पुष्कळ असून त्याच्या रसापासून साखरहि करितां येते असें प्रसिद्ध झालें आहे; परंतु त्याबरोबरच ह्या झाडाची लागवड केल्यावर तिला पाण्याचा पुरवठा करणें जरूर आहे कीं काय? खत देतात कीं काय? लागवड केव्हां मोडावयाची. लागवडीमुळें जमीन निकस होते

कीं काय व त्याचे पात्यांचा उपयोग फक्त जळणाकडेच करावयाचा किंवा दुसरा कांहीं करितां येईल ? दुसरा करितां येण्यासारखा असल्यास त्याचा वाक काढण्याचे यंत्राला किंमत काय पडते वगैरे माहिती प्रसिद्ध होणें जरूर आहे. तरी शेतकीखातें व इतर कोणी तज्ञ मनुष्य याबद्दल खुलासा करील तर तो आह्मीं मोठ्या आनंदानें प्रसिद्ध करूं.

## हास्य-मंजूषा.

सोनार–" काय ह्मणतां ? ह्याच तऱ्हेच्या आणखी सात आंगठ्या करूं ?"

तरुण गृहस्थ–" होय, पण प्रत्येकीवर " माझ्या एकुलत्या व लाडक्या प्रियतमेस ! " असें कोरण्यास विसरूं नको. "

*　　*　　*

पती–" मला जर कोणी पैसा मिळविण्याची सुलभ युक्ती सांगेल तर मी त्याचे फार उपकार मानीन. "

पत्नी–" तर मग असें करा. तुह्मीं आपल्या आयुष्याचा विमा उतरा व झटकन् मरा कसे !

*　　*　　*

जज्ज–" तुह्मीं काल आपल्या पत्नीस काठीनें मारिलें हें फारच अयोग्य केलें. मला वाटतें, तुह्मांस त्या गोष्टीचा पश्चात्ताप झाला असेलच. "

गृ०–" होय तर. तिला मारतांना माझी हस्तिदंती मुठीची काठी मोडली याचें मला फार वाईट वाटतें ! "

*　　*　　*

डॉक्टर–" एक दांत पाडावयास पांच रुपये फी पडेल "

रोगी–" पण दुसरे डॉक्टर तर फक्त एकच रुपया घेतात. "

डॉ० " तें खरें. पण एक दांत पाडावयास त्यांस जितका वेळ लागतो त्याच्या पांचपट वेळ मला तो पाडावयास लागतो. "

*　　*　　*

लहान बाळया–" आई, पुनर्विवाह ह्मणजे काय ? "

आई–" अरे वेड्या, इतकें कां तुला कळूं नये. जर एखाद्या बायकोनें आपला नवरा मेल्यावर दुसरें लग्न केलें तर त्यास पुनर्विवाह ह्मणतात "

बाळ्या-( हंसत ) " तर मग आई तूंहि तसें कर. मग तुला दोन नवरे व मला दोन बाबा होतील. कां आहे कीं नाहीं मौज? आईकडून मुलास चापटपोळ्या मिळाल्या किंवा नाहीं हें आमच्या वाचकांस सांगण्याची आवश्यकता नाहीं. "

## पोंच व अभिप्राय.

जीवनसंध्या-ही कादंबरी मूळ बंगाली भाषेंत श्रीयुत रमेशचंद्रदत्त आय्. सी. एस्. सी. आय्. ई. यांनीं लिहिली असून तिचें श्री. विठ्ठल सीताराम गुर्जर यांनीं मराठी भाषेंत भाषांतर केलें आहे. मूळ बंगाली कादंबरीकारांचा विद्वत्ता सर्वविश्रुत आहे, आणि भाषांतरकारही विद्वानच आहेत. तेव्हां हें भाषांतर उत्तम वठलें आहे, हें निराळें सांगण्याची गरज नाहीं. सोळाव्या शतकांत उत्तर हिंदुस्थानांत मुसलमानांची सत्ता दृढमूल झालेली होती. बहुतेक भाग त्यांच्या बादशाही अमलाखाहीं आलेला होता. अकबर बादशहाच्या कारकिर्दींतल्या रजपूत मुसलमानांच्या झटापटीचें वर्णन या कादंबरींत मुख्यत्वेंकरून आहे.

अकबरानें अनेक युक्तींनीं राजपुतान्यांतील शूर रजपूत संस्थानिकांना आपलेसे करून घेतले होते. मोठमोठ्या राजघराण्यांतल्या कुमारिकांबरोबर दिल्लीपतीनें बादशाही घराण्यांतील मुसलमानांबरोबर लग्नें लावून-शरीरसंबंध घडवून-रजपुतांवरची आपली छाप दृढ केली होती, परंतु, आपण जातीनें रजपूत वैदिकधर्मानुयायी असून म्लेंच्छांशीं आपला शरीरसंबंध घडवून आणणें धर्मबाह्य अतएव घोर नरकाचें साधन आहे असें समजून कसाही प्रसंग आला तरी ती गोष्ट मान्य न करणारे खरे रजपूतबच्चेही कांहीं राजस्थानांत होते, त्यांतलाच मेवाडाधिपति प्रतापसिंह हा एक होय.

प्रतापसिंह मोठा शूर, दूरदर्शी, शहाणा, कोणत्याही प्रसंगास न भिणारा, दृढनिश्चयी असा रजपूत राजा होता. त्याची धर्मश्रद्धा अवर्णनीय होती. स्वकुलाभिमान आणि स्वदेशाभिमान यांचा तो मूर्तिमंत पुतळाच होता! तो एकसारखा पंचवीस वर्षे मोंगलासीं झुंजत होता, त्याजवर अनेक आपत्ति येऊन कोसळल्या होत्या; त्याला घोर अरण्याचा आणि गिरिकंदरांचा आश्रय कराव

लागला होता तथापि तो धीरोदात्त रजपूतवीर डगमगला नाहीं ! त्याला, त्याच्या बायकोला आणि मुलांना किती विपन्नावस्थेंत दिवस कंठावे लागले, याचें वर्णन ठिकठिकाणीं या कादंबरींत आलें आहे, तें वाचतांना कंठ सद्गदीत होतो !

प्रतापसिंहाच्या वीरत्वादि अनेक सद्गुणांबद्दल अकबरचा सरदार खानखानान यानें त्यावेळीं असें लिहिलें आहे कीः—

' या जगांत सर्वच क्षणभंगुर आहे !

' भूमि आणि संपत्ति कधींतरी नष्ट होईल !

' केवळ मोठ्या नांवाचा गौरव मात्र नष्ट होत नाहीं !

' प्रतापानें भूमि आणि संपत्ति यांवर लाथ मारिली आहे !

' प्रतापानें शत्रूपुढें मस्तक नम्र केलें नाहीं !

भारतवर्षांतील सर्व राजेरजवाड्यांत केवळ त्यानेंच एकट्यानें आपल्या कुलाचें नांव राखिलें आहे.

ही शत्रूच्या तोंडची स्तुति आहे; हिची किंमत मित्रांच्या तोंडच्या स्तुतिपेक्षां सहस्रपटीनें अधिक आहे !

या पुस्तकाविषयीं लिहावें तेवढें थोडेंच आहे. ज्यांनां वाचनाची गोडी असेल त्यांनीं हें पुस्तक अवश्य वाचावें अशी आह्मीं शिफारस करितों. पुस्तकाची किंमत बारा आणे ह्मणजे कांहीं फार नाहीं.

**अमृतपुलिन**—ही कल्पित कादंबरी श्री. नालिनिलाल बंदोपाध्याय या प्रसिद्ध बंगाली कादंबरीकारांनीं बंगालींत लिहिली असून श्री. सहस्रबुद्धे यांनीं तिचें मराठींत रूपांतर केलें आहे. ही कादंबरीही उत्तम असून तिची भाषा प्रौढ आहे. कथानक करुणाजनक आहे. नायक अजयसिंह व नायिका हिरण्मयी यांजवर आलेल्या अनेक हृदयद्रावक प्रसंगांचें वर्णन वाचून कोणाच्याही नेत्रांतून टपटप दुःखाश्रु गळाल्याशिवाय राहणार नाहींत. किंमत ८६ आणे.

**महाराणा संग्रामसिंहः**—इंग्लिश कादंबरीकार सर वाल्टर स्कॉट यांच्या ' टेलिस्मन् ' नांवाच्या प्रसिद्ध कादंबरीच्या आधारानें हें गद्यात्मक नाटक कै. श्री. काशिनाथ नारायण पटवर्धन यांनीं लिहिलेलें ग्रंथप्रसारक मंडळीनें प्रसिद्ध केलें आहे. हेंही पुस्तक मंडळीच्या इतर अनेक पुस्तकांसारखेंच उत्तम आहे. अवश्य वाचावें. किंमत आठ आणे.

वरील तिन्हीं पुस्तकें मनोरंजक ग्रंथप्रसारक मंडळी, गिरगांव-मुंबई या पत्त्यावर मिळतात. मासिकमनोरंजनाचे ग्राहकांस हीं बक्षीस यंदां आहेत.

बाबू अरविंद घोस यांचीं आपल्या पत्नीस पत्रें—मुद्रक व प्रकाशक पुणे वन्देमातरम् पत्राचे संपादक. किं. १ आणा. यांत तीन पत्रें असून तीं फारच हृदयंगम आणि विचारपरिप्लुत आहेत.

वक्तृत्वकलादर्श—पावलें, अभिप्राय पुढें देऊं.

तस्करकथा पूर्वार्ध भाग १।२ पावले. अभिप्राय पुढें.

वरील पुस्तकें भेटीदाखल पाठविणारांचा मित्र फार आभारी आहे.

## फोटोग्राफीसंबंधीं अडचणी.

" मित्रा " च्या गेल्या महिन्याच्या अंकांत वाचकवर्गास केलेल्या विनंतीप्रमाणें फोटोग्राफीसंबंधीं खालील लोकांकडून आलेल्या पत्रांचीं उत्तरें खालीलप्रमाणें समजावीं.

दळीराम नारायण कलो मु. आमला- आपलें ता २१ चें पत्र पावलें. क्यामेरा वगैरे विषयीं सर्व खुलासा पत्रानें कळविलाच आहे. त्याप्रमाणें क्यामेरा घेऊन कामास सुरुवात करा व त्यांत येणाऱ्या अडचणी वेळोवेळीं विचारा. आपणांस माल मागवितां येत नसल्यास आह्मांस कळवा. आह्मीं मागवून देऊं.

मोहदिवाल आणि कंपनी मु. नरखेड–आपल्या ता २५ च्या कार्डा-प्रमाणें पुस्तक व इतर सामान व्ही. पी. नें पाठविलें आहे.

दिगंबर विष्णु थोरकर मु. इलिचपूर- आपलें ता. २६ चें कार्ड पावलें. पुस्तकाच्या किंमतीबद्दल पोष्टाच्या टिकिटा पाठविल्यास पुस्तक पाठ-विण्यांत येईल.

जयराम नारायण मु० चांदूर:- आपलें ता. २६ चें पत्र पावलें. पत्रांत विनंती केल्याप्रमाणें पुस्तक बुकपोष्टानें पाठविलें आहे; तें वाचून ही कला शिकणें असल्यास क्यामेरा वगैरे सामान मागवून कामास सुरवात करा व वेळोवेळीं येणाऱ्या अडचणी विचारीत जा ह्मणजे घरींबसल्याच ही कला साध्य होईल.

गोविंद वासुदेव मयानील आष्टी:--आपलें पत्र ता. २९ चें पावलें. उत्तर पत्रानें दिलेंच आहे. पुस्तकाच्या किंमतीबद्दल पोष्टाच्या टिकीटा

आल्या ह्मणजे पुस्तक रवाना करूं. व्ही. पी. नें खर्च फार येतो. आम्हीं आतांपर्यंत " कीनोमेटो " व " कम्बाईन्डटोनींग फीक्सींगबाथ " या नांवाचीं फक्त २ च सोल्यूसनें विक्रीस तयार केलीं आहेत. प्रत्येकाची किं० फक्त ०।१२ आहे. फोटोसंबंधी अडचणी विचारणें असल्यास " फोटोग्राफी संबंधी अडचणी " अशीं अक्षरें लिफाफ्यावर नेहमीं लिहित जा. अड-चणीचा खुलासा " मित्रांतून " देत जाऊं. आपण " लोकमित्राचे " वर्गणीदार नसल्यास वर्गणीदार व्हा. मित्रांतून नेहमी वाचण्यालायक लेख, व कृती, फोटोग्राफीसंबंधी खुलासे वगैरे येतात व पुढेंही येतील.

नरहर रामचंद्र घुडे. कारंजाः--कांचाना डेवेलोप केल्यावर थंड पाण्यानें चांगल्यारीतीनें न धुतल्यास उन्हाळ्यांत त्यावर पाणी सुटतें. तरी उन्हाळ्यांत कांचा नेहमी डेवेलोप करून थंड पाण्यानें धुतल्यावर तुरटीच्या पाण्यानें ( तुरटी ।- तोळा. पाणी २॥ तोळे ) धुवाव्यात. ह्मणजे पाणी सुट-णार नाहीं. हायफोनें कांच बरोबर न धुतल्यास त्यायोगें पांढरे डाग रहा-तात. तरी तो बरोबर धुवावा. हायफोच्या पाण्यांत वाटेल तितका वेळ कांच राहिली तरी कोणत्याही प्रकारें नुकसानीं नाहीं.

नारायणराव रामराव देशमुख मु. नांदपूर—आपलें ता. ५ चें पत्र पावलें. " फोटोग्राफीसंबंधी अडचणी " मित्रांत छापण्याबद्दल सहानु-भूती दर्शविली त्याबद्दल आभारी आहों. काम शिकण्याकरितां KlitoNo किं. रु. १७-२-० किंवा Zyns No कि. रु. ९ चा हॅन्ड क्यामेरा विकत घ्या. धंदा करण्यास पुढें " स्टॅन्ड " क्यामेरा घ्यावा लागेल. क्यामे-ऱ्याची माहीती त्याबरोबर असते फोटोग्राफीसंबंधी सुरुवातीची माहीती आमच्या " फोटो कसा काढावा ? " या पुस्तकांत दिली आहे व सामान मिळण्याचे पत्तेही त्यांतच दिले आहेत. याशिवाय कांहीं जास्त माहिती पाहिजे असल्यास विचारा म्हणजे कळवूं. मात्र आपण मित्राचे वर्गणीदार असलें पाहिजे.

**सूचना**—फोटोग्राफीसंबधानें ज्याला ज्या अडचणी येतील त्या त्यानें आमच्या पत्यावर पत्र पाठवून विचाराव्या. ह्मणजे त्याचें उत्तर मित्रांतून मिळेल.

☞ **पत्ता-एन. पी. संपत** पो. कारंजा-अकोला.

———

## स्फूटविषय.

देवनागरः—ह्या कलकत्ता येथें प्रकाशीत होणाऱ्या अद्वितीय सचित्र मा. पु. ८ वा अंक पावला. यांत अनेक भाषांतील अनेक लेख देवनागरलिपीने छापलेले आहेत. सदरी अंकांत ' भिक्षुस्वप्न ' ही कविता आणि " नैसर्गीक सृष्टीजन्य कारंजे " हे दोन लेख लोकामित्रांतले घेतले आहेत याबद्दल मित्र सदर्हु पुस्तकाच्या संपादकाचा फारच आभारी आहे. सदरी अंकांत—

दुःखीकाविलाप—

ही हिंदि कविता आली आहे. तिचांतील आरंभींचे दोन श्लोक हे

( द्रुतविलबित )

सुखजिसे कहते जगमे सभी । वहन हाय ! मिला मुझको कभी ॥
चित रहे मम नित्य उदास है । न मुखमे स्तुति है नहि हास है ॥ १ ॥
मन सदा रहता अति व्यग्र है । हृदय में नहि शांति समग्र है ॥
तनु महा कृश और मलीन है । दुःखित मीन मनो जलहीन है ॥ २ ॥


दुसऱ्या एका अंकांतील अनुभवीक उतारा देत आहों तोही मोठा उपयोगी आहे. तो हाः--

आजचे तरुण-ज्यांचीं गालफडें बसलीं आहेत, ज्यांना कोस दोन चालण्याचीही धमक नाहीं, शाळेंतील पुस्तकें उचलून नेण्याचीही ज्यांना पंचाईत पडली आहे, वसंतांतील शीतांतही ज्यांचें हातमोजे, पायमोजे व गळपट्टा यांवांचून चालत नाहीं, भर दोनप्रहरच्या उन्हांतून दहा पांच पळें चालण्यानेंही ज्यांना ब्रह्मांड आठवतें, सोळाव्या वर्षींच ' डोळे रुसले कांहीं न बघती ' म्हणून उपनेत्र ज्यांच्या नाकावर स्वार झाले आहेत, ज्यांचे दंड आणि जघन लेखण्यांचें साम्य करूं लागले आहेत व ज्यांना अन्न कसें तें मुळींच पचत नाहीं अशा आजच्या हिंदुस्थानच्या तरुणाकडे पाहिलें म्हणजे भावी कालांत याच तरुणांकडोन राष्ट्रकार्य घेऊं इच्छिणाऱ्या प्रस्तुतच्या निःसीम देशभक्तांची स्थिति काय होत असेल बरें ?

हल्लींच्या तरुणाची अशी बल-तेज-वीर्यहीन स्थिति होण्यास ब्रह्मचर्याऽभावाशिवाय दुसरें कोणतेंही कारण प्रमुख नसलें पाहिजे. ब्रह्मचर्याकडे दुर्लक्ष्य केल्यानेंच आजच्या तरुणपिढीची स्थिति अशी शोचनीय झालेली आहे.

देवनागर.

जितकें कांहीं आपणास ठावें । तितकें हळू हळू शिकवावें ॥
शहाणे करून सोडावें । सकल जना ॥ १ ॥ रामदास.




वर्ष १८ वें. ] जून. १९०९. [ अंक १२ वा.

विषयानुक्रमणिका.


| विषय. | पृष्ठ. | विषय. | पृष्ठ. |
|---|---|---|---|
| कै. बाळ गंगाधरशास्त्री जाभेकर. | ३०५ | फोटोग्राफसंबंधी अडचणी. ... | ३३० |
| पाणी व त्याचे औषधी उपयोग. | ३१८ | बरोबर एक्स्पोझर देणे. ... | ३३२ |
| चंद्रहार—( गोष्ट ). ... | ३२१ | | |


कुमुदसुंदरी व विक्रम पृथ्वीपर्यटण या दोन्हीं बक्षीस
पुस्तकांसह व्ही. पी. खर्चसुद्धां पोष्टांत १८१ भरावा लागतो

द. गो. सडेकर यांनीं खानापूर येथें आपल्या धनंजय छा. छा

## कूटोत्तर. ( उत्तर–दारू, वारुणी. )

गेल्या अंकीं जें पद्यकूट दिलें होतें त्यांचीं उत्तरें आठजणाकडून आलीं त्यांपैकीं ३ बरोबर असून ५ चुकलीं आहेत.

नंबर १–श्लोक

पहा असुर दानवां सहज कंप ' दारू ' च दे ॥
अहा मनुज सेविती मिळति ते धुळीला मदें ॥
करा विगल ' दा ' पहा उडत ' रू ' झणीं फुंकरें ॥
त्यजा अगतिदा सुरा सुजनदेशबंधू त्वरें ॥ १ ॥

**पुंडलीक पांडुरंग कामत—असोळणें-गोवा.**

नंबर २–श्लोक.

वारू घरी निजपदावरि वारुणी ती । वाणी रहित उडतो जन ते पहा ती ॥
नेले किती नर धुळीस जगीं विलोकी । ती वारुणी भरविकंप असूर–लोकीं ॥

**परशुराम गणेश देशपांडे. हेडक्लार्क–मेसाणा.**

**नंबर ३–कृष्णाजी भाऊ काकडे—इंदापूर.**

---

## नवीन गद्यकूट.

हा पहा, मला येथें पोट फाडून ठेविला आहे ह्यासाठीं शाकाहारी लोकांस प्रिय अशा ह्या पदार्थाचें काय करूं ? अरेरे, इतक्यांतच ह्यानें मला उलटसुलट करून मांसाहारी लोकांना प्रिय करून ठेविलें. इकडे पहा; हा डॉक्टर माझा पाय कापून मला उपयुक्त वृक्ष बनवूं पहात आहे. इकडे तर या यवनानें माझें डोकें उडवून मला प्राणहारक बनविलें आहे; पहा; इतक्यांतच यानें मला उलटसुलट केलें तेव्हां माझ्या मदती शिवाय यास दुसऱ्याचें सामर्थ्य अजमावितां येईल काय ? हा वैदू मात्र सज्जन खरा कारण यानें मला पुनः जोडून पूर्वस्थिती प्राप्त करून दिली तेव्हां जिवनाला अत्यंत अवश्य असा मजमध्यें उत्पन्न होणारा पदार्थ यास देऊन उपकाराची फेड करावी हेंच रास्त. तर मी कोण?

**सूचना:**–या प्रश्नांचीं उत्तरें पद्यांत किंवा गद्यांत द्यावीं. जे कोणी योग्य उत्तरें ता० १२ जुलै १९०९ पर्यंत पाठवीतील त्यांपैकीं ५ नंबरांस वृषभानुजानाटिका हें ०८ आणे किंमतीचें पुस्तक फुकट पाठवूं.

**उत्तरें पाठविण्याचा पत्ता:**–लोकमित्रकर्ते पो० खानापूर जि० बेळगांव.

# सर्वसंग्रह.

( साईज नवनीताएवढा, विषय बहुतेक नवे, चित्रें भरपूर, पृष्ठें ४००, कागद ग्लेज असून जाड, टैप नवा, बाइंडिंग सर्व वेलबुटीदार कापडाचें. किं. सवा रुपया. एका प्रतीस व्ही. पी. सह १८७, दोन प्रतींस २८१२, तीन प्रतींस ४ रुपये, चार प्रतींस व्ही. पी. सह पांच रुपये, पांच प्रतींस व्ही. पी. सह सहा रुपये.

स्त्रिया, पुरुष व मुलें यांच्या उपयोगी पडणारें एखादें पुस्तक पाहिजे असेल तर हेंच पास करा. यांत गद्यपद्यात्मक अनेक प्रकारचे नीतिपर, मनोरंजक, वेंचीव, संग्राह्य, धार्मिक, नित्योपगी असे विषय असल्यामुळें कोणीच विन्मुख होण्यास जागा नाहीं. यांत व्यवहाराचा मथितार्थ भरलेला आहे. विद्वान वाचकांनीं प्रत्यक्ष ग्रंथ पाहून खात्री करून मात्र घेतली पाहिजे. पुस्तक नको झाल्यास चार दिवसांत परत घेऊं. केवळ लोकहिताकडे लक्ष देऊन उपयुक्तपणा आणि स्वस्ताई यांची कमाल केली आहे. श्रांत मनास विश्रांति मिळावी असें ज्यावेळीं आपणास वाटेल त्यावेळीं यांचें परिशीलन करा. अनेक प्रकारच्या युक्तिप्रयुक्ति कळून याव्या अशी इच्छा असेल तर अभिमान टाकून याला हातांत धरा.

मुलांना अनेक प्रकारचे नीति बोध कळून त्यांचें ज्ञान वाढावें असें इच्छित असाल तर त्यांना हा गोड खाऊ घेऊन द्या. स्त्रियांची नीतिमत्ता वाढून त्यांना प्रत्येक सणावाराची कथा समजावी व प्रापंचिक ज्ञान व्हावें असें मनांत असेल तर त्यांना हाच सौभाग्यालंकार नजर करा.

## यांत आलेले विषय.

### अ.

अष्टपद्या-सार्थ, अच्युताष्टक, अन्नपूर्णास्तोत्र, अठरा पुराणें, अनंतफंदीचा उपदेश, अलकनंदा, अयोध्या, अनेक कवींचीं निवडक पदें (४० ), अन्योक्ती ( १२ ), अभंग, अंजनीगीत, अहार किती असावा? अहोरात्रीच्या २४ तासांचा व्यय, आईबापांस पत्र. आधुनिक तरुणीचा पश्चात्ताप, आनंद, आयुष्यवृद्धीसंबंधीं पाश्चिमात्यांचें मत, आर्यावर्त, आर्या ( निवडक १५ ), आरत्या ( निवडक १२ ), आरोग्य, आरोग्यरक्षणाची गुरुकिल्ली, आशा, आंग्ल सुभाषितें, औषधें. औदुंबरक्षेत्र, आशिर्वचनपर कविता,

**इ. उ.**

इंग्रजीराज्य-लावणी, ईशस्तुती, उदकाविसर्जनमंत्र, उपदेश लावणी, उपनिषद्भावार्थ,

**ऋ. ए.**

ऋषिपंचमीकथा, एकपत्निव्रत, एकादशीव्रत, एका मनुष्यास रोज लागणारें अन्न,

**क.**

कटाव, करुणाष्टकें, करुणामृत स्तोत्र ( ओंव्या १४४ ), कृष्णाष्टकें, कृष्णार्जुनसंवाद वेंचे, कृष्णस्वरूप वर्णन, कलिभविष्य, कलिमहात्म्य, कालभैरवाष्टक, कान, कालाष्टमी कथा, काशीक्षेत्र, काळजी, कुपुत्र निंदा, कुंभकोण क्षेत्र, कुशावर्त क्षेत्र, कुष्मांड ९ मी कथा, केसांची जोपासना, कैलास मानससरोवर, कोजागरी कथा,

**ग.**

गणपतीचे श्लोक, गणेशचतुर्थी कथा, गणेशस्तव, गणेशस्तोत्र ( संकटनाशन ), ग्रहणाचा निर्णय, गृहीणी अथवा गृहसुख, गृह कसें असावें ? गृहस्थाश्रम, गृहस्थांचीं कर्तव्यें, गायत्री ध्यान, गाढ झोंप केव्हां लागते, गुरुपादुकाष्टक, गुणग्रहणस्थानें, गोग्रासमंत्र, गोपीगीत श्लोक, गोकर्णक्षेत्र, गोमांतक, गोविंदाष्टक, गोविंदाष्टक ( प्राकृत ), गोविंदनाम संकीर्तन, गंगा, गंगाद्वार, गंगोत्री, गंगाष्टक सार्थ, गंगास्तव, गंडकी, ग्रंथाची महती,

**च.**

चर्पटमंजरी, चार वर्णाचीं स्वाभावीक कर्में, चातुर्मासांतील निषिद्ध व सेवनीय पदार्थ, चार वेद, चोवीस नामें व अर्थ, चौदा दानें, चौदा रत्नें, चंपाषष्टी व्रतकथा.

**ज. झ. ड.**

जगदुत्पत्ती व चार युगें, जमिनीतील पाणी आं. लक्षणें, ज्वरस्तोत्रम्, जीभ, जीवसंचार, जेवणवेळाशिवाय मध्यें खाणें, ज्येष्ठागौरी कथा, जोड्या फिरविणें, जोर काढणें, झोंप घेण्याचें प्रमाण, डोकें,

**त.**

त्वचा, त्रयोदशगुणी विडा, त्र्यंबकक्षेत्र, तालीम करणे, तांबुलभक्षणविधि, तिरुपतीक्षेत्र, तीर्थाटण, तिथी, वार, नक्षत्रीं वर्ज्य पदार्थ, तीर्थप्राशनमंत्र, त्रिताप, त्रिपुरीकथा, त्रिपुंड्र-धारणविधि, त्रिपुरसुंदरीस्तोत्र. तुलसीवंदन व प्रदक्षिणेचा मंत्र, तुलसीस्तोत्र, तुलसी-पत्रग्रहणकाळ, तुळजापूरवर्णन,

**द. ध**

दत्तात्रयस्तोत्र, दत्तप्रश्नावळी, दशदानें, दागीन्याचें वर्णन, दांत, द्वादशविध पुत्र, द्वादश ज्योतिर्लिंग स्तोत्र, दीपनमस्कार, देव म्हणजे काय ? द्वेषभाव, दोन्हीं हातांचें भांडण, दोहरे ( निवडक ३९ ), धौम्यनीति,

**न.**

नखें, नरदेह प्रशंसा, नरदेहकर्तव्य, नरसिंहजयंती कथा, नरकचतुर्दशी कथा, नरसिंहपूर-क्षेत्र, नवग्रहस्तोत्र, नवग्रहाचीं दानें व जप, नवनागस्तोत्र, नवविधाभक्ती, नवऱ्यानें

बायकोस कसें वागवावें याविषयीं नियम, नवरसविवेचन, नृत्य, नागपंचमी कथा, नाम० रामायण ( विठोबाअण्णाकृत ), नारायणस्तोत्र, नारदनीतींतील वेंचे, नारळीपौर्णिमा कथा, नागेशक्षेत्र, नाशीक क्षेत्र, नित्यक्रम, नित्य व्यायाम घेणेचीं कांहीं कारणें, निर्जलाएकादशी कथा, निद्राभंग झाल्यास, निरनिराळ्या ठिकाणच्या भाषेचे मासले ( तेरा ), नेत्ररक्षणाविषयीं नेम,

**प फ.**

पतिव्रताधर्म, परशुरामजयंती कथा, परोत्कर्षासहिष्णुता, प्रतापसिंहमहाराज यांचे बोल, प्रत्येक महिन्यांतील शास्त्रोक्त धर्मकृत्यें, प्रसिद्ध तीर्थें आणि क्षेत्रें, पर्शियन भाषेंतील कांहीं म्हणी, प्रयाग ( क्षेत्र ), पंढरीक्षेत्र, पशुपतीक्षेत्र, प्लेटोचीं चवदा वचनें, प्रेसिडेंट गार्फिल्ड यांचीं वचनें, प्रातःस्मरण, प्राणायाम, पाण्याची परिक्षा, पिठोरी पौर्णिमा कथा, पांच बोटांची स्पर्धा, पाळणीं, पुराणश्रवणविधी, पेशवाईतील ३॥ शहाणे, पोवाडे, पावसाळेसंबंधीं ठोकताळे, फळफळावळ, फळांपासून नुकसान, फिरंगी सुभाषितें, फटके,

**ब. भ.**

बदरीनारायण, ब्रह्मगिरी ( क्षेत्र ), ब्रह्मार्पणमंत्र, बायकांचें नवऱ्याशीं वर्तन व त्याविषयीं नियम, बालसंगोपन, बारावरील कसरत व उठाबसी, बारा प्रश्नोत्तरें, बाजीराव ( शेवटले ) यांची कारकीर्द, ब्राह्मणसुवासिनी पूजा, बेंजामिन फ्राकलीनचे दहा शब्द, बेलाचा उपयोग, बोधामृत, भजन, भवभूति, दंडि व कालिदास, भूपाळीसंग्रह, भीष्मनीतींतील वेंचे, भीति, भाषणांतील १८ न्याय, भूमीप्रार्थना, भोजनविधी, भोजनोत्तर कृत्यें,

**म.**

मलत्याग, मदालसा स्तवनाष्टक, मदालसार्या कुसुमस्रक्, मनोहर सुवास, मदालसेचा पुत्रास उपदेश, मनुस्मृतींतील वेंचे, मल्लखांब, मनोविकार, मकरसंक्रांति कथा, मराठी म्हणी, मथुराक्षेत्र, महालक्ष्मी, मंत्रपुष्पांजली सार्थ, मंगलपदार्थदर्शन, मंगलागौरी कथा, मंगेशीक्षेत्र, मंगलाष्टकें, मारुतीस्तोत्र, मारुतीनमस्कार, मारुतीजन्म कथा, मानसपूजा कशी करावी, मादकपदार्थांविषयीं धन्वंतऱ्यांची साक्ष, माळसाक्षेत्र, माथेरान, मांगीरीशस्तोत्र, मार्तंडाष्टक, मूत्रावरोध व त्यापासून अपाय, मुखप्रक्षालनविधि, मुद्राधारणविधि, मुखरंजनप्रयोग, मुढीपाडवा कथा, मैनाक.

**य.**

यमद्वितिया कथा, यक्षप्रश्न, योगवासिष्ठांतील वेंचे,

**र.**

रघुनाथाष्टक, रथसप्तमी कथा, रंजन व बोध, रामरक्षा ( सार्थ ), रामस्तुती, रामस्तव, रामनीति, रामजन्म कथा, रामदासी मनाचे श्लोक, रामेश्वरक्षेत्र, रामनाथक्षेत्र, राम प्रश्नावळी, राग, रात्रीचें भोजन, रुक्मिणीस्वयंवर–लावणी, रुक्मिणी–पत्रिका–श्लोक,

**ल.**

लक्ष्मीस्तोत्र, लहान मुलांसाठीं गोष्ट, लहानास थोराचा उपदेश, लक्षांत ठेवण्याच्या ( ४० ) गोष्टी, लग्नमंडपाचें वर्णन, लक्षांत ठेवण्यासारखे तीन, लक्ष्मी-पार्वती संवाद, लिंगमाळा, लुच्चांची संगती वाईट,

**व.**

वर्षप्रतिपदा कथा, वस्त्रांतर करणें अथवा सोंवळें नेसणें, वस्त्रधारणविधि, व्रतादिवशीं कसें वागावें, वृद्धचाणक्यांतील वेचे, व्यवहारनीति, व्यंकटेशस्तोत्र ( संस्कृत ), वामकुक्षी, वामनद्वादशी कथा, व्यायाम, विश्वरूपदर्शन, विवाहसंस्कार, विवाहांतील कृत्यें, विवाहाचे आठ प्रकार, विजयादशमी कथा, विष्णुस प्रियपुष्पें, विदुरोपदेश-फटका, विलासिनीचा रंगमहाल, विंध्यवासिनी, चित्रकूट, वैकुंठचतुर्दशी कथा.

**श.**

शनीस्तोत्र, शनीमहात्म्यसारामृत, ( ओंव्या १८१ ), शनीव्रत, शयनप्रकार, शयनसमयीं पठणाचे श्लोक, शय्या व पादसंवाहन, शरीराचे अवयव, शयनी ११ शी कथा, शंकरास प्रियपुष्पें, शंकराचार्यकृत प्रश्नोत्तरमालिका, शंकरपार्वतीसंवाद, शांतादुर्गाक्षेत्र, शांतादुर्गा-स्तोत्र, शारदानमन, शिखाबंधन, शिवपंचाक्षरस्तोत्र, शीतलासप्तमी कथा, दारिद्र्यदहन-शिवस्तोत्र, शिष्यास गुरूचा उपदेश, शिळीं न होणारीं पत्रें-पुष्पें, शीतलाष्टक, श्रीशैल्य-मल्लिकार्जुन,

**स.**

सरस्वतीस्तोत्र, सहा रस, सदाचार, सत्वगुणी-तमोगुणी-रजोगुणी, सज्जनाचा मोठेपणा, सत्पुत्रप्रशंसा, सज्जनगुणवर्णन, सनातन आर्यधर्मग्रंथांतील वेंचे, सत्यनारायणव्रतकथा ( ओंव्या ), सहा शास्त्रें, सद्यःस्थिति, स्वच्छता व आरोग्य, स्वदेशवसनग्रहण, संकष्टचतुर्थी कथा, संगीतशास्त्र, संस्कृत म्हणी, स्मश्रु, स्नान, संध्या, संध्यासमयीं वर्ज्य गोष्टी, संसार, सासुरवास, सांगलीकर यांचे ७६ नियम, सांबशिवाष्टक, स्त्रीपुरुषांचा जमजोड, स्त्रियांचे सोळा शृंगार, सूर्यनमस्कार, सूर्यस्तुति, सुपारी, सूड घेणें, सुधारणेचें खूळ, सोपा व्यायाम, सौंदर्य, सौभाग्याष्टक,

**ह.**

हातपाय धुणें, हेमाडपंत यांची नीति, हितोपदेशांतील वेंचे, हरितालिका कथा, होलिकाकथा, हिंदुस्थानांतील मुख्य नद्यांची लांबी, हास्य, हिंदुस्थानी म्हणी, हिंदीसार्थ सुभाषितें, हंसण्या-मुळें अनर्थ.

---

## कलावैभव किंवा उद्योगशाला.

आवृत्ति तिसरी पृष्ठें ३४८ किं० व्ही० पी० सह दीड रुपया.

## श्रीमद्भगवद्गीता.

श्री वैष्णवसिद्धांताला अनुसरून मूळश्लोक, व्याख्या व मराठी तात्पर्यार्थ यांसह पृष्ठें ३५० किं० व्ही० पी० सह एक रुपया दहा आणे.

## योगराजचिंतामणि.

सार्थ व अनुभवीक आणि सर्वमान्य सात प्रकरणांचा अप्रतीम ग्रंथ. पृष्ठें ३२० बाइं-डिंग कापडी उत्तम किं० व्ही० पी० सह एक रुपया तीन आणे.

पत्ता—लोकमित्रकर्ते पो० खानापूर जि० बेळगांव.

---

# लोकमित्र.

## कै. बाळगंगाधरशास्त्री जांभेकर.

( लेखक—रामकृष्ण शंकर जांभेकर कोळें जि० रत्नागिरी. )

परिवर्तिनि संसारे मृतः को वा न जायते ।
स जातो येन जातेन याति वंशः समुन्नतिं ॥

( भर्तृहरी. )

पुत्र व्हावा ऐसा गुंडा । ज्याचा तिहीं लोकीं झेंडा ॥ १ ॥

( तुकाराम. )

" शांतवृत्तिसारखें तप नाहीं. " " संतोषासारखें सुख नाहीं "
" व दयेसारखा धर्म नाहीं. "

( लोकहितवादी. )

चक्राप्रमाणें फिरणाऱ्या या संसारांत मरून जन्मास कोण येत नाहीं, सर्व येतात; परंतु त्यांत पुरुषार्थ तो काय ? तर जो जन्मल्यानें वंश मोठेपणास पावतो, तोच पुरुष जन्मास आला खरा, इतर आले न आले सारखेच. असे वंशास मोठेपणा आणणारे पुरुष विरळा निपजतात. त्यांतून राष्ट्रासही ज्यांनीं भूषणास्पद केलें आहे, असे तर फारच क्वचित् निपजतात. या कोटींत प्रमुखत्वानें गणण्यासारखे आजपर्यंत जे पुरुष होऊन गेले, त्यांपैकीं एक कै० पंडीत " बाळशास्त्री जांभेकर " हे होत.

रत्नागिरी जिल्ह्यांत देवगड तालुक्यापैकीं खारेपाटण नजीक " पोंभुर्लें " ह्मणून बावडा संस्थानचे अमलाखालीं एक गांव आहे. येथें " जांभेकर " यांचें घराणें पूर्वीपासून मोठें मान्य, संभावित, शिष्टाचारसंपन्न आहे. या घराण्यांतील बहुतेक मंडळी वैदिक, याज्ञीक, पुराणिक, शास्त्री ह्मणून प्रसिद्ध आहे. हें घराणें मूळपासून भिक्षुकवृत्तीचें असल्यामुळें तत्कालीन संप्रदायाप्रमाणे सर्व मंडळी वेदशास्त्रपारंगत होऊन गेली हें साहजीक आहे. या मंडळींनीं " वेदमूर्ती " व " वेदशास्त्रसंपन्न " ह्या पदव्या विभूषीत केल्या होत्या. तशाच पुरुषांप्रमाणें स्त्रियाही पुराण वगैरे चांगलें सांगत असत. पेशवाईत

" बाळशास्त्री जांभेकर " ह्मणन ( चरित्रनायक नव्हे ) महाविद्वान्, याज्ञीक व वेदशास्त्रपारंगत असा अवलिया पुरुष होऊन गेला. याची अशी आख्यायिका आहे कीं, पुण्यांत मोठा यज्ञ झाला होता त्यावेळीं काशीपासून रामेश्वरपर्यंतचे सर्व याज्ञीक, शास्त्री वगैरे महान् महान् विद्वान्मंडळी यज्ञासाठीं जमा झाली होती. यज्ञ मोठाच व्हावयाचा होता; यामुळें त्याची तयारी वगैरे करणेचें कामही यथाशास्त्र बरेच महिनें चाललें होतें. तेथें जमा झालेल्या विद्वान् विद्वान् मंडळींनीं शास्त्रोक्तपद्धतीनें कुंडें वगैरे सर्व तयारी केली व पुढें थोड्याच दिवसांत यज्ञाचें काम सुरु व्हावयाचें होतें; इतक्यांत हे अवलिया " बाळशास्त्री " साहजीक फिरत फिरत तेथें आले. ( हे कोंकणचे " अवलिया बाळशास्त्री " ह्मणून नांवानें ऐकून सर्वांस माहीत होते ) व यांनी तीं कुंडें पाहिलीं व अशुद्ध अशुद्ध ह्मणत नाक मुरडून चालले. तेव्हां शास्त्री वगैरे मंडळींत चळवळ उडून एवढ्या खटपटीनें केलेलीं कुंडें हे अशुद्ध म्हणणारे कोण ? ह्मणून तपास झाला व त्यावेळीं केलेलीं कुंडें अशुद्ध ( शास्त्रविरुद्ध ) आहेत असें या अवलियांनीं ठरवून दिलें व रीतीप्रमाणें शास्त्रोक्तपद्धतीनें कुंडें तयार करवून काम सुरू झालें. तसेंच एक महाविद्वान् यांची आख्यायिका ऐकून ( फिरत फिरत अजिंक्यपत्रें घेत घेत ) अजिंक्यपत्र घेण्याचे इरादानें आला, परंतु यांजकडून अजिंक्यपत्र न मिळतां त्यास यांपुढें शरण यावें लागलें. बडोद्यांतील पंडितांवर यांची छाप बसलेली होती. हे अवलिया याच घराण्यांतील होत. तात्पर्य हें घराणें मूळपासून प्रसिद्ध आहे. या अवलियांचे ( याच घराण्यांतील ) " गंगाधरशास्त्री जांभेकर " ह्मणून एक शिष्य होते. या गंगाधरशास्त्र्यांस " बाळशास्त्री " ह्मणून एक मुलगा होता; हाच आमचा चरित्रनायक नावानें " बाळ " पण कीर्तीनें " विशाळ " असा होय.

## बाळपण व विद्योपार्जन.

चरित्रनायक " बाळशास्त्री " यांचा जन्म इ० स० १८१० या वर्षी पोंभुर्लें येथें झाला. यांचें आडनांव ' जांभेकर " होतें हें मागें सांगितलेंच आहे. हे लहानपणापासूनच अतिशय बुद्धिवान होते व वर्तन केवळ स्वच्छंदी व उच्छृंखल नव्हतें. यांस घरची शिक्षा फार चांगली होती.

तत्कालीन संप्रदायाप्रमाणें " संस्कृत अध्ययन " बरेंचसें वाडिलांपाशीं बाळपणींच झालें होतें. पुढचें केव्हां, कोठें व कोणते गुरूचे हाताखालीं झालें वगैरे विशेष माहिती मिळत नाहीं. तरीं एवढें खरें कीं, संस्कृतभाषेशीं व तींतील प्रख्यात ग्रंथकारांचे कृतीशीं त्यांचा चांगला पचिय असून पूर्व-वयांत " न्यायशास्त्र " व " व्याकरणशास्त्र " यांत बरीच गती झाली होती. हे एकपाठी असल्यामुळें यांचे गुरु व सहाध्यायी यांस " बृहस्पती " असें ह्मणत असत यांचे तीर्थरूप " गंगाधर " शास्त्री यास नामांकीत शंकरशेटचे घराण्याचा आश्रय होता यामुळें; ते मुंबईस असत. अर्थात् " शास्त्रीबुवा " यांसही मुंबईस रहावें लागे. यांस पाहिल्यानें मुंबईस आणण्यास " सदाशिव काशिनाथ ऊर्फ बापूसाहेब छत्रे " हेच गृहस्थ कारण झाले. ( सन १८१८ त ब्रह्मचादशाही बुडून पुढें २-२ वर्षांनीं जिकडे तिकडे स्थिरता झाल्यावर धूर्त इंग्रजसरकारचें, लक्ष विद्याप्रसार करण्याचे कामीं लागून विद्यालयें स्थापन होण्याचे यत्न सुरू झाले; यावेळीं गांवठी शाळांतसुद्धां मुलें पाठविणेस कोणीं धजत नसत, मग इंग्रजी शिकविणेस तयार नसतील तर नवल नाहीं. प्रारंभीं मिशनऱ्यांनीं हरप्रयत्नानें अनेक संकटें सोसून, लालूच दाखऊन युक्तीप्रयुक्तीनें मुलांस शाळेंत धाडण्याचे कामीं लोकांचीं मनें वळविलीं. सन १८२१ त विद्यालयें स्थापन करण्याचा आपला उद्देश मे० मौंटस्टुअर्ट एल्फिन्स्टन साहेबांनीं एतद्देशीय लोकांस कळविल्यावर " मांडलीक राजे, शेटसावकार, " वगैरे यांनीं प्रशंसनीय औदार्य दाखऊन मदत दिली. सन १८२२ चे आगष्ट महिन्याचे एकवि-सावे तारखेस एज्युकेशन सोसायटीची शाळा मुंबईत स्थापन जाहली. प्रारंभीं लोकांस एतद्देशीय भाषांतून शिक्षण देण्याचा क्रम सुरू करून, जागोजाग शाळा स्थापून त्यांवर देखरेखीसाठीं हुशार व विद्वान् लोक तपासनिस नेमिले. त्यावेळीं मराठी शाळांवर मुख्य तपासनिस हे सदाशिवपंत छत्रे व क्रमवंत यांस नेमिलें होतें. छत्रे यांणीं आपले आप्त, इष्टमित्र वगैरे शिकण्याकरितां मुंबईस आणिले. त्यांची शिकणेची सोय लाऊन दिली; व कित्येकांस आपले घरीं ठेऊन शिकविलें त्यांपैकीं कित्येक लोक मोठे योग्यतेस चढले; त्यांत आमचा चरित्रनायक " बाळशास्त्री " हा एक होता ) इ० स० १८२४

त ह्मणजे तेरावे वर्षी बाळशास्त्र्यांचे विलक्षण बुद्धिमत्तेचे स्वानुभाविक, आश्चर्यकारक उदाहरणावरून एका फौजदारी न्यायमूर्तींनी विद्याखात्याचे अधिकाऱ्याकडे मोठी शिफारस केली ( तो प्रसंग पुढें आख्यायिकेंत समजेलच ) व याप्रमाणें इंग्रजी शिकणेचा योग जुळून आला. यांचा विद्यालयांतील शिक्षणक्रम पुरा होणेस सुमारें पांच वर्षें लागलीं. गुरुवर्य मि. मर्फी, मि. मेनबेरींग यांची " बाळशास्त्र्यांवर " फार बहालमर्जी असून विद्याभ्यासही यांचेच हाताखालीं झाला. सन १८२८ चे अखेरीस शास्त्रीबुवांचा विद्यालयांतील अभ्यास संपला. त्यावेळीं भाषाज्ञान, इतिहास, गणीत यांत यांनीं चांगलें प्राविण्य मिळविलें. आतांचे एखादे पदवीधरास देखील भूषणास्पद होईल इतकी भाषाज्ञानांत व इतिहासांत त्यांची गती झालेली होती. यांना शास्त्रीय विषयांची फार आवड होती. पदार्थविज्ञानशास्त्र, ज्योतिषशास्त्र, रसायनशास्त्र, भूगर्भशास्त्र, मानसशास्त्र इत्यादि अनुभवीक व अध्यात्मिकशास्त्रांवर यांची विशेष भक्ती असे. कोणासही प्रथम कल्पना करितां आली नाहीं, अशी पूर्वोक्त उपलब्ध, क्लिष्ट विषयांवरील ग्रंथ वाचून प्राविण्यता शास्त्रीबुवांनीं मिळविली होती. यांचे गणीतशास्त्रांतील निष्णाततेविषयीं मात्र यांचे शिक्षकांस व विद्याखात्याचे अधिकाऱ्यांस उत्तम माहिती होती. शास्त्रीबुवांचें संस्कृत व इंग्रजीभाषांचें अत्युत्तम ज्ञान पाहून सर्वांस अचंबा वाटत असे. शिवाय फ्रेंच, ग्रीक, ल्याटीन, बंगाली, गुजराथी, कानडी, हिंदुस्थानी, फारशी, तेलगु, या भाषा व वनस्पतीशास्त्र, नीतीशा त्र, इतिहास, न्यायशास्त्र वगैरे शास्त्रें तशींच षट्शास्त्रें हीं चांगलीं अवगत होतीं. मराठी भाषा तर त्यांची अगदीं जन्मभाषाच होती.

## २ अध्यापकत्व.

विद्याखात्याचे अधिकाऱ्यांनीं शास्त्रीबुवांस प्रथमतः सन १८२९ त एल्फिन्स्टन विद्यालयांत गणीतशास्त्र प्रोफेसर ओर्लिबार यांचे हाताखालीं " " अ० प्रोफेसरची " जागा दिली व पुढें लौकरच ओर्लिबार यांचे जागेवर प्रोफेसर नेमिलें. यापूर्वी यतद्देशीय गृहस्थांस हा मान मिळालेला नव्हता. आमचे लोकांत शास्त्रीबुवा हेच पहिले " प्रोफेसर " होत. हॅंडरसन, बेल वगैरे विदेशी मंडळीचे तोडीशीं स्वदेशी " प्रोफेसर बाळशास्त्री " हे होते.

यावेळीं शास्त्रीबुवांचें वय अगदीं लहान म्हणजे पुरती विशीही उलटली नव्हती; अशा बाळपणीं एवढ्या मानाची व हुद्देदारीची जागा या भिडस्त, मर्यादशील व सुस्वभावी विद्वान " बाळानें " पतकरून " शिक्षकाचें काम फार उत्तमरीतीनें बजावून छात्रवर्गास सुप्रसन्न ठेविलेमुळें " लौकरच " विशाळ " मान्यता प्राप्त झाली. याप्रमाणें सन १८४२ पर्यंत प्रोफेसरचें काम केल्यानंतर मुंबई इलाख्याचे एज्युकेशनल इनस्पेक्टरची जागा यांस मिळाली. हें काम १८४५ पर्यंत केल्यावर " नार्मल " स्कूलचे अध्यक्षाचे जागीं यांस नेमिलें. ( नार्मलस्कूलचे अध्यक्षाचें काम विद्यालयांतील अध्यापकाचें काम संभाळून करावें लागे. ) नार्मलस्कूल ही संस्था शास्त्रीबोवांचेच सूचनेवरून सरकारांतून स्थापन झालेली होती. ( पुढें सविस्तर समजेलच. )

## ३ ग्रंथकर्तृत्व व निबंधरचना.

शास्त्रीबुवांनीं विद्यालय सोडिलें; त्यावेळीं गद्यग्रंथांसंबंधानें मराठी भाषा अगदीं बाल्यावस्थेंत होती; जुन्या भाषापद्धतीनें लिहिलेल्या कांहीं बकासुराच्या बखरी सारख्या बखरी मात्र तींत होत्या. पण या भाषेस व्याकरणाचा निर्बंध, किंवा लिहिण्याची व्यवस्था हीं मुळींच नव्हतीं. कोणत्याहीप्रकारें तिला " निश्चितपणा " म्हणून आला नव्हता. गंगाधर शास्त्री फडके यांनीं " मराठी व्याकरण " तयार केलें होतें. पण त्यांतील नियमांस व्यापकपणा कमी असून, प्रसार कमी होता. या नवीन मंडळींस " नूतन संपादन केलेलें आंग्ल भाषेंतील विद्यामृत " आपल्या बंधुवर्गास प्राप्त करून देण्याची इच्छा स्वाभाविकपणें झाली; तेव्हां स्वभाषेकडे आपोआप त्यांचें लक्ष वळलें; व मराठी भाषा सुधारून व इंग्रजींतील ज्ञानभांडार खुलें करून, देण्यासाठीं यांनीं मराठी भाषेंतील गद्यग्रंथांची संपत्ती वाढविण्यास प्रारंभ केला. अलीकडील गद्यग्रंथाचे पहिले जनक, शास्त्रीबुवांचे पहिले आश्रय दाते व नंतरचे स्नेही " सदाशिवपंत छत्रे हे होत. छत्र्यांनीं वेताळपंचविशी, इसापनीति व बाळमित्र अशीं तीन भाषांतरें मराठींत प्रथमच केलीं. पहिल्यानें बाळमित्राचें केवळ भाषांतर करणेचा छत्र्यांचा विचार होता, परंतु या ग्रंथाचा निवळ तरजुमा न करितां इंग्रजी पुस्तकाचे आधारें महाराष्ट्र रीतीरिवाजास शोभतील अशातऱ्हेच्या गोष्टी मराठींत रचल्यास त्या लोकांत भारी आव-

डल्या होतील; अशी सूचना प्रथमच " बाळशास्त्री " यांनीं केली; व ती छत्र्यांनीं मान्य केली. हें पुस्तक इतक्या सफाईनें व बेमालुमरीतीनें मराठी भाषेंत आणिलें आहे कीं, तें इंग्रजीचें भाषांतर आहे असें मोठ्या मुष्किलीनें समजतें. शास्त्रीबुवांनीं देशी भाषेची सेवा मोठे आवडीनें केली. यांनीं लहान मुलां करितां ( १ ) बाल व्याकरण ( २ ) भूगोल विद्या ( ३ ) नीति कथा, ( ४ ) सारसंग्रह हे चार ग्रंथ लिहिले. बालव्याकरणांतील व्याख्या फार व्यापक असून पुनः संक्षिप्त आहेत. तसेंच यांची भाषासरणी, व्यवस्था व विषय प्रतिपादन हीं फार सरळ व सुबोध आहेत. इ० स० १८५१ त मेजर क्यांडी यांणीं छापून प्रसिद्ध केलेला हिंदुस्थानचा इतिहास शास्त्री-बुवांनींच एलफिन्स्टनकृत इतिहासाचे आधारें रचिलेला होता. यांतही हरएक ऐतिहासिक प्रकरणीं चांगली माहिती संक्षिप्तरीतीनें थोडक्यांत दिली आहे. शिवाय इंग्लंडचा इतिहास, भूगोलशास्त्र, ज्योतिषशास्त्र, गणीतशास्त्र वगैरे विषयांवरही यांनीं ग्रंथ रचले होते तसेंच " मराठी व्याकरण " या विषयावर विस्तृत ग्रंथरचना केली होती. " हिंदुस्थानचा प्राचीन इतिहास अथवा मुसलमानी अंमल " म्हणून पुस्तक यांनीं रचिलें असून तें शाळांचे अभ्या-सांत दाखल झालें होतें. ' शब्दसिद्धी निबंध " भाऊ महाजनांनीं शास्त्री-बुवांचे मदतीनें रचिला आहे. यांत मराठीभाषेंतील शब्दांचे उत्पत्तीविषयीं चांगली माहिती दिली आहे. विधवाविवाहाचे सशास्त्रतेसंबंधानें पहिल्यानें यानींच गंगाधरशास्त्री फडके यांजकडून छोटेंसें पुस्तक लिहविलें " हे मानसशास्त्रावरही कांहीं ग्रंथरचना करीत होते. भाऊ महाजन यांनीं काढिलेलें " दर्पण " नांवाचें दर आठवड्यास निघणारें वर्तमानपत्र कित्येक वर्षे चाललें होतें. हें इंग्रजी, मराठी दोन्हीं भाषांत निघत होतें व राजकीय, सामाजिक, व्यापारसंबंधीं मजकूर यांत येत असे. त्यावेळच्या लोकांत या पत्राचें मोठें वजन होतें व हरएक विषयाचा ऊहापोह त्यांत मार्मिकपणानें, निःपक्षपातानें व योग्यरीतीनें होत असे. " दिग्दर्शन " म्हणून मासिक पुस्तक शास्त्रीबुवांनीं सुरु केलेलें बरींच वर्षें चाललें होतें. या पुस्तकांतील भाषेची सरणी आणि विषयविवेचनाची पद्धति त्यांचे प्रचंड विद्वत्तेस अनुरूप व भूषणास्पद होती. " बॉम्बे ब्रॉंच आफ् दी रायल एशियाटिक सोसायटी ". व जिओग्राफिकल

सोसायटी " या नांवाच्या दोन सभा मुंबईस बऱ्याच वर्षांपासून स्थापन झाल्या होत्या. "बाळशास्त्री" हे या दोन्हीं सभांचे सभासद होते. "प्राचीन ताम्रपट, शिलालेख, भूगर्भशास्त्र व वनस्पतिशास्त्र या विषयांवर यांनी लिहिलेले निबंध सदर संस्थांचे मासिक पुस्तकांतून व वार्षिक हकीगतींतून छापून प्रसिद्ध झाले आहेत. शिवाय " रायल एशियाटिक सोसायटी " चे मुंबईशाखेचे वार्षिक हकीगतींत येणप्रमाणें शास्त्रीबुवांचे निबंधाची यादी आली आहे.

१ गिरनार मुक्कामीं सांपडलेल्या काळ्या दगडावरील शिलालेखांचें भाषांतर ( इंग्रजी ) पु० १ पृ० ९४.

२ खारेपाटण येथें सांपडलेल्या काळ्या दगडावरील शिलालेखाचें भाषांतर ( इंग्रजी ) पु० १ पृ० २०९.

३ नागपुर येथें मिळालेल्या शिलालेखाची नकल व भाषांतर ( इंग्रजी ) पु. १ पृ० २५९.

४ मालवणच्या लोखंड सांपडणाऱ्या मातीची हकीगत पु० १ पृ ४३५

५ सातारा मुक्कामीं व नांदगांव येथें मिळालेल्या दोन ताम्रपटांची नकल व भाषांतर ( इंग्रजी ) जेम्सबर्डचे टिपांसहीत. पु० २ पृ० १.

६ कोल्हापूर मुक्कामीं देवनगरी लिपींत व हल्लीं कानडी लिपींत लिहिलेल्या सात ताम्रपटांचें भाषांतर इंग्रजी ) पु० २ पृ० २६३.

७ कोल्हापूर इलाख्यांत सामनगड मुक्कामीं सांपडलेल्या शालि० शके ६७५ मधील ताम्रपटांचें भाषांतर ( इंग्रजी ) पु० २ पृ० ३७१.

## ४ आख्यायिका.

"बाळशास्त्री" यांस प्रथमतः इंग्रजी शिकणेस एका फौजदारी न्यायमूर्तीचें शिफारसपत्र कारण झालें असें मागें सांगितलेंच आहे तो प्रसंग असाः—

आपल्या वयाचे १४ वे वर्षी ह्मणजे इ. स १८२४ त बाळशास्त्री मुंबईस आले. यावेळीं यांची सर्व बाजूनें गरीब स्थिती असून इंग्रजीचा गंधही नव्हता. असें असून, मोठ्या रस्त्यावर दोघां गोऱ्या शिपायांची कलागत लागून मारामार झाली व न्यायाधिशापुढें फिर्याद गेली; त्यावेळीं यांना साक्षीस बोलाविलें, ( हे भांडणाचेवेळीं तेथ उभे होते. ) व न्याया-

धिशासमोर साक्ष झाली तेव्हां यानीं त्या कलागतीची हकीगत जशीच्यातशी उत्तमरितीनें सांगितली. इतकी यांची स्मरणशक्ती प्रखर होती

२ पुण्याच्या पाठशाळेवरील मुख्य जाडे विद्वान् पंडीत मोरशास्त्री साठे यांच्यासारखा पंडीत व सर्वमान्य ह्मणून ( महाराष्ट्रांत यांचेसारखा पंडीत कोणी नव्हता असें ह्मणतात ) नांवाजलेल्या गृहस्थांशीं भेटीप्रसंगीं संस्कृतांत शास्त्रीय विषयासंबंधानें बरीच " भवति-न भवति " करून यांनीं त्यांची बरोबरी केली व परस्परांस उभयतांचे योग्यतेची ओळख होऊन आनंद झाला.

३ गव्हर्नर साहेब शास्त्रीबोवांस अकरा पावलें सामोरे येत असत व बहुतेक समारंभाचेवेळीं गव्हर्नरसाहेबांकडून शास्त्रीबुवांस आमंत्रण येत असे व हेही जात असत.

" बाळशास्त्री जांभेकर " यांचा नांवलौकिक ऐकून त्यांना एकवार पहावें; ह्मणून एक सामान्य गृहस्थ यांचेकडे आला व घराचे दरवाज्यावर एक साधा व भव्य पुरुष उभा होता त्यास आपलें मनोगत कळविल्यावेळीं त्यानें " शास्त्रीबुवांची भेट कृपा करून तिसरे प्रहरीं आल्यास होईल " असें सांगितलें. त्याप्रमाणें तो गृहस्थ पुनः नेमिल्यावेळीं येतांच शास्त्रीबोवांची भेट होऊन त्याची खात्री झाली कीं, सकाळीं दरवाज्याशीं भेटलेले भव्य साधे पुरुष ते हेच " बाळशास्त्री " होते व एवढा थोर पुरुष ( लौकिकवान, विद्वान ) इतका साधा, सभ्य, गर्वरहीत, लीन, सन्माननीय असून अपरिचित अशा गरीब अतीतअभ्यागताचा सत्कार करणारा आहे असें पाहून त्याची पूज्यबुद्धि दुणावली व त्यास धन्यता वाटली.

## ५ लोकमत.

" पश्चिमहिंदुस्थानांत अति विख्यात, नामांकित विद्वान् एलफिन्स्टन विद्यालयांतील प्रोफेसर " बाळगंगाधरशास्त्री जांभेकर होऊन गेले; हे विद्याभ्यासाविषयीं व अनेक उपयुक्त शोध करण्याविषयीं उत्कंठित व प्रयत्नशाली असत. वर्तमानपत्रें व मासिक पुस्तकें यांचा प्रघात यांनींच प्रथम घातला. यांस " एडिंबरो रिव्ह्यू " सारख्या त्रैमासिकांत देखील निबंध लिहिणें कठीण नव्हतें. यांनीं सरकारी काम संभाळून शालोपयोगी लहानमोठीं कित्येक पुस्तकें रचिलीं. यांची आयुर्मर्यादा दीर्घ असती तर आजपर्यंत विद्येच्या

कामांत त्यांचे हातून मोठमोठालीं कामें घडलीं असतीं यांत संशय नाहीं. यांची बुद्धि मोठी विशाल होती. या देशांतील विद्वन्मालिकेंतील हे "बाळ-शास्त्री" पहिलें रत्न होत. हे एकपाठी असून यांची धारणाशक्ती अपार विलक्षण होती. यांचे अकालीक मृत्युमुळें "प्राक्कालीन इतिहास" या विषयावरील अमोलीक व उपयुक्त निबंधकार नाहींसा झाला. हे उत्तम सदाचरणी असून परोपकारी, दयाळू व उदार, होते." असे उद्गार "प्रसिद्ध डॉ० वुइलसन्, निबंधमालाकार, न्यायमूर्ती रानडे, कविचरित्रकार, सरस्वती-मंडलकर्ते, मुंबईवर्णनकार, सद्वर्तनकर्ते, ज्ञानोदयकर्ते, बॉम्बे ब्रां. ऑदि रा. ए. सोसायटीचे मासिकपुस्तककार, सहाध्यायी, छात्रवर्ग वैगेरे वैगेरे नामांकीत मंडळींनीं कित्येकदांतरीं काढलेले आहेत यांत नवल नाहीं कारण "विद्वान् सर्वत्र पूज्यते"

## ६ लोकोपयोगी सार्वजनिक काम.

हल्लीं मुंबईत "नेटीव जनरल लायब्ररी" ह्मणून पुस्तकालय उर्जितदशेस आलेलें आहे. हें राघोबा जनार्दन यांणी स्थापन केलें त्यावेळीं "बाळशास्त्री" यांची त्यास सर्वप्रकारें चांगली मदत होती. विद्यालयांत असतांना ' डिबेटिंगक्लब " नांवची एक सभा स्थापन करून तिचे सभासद विद्यार्थी व शिक्षक यांस शास्त्रीबोवानीं नेमिलें होतें. यांत धार्मीक व राजकीय विषयांखेरीज, सामाजिक, नैतिक शास्त्रीय, तसेंच ग्रंथ व भाषा वैगेरे विषयांवर चर्चा होत असे. बाळशास्त्र्यांचे आश्रयानें कित्येक वर्षें ही सभा चालली होती व तींत "बाळशास्त्रीच" प्रमुख होते. शास्त्री, पंडितलोक वैगेरे यांच्या सभांत प्रमुख कार्यभाग शास्त्रीबुवा हेच उचलीत व त्यांत अध्वर्युपणाचा मान यांस मिळे सदर क्लबांत ' बाळशास्त्री " यांचें अस्खलित, चटकदार, बोधपर, हृदयभेदक असें उत्तम, प्रौढ भाषण होऊन यांचे भाषणाचा ठसा श्रोत्यांचे मनावर चांगला उमटत असे. बाहेरगांवच्या शाळांवर देखरेख ठेविणेचें काम यांजकडे होतें त्यावेळीं; यांनीं शाळांवरील शिक्षक "सत्यप्रिय. धर्मनिष्ट, सदाचरणी, उद्योगप्रिय, तद्गुणी, बहुश्रुत, विद्वान्, निर्मत्सरी असे तयार होऊन लोकहिताचे कामीं उपयोगीं पडावे; अशा स्तुत्य हेतूनें "नार्मलस्कूल" स्थापन करणेची सरकारास सूचना करून साधक

बाधक प्रमाणांनीं आपलें म्हणणें स्थापन केलें व त्याप्रमाणें " नार्मलस्कूलची " स्थापना करविली. ही गोष्ट इ० स० १८४५ चे एप्रिल महिन्यांत झाली. याशिवाय कित्येक गांवीं " शाळा " स्थापन केल्या; कुलशीलसंपन्न असा होतकरू शिक्षकवर्ग तयार होणेकरितां मुंबईत आणून त्यांचे रहाण्यासवरण्याची एकंदर सोय लाऊन दिली व त्यांजवर देखरेख हे स्वतः उत्तमप्रकारें ठेवित असत. कोणतेंही काम पत्करल्यानंतर तडीस नेण्याविषयीं जिवापाड मेहनत करून लोककल्याणाचे कामाचा एकही प्रसंग यांनी वायां जाऊं दिला नाहीं. यांचेवेळीं नुसत्या संभावितपणावरही मिळवितां येणारा " प्रिन्सिपाल सदर अमीन " ( श्रेष्ठतर मुनसफ ) हा हुद्दा असून दरमहा पगार ५०० शें रुपये असे. स्नेही मंडळीनें हा हुद्दा मिळविणेकरितां अर्ज करण्यास सुचविलें त्यावेळीं " पगार मोठा असला; तरी खऱ्याखोट्याची निवड करण्याएवढें मोठें जबाबदारीचें काम मला नको " " लोककल्याणाचें काम जें मी पत्करिलें आहे तें च मला विशेष आवडतें " असा सरस उद्गार काढिला व तेंच काम अखेरपर्यंत चांगलेरीतीनें पार पाडलें. याशिवाय कित्येक ग्रंथ स्वतःरचून व रचऊन लोकोपयोगी कामें बरींच केलीं.

## ७ धर्ममतें, धर्मसुधारणा व सामाजिकसुधारणा.

बाळशास्त्री " स्वधर्मे निधनं श्रेयः " ही उक्ति सदोदित आपले हृदयीं वागवून " सर्व धर्मांचीं मूलतत्वें एकच " असें जाणून कोणतेही धर्माशीं विरोधभाव न ठेवितां आपले उत्तमोत्तम हिंदूधर्मावर सर्व व्यापकदृष्टीनें निष्ठा ठेऊन सर्वकाळ आचरण ठेवीत. ते आस्तिक पक्षाचेच होते घरांतील देवधर्मही जुने रीतिप्रमाणें बहुतेक असे तथापि मुख्यः होमहवन व बाह्यशास्त्रतोद्यापन, हीं मुळींच नसत. प्रातःसंध्या व सायंसंध्या नियमानें करीत. अर्थ समजल्यावांचून कोणतेंही पठण वगैरे कृत्य करणें बाळशास्त्री यांस संमत नव्हतें. सर्व धर्मांतील 'ग्राह्यांश ' घ्यावा असें ते सांगत असत. रोज संध्याकाळीं ( रात्रीं ) भोजनोत्तर घटका दोन घटका प्रेमभावानें देवाचे गुणानुवाद गाऊन व छात्रवर्ग वगैरे सहचर मंडळीकडून गावऊन भजन करण्यास अखेर पर्यंत चुकले नाहींत. शास्त्रीबुवा " एकनाथ, नामदेव, तुकाराम वगैरे संत मंडळींच्या वचनाशीं परिचय झालेले राष्ट्रीयब्राह्मण होते. यामुळें " जातिभेदाचें प्राबल्य " मानणाऱ्यांपैकीं ते

नव्हते. " बाबावाक्यं प्रमाणं " याप्रमाणें परंपर चालत आलेली रूढी वेदशास्त्र पारंगत वैदिक, याज्ञीक, शास्त्री वगैरे मंडळींचे जनसमूहांतील फाजील धुरिणत्वामुळें गतानुगतिक बनलेली शास्त्रविरुद्ध अशी, शास्त्रीबुवांस मान्य नसे. ज्ञानेश्वर वगैरे सारख्या राष्ट्रीय ब्राह्मणांचे प्रासादीक वाणीस पाठबळ देणाऱ्या इंग्रजी विद्येचें अंजन लोकांच्या समजुतीस मिळूं लागल्यापासून नवीन इंग्रजी शिकलेल्या मंडळीस " जुनेलोकांच्या मंडळींचीं कोतेपणाचीं व दुराग्रहाचीं अशीं फाजील कर्मठपणाचीं विक्षिप्तमतें, धर्मसंबंधीं खुळ्या समजुती, जातिभेद, भक्तीरहीत कर्मठपणाचें थोतांड वगैरे सहन होईनासें झालें व समाजांत दोन पक्ष झाले. एक जुना " गतानुगतिक " पक्ष, व दुसरा शास्त्रसंमत, सत्यप्रिय, देशकालवर्तमानाप्रमाणें वागणारा नवीन " सुधारक " पक्ष या दुसऱ्या " सुधारक " पक्षांतही अंमल बजावणीकरितां हल्लीं प्रमाणें " नरम " " गरम " असे दोन तट झाले होते. गरमपक्ष आपणांस अनुचित वाटणारें कर्म ' त्याग ' करून उचित अशा प्रिय समजुतींचें अनुकरण तत्काळ करूं पहात होता व दुसरा " नरमपक्ष " दूरदर्शी, थंड, विचारवश असा असल्यामुळें " समाजसुधारणा युक्तिप्रयुक्तींनें, समजुतीनें पहिल्यानें लोकांस नीट समजावून देऊन ' अमलांत आणीत असे. लोकांचीं मनें सुशिक्षीत झाल्याशिवाय सुधारणा फलद्रुप होणार नाहीं असें यांचें मत होतें. " बाळशास्त्री " हे पहिल्यापासूनच सुधारकपक्षांतील नरम तटास ( पक्षास ) सामील होते व लौकरच या पक्षाचे ते पुढारी झाले व पुष्कळ अनुयायीही मिळाले. जुनेलोकही कांहीं हळुहळु सामील झाले. " गरमपक्षास " ही अनुकूल होणें भाग पडलें व यांनीं आपलें समाजसुधारणेचें काम " धिमेपणानें, चातुर्यानें व नेटानें संभाळून अनेक शत्रू व आंतून निंदा करणारे लोक उत्पन्न झाले असतांही रावबहादूर माधवराव रानडे यांप्रमाणें पुष्कळ धोरण व पुढारीपणा अभिव्यक्त केला. बालविवाह, विधवाविवाह वगैरे महत्वाच्या विषयांसंबंधानें हरतऱ्हेनें लोकमत जागृत केलें होतें. मिशनरीलोकांचे भपक्यास भुलून धर्मांतर केलेला " श्रीपाद शेषाद्री " नामक गृहस्थ पश्चात्ताप पावून हिंदुधर्मांत येऊं पहात होता. " हिंदुधर्म इतर धर्माप्रमाणेंच असून " शेखमहंमदासारखे परधर्मीय लोक " जर यांत सामील होऊं शकले,

तर मुळच्या हिंदूंसही दाखल होतां आलें पाहिजे." अशी उच्च दृढतर समजूत शास्त्रीबोवांची होती व ह्मणूनच दयार्द्रदृष्टीनें, परोपकारबुद्धीनें सदहु "श्रीपादास" हिंदुधर्माची दीक्षा देण्याकारितां हातीं धरिला व याकामीं बऱ्याच चांगलेलोकांनीं मदतही केली; परंतु "दुर्धारकांचे" दानतीमुळें यावें तसें यांस यश आलें नाहीं. या कामीं बरीच नुकसानीही शास्त्रीबुवांची झाली. तरींही शक्य तितकें धैर्य धरून देशकालवर्तमानाकडे नजर फेंकून समाजसुधारणा करण्यास यांनीं माघार घेतली नाहीं.

## ८ सहाध्यायी.

"बाळशास्त्र्यांचे सहाध्यायीही चांगले नामांकीत नांवालैकिकास आलेले असे होते. त्यांत कै० दादोबा पांडुरंग तर्खडकर, प. वा. नौरौजी फर्दुनजी, भाऊ महाजन, जनार्दन वासूदेवजी, नारायण कृष्ण लाड, नाना नारायण वगैरे प्रमुख होते. दादोबांचें व्याकरण तर सर्वांस माहीत आहेच. नौरोजी हे मुंबई हायकोर्टाचे भाषांतरकार व दुभाषी होते. भाऊ महाजन प्रसिद्ध लेखक होते. यांचें "प्रभाकर" व धूमकेतू वर्तमानपत्र प्रसिद्ध व सर्वमान्य होतें. नामदार न्यायमूर्तीपणा पहिल्यानेंच जनार्दन वासुदेवजी यांस मिळाला. लाड हे ही उत्तम लेखक होते व नाना हे समाजसुधारक व विद्याप्रसारक ह्मणून प्रसिद्ध होते.

## ९ छात्रवर्ग.

शास्त्रीबुवांच्या सहाध्यायांप्रमाणें छात्रवर्गही फारच मोठा असून नांवारूपास आलेला होता. त्यांत कै० भाऊदाजी ( रक्तपितीवरील औषधाचे शोधक ) नारायणदाजी ( वनस्पतींचे शोधक ) रा. ब. प्रोफेसर केरूनाना छत्रे, ( गणीत-प्रसिद्ध ) डॉ. आत्माराम पांडुरंग, रामचंद्र बाळकृष्ण ( मा. क. क. दप्तरदार ) नाना मोरोजी ( मुंबईचे माजी तिसरे माजिस्ट्रेट ) भोगीलाल प्राणवल्लभदास, सरदार विनायकराव वासुदेव. वगैरे मंडळी प्रमुख होती. आज ४०।४५ वर्षें हिंदुस्थानचे कल्याणाप्रीत्यर्थ अव्याहत झटत असलेले त्रिखंडकीर्ति "शेठ दादाभाई नवरोजी" हेही बाळशास्त्री यांचे शिष्य होत.

## १० बाह्यस्वरूप व स्वभाव.

यांचा वर्ण सांवळा असून सर्व अवयव यथायोग्य होते. चेहरा साधा, इज्जतदार व भव्य होता. बांधा मध्यम असून मुद्रा प्रसन्न दिसे. सदा हंसतमुख असत, बेताचें तांबडें पागोटें डोकीस असे. नेसण्यास रेशिमकांठीं नागपुरी धोतरें, शुभ्र असा स्वच्छ पुणेशाही आंगरखा व शुभ्र एक उपवस्त्र असा नेहमींचा पोषाख असे. पोषाख जरीं जास्त किंमतीचा असे; तरी तो वापरण्यांत छानछोकी, थाटमाट टापटीप वगैरे फाजीलपणा नव्हता. पायांत दक्षिणी जोडा घालीत. स्वभाव तर अत्यंत बालबोध, परोपकारी, निष्कपटी, आनंदी, उदार, दिलदार, दूरदर्शी, विचारी, विनयी असा सन्माननीय असे. यांस " विद्याव्यसनाखेरीज " दुसरें व्यसन नव्हतें.

## ११ परलोकगमन व नातलगमंडळी.

विश्रांतिसाठीं शास्त्रीबुवा कनकेश्वरीं गेले होते; तेथें ज्वर येऊं लागला व प्रकृति उत्तरोत्तर क्षीण होत चालली औषधोपाय वगैरे बरेच केले, परंतु आराम न पडून अखेरीस सन १८४६ च्या मे महिन्याचे सतरावे तारखेस देवाज्ञा जाहली. यावेळीं शास्त्रीबुवांचें वय ३५ वर्षांचें होतें. यांचेमागें यांना एक मुलगा, बायको व सासू अशीं माणसें होतीं. यांची बायको ता० २ मे १८४७ रोजीं मुंबईत वारली व मुलगा सन १८४८ त जून महिन्याचे अकरावे तारखेस आजवळीं पंढरपुरीं कैलासवासी झाला. शास्त्रीबुवांस " चिमाबाई व लाडकीबाई " ह्मणून दोन बहिणी होत्या. चिमाबाई मालवण येथें योग्यांचे घरीं दिलेली असून दुसरी लाडकी पुण्यांचे " जानवेकर " यांकडे दिली होती. नारायणशास्त्री ह्मणून एक बंधू होता; यांचे मुलाचें नांव " यशवंतशास्त्री असून यांस ' लक्ष्मणशास्त्री " या नांवाचा मुलगा आहे. हे " लक्ष्मणशास्त्री ' पोंभुर्लें येथें आज हयात आहेत.

" बाळशस्त्री जांभेकर " ही सोनेरी अष्टाक्षरी आमचे मंडळाचे सामाजिक इतिहासांतून पुसटून जाणें अशक्य आहे! यांचे परलोकगमनामुळें रिकामी झालेली समाजांतील प्रमुख जागा भारदस्तपणानें व सर्वमान्यतेनें अंगीकारण्यास त्यावेळीं कोणच तयार नव्हते ही गोष्ट फार विषादकारक वाटते. अशातऱ्हेचे विलापरव महान् महान् मंडळींनीं काढिले आहेत.

शास्त्रीबुवा अखेरीस आपल्या अतुल गुणगणानें देशभर उदाहरणीय व अनुकरणीय होऊन, लोकमान्यतागिरीचे अत्युच्च शिखरावर असतांच सर्वांस चटका लावून परलोकवासी झाले. हें त्यांचे स्वतःचे संबंधानें वाईट झालें असें ह्मणतां येणार नाहीं. मात्र यांचे मृत्यूनें या देशाची झालेली हानी निःसंशय कल्पनेच्या पलीकडे झालेली आहे. रामदासोक्तीप्रमाणें " मरावें परी कीर्तिरूपें उरावें " या न्यायानें शास्त्रीबुवा मेले नाहींत. कीर्तिरूपानें उरलेले आहेत; त्यांचेसारख्या सर्वमान्य पुढाऱ्यांचा कित्ता गिरवून मथळ्यांतील लोकहितवादीच्या उक्तीप्रमाणें " धर्मशील, तपस्वी व सुखी असे आधुनिक पुढारी तयार होतील त्या सुदीनदिवशीं खरोखर हिंदमातेच्या पुत्रांचें कल्याण होऊन " बाळशास्त्री " यांचे मनोरथ तडीस जातील व सर्वत्र आनंदमय होऊन जाईल ? यांत संशय नाहीं. असे पुढारी व आनंदाचे दिवस राष्ट्रास सदोदीत प्राप्त होवोत ह्मणून प्रार्थना करून हें चरित्र " गंगेतलें पाणी गंगेंतच " याप्रमाणें " गंगाधर बाळ " यांस अर्पण करून पुरें करितों.

**प्रार्थना—श्लोक.**

**न निश्चय कधीं ढळो, कुजन विघ्नबाधा टळो ।**
**न चित्त भजनीं चळो, मति रुदुक्तमार्गीं वळो ॥**
**स्व तत्व हृदया कळो दुरभिमान सारा गळो ।**
**पुन्हा न मन हें मळो दुरित आत्मबोधें जळो ॥ १ ॥**

---

## पाणी व त्याचे औषधी उपयोग.

पाणी ह्मणजे काय पदार्थ आहे हें लहानापासून थोरापर्यंत कोणास माहित नाहीं असा मनुष्यप्राणी ह्या भूतलावर सांपडणें विरळा. पाण्यानें सर्व जगाचा $\frac{3}{4}$ भाग व्यापिला आहे व नेहमीं आपल्या पिण्यामध्यें, स्वयंपाक करण्याचेकामीं, वस्त्रें, भांडीं व हरएक चिजा धुवून स्वच्छ करण्याचेकामीं हें उपयोगांत येतें. याच्यायोगानेंच धान्य, भाजीपाला, फळफळावळ पिकते. हें आपल्या उपयोगी पडतें तितकेंच प्रत्येक प्राण्याचें पोषण करण्याचेकामीं त्यांना अत्यावश्यक आहे. त्याच्या वाफेच्यायोगानें केवढालीं मोठमोठीं

अवाढव्य कामें होतात हें आगगाड्या, आगबोटी, गिरण्या वगैरे प्रत्यक्ष पहावयास मिळत असल्यामुळें कळून येण्यासारखें आहे; पण त्याबद्दल विवेचन करण्याचा माझा आज हेतु नसल्यामुळें मुख्य मुद्याकडे वळतों.

**शुद्ध पाणी** Pure water ) हैड्रोजन ( Hydrogen ) आणि ( Oxygen ) ऑक्सिजन नांवाच्या दोन वायुरूपी द्रव्यांच्या रसायनीक संयोगानें तयार होतें. त्या वायूंचें वजनीं प्रमाण २-१६ व आकारावर २-१ आहे, हें सप्रमाण प्रयोगाच्यायोगानें सिद्ध करून दाखवितां येतें. **गुणधर्म** शुद्ध पाण्यास वास, चव, अगर रंग नसतो. त्यास स्वतःचा आकार नाहीं. पातळ पदार्थ असल्यामुळें ज्या भांड्यांत घालावें त्याचाच आकार धारण करितें. ह्याच्या अंगीं पुष्कळ पदार्थ विरघळविण्याची शक्ति आहे. हें विषारी नाहीं परंतु ह्यांत जर जिवंत प्राणी बुडवून ठेविला तर श्वासोश्वास करण्याकरितां मोकळा ऑक्सिजनवायु न मिळाल्यामुळें मरतो. पाणी नेहमीं पातळच असतें; परंतु कृत्रिमरीतीनें घनरूपीं बर्फ म्हणून आढळतें व वायुरूपीं वाफ होऊन रहातें. जेव्हां पाण्याचा बर्फ बनवितात त्यावेळीं त्याच्या अंगीं असलेली सर्व उष्णता काढून घेतात. पाण्याचा बर्फ होतांना एक मोठा चमत्कार दृष्टीस पडतो तो हा कीं, पाण्याच्या आकारापेक्षां त्याच पाण्याच्या बर्फाचा आकार मोठा होतो व ह्यामुळेंच बर्फ जर पाण्यांत टाकलें तर त्यावर तरंगतांना दृष्टीस पडतें पाण्यास उष्णता लाविली म्हणजे गरम होतें व नंतर त्याची वाफ होते. ह्यावरून पाणी तीन स्थितींमधें राहूं शकतें हें सिद्ध झालें. घनरूपीं बर्फ, पातळ पाणी, वायुरूपीं वाफ.

**औषधीं गुणधर्मः**—पाणी प्याले असतां तें तहान शमवितें. जर योग्यप्रमाणानें घेतलें तर भूक ब आंतड्याची क्रिया वाढवितें व शरीरास पोषकद्रव्यापैकीं एक बनतें. ज्यावेळीं एखाद्यास ताप जास्त चढतो नव्हे तो तापानें बेहोष होतो व ताप कमी करणाऱ्या औषधांची क्रियाही घडून आलेली बरोबर दिसून येत नाहीं अशा आणीबाणीच्यावेळीं जर त्यास गार पाण्याचें स्नान घातलें तर अपाय न होतां रोग्यास किती हितावह होतें हें प्रत्येक डॉक्टरास-देशी वैद्यास नव्हे-अनुभवावरून व शिक्षणापासून माहीत आहेच. पित्ताची उचल होऊन तोंडास पाणी सुटणें, ओकारी येणें, कांहीं

रोगामुळें अन्नाशयापासून रक्तस्राव होणें इत्यादि अनेक स्थिती बंद करण्याचे कामीं बर्फाचे लहान लहान तुकडे तोंडांत विरघळूं दिले असतां फार उपयोगीं पडतात. ताप अतिशय चढला असतां डोक्यावर बर्फ ठेविल्यानें तो १।२ डिग्री कमी होतो. ह्याचा सुजेच्यायोगानें वृषणवृद्धि होते ती, हर्निया, मेंदूचे कांहीं विकार ह्यांत रक्ताचा त्या भागास पुरवठा कमी करून सूज व वेदना कमी करण्याचे कामीं उपयोग करितात. गुडघी किंवा संधीवातानें एखादा सांधा सुजून फारच कळा मारीत असल्यास जर त्यावर बर्फ किंवा बर्फाच्या पाण्याची पट्टी ठेविली तर ज्याप्रमाणें थोड्या अवकाशांत मंत्रसामर्थ्यानें कळा कमी व्हाव्यात तद्वत् कमी होतात व रोग्यास आराम वाटतो. वाफेच्या वाफाराच्यायोगानें रक्ताभिसरणास जोर येऊन, शरीरांतील ग्रंथिकांना चेतना उत्पन्न होते व त्यांची क्रिया वाढते, आणि ज्ञानतंतु शांत होऊन घाम येतो न ताप कमी होतो पाणी जास्त प्यालें असतां इंद्रियजुलाबाप्रमाणें त्याचा परिणाम घडतो व लघवी पुष्कळ होऊन मूत्रपिंड, मूत्राशय व लघवीचा मार्ग धुऊन साफ व स्वच्छ करण्याचे कामीं फार उपयोग होतो व त्यायोगानें मार्गांतील रोगाचीं द्रव्यें नाहींशीं होतात. सकाळीं उठल्याबरोबर नेहमीं पाणी प्याल्यास ज्यांना मलावरोधाचा विकार आहे त्यांना शौचास साफ होतें व अशारीतीनें सौम्य रेचकाप्रमाणें तें उपयोगीं पडतें. जेव्हां उलटी व्हावी अशी इच्छा होईल त्यावेळीं गरम पाणी बरेंच प्याल्यास तें उलटी करितें.

शौचास होत नसल्यास अगर शस्त्रप्रयोगाच्या अगोदर गरमपाणी पिचकारी रूपानें एक पासून तीन शेर गुदद्वारांतून आंत घातल्यास तावडतोब शौचास होतें व सर्व मल धुवून जाऊन मार्ग साफ होतो. ह्याच तत्वावर काहीं शस्त्रप्रयोग करावयाचा झाल्यास प्रयोगामध्यें घाण होऊंनये ह्मणून रोग्यास अगोदर पिचकारी मारतात. पिचकारी देतेवेळीं कांहीं विशेष प्रसंगीं निरनिराळीं औषधी द्रव्यें, एरंडेलतेल, टरपेनतेल, साबण, अफूचा अर्क वगैरे उपयोग करितात. अशाप्रसंगीं पाणी कमी प्रमाणावर घालतात. अंग धुवून साफ राखणें, जखमा धुणें, शरीरांतील उष्णता कमी किंवा जास्त करणें, वेदना कमी करणें, झोंप येत नसल्यास त्यावेळीं, वाताचेप्रसंगीं व लहान

मुलांस आंचके येतात त्यावेळीं पाण्याचा बाह्यउपचार करितात. दारूनें धुंद होऊन बेशुद्ध झालेल्या मनुष्याच्या आंगावर एकदम जर पुष्कळ थंडपाणी ओतलें तर त्याला शुद्धीवर आणण्यास तें किती उपयोगी पडतें हें एकवेळ ज्यांना दवाखान्यांत पहावयास सांपडलें असेल ते कधीं विसरतील असें मला वाटत नाहीं. मूल जन्मतांच जर हालचाल करीत नसलें किंवा रडलें नाहीं तर त्याला एकवेळ थंडपाण्यांत व लागलेंच गरमपाण्यांत बुचकळतात, त्यायोगानें रक्ताभिसरणास मदत होऊन तें श्वासोश्वास घेऊं लागतें व सावध होतें.

पाण्याच्या स्नानांचे ( ज्यांना बाथ्स ह्मणतात त्यांचे ) प्रकार अनेक आहेत. कोणाही डॉक्टरास ही माहिती विचारल्यास ते मोठ्या आनंदानें व प्रेमानें सांगतील अशी आशा आहे व प्रसंगीं सल्ला घेणेंच अधीक श्रेयस्कर आहे. पहा, परमेश्वरानें हरघटकेस उपयोगी पडणारा व त्याशिवाय क्षणभरही कोणाचें चालावयाचें नाही व ज्याचे गुणधर्म कितीतरी अमोलिक आहेत असा जिन्नस "पाणी" किती विपुल तयार करून ठेविला आहे कीं, त्याची उणीव कधींही व कोणत्याहीप्रसंगीं व्यवहारांत भासूं नये !! अशा त्या जगन्नियंत्या परमेश्वराची त्याच्या नानाविध अगाध लीलेबद्दल स्तुती करावी तितकी थोडीच होणार आहे. "लक्ष्मीसुत."

---

## चंद्रहार.

( लेखक—"दर्भ." )

१

सराफीधंद्यांत माणिकरावांची कीर्ति दूरवर पसरली होती. व्यवहारांत अत्यंत सचोटीचा, नफा बेताचा, खरेपणा खात्रीचा, नियमितपणा पराकाष्टेचा, भाषा नम्रतेची, मग गिऱ्हाइकांची मिठी कां पडणार नाहीं ? चंगळप्रसारल्या भरभराटीच्या शहरांत, त्यांची सराफी पेढी उत्तमतऱ्हेनें चालली होती. सोन्यामोत्यांचे व विशेषतः जडावाचे दागिनें, त्यांच्या दुकानीं फारच उत्तम होत. स्वतः माणिकराव जरी जातीचे मराठे होते, तरी सोनारकामांत त्यांची गति फार

चांगली असे. कोंदण बांधण्यांत तर ते हातखंडा कसबी होते. हीं कामें अलीकडे ते स्वतः फारसे करीत नसत, पण आपल्या दुकानावर ठेवलेल्या कुशल कारागिरांकडून स्वतःच्या मर्मज्ञ दक्षतेखालीं तीं ते करवून घेत. त्यांच्या दुकानीं तयार होणारे जडवाचे चंद्रहार तर लांबलांबच्या संस्थानिकां-पर्यंत जात. अशाच तऱ्हेचा एक अत्युत्तम रत्नखचित चंद्रहार मनस्वी कौशल्याच्या कारागिरीनें हल्लीं माणिकराव आपल्या दुकानीं तयार करीत होते. चंगळपूरचे चामरपती राजे बलिराज यांच्या आज्ञेवरूनच हा अमुल्य चंद्रहार घडत होता. या चंद्रहाराच्या प्रत्येक चंद्राची कोर सुबक कोंदणां-तल्या तेजस्वी हिऱ्याची होती. बोजडपणा मुळींच नव्हता. हृदयांतील प्रीति-सागरास भरती आणणाऱ्या या तेजःपुंज चंद्रहाराचा भाग्योदय कोणच्या उदयगिरीवर होणार होता, हें त्या बलिराजासच माहीत !

बलिराजाची कारकीर्द साऱ्या चंगळपूर संस्थानास अब्रूच्या मानानें मोठी भयप्रद झाली होती. स्वतःच्या राजसत्तेच्या जोरावर आपली अनावर काम-वासना तृप्त करण्यासाठीं वाटेल त्या नवयौवन तरुणींचें पातिव्रत्य भंग कर-ण्यास बलिराज कधींही कमी करीत नसत. अर्थात् अशा राजाचें मंत्रि-मंडळही कोणत्या कर्तबगारीवर उच्च पद पावलें असेल, हें वेगळें सांगणें नको. अशा स्थितींत दाद लागणें अशक्य असल्यामुळें, अब्रूदारांना मोठे कठीण दिवस आले होते. चंगळपूर संस्थानांत एखाद्या कुटुंबांत तरणीताठी सुंदर पोर असणें ह्मणजे मोठें पापच समजलें जाई ! अशा तरुणीस हळदीकुंक-वाच्या निमित्तानें राजवाड्यावर घेऊन जाण्यास सुंदर घोड्यांची शानदार बग्गी केव्हां येईल, याचा नेमच नसे. अशी नवविकसित कुसुममंजिरी वाटेंत प्रमत्त भुंग्यांनीं चाखल्याशिवाय सोंवळेपणीं राजवाड्यावर येते असें मानणें बलिराजाच्या मदांधतेसच उचित होय !

हा अनन्वित सावळागोंधळ माणिकरावांना पुरा माहीत होता. राज-वाड्यावर लागणारें जडजवाहीर व दागदागिनें माणीकरावच पुरवीत. त्यांच्यावर बलिराजाचा पूर्ण विश्वास होता, एवढेंच नव्हे तर राजेसाहेबांची माणिकरावांवर चांगली मर्जी असे माणिकराव वयानें तरुण, पण विचारानें पोक्त व आचारानें करारी होते. ते सुशिक्षित, स्वावलंबी, स्वाभिमानी,

सदय, सूज्ञ आणि सुंदर होते. ते अविवाहित असून, त्यांना रूपगुणांनीं युक्त अशी सुसंस्कृत गृहिणी हवी होती; पण बलिराजाच्या अमदानीतील भोंवतालची परिस्थिति पाहून लग्न करण्याचा बेत ते नेहमीं लांबणी लांबणीवर ढकलीत. एखादेवेळेस त्यांना असें वाटे कीं, सौंदर्यानें कुरूप जांबुवंती, पण गुणानीं उत्तम अशी स्त्री वरून संसार थाटावा, पण तेंही जुळेना. बलिराजही त्यांना फक्कड बायको करण्याचा आग्रह करीत, पण तसें करण्यास त्या कामांध नरपशूंचेंच त्यांना भय वाटे. अलीकडे तर माणिकरावांनीं आपण अविवाहितच राहणार आहों, असें सांगून टाकलें होतें.

२

चंगळपूरच्या एका अगदीं अप्रसिद्ध आडगल्लींत बऱ्याचशा श्रीमंती सामानानें शृंगारलेल्या लहान माडींत एक वृद्ध स्त्री स्तब्धपणें बिछान्यावर पडली होती. तिच्या उशाशीं एक परम रूपवती अल्लड तरुणी कांहींशी चिंताक्रांतपणें बसली होती. ममतेच्या आवाजानें ती हलकेंच त्या वृद्ध स्त्रीला ह्मणतेः- " शुक्ताई, तुला अंमळ बरं वाटतंना? कपाळ चेपूं कां? म्हातारी शुक्त चमत्कारिकपणें हंसली व त्या तरुणीकडे टक लावून ह्मणतेः— " मुक्ते, किती ग तूं ही भोळी! माझ्या शिक्षणांत लहानाची मोठी होऊन व्यर्थ! खुळे, मला काय झालं आहे? हा नुसता डाव आहे एवढं कां तुला समजूं नये? वेडे, तो सद्वर्तनी माणिकराव उगीच कसा जाळ्यांत सांपडेल? सप्तजलेंत धुणं धुतांना मी कां पडणारी बायको? अग, तें सारं खोटं! खोटीच पडल्यें, खोटीच बुडत होतें, मला पोहायला येतं हें नाहीं कां तुला ठाऊक? पण जवळच माणिकराव स्नान करीत होते. त्यांना तुझ्याकडे आकर्षून घेण्यासाठीं एवढा खटाटोप! झालं आतां मला नदींत बुडतां बुडतां उडी घालून वांचविल्याबद्दल, त्यांना सत्कारानं येथें आणून, सहजासहजीं ह्मणून त्यांची आणि तुझी दृष्टादृष्टच नव्हे, तर थोडी ओळखही करून दिली. इतकंच करून मी थांबल्यें नाहीं! मुक्ते, तुला त्यांणीं पदरांत घेऊन जन्माची सांगातीण करून, मला त्यांनीं जिवदान दिल्याच्या उपकारांतून अंशतः तरी उतराई होऊं द्यावं, असंही कावेबाज बोलणं लावण्यास मी कमी नाहीं हो केलं! तेही घुटमळले आहेत; तेव्हां आतां शुद्ध राहून, त्यांना मोहून सोडण्याचं काम तुझं. "

चित्त देऊन ऐकणारी मनोहरमुक्त उत्सुकतेनें ह्मणतेः–“ खरंच, शुक्ताई, ते मोठे सुंदर असून थोर मनाचे दिसतात नाहीं ? ” शुक्त तुच्छतेनें ह्मणतेः–“ असतील. त्यांच्या सौंदर्याला व थोर मनाला तूं आपला दिल कां देणार आहेस वेडे ! शिवाय तूं काय कमी सुंदर आहेस ! तुझ्या मुसमुसणाऱ्या भरज्वानीच्या लावण्याचं नुसतं गोड दर्शन व तुझं भुरळ घालणारं मधुर-भाषण, यांच्यायोगानं त्यांना अचुक फसवून कार्यभाग उरकलास, कीं उघडलंच दैव ! तुझ्यासाठीं शिंदेशाई तोडे विकत घ्यायला मी आतां जात्यें त्यांच्याच दुकानीं; संध्याकाळीं माणिकराव येथें ठेवलेले. तूं आपली उत्तम शृंगार करून थाटामाटानें तयारींत ऐस. फुलासारखं नाजुक चालणं, लाजत लाजत प्रेमळ मुरडणं, लटक्या रागाच्या आविर्भावांत ठसकेबाज ठुमकणं, खुद्कन् लडिवाळ हंसणं, खडीसाखरेसारखं मिठ्ठं बोलणं, वेड लावून हृदय चोरणाऱ्या जादूनं पाहणं, इत्यादि सारी करामत, सहजासहजींच्या हाव-भावांत शिताफीनं खुलवून, त्यांना आपला दास बनीव म्हंजे झालं !

३

शुक्त बाहेर निघून गेली, तरी कितीवेळ मुक्त आपली विचार करीत तशीच बसली होती. तिचा रमणीय चेहरा कांहींसा खिन्न व कांहींसा क्षुब्ध दिसत होता. एकदम ती शून्यहेतूनेंच उठून उभी राहिली, तों समोरच्या भिंतींवर स्वच्छ बिलवरी आरशांत स्वतःचेंच सुंदर प्रतिबिंब तिच्या नजरेस पडलें. क्षणभर तिची दृष्टि तेथेंच खिळली. तेथें आपल्या अवर्णनीय लाव-ण्याची खात्री पटूनच कीं काय, तिच्या आरोग्यपूर्ण मृदु गालाच्या गुलाबी छटेंत, साभिमान स्मिताची एक अत्यंत अंधुक लकेर झळकली ! पण लगेच एक लांब उसासा टाकून, ती आरशासमोर खुर्चीवर बसली. मूळची ही आपली अशी निष्कलंक काया, द्रव्यासाठीं वाटेल तशी विकून स्वतःला व जगाला पापमयपणें भ्रष्ट करून सोडणारें मोहक सौंदर्य आपल्याला देवानें दिलें नसतें तर फार बरें झालें असतें; असें वाटूनच कीं काय ती सुस्कारली ! अस्सल मराठ्यांच्या कुळांत जन्म देणारे कुलीन आईबाप आपल्या लहान-पणींच प्लेगाला बळी पडून, संगोपन करण्यास कोणीही न उरल्यामुळें, आपल्या सौंदर्याच्या भांडवलावर धंदा करूं इच्छिणाऱ्या या वृद्ध विश्वयोषितेच्या

वाट्यास आपण आलों, एवढी जाणीव त्या तरुणीला खास होती. या घडी-पर्यंत ती सुरम्य मुक्त म्हणजे वेज न पाडलेलें एक पाणीदार अमोल मोतीं किंवा नुकत्याच उमलूं लागलेल्या सुकुमार सुवासिक प्रेमपुष्पाचें मूर्तिमंत निर्भेळ पावित्र्यच होतें, असें ह्मणण्यास हरकत नाहीं; तरी पण काय असेल तें असो. माणिकरावांना मोहित करून सोडण्याची तिची मनापासून खूप तयारी सुरू होती.

काजळी बुटेदार शालू मोठ्या ठाकठिकीनें सुरकुती न पडूं देतां आपल्या गोंडस अंगाबरोबर चापून चोपून ती नेसली. दंडांत रुतण्या इतकी तंग अस्मानी चोळी अंगांत चढविली. तिनें आपल्या विशाल कपाळावर किंचितसे केंस चढवून, डाव्या कानावर झुकता असा सुरेख भांग काढला व तुळतुळीत केसांची पट्टी बसविली. माने बरोबर घट्ट अंबाडा घातला. आपल्या आवडत्या दागदागिन्यांनीं ती नखशिखांत मंडित झाली. डोळ्यांत काजळ घालून तिनें आपल्या स्वच्छ कपाळाखालीं, धन्वाकृती भिंवयामध्यें, तिळाएवढी काळी टिकली ठेवून दिली. ती उठली व पायांतील पैंजणाचा श्रुतिमधुर छुमछुम आवाज बरोबर होतो कीं नाहीं, हें पाहण्यासाठींच कीं काय ती चार दोन पावलें चालून आरशा जवळ जाऊन उभी राहिली. रतीलाही लाजविणाऱ्या आपल्या या शृंगारपूर्ण सौंदर्याला दृष्ट लागूं नये ह्मणून, कानांतील मत्स्याकृती नीलमण्याच्या कर्णभूषणांनीं किंच्या गोऱ्यापान गालावर गालबोट लावलेलें आरशांत पाहून, तिला धन्यता वाटली; तरी पण तो भरदार छातीला शोभा आणणारा अपूर्व चंद्रहार आपल्या कंठांत पडेल कीं नाहीं या शंकेनें तिच्या तोंडावर खिन्नता आली. आरशांत निरखून बघतां बघतां, एकदम एक विचार तिच्या मनांत येऊन, ती अचंब्यानें आपल्याशींच ह्मणतेः-“ अग बाई हा तर माझा गोंवेकरीण कसबिणीचा थाट, आणि सुक्ताईन तर मला माणिकरावांची अर्धांगी ह्मणून देऊं केलेली! केवढी चूक ही ! बर झालं, लौकर समजलें. मला आतां सभ्य व कुलीन नववधूच बनलं पाहिजे, आणि खरंच मी मूळची तशीच नव्हेका ? गरतीचा साधा वेष घेण्याच्या उतावळीनें बुचडा सोडून, वांकडा भांग मोडीत मोडीत ती खुर्चीवर बसली. सुबक स्कंधभागावरून छातीवर लोळणाऱ्या तिच्या काळ्याभोर

तुळतुळीत सडक केशकलापांत कित्येक केश असे कांहीं कुटिल होते कीं, ते तिच्या प्रेमळ चेहऱ्यावर सहज गोडपणा आणीत आणीत तेथेंच रममाण झाले. खरोखर तिच्या त्या स्वभावसुंदर मुखकमलावर स्वैरपणें विहार करणाऱ्या त्या भाग्यवान् अलकभृंगाचा कामीजनाला हेवाच वाटणें साहजिक आहे.

रात्रीं माणिकराव आले, तेव्हां विनयसंपन्न मुक्त ह्मणजे कुलीनतेची चालकीबोलकी पुतळीच बनली होती. माणिकरावाच्या सुजनतेनें जरी त्यांना तेथें फार वेळ बसूं दिलें नाहीं, तरी तितक्या वेळांत आदरसत्कारापेक्षां तिची साधी वागणूक व सुशीलता यांचाच परिणाम त्यांच्यावर जास्त झाला. परिचयानें जाणेंयेणें वाढलें व माणिकराव बहुतकरून रोज संध्याकाळीं घटकाभर विश्रांतिसाठीं तेथें जाऊं लागले. मुक्त साधारण लिहितांवाचतां येण्याइतकी सुशिक्षित असून सुबुद्ध होती. माणिकराव तिला रोज थोडें थोडें लिहिणेंवाचणें शिकवित व तें तिला तेव्हांच समजे व या विद्यानंदांतच त्या उभयतांची चांगली करमणूक होई. शुक्र लग्नाची गोष्ट काढी, पण माणिकराव उत्तराची टाळाटाळ करीत व एखादेवेळीं फारच आग्रह केल्यास " तूर्त तर सिंहस्थ आहे कन्यागत तर येऊंद्या " असें ह्मणून वेळ मारून नेत त्यांच्या मनांत मुक्त घोळत नव्हती असें नाहीं. तिजविषयीं त्यांना निराभिलाष प्रेमादर वाटत असे.

४

" छे मुक्त, उगीच जास्त वेळ बसण्याचा आज मला आग्रह करूं नकोस. तुझी ती रुक्मिणीस्वयंवराची पोथी सोडूं देखील नकोस. सुदेवाकरवीं रुक्मिणीनें श्रीकृष्णाला पाठविलेलें प्रेमपत्र समजून घेण्याची तुझी उत्सुकता उद्यांपर्यंत आवरून धर. खरंच म्हणशील तर मी आज येथें यायला देखील नको होतं. पण हा चंद्रहार पाहण्याचा तूं आग्रह धरलास, ह्मणून राजवाड्यावर जातांजातां तो तुला दाखविण्यासाठीं मी येथें आलों. उशीर झाला. दे तो चंद्रहार. आठवाजतां मला हा चंद्रहार चामरपतीपुढें नेऊन ठेवलाच पाहिजे. " माणिकरावांच्या या घाई घाईच्या बोलण्यावर ह्मातारी शुक्र मोठ्या धिमेपणानें हसत हसत ह्मणतेः—" पण हा चंद्रहार माझ्या मुक्तीच्या गळ्यांत कसा शोभतो हें तरी एकदां पहा आपण. कन्यागतीं तिच्या लग्नांत

तिला तुम्हीं चंद्रहार केल्याशिवाय कां राहणार आहांत ? म्हणून म्हणतें हाच तिच्या गळ्यांत घालून, त्यांत काय कमजास्त पाहिजे, एवढें बघून ठेवावं तें बरं. असंच ना मुक्ते ? " पण चंद्रहारमंडित मुक्त नेहमींसारखी प्रसन्नचित्त दिसत नव्हती. प्रक्षुब्ध मनाच्या चंचलपणाची दाट छाया तिच्या निसर्गमधुर चेहऱ्यावर पसरली होती.

खालून कोणीशीं मोठ्या तांतर्डीनें माणिकरावांना हांक मारली. कोण आहे तें पाहण्यासाठीं, माणिकराव तोंड फिरवून, खिडकींतून खालीं पाहूं लागले. तोंच त्यांचा डोळा चुकवून इकडे गळ्यांत चंद्रहार घातलेली मुक्त, तशीच एकदम माडीच्या चोरदारानें पार नाहींशी झाली. माणिकराव बुचकळ्यांत पडले. शुद्धवृत्तिची मुक्त, चंद्रहार उपटून पळून जाईल अशी शंका देखील त्यांच्या मनांत येणें शक्य नव्हतें, पण हा थट्टेच्या पलीकडचा कांहीं तरी घोटाळा खास असावा असें जाणून, त्यांणीं शुक्तजवळ चौकशी चालविली. इच्छित साधल्याच्या हर्षातिशयानें हुरळलेली म्हातारी शुक्त , विजयदृष्टीनें माणिकरावांकडे पाहून, भेसूरपणें खदखदा हंसली व निर्भयचित्तानें आपल्या पोटांतलें विष ओकण्यासाठीं बेपर्वाईनें म्हणतेः–" आतां कोठची मुक्त ? ती खरोखर केव्हांच मुक्त झाली ! तिचं नखसुद्धां आतां आपल्या दृष्टीस पडणार नाहीं. आतां ती चामरपती बलिराजाची पट्टराणी झाली तिनें पैज जिंकली. मी गोंव्याची कसबीण. मुक्त माझी पाळलेली पोर. तुमच्या बाहेरख्याली राजाच्या हेरांनीं आम्हांला हेरलें व मग मोठ्या इनामाच्या आशेनें आपली ही अपुट चटकचांदणी मुक्त घेऊन मी येथें आलें. विलासमंदिरांत तिची व बलिराजाची गांठ पडली; पण कसबिणीचा थोर धंदा अस्सल कसबिणीच्याच पोरीला साधायचा ! ही कार्टी पडली नेभळ्या गरती कुळांतली. ती गेली वळणावर. तिच्यासाठींच तुमच्या दुकानीं घडविलेला हा चंद्रहार मुकाट्यानें उपटून, खुळलेल्या राजाला गार करून पार झाल्यावर, आज जगांतली सारी नीति तिच्या उघड्या दुकानांत लाळ घोटूं लागली नसती कां ? पण तिला आठवली अवदसा. चंद्रहार नको पण गुलामगिरीच्या बंदिवासाचें पट्टराणीपद पाहिजे असें तिला वाटलें ! राजानं तिला या अमोल खुमासदार चंद्रहाराचा मोह घालण्याचा यत्न

केला, पण पट्टराणीपदाच्या वचनावांचून ती राजी होईना तिच्या तारुण्य-सौंदर्याला भाळलेल्या व तुमच्या सद्वर्तनावर फाजिल विश्वासलेल्या बलिराजानें युक्ति काढली व हा चंद्रहार तुह्मीं राजवाड्यांत नेऊन देण्याच्या-वेळींच जर तो तुमच्यापासून वाटेल त्या यत्नानें उपटून शुद्धपणें राजापुढें नेला, तर तिला पट्टराणी करूनच तिचा अंगिकार करावयाचा; पैज फसल्यास चंद्रहारही न देतां तिची सोज्वल भरज्वानी बटकीपणांत फुकट घालवावयाची, असा पण लागला; पण आपल्या कृपेनें आमच्या कसबी डावास यश आलं तारुण्यांत खेळल्यासवरलेल्या या ह्मातारीस राजाची सासू झाल्यामुळं आतां वृद्धापकाळीं कशाचीच ददात उरली नाहीं. तुमच्या-सारख्या कोट्याधीशानं या चंद्रहाराच्या लाख पन्नास हजारांचीव्यापारांत ठोकर बसली असं ह्मणून स्वस्थ बसावं हेंच बरं. फसून वरती ' मी फसलों ' ह्मणून डंका करण्यांत काय लौकीक ? शिवाय जरी ही आह्मीं उघड चोरी केली असली, तरी तिची दाद या विलासीराज्यांत कोण घेणार ? झालेला सारा प्रकार गुप्त हेरांनीं बलिराजांस केव्हांच कळविला असेल ! कारण ते सावलीसारखे आमच्या हालचालीवर दक्षतेनें नजर ठेवून होते. "

चकित झालेले माणिकराव शांतपणें म्हणाले:-" तर मग या चंद्रहारानें ही खरोखरच बिनमोल कामगिरी बजावली. तेजस्वी मुक्त तुमच्या घाणेरड्या कसबाच्या पातकाग्नींत व्यर्थ जळून न जाऊं देतां, राज्ञीपदाच्या योग्य कोंदणांत, बसविण्याचें श्रेय या चंद्रहारालाच दिलें पाहिजे ! " इतकें बोलून झटकन् ते तेथून बाहेर पडले.

५

जसा एखादा चोर साशंकपणें, आपणाकडून होईल तितकी लोकांची नजर चुकवून, रस्त्यानें झपाझप पावलें उचलीत असतो, तशाच वृत्तींत माणिकराव राजवाडा जवळ करीत होते. यःकश्चित वेश्येनें आपल्याला फसवलेलं पाहून त्यांच्या मनाला चुटपुट लागली होती खरी; तथापि त्या वेश्येच्या कृतीवर ताण करून वचनभंगानें व्यसनीं चामरपती, राज्ञीपद मुक्तला खास लाभूं देणार नाहीं, असें त्यांना वाटून चुकलें होतें. त्यांत त्यांची नजर चुकवून, भामटेगिरीनें चंद्रहार कसा उपटला, हें कळतांच,

बलिराजापुढें मुक्त खात्रीनें विफलमनोरथ होईल. चंद्रहाराच्या फसवणुकीनें राजापुढें स्वतःची फजीती होईल, याची त्यांना इतकी परवा नव्हती, पण त्यांच्या मनानें अभिलाषहीनवृत्तींत पूज्य मानलेली सद्गुणी मुक्त, वेश्या व्हावी ही कल्पना देखील, आतां त्यांना असह्य वाटूं लागली. इतकें तिज-विषयीं त्यांना प्रेम उत्पन्न झालें होतें. राजापुढें चंद्रहाराबद्दल खरी खरी हकीकत सांगतांना, त्यांनीं तिच्या बचावासाठीं थोडेंसें खोटें बोलण्याचाही निर्धार केला. इतक्यांत त्यावेळच्या अर्धवट चांदण्यांत एका बोळांतून, एक सुंदर तरुणी मोठ्या लगबगीनें त्यांच्यापुढें येऊन उभी राहिली.

ती एकदम म्हणतेः–" आपण राजवाड्याकडेच निघाला आहांत पण तेथें जाऊन काय सांगणार ? आपली पवित्र व गोड वाणी अनृतानें कधींही विटाळणार नाहीं, अशी माझी खात्री आहे, पण नाइलाजानें अधम बनून, आपला चंद्रहार चोरणाऱ्या या गरीब व अपराधी मुक्तीसाठीं राजाजवळ थोडं खोटं बोला नाहीं तर सर्वस्वी घात होतो आहे ! " माणिकराव सद्ग-दितपणें ह्मणतातः–" भिऊं नकोस मुक्त. तुझ्या कल्याणापेक्षां हा चंद्रहार मला जास्त नाहीं. मी बलिराजाला जाऊन सांगतों कीं, केवळ तुझ्या बऱ्या-साठीं, शुद्धवृत्तीच्या तुझ्या गुणाला भुलून हा चंद्रहार मी तुला बहाल केला आहे; व असें करण्यांबद्दल राजशासन भोगण्यास मी तयार आहे ! मग तर झालेंना ? " कंठ भरून आलेली मुक्त आश्चर्यानें ह्मणतेः–" अग-बाई, काय हें औदार्य ! केवढा हा थोरपणा ! कसलं हें अचाट धैर्य ! पण मी असलं कांहीं नाहीं आहे हो खोटं बोलायला सांगत. खरंच, हा चंद्रहार ह्मणजे लग्नांतली माळच आपण माझ्या गळ्यांत घातली, असं ह्मटलं तर नाहीं का चालायचं ? छे, पण अशानं तो नराधम राजा दुखवलेल्या कृष्ण-सर्पासारखा खवळून नुसता अनर्थ करून सोडील. त्या मेल्याची पट्टराणी होण्यापेक्षां, मी या पायाची बटीक झालेली काय वाईट ? पण किती ही मी वेडी ! बाजारबसवीच्या पोरीला, आपल्यासारखा थोर कुळांतला पति कोठून लाभणार ? तें कांहीं नव्हे. ज्यांच्या कह्यांत वागून, आपणापासून हा चंद्रहार चोरणं मला भाग पडलं, त्यांना क्षणभर चुकवून मी येथें आपणाकडे उभा-उभी आलें आहे. मजकरतां तुमच्यासारख्या निष्कलंक प्रत्यक्ष देवमाणसाला

काळिमा लागावा, हें मला सहन होत नाहीं. त्यापेक्षां पैज फसून, मी जन्मभर राजवाड्यांत बटकूर होऊन दिवस कंठलेले फार बरे ! एवढ्यासाठीं हा घ्या आपला चंद्रहार परत. आतांच आठ वाजतील. जसं कांहीं, कांहींएक नवल विशेष घडलं नाहीं अशा थाटानं तो राजापुढं नेऊन ठेवा. माझं काय होईल याची व्यर्थ काळजी आपण करूं नये. तेवढ्यापुरती माझी मी खंबीर आहे. " असें बोलून मुक्त मोठ्या घाईनें तो चंद्रहार माणिकरावांच्या हवालीं करून निसटण्याच्या विचारांत होती, पण तिचा हा स्वार्थत्याग पाहून, चकित झालेले माणिकराव, तिच्या हातांतला चंद्रहार न घेतां तो हात धरून प्रेमानें ह्मणतातः–" मुक्त, तुझ्या मनांत मजविषयीं अशी अलोट प्रीति उत्पन्न झाली असेल, असें मला वाटलें सुद्धां नव्हतें ! पण मी खचित सांगतों ही तुझी प्रीति अस्थानी आहे. तुझ्या असल्या स्वर्गीय प्रेमास मी खास पात्र नाहीं. हा चंद्रहार घेऊन जा व सुखानें राजाची पट्टराणी हो. "

" गाढवी, त्यांचं तरी ऐक. इतका कसा तूं अगदीं ताळ सोडलास ! " असें संतापानें खेंकसून, तिच्या पाठोपाठ आलेली म्हातारी शुक्त तिला विलक्षण आवेशानें फरफरां ओढून नेऊं लागली. प्रेमसंचार झालेली मुक्त, म्हातारीला झिडकारून, अश्रुपूर्णनेत्रांनीं माणिकरावांची करुणा भाकूं लागली. प्रेमाच्या स्फूर्तीनेंच माणिकरावांनीं तत्क्षणी शिंपल्या ( शुक्त ) पासून, मोतीं ( मुक्त ) वेगळें करून, पोटाशीं धरलें.

* * * *

हा माणिकमोत्याचा जोडा चंगळपूर संस्थानांतून पार फरारी झाल्यामुळें बलिराज नुसते चडफडून राहिले आहेत; व म्हातारी शुक्त वेड्याच्या इस्पितळांत खुशाल आहे.

---

## फोटोग्राफीसंबंधीं अडचणी व त्यांस उत्तरें.

---

रानबा भागू कापदार, सेलोटी:–आपलें पत्र ता. १५।२५ व १ चें अशीं ३ पत्रें पावलीं. प्रत्येक पत्राचें पोष्टानें उत्तर दिलें आहे. आपल्या हातून काढलेल्या फोटोची कांच व कागदही पावला. खुलासा सर्व पत्रानें

केला आहे. आपण एकाच पत्रांत ५।२५ प्रश्न एकदम विचारतां त्यामुळें उत्तर खुलासेवार देण्यास फार वेळ लागतो. तरी यापुढें एका पत्रांत एकाच विषयावर एकच प्रश्न विचारण्याची वहिवाट ठेवावी ह्मणजे आह्मांस त्रास होणार नाहीं. आपण फोटोच्या अडचणी मित्रांत छापण्याबद्दल सहानुभुती दाखविली त्याबद्दल आभारी आहें. याबद्दलचें सर्व श्रेय मित्रकर्ते यांजकडेस आहे. मित्राचे वर्गणीदार आपण होण्यास राजी आहां हें पाहून आनंद वाटतो. नवीन वर्ष जुलाईपासून सुरु होतें. एक्सपोझरसंबंधीं सर्व खुलासेवार माहिती या अंकांत दिली आहे. दोन महिनें एकसारखे प्रयत्न करून सर्व तक्ते वगैरे हिंदुस्थानच्या ऋतु, दिनमानपरत्वें फार श्रमानें बसविले आहेत. एक्सपोझरसंबंधीं यासारखी खुलासेवार व हिंदुस्थानच्या बरहुकूम माहिती आपल्या किंवा एतद्देशीयांच्या भाषेंत देखील आजपर्यंत प्रसिद्ध झाली नाहीं. गोल्ड क्लोरार्डडसह सोडाफास्फेटनें टोनींग करण्याची प्रमाण सह रीत खालीलप्रमाणें समजावी.

कोमटपाणी .... १० औंस.
सोडाफास्फेट .... ३० ग्रेन ( गहूंभार ).

कोमटपाण्यांत सोडा वितळल्यावर—

गोल्डक्लोराईड .... १ ग्रेन.

टाकावें य सर्व मिश्रण थंड झाल्यावर उपयोग करावा. प्रथमतः सर्व प्रीन्ट फक्त थंडपाण्यानें ५।७ वेळ धुऊन नंतर वरील औषधांत चांगला रंग येईतोंपर्यंत ठेवावे; नंतर थंडपाण्यानें धुऊन तुरटीच्या पाण्यांत २।४ मिनिटें ठेवून पुन्हां थंडपाण्यानें धुऊन हायफोच्या पाण्यांत दृढ करावें. फोटोस चांगला रंग येणें हें चांगल्या नेगेटीव्हवर आहे व चांगली नेगेटिव्ह येणें हें बरोबर एक्सपोझरवर अवलंबून आहे. रोडीनलची कुपी एक व सेल्फटोनिंग कागदाचा एक पाकीट व्ही. पी. नें पाठविण्यास बाबाजी सखाराम कंपनीस आजरोजीं लिहिलें आहे.

☞ फोटोग्राफीसंबंधीं असलेल्या अडचणीवाल्या गृहस्थांनीं आम्हांस अडचणी विचारल्यास त्याचीं उत्तरें मित्रांतून देऊं एका पत्रांत एकाचवेळीं एकच प्रश्न विचारावा. पत्ता-एन्. पी. संपत. कारंजा ( वऱ्हाड. )

## बरोबर एक्सपोझर देणें.

क्यामेऱ्यामध्यें फोटो काढण्याकरितां प्लेट भरल्यावर त्या प्लेटीवर ज्या पदार्थाचा फोटो घ्यावयाचा आहे, त्याची छाया पडूं देण्यास जितका वेळ लेन्स उघडी ठेवावी लागते, त्या अवकाशास एक्सपोझर असें ह्मणतात.

एक्सपोझर बरोबर दिल्याखेरीज कांचांवरील प्रतिमा, त्यावरून काढलेला फोटो त्याचा व रंग, स्वच्छपणा व बारीकसारीक खुणा, बरोबर येणें शक्य नाहीं या विषयाबद्दल बिनचूक ज्ञान न झाल्यामुळें, फोटो चांगला आला नाहीं ह्मणजे पुष्कळ लोक प्लेटला, अगर धुण्याचे औषधाला व शेवटीं क्यामेऱ्यासही दूषण देण्यास तयार होतात. सबब बरोबर एक्सपोझर देणें, हा फोटोग्राफीच्या कलेमधें सर्वांत मोठा महत्वाचा मुद्दा आहे व जरी एक्सपोझरखेरीज, इतर कृतिला ह्मणजे धुण्याला, दृढ करण्याला, वगैरे बरीच हुषारी लागते. तरी बरोबर एक्सपोझर देतां आलें, ह्मणजे फोटो चांगला येण्याच्या बाजूचें ३/४ काम झालें असें समजावें. बरोबर एक्सपोझर देणें, हें मुख्य खालील गोष्टींवर अवलंबून आहे. त्या गोष्टी येणेंप्रमाणेः—

( १ ) प्लेटची शक्ति. ( Speed ) ( २ ) डायफाग्राम. ( ३ ) फोटो काढावयाचा विषय. ( ४ ) फोटो काढण्याच्या वेळेचा उजेड.

आतां या चार गोष्टींचा विचार विस्तारानें करूं.

( १ ) प्लेटची शक्तिः—ज्यावर फोटो काढला जातो, त्या प्लेटी एकसारख्या नसून त्यांच्या शक्ति निरनिळ्या असतात. ह्मणजे जर एका जातीच्या प्लेटला एखाद्या पदार्थाचा फोटो घेण्याला अमुक वेळ लागला, तर दुसऱ्या जातीच्या प्लेटला त्याच पदार्थाचा फोटो त्याच उजेडांत घेण्यास अमुक एक पटीनें त्या प्लेटच्या कमी जास्ती शक्तिच्या मानानें जास्त किंवा कमी एक्सपोझर द्यावें लागेल. ही शक्ति त्या प्लेटला लावलेल्या औषधीच्या कमी जास्त जलदपणावर अवलंबून असते. अशा निरानिराळ्या शक्तीचे औषधी लाविलेले कांचपट, निरनिराळ्या कंपनीचे विकत मिळतात. उदाहरणार्थः—एलफर्ड कंपनी. ( कीं ज्यांच्या प्लेटी फार प्रख्यात असून चांगल्या असतात. ) ही निरनिराळ्या कमी जास्ती शक्तीच्या ५।६ प्रकारच्या प्लेटस् काढते. जसेः—ऑर्डिनरी, एमप्रेस, स्पेशिअलस्पीड, झीनीथ, मॉनर्क, वगैरे. ह्या प्लेटींपैकीं प्रत्येक जातीची शक्ति त्याच्या मागें लिहिलेल्या जातीच्या प्लेटीच्या शक्तीपेक्षां दुप्पटीनें जास्त असते. तरी ज्या जातीच्या प्लेटस् वापरल्या असतील त्यांस शक्तीनुरुप एक्सपोझर द्यावें लागतें.

( २ )डायफ्राग्राम:-( ह्यास स्टॉप असेंही ह्मणतात. ) क्यामेऱ्याच्या लेन्सपुढें त्या लेन्समधून कांचांवर उजेड पाडण्याचा जो मार्ग, तो कमी जास्ती करण्याचें जें लहानमोठें होणारें छिद्र, त्याला डायफ्राग्राम असें ह्मणतात. मोठें छिद्र ठेविलें असतां, उजेड जास्त येतो. ह्मणजे एक्सपोझर कमी पाहिजे व लहान छिद्र ठेविलें असतां, कमी उजेड येतो. सबब एक्सपोझर जास्त पाहिजे, परंतु लहान छिद्र ठेविलें असतां, त्याचा बारीकसारिक देखावा स्पष्ट येतो. लहान मोठें छिद्र समजण्याकरितां त्याला निरनिराळे नंबर दिलेले असतात उदाहरणार्थ: F८, F११, F१६, F२२, F३२, ( लहान हॅन्ड क्यामेऱ्यास बहुधा ११, १६, २२, ३२. असे चारच स्टॉप असतात व भारी क्यामेऱ्यास F ४, पासून F ६४ पर्यंतही स्टॉप असतात. ) ह्मणजे प्रत्येक स्टॉप त्याच्या मागील नंबराच्या स्टॉप पेक्षां ½ कमी असतो. ह्मणून त्या स्टॉपला त्याच्या मागें दिलेल्या स्टॉप पेक्षां दुप्पट एस्कपोझर लागेल, हें उघड आहे. हलक्या क्यामेऱ्यास अशाप्रकारचे स्टॉप मुळींच नसतात. त्यामुळें त्याचा चांगला उपयोग होणें शक्य नसतें.

( ३ ) फोटो काढावयाचा विषय निरनिराळ्या विषयांना ह्मणजे उदाहरणार्थ:- उजेडांतील इमारती, बगीचे, आकाश, समुद्र, दूरचे देखावे, घरांतील कमी उजेडांतील देखावे व हालचाल करणारे पदार्थ, अतिशय वेगाच्या वस्तु वगैरे, वगैरेनां त्यांच्या उजेडाच्या मानानें कमीजास्त एक्सपोझर द्यावें लागतें.

( ४ ) उजेड:—हा वर्षाचे काल, ऋतु, महिना, दिनमान, अभ्रें व फोटो काढण्याची वेळ, यांवर अवलंबून असतो आणि त्या त्या वेळेच्या कमीजास्ती उजेडाच्या प्रमाणानें एक्सपोझर कमीजास्त द्यावें लागतें.

ह्या सर्व गोष्टींचा विचार करून एक्सपोझर बरोबर साधण्यास बरेच दिवस अनुभवांत घालविले पाहिजेत. इतकेंच नव्हें तर शेंकडों प्लेटी देखील खराब कराव्या लागतील तसें न व्हावें, ह्मणून आजपर्यंत ज्यांनीं अतिशय श्रम करून अनुभव घेतले आहेत, त्यांनीं आपआपल्या अनुभवानीं निरनिराळे तक्ते ( कोष्टकें ) बसवून तयार केले आहेत. त्या सर्वांत उत्तम व सोपा असा एक तक्ता नवशिक्यांस मार्गदर्शक ह्मणून दिला आहे. त्यावरून एक्सपोझर किती द्यावें, ह्या महत्वाच्या व समजण्यास कठीण अशा बाबतींत विशेष अडचण न पडतां, नक्की किती एक्सपोझर द्यावें, हें लवकर कळेल व त्यायोगानें नवशिक्याचा मार्ग सोपा होऊन प्लेट वगैरे न बिघडतां फोटो चांगले निघतील.

कोष्टक नंबर—१.

| विषय. | F. ४ | F. ५ | F. ८ | F ११ | F १६ | F २२ | F ३२ | F. ४५ | F ६४ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| समुद्र, आकाश व दूरचे देखावे. | १/३०० | १/१५० | १/७५ | १/४० | १/२० | १/१० | १/५ | २/५ | ४/५ |
| चांगल्या उजेडांत असलेला खुला देखावा. | १/६४ | १/३२ | १/१६ | १/८ | १/४ | १/२ | १ | २ | ४ |
| भरउन्हांतील सर्वप्रकारचे देखावे. | १/३२ | १/१६ | १/८ | १/४ | १/२ | १ | २ | ४ | ८ |
| ज्यासमोर दाट सावली आहे असा खुला देखावा. | १/२० | १/१० | १/५ | २/५ | ४/५ | १ ३/५ | ३ १/५ | ६ २/५ | १२ ४/५ |
| झाडाखालील देखावा. | ४ | ८ | १६ | ३२ | मि. से. -४ | मि. से. २-८ | मि. से. ४-१६ | मि. से. ८-३२ | मि. से. १७-४ |
| सावली पडलेल्या खुल्या जागेंतील मनुष्य. | १/८ | १/४ | १/२ | १ | २ | ४ | ८ | १६ | ३२ |
| चांगला उजेड असलेल्या खोलींतील मनुष्य. | २ | ४ | ८ | १६ | ३२ | मि. से. १-४ | मि. से. २-८ | मि. से. ४-१६ | मि. से. ८-३२ |

## कोष्टक नंबर २.

| दिवसाची वेळ. | १२ दुपारीं. | ११ व १ | १० व २ | ९ व ३ | ८ व ४ | ७ व ५ | ६ व ६ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| जून. | ३/४ | १ | १ | १ १/४ | १ १/२ | २ १/४ | ६ |
| मे-जुलै. | ३/४ | १ | १ | १ १/४ | १ १/२ | २ १/२ | ७ |
| एप्रील-आगष्ट. | ३/४ | १ | १ | १ १/४ | १ १/२ | २ ३/४ | १२ |
| मार्च-सप्टेंबर. | १ | १ | १ | १ १/२ | १ ३/४ | ३ १/२ | .... |
| फेब्रुआरी-अक्टोबर. | १ | १ | १ १/४ | १ १/२ | २ | ४ | .... |
| जान्युआरी-नोव्हेंबर. | १ | १ १/४ | १ १/४ | १ ३/४ | २ १/४ | ६ | .... |
| दिसेंबर. | १ १/४ | १ १/४ | १ १/२ | २ | ३ | १५ | .... |

## कोष्टक नंबर. ३.

| सूर्य प्रकाशित असतां. | अभ्रें असतां. | अंधुक किंवा पाऊस पडत असतां. |
|---|---|---|
| १ | ४ | ८ |

### कोष्टक नंबर. ४

| ऑर्डिनरी. | एमप्रेस. | स्पेशिअलरॅपीड. | झीनीथ. | मॉनर्क. |
|---|---|---|---|---|
| १ | $\frac{१}{२}$ | $\frac{१}{४}$ | $\frac{१}{८}$ | $\frac{१}{१२}$ |

कोष्टक पाहण्याची रीतः- प्रथम आपणास ज्या विषयाचा फोटो काढावयाचा असेल, तो विषय पहिल्या नंबरच्या कोष्टकांतील डाव्या बाजूकडील यादींत पाहावा. नंतर आपण कोणत्या नंबरचा डायफाग्राम वापरला आहे, तो त्याच कोष्टकाच्या वरील आडव्या ओळींत पाहून व त्या नंबरच्या खालचे ओळींत, विषयाच्या सामेर जो आंकडा येईल तितके सेकंद समजावे. पुढें दोन नंबरच्या कोष्टकांत ज्या महिन्यामध्यें फोटो घ्यावयाचा असेल, तो महिना डावेकडील बाजूच्या यादींत पाहून पुढें ज्या वेळेला फोटो घ्यावयाचा असेल, ती वेळ त्याच कोष्टकांत वरील आडव्या ओळींत पाहून, त्या खालील ओळींमध्यें महिन्याच्या समोर जो आंकडा येईल, त्यानें पहिल्या कोष्टकांत आलेल्या सेकंदांस गुणावें व जें उत्तर येईल, तितके सेकंड एक्सपोझर समजावें. पुन्हा ज्या वेळेस आपण फोटो घेत आहोंत, ती वेळ कशी आहे, हें तिसऱ्या कोष्टकांत पहावें व त्याच्या खालीं जो आंकडा दिला आहे, त्यानें आलेल्या एक्सपोझरास गुणावें न ह्या गुणाकारास ज्या प्रकारची प्लेट वापरली असेल, त्या प्लेटच्या नांवा खालील आंकडा यानें गुणावें, ह्मणजे तें बरोबर एक्सपोझर झालें.

उदाहरणार्थः—आपण १६ डायफाग्राम वापरला असून आपणास सावली असलेल्या खुल्या जागेंत मनुष्याची तसबीर काढणें आहे, ती वेळ मे महिन्याची दुपारची ४ वाजतांची असून, आकाशांत ढग आलेले आहेत, तेव्हां या चारही कोष्टकांपासून नक्की काय एस्कपोझर येईल, हें पाहूं. पहिल्या कोष्टकांत सावली असलेल्या खुल्या जागेंतील मनुष्य या विषया समोर व १६ नंबरच्या डायफाग्रामच्या ओळीच्या खालीं दोन सेकंड असें आहे, दुसऱ्या कोष्टकांत मे महिन्याच्या समोर सकाळचे ८, व दुपारचे ४, या सदराखालीं १½ असा आंकडा आहे, तेव्हां पहिल्या २ सेकंडांस १½ यानें गुणल्यानें ३ सेकंद असें उत्तर येतें. पुढें तिसऱ्या कोष्टकांत पाहिलें असतां ढग या सदराखालीं ४ हा आंकडा आहे. तेव्हां या ३ ला ४ नीं गुणलें ह्मणजे १२ उत्तर आलें ह्मणजे वरीलप्रमाणें स्थिति असतानां जर १२ सेकंड एक्सपोझर दिलें तर तें ऑर्डिनरी प्लेटला बरोबर होईल व स्पेशिअल रॅपीड प्लेट असल्यास त्याच्या पावपट ह्मणजे ३ सेकंड एक्सपोझर लागेल.

---

## " आनंदवनभुवन आणि वारकरी. "

श्रीयुत भालाकारांनीं " आनंदवनभुवनाचा " उतारा देऊन सजाण अथवा अजाणपणें वारकऱ्यांना ' वर्माणि कृन्तत ' लेख लिहिला त्यावर ह. भ. प. मुमुक्षु कर्ते. राष्ट्रधुरीण श्री. राष्ट्रमतकर्ते, आठविलें असतां सजल नेत्र झाल्याविना न राहविणारे श्री. वंदेमातरम्कर्ते व हास्यरसोत्पादन करणाऱ्यांमध्यें अग्रगणी श्री. हिंदुपंचकर्ते यानीं आपआपल्या शीलास साजेल त्याप्रमाणें लेख व चित्रें देऊन आवड जाणविली. असो.

वरील प्रमाणास महिपतकृत भक्तविजयामधील अठ्ठेचाळीस अध्यायाचा माथितार्थ देऊन तंट्याला झाला तर ' मूले कुठारः ' घालावा असा मानस आहे.

" संतशिरोमणी तुकारामाचें आपण होऊन दर्शन घ्यावें या इराद्यानें मुसलमानाच्या प्राबल्यातिरेकानें सिंहगडांत त्यावेळीं असलेल्या आपल्या निवासस्थानापासून कोणाला न कळतां रात्रीं शिवरायाची स्वारी सडी घोड्यावर बसून पुण्याला निघाली व लवकरच तुकाराम ज्या वाण्याच्या घरीं कीर्तन करीत होते तेथें पोहोंचली. पण मुसलमान लोक आपण गाफील रीतीनें येथें असल्यामुळें आपणाला पकडून नेतील ही भीति मनुष्यस्वभावाप्रमाणें त्यांच्यांतही उत्पन्न झाली. त्या दिवशीं एकादशी असल्यामुळें कीर्तनाला बहारी आली होती. सगळें देऊळ ' विठ्ठल रखुमाई, विठोबा रखुमाई ' या नामघोषानें दुमदुमून गेलें होतें

इतक्यांत चाकण किल्यावरून तेथील सुभेदारानें दोन हजार पठाणस्वार शिवरायास पकडण्यास गुप्तहेरांच्या सांगण्यावरून पाठविले. ज्या वाड्यांत कथा चालली होती त्या वाड्याला स्वारांनीं गराडा दिला. आपल्या मालकाच्या हुकुमाप्रमाणें ते शिवाजीला बांधून नेणार होते. त्या वेळीं श्री भालाकारांच्या वेळेसारखा वारकरी व धारकरी यांच्यामध्यें बेबनाव नव्हता म्हणून साधु तुकारामानीं श्री. भालाकारांच्या भावी धारकरी पंथाच्या ' अग्रेसरकेसरी ' ला आपल्या पाठीशीं घातलें. आपल्या करुणारसपूर्ण वाणीनें श्रीविठ्ठलाला आळवून शिवरायाचें स्वरूप घेववून रक्तपातावांचून पठाणांचा निःपात केला व शिवरायावरील संकटाचें परिमार्जन केलें. " याची उतराई प्रत्यक्ष शिवरायाकडूनही होणार नाहीं. या वेळीं महाराज स्वतः असते तर तुकारामाच्या निंदकाला हत्तीच्या पायाशींच दिला असता.

---

कृष्णसुत.

...जि. सातारा

## इहवृत्त आणि निवडक वेंचे.

**खानापूर**–मृगनक्षत्राचा पाऊस झाला व त्यायोगानें तूर्त हंगाम चांगला साधला आहे. आतां लौकरच खऱ्या बरसातीस सुरवात झाली पाहिजे. गांवांत बरेच दिवसांपासून पटकीचा आजार आहे. आतां थंडाईचे दिव. असल्यामुळें कमी होईल असें वाटतें. दैविक उपायही सुरू आहेत.

—कान्स्टँन्टीनोपल येथें आजपावेतों एकंदर ३९ सुलतान झाले; त्यांपैकीं ३४ अपघातानें मरण पावले.

—ग्लाडस्टनसाहेब इग्लंडचे प्रधान होते तथापि ते इतके साधे होते कीं जोडे बगलेंत मारून त्यांस ठिगळें लावण्यासाठीं ते स्वतः चांभाराच्या घरीं जात.

—इराणच्या शहाजवळ कुराणाची प्रत आहे. तिची किंमत २॥ लक्ष रु.आहे. तिचें आच्छादन सोन्याचें असून त्याला १०९ हिरे व १६७ मोत्यें आहे.

—लॉर्ड डफरीन ह्यांच्या संग्रही शीखलोकांच्या धर्मग्रंथाची एक प्रत आ. तिचा आकार पोष्टाच्या तिकिटीच्या अर्ध्याएवढा आहे.

—बंदुकीच्या गोळीनेंही फुटणार नाहीं असें एक चिलखत बनविण्याच युक्ती एका जर्मनगृहस्थानें शोधून काढली आहे.

—हिराकस-हा ऑक्सीजन वायु. गंधक व लोखंड मिळून झाला आहे.

—शेंदूर–हा ऑक्सीजन वायु व शिसें मिळून झाला आहे.

—मीठ-हें क्लोराइनवायु व सोडिअम मिळून झालें आहे.

—मनशीळ- हा सोमल व गंधक मिळून झाला आहे.

—सफेता- हा ऑक्सीजनवायु, शिसें व कार्बान मिळून झाला आहे.

—सोरा-हा पोटेशिअम् धातु, नैट्रोजनवायु व ऑक्सीजनवायु मिळून झाला.

—हरताळ-हा सोमल व गंधक मिळून झाला आहे.

—हिंगुळ-हा पारा व गंधक मिळून झाला आहे.

—पापडखार–हा ऑक्सीजनवायु, कार्बान व सोडियमधातु मिळून झा.

—मुरदाडशिंग-हें शिसें व ऑक्सीजनवायु मिळून झालें आहे.

—बेळगांव येथील प्रसिद्ध पेढीवाले नरसिंगराव राणोजी माने यांस गेल्या १८ तारखेस अतिसारानें एकाएकीं देवाज्ञा झाली हें कळविण्यास मित्रास फार दुःख होत आहे. लौकरच यांचें अल्पचरित्र मित्रांत देण्याचा विचार आहे.

———

**सूचना**—या अंकासोबत पालीवाल आणि कंपनीची जाहिरात वाटली जात आहे तिकडे लक्ष असावें.

———